८


खरे उपयोगी संस्कार

•

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक



जीवनसाथ

दुसरी आवृत्ती

जीवनसाथ - 12 पुस्तकांच्या संचापैकी

पुस्तक क्र. 8

खरे उपयोगी संस्कार

•

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजे जीवनसाथ

अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

प्रकाशक
अनिल भागवत
ई 3/21 गिरिजा शंकर विहार
कर्वे नगर, पुणे 411052


प्रथम आवृत्ती : 27 डिसेंबर2015

मुखपृष्ठ : आभा भागवत

टाइपसेटिंग
स्मिता टाईपसेटर्स
1120, सदाशिव पेठ,
पुणे 411030

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स,
1019, सदाशिव पेठ,
पुणे 411030

किंमत 400 रुपये



अनिल भागवत – ओळख

- बांधकाम व्यवस्थापनाचं अमेरिकेत शिक्षण आणि नोकरी
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत बायकोबरोबर प्रवास
- भारतात अतिजलद आणि दर्जेदार बांधकाम व्यवस्थापनाचा अनेक वर्षं व्यवसाय
- तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यांचा रोजच्या आयुष्यात उपयोग करण्याविषयी खास अभ्यास
- 'वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशन' या विषयात डॉक्टरेटचं काम पूर्ण
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह-शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 500 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- जीवनसाथ अभ्यासमंडळ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ समुपदेशन केंद्र – प्रमुख समुपदेशक
- पालक विद्यापीठ – सल्लागार
- इंग्लिश संभाषण वर्ग – प्रमुख शिक्षक
- रोजच्या आयुष्याचं व्यवस्थापन – डायरी प्रशिक्षण – प्रमुख प्रशिक्षक
- सुंदर हस्ताक्षर वर्ग – प्रशिक्षक

- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून अनेक वर्षं लिखाण

पुस्तकं -

1. घर पाहावं बांधून (5 वी आवृत्ती)
2. लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)
3. व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (2 री आवृत्ती)

●●●



शोभा भागवत – ओळख

- मराठी, संस्कृत, इंग्लिश भाषेत पदव्या
- अमेरिकन ग्रीन कार्ड होल्डर असूनही भारतात परत येण्याचा निर्णय
- 8 महिने 50,000 कि.मी. आणि 35 देशांचा स्वतः गाडी चालवत नवऱ्याबरोबर प्रवास
- 2 वर्षं युनिसेफसाठी शैक्षणिक सल्लागार
- गरवारे बालभवन, सारसबाग, पुणे. च्या संचालक (1985 ते 2015)
- भारत सरकारतर्फे शैक्षणिक कार्यक्रमासाठी ब्राझिलला भेट
- इंग्लंड आणि अमेरिकेत पालक-शिक्षण आणि विवाह शिक्षणाच्या कार्यशाळा
- विवाह-शिक्षणाचे 300 च्या वर कार्यक्रम (1997 ते 2015)
- पालक-शिक्षणाचे 1000 च्या वर कार्यक्रम (1980 ते 2015)

सामाजिक कामं -

- पालक विद्यापीठ – प्रमुख सल्लागार
- जीवनसाथ अभ्यासमंडळ – सल्लागार
- अक्षरनंदन शाळा – सल्लागार
- महाराष्ट्र पालक शिक्षक संघ – कार्याध्यक्ष
- डॉ. स्नेहल अशोक स्मृती न्यास – विश्वस्त
- हुजूरपागा नियामक मंडळ – सदस्य
- लेखन – वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून सातत्यानी लेखन

पुस्तकं

1. आपली मुलं (राज्य पुरस्कार प्राप्त)
2. गारांचा पाऊस (राज्य पुरस्कार प्राप्त)
3. मूल नावाचं सुंदर कोडं
4. दिवास्वप्न (अनुवाद)
5. दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा
6. बहुरूप गांधी (अनुवाद)
7. आनंदाच्या पाऊलवाटा
8. देणारं झाड (अनुवाद)
9. मांजरांची वरात (अनुवाद)
10. गंमत जत्रा
11. विश्व आपलं कुटुंब
12. स्त्रियांचे प्रश्न
13. खेळण्यांचा जादूगार - अरविंद गुप्ता
14. सिंह आणि चिंगुली लाल चिमणी (अनुवाद)
15. खट्याळ उंदीर (अनुवाद)
16. अमरपत्र (अनुवाद)
17. शहाणी मुलं छान मुलं (अनुवाद)
18. बियांचे प्राणी (अनुवाद)
19. अंगठ्याची चित्रं (अनुवाद)
20. बोलणारे दगड (अनुवाद)

आगामी पुस्तकं

21. सारं काही मुलांसाठी
22. शिक्षण आणि शांती (अनुवाद)

नाटक – आम्ही घरचे राजे (थिएटर अकादमी)

अनेक लेख, कविता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यक्रमांचं लेखन आणि सादरीकरण

●●●

प्रस्तावना – शोभा भागवत

आमचं ‘जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ’ 1997 मधे सुरू झालं. आमची दोन्ही मुलं तेव्हा लग्नाच्या वयाची होत होती. अनिलला तेव्हा असं सारखं वाटत होतं की, आपण दोघांशी लग्नाबद्दल सूत्रबद्ध बोलायला हवं, पण या वयातली मुलं कुठं आई-वडलांचं ऐकण्याच्या मनःस्थितीत असतात? त्यांच्या मित्र-मैत्रिणींचा गट जमवणं, त्यांच्या पालकांनाही बोलावणं आणि दर रविवारी 2-3 तास एकत्र चर्चा करणं ही कल्पना मात्र त्यांना आवडली, आणि आमच्या घरीच ‘जीवनसाथ’ सुरू झालं.

‘जीवनसाथ’ म्हणजे स्पष्ट विचारांची जीवनभराची साथ. खूप जणांना असं वाटतं की, अविवाहित मुला-मुलींसाठी हे गट चालवतात, म्हणजे हे वधूवरसूचक मंडळ आहे. पण असं लग्न जमवण्यासाठी मंडळ चालवण्यात आम्हा दोघांनाही रस नाही. अर्थात, मंडळाच्या निमित्तानी एवढ्या वर्षांत लग्नाचा अभ्यास करता करता परिचय होऊन बरीच लग्नं ठरली, झाली, टिकली आणि ती विचारपूर्वक झाली याचं आम्हाला समाधान वाटतं.

18 वर्षांच्या अनुभवानी आम्हाला असं वाटतं की, तरुण मुली लग्नाबद्दल खूप विचार करतात. कारण, त्यांना जाणीव असते की, लग्नानंतर पुरुषाचं आयुष्य फार बदलणार नाही, पण बाईचं सगळंच बदलून जातं. या उच्चशिक्षित मुली असं म्हणतात की, लग्न हे काही आयुष्यभराचं ‘अल्टिमेटम’ नाही हे आमच्या पिढीला कळलेलं आहे. त्याचप्रमाणे, एका व्यक्तीशी आयुष्यभर आपण जोडले जाणार, तर ती कशीतरी उरकून टाकायची पण गोष्ट नाही. लग्नानंतर आपलं आयुष्य घडूही शकतं किंवा बिघडूही शकतं. त्यामुळं स्वतः विचार करून स्वतःच निर्णय घ्यायचा. ज्याच्याशी लग्न करायचं त्याच्या संस्कारांची माहिती

करून घ्यायची.

ठराविक 'कांदापोहे' कार्यक्रमाचं स्वरूप बदललं आहे. तरीही अजून परिचयात मोकळेपणा नसतो. शिक्षण, पगार, घरदार, दिसणं या व्यावहारिक गोष्टींकडेच झुकतं माप असतं. माणूस म्हणून एकमेकांची सांस्कृतिक ओळख होत नाही.

एखाद्या जोडीत कुटुंबातल्या पार्श्वभूमीमुळे, वातावरणामुळे मनमोकळा संवाद असला, तरीही लग्नाच्या वेळी विचार नेमका कशाकशाचा करायचा याबाबतीत पालकांना काही कल्पना नसते. मुलांना वाटतं पालक त्यांच्या अनुभवामुळे काहीतरी सांगू शकतील. त्याचवेळी पालकांना वाटतं, आजकालच्या मुलांना सगळं माहिती असतं. शेवटी दोघांकडून मिळून आवश्यक असलेला स्पष्ट विचार कमी पडतो.

आज प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा ध्यास आहे. अशा वेळी वरवर भेटून, बोलून आयुष्यभराचा निर्णय कसा घ्यायचा? लग्न म्हणजे काय एक दिवसाचा सोहळा आहे का? ती आयुष्यभराची दोघांनी केलेली 'कमिटमेंट' आहे.

लग्नाच्या वयात घरून प्रचंड मानसिक दबाव असतो, असंही मुली सांगतात. त्यात घरात आई-वडलांचंच आयुष्य अत्यंत असमाधानी पाहिलेलं असलं, घरात त्यांची एकमेकांना, मुलांना मारपीट पाहिलेली असली, तर लग्नाबद्दल प्रचंड साशंकता असते. अनेक कुटुंबांत दुर्दैवानी तरुण मुलांना मोकळेपणानी बोलता येत नाही. अनेकदा पालकांशी संवादच तुटलेला असतो.

याला उपाय म्हणून, आपल्या समाजात या मुला-मुलींसाठी काय सोयी उपलब्ध आहेत? वधू-वर सूचक मंडळं आहेत, ती पालकांना जेवढी आकर्षक वाटतात, तेवढी मुला-मुलींना वाटत नाहीत. मेळाव्याचा अनेकांनी धसका घेतलेला आहे. विवाहपूर्व समुपदेशन खऱ्या अर्थानी सुरू झालेलं नाही. इंटरनेटचा आधार अनेकजण घेत आहेत, पण त्याची विश्वासार्हता अजून सिद्ध व्हायची आहे. इंटरनेटवर माहितीचा धबधबा असतो, पण त्यातली बरीचशी पाश्चात्त्य असते. स्वतःला उपयोगी असं फारच कमी सापडतं. शिवाय फसवणुकीची खूप उदाहरणं कानावर आलेली असतात.

अशा वेळी परिचयोत्तर विवाह असा काही कुठे पर्याय आहे का, मैत्रीतून विवाह असा काही 'प्लॅटफॉर्म' आहे का, या शोधात तरुण आहेत. त्यामुळेच जिथे केवळ पैशांसाठी काम चालत नाही, पण जिथे समाजकार्य असाही आव

नाही, जिथे कुणाचं दडपण विचारांवर नसेल आणि निर्णयासाठी दबाव नसेल, जिथे तरुणांचा सन्मान जपला जाईल आणि मार्गदर्शन म्हणून उपदेशांचे डोस नसतील, अशा विवाह अभ्यास मंडळाच्या शोधात मुलं-मुली आहेत. ही गरज ओळखून 'जीवनसाथ'ची सुरुवात झाली.

'जीवनसाथ' सुरू केल्यापासून अनिलनी वैवाहिक जीवनात येणाऱ्या प्रश्नांची यादी करून अभ्यासाला सुरुवात केली. विवाहामधल्या प्रश्नांचा अभ्यासक्रम तयार केला. त्याचं 'मॅनेजमेंट' या विषयाचं शिक्षणही आहे आणि व्यवसायही आहे. त्यातली तत्त्वं वैवाहिक जीवनात उपयोगी आहेत. आपण कसे आहोत हे कळणं आणि दुसऱ्याला पारखता येणं, यासाठी त्यानी व्यक्तिमत्त्वाच्या प्रकारांचा अभ्यास केला आहे. विवाहासाठी काय प्रकारची प्रगल्भता हवी हे शोधण्याचं त्याचं काम चालू आहे. त्याचं मानसशास्त्राच्या अंगानी 'वैवाहिक समुपदेशन' या विषयातलं डॉक्टरेटचं काम पूर्ण आहे. पीएच.डी. हातात मिळणं बाकी आहे. क्रिटिकल ॲनॅलिसिस या पद्धतीनी तो तरुण मुला-मुलींना आपले प्रश्न सोडवण्याचा आत्मविश्वास देतो आहे. अतिशय सातत्यानी 'ग्रुप काउन्सेलिंग' आणि 'इंडिव्हिज्युअल काउन्सेलिंग' करतो आहे. त्याची अभ्यासू वृत्ती, शिस्त, चिकाटी, तरुणांशी संवाद साधण्याचं कौशल्य, हे काम यापुढे करण्यासाठी 'ट्रेनर्स' तयार करणं, हे सगळं पाहणं, त्यात मदत करणं हा माझ्या आनंदाचा भाग आहे.

'जीवनसाथ'मधे अविवाहित तरुण-तरुणी तर येतातच, पण नवविवाहित, मध्यमवयीन विवाहित जोडपी, घटस्फोटित व्यक्ती, अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेली मंडळीही येतात. त्यांच्यामधल्या विचारांच्या देवाण-घेवाणीचा सर्वांनाच उपयोग होतो. अनेक प्रश्नांच्या मुळाशी गेलं तर संस्कारामधला फरक हेच कारण सापडतं. नवरा-बायकोच्या संस्कारांच्यात फरक असतो हे समजणं हा सर्वात महत्त्वाचा संस्कार अनिल त्यांना समजावून सांगतो.

इथल्या काहींच्या प्रतिक्रिया बरंच काही सांगतात. 'जीवनसाथ'मधे येणारी कॉम्प्युटर इंजिनिअर मुलगी एकदा सांगत होती– ''माणसाच्या दिसण्यापेक्षा माणसाचं असणं महत्वाचं असतं, ते कसं पारखावं याचं सहज, सोप्या शब्दांत मार्गदर्शन तुम्ही करता, ते मला आवडलं. केवळ नवरा-बायको या नात्यातच नव्हे, तर इतरही नात्यांत प्रत्येकाला 'स्पेस' देऊन जे नातं जोपासलं तर ते अधिक सशक्त ठरतं, हे मला इथं कळलं. लग्न करायचं तर अफाट अपेक्षा ठेवून कसं

चालेल? आपल्याला आयुष्यात काय चालणार नाही, पेलणार नाही, कोणाला नाही म्हटलं पाहिजे याबद्दलचे माझे विचार इथेच स्पष्ट झाले. लग्न या प्रक्रियेकडेच जाणीवपूर्वक पाहण्याचा मार्ग मला इथे सापडला.''

चर्चेत एकदा एक मुलगा म्हणाला होता, ''एखाद्या सुंदर, मादक मुलीशी लग्न आणि मग हनिमून इथपर्यंतचा मुलग्यांचा 'प्लॅन रेडी' असतो, पण पुढं सगळी गडबड गडबड असते. खरं म्हणजे लग्न या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात शाळेत आणि महाविद्यालयातच व्हायला हवी.''

एक मध्यमवर्गीय घरातला खूप न शिकलेला मुलगा. तो सांगत होता –

''आमच्या घरात जे विषय उच्चारले सुद्धा जात नाहीत त्यावर इथे मोकळेपणानी बोलतात हे पाहून मी चक्रावूनच गेलो. मित्राच्या सांगण्यावरून मी इथे आलो आणि मला कळलं की, इथे केवळ लग्नाविषयी नाही, तर आयुष्यातल्या इतर खूप विषयांबद्दल चर्चा होते. आयुष्य स्वस्थ आणि समाधानी कसं होईल हे कळतं. 'ग्रुप डिस्कशन'मधे अनेक माणसांचे विचार कळतात. इतरांच्या प्रश्नांची आणि उपायांची कल्पना येते.''

मॅनेजमेंटचा अभ्यास करणाऱ्या अतिशय संवेदनक्षम मुलीला काही वेगळेच फायदे जाणवले. ''प्रश्नाच्या मुळापर्यंत जाणं आणि मूळ प्रश्नाचं उत्तर शोधणं यांचे संस्कार इथे माझ्यावर झाले. वास्तवाची जाण आली आणि अपेक्षांचा क्रम लावता आला. इथल्या 'प्रेझेंटेशनचा' मला माझ्या 'मॅनेजमेंट स्टडीज'मधे उपयोग झाला. कायम मुद्दे लिहून तयारी करण्याची सवय झाली.''

दुसरी एकजण म्हणते, ''विवाहबाह्य संबंधांवरच्या चर्चा बैठक संपल्यावरही मनात ठसठसत राहिल्या. घटस्फोट होऊ नये यासाठी काय करावं, झालाच तर काय करावं, किती मुलं हवीत, संगोपन कसं करावं, आपलं मरण, जोडीदाराचं मरण, आप्तजनांचं मरण या अत्यंत अप्रिय अशा विषयांवरच्या चर्चांनी मनोधैर्य वाढलं. प्रत्येक बैठकीला येताना, आज काय नवीन शिकायला मिळेल अशी उत्सुकता असते.''

एक अतिशय गंभीर मुलगी आहे. तिनी अतिशय विचारपूर्वक लग्न केलं आहे. ती एकदा चर्चेत सांगत होती– ''लग्न म्हणजे तडजोड आणि ती बाईलाच करावी लागते. पण 'जीवनसाथ'मधे येऊन मुलांमधेही तडजोडीची जाणीव आणि इच्छा निर्माण होते. एकमेकांत खेळीमेळीचं वातावरण असण्यासाठी वैचारिक पातळी जुळणं आवश्यक आहे. विचार जुळले तर 'कम्फर्ट लेव्हल' वाढते.

एकमेकांचे दोष स्वीकारणं सोपं जातं. प्रत्येक माणसात दोष असणारच, मतभेद असणारच, पण ते कमी कसे करायचे त्यावर मार्ग कसे काढायचे ते इथे आल्यावर उमगलं.'' ''आम्ही दोघं लग्नापूर्वी एकमेकांशी करिअर, पैसे, मित्रमैत्रिणी, कुटुंब यांविषयी बोललो. आमचे बरेच विचार जुळत होते. यावेळी निर्णय घेताना आम्हाला अनिलदादांनी सांगितलेली 'क्रिटिकल ॲनॅलिसिस'ची पद्धत उपयोगी पडली. आता लग्न झाल्यावर हा विचार किती महत्त्वाचा होता, ते लक्षात येतं आहे.''

एक रोखठोक मुलगी सांगते, ''मी 'हेडस्ट्राँग' आहे. पटल्याशिवाय काही करणार नाही. मुलं बघताना मी खूप विचार करत होते. पण मुलगे 'टिपिकल माइंडेड' असतात. मग नकार सुरू झाले. बाबांना त्याचा त्रास होऊ लागला. अजूनही मला जे हवंय ते मला सापडत नाही. जीवनसाथमधे लग्न जमलं तर मला आवडेल, पण इथे स्वतःला समजून घेण्याचा आणि इतरांना समजून घेण्याचा एक दृष्टिकोन मिळाला. तो मला उपयोगी पडतो आहे. सर्वांना मतं असतात. ती एकमेकांवर लादू नयेत, हे मी इथं शिकले. आपल्या समाजात मुलग्यांची मतं खूप पारंपरिक आहेत. माझ्यासारख्या मुलींना फार निराशा येते. अशा वेळी जीवनसाथचा, अनिलदादा आणि शोभाताईंचा मला खूप आधार वाटतो.''

आमच्या एक घटस्फोटित सभासद म्हणतात ते मला फार महत्त्वाचं वाटतं– ''सध्या विवाहसंस्थेला आलेलं बाजारी बजबजपुरीचं स्वरूप घातक आहे. नको त्या गोष्टी लग्नसंस्थेत घुसून मूळ मूल्यांनाच छेद देत, पार बोजवारा उडवत आहेत. लग्नाच्या निमित्तानी एकूण मानवी सूक्ष्म, नाजूक, तरल नाती आणि भावभावना यांचा हळुवार गोफ गुंफला जात असतो. त्याचा नितांत सुंदर अभ्यास या मंडळात होतो. आजच्या नव्या विचारांनी कालचा मनस्ताप पुसता येतो, हे मला या अभ्यासाचं सामर्थ्य वाटतं.''

जीवनसाथमधे सातत्यानं गेली पाच वर्षं येणाऱ्या एक मध्यमवर्गीय पालक म्हणतात : ''लग्न ठरवताना पत्रिकेवर अनावश्यक भर असतो, पण मुलामुलींच्या गाठीभेटी, चर्चा जास्त आवश्यक असतात. दोन कुटुंबांच्या परिचयासाठी वेळ देणं आवश्यक असतं, ते होत नाही. जीवनसाथमधे येण्यापूर्वी माझी मतं पक्की नव्हती. 50-50 टक्के दोन्ही बाजू खऱ्या वाटायच्या. पण आता मी योग्य शब्दांत माझा मुद्दा पटवून देऊ शकते. पालकांनाही या अभ्यासाची गरज आहे.

लग्नात पालकांचा पुढाकार नसावा. मुला-मुलींनीच पुढे जबाबदारी पेलायची असते. त्यामुळे मुलांचा पुढाकार आणि पालक फक्त सल्लागार असं व्हायला हवं. पालकांनी योग्य गोष्टींना प्रोत्साहन द्यावं, अयोग्य गोष्टी स्पष्ट, योग्य शब्दांत त्यांच्यासमोर मांडाव्यात, निर्णय मात्र मुलांचाच असावा.

जीवनसाथमधे नकारात्मक गोष्टींचा विचारही करण्याचं तंत्र कळलं. म्हातारपण, आजारपण, मृत्यू यांबद्दलचे विचार पक्के झाले; अनेक अंधश्रद्धा गेल्या, साधी राहणी उच्च विचारसरणी म्हणजे काय हे कळलं. परंपरा पाळणं म्हणजे संस्कार नाहीत हे कळलं. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे इथं मुलांबरोबर पालकांनाही आपल्या वैवाहिक आयुष्यातल्या समस्या सोडवता येतात, याचा दिलासा वाटला. आमचंही आयुष्य 'जीवनसाथ'नी समृद्ध केलं.''

स्वतः अनेक प्रकारची प्रशिक्षणं देणारं आमचं एक अत्यंत उत्साही, कृतिशील सभासद जोडपं म्हणालं, ''वैचारिक देवाणघेवाण फार कमी ठिकाणी होते. इथलं पद्धतशीर विश्लेषण आम्हाला खूप गोष्टी शिकवतं. अनिलदादांचे खास खेळ गमतीबरोबर महत्त्वाचे संदेश सहज देतात. तुम्ही दोघं आधी भेटला असतात तर आम्हाला अधिक चांगले नवरा-बायको होता आलं असतं आणि अधिक चांगले पालकही.'' लग्न आणि मुलांना वाढवणं हे प्रत्येकाच्या जीवनातले महत्वाचे प्रकल्प; पण लोक त्यांच्याकडे पुरेशा गांभीर्यानं पाहात नाहीत. आज झट लग्न पट घटस्फोट ही पद्धत होऊ पाहते आहे. अशा वेळी अशी मंडळं समाजात काही नवं घडवत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

तरुणपणी योग्य वयात जीवनसाथमधे नियमितपणे यायला सुरुवात केली तर फारच छान; पण समजा तसं नाही जमलं तर काय करायचं? ताण आधीच निर्माण झाले असले तर? मला वाटतं 'बेटर लेट दॅन नेव्हर.' मध्यमवयीन, वयस्कर असलं म्हणून काय झालं? दोघांची इच्छा असली तर ताण नक्की कमी करता येतील. घालवताही येतील कारण 'विवाहाचं बिघडलेलं यंत्र कुठच्याही अवस्थेत दुरुस्त करायचा प्रयत्न करता येतो.'

अनिल त्याच्या वैयक्तिक समुपदेशनाच्या कामातही खूप व्यस्त असतो. लोकांना केवढ्या प्रकारचे किती प्रश्न आहेत हे त्यामुळे कळतं. जेवढे करावेत तेवढे प्रयत्न कमीच पडतील इतकी आपल्या समाजाला समुपदेशनाची गरज आहे हे लक्षात येतं.

असं हे जीवनसाथचं काम, वातावरण आणि फलितं! यातला अभ्यास

आणि पुढाकार अनिलचा. माझी इतर कामं सांभाळून मी साथीला असते एवढंच. लोक रविवारच्या या कृतिसत्रांची वाट पाहात असतात याचं फार समाधान वाटतं.

आमची मुलं लहान होती तेव्हा आम्ही दोघांनी पालक-शिक्षणाचा अभ्यास केला. बऱ्याच पालकांपर्यंत तो पोहोचवला. ती वाढत असताना मला बालभवनच्या निमित्तानी चांगलं काम करता आलं. ती लग्नाची झाल्यावर अनिलनी विवाह-अभ्यास पुढं नेला. आता आम्हाला तीन छोटी नातवंडं आहेत. लहान मुलांची काळजी घेण्याची अधिक चांगली सोय समाजात व्हावी यासाठी खूप काही करायचं आहे. त्या त्या वेळी आपल्या समाजातले जे प्रश्न जाणवतात त्यासाठी काम करणं, हे आम्हाला आमचं कर्तव्य वाटतं. इतरांच्या कामाशीही त्यामुळं भरपूर संपर्क असतो. त्या नेटवर्कचा खूप फायदा होतो.

आम्ही दोघं गेली अनेक वर्षं पुण्यातच राहतो. पुण्याचे गुण, दुर्गुण आम्हाला आपोआपच चिकटलेले असणार. अनिलचं सगळं काम जास्तीतजास्त पुण्यातलंच आहे. बरेच संदर्भ महाराष्ट्र, पुणं, कर्वेनगर या भोवतालचे आहेत हे खरं आहे. हे पुस्तक वाचताना तुम्ही जगाच्या कुठच्याही भागात असलात तरी त्यामुळे जागेचे संदर्भ बदलतील. अभ्यासाचे विषय मात्र तेच राहतील.

अनिलचा तत्त्वज्ञान या विषयातला अभ्यास निराळ्या प्रकारचा आहे. तो स्वतः कट्टर निरीश्वरवादी असला तरी त्याचा समतोल वागणुकीचा अभ्यास आणि आग्रह तेवढाच कट्टर आहे. त्या सगळ्या चिंतनातून खरे आधुनिक संस्कार शोधून मांडण्याचं उपयोगी काम त्यानी केलं आहे. त्यातूनच सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य या महत्त्वाच्या विषयाचा जन्म झाला.

– शोभा भागवत

अभ्यास मंडळात या विषयाबद्दल नेमकं काय चालतं

या कल्पनेची थोडक्यात ओळख

मी भाषणं करण्याच्या विरुद्ध आहे कारण त्याचा काही उपयोग होत नाही, अशी माझी खात्री झाली आहे. त्यामुळे मी फक्त कार्यशाळाच घेतो. मला वाटतं की कार्यशाळेनीच थोडासा संस्कार होतो. आत्तापर्यंत 500च्या वर ज्या कार्यशाळा घेतल्या त्याविषयी हे लिखाण आहे. यातला प्रत्येक लेख किंवा लेखाचा भाग म्हणजे एक कार्यशाळा आहे असं समजूया. पण त्या विषयाच्या अनेक कार्यशाळांचा गोषवारा इथे आहे. प्रत्यक्षातल्या कार्यशाळा अनौपचारिक आणि प्रश्नोत्तरं पद्धतीच्याच असतात; पण तो मजकूर त्याप्रकारे संवादांसारखा लिहायचा म्हणजे तो खूप पानांचा होतो. म्हणून ते मुद्दे सलग पद्धतीनी मांडले आहेत.

कार्यशाळांचा मुख्य सूत्रधार बहुतेक वेळा मी असतो. भविष्याचा विचार करून सूत्रसंचालनासाठी आणखी काही लोक तयार करण्याचं काम चालू आहे. सूत्रधारांनी आधी त्या विषयाचा अभ्यास करून माझ्याशी चर्चा करून मुद्दे लिहून तयार ठेवलेले असतात.

अगदी प्रथम माझी या सबंध कामामागची, कार्यशाळेमागची, पुस्तकामागची भूमिका स्पष्ट करतो. ही एक अनेक विषयांची कार्यशाळांची मोठी मालिका चालू आहे अशी कल्पना करून मी हा पुस्तकसंच लिहिला. आपण सगळे एका खोलीत समोरासमोर किंवा गोलात बसलो आहोत आणि प्रत्येक विषयासंबंधी

निरनिराळ्या लोकांची निरनिराळी मतं, शंका, गैरसमजुती आपण सगळे ऐकतो आहोत अशी कल्पना केली आहे. जीवनसाथमधला आत्तापर्यंतचा अभ्यास त्याबद्दल काय म्हणतो हे मी सांगतोय, अशी कल्पना मनात धरलीय.

मला कळायला लागल्यापासून गेली 59 वर्षं मी जे आसपासचं जग बघतोय, परदेशात, भारतभरात, महाराष्ट्रात जे अनुभवलंय ते मला आवडलेलं नाही. थोडक्यात, ज्या दिशेनी सबंध जगाचा, भारताचा प्रवास चाललाय ती दिशा मला योग्य वाटलेली नाही. कुठच्यातरी निराळ्या पद्धतीनी विचार केल्याशिवाय, मार्ग शोधल्याशिवाय मला धडगत दिसत नाही. ज्याला सध्याची परिस्थिती पसंत नसेल त्यानी ती परिस्थिती बदलण्यासाठी धडपड करावी, नाहीतर मुकाटपणी सहन करावं. मी मुकाटपणी सहन करणाऱ्यांपैकी नसल्यामुळे मी तशी धडपड केली, आयुष्यभर केली. त्या सगळ्या प्रयत्नांचा सारांश म्हणजे 'जीवनसाथ'. या अभ्यासाची सुरुवात विवाहाच्या अभ्यासानीच झाली. पुढे मात्र ती सबंध आयुष्याच्या अभ्यासाची संस्था बनली.

मी माझ्या आसपास बघितलं तर मला संतुलित लोकं सहज दिसतच नाहीत. उन्मत्त तरी दिसतात किंवा उदास लोक दिसतात. वागणारे मग्रूर तरी असतात किंवा केविलवाणे असतात.

प्रत्येक पर्वातल्या प्रत्येक काळात समाजाला विचार आणि भावना यांच्या समतोलाचीच गरज असते हे सगळ्यांना तत्त्व म्हणून मान्य असतं. पण पुढे माझ्यासारख्या कोणी म्हटलं की, सध्याचा समाज भावनेच्या बाजूला पार झुकलेला आहे, त्यामुळे या समाजाला विचाराच्या दिशेनी समतोलापर्यंत खेचूया तर ते मात्र मान्य होत नाही.

समाज भावनेच्या बाजूला अतिरिक्त प्रमाणात कशामुळे झुकला हे बघायला गेलं तर दोन गोष्टी स्पष्ट दिसतात. एक म्हणजे प्रत्येक माणूस स्वतःच्या भविष्याची चिंता या एका भावनेमुळे हवालदिल आहे. वरवर बघितलं तर तो गाताना, नाचताना, हसताना दिसेल. पण ते दृश्य फसवं आहे. माणूस आतून घोर काळजीत आहे. त्या चिंतेच्या भावनेच्या ओझ्यामुळे तो झुकलेला आहे.

दुसरं म्हणजे प्रसारमाध्यमांनी सर्वसामान्य माणसाची बुद्धी किंवा विचार करण्याची क्षमता क्षीण केली आणि त्याच वेळेला अतिशयोक्त भावनांचं भडक चित्रण करून त्याला भावनेच्या बाजूला आणखी ढकललं. ही दोन्ही कारणं जरी

समजली तरी सत्य ते सत्यच आहे. समतोलापर्यंत त्याला पोहोचवण्यासाठी स्पष्ट विचारांचं बळ त्याला द्यायला हवं आहे. माझी त्याबद्दल खात्री झाली आहे. मला जर वाटलं असतं की, माणूस फार विचारांच्या दिशेनी झुकला आहे तर मी भावनांच्या दिशेनी त्याला खेचलं असतं कारण शेवटी समतोल हा उद्देश आहे.

या सगळ्या प्रयत्नात दोन मोठ्या अडचणी मात्र आहेत. विचाराच्या दिशेनी खेचणं म्हणजेच विवेकनिष्ठ विचारसरणीमधे खेचणाऱ्याला फार कष्ट आहेत कारण कोट्यवधी लोकांना खेचण्याचा तो लढा आहे, आणि खेचणारे फार कमी आहेत.

दुसरी अडचण म्हणजे विवेकनिष्ठ विचाराच्या पुरस्कर्त्याला लोक कोरडा किंवा भावनाहीन, असंवेदनशील समजतात. ते खरं नाही हे त्याला स्वतःला माहिती असतं. पण लोकांची तशी गैरसमजूत होते, उघड किंवा पाठीमागे टीका सहन करावी लागते. थोडक्यात, या कारणांमुळे हा मार्ग लोकप्रिय होऊ शकत नाही.

मी आता 72 वर्षांचा आहे. शोभा 69ची आहे. हे सगळं पुस्तकात उतरवणं शक्य आहे तोपर्यंत लिहिलेलं बरं असं वाटल्यामुळे मी इथे दोन गोष्टींवर भर देऊन लिहायचं ठरवलं.

1. समाजाचं वैवाहिक आयुष्य, त्याखेरीजचं आयुष्य, त्यातले समाजाचे प्रश्न आणि त्यावर उपाय
2. शोभाच्या आणि माझ्या वैवाहिक सहजीवनाचं चरित्र. सहजीवनाचं चरित्र या शब्दाकडे मला लक्ष वेधायचं आहे कारण हे माझं किंवा शोभाचं व्यक्तिगत चरित्र नाही.

या पुस्तकाबद्दलचा एक निर्णय पक्का केलाय तो असा. व्यवस्थापनशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या माझ्या अभ्यासातल्या तीनही विषयांत मूळच्या अभ्यासातच असे अनेक शब्द आहेत की, त्यांचं ओढूनताणून मराठी भाषांतर करण्याच्या फंदात न पडणं चांगलं. काही भाषांतरित शब्द सोपे, काही आधीच प्रचलित असलेले आहेत ते वापरले. बाकीचे खुशाल देवनागरी लिपीत इंग्लिश शब्द वापरायचे असं ठरवलं, कारण हे पुस्तक लोकांनी वाचावं, त्यांना ते सोपं जावं,

त्यातल्या गोष्टी त्यांनी अमलात आणाव्यात ही इच्छा आहे. मग समजायला कठीण करून कसं चालेल? याबद्दलचे सोपे-कठीण वगैरेचे निर्णय मीच वाचकांबद्दलच्या माझ्या अंदाजानी घेतले आहेत. त्या माझ्या अंदाजात काही चूक आढळली तर नंतर ती जरूर दुरुस्त करीन.

आणखी एक निर्णय घेतला. हे पुस्तक वाचणाऱ्यांपैकी कॉम्प्युटर वाचणाऱ्यांचं प्रमाण जास्त असेल असं मला वाटतंय. त्यामुळे जीवनसाथच्या वेबसाईटवरून हे सबंध पुस्तक बघता येईल, छापता येईल अशी व्यवस्था करणार आहे. ज्यांना कागदावर छापलेली अक्षरंच सोयीची वाटतात त्यांच्यासाठी छापील पुस्तकाचीही सोय असणार आहे. मी आणि शोभा छापील पुस्तकवाले आहोत.

मी स्वतः व्यवस्थापनशास्त्र शिकलेलो असल्यामुळे आणि गेल्या अनेक वर्षांमधे तो विषय शिकवल्यामुळे विषयाचे भाग पाडण्याची मला सवय लागली आहे. वाचणाऱ्यांना ते सोयीचं जाईल याबद्दल माझी खात्री आहे.

एक प्रश्न सगळ्यांना पडेल त्याचं आधीच स्पष्टीकरण करतो. आपलं म्हणणं थोडक्यात मांडावं अशी शिफारस मी अनेक वेळा ठिकठिकाणी केली आहे, तर मग जीवनसाथ म्हणजेच जीवनभर स्पष्ट विचारांची साथ हा विषय समजावून सांगताना एवढी थोरली 3000 पानं आणि बारा पुस्तकं कशासाठी लिहिली? याचं उत्तर असं आहे. 18 वर्षं एवढ्या निरनिराळ्या लोकांशी बोलताना एक गोष्ट लक्षात आलेली आहे. कुठच्या शब्दांत, कुठच्या पद्धतीनी, कुठच्या वेळेला, कोणाला मुद्दा समजेल याला कुठचाही नियम नाही. तो संवाद साधण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे माहिती असलेले सगळे मार्ग वापरायचे, असं मी ठरवलं. त्यामुळे मजकूर वाढला.

किती बारकाव्यात शिरायचं, किती सविस्तर सांगायचं याबद्दल माझा विचार तळ्यात-मळ्यात होता. तो पक्का कशामुळे झाला तो प्रसंग सांगतो. सकाळी चार वाजता नियमितपणी रोज उठून मी हे पुस्तक लिहिण्याचं काम करतोय. मधे व्यायाम, रोजचं आवरणं आणि समुपदेशनाच्या ठरलेल्या वेळा सांभाळून, किंचित टी.व्ही. बघून मी रोज रात्री 10 वाजता झोपतो. त्यातला व्यायाम मला रोज 3 ते 4 वेळा करावाच लागतो, नाहीतर माझी कंबर, खांदे, मान दुखायला लागतात आणि ही सगळी कामं, लिखाण शक्यच होत नाही. व्यायामाबद्दलच्या अनुभवामुळे माझा निर्णय झाला. कसा ते सांगतो. माझ्या

डॉक्टरांनी मला जे व्यायाम सांगितले त्याबद्दल माझी जराही तक्रार नाही. ते सोपे आणि उपयोगी व्यायाम आहेत. ते व्यायाम त्यांनी मला रोज 6 वेळा करायला सांगितले होते. माझी अडचण निराळीच होती. पहाटे व्यायाम नक्की जमायचा. माझं 'काउन्सेलिंग शेड्यूल' सुरू झालं की, त्यात मला मधे दिवसा व्यायाम शक्यच व्हायचा नाही. थोडक्यात, पहाटे आणि रात्री दोनदाच मला व्यायाम जमायचा. अर्थातच तेवढा व्यायाम पुरायचा नाही. शेवटी मान, खांदे, कंबर दुखायचीच. साधारण दोन महिने मी निरनिराळ्या युक्त्या करून बघितल्या. पण त्यांतली एकही युक्ती उपयोगी पडली नाही. त्रास तसाच्या तसाच.

दोन महिन्यांनंतर मी तोच व्यायाम पहाटे आणि रात्री लागोपाठ दोनदा करायला लागलो. म्हणजे त्याची बेरीज झाली चार वेळा व्यायाम. दोन वेळचा प्रश्न उरला. मग मी त्या व्यायामाचे छोटे भाग केले. दिवसभरातल्या वेळापत्रकात जमतील तसे, तेवढ्या मिनिटांत बसतील तसे तुकड्यातुकड्यांत व्यायाम करत गेलो. या पद्धतीनी कधी पाच वेळा तर कधी सहा वेळा व्यायाम व्हायला लागला. माझा प्रश्न सुटला. मला त्यासरशी साक्षात्कार झाला की समुपदेशनार्थींचा प्रश्न, दिनचर्या, स्वभाव, कौटुंबिक प्रश्न, सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन उपायांचे पर्याय सविस्तरपणी मांडले तरच त्याला त्याचा खरा उपयोग होतो. माझे गेले तसे दोन महिने त्रास सोसत वाया जात नाहीत. त्यामुळे या कार्यशाळेत म्हणजेच या पुस्तकात एकदम बारकाव्यात सविस्तर सांगायचं हा निर्णय एकदम पक्का झाला.

ही कार्यशाळा घेताना, हा मजकूर लिहिताना मला अनेक भूमिकांच्यात शिरावं लागणार आहे. दोन मुख्य भूमिका म्हणजे समुपदेशक आणि ज्येष्ठ अभ्यासू मित्र. पुन्हा या दोन भूमिकांमधून बोललेल्या, लिहिलेल्या मजकुराची सरमिसळ होणार हेही निश्चित आहे. कधी मित्र म्हणून गमतीगमतीत एखादी गोष्ट सांगितलेली असेल, तर कधी माझा समुपदेशनातला गंभीर अभ्यास त्यात डोकावेल.

समुपदेशन या सबंध विषयाविषयी खूप गैरसमजुती आहेत. वेड लागलेल्या माणसाला वेड्यांच्या हॉस्पिटलमधे ठेवतात ही गोष्ट सगळ्या भारतीयांच्या मनावर थेट कोरलेली आहे. समुपदेशकाकडे देखील वेड लागलेली माणसंच जातात असा त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे समुपदेशकाकडे जायचा विषय निघाला की, 'वेड लागलंय का?' हा प्रश्न लोकांच्या मनात असतो. ज्याला समुपदेशन म्हणजे काय हे समजलं त्याचा बरोब्बर उलटा प्रश्न असतो. 'इतका त्रास होतोय तरी

अजून तू समुपदेशकाकडे गेला नाहीस? असा वेडेपणा करू नकोस.’

समुपदेशन या विषयाच्या अंतरंगाच्या पसाऱ्याची लोकांना कल्पना नसते. जीवनसाथमधे 60 विषयांची यादी आम्ही वापरतो. त्यांच्यापैकी विषय निवडण्याचं काम सभासदच करतात आणि दर महिन्याच्या पहिल्या रविवारी एक एक विषय गटचर्चेसाठी ठेवतात. लोकांना पडलेला प्रश्न असा असतो की, आयुष्यात एवढ्या साठ विषयांचा संबंध खरोखर येतो का? माझ्या दृष्टीनी नक्की येतो. माझ्या 72 वर्षांत माझा तर त्यातल्या प्रत्येक विषयाचा संबंध आला बाबा!

आणखी एक प्रश्न अनेकांच्या मनात असतो. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव निराळा असतो. प्रत्येकाचा प्रश्न स्वतंत्र आणि खासच असतो. घडणाऱ्या घटनाही निराळ्याच आणि खास असतात. चांगल्या घटना आणि वाईट घटना दोन्ही त्या त्या व्यक्तीलाच फक्त तपशीलातल्या बारकाव्यासकट माहीत असू शकतात. मग निराळीच कुठचीतरी त्रयस्थ व्यक्ती तो प्रश्न कसा सोडवू शकेल? याचं खरं उत्तर असं आहे की, जगाची लोकसंख्या कितीही असली तरी व्यक्तिमत्त्वाचे प्रकार मोजकेच असतात. चांगल्या आणि वाईट घटनांचेही मोजकेच प्रकार असतात. समस्यांचंही तसंच असतं. व्यक्तिमत्त्वाचे, घटनांचे आणि समस्यांचे या तीन गोष्टींच्या प्रकारांची सांगड कशी घालायची हे समुपदेशकाला माहिती असतं. तेवढी दिशा त्यांनी दाखवली की, प्रश्न सुटण्याच्या दिशेनी एक एक पाऊल पडायला लागतं. समुपदेशनार्थींनी अभ्यास मात्र मनापासून करावा लागतो. अगदी कॉलेजमधे असताना जसा विषय, त्यातले मुद्दे, त्यांचा क्रम, त्यांची प्रश्नोत्तरं, त्यांबद्दल चर्चा, पडताळणी, लिखाण असतं तसं सगळं करावं लागतं.

मी व्यवस्थापनशास्त्र अमेरिकेत शिकलो ते बांधकामापुरतं. त्या ज्ञानाचं भारतीयीकरण केल्याशिवाय त्याचा इथे उपयोग नाही, हे मला पदोपदी जाणवलं. तेवढं केल्यावर मात्र व्यवसायात त्याचा खूप फायदा झाला. माझ्या आणि शोभाच्या वैवाहिक आयुष्यासाठी, कुटुंबासाठी उपयोगी असं त्यात फारसं नव्हतं. ते कसं शोधायचं याबद्दल माझ्या सुप्त मनात सतत विचार चालू होता. मी त्या माझ्या प्रयत्नांना ‘रिलेशन्स मॅनेजमेंट’ असं म्हणायचो. या नावाची काही लोक टिंगल करायचे. ते म्हणायचे, ‘जी रिलेशन्स मॅनेज करावी लागतात त्यांच्यात अर्थच काय?’ खरं असंय, मला शोभाशी बोलताना देखील कुठच्या शब्दांत, केव्हा, कसं याचा विचार करावा लागतो. ती ‘मॅनेजमेंट’च आहे आणि त्यात

वाईट काहीच नाही. शोभाचं माझ्याशी वागताना असंच होतं.

पुढे अनेक वर्षांनी वैवाहिक समुपदेशन या विषयात पीएच.डी. करायची ठरवून मी मानसशास्त्राच्या मार्गानी गेलो. मानसशास्त्रामधे समोर आलेली 'थिअरी' प्रचंड होती. काही गोष्टींचा खोलवर अभ्यास आणि बाकीच्यांचा तुलनेनी वरवर अभ्यास असं ठरवावंच लागलं. मी पूर्वी शिकलेल्या व्यवस्थापनशास्त्रातल्या अनेक मुद्द्यांचा निराळा अर्थ मला दिसायला लागला. त्यामुळे पीएच.डी. 'थीसिस' लिहिताना मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र या दोन्हींचा उपयोग विवाहानंतरच्या आयुष्याला कसा करता येईल याच्या मागे मी लागलो. त्यावेळेला सारखं मनात यायला लागलं की, सगळ्या शास्त्रांच्या, ज्ञानाच्या मुळाशी तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. 'थीसिस'मधे ते शक्य नव्हतं. कारण ठरलेल्या वेळेत आणि पृष्ठसंख्येत ते बसलं नसतं. त्या 'थीसिस'मधे मी माझ्या स्वतःच्या काही कल्पना मांडल्या. गंमत म्हणजे त्यावर जो रिपोर्ट लिहून आला त्यात संशोधन करणाऱ्यानी मी स्वतःची कल्पना मांडली त्याबद्दल टीका केली होती. स्वतःचं डोकं चालवणं याला 'ॲकॅडमिशियन्स'च्या जगात वाईट समजतात हे मला त्यावेळी थप्पड खाल्ल्यासारखं कळलं. मी तर 'सेल्फ मेड' आणि 'अप्लाइड' प्रकारचा माणूस आहे. मी त्याला मान झुकवली नाही. माझ्या दृष्टिकोनातून आत्तापर्यंत थोर लेखकांनी, संशोधकांनी म्हटलं तेच मानत राहणं, बोलत, शिकवत राहणं, यापेक्षा स्वतःचा विचार मांडणं जास्त चांगलं आहे.

त्यामुळे मी साधारण सहा-सात वर्षांपूर्वी 'विवाहाचं तत्त्वज्ञान' या विषयाच्या मागे लागलो. मला हवं ते कुठे सापडेना. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांशी बोललो. 'वैवाहिक आयुष्याचं तत्त्वज्ञान' असा स्वतंत्र अभ्यास झालेला नाही असं कळलं. मग मीच त्या गोष्टी वाचून, माझ्या पद्धतीनी मांडायच्या ठरवल्या. मी 'हार्डकोअर फिलॉसॉफी शिकवणारा ॲकॅडेमिशियन' नसल्यामुळे मी जे या पुस्तकात मांडलंय ते तत्त्वज्ञानातल्या विद्वान, अनुभवी लोकांच्या दृष्टिकोनातून अर्धवट आणि निराळंच किंवा विक्षिप्त असू शकेल; पण आता मी थांबायला तयार नाही. मी मांडतो ते उपयोगी आहे याबद्दल मला शंका नाही, कारण मी ते अनेक वेळा बोलून, मांडून बघितलंय आणि तरी मी यामधे कुठच्याही दुरुस्तीला तयार आहे ना! मी स्वतः कुठे कमी पडतो याचा माझा शोध अखंड चालूच आहे. तेव्हाच तर माझ्या वागणुकीत दुरुस्ती होईल. या पुस्तकसंचात मी कसा कसा बदलत

गेलो त्याचीच कहाणी आहे म्हटलं तरी चालेल.

स्वतःला स्वतःबद्दल नीट कळणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण स्वतःच्या शोधाची प्रक्रिया समजली की, इतरांना समजणंही सोपं जातं. ते जमलं की बऱ्याच बाबतींतले छुपे/उघड संघर्ष संपतात, निदान कमी होतात आणि शेवटी माणूस मनःशांतीपर्यंत पोहोचण्याची शक्यता हळूहळू वाढत जाते.

प्रत्यक्ष अनुभवानंतर माझी खात्री झालीय की, लोकांना समजणं हाच काहीही समजावून सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. तीच सांगणाऱ्याची खरी परीक्षादेखील आहे. त्या दोन्हींच्या वापराचं म्हणजे थिअरी आणि प्रॅक्टिसविषयी बोलण्याचं माझ्या दृष्टीनी प्रमाण थिअरी एक वाक्य, तर प्रॅक्टिसविषयी 100 वाक्यं असं आहे.

मला वाटणारी अगदी मुळातली गोष्ट प्रथम सांगतो. शब्दशः काहीही म्हणजे अगदी काहीही कोणीही करत असलं, तरी त्याचा हेतू दोन शब्दांत वर्णन करता येतो. 'समाधान मिळवण्यासाठी'. इतरांच्या दृष्टीनी ते कृत्य चांगलं, वाईट, 'ग्रेट' कसंही असो, तो माणूस ती गोष्ट स्वतः समाधान मिळवण्यासाठीच करत असतो. लहानपणीचा स्वतःचा खेळ, अभ्यास, धांगडधिंगाही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतो आणि तरुणांचे वात्रट चाळे, प्रेमप्रकरणं, चांगल्या शिक्षणासाठी केलेली धडपड, करिअरसाठी केलेले प्रयत्नही स्वतःला आनंद मिळवण्यासाठीच असतात. आई-वडलांवर असलेलं प्रेम, आदर, भांडणंही त्यासाठीच आणि अधिक पुढच्या वयातला लग्नाबद्दलचा निर्णयही स्वतःच्या समाधानासाठीच असतो. लग्न न करण्याचा निर्णय असो, अमुक एका व्यक्तीशी लग्न करण्याची कृती असो, शेवटी हेतू एकच. स्वतःच्या मनाविरुद्ध आईवडलांचं मन सांभाळण्याचा निर्णयही शेवटी त्यांचं मन सांभाळण्यामुळे स्वतःला मिळणाऱ्या समाधानासाठीच असतो. समाजासाठी निरपेक्षपणी काहीतरी करू हाही निर्णय स्वतःच्या समाधानासाठीच असतो. इतरांचा फायदा हे त्याचं 'बाय प्रॉडक्ट' असतं.

थोडक्यात, हा सगळा माझा प्रयत्न समाजाच्या जगण्याचा दर्जा सुधारण्यासाठी म्हणजेच 'क्वालिटी लाईफ'साठी आहे. जीवनसाथचं सगळं काम 'प्रिव्हेंटिव्ह' काउन्सेलिंगवर भर देणारं आहे. पण आपल्या समाजात 'क्युरेटिव्ह' कामच जास्त लोकप्रिय आहे आणि मानसिक अस्वास्थ्याच्या बाबतीत काहीच न करता नुसतं सोसणं त्याहून लोकप्रिय आहे. त्याच्याहीपेक्षा वरच्या नंबरवर लोकप्रियतेच्या शिखरावर

जोडीदाराला किंवा मुलांना छळणं आहे. त्याबद्दलचं हे प्रबोधनाचं काम आहे.

लोकांचे अनेक प्रश्न असतात. त्या प्रश्नाचं मूळ शोधायला गेलं तर त्याची मुळं त्यांच्या लहानपणाच्या वाढीत सापडतात. लहानपणी त्यांची वाढ चुकीच्या पद्धतीनी झालेली असते. म्हणजेच पालकांची वागण्यात चूक झालेली असते. त्या पालकांच्या वागण्यातल्या चुकीची कारणं शोधली तर ती त्यांच्या सह-जीवनात सापडतात.

माझा दृष्टिकोन कायम विवेकनिष्ठ बुद्धिवाद्याचा आहे. बुद्धी शब्दावरून आमच्याकडे नेहमी गंमत चालते. मी कुठलाच धर्म मानत नाही, हे सगळ्या जीवनसाथींना माहिती आहे. माझ्या विवेकवादाला ते 'बुद्धिझम' म्हणतात. तो गमतीचा भाग तात्पुरता सोडला तरी एक गोष्ट नक्की. विवेकनिष्ठ विचारांनी सहजीवनाकडे बघता आलं तरच उपाय सापडेल. म्हणून सहजीवनाबद्दल काहीतरी करता येतं का बघूया. त्यासाठी या पुस्तकसंचाचा महाप्रपंच.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, माणसाला कुठचाही प्रश्न असो, त्यावरच्या उपायाला सुरुवात झाली किंवा केली तरी स्वस्थ वाटतं.

ज्या अनेक प्रश्नांविषयी मी काम केलं आणि अजूनही करतोय त्यामधला भारतीयांच्या मनावरचा एक मोठा चुकीचा संस्कार बऱ्याच प्रश्नांना कारणीभूत आहे असं मला वाटतं. तो म्हणजे दैवी शक्तीवरचा विश्वास आणि परावलंबन. त्या घोटाळ्यामुळे खरे संस्कार म्हणजे त्या शक्तींची आराधना असा गैरसमज झाला. मी या पुस्तकात मला समजलेला खऱ्या संस्काराचा अर्थ सविस्तर सांगितलेला आहे. समाजकार्याचा खरा अर्थही माझ्या दृष्टीनी त्या समजेमधूनच निघतो. जीवनसाथचा अर्थ वर्णन करणारा एक परिच्छेद इथे सांगतो.

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच. नशिबानी चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वतःला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

●

खरे उपयोगी संस्कार

●

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

जीवनसाथ

जीवनभर स्पष्ट विचारांची साथ म्हणजेच जीवनसाथ

अनुक्रम

पुस्तक क्र. 8

●●●

1

दैवी शक्तींविषयी सत्यशोधकाची भूमिका

1) ईश्वर इत्यादी पॅकेज मधून मुक्ती

अनेकवेळा मी निरनिराळ्या ठिकाणी 'जीवनसाथ' शब्दाचा माझ्या मनातला अर्थ सांगितला आहे. तरी या विषयाशी त्याचा फार जवळचा संबंध असल्यामुळे पुन्हा एकदा सांगणार आहे.

आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं मर्म एकच. नशिबानी चांगल्या वाईट अनेक गोष्टी प्रत्येकाच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते प्रत्येकानी स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या गोष्टींच्या सगळ्या अंगांचा अभ्यास प्रत्येकाला स्वतःलाच करावा लागतो. तो अभ्यास करण्यासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. 'जीवन'भर स्पष्ट विचारांची 'साथ' म्हणजे जीवनसाथ.

'ईश्वर-धर्म-जात-पुनर्जन्म-नशीब-ज्योतिष-पत्रिका-शुभाशुभ-कर्मकांडं-रीतिरिवाज-रुढी-परंपरा' या सगळ्या विषयांचा मी स्पष्ट विचार आणि अभ्यास केला. त्याबद्दल माझे निष्कर्ष स्पष्ट झाले. तुम्ही स्वतःदेखील या सगळ्याचा जरूर अभ्यास करा आणि स्वतः निष्कर्ष काढा अशी मी विनंती करतो. माझ्या दृष्टिकोनातून ह्या सगळ्या गोष्टी म्हणजे एकत्र पॅकेज आहे.

स्वतःचा धर्म हिंदू आहे किंवा ख्रिश्चन किंवा मुस्लिम आहे म्हणताक्षणी देव त्या शब्दाला आपोआप चिकटतात. जात जोडली जाते. पुनर्जन्म या कल्पनेचा समावेश होतो. ज्योतिष, शुभाशुभाची कल्पना, स्वर्ग-नरक, कर्मकांडं, रीतीरिवाज, व्रतवैकल्यं, रुढी- परंपरा या सगळ्या कल्पना गाठोड्यात सक्तीनी बांधाव्याच

लागतात. सगळं पॅकेज स्वीकारायचं किंवा सगळं सोडायचं, हा निर्णय घ्यावा लागतो.

जीवनसाथमधे तत्वज्ञानातला एक विषय अभ्यासासाठी आम्ही ठेवलाय. तो म्हणजे 'आयुष्यातले आनंदाचे अनुभव.' त्याविषयी स्वतंत्र लेख आहेच. इथे मी तुम्हाला एवढंच सांगतो की, या आत्ता सगळ्या विषयांच्या अभ्यासानंतर मी पॅकेजमधून पूर्ण मुक्त झालो याचा मला अतिशय आनंद होतो. समोरचा माणूस देव मानतो का नाही हे समजून घेण्यातला माझा रस संपला. तो माणूस सगळ्यांशी कायम सरळपणी, सज्जनपणी वागतो की नाही या एकाच गोष्टीत मला रस असतो.

जीवनसाथ हे एकेकाळी 'विवाह अभ्यास मंडळ' म्हणून सुरू झालं. त्यानंतर हळूहळू जरा जास्त व्यापक स्वरूपाचं काम करायला हवं आहे असं लक्षात आलं. इतर अनेक विषयांचा विवाहाशी संबंध आहे हे मला पटलं होतं. ईश्वर, धर्म, जात, पुनर्जन्म, संस्कार, रुढी-परंपरा या विषयांच्या खोलात जाऊन अभ्यास केल्याशिवाय आयुष्यातले प्रश्न सोडवता येणार नाहीत हे स्पष्ट झालं होतं.

त्यानंतर या सगळ्या विषयांच्या कार्यशाळांना जोरात सुरुवात केली. त्याचबरोबर नावही बदलून 'जीवनसाथ अभ्यास मंडळ' ठरवलं. एवढ्या सगळ्या विषयांचा आयुष्यात खरोखर संबंध येतो, याविषयी अजूनही काहींना शंका असते. तो संबंध पटवून देण्याचं काम अखंड चालू असतं. मनःशांती मिळवण्यासाठी प्रत्येकाला स्वतःला काय शक्य आणि काय अशक्य हे कळण्याची जरूर असते. जे शक्य ते करायला थेट सुरुवात करायची. त्याचबरोबर जे अशक्य ते डोक्यातून काढून विसरायला सुरुवात करायची. जीवनसाथमधल्या चर्चांमधे या दोनही प्रक्रियांना सुरुवात होते ती महत्त्वाची असते.

●

2) जन्मापासून पॅकेजबद्दलचे प्रश्न

आपण जन्म घेतो तेव्हा 'भूक लागली' याखेरीज आपल्याला काहीच समजत नसतं त्यामुळे ईश्वर इत्यादी कल्पना स्वतःहून मनात येण्याचा प्रश्नच नाही. थोडं थोडं मोठं होताना नशिबानी ज्या कुटुंबात, ज्या आईच्या पोटी आपण जन्म घेतलेला असतो ते लोक म्हणजे आसपास जे असतील ते केव्हातरी आपल्याला इतर गोष्टी शिकवतात. त्याचे प्रत्येकाचे टप्पे, क्रम निराळे असतात. मला आठवतंय् तसं आणि तेवढं मी इथे लिहितो. वाचणाऱ्याला जे आठवत असेल ते त्याने स्वतःच्या संदर्भात आठवून बघावं. माझे त्याबद्दलचे टप्पे, प्रसंग आणि त्यांचा माझ्यावर झालेला परिणाम निराळा असणार आणि माझ्या बायकोचं, शोभाचं कुटुंब निराळं असल्यामुळे तिच्यावर झालेले परिणाम निराळे असणार हे उघडच आहे. पण मी माझ्यापुरतंच लिहितोय्.

मला आठवतंय् तसं साधारण दोन वर्षांचा असताना मला बाप्पाकडे बोट दाखवून तसं म्हणायला शिकवलं असावं. तिसऱ्या वर्षापासूनचं मला खरं म्हणजे नीट आठवतंय. आई घरात देवपूजा करायची. माझी आई आता हयात नाही त्यामुळे तिला किंवा कोणालाच त्याबद्दल विचारणं शक्य नाही. प्रत्यक्षात आईचे वडील नास्तिक होते. तसं ते स्पष्ट सांगायचे. चांगले शिकलेले सरकारी नोकरीतले एल.सी.पी.एस. 'डॉक्टर बाळ' होते. त्यांची बायको म्हणजे माझ्या आईची आई लवकर वारली. माझे मामा नास्तिक होते. अशा वातावरणात आई देवपूजा का करायची हे कोडंच आहे. ज्या काळात आम्ही वडलांना प्रश्न विचारायला लागलो तेव्हापासून वडील देवपूजा करताना कधी बघितलं नाही. ते म्हणायचे, कुठच्या तरी अदृश्य शक्तीवर माझा विश्वास आहे, पण मूर्तिपूजेवर नाही.

देव मानणं आणि मूर्तिपूजा यांतला फरक मला तेव्हा खरं म्हणजे समजलाच नव्हता. एवढ्या काळानंतर हा फरक स्पष्ट झालेला आहे की, नुसत्या देव मानणाऱ्या माणसाला रोज काहीच करायचं नसतं. कुठच्याच रोजच्या कृतीतून ती व्यक्ती देव नावाच्या शक्तीला मानते हे स्पष्ट होत नाही. याउलट मूर्तिपूजा मानणारी व्यक्ती रोज प्रत्यक्ष देवाची पूजा करताना दिसते. फुलं, गंध, वस्त्र, प्रसाद, प्रार्थना असं काहीतरी दृक्‌श्राव्य कृत्य असतं. ते करणाऱ्याला आणि

बघणाऱ्याला रोज ईश्वरवादाची आणि त्याच्याबरोबर जोडलेल्या सगळ्या गोष्टींची आठवण होते. ईश्वरवाद अधिकअधिक प्रसार पावतो. मूर्तिपूजा न करणारी पण देव मानणारी माझ्या वडलांसारखी माणसं तेव्हा फार कमी होती.

त्यांचे वडील म्हणजे माझे भागवतआजोबा आम्ही मधूनमधून पुण्याला सुट्टीवर यायचो तेवढेच भेटायचे. ते रोज देवपूजा करायचे तेव्हा आम्ही मुलं आसपास खेळत असायचो. आजोबांचा देवावर, पूजेवर खरा विश्वास नसावा. निदान त्यांची वागणूक तरी तशी होती. पूजा करताना ते आमच्यावर रागवायचे, मधेच राजकारणातल्या घडामोडींविषयी बोलायचे. या सगळ्या पार्श्वभूमीमुळे बहुतेक सातव्या-आठव्या वर्षापासून माझ्या डोक्यात देवाबद्दल शंका सुरू झाल्या.

लहानपणी अभ्यासाची मला गोडीच लागली नाही. शाळेतल्या काही मित्रांच्यात रामकाठी नावाचा विषय निघायचा. उजव्या अंगठ्याच्या नखानी स्वतःच्या कपाळावर मध्यभागी उभ्या गंधासारखं खरवडून सालं काढायची. दुखतं, पण संपूर्ण आयुष्याचं, (अर्थात नावडत्या अभ्यासासकट) कल्याण होतं. आम्ही काही मित्रांनी अशी रामकाठी नावाची जखम करून घेतली. घरचे लोक ओरडले, हसले आणि काही महिन्यांनी तो कपाळावरचा व्रण नाहीसा झाला. उपयोग अर्थातच शून्य.

मग आम्ही सगळे ठाण्याला राहायला आणि मुलं शाळेला गेलो. माझी शाळेची नावड वाढली होती. मी शाळेच्या वेळेत घरातून बाहेर पडायचो नि शाळा संपायच्या वेळेला घरी यायचो. एक-दोन आवडते विषय सोडले तर सगळी शाळाच नावडती असल्यामुळे दिवसभर मित्रांच्यात क्रिकेट खेळणं, सिगारेट ओढून बघणं आणि वयानी मोठ्या मित्रांबरोबर बायकांच्या चित्रांची मासिकं बघणं हा उद्योग चालायचा. माझी मोठी बहीण निराळ्या वरच्या इयत्तेत पण त्याच शाळेत असल्यामुळे घरी आईला सगळी बातमी रोज कळायची. रोज आई मारायची, शिक्षा करायची.

माझा सख्खा काका वाईट संगतीमुळे बिघडून घरातून निघून गेला हे आम्हाला ऐकून माहीत होतं. बहुतेक त्यामुळे दोन बहिणींच्या मधला एकटा मुलगा एवढ्या वाईट संगतीत असतो ह्याची आईवडलांना धास्ती असावी. परिणाम एकच. रोज आईचा मार, आईनी केलेली शिक्षा आणि वडील संध्याकाळी आले की त्यांचा मार. शिक्षा म्हणजे देवाच्या पाया पडण्याची, कोपऱ्यात तोंड करून उभं राहण्याची आणि 'देवा, मी यापुढे असं वागणार

नाही,' असं अनेक वेळा मोठ्यांदा म्हणण्याची असायची.

माझ्या आईला मला सुधारण्यासाठी दोनच गोष्टी बहुधा माहीत होत्या. देवासमोर उभं करणं आणि मारणं. माझी आई खरी बुद्धिमान होती. पालकत्वाचं पद्धतशीर शिक्षण तिनी घेतलं नसलं म्हणून काय झालं? या दोन्ही गोष्टी नुसत्या निरुपयोगीच नाहीत तर अपायकारक आहेत हे तिला कळलं असतं तर फार निराळ्या गोष्टी घडल्या असत्या.

प्रत्यक्षात मी सुधारलो नाही. रोज मार, शिक्षा चालू आणि सगळं चुकीचं वागणंही चालू राह्यलं. माझ्या वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षी माझी मुंज केली. बहुधा वडलांच्या निर्णयामुळे गोटा केला नव्हता. भटजी होते, मंत्र होते, कसला तरी कुंड, अग्नी, प्रदक्षिणा होत्या. बरेच पाहुणे आलेले होते. जेवणावळी होत्या. कानात मला माझं नवीन नाव सांगितलं. काय होतं ते आठवत नाही. माझ्या वागणुकीत मुंजीमुळे सुधारणा होईल अशी आईवडलांच्या मनात आशा असावी. तसं काही झालं नाही.

मुंज हा संस्कार निरर्थक आहे याबद्दल माझी खात्री झाली. पुढच्या टप्प्यांचा विवेकनिष्ठ विचार चालू झाला.

●

3) पॅकेजबद्दल स्वतःची भूमिका

तेराव्या वर्षी मी नवव्या इयतेत गेलो आणि माझ्या वागणुकीत फरक पडला. आत्ता मी वर्णन करतोय तेवढी स्पष्ट अर्थातच नाही, पण स्वतःच्या आयुष्याची स्वतःवर असलेली जबाबदारी मला कळायला लागली. अभ्यासाला पर्याय नाही हे कळलं. शिक्षण, पुढची करिअर, स्वतःचं भविष्य याविषयी स्पष्ट विचार चालू झाले. मी सुधारलो. संस्कार नावाचं एक खूप मोठं गाठोडं ऊर्फ पॅकेज खरोखर उपयोगी आहे का नाही, याचा अभ्यास सुरू झाला.

स्वतःच्या आयुष्याचा भार स्वतः एकट्याला पेलायचा आहे म्हणजेच दुसरी कुठचीही शक्ती याची जबाबदारी घेणार नाही हे मला कळलं. देवाच्या अस्तित्वाबद्दल, धर्माबद्दल, जाती, रूढी, कर्मकांडं यांच्याबद्दल झपाट्यानी विचार सुरू झाले. चिंतन चालू झालं. चौदाव्या वर्षापर्यंत विचार बरेच स्पष्ट झाले. पंधराव्या वर्षी मी घरात जाहीर करून टाकलं की, 'देव, पूजा, उत्सव, कर्मकांडं' या कशात यापुढे मला धरू नका. मला आणखी छान,जबाबदार, आत्मनिर्भर वाटलं. जबाबदारी वाढली. शिक्षण, व्यायाम ह्या गोष्टी एकाग्रतेनी चालू झाल्या. अशा तऱ्हेनी माझा सत्यशोधक म्हणून प्रवास चक्क तेराव्या वर्षी चालू झाला होता.

भागवत कुटुंबात माझ्या पुढाकारानी 'गाठोड्यापासून मुक्ती' आंदोलन सुरू झालं खरं, पण कुटुंबियांचा म्हणावा तसा प्रतिसाद लगेच मिळाला नाही. त्यावरून आणखी एक गोष्ट कळली. इतर कुठच्याही प्रवासाप्रमाणेच मुक्तीच्या प्रवासाचे अनेक टप्पे, स्टेशनं असणार आणि निरनिराळी माणसं निरनिराळ्या स्टेशनांवर असणार.

पण एका गोष्टीबद्दल माझी खात्री झाली. ईश्वर, धर्म, जात, पुनर्जन्म, शुभ-अशुभ हे सगळे विकार आहेत. आजार म्हटलं तरी चालेल. विकार म्हटलं की 'निर्विकार' शब्द आठवतो. गंमत वाटते. मला मात्र 'निर्आजार', आरोग्यपूर्ण, बनायचं होतं. त्याचा मी अभ्यास करायला सुरुवात केली.

●

4) सध्याच्या प्रश्नांना उपाय

त्यापुढचं कॉलेजचं शिक्षण, नोकरी, परदेशात वास्तव्य, तिथलं शिक्षण आणि परदेशातच लग्न अशा पायऱ्यांनी मी पुढे गेलो, पण त्या इतिहासात आत्ता आपल्याला शिरायचं नाही. या सगळ्याचा आयुष्याशी संबंध मला इथे उलगडायचा आहे. तरुण, मध्यमवयीन, ज्येष्ठ सगळ्या लोकांचं सध्याचं जीवन मी समुपदेशनामुळे व्यवस्थितपणी समजावून घेतलं आहे. त्यांच्या आयुष्यातले सगळे खरे प्रश्न अभ्यासल्यावर लक्षात येतं ते असं की, सध्याच्या कुठच्याही प्रश्नाला देव, धर्म, त्यामधले उत्सव, कर्मकांडं उत्तरं शोधू शकत नाहीयत. उलट असं दिसतंय् की, खऱ्या गंभीर प्रश्नाचं खरं उत्तर शोधायला जी सतर्क बुद्धी लागते, विचार लागतो तो लोकांना शक्य होत नाहीय्. अस्सल खऱ्या विवेकवादी विचाराला पर्याय नाहीय्. देव, धर्म, जाती, पुनर्जन्माची कल्पना, कर्मकांडं, सण, उत्सव, व्रतवैकल्यं, रूढी या सगळ्या गोष्टी म्हणजे तर विचारप्रक्रियेची कुंपणं आहेत.

खास करून हा वैवाहिक आयुष्याला उपयोगी अभ्यास असं समजायचंही कारण नाही. एखाद्या माणसानी लग्न नाही करायचं असं ठरवलं तरी आयुष्यासाठी उपयोगी अशी धोरणं त्याला शोधावीच लागतात.

आधीच्या मार्गांनी पुढे जाणं बंद करून, मागे फिरून मूळ बेचक्यापाशी आलं तरच दुसऱ्या वाटेनी जाता येईल हे देखील स्पष्ट झालं. निराळ्या शब्दात सांगायचं झालं तर इतर दारं बंद केल्याशिवाय विवेकवादी विचाराचं दार उघडताच येणार नाही हे ठरलं.

●

अस्सल खऱ्या विवेकवादी विचाराला पर्याय नाहीय्. देव, धर्म, जाती, पुनर्जन्माची कल्पना, कर्मकांडं, सण, उत्सव, व्रतवैकल्यं, रूढी या सगळ्या गोष्टी म्हणजे तर विचारप्रक्रियेची कुंपणं आहेत.

5) तत्त्वज्ञानाची गोडी

गेली काही वर्षं मी जाणीवपूर्वक तत्वज्ञानाचा जमेल तेवढा अभ्यास करतोय. 2500 वर्षांपासूनचा तत्वज्ञानाचा अभ्यास मला शक्यही नव्हता, पण विवाहासंबंधी कोण काय म्हणत होतं हे शोधण्यासाठी मी बऱ्यापैकी वाचन केलं. त्या ओघात देव ह्या कल्पनेबद्दलही बरंच वाचनात आलं.

'इंडॉलॉजी' नावाच्या विषयात माझी मुलगी आभा हिनी एम.ए. केलं आहे. मराठीत त्याला भारतविद्या म्हणतात. भारतीय संस्कृतीचा इतिहास त्याच्यात शिकवतात. उत्खननातून अनेक शिल्पं, मूर्ती, चित्रं सापडतात. त्यावरून शास्त्रज्ञ इतिहासपूर्व काळात केव्हा काय घटना घडल्या असतील याबद्दल अंदाज बांधतात. एक गोष्ट तिच्या बोलण्यातून अगदी स्पष्ट कळली. देव या कल्पनेला मानवानी विशिष्ट हेतूंनी जन्म दिला. विशिष्ट देवांची भक्ती करणारे विशिष्ट धर्मही मानवानीच शोधले. त्यातले पंथ, कामाप्रमाणे जाती या सगळ्या गोष्टी निश्चित मानवनिर्मित आहेत. कुठच्याही दुसऱ्या अदृश्य शक्तीनी या कल्पना निर्माण केलेल्या नाहीत.

आतापर्यंत अध्यात्माविषयी बोलणारे अनेक जण होऊन गेले. माझ्यासारख्या सत्यशोधक व्यक्तीला अध्यात्माचा साधा रोजच्या भाषेतला अर्थ पाहिजे होता. त्यातल्यात्यात बऱ्याच चर्चा, वाचनानंतर मला त्याचा अर्थ कळला तो असा – अध्यात्म म्हणजे स्वतःच्या आयुष्याचा, जीवनाचा उद्देश स्वतःला कळणं. पुढे असं लक्षात आलं की, उद्देश तर आपण स्वतःच ठरवायचा असतो. तो आपल्या विचारशक्तीवर अवलंबून असतो. थोडक्यात आपल्याच हातात असतो. एक गोष्ट या चर्चांच्यात स्पष्ट झाली. अध्यात्म आणि गूढविद्या या पूर्ण निराळ्या गोष्टी आहेत. गूढविद्या म्हणजे काय हे समजून घेण्यात मला रस नसल्यामुळे सध्या त्याबद्दल इतकंच सांगता येईल.

ऐकणं, वाचणं या गोष्टी महत्त्वाच्या आहेतच, पण स्वतः त्याविषयी चिंतन करणं सर्वांत महत्त्वाचं आहे. रोजच्या आयुष्यात देखील चिंतन होऊ शकतं. त्यासाठी विशिष्ट पद्धतीनी विशिष्ट ठिकाणी बसावं लागतंच असं नाही. ज्यांना रोजच्या दिनचर्येच्या वेळेत चिंतन जमत नसेल त्यांच्यासाठी विपश्यना, त्यासाठीची

केंद्रं आहेत. आणि तरी त्याचा उपयोग सगळ्यांना होतोच असं नाही. ध्यान, त्यासाठी विशिष्ट आसनात बसणं याची काहींना जरूर असते, काहींना नसते. ‘ध्यानाचा अर्थ विचारहीन अवस्था, थोडक्यात मेंदूच्या एका भागाला विश्रांती.’ एवढाच आहे.

स्वतःला अहंकार विसरता आला तर शांती मिळतेच. स्वतः काहीतरी चांगलं काम केलं तरी शांती मिळते. चांगलं काम म्हणजे कुठचाही स्वार्थ नसलेलं दुसऱ्याच्या फायद्यासाठी केलेलं काम.

असं म्हणतात की, आपल्या मनाच्या मूळ प्रेरणा कायम निर्लेप ठेवल्या तर स्वतःला अंतर्प्रेरणेनी योग्य तो संदेश मिळतो. यासाठीच ध्यानाला बसण्याची पद्धत आली. मात्र फार कमी लोकांना ते जमतं. ध्यानामुळे अनेक गोष्टी सुचतात, प्रतिभा वाढते असं म्हणतात. मला स्वतःला ध्यान जमत नाही. दिवसभर वावरताना कामं करतानाच, मला अनेक गोष्टी चिंतनातून सुचतात. मी लगेच त्यांची कागदावर नोंद करतो. इतरांच्यात आणि माझ्यात कागदावर नोंदी हा मोठा फरक आहे.

स्वतःच प्रयत्न करून स्वतःच्या अडचणींवर मात करण्यासाठी अनेक लोकांनी अनेक उपाय शोधले आहेत. ‘लुइस हे’ या बाईंनी लिहिलेलं ‘यू कॅन हील युवर लाइफ’ हे पुस्तक मी वाचलंय. त्याच्या कार्यशाळाही चालू असतात. मला मात्र स्पष्ट कळलं की, ही पद्धत माझ्यासाठी नाही. स्वतः रोजच्या दिनचर्येतच प्रत्येक प्रश्नाविषयी चिंतन करून स्पष्ट विचारानी उत्तर शोधणं हाच माझा मार्ग मी पक्का ठरवला.

●

6) माणसांचे प्रकार

माझ्या विवेकनिष्ठ सत्यशोधक विचारपध्दतीनी मला मुळात माणसांचे दोन प्रकार दिसले : 1.विचार करायची तयारी आणि क्षमता असलेले. 2. विचार करायची तयारी नसलेले किंवा क्षमता नसलेले. या दोन्ही गटांत आपली वागणुकीची पध्दत दुसऱ्यावर लादणारे आणि न लादणारे असतात. यांपैकी कुठच्या प्रकारची समोरची व्यक्ती आहे हे मी सवयीनी ओळखायला शिकत होतो.

या पद्धतीत सगळे मिळून माणसांचे 4 प्रकार होतात.

1) विचारांची क्षमता आणि इच्छा असणारे. याच वाटेनी तर मी प्रवास करतो आहे.
2) विचारांची क्षमता असणारे पण चुकीच्या पध्दतीनी वाटचाल करणारे.

जगात आणि आपल्या भारतात पुरुष सत्ताधारी आहे आणि ज्यांच्याकडे सत्ता नाही त्या स्त्रिया त्याच्या बळी ठरतात. हे चित्र सबंध समाजासाठी अतिशय विघातक आहे. कुटुंबाकुटुंबांत तेच तर चालू आहे. ज्यांच्याकडे राजकीय सत्ता असते, त्यांना स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी इतरांना दुबळं करण्यासाठी धडपड करावी लागते. इतर म्हणजे जनता. लोक जेवढे परावलंबी आणि पांगळे असतील तेवढं चांगलं.

भारतात बुवाबाजीचं एवढं प्रमाण आहे कारण लोग पांगळे आहेत. त्या जनतेला तसं ठेवण्यासाठी सत्ताधारी काहीही करायला तयार आहेत. शासकीय पूजा हा विनोद त्यासाठी तर असतो. ईश्वर, पूजा, भक्ती ही वैयक्तिक गोष्ट आहे, सामाजिक नाही. शासन म्हणजे एक व्यक्ती नाही. त्यामुळे शासनानी पूजा करणं हे नैतिकतेतच बसणारं नाही. सरकारी कामकाजात देखील ईश्वर कुठेही असता कामा नये. सध्या जो चालू आहे तो सरकारी अत्याचारच आहे.

3) विचारांची क्षमता नसणारे पण आपला विचार दुसऱ्यांवर लादणारे. असे लोक मानवजातीचे आणखी एक मोठे शत्रू आहेत असं माझं मत बनलं. स्वतः निर्बुद्ध पण केवळ पुरुष असल्यामुळे बायकोवर गुरगुरणारे बरेच लोक मला माहिती आहेत.
4) विचारांची क्षमताही नाही आणि दुसऱ्यावर सक्तीची इच्छाही नाही. असे लोक संख्येनी खूप असतात, पण निरुपद्रवी असतात.

●

7) विवेकनिष्ठतेचे निकष

स्वस्थ समाजासाठी सात 'स'ची शिफारस केलेली आहे.

1. स्वार्थ - प्रत्येकाला स्वतःची काळजी घ्यायलाच लागते नाहीतर समाजातले इतर 'स' शक्यच होणार नाहीत.
2. सभ्यता - प्रत्येकाबरोबर सभ्य वागणूक
3. समज - परिस्थितीचं आकलन म्हणजेच समज अत्यावश्यकच आहे.
4. समतोल - तो सतत साधत पुढे जावं लागतं.
5. संघटना - या सगळ्यासाठी माणसं जोडावीच लागतात.
6. स्पष्टपणा - स्वतःचे विचार प्रत्येकानी स्पष्टपणी मांडावेच लागतात. विचार न बोलता लपवला तर घोटाळे होतात.
7. समाधान - समाजात या सगळ्या गोष्टी साध्य झाल्या तरच समाधानी समाज निर्माण होणं शक्य आहे.

आणखी एका पद्धतीनी देखील विवेकनिष्ठ विचारसरणीची व्याख्या काहींनी केली आहे.

वि - म्हणजे विचार. स्पष्ट विचार या एकाच गोष्टीत खरी ताकद असते.

वे - म्हणजे दुसऱ्याच्या वेदना समजण्याची संवेदनक्षमता.

क - म्हणजे कर्म म्हणजेच अंमलबजावणी करण्याचं धारिष्ट्य.

खरोखर सांगतो, समाधान मिळवण्यासाठी याशिवाय दुसरा मार्गच असू शकत नाही. नुसतं बोलण्यासाठी, बोलण्यापुरतं काहीच नसतं. सगळं असतं ते आचरणासाठीच असतं. थिअरी निराळी आणि प्रॅक्टिस निराळी ही कल्पना डोक्यातून काढून टाकायची आहे.

●

8) खरा मार्ग

आपल्या आयुष्यातल्या अनेक नात्यांचा विचार करतानाही विवेकनिष्ठ विचारांचाच वापर करावा लागतो. सगळ्या गाठोडं ऊर्फ पॅकेजला सुरुवात ईश्वरवादामुळे होते. सगळ्या नात्यांच्यात त्या गाठोड्याचं ओझं बाळगायचं का नाही हा निर्णय घ्यावा लागतो. आईवडील, मुलं, मित्र, समाज, अनेक नाती सांभाळायची असतात आणि त्याशिवाय लग्नातला जोडीदार. नवराबायकोंची शरीरं, पार्श्वभूमी, वाढ या गोष्टी निराळ्या असतात त्यामुळे मनं निराळीच असणार. तो निराळेपणा समजण्यासाठी उदार दृष्टी आवश्यक आहे.

सत्यशोधक म्हणून माझं सारांशात म्हणणं असं आहे–

● पूर्वीच्या समाजानी सज्जन ईश्वरवादी बघितले तेव्हा समाज समाधानी होता.

● त्यानंतर असज्जन ईश्वरवादी गेली काहीशे वर्षं समाजाचं वाटोळं करतायत.

● आता समाजाला सज्जन निरीश्वरवादी लोकांची गरज आहे. काही शतकं असा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे?

आधी मगाशी सांगितलेलंच पुन्हा सांगतो. तेच मला सर्वांत महत्त्वाचं वाटतं. समोरचा माणूस ईश्वर मानतो का नाही हे समजून घेण्यात मला काही स्वारस्य नाही. तो माणूस 365 दिवस 24 तास प्रत्येकाशी सरळपणी, सज्जनपणी वागतो का नाही या एकाच गोष्टीबद्दल मला जाणून घ्यायचंय. तिथेच तर सगळा प्रश्न आहे. जवळजवळ प्रत्येक माणूस या परीक्षेत नापास होतो आहे.

एका कार्यशाळेत एकानी शंका काढली होती. त्याचं म्हणणं सरळ, सज्जन, चांगलं या शब्दांबद्दल परस्परविरोधी मतं असू शकतात, त्याचं काय? मला हा प्रश्न रास्त वाटतो. त्याचं उत्तर इथे सांगितलंच पाहिजे. स्वतःच्या मनातला विचार प्रचलित, सभ्य शब्दांत शक्य तेवढ्या लवकरात लवकर दुसऱ्यापाशी व्यक्त करणं म्हणजे सरळपणा. प्रत्येक माणसाला स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार असतो, ही मूलभूत कल्पना मान्य करून त्याची अंमलबजावणी

करणं म्हणजे सज्जनपणाची वागणूक. लोकप्रिय रूढींप्रमाणे वागणं हा सज्जनपणाचा अर्थ नाही.

स्वतः मत व्यक्त करताना दुसऱ्या कोणाशीही मतभेद आढळला तर नम्रपणी मतभेद असणाऱ्या व्यक्तीची बाजू मनापासून समजून घेणं म्हणजे चांगली वागणूक. मतभेद लपवून समोरच्या व्यक्तीशी खोटी सहमती दर्शवणं म्हणजे चांगुलपणा नाही.

●●●

- *पूर्वीच्या समाजानी सज्जन ईश्वरवादी बघितले तेव्हा समाज समाधानी होता.*
- *त्यानंतर असज्जन ईश्वरवादी गेली काहीशे वर्षं समाजाचं वाटोळं करतायत.*
- *आता समाजाला सज्जन निरीश्वरवादी लोकांची गरज आहे. काही शतकं असा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे?*

2

ईश्वरवादाबद्दलचा समतोल विचार

1) सर्वांत महत्त्वाची गोष्ट

मगाशी म्हटलं ते पुन्हा सांगतोय कारण ते सर्वांत महत्त्वाचं आहे. माणूस देव मानतो का नाही याला काही महत्त्व नाही. तो माणूस वर्षाचे 365 दिवस संबंधित सगळ्यांशी सरळपणी, सज्जनपणी वागतो आहे का नाही या एकाच प्रश्नाचं उत्तर जाणून घेण्यात मला रस आहे. ते उत्तर नाही असलं तर तो माणूस श्रीमंत असो, सत्ताधारी असो, रूपवान, शक्तिवान, बुद्धिमान असो, प्रसिद्ध असो, पुजारी, देवभक्त, देवाचा प्रेषित असो, माझ्या दृष्टीनी तो नापास असतो. सज्जनपणी वागण्याची व्याख्या मागच्या कार्यशाळेत, लेखात स्पष्ट केली असल्यामुळे पुन्हा सांगत बसत नाही.

मूर्तिपूजेबद्दलदेखील आम्हा विवेकनिष्ठ सत्यशोधक लोकांचं म्हणणं साधं आहे. मूर्तिपूजा करणं, न करणं याला फार कमी महत्त्व आहे. इतरांशी (नवरा, बायको, मुलं, आईवडील, मित्र, सहकारी, कष्टकरी, नोकर, चाकर, सगळे) सज्जनपणी, निःस्वार्थीपणी वागणारा तो माणूस आहे का नाही यालाच फक्त आमच्या दृष्टिकोनातून महत्त्व असतं.

मानसशास्त्रातली एक महत्त्वाची आणि उपयोगी संकल्पना इथे सांगतो. माणसानी ईश्वर या कल्पनेवर विश्वास ठेवायचा का नाही हे मी सांगणार नाही, कोणी कोणाला सांगू नये. स्वतःवर विश्वास असणं हे महत्त्वाचं आहे. कोणी म्हणायला लागला की, माझा स्वतःवर आणि देवावर दोन्हीवर सारखाच विश्वास आहे, तर ते मानसशास्त्राच्या गेल्या 70-75 वर्षांच्या अभ्यासाप्रमाणे पटण्याजोगं

नाही. कोटीकोटींमधे एखादा माणूस असा असतो की ज्याचा दोन्हींवर सारखा विश्वास खरोखरीच असतो. बाकीचे खोटं बोलतात. त्यांचा स्वतःवर पुरेसा विश्वास नसतो. स्वतःवर जास्त किंवा पूर्ण विश्वास असलेली लोकं समाजाचे निरनिराळ्या श्रेणींचे पुढारी बनतात.

सर्वांत ठळक उदाहरण महात्मा गांधींचं. त्यांचा स्वतःवरचा विश्वास इतका प्रचंड होता की ते महामानव बनले. ईश्वर या कल्पनेचा त्यांनी फक्त त्या काळच्या गरजेसाठी वापर केला. जीवनसाथमधे हा विषय काही वेळा गटचर्चेला असतो. बाबा आमटेंनाही लोक महामानव म्हणूनच ओळखायचे. या संकल्पनेच्या संदर्भात त्यांचा विचार जरूर करून बघावा. त्याचबरोबर स्वतःचा आणि कोणाही प्रसिद्ध राजकीय किंवा महान व्यक्तीचा विचार करावा.

बाबा आमटे हा फार थोर माणूस होऊन गेला. अगदी तरुणपणापासून त्यांच्याविषयी एक घटना ऐकली तेव्हा माझी विचारचक्रं जोरात फिरली. बाबा निरीश्वरवादी होते नि साधनाताई ईश्वरवादी. एकदा साधनाताई देवळात आत गेल्या होत्या आणि बाबा देवळाच्या दारात घंटा वाजवत होते. कोणीतरी त्यांना विचारलं, 'तुमचा देवावर विश्वास नाही तर तुम्ही घंटा का वाजवता आहात?' ते म्हणाले, 'माझा देवावर नाही, पण माझ्या बायकोवर विश्वास आहे ना!' बाबा आमटेंची आदरपूर्वक क्षमा मागून मी सांगतो की, मला त्यांचं उत्तर पटलं नाही.

अनेक विचार डोक्यात येऊन गेले. भ्रष्टाचारामधे पैसे घेणाऱ्याला दोषी मानतात तसंच देणाऱ्याला मानतात. गुन्हा करणाऱ्या माणसाला आश्रय दिला तरी तो गुन्हा ठरतो. वाईट किंवा स्वतःला न पटणाऱ्या गोष्टीला मदत करणं म्हणजे काही अंशी ती वाईट गोष्ट स्वतः केल्यासारखीच आहे. मला गणपती उत्सव पसंत नसेल तर मी त्याची वर्गणी भरणंही चूकच ठरेल. मी मद्यपानाच्या विरुद्ध असून मी दारूचा व्यापार केला तर कसं चालेल? माझ्या बांधकाम व्यवसायात मी स्वतः नास्तिक असल्यामुळे देवळाच्या बांधकामांना नकार देत आलो आहे. लोक काहीही म्हणाले तरी मला स्वतःच्या बुद्धीशी प्रामाणिक राहणं महत्त्वाचं वाटतं.

खराखुरा विश्वास म्हणजे काय असतं हो? मला काय वाटतं ते इथे सांगतो. काही बाबतींत शोभाचा आणि माझा मतभेद असतो. तो आम्हा दोघांना माहीत असतो. आणि एखादी मला न पटणारी गोष्ट शोभा करत असली तर एकदा आठवण करण्यापलीकडे मी काही करत नाही. काही प्रसंगांत आठवणदेखील करत नाही. माझा विश्वास असा असतो, 'शोभानी ती गोष्ट करताना काहीतरी

विचार केला असेलच की!' ह्याला म्हणतात विश्वास. पण मला न पटणाऱ्या त्या कृतीत मी भाग घ्यायचा का? मीही काहीतरी विचार केला असणारच ना! त्यामुळे मी त्यात भाग घेता कामा नये. शोभासाठी म्हणून मन मारून मी एखादी मला न पटणारी गोष्ट करत असीन तर तिनी ते मान्य करता कामा नये.

जरा निराळ्या भाषेत ही गोष्ट समजावून सांगतो. 100% सत्य, योग्य किंवा अयोग्य असं काहीच नसतं. विश्वास नव्याण्णव टक्के असतो आणि श्रद्धा 100% असते. म्हणून तर म्हणतात की श्रद्धा आणि अंधश्रद्धा या एकच गोष्टी आहेत. त्या एक टक्क्यानी सगळा घोटाळा होतो. त्यात आंधळेपणा शिरतो.

काही प्रमाणात श्रद्धा, काही प्रमाणात भीती, स्वार्थ अशा अनेक कल्पनांमुळे शेवटी लोकं निरर्थक गोष्टी करत राहतात. कुठच्यातरी विचार-भावनांनी मेंदूतली केंद्रं गुंतून राहावीच लागतात. ही मानवी शरीराची गरजच आहे. विचारहीन अवस्था सर्वसामान्य माणसाला जमतच नाही. कशानी तरी मेंदूतलं विचारकेंद्र भरावंच लागतं म्हटलं की पुढचं सगळं आपल्या लक्षात येतं. दुसऱ्याला छळण्याच्या, अपाय करण्याचा विचारांपेक्षा भक्तीभावनेनी मेंदू भरला तर नक्कीच चांगलं. ईश्वर ही कल्पना यासाठीच पूर्वीच्या लोकांनी परसवली असावी.

पुढे मग त्या भावनांचं, विचारांचं स्वरूप बदलून त्याची कर्मकांडं बनतात. पूजा, प्रसाद, आरती, नमस्कार, ज्योतीवरून हात फिरवणं, डोक्यावरून हात फिरवणं अशा निरर्थक गोष्टींनी दिवस भरतो. पुन्हा एकदा मान्य करतो की दुसऱ्याला त्रास देण्याच्या कल्पनेपेक्षा ही निरर्थक कर्मकांड बरी. करमणुकीसाठी सुनेला छळण्याचा छंद जोपासण्यापेक्षा देवळात जाऊन कीर्तन, भजन, वाती वळणं नक्कीच चांगलं.

या कार्यशाळेतला एक भाग म्हणून मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो तुम्ही ईश्वर मानता का नाही? मानत असलात तर त्याचं कारण सांगता? समजा, मानत नसलात तरी त्याचं कारण सांगता का? हा प्रश्न स्पष्ट विचार करणं आणि तो व्यक्त करणं यासाठी आहे. वैयक्तिक वाद आपल्याला घालायचा नाही. हा प्रश्न काढला की, खरं म्हणजे याचं उत्तर कोणापाशीही नाही हे मला माहीत असतं. माणूस उत्तर काय आणि कसं देतो हेच महत्त्वाचं असतं.

मग लोक देवळात प्रसन्न वाटतं म्हणतात, मन शांत होतं सांगतात, पण प्रश्नाचं उत्तर टाळतात. खरं म्हणजे देवळात छान वाटतं याची कारणं निराळी आहेत. मुख्य म्हणजे तिथे गेल्यामुळे पुण्य मिळतं त्यामुळे यापुढे सगळं भलं

होणार अशी कल्पना असते. याशिवाय देवळाचं छत बरंच उंचावर असतं. सुशोभित असतं. बहुतेक वेळा दगडी असतं. त्यामुळे उकाड्याच्या काळात तिथे थंड वाटतं आणि थंडीच्या काळात उबदार. बहुतेक वेळा फरशी संगमरवरी,कोटा, मार्बल, ग्रॅनाइट अशी कसलीतरी म्हणजे गुळगुळीत आणि शोभिवंत असते. देवळात घंटा असते त्यामुळे तिचा नाद घुमतो. तिथे आलेली माणसंदेखील या सगळ्या गोष्टींच्या दबावाखाली असल्यामुळे त्यांच्या सज्जन वागणुकीची मनात खात्री असते त्यामुळे सुरक्षित वाटतं.

समजा, हाच प्रश्न मला विचारला तर माझं उत्तर काय आहे, ते सांगतो म्हणजे विवेकवादी सत्यशोधकाचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन समजायला सोपं होईल. गेल्या 70 वर्षांत एवढ्या निरनिराळ्या ठिकाणच्या अनेक घटना बघताना एकाही वेळी मला ईश्वराचं अस्तित्व जाणवलेलं नाही. त्यामुळे माझी नव्याण्णव टक्के खात्री झाली आहे की, देव ही मानवनिर्मित कल्पना अनैतिक वागणाऱ्यांना भीती दाखवण्यासाठी आणि निराशेत असलेल्या माणसाला आशेचा किरण दाखवण्यासाठी आहे. मला नैतिक आणि सकारात्मक, समतोल आयुष्य जगण्यासाठी माझा आत्मविश्वास पुरेसा वाटतो त्यामुळे मला ईश्वरासारख्या कल्पनेच्या आधाराची गरज नाही. त्यामुळे एक टक्का उरलेल्या शक्यतेसाठी आहे. यापेक्षा अधिक अभ्यास करण्याची माझी इच्छा नाही. इंग्रजीतला 'ॲग्नॉस्टिक' हा शब्द अगदी अर्थपूर्ण आहे. त्याचा साधा अर्थ 'देव आहे का नाही हे मला नक्की माहिती नाही आणि तुम्हालाही माहिती नाही हे मला माहिती आहे'.

मी आत्तापर्यंत लहानपणापासून चांगल्या कामाबद्दल, कलाकृतीबद्दल बोलताना मोठ्या मोठ्या माणसांकडून एक वाक्य ऐकलंय्. 'परंतु तेथे ईश्वराचे अधिष्ठान पाहिजे.' माझ्या मते हेच वाक्य 'तेथे विवेकाचे अधिष्ठान पाहिजे.' असं हवं. मागे सांगितलेल्याच एका गोष्टीचा पुन्हा उल्लेख करतो, 'विवेक' या शब्दाची फार छान फोड आहे. वि म्हणजे विचार. वे म्हणजे वेदना, म्हणजेच दुसऱ्याची वेदना समजणं आणि क म्हणजे त्याबद्दल कर्म करणं, म्हणजेच कृती करणं. कृती खरी महत्त्वाची आहे. ईश्वराच्या अधिष्ठानामुळे माणूस म्हणतो आपण त्याबद्दल काहीच करायचं नाहीय्. देव करेल. शेवटी कोणीच काही करत नाही.

एक गोष्ट मुद्दामून स्पष्ट करतो. देव मानणाऱ्यांच्यात आणि न मानणाऱ्यांच्यातही प्रकार असतात. ते सगळे प्रकार योग्यच असतात कारण मुख्य निकष एकच. ती व्यक्ती सगळ्यांशी कायम सज्जनपणी, सरळपणी वागत असली की माझ्या

शंकेचं उत्तर मला मिळतं आणि चर्चा संपते.

शोभा नास्तिक नाही, तसं म्हणत देखील नाही. पण ती कुठचीही धार्मिक कर्मकांडं, पूजा यांच्या भानगडीत पडत नाही. 365 दिवस 24 तास सगळ्यांशी सरळ आणि सज्जनपणी वागते. शोभाबरोबर मला याहून अधिक चर्चेची गरज वाटत नाही.

माझ्या एक मित्र नास्तिक आहे, असं जाहीरपणे सांगतो, पण सगळी कर्मकांडं करतो. धार्मिक सण, उत्सव साजरे करतो. शोभाबद्दल मी ज्या खात्रीनी सांगतोय् तसं त्याच्याबद्दल मला वाटत नाही कारण तो त्याच्या घरी खाजगीत कसा वागतो याबद्दल मला निश्चित सांगता येत नाही.

मी अगदी निश्चित निरीश्वरवादी आहे. देवभक्ती मला पटत नाही त्यामुळे मी करणार नाही. इथेच हे विधान थांबत नाही. मला ईश्वरवाद अनेक कारणांमुळे समाजविघातक वाटतो त्यामुळे मी निरीश्वरवादाचा सभ्यतापूर्वक प्रसार करण्याचा प्रयत्न करीन. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विचारांशी मी पूर्ण सहमत आहे. शोभा आणि मी त्याच प्रवासाच्या वाटेवर चालत असलो तरी आम्ही पूर्वी निराळ्या स्टेशनांवर होतो आणि आजही आहोत.

शोभाच्या कुटुंबाची पार्श्वभूमी ग्रामीण, परंपरावादी होती, तर माझी कौटुंबिक पार्श्वभूमी शहरी आणि पुरोगामी होती. मी या प्रवासाच्या पुढच्या स्थानकावर उभा आहे तो शोभाच्या तुलनेत. पण आमच्या संसाराला सुरुवात झाल्यापासून केलेला प्रवास बघितला तर शोभानी जास्त अंतर कापलेलं आहे. अंधश्रद्धेच्या वाटेनी शोभा कधी गेली नाही पण त्याच्या निर्मूलनाचा खास प्रयत्नही तिनी केला नाही. मी मात्र ईश्वरवाद, अंधश्रद्धा, अनिष्ट आणि निरर्थक रूढी या गोष्टींना जाणीवपूर्वक, स्पष्ट विरोध केला. थोडक्यात शोभा तिच्या कुटुंबात बंडखोर ठरली, पण समाजात नाही. मी मात्र समाजात बंडखोर म्हणून ओळखला जाऊ लागलो.

प्रत्यक्षात आम्ही दोघंही समाजवादी पक्षाचे नाही, तसं स्वतःला मानत नाही, पण लोकांनी परस्पर तसं लेबल आम्हाला लावलं. काही लोकांनी आम्हाला विचारलं की आम्ही देव मानत नाही म्हणजे आम्ही कम्युनिस्ट आहोत का? त्याचंही उत्तर नाही असंच आहे. लोकांना डॉ. दाभोळकरसुद्धा काय म्हणत होते हे समजलं नव्हतं. भक्ती हा वैयक्तिक भावनेचा प्रश्न आहे. त्याचं सार्वजनिक स्वरूप चुकीचं आहे आणि दुसऱ्याचा गैरफायदा घेणाऱ्या स्वार्थी भोंदूबाबा मंडळींना विरोध व्हायला पाहिजे, तसा कायदा झाला पाहिजे असं त्यांचं

म्हणणं होतं. भूत, पिशाच्च, करणी, थोडक्यात बुवाबाजी, स्वार्थासाठी केलेला जादूटोणा याला अंनिसचा विरोध आहे. ही गोष्ट त्यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीनी मांडली, त्याचा आग्रह धरला, उपाय शोधून काढण्यासाठी रास्त भूमिका समोर ठेवली, पण धर्मवेड्यांना ते सहन झालं नाही. जीवनसाथमधे मी जे काम करतो ते विवाहासंबंधातल्या अंधविश्वासांच्या विरुद्धच आहे. माझ्या कामाकडे दुर्लक्ष करणारे खूप लोक आहेत. विरोध करणारेही खूप आहेत. पण डॉ. दाभोळकरांच्या हत्येच्या प्रकरणामुळे समाजप्रबोधनाची जीवनसाथसारखी कामं नक्की थांबणार नाहीत.

आमच्या दृष्टीनी स्वर्ग आणि नरक असंही काही नसतं. साहजिकच स्वर्ग म्हणजे वर आकाशाकडे बघणं आणि नरक, पाताळ म्हणजे खाली पृथ्वीच्या पोटात असंही आम्ही मानत नाही. खगोलशास्त्राच्या एवढ्या शाळेपासून शिकलेल्या धड्यांमुळे आकाशाकडे बोट दाखवून 'तो बघतोय्' हे वाक्य विवेकवादी सत्यशोधकाच्या नजरेतून निरर्थक आहे.

आमच्यात देव न मानल्यामुळे आणि जात या कल्पनेला विरोध असल्यामुळे काही शब्दप्रयोगही टाळायचे असतात, 'देवदयेने', 'अरे देवा', 'देवा-ब्राह्मणांच्या साक्षीने' असं आम्ही लोक बोलत नाही. 'अग्नॉस्टिक' लोकं इंग्लिश बोलताना सुद्धा 'माय गॉड' न म्हणता 'माय गुडनेस' असा शब्दप्रयोग इंग्लंड, अमेरिकेत वापरतात. आम्ही 'देव तुझं भलं करो,' असंही म्हणत नाही. 'देवानी आपल्याला हात दिलेयत्, देवानी आपल्याला तोंड दिलंय्' असं म्हणत नाही.

बऱ्याच वर्षांपूर्वीचं एक संभाषण सांगतो. माझी आजी त्यावेळी साधारण 70 वर्षांची असेल आणि मी 30-35 वर्षांचा असीन. मी जाहीर नास्तिक आणि तिचा रोजचा मुख्य उद्योग देवपूजा, कीर्तनं, कापसाच्या वाती वळणं हा. आमच्या मधून मधून गप्पा चालायच्या. ती म्हणायची की, मी आणखी मोठा झालो की देव मानायला लागीन. मी म्हणायचो की, ते मला शक्य वाटत नाही. पण तिच्या म्हणण्याप्रमाणे झालं का नाही ते बघायला ती हयात कशी असेल? हे म्हणताना मला एका गोष्टीचं कारण कळलं. देव आहे का नाही हे हजारो वर्षांत कोणी सिद्ध करू शकलेला नाही याचं हेच कारण असणार. सिद्ध होण्यासाठी संबंधित लोक जिवंत हवेत ना!

सगळ्या ईश्वर मानणाऱ्या लोकांचं एकच म्हणणं असतं, 'एवढे जगभर देव मानणारे लोक आहेत. त्या अर्थी देव असलाच पाहिजे. जग काय मूर्ख आहे का? ज्ञानेश्वर, विवेकानंद यांच्यासारखे महात्मे काय वेडे होते का?' याचं खरं

उत्तर एकच आहे. ज्या काळात हे महात्मे देव आहे असं सांगत होते त्या काळाची तशी गरज होती. लोकांच्यात समभावना निर्माण करण्याची, लोकांना एकत्र जमवण्यासाठी काहीतरी युक्ती करण्याची आवश्यकता होती. एवढ्या वर्षांनंतर गरजा बदल्यायत्. आता त्या प्रकारच्या देवभक्तीची गरज नाही. मला तर ठामपणी वाटतं की, आता गरज भक्तीमार्गाची नाही, ज्ञानमार्गाची आहे.

●

2) ईश्वर या कल्पनेचा जन्म आणि कल्पनाविस्तार

देव या कल्पनेच्या जन्माचा नेमका कालावधी कोणालाच माहिती नाही. निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या देवांची उपासना चालायची. तत्वज्ञानाचा जन्म झाला तेव्हा म्हणजे अडीचहजार वर्षांपूर्वी त्यावेळेला देव आहे का नाही ह्याच्यावर अनेक वर्षं चर्चा चालू होत्या. देव हा स्त्री का पुरुष हा सुद्धा प्रश्न होताच. काही लोकांनी त्याला मार्ग काढला आणि शेवटी देवही असतो आणि त्याची बायको देवी असते असं ठरवून टाकलं. देवाच्या बाजूनी जे वाद घालणारे लोक असायचे त्यांचं म्हणणं होतं की, माणूस कशालातरी घाबरत असला तरच तो सरळपणी वागेल, नाहीतर तो इतरांना त्रास देईल, फसवेल. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला अशा कुठच्यातरी भीतीची गरज आहे.

या कल्पनेत नक्कीच तथ्य आहे आणि तरी देखील एक प्रश्न अनुत्तरितच राहतो. देवानी सृष्टी निर्माण केली, माणसाची निर्मिती केली असं मानणारे खूप आहेत. त्याचबरोबर मानवानी देव या कल्पनेला जन्म दिला असंही ठामपणे म्हणणारे आहेत. थोडक्यात देवानी मानवाला जन्म दिला का मानवानी देवाला जन्म दिला हे ठरूच शकत नाही. गेली हजारो वर्षे ईश्वरवादी आणि निरीश्वरवादी अस्तित्वात आहेतच आणि ते आपापला विश्वास दुसऱ्याला पटवून देण्याचा अखंड प्रयत्न करतायत.

भारतीय परंपरांच्यात, सांस्कृतिक इतिहासात असे उल्लेख सापडतात की, पूर्वी नास्तिक माणसालाही समाजात तेवढाच सन्मान असायचा. नवीन अस्सल विचार करणारा आणि मांडणारा पहिला सन्माननीय नास्तिक म्हणजे चार्वाक. चार्वाकानी स्त्री-पुरुष संबंधांविषयी पण महत्त्वाचे विचार मांडले होते.

खरं म्हणजे स्वतंत्रपणी विचार करण्याच्या क्षमतेचा कुठचाही माणूस आपला सगळा विचारभार कुठच्याही बाह्यशक्तीवर अवलंबून ठेवणं तर्कबुद्धीत बसण्याजोगंच नाही. उदाहरणार्थ, शिवाजी आणि त्याच काळामधले रामदासस्वामी इतके द्रष्टे, चाणाक्ष आणि बुद्धिमान लोक स्वतः देवभक्त असणं शक्यच नाही. राजकारण, समाजकारण, लोकप्रियतेचा निवडलेला मार्ग म्हणून त्यांनी ठरवलं असेल की 'भवानीमाता' ही भावनिक शक्ती स्वराज्यासाठी उपयोगी पडणार

आहे, तेव्हा प्रजेशी बोलताना देव ही संकल्पना अतिशयोक्त स्वरूपात मांडायची.

खरं तर अगदी सध्याच्या हुशार, यशस्वी, मोठ्या, प्रसिद्ध माणसांविषयीदेखील मला असंच वाटतं. देव आहे असं म्हणत राहण्यात त्यांच्या व्यवसायाचा फायदा त्यांना दिसत असणार. प्रत्यक्षात त्यांची स्वतःची देवावर श्रद्धा असेल असं मला वाटत नाही. मी स्वतः निरीश्वरवादी असलो तरी निर्लेप दृष्टिकोनातून अभ्यासाचा विषय म्हणून लोकांचं बोलणं ऐकतो. मधे एक मित्र फार चांगलं बोलला होता. तो म्हणाला, 'समाजासाठी काही न करणाऱ्या नास्तिकापेक्षा अभ्यासू आणि समाजासाठी काहीतरी करण्याची धडपड करणारा आस्तिक बरा.' मला हे एकदम पटतं.

याबद्दलचा निर्णय कधीही होणार नाही. वाईट असं की, वादविवादाच्या भरात दोघंही एकमेकांचा अपमान करतात. मी तिसऱ्या विकारमुक्त गटातला असल्यानी मी काही निष्कर्ष काढले आहेत. ईश्वर ही कल्पना श्रद्धेवर (श्रद्धा आणि परावलंबित्व एकच) आधारलेली आहे. श्रद्धा ही अंधश्रद्धाच असते कारण त्यामधे 'का, कसं, केव्हा, कशावरून' असं विचारायला परवानगी नाहीय. आपण आत्ताच म्हणालो त्याप्रमाणे दैवी शक्ती आहे किंवा नाही असं कधीच कोणी सिद्ध करू शकलेलं नाही. गेल्या काही हजार वर्षांत आस्तिकता विरुद्ध नास्तिकता हा वाद कधीही निर्णयापर्यंत पोचला नाही आणि कधीही पोचणार नाही.

याच काळात मन म्हणजे नेमकं काय हाही विषय अनिर्णित राहिला. शरीरशास्त्राचं जसं ज्ञान विकसित होत गेलं तसतसं एक गोष्ट स्पष्ट होत गेली की, मेंदू आणि हृदय हे सर्वांत महत्त्वाचे अवयव आहेत. यांपैकी हृदय बंद झालं तरी लगेच मृत्यू येतो हे कळल्यामुळे काहींचं म्हणणं हृदय म्हणजे मन असं आहे. याउलट विचाराची क्रिया मेंदूतून होते, भावना मेंदू नियंत्रित करतो हे कळल्यामुळे काहींचं म्हणणं मेंदू म्हणजे मन असं आहे.

सगळ्या निरीश्वरवादामधला मुख्य विचार, प्रतिवाद असा आहे की आमचा कुठच्याही अतींद्रिय, अदृश्य शक्तीवर विश्वास नाही, पण आम्ही हा मुद्दा सप्रमाण सिद्ध करू शकत नाही. समजा, अशी शक्ती असली तरी त्या शक्तीवर आपलं काही नियंत्रण आहे का? जर नियंत्रण नसलं तर अशा शक्तीचा विचार सोडून देण्यातच शहाणपणा आहे.

ईश्वर मानण्याबाबत - न मानण्याबाबत मुक्तता हा विचार करून पाहाल तर पुढचं सोपं आहे. आमच्या लहानपणी म्हणजे 67 वर्षांपूर्वीचा भारत स्वतंत्र

झाला तेव्हा एका विशिष्ट महत्त्वाच्या टप्प्यात होता. तेव्हा सर्वसाधारण समजूत अशी होती की, ईश्वराला मानणारा म्हणजे सज्जन माणूस. तेव्हा कदाचित ते खरं असेलही. सध्या मात्र तसं नाही. फार ईश्वर-ईश्वर करणारी, मोठं गंध, माळा, भस्म लावणारी व्यक्ती खरी अंतर्बाह्य सज्जनपणी वागणारी असण्याची शक्यता कमीच असते.

पूर्वी लोकांना ईश्वराचा खराखुरा आधार वाटत असणार. अजूनही बऱ्याच लोकांना ईश्वर आपले प्रश्न सोडवेल असं वाटतं. ज्यांना त्यामुळे आधार मिळत असेल त्यांनी तसं करावं असंच मला वाटतं आणि ज्यांना त्याचा आधार वाटत नसेल त्यांनी विवेकनिष्ठ विचार समजून घेऊन त्या वाटेनी जावं. कशाचा आधार घ्यायचा हा निर्णय घ्यायला हवा.

जेव्हा हजारो वर्षांपूर्वी काही चलाख लोकांच्या लक्षात आलं की, न दिसणाऱ्या ईश्वराच्या कल्पनेच्या आधारानी कुठचीही गोष्ट समोरच्या माणसाला पटवता येते तेव्हा मुत्सद्दी लोकांना लोकांच्या मनाची कळच सापडल्यासारखं झालं. ही कल्पना पचली कळल्यावर त्या कल्पनेबद्दलच्याही अनेक कल्पना निघाल्या. अगदी सध्या देखील 'समाजाच्या हितासाठी, कुटुंबाच्या भल्यासाठी' अशी लेबलं लावून कशाचाही प्रसार, प्रचार करतात.

आणखी निराळा कल्पनाविलास सुरू होतो. अमुक मंत्र 100 वेळा म्हटला की तमुक होईल, 1000 वेळा म्हटला की फलाणं होईल वगैरे चालू होतं. हे दावे सिद्ध करण्याची जरूर नसते. श्रद्धाळू माणूसच समोर आलेला असतो. पूर्वी रिसर्च मेथडॉलॉजी अस्तित्वातच नव्हती त्यामुळे कुठच्याच दाव्याची खरी परीक्षा कधी झाली नाही. कल्पनाविलासच करायचा म्हटल्यावर गायत्री मंत्र एक कोटी वेळा म्हटला की आयुष्यातले सगळे प्रश्न संपतात हे सुरू झालं. सगळंच काल्पनिक म्हटल्यावर काहीही म्हणता येतंच की!

एक निराळीच गोष्ट मुद्दाम उदाहरणादाखल सांगतो. साधारणपणी माणसाची वागणूक बघून तो ईश्वरवादी असेल का निरीश्वरवादी याचा अंदाज येतो. एका मुलानी मात्र धक्का दिला. त्याचा देवावर विश्वास नाही म्हणायला लागला. कारण विचारल्यावर म्हणाला की, पूर्वी त्याचा देवावर खूप विश्वास होता. त्याची आई आजारी होती तेव्हा त्यानी अनेक तऱ्हेनी देवाची मनधरणी केली. रोज पूजा केली, उपास केले, नवस बोलले पण शेवटी आई त्या आजारात गेलीच. तेव्हापासून देवावरच्या रागामुळे तो नास्तिक झाला. अशी नास्तिकता विवेकनिष्ठ

विचारातून जन्मलेली नसल्यामुळे टिकाऊ नाही. मुख्य म्हणजे ज्ञानमार्गावरची ही घटनाच नाही.

काही गोष्टी तर सरळसरळ विनोदीच वाटतात. एक देव विरुद्ध दुसरा देव यावरून झालेली युद्धं, शैव आणि वैष्णव यांची भांडणं याचं फार आश्चर्य वाटतं. अमुक एका देवाचं स्त्रियांशी वैर, अमुक देवीचं दुसऱ्या देवांशी भांडण, या कथा म्हणून रंजक आहेत कारण संघर्षाशिवाय कथावस्तू निर्माण करता येत नाही. पण ते सीरियसली अमलात आणणं हे पटण्याजोगं नाही.

निरनिराळ्या अंगांनी देव या कल्पनेचा विचार करताना देवदिवाळी नावाची कल्पना मला हुशारीची वाटते. उरलेले खाद्यपदार्थ संपवणं, मिठाया संपवणं, फटाके संपवणं ही छान कल्पना आहे.

बुद्धी देवानी दिली असो-नसो, बुद्धी तर आहे ना! तिचा वापर केला तर एक विचार डोक्यात यायलाच हवा. 'देवापुढे धरणं धरून, देव पाण्यात ठेवून, साकडं घालून, यज्ञ करून पाऊस पडत असता तर दुष्काळ कधी पडलाच नसता.' एकूणच भारत देशाची अशी हालत झालीच नसती.

●

3) देव एक का अनेक

खास भारत देशापुरता एक स्वतंत्र प्रश्न आहे. देव एकच आहे का अनेक असतात याचं खरं उत्तर अजून कोणीही समाधानकारकपणी देऊ शकलेलं नाही. गणपती हा देव का देवाचा मुलगा? धड उत्तर नाही. तो एवढा लोकप्रिय का याचं मात्र उत्तर आहे. हत्तीचं डोकं लावलेलं हे वैचित्र्य आणि शिवाय आकार सोपा. नुसती सोंड, मोठं पोट सूचित करणारा कंस काढला की गणपती ओळखता येतो. गणपतीच्या दगडी मूर्तीचं असंच. ज्या आकारात सोंड दिसेल अशा कुठच्याही दगडाला गणपती म्हणता येतं. शिवाय स्वयंभू म्हणून जास्त कौतुक. कुठच्याही दगडी कपारीत असे हजारो गणपती शोधता येतील. शेंदूर लावला की झालं.

गणपतीची आणखी खासियत म्हणजे नेहमी त्याची सोंड डावीकडे वळवलेली असते. सरळ ठेवायला काय हरकत होती, पण नसते. हे निर्णय कोणी कसे घेतले कोण जाणे. वैचित्र्याचं महत्त्व ज्याला केव्हातरी पूर्वी प्रथम कळलं असेल त्यानी मुद्दामून किंवा चुकून उजव्या सोंडेचा गणपती बनवला, त्याच्याभोवती आख्यायिका रचली आणि भाबडी जनता उजव्या सोंडेच्या गणपतीचं गुणगान करायला लागली. त्यात कोणाच्या तरी सुपीक डोक्यातून लाभणं, न लाभणं ही कल्पना निघाली. देवाबद्दलच्या कल्पनांबद्दल लोकांच्या प्रतिभेच्या भराऱ्या बघून मला अचंबाच वाटतो. हीच प्रतिभा, बुद्धिमत्ता, व्यक्तिस्वातंत्र्य-विवेकनिष्ठतेच्या मूल्याविषयी वापरली असती तर मानवजातीचं खरोखर कल्याण झालं असतं.

याखेरीज मूळचे देव आणि देवांचे अवतार हे आणखीनच गुंतागुंतीचं प्रकरण आहे. ब्रह्मा विष्णू महेश हे मूळ देव म्हणतात. पण दत्त हा आणखी निराळ्याच प्रकारचा लोकप्रिय देव आहे. आठवड्याचे विशिष्ट वार विशिष्ट देवाचे अशीही कल्पना काही लोक मांडतात. काही वार विशिष्ट देवीचाही मानतात. एकूण देवांबद्दलच्या कल्पना-विलासानी थक्क व्हायला होतं हे मात्र नक्की. देव एक का अनेक याच्यावर वाद घालणारेही महाभाग होतेच की! देव न मानणारे लोक निदान अशा वादातून सुटले म्हणायचे.

●

4) ईश्वराची भीती - चूप बस संस्कृती

मी लग्नापूर्वी फिलाडेल्फिया, यू.एस.ए. मधे माझ्यापेक्षा 10 वर्षांनी मोठ्या असलेल्या मित्राबरोबर एका फ्लॅटमधे राहायचो. मी कट्टर नास्तिक होतोच त्यामुळे देव, मूर्ती, देवाचा फोटो असं माझ्याकडे काहीच नव्हतं. फ्लॅट माझ्या नावावर भाड्यानी घेतला होता म्हणून माझ्यासारखी व्यवस्था होती. हा रोज सकाळी आंघोळीनंतर साधारण पूर्व दिशेला वरती छताजवळ बघून अर्ध्या सेकंदाचा एक झटपट नमस्कार करायचा. म्हणायचा, 'चुकून देव असलाच तर आपला नमस्कार केलेला बरा.' मी या त्याच्या वाक्याला नेहमी हसायचो. इतक्या वर्षांनंतर मला वाटतं, बरीच लोकं आयुष्यभर माझ्या या मित्राच्या अवस्थेत असतात.

अनेक लोक देव मानतो असं म्हणतात कारण त्यांना देवाची भीती वाटते. भित्र्या स्वभावाच्या माणसाला वर, शाप, कोप अशा प्रकारच्या कथेमधल्या गोष्टी खऱ्या वाटतात. मानसशास्त्राच्या अभ्यासाप्रमाणे आस्तिक म्हणजे दुर्बल. माझी त्याबद्दल खात्री पटलेली आहे. ज्याला स्वतःव्यतिरिक्त दुसऱ्याचा आधार लागतो तो म्हणजे दुर्बल. सबलाला देव या कल्पनेची गरजच वाटत नाही. अशा आस्तिक लोकांची संख्या जास्त असते, त्यांना एकमेकांची गरज जास्त असते. त्यामुळे त्यांच्या अनेक संघटना असतात. शिवाय सगळ्या संघटनांची मिळून ईश्वरवादाच्या प्रसारासाठी अघोषित एकी पण असते.

आपल्या देवभक्त समाजाचं वागणं मला कळतच नाही. 'देव भावाचा भुकेला' म्हणायचं. 'प्रत्येक प्राण्यात, प्रत्येक वस्तूत ईश्वर वसतो', म्हणायचं, 'खुलभर दुधाची कहाणी' मुलांना रंगवून सांगायची आणि पुढे वागणूक? प्रसादाचा पेढा घ्यायला लहानग्या मुलानी डावा हात पुढे केला की दे डाव्या हातावर फटका. निरांजन डावीकडून उजवीकडे गोलात फिरवायचं की उजवीकडून डावीकडे याबद्दल सुनेला नावं ठेवायची आणि वर तसं शास्त्र आहे म्हणायचं.

भारतीय देवळांच्यामधला प्रसाद, कमंडलूमधलं पाणी लोकं उजव्या तळहातावर घेऊन श्रद्धेनी खातात, पितात, तेव्हाही मला ते दृश्य अस्वच्छ वाटतं. लहानपणी जेव्हा मी आईबरोबर देवळात जायचो तेव्हा असली प्रश्नोत्तरं चालायची, 'घरी जर प्रत्येक जेवणाआधी हात धुणं सक्तीचं तर इथे हात न धुता

प्रसाद कसा खाता येईल? आपण तर इथे येताना शंभर गोष्टींना हात लावलेला आहे?' याच्या उत्तराची आपल्याला सगळ्यांना कल्पना आहे. ते उत्तर म्हणजे 'चूप बस.' माझी आई निराळ्या भाषेत प्रत्यक्षात उत्तर द्यायची. ती म्हणायची, 'देवळात सगळं चालतं.' कसं पटेल असं उत्तर कोणाला? अनेक वर्षांनी कळलं की, पु.ल.देशपांड्यांनी भारतीय संस्कृतीला 'चूप बस संस्कृती' असं नाव ठेवलं आहे. त्या 'चूप बस' मधेच माझ्यासारख्या विवेकवादी, सत्यशोधक मनाला सगळा घोटाळा दिसतो.

एक बदल मान्य करूया. 'चूप बस' ऐवजी बरेच लोक 'शट अप' म्हणायला लागले आहेत.

●

आपल्या देवभक्त समाजाचं वागणं मला कळतच नाही. 'देव भावाचा भुकेला' म्हणायचं. 'प्रत्येक प्राण्यात, प्रत्येक वस्तूत ईश्वर वसतो', म्हणायचं, 'खुलभर दुधाची कहाणी' मुलांना रंगवून सांगायची आणि पुढे वागणूक? प्रसादाचा पेढा घ्यायला लहानग्या मुलानी डावा हात पुढे केला की दे डाव्या हातावर फटका. निरांजन डावीकडून उजवीकडे गोलात फिरवायचं की उजवीकडून डावीकडे याबद्दल सुनेला नावं ठेवायची आणि वर तसं शास्त्र आहे म्हणायचं.

5) मूर्तिपूजा

मगाशी मी उल्लेख केला होता की, माझे वडील मूर्तिपूजा मानायचे नाहीत. त्या काळी अभ्यास मंडळ असतं तर या विषयावर व्यवस्थित चर्चा झाली असती. देवासाठी लागणाऱ्या फुलांचा पर्यावरणाशी असलेला संबंध कदाचित उलगडला असता.

पूर्वी म्हणजे भारत स्वतंत्र झाला त्यावेळी जगाची लोकसंख्या, भारताची लोकसंख्या हे गंभीर प्रश्न नव्हते. सबंध जगातल्या लोकांचे दिनक्रम पर्यावरणपूरक होते त्यामुळे पर्यावरण हा गंभीर प्रश्न नव्हता. सध्या सबंध जगासमोरच्या मुख्य प्रश्नांपैकी एक प्रश्न पर्यावरणाची हानी हा आहे. जगापुढचा प्रश्न म्हणजेच भारतापुढचा, अर्थात महाराष्ट्रासमोरचा म्हणजे पुण्यासमोरचाही. कोणीच त्यातून सुटत नाही. मी पर्यावरणतज्ज्ञ नाही, अभ्यासक नाही पण पर्यावरणसमर्थक नक्की आहे. काही गोष्टींची मी माहिती काढलेली आहे. त्या तेवढ्या माहितीबद्दल माझी खात्री आहे.

लोक घरी देवपूजा करतात. आम्ही निरीश्वरवादी असल्यामुळे आमच्या घरी देवाची मूर्ती, तसबीर काहीच नसतं त्यामुळे फुलांचाही प्रश्न येत नाही. लोक घरातल्या देवांसाठी रोज सकाळी झाडाझुडपांवरची फुलं तोडून आणतात त्याबद्दल माझा आक्षेप आहे. निसर्गाच्या मूळ योजनेपेक्षा निराळं असं सगळं निसर्गाचा तोल बिघडवतं म्हणजेच पर्यावरणाची हानी करतं. निसर्गाच्या मूळ योजनेप्रमाणे झाडावरून, झुडपावरून जी फळं, फुलं खाली पडतात तेवढीच वेचून वापरायची असतात. झाडावरून फळं, फुलं तोडणं म्हणजे झाडाला इजा करणं असतं. मानवानी निसर्गावर केलेल्या आक्रमणांपैकी, अत्याचारांपैकी हे एक असतं.

देवपूजा हे पुण्यकृत्य मानलं तर त्याला वाहिलेली फुलं हे याप्रकारे पापकृत्य होतं. विकत आणलेली असली तर जास्तच वाईट कारण कोणीतरी त्या फुलं विकण्याच्या धंद्यासाठी फुलझाडांची कृत्रिम लागवड केलेली असते. एकाच प्रकारच्या वनस्पतीची अशा प्रकारे केलेली लागवड ही देखील पर्यावरणाची हानीच ठरते.

आचार्य विनोबा भावेंनी मूर्तिपूजेबद्दल काय म्हटलं होतं ते बघूया. ‘आधी

दगडाला देव मानायचं आणि मग त्याची पूजा करायची असं मला करायचं नाही. माझं म्हणणं तर हे आहे की, हा दगड खिशात ठेवा आणि अंतर्यामी देवाची पूजा करा. दगडाला देव बनवण्याचा एक काळ होता. त्या काळाची मी कदर करतो. परंतु चंदन घासून दगडाची पूजा करायची आणि भोवती भुकेनी व्याकुळ असलेल्या लोकांकडे पाहायचं नाही, असं आता चालणार नाही. दगडाची पूजा आता कालबाह्य गोष्ट झाली आहे.'

रोज सकाळ-संध्याकाळ मूर्तिपूजा करणाऱ्यानी समाजातल्या गरजवंतांविषयी काहीतरी करण्यासाठी तो वेळ दिला तर त्याला खरं म्हणजे जास्त पुण्य लाभेल.

●

6) ईश्वर - एक वैयक्तिक कल्पना

माझ्या आस्तिकतेपासून नास्तिकतेपर्यंतच्या प्रवासात लहानपणी मी अनेक प्रश्न उपस्थित करायचो. मी म्हणायचो, 'देवपूजा रोज एकदा हे कोणी कसं ठरवलं?' तेव्हा आम्ही नागपूरला होतो. नागपूरचा उकाडा भयानक आणि त्यात देवापाशी जळणारं निरांजन. त्यामुळे, देवाला अनेकदा आंघोळ का नाही?', 'रात्री निरांजन बंद केलेलं कसं चालतं? आपल्याला तर दिवे लागतात.' 'देव प्रत्येक गोष्टीत असतो तर मूर्ती कशाला?' 'देव भावाचा भुकेला असला तर त्याच्यासाठी रोज गंध, फुलं कशाला लागतात?' माझ्या सगळ्या प्रश्नांचं एकच उत्तर मिळायचं, 'असले प्रश्न विचारायला परवानगीच नाही' त्यामुळे, 'चूप बस.' मगाशी आपण याविषयी बोललो. ते सगळं साधारण साठ वर्षांपूर्वीचं होतं. पण इतर कितीही गोष्टी बदलल्या तरी 'चूप बस' संस्कृती बदललेली नाही.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे ईश्वर ही वैयक्तिक कल्पना आहे, सार्वत्रिक किंवा सार्वजनिक नाही. ईश्वर मानावा किंवा न मानावा याबद्दल एकानी दुसऱ्याला पटवण्याचा प्रयत्न करणं चूक आहे. सार्वजनिक ईश्वरोत्सव साजरा करणं, त्यांची इतरांवर प्रत्यक्ष सक्ती (वर्गणी गोळा करून) किंवा अप्रत्यक्ष सक्ती (लाऊडस्पीकरवर, आरत्या करून, रस्ता अडवून) करणं हा अत्याचाराचाच प्रकार आहे. तो राजकीय हेतूंनी सत्तेसाठी, मतांच्या अभिलाषेनी किंवा तात्पुरत्या स्वार्थासाठी (पैसे खाणं, फुकट खाणं, दारू पिणं इ.) केलेला सामाजिक अनाचार आहे. नीट विचार केला की, नवरा-बायकोसारख्या नात्यातही ईश्वरवाद किंवा निरीश्वरवादाची सक्ती होता कामा नये, हे पटेल. प्रत्यक्षात मात्र कुटुंबाकुटुंबांत मुलांवर, सुनांवर ईश्वरवाद लादण्याच्या परंपरा अनेक वर्षं भारत देश सहन करतोय. तुलनेनी पाश्चात्त्य देशांत अधिक मुक्तता आहे.

मुळात ईश्वर ही पूर्णपणे खाजगी संकल्पना आहे. एका व्यक्तीची श्रद्धा, स्वरूप, परिणाम आणि दुसऱ्या व्यक्तीची श्रद्धा, परिणाम सारखे असूच शकत नाहीत. व्यक्तिगत ईश्वरभक्तीबद्दल इतर कोणाला काही कळणार देखील नाही. कोणी त्यावर आक्षेप घेऊ नये. पण सार्वजनिक ईश्वरभक्तीचं स्वरूप मुळात असज्जनपणाचं आणि व्यक्तिस्वातंत्र्य या सर्वोच्च मूल्याच्याच विरोधात आहे.

एका व्यक्तीनी कुठच्याही दुसऱ्या व्यक्तीला म्हणणं की, तू ईश्वराची भक्ती कर किंवा श्रद्धा ठेव हेच मुळात चूक आहे. भारतभर अनेक देवदेवतांचे अनेक मोठमोठे उत्सव चालतात. त्यांतल्या अनेक ठिकाणी श्रद्धा आणि ईश्वरभक्तीच्या माध्यमातून व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्याची सार्वजनिक पायमल्ली आणि अत्याचार होत असतात.

मी महाराष्ट्रियन आणि पुणेकर, त्यात नास्तिक असल्यामुळे मी कुठच्याच देवांच्या आणि उत्सवांच्या वाटेला जात नाही. त्यामुळे ईश्वराच्या पूजेसाठी चालणाऱ्या उत्सवांबद्दल, त्यातल्या अत्याचारांबद्दल, अंदाधुंदींबद्दल, अस्वच्छपणाबद्दल मला माहिती गोळा करावी लागली. नाशिकचा कुंभमेळा, पंढरपूरची वारी, जगन्नाथपुरीची रथयात्रा अशी थोडी माहिती मिळाली. पण पुण्याचा गणपतीउत्सव मी प्रत्यक्ष अनुभवलेला असल्यामुळे माझ्या दृष्टीनी पुण्याचा गणपतीउत्सव सर्वांत बीभत्स आहे अशी माझी खात्री झाली.

सगळ्या धार्मिक सणांच्या मुळाशी देवावरचा विश्वास असतो. त्याचे पुढे काय परिणाम होतात हे जरा सांगतो. मी सण साजरे करणं सोडून दिल्याला पंचावन्न वर्षं होऊन गेली त्यामुळे माझी माहिती अपुरी असेल, हे मी मान्यच करतो. पण पुणेकर म्हणून जे सण सार्वजनिक गैरसोयीचे आणि वैतागाचे वाटतात त्याचा त्रासाप्रमाणे क्रम लावण्याचा प्रयत्न केला. सर्वांत त्रासदायक म्हणजेच 1 नंबर गणपतीउत्सवच.

त्याच्या खालोखाल दिवाळी. त्यातला सर्वांत मोठा उच्छाद म्हणजे फटाके. पहाटे, रात्री, हजार फटाक्यांची माळ लावू नये असं अपेक्षित आहे. पण तरी कोणी लावलीच तर कोणी फारशी कुरकुर करत नाही, कारण त्यांनीही काहीतरी अनैतिक काम केलेलंच असतं. त्यामुळे 'तेरी भी चूप और मेरी भी चूप' असतं. मुख्य म्हणजे एकजात सगळे लोक दिवाळीच्या नशेमधे असतात.

त्याखालोखाल होळी आणि रंगपंचमी. सगळीकडे रंगांची घाण करायची आणि दुसरं कोणीतरी ती साफ करेल म्हणून थांबून राहायचं. शेवटी पायानी चालून चालून, सफाईयंत्रणा, पाऊस यामधे ती घाण काही महिन्यांत हळूहळू साफ होते. इतर सण मला माहिती आहेत पण त्यांचा त्रास कमी होतो. उदाहरणार्थ, नवरात्र आणि दसरा. पुण्यातल्या चतुश्रृंगी रस्त्यावर जायचं टाळलं की प्रश्न मिटतो. बाकीचे संक्रांत, गुढीपाडवा, नागपंचमी, वटपौर्णिमा हे सण अगदी किंचितच जाणवतात, कारण कामवाल्यांच्या सुट्या असतात. जाणकारांना

याहून खूप सण माहिती असतील. त्यांचं परंपरेमधलं महत्त्व माहिती असेल, पण आमचं त्या सणांशी काही भांडण नाही.

माझ्या दृष्टिकोनातून ज्या ज्या रुढीमुळे जनजीवनावर परिणाम होऊन काम थांबेल, रस्ते बंद होतील, ट्रॅफिकजॅम्स होतील ती प्रत्येक गोष्ट टाळायलाच हवी. पूर्वी शहर छोटं होतं तेव्हा बहुधा फारसं बिघडत नसेल, पण आता लोकांचा कामाचा वेळ या राष्ट्रीय संपत्तीची हानी होते म्हणजे ती गोष्ट चूकच. मग तो गणपतीउत्सव असला काय, पालखी असली काय, नाताळ, ताबूत असला काय, मला सारखंच. म्हणजे सारखंच वाईट.

'गणपतीउत्सव – संस्कृती का विकृती' नावाची एक पुस्तिका आहे. थेट माझ्या मनातलेच विचार त्यात मांडलेले आहेत. गणपतीला विघ्नहर्ता का विघ्नकर्ता म्हणावं हा प्रश्नच पडतो. भरपूर पैशांचा मोठा महापूर गणपतीउत्सवासाठी वाहत असतो. ज्यांना ही गोष्ट योग्य वेळेला कळली त्यांनी त्याचा पद्धतशीर धंदा केला, भरभराटीला नेला. त्यांना एक गोष्ट कळली होती की, जनता भाबडी आहे. त्यांना योग्य पद्धतीनी हाताळलं तर देवाच्या धंद्यात खोऱ्यानी पैसा ओढता येईल.

आपल्या मनात साहजिकच येतं की, महाराष्ट्रात दरवर्षी एखादी तरी नैसर्गिक आपत्ती येतेच. इतका पैसा लोकांकडून ओढल्यावर तो अशा आपत्तीवर खर्च करायला काय हरकत आहे? प्रत्यक्षात लोकहितासाठी काहीतरी केल्याचा देखावा करायचं ठरतं. जो कार्यक्रम आखला जातो त्यातून जनतेला आणखी जास्त उल्लू बनवण्याची योजना असते.

जनतेसाठी पाणीकपात असो, वीजभारनियम असो, या सुखहर्त्या दुखकर्त्याला वीज आणि पाणी कमी पडत नाही. रोषणाई आणि लखलखाट असतो. दिवसरात्र जनरेटर्स चालू असतात. गणेशोत्सवाच्या वर्गणीसाठी थेट दमबाजीच असते. जेव्हा केव्हा कोणा दुकानदारानी प्रथम वर्गणी द्यायला नकार दिला तेव्हा त्याला इतकं सरळ केलं की, त्यानंतर कुठच्याही दुकानदाराची विरोध करायची हिम्मत झाली नाही.

अनंतचतुर्दशीच्या म्हणजे गणपतीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीच्या वेळी एकदा चक्क हेलिकॉप्टरमधून गणपतीवर फुलं उधळली गेली. भाबड्या जनतेला त्याचं फार अप्रूप वाटलं. पुढच्या वर्षीपासून विमानातून फुलं उधळल्याचं दृश्य पाहाण्यासाठी जास्त गर्दी, खेचाखेच आणि चेंगराचेंगरी झाली. जनतेचं अक्षरशः

‘कल्याण’ झालं.

एकदा काही लोकांशी बोलताना मी म्हणालो, ‘माझे आणि गणपतीचे संबंध बिघडलेले आहेत’ यावर ऐकणाऱ्याचा आक्षेप होता की, गणपती या देवाला मी माणसाच्या पंक्तीला बसवलं. मगाशी बोलताना मी म्हणालो की, ईश्वर ही कल्पना वैयक्तिक आहे आणि ती सामाजिक कल्पना कधीच होता कामा नये. ‘को-ऑपरेटिव्ह सोसायटी’च्या गणपतीबद्दल सुद्धा माझा आक्षेप आहे. त्याचं कारण तो गणपती सामाईक जागेत बसवलेला असतो. माझ्या मते कुठच्याही सामाईक, सार्वजनिक ठिकाणी देवाला थारा मिळता कामा नये.

गणेशोत्सवाच्या निमित्तानी काही चांगल्या गोष्टीही घडतात. मुलांच्या खेळांच्या गमतीच्या शर्यती असतात. खरं तर अशा गोष्टींसाठी गणेशोत्सव कशाला हवा? वर्षभर विभागून मुलांचे असे खेळ जरूर घ्यावेत. खाद्यपदार्थांचंही तसंच. उकडीचे मोदक करण्यासाठी गणेशोत्सवाची जरूरच नाही. वर्षातून विभागून मधूनमधून करावेत की!

काही सार्वजनिक गणपतीउत्सवांची वर्गणी लोकांकडून गोळा करण्याऐवजी नगरसेवक भरतात. अर्थातच त्यानंतर ते मतं मागायला येतात. आमच्याकडे भांडी घासणाऱ्या मुलीनी एकदा उसने पैसे मागितले. कशासाठी विचारलं तर कळलं की गणपतीच्या आराशीसाठी आणि गणपतीउत्सवासाठी आलेल्या पाहुण्यांना भेटवस्तू घेण्यासाठी पैसे हवे होते. एरवी महिन्याचा खर्च भागवण्याची पंचाईत असताना असा गणपतीसाठीचा खर्च तर अगदी चुकीचा आहे.

मला स्वतःला असं वाटतं की, गणपती, नवरात्री यांच्यासाठीच्या मांडवांची परवानगी मोठ्या रस्त्यांवर अजिबात देऊ नये. मोठे रस्ते हे शरीरातल्या रक्तवाहिन्यांसारखे असतात. त्यांच्यात ब्लॉकेजेसना जाणूनबुजून परवानगी कशी योग्य ठरेल? छोट्या रस्त्यांवरच परवानगी हवी. तीही दोन मोटारकार्स जाण्याइतकी जागा मोकळी सोडून उरलेल्या जागेतच फक्त.

भारतातल्या तमाम ईश्वरभक्तांना मला हा प्रश्न विचारायचा आहे. पुण्यातल्या गणपतीच्या विसर्जनाच्या मिरवणुकीत हजारो लोक रात्रभर नाचत, वाजवत भाग घेत असतात. त्यांनी लघवी कुठे करायची? लघवी न करता तसंच चालणं तर अशक्य आहे. बरीच वर्षं माझ्या मनात हा प्रश्न घोळत होता. एका पोलिस अधिकाऱ्यानी खरं उत्तर दिलं, ‘अंगावर कपडे तसेच ठेवून चालता-चालताच, नाचता-नाचताच रस्त्यावर लोक मुततात. बहुतेक वेळा पाऊस असतो त्यामुळे ते

कोणाच्या लक्षात येत नाही. पण त्यावर सत्यशोधकाचा प्रश्न आहेच. हे देवभक्तांना कसं चालतं? नाशिकचा कुंभमेळा, हरिद्वारची गंगा अशा गलिच्छ उदाहरणांबद्दल सगळ्या देवभक्तांनी जाहीर उत्तर द्यावं की हे योग्य कसं? पालखीच्या काळातील पंढरपूरची घाण कशी योग्य समजायची? या घाणीबद्दल देवभक्त शासन काय करतं आहे?

आता मी आर्किटेक्ट म्हणून कामं करत नाही. पण मी पूर्वी अगदी इतर आर्किटेक्ट लोकांसारखी प्रॅक्टिस करायचो. एखाद्या कामाचे प्लॅन्स बांधकाम परवानगीसाठी टाकले असले की टेबलावरून पुढच्या टेबलावर फाइल जाण्यासाठी सतत चकरा मारायलाच लागायच्या. पुणे म.न.पा. चा उल्लेख आर्किटेक्ट लोकांच्यात 'देऊळ' असा व्हायचा. एक दिवस मी मनपाच्या बांधकाम परवानगी विभागात गेलो तर खूपच गमतीशीर दृश्य बघितलं. सगळी टेबलं बाजूला भिंतीशी सरकवलेली, एक टेबल रिकामं करून त्यावर दत्ताची मूर्ती, हार, फुलं, कुंकू आणि आलेल्या प्रत्येकाला दत्ताचा प्रसाद म्हणून पेढा देणं जोरात सुरू होतं. आलेल्यांपैकी कोणी नास्तिक असू शकतं आणि त्या माणसावर केलेला हा अत्याचारच आहे, हा विचारही कोणाला सुचलेला नव्हता बहुतेक.

याच्या पुढच्या पायरीची गमतीशीर कल्पना माझ्या डोळ्यासमोर आल्यावाचून राहात नाही. पुणे महानगरपालिकेचे कमिशनर, सिटी इंजिनियर, महापौर उघड्यानी, सोवळं नेसून, ऑफिसचं सगळं काम सोडून पूजा करतायत्, भटजी त्यांना पूजा सांगतायत्, सगळे इंजिनियर, क्लार्क टाळ्या वाजवून आरत्या म्हणतायत्. हे सगळं महानगरपालिकेच्या मोठ्या हॉलमधे चालू आहे आणि अर्थात ते म.न.पा.च्या खर्चानी म्हणजे जनतेच्या पैशानी. मी हयात नसीन, पण पुढच्या काळात हे अशक्य नक्कीच नाही.

शोभाचा आणि माझा एकेकाळचा मतभेद सांगतो. अनेक वर्षांपूर्वी शोभा आमच्या घरात कुठच्यातरी देवाची मूर्ती विशिष्ट ठिकाणी ठेवायची. मी तिला पूजा, नमस्कार, फुलं, गंध, कुंकू असलं काही करताना बघितलेलं नाहीय्, पण ती मूर्ती मात्र स्वयंपाकघरातल्या विशिष्ट कप्प्यात असायची. ज्या अर्थानी मी मगाशी म्हणालो की, ईश्वर ही व्यक्तिगत कल्पना आहे त्यामुळे त्याचं सार्वजनिक स्वरूप हे चुकीचं आणि अन्याय्य आहे, त्याच तर्कबुद्धीनी मी शोभाला म्हणत होतो की, घरातल्या सार्वजनिक ठिकाणी म्हणजे दिवाणखाना, जेवणघर, स्वयंपाकघर अशा ठिकाणी देवाची मूर्ती ठेवणं चूक आहे. तिच्या स्वतःच्या

एकटीनी वापरण्याच्या कपाटात तिनी कितीही मूर्ती ठेवाव्यात.

बहुतेक शोभाला माझी तर्कसंगती पटली. तिनी माझ्याशी वाद घातला नाही. पण त्या मूर्तीसमोर उभी राहताना मी तिला त्यानंतर कधी पाहिलं नाही. तिनी ती मूर्ती हलवली देखील नाही. अजूनही ती मूर्ती स्वयंपाकघरातल्या एका कपाटात डब्या, बाटल्या यांच्यामागे तशीच आहे. मी देखील त्याबद्दल कधी काही बोलत नाही.

●

7) ईश्वरवादाचे प्रसारक - ईश्वराचे दलाल, व्यापारी

ईश्वरवादी लोकच भारतात जास्त आहेत हे मला माहिती आहे. पण जे लोक जातायेता, फोनवर, प्रत्यक्षात, पत्रव्यवहारात, मोबाइल मेसेजमधे सारखे देवाची, विशिष्ट पंथाची आठवण करून देतात, ते मला कृत्रिम, विनोदी आणि नासमझ वाटतात. मी अशी बरीच माणसं बरंच काही काही म्हणताना बघितली आहेत. काही 'जय गणेश' म्हणतात, 'राधे श्याम' म्हणतात, 'हरेकृष्ण' म्हणतात, जय गुरूदेव, हरी ओम, जय गोविंद, जय गोपाळ, असंही म्हणतात. अशांपैकी एक विशिष्ट माणूस माझ्या फार लक्षात राहिलेला आहे, तो किस्सा सांगतो.

एकदा कुठच्यातरी महत्त्वाच्या कामासाठी एक दस्त म्हणजे डॉक्युमेंट त्या दिवशी दुय्यम निबंधकाकडे नोंद करायलाच हवा होता. तो दिवस होता 1 जानेवारीचा. आम्ही तिथे पोचलो ती त्या दिवसाची पहिलीच नोंदणी होती. दस्त तपासणी, सह्या, अंगठे सगळं झालं. तो निबंधक बाबा सारखा तोंडानी 'हरिओम् तद्सद्' म्हणत होता. 30 मिनिटांत 15 वेळा तरी तसं म्हणून आलं. आज 1 जानेवारी, वर्षाचा पहिला दिवस, असं 5-7 वेळा म्हणून झालं, पण दस्त काही ताब्यात मिळेना. हळूहळू जास्त गर्दी जमायला लागली. इतर लोकं कामं उरकून निघायला लागली तरी आमचा दस्त ताब्यात मिळत नव्हता. मुद्दा सरळसरळ लाच खाण्याचा होता. त्यातला त्यांचा मुख्य विचार असा होता की, वर्षातली पहिली नोंदणी बिनलाचेची, अशुभ, नाट लावणारी झाली तर सबंध वर्ष वाईट गेलं असतं. आम्हालाच निघण्याची घाई असल्यामुळे आम्ही त्या 'हरिओम् तद्सद्' ला दक्षिणा देऊन दस्त घेऊन निघालो.

आमचे एक सब कॉंट्रॅक्टर होते. ते ठार ईश्वरवेडे होते. जाता-येता, फोनवर 'हरेकृष्ण' चा जप चालायचा. एकदा एका घराच्या आतलं काम होतं आणि वेळा जुळवण्याचा, त्यांच्या माणसाला घराची किल्ली देण्याचा प्रश्न होता. त्यांचं म्हणणं होतं की, त्यांचे सगळे कामगार 'हरेकृष्ण' वाले असल्यामुळे घराची किल्ली त्यांच्या कडे द्यायला काही हरकत नाही. मला त्या माणसाच्या भाबडेपणाची कमाल वाटली. अशा विशिष्ट पंथांचे सदस्य झाल्यामुळे लोकं प्रामाणिक बनत असती तर सबंध जगापुढचे सगळे अप्रामाणिकपणाचे प्रश्न संपले नसते का?

भारतात मी बऱ्यापैकी हिंडलो आहे. महाराष्ट्रात देखील कामासाठी अनेक गावी गेलो आहे. मुंबईत फिरलेलो आहे आणि अनेक वर्षं पुणेकर असल्यामुळे पुण्यात तर सर्व दिशांना चालत, स्कूटर, मोटारसायकलनी आणि कारनी गेलेलो आहे. मागे आपण उल्लेख केल्याप्रमाणे जगातल्या पस्तीस देशांच्यातही हिंडलेलो आहे. एक ठळक फरक म्हणजे फूटपाथवरची देवळं. सुरुवातीला एक बारीकसा दगड दिसतो. त्याला शेंदूर लावलेला असतो. साधारण महिन्याभरात त्याचं देऊळ होतं आणि साधारण 3 ते 6 महिन्यांत तिथे पद्धतशीरपणी बांधलेलं देऊळ उभं राहतं. अशी काही देवळं मी माझ्या रोजच्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावरही बघितलेली आहेत. या देशाची खरोखरच कमाल आहे. मुख्य म्हणजे महानगरपालिकेचा बापदेखील त्या देवळांना हात लावू शकत नाही. रस्त्याच्या मधोमध देवळं काय असतात, काय वाट्टेल ते चालतं.

अनेक वर्षांपूर्वी सार्वजनिक इमारतींच्या जिन्याच्या 'मिडलँडिंग' वर कोपऱ्यात लोकं पान खाऊन थुंकतात म्हणून पत्र्याची तस्तं किंवा पिपं ठेवलेली असायची. काही वेळा कुंडीत शोभेची झुडपंही असायची. मग प्रथम कोणालातरी देवाच्या चित्राची कल्पना सुचली. त्यानंतर कोपऱ्यात देवाचं चित्र काढलेली टाइल कोणीतरी लावून बघितली. असं लक्षात आलं की, या युक्तीला म्हणजे देवाला घाबरून का होईना, पण लोक खरंच पिचकारी मारीनासे झाले. ग्लेझ्ड टाइल्स बनवणाऱ्यांनी तशा देवांच्या चित्रांच्या टाइल्स विकायला सुरुवात केली. घराच्या दारावर, जिन्यात, दारासमोरच्या फरशीवर लोक देवाची टाइल कुठच्याही किमतीला घेतील हे लक्षात आल्यावर अशा खास देवाच्या टाइल्सच्या किमती दुपटीतिपटीनी वाढल्या नाहीत तरच आश्चर्य!

दुसरी एक गमतीशीर गोष्ट सांगतो, मी भारताची घटना वाचलेली आहे. सरकारी कचेरी सगळं काम बंद ठेवून एखाद्या दिवशी फक्त देवपूजा करतेय हे अधिकृतपणे घटनेला मान्य नाही. आपण जनतेनी हे मान्य केलं तर काही वर्षांनी सरकारी ऑफिसच्या मध्यावर कुंड रचून यज्ञ करताना आढळले तर आश्चर्य वाटायला नको. शासकीय पूजा नावाची गोष्ट सरकार लोकांच्या पैशानी नैतिक दृष्टीनी करूच शकत नाही. तरीही अशा पूजा होतात आणि वरिष्ठ राजकीय व्यक्ती सपत्निक अशा पूजा समारंभानी आणि अर्थात अभिमानानी करतात. त्याचे फोटोदेखील छापून येतात.

आर्किटेक्ट मंडळींना भूमिपूजन, वास्तुशांत वगैरे कार्यक्रमांना लोक बोलावतात.

मी अशा सगळ्या कार्यक्रमांना हजर राहायला नकार द्यायचो. इतर आर्किटेक्ट मित्रमंडळी अशा कार्यक्रमांना जायची आणि त्या कार्यक्रमात कपाळावर लावलेलं गंध, टिळा तसाच ठेवून दिवसभर तश्शी हिंडायची. सुरुवातीला मला प्रश्न पडायचा, पण मग लक्षात आलं की, 'मला काम मिळालं' किंवा 'माझं एक काम पुरं झालं' अशी जाहिरात दिवसभर त्या टिळ्यामुळे आपोआप व्हायची ती महत्त्वाची होती.

मी 'सुपरस्पीड कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट'चाच व्यवसाय अनेक वर्षं केला. शक्यतोवर आम्ही रात्रपाळ्या टाळायचो पण क्वचित केव्हातरी खूप उशिरा रात्री साइटवर काम करावं लागायचं. रात्री साइटवरच्या कामाचा थोडातरी आवाज व्हायचाच. आसपासची लोकं तक्रार करायची. मला त्यांच्याकडे भेटायला जायला लागायचं. मी समजावून सांगायचो. अगदी पहाटेची भजनं, काकडआरती, गणपती उत्सवातली रात्रभरची मिरवणूक, दिवाळीचे फटाके अशा अवेळी चाललेल्या अनेक गोष्टी केवळ देवाधर्माशी संबंधित असतात म्हणून मान्य केल्या जातात. मग क्वचित होणाऱ्या बांधकामाच्या साइटवरचा रात्रीचा आवाज मान्य करण्याबद्दल बोलायचो. रात्री 12 वाजेपर्यंत चाललेल्या टी.व्ही. वरच्या अवॉर्डस्, गाण्याचे कार्यक्रम यांची उदाहरणं द्यायचो. निम्म्या वेळेला मुद्दा पटायचा, निम्म्या वेळेला नाही. पण एक गोष्ट स्पष्टपणी कळायची. देवाच्या नावानी काहीही चालतं. एरवी नाही.

आम्ही पूर्वी शनिवार पेठेत राहायचो. तिथे देवपूजेच्या साहित्याची काही दुकानं दिसायची. पुढे कर्वेनगरला राहायला आलो. तिथेही फक्त देवपूजेचं साहित्य विकणारं दुकान दिसलं. मनात म्हटलं हे दुकान कितपत चालत असेल कोण जाणे. सहज चौकशी केली तर ते उत्तम चालतं. एका कुटुंबाचं मध्यमवर्गीय राहणीमान सांभाळण्याइतपत प्राप्ती होते असं कळलं. आश्चर्य वाटलं. आश्चर्य वाटलं हेच चुकलं. लोकांच्या देवभक्तीच्या प्रमाणातली वाढ बघितली तर असं दुसरं दुकान निघालं तरी आश्चर्य वाटायला नको.

एक गोष्ट स्पष्ट आहे. सध्या जे समाजाचे पुढारी आहेत आणि देवभक्तीचं प्रदर्शन करतात, त्यांचा त्यात स्वार्थ आहे. सामान्य माणूसही काहीतरी मागण्यासाठी म्हणजे स्वार्थासाठी भक्ती करतो. निरपेक्ष श्रद्धा किती लोकांची असते याबद्दल मला शंकाच आहे.

पुनर्जन्म ही कल्पना, स्वर्ग-नरक या सगळ्या कल्पना माणसांनी चांगलं

वागावं म्हणून माणसानीच निर्माण केल्या. त्या खऱ्या का खोट्या हे सिद्ध करणं नेहमीच अशक्य असतं. ज्यांचा स्वार्थ ते खरं आहे असं म्हणण्यात गुंतलेला आहे ते त्याला खरं म्हणत राहणार. काहींचा स्वार्थ त्यांना विरोध करण्यात आहे, ते विरोध करणार. फारच कमी लोक खरं शोधण्याचा प्रयत्न करणार. सगळे बुवा, महाराज, स्वामी हे ईश्वराचे एजंट म्हणून काम करतात. आपल्याला कल्पना नसते पण टर्नओव्हरच्या भाषेत देव-धंदा भारतातला पहिल्या क्रमांकाचा धंदा आहे. सिनेमा, क्रिकेट, राजकारण, सरकारी कचेऱ्यांचं लाएझन यांच्यातही खूप पैसा खेळत असतो, पण 'गॉड-बिझिनेस' एवढा नाही.

या परिस्थितीत सर्वसामान्य माणसाला खरं काय ते कधीच कळत नाही. इंग्रजी भाषेत 'ॲग्नॉस्टिक' हा अगदी चपखल शब्द आहे तसा मराठीत नाही. त्याचा अर्थ देव आहे का नाही हे मला माहीत नाही त्यामुळे मी आस्तिकही नाही आणि नास्तिकही नाही. लोकांची, बऱ्याच जणांची मुख्य अडचण स्वतःला खरं काय वाटतं ते व्यक्त करण्याचं धाडस नसण्याची आहे. तुकारामांनी म्हणून ठेवलंय् त्याकडे लक्षच द्यायला कोणी तयार नाही. 'जनी म्हणावे देव आहे, देव नाही मनी जाणावे.' या परिस्थितीत भक्तीचा देखावा किती आणि खरी अस्सल देवभक्ती किती, कोणाची हे कळणंच कठीण आहे. लोकांनी चांगलं वागावं म्हणून संतांनी केलेली शेकडो वर्षांची मेहनत वाया गेलेलीच आढळते.

काही विचित्र गोष्टींची लोकप्रियतादेखील आपल्यापुढे प्रश्न निर्माण करते. सत्यसाईबाबा हे तर चक्क जादूगारच होते. त्यांच्या चमत्कारांनी त्यांनी लाखो लोकांना भारून टाकलं होतं. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनेक बाबा, बुवा, महाराज, त्यांचे आश्रम आणि मठ आहेत. त्यात सुद्धा त्यातल्या वैचित्र्यामुळे नागडे-उघडे बाबा जास्त लोकप्रिय होतात. त्यांचे हजारो फोटो जागोजागी छापतात. बाबांच्या आशीर्वादानीच सगळं काही होतं म्हणणाऱ्यांमधे उच्चशिक्षित, डॉक्टर्स अक्षरशः कोणीही असू शकतं.

आचार्य विनोबा भावेंनी बुवाबाजीसंबंधी काय म्हटलं होतं ते बघूया. 'सर्व प्रगतिशील व्यक्तींनी जगभर शुद्ध व्यवहारासाठी दोन गोष्टी आवश्यक मानल्या आहेत. एक ही की भगवान व भक्त ह्यांच्यात कोणी उपाध्याय किंवा पुरोहित नसावा. व दुसरी ही की, वस्तू निर्माण करणारे व वापरणारे ह्यांच्या मधे कोणी दलाल नसावा.' प्रत्यक्षात सगळे बुवा, महाराज, स्वामी हे एजंट ऊर्फ दलालच असतात यात काही शंका नाही.

भारत देशातली जनता इतकी केविलवाणी, असहाय्य, मानसिकरीत्या दुर्बल आहे की काहीही सांगितलं तरी ते त्यांना पटेल. कल्पना करावी यासाठी फक्त सांगतो. पुण्यात मी निरीश्वरवादी, कर्मकांडविरोधी, धर्म, जात न मानणारा म्हणूनच माहिती आहे. पण मी कुठच्यातरी भलत्याच नवीन ठिकाणी गेलो आणि भगवी वस्त्रं घालून माळा, जप, वाढलेली दाढी अशा अवतारात डोळे मिटून बसलो, तर लोक जमतील, हळूहळू गर्दी जमेल आणि वर्षभरात त्याचं रूपांतर स्वामी 'अमुक अमुक' यांच्या मठामधे होईल.

भारत हा एक खूप लोकसंख्या असलेला भाविकांनी भरलेला देश आहे हे बाकीच्या व्यापारी देशांना कळल्यावर ते गप्प कसे बसतील? प्रत्येक भारतीय हा उल्लू बनवायला सोपा असा ग्राहक आहे हे सबंध व्यापारी जगात पसरलं. मोठ्यामोठ्या सरकारी योजनांच्यात कन्सल्टंट म्हणून ब्रिटिश, अमेरिकन्स, जर्मन, फ्रेंच, इटालियन शिरले. उत्पादनात शिरले, औषधांच्या क्षेत्रात, दुकानदारीच्या क्षेत्रात, स्वतंत्रपणी किंवा भागीदारीत शिरले. यामधे गॉड बिझिनेस मागे कसा राहील? टेलिव्हिजनवर एक जाहिरात मी अनेक वेळा बघितली, कोणीतरी हनुमान चालीसा यंत्राविषयी काहीतरी सांगतंय् कळल्यावर मी टीव्ही म्यूट करायचो. नुकताच एकदा काहीतरी कारणानी त्या जाहिरातीच्या वेळी टीव्हीचा आवाज चालू राहिला, तेव्हा कळलं की, हनुमान चालीसा यंत्र बेलजियममधे बनलं आहे. मी तर बाबा चाट पडलो.

●

8) दैवी शक्तींचे इतर प्रकार

एकदा मानवाच्या स्वतःच्या शरीराबाहेर अतींद्रिय नियंत्रक शक्ती असण्याचं तत्व मान्य केलं की त्याबद्दलच्या कल्पनांना काही मर्यादाच नाही.

उत्सुकता म्हणून रेकी, प्राणिक हीलिंग, ऑरा या गोष्टी नेमक्या काय आहेत याची मी चौकशी केली. त्याविषयीही वाचलं. हिप्नॉटिझम विषयी देखील वाचलं. माझा या कुठच्याच गोष्टीवर विश्वास बसला नाही. त्यातला महत्त्वाचा भाग असा की, ज्या माणसाचा विश्वास नाही त्याच्यावर अशा गोष्टींचा परिणाम होत नाही म्हणे. माझ्यावर रेकी, प्राणिक हीलिंग, हिप्नॉटिझम यांचे प्रयोग करून बघितले, पण फसले. या गोष्टींचा भरपूर प्रमाणात गावोगावी हिंडून व्यवसाय करणारे मात्र बरेच जण आहेत.

पैसे मिळवण्यासाठी एखाद्यानी दागिने विकले काय आणि खराटे विकले काय, त्याचा तो अधिकार आहे. पण दैवी, चमत्काराच्या पातळीवरच्या, जादूटोणा, करणी अशा कृत्यांवर कायदेशीर बंदी ही अंधश्रद्धा निर्मूलन समितीची कल्पना योग्यच होती आणि तरी कायद्यामधून सुटलेल्या अनेक निरर्थक गोष्टी या देशात राजरोस चालू असतात की! माझा त्यातला अभ्यास अगदीच तोकडा असल्यामुळे मी अशा सगळ्या गोष्टींबद्दलच्या मूलतत्त्वाचा उल्लेख करून तिथे थांबायला हवं.

रेकी, प्राणिक हीलिंग, संमोहन, ऑरा आणि अशा प्रकारच्या अतींद्रिय नियंत्रक शक्तीवरच्या नियंत्रणावर ज्यांचा विश्वास असेल त्यांनी ते इलाज करवून घ्यावेत. ज्यांना तसे इलाज दुसऱ्यावर करून चांगलं वाटतं त्यांनी ते करावेत. त्याचे पैसे किंवा कुठच्याही स्वरूपात मोबदला घ्यावा का नाही एवढाच प्रश्न उरतो. त्याबद्दल माझं वैयक्तिक मत स्पष्टपणे पैसे घेऊ नयेत असं आहे.

●

9) विवाहाचा, एकूण आयुष्याचा ईश्वराशी संबंध

आपला सगळा विषय विवाहाशी आणि आयुष्याशी निगडित आहे. मी फार पूर्वीपासून नास्तिक असलो तरी निरनिराळ्या संदर्भांत त्याचा सापेक्ष विचार सततच चालू असतो. जोडीदाराच्या निवडीबद्दल मला स्वतःला वाटायचं की, जोडीदार नास्तिक असण्याला खूप महत्त्व आहे. त्यानी बरेच प्रश्न आपोआप सुटतात. विवाहाचा अनेक अंगांनी अभ्यास करायला लागल्यावर मला वाटतं, नास्तिकतेबरोबर समानतेची समज, पैशाबद्दल विचार करण्याची पद्धत हे पण जोडीदार ठरवण्याआधी कळायला हवं. सबंध आयुष्य जबाबदारीनी वागण्याची समज हवीच. आरोग्यही तेवढंच महत्त्वाचं.

भेटलेल्या माणसाच्या भक्तीमार्गावरून, धर्मावरून आणि जातीवरून तो माणूस कसा असेल याबद्दल पूर्वग्रह बनू द्यायचा नाही यासाठी खूप प्रगल्भ विचार लागतात. इंग्लिशमधे अनअशूमिंग शब्द आहे आणि ते उच्च विचारसरणीचं वर्णन आहे. नास्तिकतेनी प्रश्न संपत नाहीत. नास्तिकतेमुळे काय करायचं नाही हे समजलं असण्याची शक्यता आहे. पण त्याचबरोबर काय करायचं आहे याविषयी विचार केलेला नसण्याचीही शक्यता आहे. मागे म्हटल्याप्रमाणे आम्हा लोकांचा पाप-पुण्य या शब्दांवर विश्वास नाही. सतत सगळ्यांशी चांगलं, सरळपणी वागणं ही एकच वागण्याची पद्धत आम्हाला पटते.

मुळात माणूस स्वतःचे सगळे निर्णय स्वतःच घेतो हे नक्की. जरा अडचणीची परिस्थिती समोर आली की ती सोडविण्याची जबाबदारी स्वतः घेणारे असतात आणि दुसऱ्यावर ढकलणारे असतात. ज्यांना कितीही अडचणीची परिस्थिती असली तरी जबाबदारी स्वतः घेणंच योग्य वाटतं, तेवढी धमक असते, असे लोक मुळात कमी. बाकीचे लोक दुसऱ्यावर जबाबदारी टाकल्यानी स्वस्थ होतात. असे लोक हे परावलंबित्वाचे प्रतिनिधी आहेत. ज्यांच्यावर भार टाकायचा तो कोणीतरी मनुष्य (नवरा, बायको, आई-वडील, मुलं, पुढारी, गुंड, बुवा, महाराज, पसंतीप्रमाणे कोणीही) हा एक प्रकार किंवा ईश्वर याची त्यांना गरज असते. निर्गुण ईश्वर मानायचा का मूर्तिपूजा हा केवळ उपप्रकार आहे. मूळ प्रकार ईश्वरवादी का निरीश्वरवादी (स्वतःचे प्रयत्न, जिद्द हीच ताकद मानणारे) हे

दोनच. नवरा-बायको या प्रवासात आसपासच्या टप्प्यावर तरी हवेत. जसे मी आणि शोभा आहोत. पण दोन स्टेशनांत फार अंतर असेल तर त्रास होणारच.

शोभाचं माहेर ग्रामीण पार्श्वभूमीचं आणि परंपरा मानणारं होतं हे मी तुम्हाला सांगितलंच. त्यांच्या मूळ गावी काही पिढ्यांपूर्वी कोणीतरी हुशार, चलाख माणूस असला पाहिजे. त्यानी ठरवलं की त्यांच्या घराण्याला गणपती लाभत नाही. त्या एका युक्तीमुळे सबंध घराण्याची गणपती बसवण्यापासून कायमची सुटका झाली. आमच्या घरी माझ्या लहानपणी जेव्हा गणपती बसवणं थांबलं तेव्हा न लाभणं ही युक्ती वापरता आली असती पण तसं न करता 'माझ्या बुद्धीला गणपतीउत्सव पटत नाही, तुम्हाला हवं तर तुम्ही करा, मी त्यात नाही.' अशी भूमिका मी पंधराव्या वर्षी घेतली. एवढ्या अभ्यासानंतर लाभणं-न लाभणं ही एक अती चलाखीची कल्पना आहे हे मला कळलेलं आहे.

मधे एका मुलीशी तिच्या होणाऱ्या नवऱ्याच्या घरचे लोक कसे आहेत असं बोलणं चाललं होतं. तिचं म्हणणं होतं, ते आधुनिक लोक आहेत. ऐकून मला बरं वाटलं. मग पुढे ती म्हणाली की त्यांच्याकडे गणपतीची बोळवण घरातल्या हौदात करतात. याचा अर्थ गणपती बसवतात तर! आणखी काय काय करतात? पुढच्या सगळ्या वर्णनात ते आधुनिकतेच्या रस्त्यावर नेमके कुठे आहेत याचा अंदाज आला. या पुस्तकसंचात 'आधुनिक आणि पारंपरिक' म्हणजे नेमकं काय? या विषयावर एक लेख आहे तो जरूर वाचा. या आधुनिक जोडप्याचं पुढे काय झालं ते सांगतो. ते चक्क घराण्याच्या कुलदैवताला भेट द्यायला बाहेरगावी गेल्याचं कळलं.

दुसरी एक गंमत सांगतो. एका ओळखीच्या मुलाला घरी जबरदस्तीनी देवपूजा करायला लागायची. तो देवांच्या मूर्तींना फुलं वाहताना 'घे राम्या, घे कृष्ण्या' असं म्हणत पूजा उरकायचा. काय होईल या मुलाचं पुढे? विवाहानंतर? आयुष्यभर? समाजात वावरताना? 'फ्यूजन?' 'डिफ्यूजन?' 'कनफ्यूजन?'

1995 सालचा एक किस्सा सांगतो, मी माझ्या कामासाठी गल्फमधे होतो. शोभा काही दिवसांसाठी तिकडे आली होती. आमचा एक मित्र आमच्याकडे आलेला असताना हे सांगत होता. कुठच्या तरी विशिष्ट दिवसांच्यात गणपतीच्या मूर्तीच्या सोंडेसमोर दूध ठेवलं की ती मूर्ती ते पिते असं म्हणत होता. त्याच्याकडे तशी मूर्ती दुबईतल्या घरात होती नि त्या मूर्तीनी चमचाभर दूध प्रत्यक्ष प्यायलं असं तो म्हणत होता. आम्हा निरीश्वरवाद्यांच्या दृष्टीनी अर्ध्या सेकंदात ही गोष्ट ऐकून निकालात काढण्याजोगी होती, कारण त्यापलीकडे आम्ही त्याला महत्त्वच

देणं शक्य नव्हतं. काही दिवसांनी शोभा भारतात परतल्यावर कळलं की, ही बातमी टीव्ही, वर्तमानपत्रं यांनीही मनावर घेतली होती नि लाखो लोकांचे लाखो फोन जगभर होत होते केवळ या बातमीसाठी. विवेकवादी विचारसरणीविषयी बोलण्याचीही आपल्या समाजाची परिस्थिती नाही हे तेव्हा आम्हाला चपराक मारल्याइतकं स्पष्ट कळलं. आपला समाज थेट आजारी आहे याची खात्री झाली.

मागे आपण थोडं बोललो होतो त्याविषयी सांगतो. देव मानणारा माणूस सज्जन असतोच असं नाही पण असू शकतो. त्याचबरोबर नास्तिक माणूस असज्जन असतोच असं नाही, सज्जनही असू शकतो. ही गोष्ट सगळ्यांनी नीट समजून घ्यावी. परंपरेनी या दोन गोष्टींचा संबंध जोडलेला आहे तो विसरून जावा. विशेषतः जोडीदाराची निवड करताना मुलगा, मुलगी आणि त्यांची कुटुंबं या बाबतीत चूक करताना दिसतात. विवाहासंबंधीच्या एकूण समजेविषयी अर्थातच जरूर विचार करावा. त्यालाच आम्ही विवाह-अभ्यास म्हणतो.

आमच्या बांधकामाच्या क्षेत्रात आर.सी.सी. स्लॅब ओतण्याचा दिवस म्हणजे जणू लग्नसमारंभ असतो. तांत्रिकदृष्ट्या स्लॅब चांगली होण्याला खूप महत्त्व असतं हे आपण समजू शकतो. पण त्याचं महत्त्व, दिवसभराची धांदल आणि घरमालकाचं अज्ञान याचा सगळे तंत्रज्ञ फायदा घेतात. कित्येक ठिकाणी आर्किटेक्ट आणि काँट्रॅक्टरला देखील स्लॅबबद्दलची तांत्रिक माहिती बेताची असते. ज्याला नीट माहिती असते त्या स्ट्रक्चरल डिझाइनरला व्यावसायिक बंधनापायी एक चक्कर मारायची असते तेवढी तो स्लॅब ओतण्यापूर्वी मारतो आणि प्रत्यक्ष स्लॅब भरण्याशी त्याचा काही संबंध नसल्यासारखा निघून जातो.

साइटवर शिल्लक असतात ते सगळे अर्धशिक्षित किंवा अशिक्षित लोक. स्वतः मालक त्याच्या स्वतःच्या विषयातला डॉक्टरेट असला तरी स्लॅब टेक्नॉलॉजीच्या बाबतीत तो अडाणीच असतो. इथे सगळा नको तो अंधश्रध्देचा खेळ सुरू होतो. अज्ञान म्हणजेच भीती. भीती म्हणजे असहायता म्हणजेच अवैज्ञानिक पद्धतीचे अशास्त्रीय भोंदूगिरीचे उपाय. मग स्लॅब ओतण्यापूर्वी त्याची पूजा, कुंकू, नारळ, प्रसाद या गोष्टींमुळे मालकाला भावनिक आधार सापडतो. प्रत्यक्षात ज्या दर्जाची स्लॅब भारतात ओतली जाते तशी विलायतेतल्या कामात अजिबात मान्य होणार नाही.

मी तर फिलाडेल्फियामधे यातलं शिक्षणच घेतलं आहे. इथे येऊन मी स्लॅब कास्टिंग या विषयात अनेक वर्षं प्रबोधन केलं. पूजा, कुंकू, नारळ, फुलं, प्रसाद यांना कायम नकार दिला आणि खऱ्याखुऱ्या चांगल्या दर्जाच्या स्लॅब

ओतल्या. एकदा-दोनदा तर स्लॅब ओतणारी वडार मंडळी पूजा, प्रसाद-दक्षिणा नाही म्हणून परत गेली. दुसऱ्या दिवशी त्याच लोकांनी पूजेशिवाय मुकाटपणी स्लॅब ओतून दिली. बांधकाम तंत्र, त्यातलं इंजिनियरिंग, वेळेची, कामाची, नोंदीची शिस्त या बाबतीत मी खूप कडक असायचो. पण इतर कॉंट्रॅक्टर लोक लेबर, मिस्त्री यांना पैशात फसवायचे, वाईट-साईट बोलायचे. तसं मी कधीच केलं नाही. त्यामुळे मला लेबर, मिस्त्री, सप्लायर्स, सबकॉंट्रॅक्टर्स 'देव न मानणारा देवमाणूस' म्हणून ओळखायचे.

मी काही काळ योगासनं शिकलो, योगासनं केली. मला ती चांगलीच वाटतात. इतर व्यायाम-प्रकारांच्यामधे शरीराच्या बाह्यांगाला चांगला व्यायाम होतो. योगासनांमुळे शरीराच्या अंतर्भागांना देखील व्यायाम होतो ही फारच महत्त्वाची गोष्ट आहे. श्वसनाकडे तर खूपच लक्ष दिलं जातं. योगासनं शिकवणारे मी जे लोक बघितले आहेत ते या महत्त्वाच्या गोष्टी उत्तम जाणतात यात काही शंका नाही. ते सगळे लोक एक घोटाळा मात्र करतात. योगासनं शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदू धर्माचे, परंपरेचे संस्कार शिकवण्याचा प्रयत्न करतात. बरेचसे शिक्षक त्यापुढे जाऊन अशा पारंपरिक संस्कारांचा आग्रह धरतात. प्रार्थनेचा आग्रह, गायत्रीमंत्राचा आग्रह, ओम म्हणण्याचा आग्रह. मग पुढे ओंकारामधली दैवी शक्ती यावर भाषण देतात. माझ्या मते तिथे ते घोळ करतात.

विद्यार्थ्यांपैकी माझ्यासारखे टोकाचे नास्तिक अगदी कमी असतील हे मला मान्य आहे, पण अनेकांच्या मनात एक प्रश्न सारखा येत असतो. ओम उच्चारात जेवढी ताकद आहे तेवढीच स्तोम, फोम, लोम, सोम या शब्दांच्यात असली पाहिजे. ती त्या स्वराची किमया आहे. त्यातली दैवी जादूई शक्ती वगैरे काही खरं नाही. आम्ही काही बोलत नाही म्हणून किती पिळायचं? आम्ही योगासनं शिकायला येतो. संस्कार शिकायला नाही.

या विषयावर आणखी स्पष्ट विचार करण्यासाठी हे बोधवाक्य उपयोगी ठरेल. 'चुकतो तो माणूस, चूक मान्य करतो तो मोठा माणूस आणि चूक सुधारतो तो देवमाणूस.' मला वाटतं, अजून फार उशीर व्हायच्या आत प्रत्येकानी आत्तापर्यंत झालेली चूक सुधारून टाकावी. देवमाणूस नाही पण तो विकृती झटकून टाकलेला माणूस होऊ शकेल.

●

10) प्रार्थना

लहानपणी आम्हा मुलांना निरनिराळ्या प्रार्थना जबरदस्तीनी म्हणायला लावायचे. जेवताना प्रार्थना म्हणण्यात काहीतरी चूक केली म्हणून मी फटकादेखील खाल्लेला आहे. शिक्षा म्हणून देवासमोर मला उभं करणं ही गोष्ट तर जवळजवळ रोजची होती. नैवेद्य खाल्ला म्हणून मी अनेक वेळा ओरडा खाल्ला.

प्रार्थना करताना आनंद होत नसेल, उलट मनस्ताप होत असेल तर कशाला प्रार्थना करायची, असा प्रश्न मी विचारायचो. खरं काय आहे हे समजून घेण्याची माझी धडपड चाललेली होती. माझ्या प्रश्नाचं नीट उत्तर अजूनही कोणी देऊ शकलेलं नाही. मग कोणीतरी म्हणायचं, 'समजणाऱ्याला प्रार्थनेचा अर्थ कळतो.'

या अशा उत्तराला, स्पष्टीकरणाला काहीच अर्थ नाही. निराळ्या शब्दात ते 'चूप बस' म्हटल्यासारखंच आहे.

मी माझ्यापुरतं ठरवून टाकलेलं आहे. 'प्रार्थना प्रकरणात मी नाही.'

जाहीर कार्यक्रमात सभागृहात आसपासचे इतर शेकडो लोक प्रार्थना म्हणतात, काही जण पुटपुटत असतात. नमस्कारासाठी समोर हात जोडलेले असतात. मी यातलं काहीच करत नाही. जेव्हा प्रेक्षागृहातले शेकडो लोक उभे राहून हे सगळं करत असतात तेव्हा खऱ्या कठीण निर्णयाचा प्रश्न येतो. सगळे इतर लोक उभे राहिलेले असताना मी माझ्या खुर्चीवर बसून राहायचं का उभं राहायचं? इथे मी हे कबूल करतो की मी अप्रामाणिकपणी वागतो. मी उभा राहतो. त्यातलं एक कारण म्हणजे संयोजकांचा अपमान करण्याची माझी इच्छा नसते. दुसरं कारण म्हणजे माझ्यातलं धारिष्ट्य कमी पडतं.

●

11) जगातली परिस्थिती

इतर जगात आणि पाश्चात्त्य देशांत ईश्वराच्या बाबतीत काय चालतं हे केवळ माहिती म्हणून सांगतो. आस्तिक आणि नास्तिक जगभर असतातच. मंगोलियन, मलेशियन देशांच्यात बुध्दाची भक्ती करतात. तो स्वतः देव नव्हता तरी बुद्धाला लोकांनी देवच बनवलं. मुस्लिम राष्ट्रांच्यात मूर्तिपूजा नसते पण भक्तीची पद्धत जास्त कडवी असते. संपूर्ण राष्ट्र मुस्लिम धर्म जाहीर करतं. इंग्लंड, यू.एस.ए. बद्‍दल मला जास्त माहीत आहे. तिथे देव अदृश्य पण ईश्वराचा प्रेषित येशू याची मूर्तिपूजा जोरात चालते.

भारतीय लोक परदेशात जातात आणि तिकडेच स्थायिक झालेल्या अनेक पिढ्या हिंदू देवांचीच खूप प्रमाणात भक्ती करतात. लंडनमधलं प्रचंड स्वामी नारायण मंदिर अक्षरशः थक्क करणारं आहे. लंडनमधे अनेक छोटी मंदिरंदेखील आहेत.

जागतिक राजकारणात रशिया आणि यू.एस.ए. हे दोन मातब्बर प्रतिस्पर्धी. त्यांना एकमेकांविरुद्ध बोलावंच लागतं. रशिया अधिकृतपणी जाहीर नास्तिक राष्ट्र म्हणवून घेतं, त्यामुळे यू.एस.ए. च्या अध्यक्षांपासून सगळ्यांना आपण ईश्वरवादी आहोत असं म्हणावंच लागतं. प्रत्यक्षात अमेरिकेमधे सर्वसामान्यांच्यात देव मानणाऱ्यांचं प्रमाण बेताचंच आहे. नवी अमेरिकन पिढी त्याहून जास्त निरीश्वरवादी आहे. अमेरिकेतल्या काळ्या हबशींनी आफ्रिकेतला मूळचा देव जवळजवळ सोडून दिला आहे.

पाश्चात्त्य देशांच्यातली पॅकेज मुक्तता केवळ भारतीयांच्या तुलनेनी जास्त आहे एवढंच मी म्हणतोय्. प्रत्यक्षात ईश्वर-कर्मकांडं वगैरेंच्या बेड्या त्यांच्याही पायात आहेत. भारतीयांच्या बेड्या जाड तर त्यांच्या पातळ एवढाच फरक आहे. चार वर्षांपूर्वी आमच्या सुनेबरोबर एका ग्रीक चर्चमधे गेलो होतो. केवळ उत्सुकतेनी मी सगळं बघत होतो. मेरीच्या संगमरवरी मूर्तीच्या पायाचं चुंबन घेण्यासाठी रांग होती. एका बाजूनी ओळीनी एक एक जण यायचा आणि पायावर ओठ टेकवून पुढे जायचा. माझ्या अश्रद्ध नजरेला ते अस्वच्छ वाटलं. गोऱ्या लोकांनी केली म्हणून अयोग्य गोष्ट योग्य कशी ठरेल?

या विषयामधल्या गंभीर चर्चेमधे जरा चवबदलासाठी 1995 सालचा एक किस्सा सांगतो. मी दुबईत गेल्यावर पहिल्या दोन-तीन आठवड्यांतच माझ्या कंपनीतर्फे मला कन्सल्टंट म्हणून चर्चेसाठी एका हॉस्पिटलच्या साइटवर पाठवायचं ठरलं. तिथे हॉस्पिटलच्या आवारात मशीद, हॉस्पिटलच्या इमारतीतल्या प्रत्येक भागात नमाजखाना अशी रचना असते. माझ्या बोलण्यातून मी कट्टर निरीश्वरवादी, धर्मविरोधी, कर्मकांडविरोधी आहे हे कळल्यामुळे साइटवर जाण्यापूर्वी मला एका बैठकीत सगळी परिस्थिती मित्रांनी समजावून सांगितली. ते म्हणाले, 'तिथे साइटवर फक्त बांधकामासंबंधी बोलायचं. हॉस्पिटलमधे नमाजखाना, मशीद कशासाठी वगैरे विषयाबद्दल काही बोलायचं नाही. तुझा विरोध सगळ्या देवांना आणि सगळ्या धर्मांना आहे, पण त्यांना तो अल्लाला आणि इस्लामला विरोध वाटेल आणि फार वाईट परिणाम होतील. तेव्हा तोंड बंद ठेव.' सारांशात सांगायचं तर, भारतात काय, विलायतेत काय आणि आखाती देशात काय, 'चूप बस संस्कृती' पाठ सोडत नाही.

मी अगदी आधुनिक मुस्लिम धर्माच्या लोकांनाही भेटलो. काही मुस्लिमांचा दृष्टिकोन बऱ्यापैकी विवेकवादी असल्याचं जाणवायचं पण त्यांपैकी कोणीच हे विचार शब्दात मांडणं शक्य नव्हतं. फंडामेंटॅलिस्ट लोकांची सगळ्यांना भीतीच वाटायची. माझ्या कामामधे प्रवास बराच असायचा. रमझानच्या काळात खूप गमती बघायला मिळायच्या. दिवसा पूर्ण उपास करायचा असतो हे बऱ्याच जणांना माहिती असतं. प्रवासात काही लोक रमझानच्या उपासाच्या बाबतीत खूप कडक, कर्मठ असायचे. ते थुंकीही गिळायचे नाहीत. तोंडातली लाळ टिपायला टिशू पेपर हातात ठेवून सारखे ओठ टिपत प्रवास चालायचा.

रमझानच्या काळात सगळी रेस्टॉरंटस् दिवसा बंद असायची. रस्त्यावरच्या व्हेंडिंग मशीन मधून थंडपेयाचा डबा रस्त्यावर फोडून रस्त्यात पेय प्यायलेलंही चालायचं नाही. संध्याकाळी इफ्तारचा भोंगा वाजला की प्रवासी गाड्यादेखील रस्त्यात थांबून, रस्त्याच्या कडेला सगळे फराळ करायला बसायचे. त्या फराळात सगळ्यांना सामील करून घ्यायचे. नाही पण म्हणता यायचं नाही कारण त्यांचा अपमान होण्याची भीती असायची. मला फरक नाही पडायचा, पण कडक शाकाहारी लोकं रमझानच्या काळात त्यामुळे प्रवासच टाळायची कारण त्यांच्या सहभोजनात मांसाहारी वडे हमखास असतात.

●

12) भूत, पिशाच्च, करणी वगैरे

एकदा आपल्या शरीराबाहेरच्या शक्तीची कल्पना करायची म्हटली की त्याला थोपवणं कठीणच असतं. देवाच्याच प्रकारे सैतान, भूत, पिशाच्च ह्या कल्पनांचांही जन्म झाला असं इतिहासात सांगतात.

ईश्वर इत्यादी प्रकारची मुख्य अडचण मात्र कायमची तशीच राहणार. ईश्वर आहे हेही कधी कोणी सिद्ध करू शकलेलं नाही त्याचबरोबर ईश्वर नाही हे मी सिद्ध करू शकत नाही. तसंच भूतपिशाच्चाबद्दल आहे, आत्मा या कल्पनेचं आहे. आत्मा आहे का नाही सिद्ध करणं अशक्य आहे.

काही वर्षांपूर्वी गरवारे बालभवनमधे लहान मुलांशी गप्पा मारायला डॉ. नरेंद्र दाभोळकरांना बोलावलं होतं. त्यांची नि माझी 'साधना'च्या ऑफिसमधली ओळख होती. मी अंधश्रद्धा निर्मूलनाचं काम गेली 55 वर्षं करतोय, पण ते व्यक्तिगत पातळीवर. मी 'अंनिस'चा समर्थक आहे, पण सभासद नाही. त्यांना चारचाकी गाडीनी घेऊन येणं आणि पुन्हा सोडणं ही जबाबदारी साहजिकच माझ्यावर होती.

बालभवनात साधारण 40-50 मुलं होती. विषय होता भूत-पिशाच्च. त्यांनी मुलांना टप्प्याटप्प्यानी व्यवस्थित समजावून सांगितलं की, देव आणि राक्षस या जशा मानवनिर्मित कल्पना आहेत, तशाच भूत, पिशाच्च, चेटकीण या मानवनिर्मित कल्पना आहेत. जो माणूस केवळ देवानी सांगितल्यामुळे कुठचीही गोष्ट करत नाही तो भूत या कल्पनेलाही घाबरत नाही. देवही प्रत्यक्षात नसतो आणि भूतही नसतं. स्वर्ग आणि नरक या कल्पनादेखील केवळ चांगलं वागायला प्रवृत्त करण्यासाठी आहेत. खऱ्या नाहीत.

देव प्रत्यक्ष बघितलेला माणूस जसा नसतो तसा भूत बघितलेलाही माणूस नसतो. सगळ्या कथा सांगोवांगीच्या असतात. एकदा स्वतःच्या डोक्यातून भूत, पिशाच्च, सैतान या कल्पना निघाल्या की करणी, भानामती हे सगळं निकालात निघतं.

शहरात राहून या विषयाच्या प्रमाणाची, गांभीर्याची कल्पना येत नाही, पण जरा निमशहरी किंवा ग्रामीण भागात गेलं की या प्रकारानी घातलेलं थैमान दिसतं. शहरवासीय 'लिंबू-मिरची'च्या फार पलीकडे गेलेले नाहीयत. शहराबाहेर मात्र या लिंबू-मिरचीतून मुक्त माणूस लाखात एक असतो.

●

13) रास्त, विवेकनिष्ठ, समतोल विचार

ईश्वर या विषयाच्या अनेक बाजू आपल्या बघून झाल्या. तरी शेवटी त्याबद्दलच्या समतोल विचारालाच सर्वांत जास्त महत्त्व आहे, हे मला कळतं.

एक विचार असाही मी ऐकलेला आहे, ईश्वर आहे, तो आपलं भलं करेल, अडचणीतून मार्ग दाखवेल, आपल्याला काही कमी पडू देणार नाही अशा विश्वासाच्या आधारावर अनेक माणसं आयुष्य ढकलतात. तो त्यांचा आधार गेला तर निराशेचे मनोरुग्ण वाढतील. या विचारात मला तथ्य वाटतं. ईश्वर आणि एकूणच भक्तीमार्ग काही लोकांसाठी उपयोगी आहे. उरलेल्यांनी ज्ञानमार्गानी जायला हवं. तिथे मात्र खूप अडचणी आहेत. ज्ञानमार्गानी जाण्यासाठी मुळात क्षमता लागते. शिवाय त्या मार्गावर जाण्यात खूप कष्ट आहेत. यातला कुठचाच मार्ग न निवडणाऱ्यांची संख्या खूप आहे हे दुर्देवी आहे आणि तरी मगाचचाच प्रश्न पुन्हा समोर येतो. मार्ग कुठचा हे महत्त्वाचं नाही. 365 दिवस 24 तास प्रत्येकाशी सज्जनपणी आणि सरळपणी वागणं महत्त्वाचं आहे.

देव मानणारी, पण कर्मकांडांचं अवडंबर न करणारी काही शहाणी माणसंही आमच्या ओळखीची आहेत. ते निसर्ग म्हणजेच देव असं म्हणतात. अशा माणसांबद्दल विवेकवाद्यांचंदेखील काही म्हणणं नसतं. माझं स्वतःचंही नाही.

काही शहाणी माणसं निराळ्या पद्धतीनी हा मुद्दा मांडतात. ते म्हणतात, ‘जे आहे ते आपल्या शरीराच्या त्वचेच्या आत आहे. जी बुद्धी, जो जीव, प्राण, आत्मा जे असेल ते आपल्यात आहे. कुठचीही शक्ती असली तरी त्यावर आपलं नियंत्रण नाही. देव असला तरी तो आपल्यातच आहे.’ हे पण वर्णन मला खूप सूज्ञपणाचं वाटतं.

मगाशी मी म्हणालो की, आस्तिकता ही वैयक्तिक पातळीवरची कल्पना आहे. त्याचप्रमाणे नास्तिकता ही देखील वैयक्तिकच असायला हवी. संस्थेत, समाजिक कामात, संघटनेत आस्तिकता किंवा नास्तिकता यांपैकी काहीच येता कामा नये. प्रत्यक्षात तसं होत नाही. संस्था कुठच्यातरी एका दिशेनी पार झुकलेली असते.

आमच्या घरी दरवाजापाशी कुठच्याही देवाची टाइल, तोरण असं कधीच

काही नसतं हे तुम्ही ओळखलंच असेल. आम्हाला आस्तिकतेचा रंग नको तसाच नास्तिकतेचा तोराही नको.

गेल्या हजारो वर्षांत देव आहे असं कोणी सिद्ध करू शकलेलं नाही, यापुढेही ते अशक्य आहे हे सत्य मान्य करण्यावाचून इलाज नाही. देव नाही हे सिद्ध करणं तेवढंच अशक्य असल्यामुळे त्यातल्या त्यात खरं अचूक शब्दात त्याचं असं वर्णन करता येईल, 'देवाच्या अस्तित्वाबद्दल होकार किंवा नकार हे कोणीच ठरवू शकत नसल्यामुळे माझा कल नकाराकडे आहे एवढंच मी म्हणू शकतो.'

विवेकवादी सत्यशोधक विचारधारेचं साधं म्हणणं असं आहे. हजारो वर्षं ईश्वरवादाच्या मार्गांनी समाजानी जाऊन बघितलं. धर्मबंधनं, पुनर्जन्माची भीती बाळगणं, या मार्गांनी जगाच्या, देशाच्या, आपल्या समाजाच्या कल्याणासाठी भट्टी लावून बघितली, पण ती जमली नाही, पार बिघडली. आता निरीश्वरवादाच्या निधर्मी, निर्जात प्रकारे समाजकारण करून बघायला काय हरकत आहे? अनेकांना हा विचार मनातून पटेलही, पण खुर्च्यांवर समाजकारण्यांची रूपं घेऊन बसलेल्या राजकारण्यांचं काय?

●●●

आस्तिकता ही वैयक्तिक पातळीवरची कल्पना आहे. त्याचप्रमाणे नास्तिकता ही देखील वैयक्तिकच असायला हवी. संस्थेत, समाजिक कामात, संघटनेत आस्तिकता किंवा नास्तिकता यांपैकी काहीच येता कामा नये.

3

धर्माविषयी समतोल विचार

आजच्या कार्यशाळेमधे धर्माविषयी आपण बोलायचं ठरवलं आहे ते बोलूच. त्याआधी तुम्हाला सगळ्यांना 'गाठोड्या'विषयीचा मागचा प्रश्न पुन्हा विचारायचा आहे. तुम्ही 365 दिवस 24 तास सगळ्यांशी चांगलं वागता का? तसं असलं तर तोच खरा तुमचा-माझा धर्म. गौतम बुद्धांनी तर म्हटलं होतं की, प्रत्येकानी आपला धर्म स्वतः शोधावा आणि पाळावा.

आता आपण धर्माच्या पारंपरिक अर्थासंबंधी जरा बोलूया. धर्माचा उद्देश तर अगदी साधा होता. प्रत्येक माणसाची जगण्याची पद्धत निराळी असली तर ते अव्यवहार्य होईल यासाठी सगळ्यांना लागू होईल अशी वागण्याची पद्धत म्हणजे धर्म. थोडक्यात धर्माची कल्पना ही सामाजिक व्यवस्थापनाची गरज होती.

गेल्या पाच हजार वर्षांमधे निरनिराळे धर्म अस्तित्वात आले. स्थिर झाले. आपल्या धर्माचे अनुयायी वाढावेत म्हणून प्रलोभनापासून तो अत्याचारापर्यंत सर्व उपायांचा अवलंब करण्यात आला. काही धर्मांत मूर्तिपूजेला स्थान नाही. काही धर्मांत ठराविक मूर्तींचीच पूजा होते. इतर काही धर्मांत अनेक देव-देवतांच्या मूर्ती असतात. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, ज्यू, बौद्ध, जैन, शीख हे प्रमुख धर्म आहेत. अगदी थोडे लोक पारशी पण आहेत. काही धर्मांत प्रेषित व देवदूत श्रेष्ठ ठरलेत, तर काही धर्मांत ग्रंथ.

हिंदू धर्मात देवांनी अवतार घेतले आणि दुष्टांचा संहार करण्याकरिता देव भूतलावर आले अशी कल्पना आहे. दशावतारांतले राम आणि कृष्ण हे अवतार अधिक मान्यता प्राप्त झालेले आहेत. कृष्णावताराला तर पूर्णावतार म्हणून संबोधण्यात आलं. पूर्णावतार कृष्णानी संपूर्ण मानवजातीला गीतेच्या माध्यमातून उपदेश केला. राम या अवतार-पुरुषाला सुद्धा समुपदेशनाची गरज भासली.

दशरथाच्या मृत्यूनंतर मानवश्रेष्ठ राम सैरभैर आणि उद्विग्न झाला. त्याचं सांत्वन करण्याकरता आणि त्याला योग्य तो उपदेश करण्याकरता वसिष्ठ मुनींनी 'योगवाशिष्ठ' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी लौकिक व पारलौकिक सृष्टीचं विवेचन केलं. त्यात मानवाचं स्थान काय आहे हे सविस्तर सांगितलं. खरं काय ते समजणं आणि मान्य होऊन आचरणात आणणं याचं शिक्षण म्हणजेच समुपदेशन हे तेव्हापासून स्पष्ट होतं.

सत्यशोधकांच्या दृष्टीनी धर्म ही कल्पना अशी आहे. स्वतःचा विचार, स्वतःची काळजी प्रत्येक माणूस करतोच. दुसऱ्याचा विचार करण्याची पद्धत म्हणजे धर्म. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, ज्यू ही नुसती दुसऱ्याशी चांगलं वागण्याच्या ठराविक प्रकारांची नावं आहेत. आणखी अनेक धर्म आहेत. त्या सगळ्या धर्मांत काय सांगितलं आहे त्याचा सारांश एकच आहे. 'दुसऱ्याशी चांगलं वागा.' प्रत्यक्षात धर्माच्या वेडामुळे झालेल्या इतिहासातल्या कत्तली, युद्धं, अत्याचार बघितले की धर्म या मूळ कल्पनेच्या अंमलबजावणीतली विकृती लक्षात येते.

शोभा आणि मी स्वतःला निधर्मी समजतो आणि तशा आचरणाचा प्रयत्न करतो. आणि तरी हेही मान्य करायला हवं की, आम्ही लहानपणापासून बराच काळ हिंदूपणाच्या पगड्याखाली होतो. त्यामुळे झालेले काही परिणाम अजूनही आमच्या संवेदनांमधे दिसतात. आम्हाला साहजिकच हिंदू धर्माची जास्त माहिती आहे आणि इतर धर्मांची तुलनेनी कमी माहिती आहे. तरीही त्या मर्यादित माहितीत एक गोष्ट नक्की दिसते. निरनिराळ्या धर्मकल्पनांमधे फरक कमी आहे. कर्मकांडांच्यात मात्र खूप फरक आहे. सत्यशोधक या शब्दात एक गर्भितार्थ आहे– 'पटलं की बदलायची तयारी आणि पटेपर्यंत अमान्य.' हा तो दडलेला अर्थ.

देव ही कल्पना निराळी आणि धर्म ही कल्पना निराळी. मग उल्लेख करताना देवधर्म असं जोडून कशासाठी म्हणत असतील? याचं उत्तर असं आहे की, कुठचा तरी देव किंवा अतींद्रिय शक्ती मानून त्याच्या आराधनेसाठी विशिष्ट वागणुकीची ठरवलेली विशिष्ट पद्धत म्हणजे धर्म. प्रत्येक धर्माची मूळ कल्पना सगळ्यांशी चांगलं वागण्याची आहे. काही धर्म देवाची मूर्ती मानत नाहीत, पण त्याच्या प्रेषितांच्या मूर्ती पुजतात. काही देश सरळ विशिष्ट धर्माच्या अंमलाचा देश असं स्वतःला मानतात. पण सरतेशेवटी देव आणि धर्म या दोन्ही कल्पनांनी जगाच्या शांततेची मात्र वाटच लावली.

आपल्या देशासमोरचा सर्वांत मोठा प्रश्न प्रचंड लोकसंख्येचा आहे हे बहुतेक जण मान्य करतील. त्याचा राजकारणाशी संबंध आहेच, पण त्याबद्दल सांगण्याचा इथे हेतू नाही. त्याचा धर्माशी काय संबंध आहे, याबद्दल मला आहे तेवढी माहिती इथे मांडणार आहे. जगातले जे जे प्रगत देश आहेत (ज्याला आपण सरसकट विलायत म्हणतो) त्या सगळ्या देशांच्यात एक धोरण समाइक आहे, ते म्हणजे 'लोकसंख्या नियंत्रण'. देशाच्या गरजेप्रमाणे लोकसंख्या कमी-जास्त आखण्यात येते. देशाच्या गरजेप्रमाणे जास्त मुलं व्हावीत का कमी, जगातल्या इतर भागातून कायम वास्तव्यासाठी किती लोकांना परवानगी द्यायची ते ठरतं. या सगळ्याच्या केंद्रस्थानी असतं लोकांचं चांगलं, सुखी, समाधानी आयुष्य. आखाती देशाचा खाक्या निराळा आहे. मुस्लिम देश ही गोष्ट त्यांनी जाहीरपणे सांगितलीय्. इस्रायल ज्यूंचा देश, मध्यपूर्वेकडचे बौद्धधर्मीयांचे देश असं जाहीर आहे.

भारत मात्र सुरुवातीपासून हिंदुत्वप्रधान असला तरी 'सेक्युलर' म्हणजे सर्वधर्मांचं स्वागत आणि समावेश करणारा आहे. गेल्या 67 वर्षांत म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यापासून आत्तापर्यंत राजकीय खेळांमुळे मुस्लिमांची संख्या जास्त प्रमाणात वाढली. हिंदू-मुस्लिम दंगली ही कायमची डोकेदुखी ठरली. हिंदू, विशेषतः उच्चवर्णीयांनी वाईट वागवल्यामुळे अनेक मूळचे कनिष्ठवर्गीय हिंदूमुस्लिम बौद्ध किंवा ख्रिश्चन झाले. सगळ्यांना असमान वागणूक, लोकसंख्येवर नियंत्रण शून्य, राजकारणाचा रंग धर्मभावनांना उत्तेजन देण्याचा, या सगळ्यामुळे सगळा राडा झाला. 'सेक्यूलर'च्या खऱ्या अर्थाबद्दलच सगळा घोळ आहे. कोणाचंच कोणाशी जमत नाही अशी परिस्थिती आली.

आपण नीट विचार केला तर सरकारच्या अस्तित्वाचाच उद्देश समाईक गोष्टींची व्यवस्था करणं हा आहे. देव ही व्यक्तिगत गोष्ट आहे त्यामुळे सरकारी कामकाजात म्हणजेच समाईक नागरी सुविधांमधे देव किंवा धर्म यांचा काही संबंधच असता कामा नये असा आपला तर्कविचार सांगतो. मग पुढे अनेक प्रश्न पडतात. उदाहरणार्थ, जनतेच्या हितासाठी आणि वापरासाठी एखादी योजना असली तर ती सर्वधर्मांच्या जनतेसाठी असते. त्यामुळे त्याचं उद्‌घाटन करताना कुठच्याही एका धर्माच्या पद्धतीनी, कुठच्याही एका देवाची पूजा करताच येणार नाही. खरं म्हणजे देवपूजा ही गोष्ट खाजगी आणि वैयक्तिक असल्यामुळे एखाद्या रस्त्याची, पुलाची, मेट्रोची पूजा करणं ही कल्पनाच चुकीची आहे. जे

जे सरकारी काम आहे, कार्यालय आहे तिथे कुठच्याही धर्माच्या कुठच्याही देवाची पूजा करणं चूक आहे. खाजगी शाळांना त्यांचं त्यांचं ठरवू द्यावं, पण सरकारी शाळेत कुठचाही धार्मिक सण साजरा करणं चुकीचं आहे.

मला एक खूप मोठी अडचणीची गोष्ट दिसते. ज्यांनी सामाजिक हिताचे निर्णय घ्यायचे असतात, त्या राजकारणी लोकांची उद्योजकांशी छुपी भागीदारी असते. उद्योजकांचं काहीतरी उत्पादन असतं. ते उत्पादन खपण्यासाठी देव, धर्म, सण, उत्सव अशा कल्पनांना प्रोत्साहन देण्याखेरीज काही मार्गच नसतो. पूर्वी ही गोष्ट भारतीय राजकारणी आणि भारतीय उद्योजक यांच्यातच व्हायची. गेल्या 15-20 वर्षांत जागतिक उद्योगाच्या विश्वात भारतीय लोक हे चांगलं गिऱ्हाइक असल्याची जाणीव झाली. त्यामुळे या छुप्या जॉइंट ॲडव्हेंचर मधे मल्टीनॅशनल्स देखील शिरले. मग काय, मोठी बजेट्स्, मोठे फेस्टिवल्स, सण, उत्सव, करमणुकीसाठी खूप सोयी, मज्जाच सगळी. परिणाम? गरीब जास्त गरीब आणि जास्त असहाय झाले.

धर्मसत्तांना सामान्य माणूस शहाणा झालेला चालत नाही. त्यामुळे धर्मपीठामधले सत्ताधारी लोक सामान्यांच्या धर्माबद्दलच्या जाणिवांना धारदार करण्यासाठी धडपड करतात. धर्म नावाच्या नशेमधे सामान्य जनता गुंगून पडली तर सत्ताधाऱ्यांना ते फार सोयीचं आहे. मार्क्सनी याबद्दल असं विधान केलं होतं की, धर्म ही अफूची गोळी आहे. त्यावर बंदी घालणं जरूरीचं आहे.

पूर्वीचे पारंपरिक हिंदू सण वर्षात सारखे विभागलेले, निसर्ग आणि वनस्पती, शेती यांचे बहराचे मोसम लक्षात घेऊन फार हुशारीनी योजलेले होते. स्वातंत्र्यानंतर धार्मिक दबावांमुळे सण, त्यांच्या सुट्ट्या, बेतालपणे यायला लागल्या. मुळात माणसं पुरेसं काम करत नाहीत हा प्रश्न होता, त्यात तेच लोक करतात तेवढं कामही मनापासून करेनासे झाले.

पूर्वी मी यू. एस. ए. मधे नोकरी करायचो, तेव्हा त्यांच्या सरकारचं मला सुट्यांच्या योजनेच्या बाबतीत फार कौतुक वाटायचं. संपूर्ण देशभर सगळीकडे शनिवारी-रविवारी सुटी. धार्मिक सण कमी, त्यांच्या सुट्या कमी आणि त्याही शनिवार-रविवारला जोडलेल्या. त्यामुळे जे काम व्हायचं ते सलग आणि भारतीयांच्या तुलनेत जास्त एकाग्रतेनी व्हायचं. सुट्ट्यांची जरूर प्रत्येकाला असते हे मान्य करून, वर्षभरातल्या मोठ्या सुट्या सारख्या विभागून योजण्यात आणि तरी कार्यक्षमता टिकवण्यात तर कौशल्य आहे. भारतात व्यवसाय करताना नेहमी

कामाची निकड, घाई आणि लाल आकड्यांनी भरलेलं कॅलेंडर यांचा कडमडाट मला दिसायचा. कामगार कामाला नाही म्हणायचे नाहीत, त्यांना फक्त दीडपट पैसे हवे असायचे.

देव या कल्पनेमागचं मानसशास्त्र मी समजू शकतो. जेवढा माणूस जास्त अगतिक तेवढी त्याला आधाराची जास्त जरूर. धर्माची कल्पनाही एवढी लोकप्रिय होण्याचं कारण आहे. खूप मोठ्या संख्येनी समान विचारी आचारी भेटल्यामुळे संख्येच्या बळाचा माणसाला आधार वाटतो. त्या संख्येच्या बळाचं रूपांतर उन्मादातदेखील होऊ शकतं. असा अतीव उन्माद झाला की माणसांचा गट आक्रमक होतो नि हिंसक बनतो. मुंबईमधे काही वर्षांपूर्वी दंगली झाल्या तेव्हा रस्त्यावरचे महानमाज, महाआरत्या हे काय सिद्ध करतात? धर्मांधपणा, अविवेक. दुसरं काही नाही.

धर्मभावनेचा सामूहिक उन्माद याचा प्रताप भारतानी भरपूर भोगलेला आहे. हिंदूंनी संघटित होऊन बाबरी मशीद पाडली, मग सूडबुद्धीनी मुस्लिम दहशतवाद्यांनी मुंबईत बाँबस्फोट घडवून आणले, मग यांनी अमुक केलं म्हणून त्यांनी तमुक केलं याची मालिकाच चालू झाली. खरं म्हणजे जगभर अशीच अशांतता आहे आणि त्या सगळ्याच्या मागे धर्मभावना आहे. या सगळ्या वातावरणाचं परिणामकारक चित्रण ‘बॉम्बे’ या सिनेमात केलं आहे.

साधारण 20 वर्षांपूर्वी मी आणि शोभा नागालँडला शिक्षकांचं 15 दिवसांचं शिबिर घ्यायला गेलो होतो. शिबिरात आम्ही शिकवलं ते ती लोकं कितपत उपयोगात आणतात माहीत नाही, पण आम्हाला फार महत्त्वाची एक गोष्ट त्या शिबिरामुळे कळली. ईशान्य भारत हे सगळं प्रकरणच निराळं आहे. भारतदेशच पण बांगलादेशच्या पलीकडे ब्रह्मदेशाला जोडून असलेला हा प्रदेश सांस्कृतिकरीत्या पूर्णपणे भारतापासून तुटला आहे. ख्रिश्चनधर्मीय जास्त संख्येनी आहेत. भाषा निराळी, हिंदी, इंग्लिश बेताचं येतं आणि भारताला ते आपला देश मानायला तयार नाहीत. पुण्यातून गेलेल्या आम्हा लोकांचा उल्लेख ‘इंडियन्स’ असा होत होता. मला तरी असं वाटतं की, धर्म या विकाराचे आपण सगळे बळी आहोत. काश्मीरमधली परिस्थिती याहून वाईट आहे पण त्याला भारत-पाकिस्तान वादाची पार्श्वभूमी तरी आहे. ईशान्य भारत तर न जमलेल्या, फिसकटलेल्या राजकीय, सामाजिक धोरणांचा बळी आहे.

भारतात अशा तऱ्हेनी नांदणाऱ्या, नव्हे भांडणाऱ्या धर्मवेड्यांचे इतके

निरनिराळे धर्म यादीत सांगता येतील– हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, बोहरी, ज्यू, शीख आणि अर्थात आदिवासी आणि निधर्मी. आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाह आणि एकत्र खाणंपिणं याचं प्रमाण फार कमी असल्यामुळे निधर्मी लोकांची संख्या कमीच राहते. मिश्रधर्म असं होऊच शकत नाही. रोटी-बेटी प्रकारातला इतिहासातला प्रसिद्ध विवाह म्हणजे जोधा-अकबर. सध्याच्या काळात फिल्मी जगतात असे हिंदू-मुस्लिम विवाह तुलनेनी जास्त सापडतात.

सर्वसाधारण माणसाच्या धर्माबद्दलच्या ज्ञानाची, कल्पनांची चौकट छोटी असते. काही समाजसुधारकांनी ती चौकट मोठी करण्याचे प्रयत्न केले, पण धर्मबंधनांच्या पलीकडे ते जाऊ शकले नाहीत. खरी जरूर मात्र मानवधर्माच्या अमर्यादित मुक्त समजेची, पृथ्वी, अवकाश अशा कल्पनेची आहे.

प्रत्यक्षात धर्माची पोषाखाची बंधनं अगदी थोडी असतात, पण त्या माणसालाच आपल्या धर्माचा देखावा महत्त्वाचा वाटत असला तर ती गोष्ट न करण्याचंही बंधन नाही. शिखांची दाढी, फेटा, कृपाण ठळकपणे दिसतं. मुस्लिमांची दाढी, सलवार-सदरा, टोपी ठळक दिसते. हिंदूंना आपलं हिंदूपण जाहीर करायचं असल्यामुळे काही लोक धोतर, झब्बा, भगवं उपरणं, शेंडी, गंध, भस्म अशा गोष्टी अभिमानानी करतात. पूर्वीच्या काळी पगडी किंवा टोपी आवश्यक असायची, ती आता लोपली.

अजूनही शहरात, छोट्या गावात असे बरेच लोक आहेत की, ज्यांचा विश्वास आहे की, हिंदूंचा परंपरावादच देशाचं कल्याण करू शकेल. ते सगळ्या धार्मिक कर्मकांडांबद्दल खूप आग्रही असतात. ते स्वतः तसं वागतात आणि परंपरांचा त्यांच्या परीनी प्रसार करत राहतात. रोजची पूजा, संध्या, जानवं, गोटा आणि शेंडी, स्तोत्रपठण यांच्याबद्दल ते आग्रही असतात. त्यांच्या बायका नऊवारी साडी, मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या यांबद्दल आग्रही असतात. मला आणि शोभाला यातलं काहीच वैयक्तिक पातळीवर पटलं नाही तरी जे लोक हे करतात ते मनापासून करतात याबद्दल आम्हाला आदर आहे.

विवेकनिष्ठ विचारपद्धतीत कुठच्याच गोष्टीचा तोरा असणं बसत नाही. विशिष्ट धर्म, पंथ, जात, विचारपद्धती यातलं काहीच खूप चांगलं किंवा खूप वाईट नसतं. त्यामुळे त्याविषयी दुराभिमान म्हणजेच माज विवेकनिष्ठ विचारपद्धतीत बसत नाही.

धर्माच्या बाबतीतला एका अनुभवाचा गमतीशीर किस्सा सांगतो. जनगणनेचा

फॉर्म भरून घ्यायला एकदा दोघंजण आले. इतर माहितीबरोबर माझा धर्म आणि जात विचारली. मी धर्म नाही आणि जात मानत नाही असं खरं उत्तर दिलं. ते म्हणाले, असं फॉर्ममधे भरता येत नाही. असं उत्तर देणारे हिंदू आणि ब्राह्मणच असतात हे आम्हाला माहितीय्. आम्ही तसं लिहिणार. माझा त्याला नकार असल्यामुळे थोडी चर्चा झाली, पण फॉर्मवर माझी सही आवश्यक नसल्यानी ते त्यांच्या मर्जीप्रमाणे फॉर्मवर लिहून निघून गेले.

मी धर्मशास्त्राचा (इंग्लिशमधे 'थिऑलॉजी') अभ्यासक नाही, पण माझ्या काही मित्रांनी मला धर्मशास्त्रातली उपयोगी माहिती दिली. हिंदू धर्म 5000 वर्षांचा जुना मानतात. पुराणातलं आधी रामायण आणि मग महाभारत सर्वांत लोकप्रिय आहे, पण त्याचा काळ साधारणच माहिती असल्यामुळे त्याला इतिहास मानत नाहीत. संघर्षांनी भरलेलं नाट्यमय रंजक कथानक म्हणून ते चांगलं आहे. त्यातले काही संदर्भ प्रत्यक्ष सापडतात, पण त्याची सत्यता ठरवणं कठीण आहे. अयोध्या, लंकेला जाण्याचा सेतू, दंडकारण्य, हस्तिनापूर, द्वारका, मथुरा अशी अनेक ठिकाणं बघायला मिळतात, पण त्यात कविकल्पनांचा, शिल्पकलेच्या आविष्काराचाच प्रभाव जास्त जाणवतो. प्राण्यांमधल्या फक्त मानवानी काव्य, चित्र, शिल्प निर्माण करून पुढच्या पिढ्यांसाठी आठवणी ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष धर्माचं शिक्षण पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुकरणानीच मिळत गेलं.

धार्मिक समारंभ लोक करताना दिसतात पण त्यांचा अर्थ, उद्देश समजून घेतल्याशिवाय काहीतरी उगीचच करतात असं दिसतं. धार्मिक समारंभाला लोक अनेकांना जेवायलाही घालतात पण तेही बहुतेक वेळा स्वतः पुण्य मिळवण्याच्या स्वार्थासाठी किंवा सदर भरण्यापुरतं असतं.

ह्या सगळ्याखेरीज जगाच्या काही भागात ख्रिश्चन धर्म, भारतात मुख्यतः हिंदू धर्म, काही प्रमाणात मुस्लिम, शीख, पारसी, ज्यू असे निरनिराळे धर्म आणि त्यांना सामावून घेण्याची कल्पना निघाली. एवढ्या सगळ्या कल्पनांच्या जंजाळातून कर्मकांडं आणि चालीरीती या सगळ्यांची अंमलबजावणी चालू झाली. विशेषतः हिंदू धर्मात चार वर्ण असल्यामुळे सबंध आयुष्य अशा कर्मकांडांनीच भरून गेलं. अशा चालीरीतींची सविस्तर माहिती खरं म्हणजे मला नाही. त्यांची पूर्ण माहिती घेतल्याशिवाय अमुक एक गोष्ट मला पटत नाही असं म्हणण्याचा मला अधिकार नाही. पण त्याचबरोबर तत्त्वज्ञानातलं ज्ञानाविषयीचं महत्त्वाचं वाक्यही आठवतं. परिपूर्ण टोकाचं ज्ञान असं कुठच्याच व्यक्तीला

कधीही असू शकत नाही. ह्याचाच अर्थ मला पूर्ण ज्ञान नसतानाही मला ते पटत नाही, त्यामुळे मी तसं वागणार नाही एवढं म्हणण्याचा अधिकार मला पोहोचतो.

आपण विशिष्ट धर्मीयांच्या पोषाखाविषयी मगाशी बोललो ती प्रतीकं आहेत. त्यासाठी जरा प्रतीकांविषयी बोलूया. वर दिलेल्या सगळ्या निरनिराळ्या कल्पना माणसाच्या डोक्यात असतात पण त्या समोरच्याला कशा कळणार? समजा, एखाद्याच्या मनात आपण ख्रिश्चन आहोत आणि ते खूप महत्त्वाचं आहे असं असलं तर ते महत्त्व बघणाऱ्या माणसाला कळण्यासाठी काहीतरी करण्याची त्याला गरज वाटते. ह्या विचारातून प्रतीक ह्या गोष्टीचा जन्म झाला. ख्रिश्चन माणूस आपण ख्रिश्चन आहोत हे जाहीर करण्यासाठी गळ्यात धातूचा क्रॉस वापरतो. आशीर्वाद देताना किंवा इच्छा व्यक्त करताना हातानी तो क्रॉसच्या आकाराच्या हालचाली करतो. मुस्लिम माणूस, आपण मुस्लिम आहोत हे जाहीर करण्यासाठी दाढी वाढवतो. डोक्यावर टोपी घालतो. ती विशिष्ट प्रकारची असते. त्याचा पोशाख पण निराळा असतो. शीख माणूस दाढी, पगडी, कृपाण अशा गोष्टी वापरतो. शीखांच्यात बिनदाढीपगडीचे मोना सरदारही असतात. हिंदूंमधे चार वर्ण असल्यामुळे ब्राह्मणाच्या ब्राह्मणत्वाचं प्रतीक म्हणून ते काही गोष्टी वापरतात. गंध लावतात, जानवं वापरतात. अशा निरनिराळ्या प्रकारे आपली भूमिका आणि श्रद्धा जाहीर करण्यासाठी सगळे जण प्रतीकं वापरतात. त्या प्रतीकाला अवास्तव महत्त्व प्राप्त होऊन पुढे तो त्याचा मानबिंदू बनतो. तिथे मात्र सगळ्या गडबडीला सुरुवात होते.

लोकहितवादींनी धर्म या विषयावर खूप परखड विचार खूप पूर्वीच मांडले होते. ते असे– 'धर्माचं वेड विलक्षण माजून त्याखाली अनेक अनन्वित कृत्यं बेलाशक गोवून, त्याला हे धर्मवेडे लोक बेधडक अनुसरून त्यातच आपली, आपल्या कुलाची आणि आपल्या देशाची धन्यता मानू लागले. सारांश, खरा पुरुषार्थ आणि खरं तप जाणण्याविषयी येथून तेथवर सर्वत्र अज्ञानपणाचं अभ्र पसरलं व सगळ्यांना भुरळ पडून दिशाभूल झाली.' पुराणं हे बाष्कळ ग्रंथ आहेत, असं विधान करून ते म्हणतात, 'नीती, सदाचार, धर्म आणि भक्ती यांच्यावर अगदी माती टाकून स्थलांचं, नद्यांचं व महिन्यांचं भाराभर वर्णन केलं. त्यामुळे सदाचरणावरची सुबुद्धी आणि त्यांचं महत्त्व अगदी उडवून दिलं हे फार अनिष्ट झालं.'

'अज्ञान फार वाढलं, त्याला साधन म्हणून मुख्य पुराणं आणि महात्म्यं लिहायची हाच काही दिवसांपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हा त्यांनी मनाला

येईल ते लिहिलं. कोणी कावेरीमहात्म्य, कोणी करवीरमहात्म्य, कोणी शालिवाहनचरित्र, कोणी नाशिकमहात्म्य, कोणी अग्निपुराण, कोणी गणपतीपुराण अशी लिहिली. प्रत्येकात त्यांचा हेतू इतकाच होता, की एखाद्या देवाचं किंवा एखाद्या नदीचं वर्णन करून ईश्वर त्यात आणून ठेवून, ब्राह्मणाला पैसा मिळण्याची तजवीज करावी.'

लोकहितवादींनी 'धर्मसुधारणा' या लेखात धर्मसुधारणेची कलमं मांडली आहेत. या लेखात विश्वधर्माच्या अधिष्ठानावर आधारलेल्या आणि हिंदूसमाजाला उपयुक्त, अशा मुद्द्यांची मांडणी केली आहे. त्यांचा सारांश असा : 1) ईश्वराची फक्त मानसिक पूजा करावी, 2) आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव, 3) ईश्वरोपासना स्वभाषेत म्हणजे ज्या भाषेचा अर्थ समजेल त्या भाषेतच करावी, 4) आचारस्वातंत्र्य व विचारप्रदर्शनाचं स्वातंत्र्य असावं, 5) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मात व व्यवहारात समान असावेत व स्त्रियांना प्रौढविवाहाची व पुनर्विवाहाची मोकळीक असावी, 6) रूढी आणि इतर आचार यांपेक्षा नीती ही प्रमुख असावी, आचारधर्म गौण धरावेत, 7) कोणत्याही जातीच्या, धर्माच्या किंवा राष्ट्राच्या मनुष्याला तुच्छ मानू नये, 8) दुःखिताला सुख, रोग्याला औषध, मूर्खाला ज्ञान व दरिद्री लोकांना द्रव्य शक्तीनुसार देण्यास तत्पर असावे, 9) सत्यनिष्ठा ही सतत मनात असावी, 10) विद्येमधे सत्याचा शोध करण्यात आळस करू नये आणि विद्या संपादन करायला सगळ्यांना समान संधी असावी.

स्वामी विवेकानंदांनीही धर्मविरोधी विचार अतिशय परखडपणी मांडले होते. हिंदुधर्मातले वेद आणि त्यांच्या आधारानी चरितार्थ चालवणाऱ्या धर्मशास्त्र सांगणाऱ्यांविषयी त्यांनी अशी विधानं केली होती.–

'ज्यांच्या पाचशे पिढ्यांनी वेद ही काय चीज आहे हे बघितलेलं नाही ते पुरोहित आज या देशाला धर्मग्रंथ सांगून लुबाडताहेत. देवाब्राह्मणांच्या रूपानी या देशात आज वावरणाऱ्या या राक्षसांच्यापासून या देशाचं रक्षण करायला हवं.' अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या पाशामधून या देशाला मुक्त केल्याशिवाय या देशाच्या स्वातंत्र्यालाही काही अर्थ असणार नाही, हे स्वातंत्र्यलढ्याची अभिनव रचना करणाऱ्या विवेकानंदांनी नेमकं सांगितलं. एका पत्रात त्यांनी आपल्या शिष्यांना आठवण करून दिली.

'समजा, उद्या इंग्रजांनी आपल्या हातात राज्य दिलं आणि ते इथून निघून गेले, तर काय होईल? ज्यांच्या हातात हे राज्य येईल ते इतरांना पुन्हा गुलामासारखे वापरतील. या देशात हे जवळ जवळ कायम होत राहिलंय.

गुलामांना स्वराज्य हवं असतं ते इतरांना गुलाम बनविण्यासाठी आणि त्या प्रक्रियेत स्वतः पुन्हा गुलाम होण्यासाठी.' आणि हे सारं टाळायचं असलं तर काय करायला हवं हे त्यांनी आपला मित्र रामकृष्णानंद याला 1894 मधे लिहिलेल्या पत्रातून कळवलंय. त्यांनी लिहिलंय, ''प्रत्येक खेड्यात एक संन्याशी म्हणजे एक कार्यकर्ता ठेवावा लागेल. त्याच्याबरोबर वेद, कुराण, बायबल हे ग्रंथ असतील. साऱ्या धर्मांचं मूलतत्त्व एकच आहे. 'माणसाला जो माणूस बनवतो तो धर्म' ही धर्माची खरी व्याख्या आहे. त्यामुळे हा एक धर्म स्वीकारलात, तर तुम्हाला इतर सारे धर्म नाकारावे लागतील, हे या संन्याश्यांना खेड्यातील लोकांना समजावून द्यावं लागेल. म्हणजे माणूस बनण्यासाठी एखादा धर्म स्वीकारण्याची पण गरज नाही हे लोकांच्या लक्षात आणून द्यावं लागेल. मात्र या संन्याश्यांच्या बरोबर पृथ्वीचा गोल असेल. भूगोलाच्या मदतीनी ते इतिहास शिकवतील. त्यांच्याबरोबर लोहचुंबक असेल, रसायनशास्त्रामधले प्रयोग असतील. आधुनिक विज्ञान समजावून देऊन आपणाला या आपल्या लोकांना तमोयुगातून बाहेर काढून त्यांची आज जी पाशवी पिळवणूक होते आहे त्यातून मुक्त करावं लागेल.''

हे सारंच विलक्षण आहे. मात्र अंधश्रद्धेपासून समाजाला मुक्त करायचं असेल तर भविष्य आणि चमत्कार या वेडगळ समजुतींपासून समाजाला मुक्त करणं ही प्राथमिक गरज आहे, हे त्यांनी सांगितलं. अमेरिकेत भाषण देताना ते म्हणाले, ''आकाशात हिंडणारे वायूचे गोळे पृथ्वीवर हिंडणाऱ्या माणसाच्या कर्तृत्वावर परिणाम करतात असं समजणं हा मानवी मनाला होणारा रोग आहे. माणसाचं सामर्थ्य खच्ची करणारी यासारखी दुसरी भयावह गोष्ट नाही.'' काही बिलंदर लोकांनी हा आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय केलाय. त्यांचं पितळ उघडं पाडणं गरजेचं आहे आणि सहज शक्य आहे.

विवेकानंदांनी चमत्कार नाकारलेत. त्यांनी सांगितलंय, ''विज्ञान कार्यकारणभाव मानतं. त्याचप्रमाणे धर्म पण कार्यकारणभाव मानतात. यामुळे विज्ञानाप्रमाणे धर्मातही चमत्कारांना स्थान नाही. धर्मग्रंथातील रूपककथांना नंतर बेरकी लोक चमत्कार मानायला लागले.''

''माणूस आस्तिक आहे की नास्तिक हा प्रश्न नाही. माणूस चांगला आहे का, एवढंच पहावं. सर्वच धर्म चांगले आहेत असा माझा विश्वास आहे आणि धर्माच्या अनुयायांनी आपापसात भांडणं हे पाप आहे.

ढोंगी साधुसंन्याशी आणि विवक्षित वर्गातले ब्राह्मण यांनी देशाला विपत्तीच्या

खाईत लोटलं आहे. चोरीमारी, दुष्टपणा यातच हे लोक मग्न असतात आणि हेच लोक स्वतःला धर्मोपदेशक म्हणतात! या देशात 25 टक्के माणसं भुकेनी तडफडून मरताहेत. आठ वर्षांच्या अजाण मुलीचा तीस वर्षांच्या माणसाशी विवाह होतो आहे आणि याला आम्ही विरोध केला तर, तुम्ही आमचा धर्म बुडवीत आहात म्हणून माझ्यावर टीका होते.''

1895 च्या एका पत्रात त्यांनी लिहिलंय, ''फक्त सुशिक्षित हिंदूंमधेच आढळून येणाऱ्या जात्यंध, धर्मभोळ्या, निर्दय, दांभिक, नास्तिक भेकडांमधलं एक बनून जगावं आणि मरावं यासाठीच मी जन्माला आलो आहे असं का तुम्हाला म्हणायचं आहे?... मला माझ्या देशाविषयी खोटा अभिमान नाही. मी जितका भारताचा आहे तितकाच जगाचाही आहे. याबाबतीत खोटेपणा मुळीच नाही.''

'ज्याला आपण आज आपला धर्म म्हणतो तो ठिकठिकाणच्या लहान लहान ग्रामदैवतांमधे आणि क्षुद्र खुळचट रूढींमधे सामावला आहे. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे काही तुमचा धर्म मुळीच बुडत नाही. लक्षात ठेवा, रूढी या नेहमीच बदलत आल्या आहेत. बदलल्या पाहिजेत. याच भारतात असा एक काळ होता की, गोमांस खाल्ल्यावाचून ब्राह्मण हा ब्राह्मण राहू शकत नसे. वेदात तुम्हाला आढळेल की, जेव्हा एखादा संन्याशी, राजा किंवा थोर पाहुणा घरी येई तेव्हा उत्तम बैल मारण्यात येत असे. जेव्हा लक्षात आलं की, या शेतीप्रधान देशात बैल मारल्यानी शेतीचं नुकसान होतं, तेव्हा ही रूढी बंद पडली आणि गोमांस निषिद्ध मानलं जाऊ लागलं.'

'आज ब्राह्मण आणि पुरोहित सत्त्वगुणाच्या बहाण्यावरून देश तमोगुणात बुडवीत आहेत. मठ्ठ लोक ब्रह्मविद्येवरील प्रेमाच्या नावाखाली स्वतःचा अजागळपणा झाकून ठेवत आहेत. हे आळशी लोक स्वतःच्या सामाजिक निष्क्रियतेवर वैराग्याचं पांघरूण घालत आहेत. अतिशय क्रूर असे हे लोक तपश्चर्येचं आणि यज्ञांचं ढोंग रचून आपली वागणूक म्हणजे धर्म असं आम्हाला सांगत आहेत. पुस्तकं पोपटासारखी पाठ करणं आणि बापजाद्यांची खोटी बढाई मारणं एवढंच यांचं कर्तृत्व आहे. देश यांच्यामुळे रसातळाला जातोय.'

'कोणत्याही धर्मानी अंधविश्वासाची शिकवण दिली नाही. हा अंधविश्वास धर्मग्लानीच्या काळात पुढे येतो. मूर्ख लोक स्वतःमधे काहीही सामर्थ्य नसताना, पोपटपंचीच्या जोरावर इतरांना डोळे मिटून विश्वास ठेवायला सांगतात. पण आंधळेपणानी विश्वास ठेवला की अधःपात होतो, हेच सारे धर्म सांगत असतात.

तुम्ही नास्तिक झालात तरी चालेल, पण हे लोक धर्माच्या नावानी सांगतात म्हणून त्यावर आंधळेपणानी विश्वास ठेवून स्वतःला पशूच्या पातळीवर आणू नका.'

'आजचे सर्व धर्म म्हणजे बाह्य घटनांची भंपक स्पष्टीकरणं देणारी भारूडं बनली आहेत. उदाहरणार्थ, रथातून फिरणारा सूर्य. धर्माच्या मते सर्वकाही कुठल्यातरी देवतेमुळे घडतं आहे. म्हणजे सर्व कारणं कार्याबाहेरची आहेत. मात्र विज्ञानाचा अर्थ हा की, प्रत्येक गोष्टीचं कारण तिच्या क्रियेतच आहे. विज्ञान क्रमशः प्रगत होत आहे आणि घटनांचं कारण देव व राक्षस यांच्या हातातून काढून घेत आहे. आज आपण बुद्धदेव काय म्हणाले ते म्हणूनच समजावून घेण्याची गरज आहे. ते म्हणालेत, ''ईश्वरकल्पना नुसती तर्कविसंगतच नाही तर ती अनीतीला कारणीभूत होणारी आहे. कारण माणसाला ती दुर्बल बनवते आणि बाहेरून मदतीची याचना करायला त्याला शिकवते.'' ज्याला कोणी कधी पाहिलं नाही, ज्याला कोणी कधी अनुभवलं नाही आणि ज्याच्याकडून कोणालाही कधी सहाय्य लाभलं नाही त्याच्यावर विसंबून का राहता? तुम्ही असे भित्रे का बनता?'

'या देशात युधिष्ठिर, अशोक, अकबर यांच्यासारखे कार्यक्षम व दयाळू राजे झाले हे तर खरं. पण हे अपवाद आहेत. बहुसंख्य राजे प्रजेला पिळणारे होते. प्रत्येक देशाचा राज्यकारभार हा त्या देशातल्या लोकांच्या मताप्रमाणे चालला पाहिजे हे आधुनिक पाश्चात्त्य देशांचं ब्रीदवाक्य आपण स्वीकारलं पाहिजे.'

'जगाचं, मानवाचं मंगल करण्यासाठी जन्म घेतलेल्या सर्व धर्मांनीच सर्वाधिक रक्तपात करून मानवाला सर्वाधिक दुःख दिलं आहे. भविष्यकाळात जग जिंकण्यासाठी बौद्ध, ख्रिस्ती व इस्लाम यांच्यात झगडा होईल. इतर धर्मांना अनिवार्यपणे या झगड्यात वापरलं जाईल. आणखी एक गुंता आपणासमोर आहे. विज्ञान वस्तूंची विपुलता आपणासमोर आणेल. अनावश्यक वस्तूंत मानवजात गुंतून पडेल. त्यातून चंगळवाद येईल. वस्तूंच्या विपुलतेमुळे माणसं आत्मकेंद्री बनतील. माणसांचं एकमेकांत गुंतणं संपेल. आपल्याला कदाचित नवी समाजरचना शोधावी लागेल. प्रत्येक चळवळीला या सर्वांचं भान हवं.'

'जो धर्म, जो समाज स्त्रियांना समानतेचा हक्क देत नाही, तो धर्म, तो समाज हा सैतानाचा बाजार आहे. पक्षी कधी एका पंखाने उडू शकत नाही. अमेरिका संपन्न आहे. सुसंस्कृत आहे, श्रीमंत आहे, कारण इथल्या स्त्रिया मुक्त आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. त्या साक्षात जगदंबा आहेत. मृत्यूपूर्वी अशा शंभर स्त्रिया जरी मी भारतात निर्माण करू

शकलो तरी मी सुखानी मरीन. पण हे फार कठीण काम आहे कारण रजस्खलेनी मंदिरात जाऊ नये असा भंपक उपदेश करीत इथले धर्म उभे आहेत आणि मी तर तुम्हाला सांगतोय, दक्षिणेश्वराचं मंदिर वेश्यांसाठीही खुलं असलं पाहिजे.'

'समाजाचं भलं करू पाहणाऱ्यांचं काम आज अधिकाधिक कठीण होत जाणार आहे. कारण विज्ञानाच्या झंझावातापुढे सर्व स्वमतान्ध धर्मांचे बुरूज धडाधड कोसळत आहेत. मात्र धर्म हे ज्यांच्या उपजीविकेचं साधन बनलंय ते लोक त्यामुळे वेगळी खेळी खेळताहेत. ते धर्माला व्यक्तिगत बाब न ठेवता त्याला सांघिक कवायतीचं स्वरूप देताहेत! धर्म त्यांनी दिवाणखान्यात आणि रस्त्यावर आणायला सुरुवात केली आहे. आणि गोंधळलेली मानवजात धर्माच्या सांगाड्यालाच धर्म समजून त्याला कवटाळून बसायला लागली आहे...'

आपली अडचण एवढीच आहे की, तुकाराम, रामशास्त्री, विवेकानंद यांच्या मांडणीचं फलित आणि अंनिसच्या रचनेचं फलित एकच असतं. तुकारामांना जिवंतपणे वैकुंठयात्रेला पाठविलं जातं. रामशास्त्र्यांना पायउतार होऊन खेड्यात जाऊन उरलेलं आयुष्य अज्ञातवासात घालवावं लागतं, विवेकनंदांचे नुसते पुतळे उभारतात, कोणत्याही मार्गाने जा, पाच हजार वर्षांचा लेखाजोखा पुरा करण्याची ही लढाई यातनामय आणि प्रदीर्घ आहे. त्या लढाईत विजय होण्याची शक्यता धूसर आहे.

आगरकरांनी 'सुधारक' नावाचं साप्ताहिक चालवलं होतं. त्यांचा बौद्धिक प्रामाणिकपणा, निष्कलंक चारित्र्य प्रशंसनीय होतं. ते मूर्तिपूजेच्या विरुद्ध तर होतेच पण पुढे त्यांनी असं म्हटलं की, मानवी समाजाला धर्मसंस्थेची यापुढे गरज नाही. मला हे संपूर्णपणे पटतं.

'माणूस माझा धर्म' असं म्हणणारे मधूनमधून भेटतात. ऐकायला ते छान वाटतं. तसं वागणारे मात्र फार क्वचित दिसतात. खरं तर धर्माचा आणखी एक साधा अर्थ आहे तो म्हणजे 'स्वतःखेरीज इतरांचा विचार करण्याची एक विशिष्ट पद्धत.' पण तो अर्थ कोण लक्षात घेतो?

मी पूर्वी इंग्लंडमधे होतो, अमेरिकेत होतो हे ऐकून लोक विचारतात, 'मग तुम्ही ख्रिसमस करत असाल ना?' एखादी व्यक्ती, कुटुंब काहीच साजरं करत नाही, कुठचाच धर्म मानत नाही, कशाचीच पूजा करत नाही हे त्यांना समजूच शकत नाही.

●●●

4

जातीविषयी समतोल विचार

मी, शोभा, शोनील, आभा कोणाचीही जात विचारत नाही हे प्रथमच स्पष्ट करतो. मग मगाचचा मुख्य प्रश्न– तुम्ही सगळ्यांशी कायम चांगलं वागता का? याचं उत्तर हो असलं तर छान. नसलं तर त्याचा आधी विचार करा बुवा!

आता बोलायला सुरुवात करूया. धर्म आणि जातिव्यवस्था हे शब्द, त्यांचे अर्थ निरनिराळे असले तरी जातीविषयी खोलवरच्या विवेचनात शिरण्यापूर्वी धर्म-जात यांचा एकत्र उल्लेख आवश्यक दिसतो म्हणून इथे करतो. ब्राह्मणजातीचा आद्यपुरुष परशुराम. त्याच्या काळातले देवांची उपासना करणारे ऋषिमुनी जातीनी ब्राह्मण असायचे. त्यातले कोकणस्थ ब्राह्मण रंगानी गोरे आणि घाऱ्या डोळ्यांचे साधारणपणी असतात.

'जाति' या मूळ संस्कृत शब्दाचा अर्थ कूळ ऊर्फ वंश. उदाहरणार्थ, राम हा रघू कुळातला होत. कृष्ण हा यादव कुळातला होता. शेतीच्या संदर्भात जमिनीचे मालक असतात आणि त्यांनी कुळाला जमीन वापरायला दिलेली असते, ते कूळ हा निराळा शब्द आहे. 'कूळकायदा' त्याला लागू आहे, आणि त्याचा संदर्भ फक्त जमिनीचा आहे.

केवळ समजावून सांगण्यासाठी सांगतो. काहीशे वर्षांपूर्वी कोकणात चिपळूण गावाच्या आसपास कुंटे आडनावाचे लोक होते. त्या कुंट्यांपैकी काही भागवत झाले. त्यांपैकी आम्ही भागवत. काही कुंटे वर्तक झाले. अशांसाठी कूळ किंवा जाति कळावी म्हणून वंशवृक्ष, कुलवृत्तांत छापले गेले.

प्रत्यक्षात रंगानी गोरे आणि घाऱ्या डोळ्यांचे लोक देखणे असतातच असं नाही. सुंदर सावळे स्त्री-पुरुषही असतात आणि भकास घाऱ्या डोळ्यांचे भकास लोकही असतात. मला स्वतःला काळेभोर डोळे सर्वांत सुंदर वाटतात. विवाहासाठी

जोडीदार निवडताना या गोष्टी बोलायचा मुलं-मुली सुरुवातीला संकोच करतात, पण नंतर मनातलं बोलतात.

देशस्थ ब्राह्मण रंगानी काळेसावळे आणि काळ्या डोळ्यांचे. या दोन ब्राह्मण जातींच्यातसुद्धा एकमेकांच्या आनुवंशिक गुणाबद्दल हेटाळणी, नावं ठेवणं चालतं हे पटण्याजोगंच नाही, पण सत्य आहे. विवाहासंबंधी विचार करताना शक्यतोवर गोरा रंग, नाइलाजानी सावळा मान्य, अगदी शेवटचा क्रम काळ्या रंगाला अशीच परिस्थिती आजही आहे. इतिहासात आर्य गोरे होते, द्रवीड काळे होते, असा उल्लेख सापडतो. मानववंशशास्त्रज्ञ सांगतात त्याप्रमाणे मानवाच्या मूळ गुणधर्माप्रमाणे तीनच जाती. कॉकेशियन (म्हणजे आपल्या भाषेत गोरे), मंगोलियन (म्हणजे चपट्या चेहऱ्याचे पिवळे ऊर्फ चिनी) आणि नीग्रॉइड (म्हणजे कुरळ्या केसांचे काळे हबशी). भारतीयांच्यात तर हे तीनही रंग आणि प्रकार मिश्र प्रमाणात आढळतात. अशा मिश्र संकरित मानवजातीला इंग्लिशमधे 'म्युलॅटो' म्हणतात. ह्या अर्थानी संपूर्ण भारत देश म्युलॅटोंचाच आहे.

संपूर्ण देशाची जनता मिश्रविवाहातून जन्मलेली आहे हे एवढ्यासाठी अधोरेखित करून सांगण्याची आवश्यकता आहे, की जोडीदाराची निवड करताना मिश्र जातीच्या मुलींना विशेषतः खूप त्रास होतो. गंमत म्हणजे मुलग्यांना हा त्रास होत नाही.

भारत हा खूप जुना देश आणि तरी संकरितांचा देश कसा हे एक कोडंच आहे. त्याशिवाय भारतामधल्या निरनिराळ्या भागांमधल्या आदिवासी लोकांचा वांशिक उगम हेही कोडंच आहे. अमेरिकन रेड-इंडियन्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडमधले अबओरिजिनीज ही सुद्धा कोडीच आहेत. पूर्वी काही देश जोडलेले होते आणि हजारो वर्षांपूर्वी झालेल्या पृथ्वीवरच्या भूकंपामुळे त्यांचे तुकडे पडले ही एक शक्यता असू शकते. आपण सर्वांत जुना देश, संस्कृती भारताची असंही म्हणू शकत नाही. ईजिप्त, चीन, ग्रीस यांच्याबाबतीतही तसं म्हणता येत नाही. ही सगळी माहिती अशासाठी नजरेखालून घालायची की त्यामुळे निदान भारत सर्वांत श्रेष्ठ, भारतीय संस्कृति सर्वांत जुनी नि श्रेष्ठ, हिंदू धर्म सर्वांत श्रेष्ठ हे खरं नाही हे कळेल. भारतीय जातीव्यवस्था सर्वोत्तम अशा खरी माहिती उपलब्ध नसलेल्या अवस्थेतला खोटा अभिमानही योग्य नाही. त्यापायी दुसऱ्या देशांना, संस्कृतीला, धर्मांना, जातींना कमी लेखण्याची भावना थोडी बोथट व्हावी आणि यातून माणसानी मुक्त व्हावं.

एवढ्या कुलवृत्तांताच्या धडपडीनंतरदेखील प्रश्न शिल्लक उरतोच. किती मागे शोधत जाणं शक्य आहे? माहिती मिळणार कशी? ती सांगायला कोणी हयात नसणार त्याचं काय? त्याखेरीज वंश तपासण्याचा प्रयत्न फक्त पुरुषाचाच का? अनुवंशिकेतेचे गुण तर आईकडूनही येतात.

गेली काही हजार वर्षं भारतात, जगात पितृसत्ताक पद्धत आहे असं दिसतं. म्हणजेच पित्याचा वंश या कल्पनेबद्दल शोध घेता येईल. पण त्यापूर्वी सगळीकडे मातृसत्ताक पद्धत होती. म्हणजे वंशाचा शोध ह्या कल्पनेलाच छेद जायची पाळी आली समजायची. वंश कोणाचा? आईचा का वडलांचा? वंश ठरवायचा कसा? म्हणजेच जात ठरवायची कशी? सगळा घोळच घोळ आहे. खरं सांगायचं म्हणजे फार तपासणं अशक्य आहे आणि त्यामुळे कूळ, जात या विषयाच्या मागे न लागणंच योग्य.

ज्या जातिद्वेषामुळे ज्यूंच्या कत्तली झाल्या, त्यातून महायुद्धं झाली आणि संहारच संहार झाला, ती जात ही कल्पना चांगली कशी म्हणता येईल? मी स्वतः जात तर मानत नाहीच आणि 'जी कधी जात नाही ती जात' हे माहिती असूनही या कल्पनेच्या विरोधात आहे. आणि तरी समुपदेशनाच्या एवढ्या अभ्यासावरून मला वाटतं की, धर्मभावना बोथट करणं जरा तरी शक्य आहे, पण जातभावना त्या तुलनेत फार चिवट असते. 'जात जाता जात नाही.'

अगदी निःसंशयपणे दिसतं की, पूर्वी कामाच्या प्रकारावरून जाती तयार झाल्या. उच्च समजल्या गेलेल्या जाती बुद्धीची कामं जास्त करत असत. त्यांच्या बुद्धीला जास्त व्यायाम झाला. शिवाय अनुवंशिकतेमुळे त्यांची अपत्यं ठरवून बुद्धिप्रधान कामं करू लागली. शारीरिक कष्ट करणाऱ्यांच्यात याच पद्धतीच्या कष्टांची प्रथा बनली.

उच्च समजलेल्या जातींना पुढारीपण मिळालं. मिळालेलं उच्च स्थान कोणीच घालवायला तयार नसतं. त्या स्थानाला कोणी आव्हान केलं की ते राखण्यासाठी डावपेच चालू होतात. ब्राह्मण समाजानी असे अनेक डावपेच रचले. वैश्य, क्षत्रिय, शूद्र यामागच्या मूळच्या अस्पष्ट कल्पना पक्क्या, घट्ट नि टिकाऊ करून टाकल्या. त्या वर्णाचा श्रेष्ठपणा टिकवण्यासाठी यांच्यातले मिश्र विवाह अशक्य करून टाकले. स्पृश्य, अस्पृश्यांच्या कल्पना सगळ्यांनी मिळून जास्त वाढवल्या. बघताक्षणी वर्ण कळावा यासाठी पोषाख, अलंकार, भाषा, नावं-आडनावं यांच्या प्रथा रूढ केल्या. त्या वेळच्या स्वार्थासाठी त्या लोकांनी

माणुसकी धाब्यावर बसवली.

माणुसकी सोडून कोणीही कोणाशी वागलं की त्याचे परिणाम पुढे दिसणारच. ती वागणूक एका व्यक्तीची असो किंवा समूहाची असो. पुढे त्या वागणुकीवर प्रतिक्रिया म्हणून विरुद्ध बाजू काहीतरी बोलणार-वागणार हे नक्कीच. त्यामुळे वाद वाढणार मग सूड घेण्यासाठी षड्यंत्रं रचली जातात. त्याचा प्रतिसूड घ्यायचा ठरतो. हा झाला मानसशास्त्रातला ठोकताळा. पण मुळात हे झालं कशामुळे तर, धर्म, जात, उच्चनीच या विचारांचं रूपांतर चुकीच्या तीव्र भावनेत झाल्यामुळे.

स्वतंत्र भारताचं लोकशाही राजकीय स्वरूप स्पष्ट होत गेलं तसं त्यातल्या गैरसोयीही कळू लागल्या. ब्रिटिशांमुळे भारतात रेल्वे आली. सुरुवातीला रेल्वेत पहिला वर्ग, दुसरा आणि तिसरा वर्ग असायचे. थोड्याफार फरकानी समाजातले उच्चजातीचे उच्चमध्यमवर्गीय पहिल्या वर्गात, मध्यममध्यमवर्गीय दुसऱ्या आणि खालच्या जातीचे कष्टकरी तिसऱ्या वर्गानी प्रवास करायचे. मुंबईच्या लोकल्समधेही साधारण हीच तऱ्हा, पण जास्त सरमिसळ. अस्पृश्यता हा विषय डोक्यातून जायला मुंबईच्या लोकल्सच्या गर्दीची फार मदत झाली. मुळात स्पृश्य-अस्पृश्य हा विचार स्वच्छ-अस्वच्छ यातूनच आला असावा.

त्या बाबतीतली ब्रिटिश लोकांबद्दल एक गंमत सांगतो. माझ्या लहानपणापासून मी बघतोय, विलायती गोरे लोक अधूनमधून दृष्टीला पडायचे. सर्व भारतीय लोक त्यांच्याकडे अचंब्यानी आणि आदरानी बघायचे. त्यांच्या देहयष्टीमुळे आणि गोऱ्या रंगामुळे ते जणू काही देवच. थोडक्यात लोक त्यांना श्रेष्ठ मानवजात मानायचे आणि तेही स्वतःला श्रेष्ठ समजायचे. त्या काळात आणि अजूनही सर्वसाधारण भारतीय माणसाच्या दृष्टीनी ब्रिटिश, अमेरिकन, जर्मन, रशियन, फ्रेंच, स्कँडिनेव्हियन सगळे एकच. गोऱ्या कातडीचे.

प्रत्यक्षात त्यांच्यातही कमी-अधिक बुद्धिमत्ता, कमी-अधिक गुणवत्ता असतेच. पण त्या काळापासून आजही 'कॉकेशियन अरोगन्स' असतोच. गोरी माणसं भारतीयांकडे त्याच तुच्छ नजरेनी सुप्त मनातून बघतात. हे सगळं सांगण्याचा हेतू सांगतो. 1968 साली मी इंग्लंडमधे नोकरीसाठी गेल्यावर गोऱ्या माणसांचा जवळून संबंध आला. कामाच्या ठिकाणी नि मी ब्रिटिश कुटुंबात राह्यचो त्यामुळे तिथेही. एक गोष्ट कळली की हे लोक रोज अंघोळ करत नाहीत. योजना करून रविवारी फक्त अंघोळ करतात. त्यामुळे त्यांच्या अंगाला घाणेरडा वास यायचा.

हे दातही रोज घासायचे नाहीत, त्यामुळे जवळ आले की तोंडाला घाण वास येत असे. या प्रत्येक गोष्टीला अपवाद तेव्हाही होता आणि आत्ताही असतो. पण ज्यांना भारतीय माणसं 'राज्यकर्ते, देवासारखे श्रेष्ठ' असं मनानी समजतात, त्यातले दोन तृतीयांश लोक अस्वच्छ आहेत हे लख्ख कळलं. इंग्लंडमधे त्या काळात राष्ट्रीय पातळीवर आंघोळ करणं कसं आवश्यक आहे याबद्दल प्रबोधन चालायचं.

वर्ण मिसळामिसळ झाली, असमानतेत संतुष्ट असलेल्या भारतीय समाजात समानतेच्या क्रांतीची झळ लागू लागली. पोषाख एकसारखे झाले, आडनावं बदलायली लागली. जात कळण्यासाठी कागद बनवावे लागले. विशिष्ट जातींसाठी सवलत ही मुळात कल्पना समानतेच्या सूत्राप्रमाणे निघाली, पण त्यातून जास्तच कडक कागदपत्रप्रथा जन्माला आली. सर्व थरांत असंतोष निर्माण झाला. अधिक साकल्यानी विचार करणाऱ्यांची, जात न मानणाऱ्यांची एक नवी जात जन्माला आली. हे सगळं समजावून देऊन जीवनसाथ अभ्यास मंडळात एक प्रश्न आम्ही मुद्दामून विचारतो.

समजा, आमच्यासारखे सत्यशोधक लोक जात मानणाऱ्या समोरच्याला म्हणतायत की, आम्हाला जात नाही, तरी तुम्ही आमची जात ठरवताच. ती कशावरून, तर आमचा रंग, भाषा, पोषाख, शिक्षण आणि दुसऱ्याशी वागणं यावरूनच ना? समजा, असंच बोलणारी, वागणारी, सुशिक्षित, पण अनेक पिढ्यांपूर्वी शूद्र, क्षत्रिय, वैश्य, ब्राह्मण यांच्यात लग्न झाल्यामुळे निर्माण झालेली संकरित संतती आहे. तर जात कशी ठरवणार? सध्याचे गुण महत्त्वाचे की पूर्वजांची जात महत्त्वाची? अशा प्रश्नांच्यातून जात याविषयीची तीव्र संवेदना बोथट करण्याचा आमचा प्रयत्न असतो. कारण उघड आहे. मी, शोभा, शोनील, आभा, बऱ्याच प्रमाणात जात या कल्पनेतून मुक्त होऊ शकलो आहोत. तुम्हीही झालात तर तुम्हाला स्वतःला खूप सुख लागेल.

जोडीदार शोधताना 'अमुक वर्णनाचा', 'तमुक स्वभावाची' अशी इच्छा कोणी केली तर त्यात काही गैर नाही. पण 'जात' या विषयाबद्दल मनात आणलं तरी पुरेशी माहिती मिळूच शकत नाही. जी माहिती मिळू शकते तिला काहीच अर्थ नसतो.

जात या शब्दाच्या व्याख्येबद्दल मला कित्येक वेळा प्रश्न पडलेला आहे. विशेषतः तो प्रश्न लिंगायतांबद्दल आहे. काही लोक त्याला हिंदूंमधला पंथ

मानतात. काही लोक लिंगायत ही जात समजतात. जीवनसाथ हे फक्त अभ्यास मंडळ आहे, वधूवर सूचक संस्था नाही. त्यामुळे मी येणाऱ्यांना जात, धर्म विचारत सुद्धा नाही. लिंगायत लोक स्वतः लिंगायत असल्याचं आवर्जून सांगतात नि गरज नसताना त्याच जातीतला जोडीदार हवा हे पण सांगतात.

केवळ उत्सुकतेमुळे मी चौकशी केली. लिंगायतांची वैशिष्ट्यं काय हे शोधायचा प्रयत्न केला. असं कळलं की, हा हिंदूंमधला एकमेव पंथ आहे की ज्यात मृत व्यक्तीला खड्ड्यात पुरतात. जाळत नाहीत. पुन्हा विशेष म्हणजे मृत व्यक्तीला बसत्या अवस्थेत पुरतात, झोपून नाही. कोणी मेलं की तीन दिवसांत नातेवाईकांना जेवू घालून आपापल्या उद्योगाला लागतात. इतर हिंदूंच्या मानानी यांचा कल आधुनिकतेकडे असतो. त्याशिवाय लिंगायत लोक धार्मिक उपास करत नाहीत. ही पण खूप खास गोष्ट आहे, कारण हिंदूंचा धार्मिक उपास म्हणजे अखाद्य खादाडीचा दिवस असतो. जबरदस्त विनोदी प्रकरण असतं ते.

जात विषयाबद्दल भारत सरकारनी, महाराष्ट्र सरकारनी चुका केल्या. त्यावर उपाय म्हणून घोडचुका केल्या. मग त्या निस्तरण्यासाठी महाचूक नुकतीच केली. सहा नवीन जातींना 'ओबीसी' म्हणजे इतर मागासवर्गीय जमातींमधे समाविष्ट करून घेतलं. या युक्तीमागे एकगठ्ठा मतं मिळवणं ही कल्पना असेल बहुधा.

जात या विषयातला सर्वांत काही वाईट प्रकार असेल तर तो म्हणजे अस्पृश्यता. अगदी माझ्या आजोबांच्या काळात देखील 'खालच्या जातीचा' हे शब्द रोज घरात बोलले जायचे. असे लोक कामासाठी लागायचे तर खरे, घरी येणं-जाणं असायचं, त्यांना चहा, खायला द्यायचं, सगळं चालायचं, पण त्यांनी ओसरीवर खाली बसायचं, खुर्चीवर नाही. चुकून स्पर्श झाला तर स्वतः आंघोळ करण्याची पद्धत होती. इतर धर्मांच्यामधे जात नाही. ख्रिश्चनांच्यात, मुसलमानांच्यात जात, उच्चनीच नाही. फक्त हिंदूंच्यात या जातीच्या कल्पनेनी भयंकर घोटाळे करून ठेवले आहेत. असा हिंदूधर्म सर्वश्रेष्ठ असं मानणारे अनेक लोक आहेत, पण ते खरं नाही.

जाती-उपजाती यांच्या अभ्यासाचा शाळा-कॉलेजच्या शिक्षणात स्वतंत्र विषय नसतो. त्याचं कारण माहीत नाही. पण ब्राह्मणाला फक्त ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर एवढंच बघायचं असतं. त्यात कोकणस्थ स्वतःला देशस्थांपेक्षा वरचे समजणार. सारस्वत, सी.के.पी. यांना 'परभट' समजणार.

आमच्या एका गोव्यात स्थायिक झालेल्या जवळच्या मैत्रिणीकडून कळलेली

माहिती सांगतोय. तिथे 'रोमन कॅथलिक ब्राह्मण' असतात. बर्वे, गोरे, ढवळीकर अशा आडनावांची मराठी भाषिक कुटुंबं असतात ही. इतके दिवस माझी समजूत होती की, ब्राह्मण म्हणवून घेणारे फक्त हिंदूच असू शकतात.

गोव्यातली आणखीन् एक गंमत ती सांगत होती. तिथले सारस्वत आणि चांद्रसेनीय प्रभू म्हणजे सी.के.पी. स्वतःला उच्च जातीचे ब्राह्मणच समजतात. ते बंगालमधून किनारा शोधत महाराष्ट्रात आलेले असल्यामुळे ते मासेखाऊ ब्राह्मण एवढाच मुख्य फरक. बंगाली मासेखाऊ ब्राह्मण माशांना शाकाहारच समजतात ना!

अगदी खरं सांगायचं तर, अनेक जाती आणि त्यांची वैशिष्ट्यं माहिती असणारा एकच माणूस माझ्या ओळखीतच नाही. ज्या जातींची मी नुसती नावं ऐकली आहेत त्यांची यादी सांगतो. कोकणस्थ ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, कऱ्हाडे, लिंगायत, सारस्वत, सीकेपी, जैन, माहेश्वरी, छात्र (क्षत्रिय), मराठा, लेवा पाटील, कुणबी, महार, चांभार, मातंग, माळी, न्हावी, शिंपी, सोनार, धनगर, कोष्टी, कासार, त्वष्टा कासार, सुतार, कोळी, महादेव कोळी, आग्री. बस्स, मला एवढीच आठवतात. जाणकारांना अजून खूप जातींची नावं माहिती असतील, पण मला माहिती नाहीत, कारण मी कोणाची जात विचारत नाही, त्याविषयी विचारत नाही. माझ्या बघण्यात मात्र असे खूप लोक आहेत की, त्यांच्या समोर बसलेल्या माणसाची जात कळल्याशिवाय त्याच्याशी वागायचं कसं याबद्दल त्यांचं धोरण ठरत नाही. मग आडून आडून अनेक प्रश्न विचारत राहतात, मूळ गाव कुठचं? अमुक अमुक तुमच्या नात्यातले आहेत का? वगैरे.

मराठा, त्यात शहाण्णव कुळी मराठा स्वतःला उच्च समजतात. कुणबी हे मराठाच पण शेतकरी वर्गातले. छात्र ही मराठ्यांच्यातलीच एक जात. ते खरे लढवय्ये क्षत्रिय म्हणे. महाराष्ट्रापुरतं तरी असं चित्र दिसतं की, मराठ्यांनी राजकारण व्यापून टाकलं नि ब्राह्मणद्वेषाची बीजं पेरली. 'जानवंवाले' असा ब्राह्मणांचा उल्लेख नि जिथे तिथे त्यांचे पाय ओढायला सुरुवात झाली.

माझं लहानपण खूपसं पुरोगामी वातावरणात गेल्यामुळे केवळ मुंजीच्या वेळी मला जानवं घालायला लावलं होतं एवढं आठवतंय्. एरवी माझे वडील काही काळ जानवं वापरताना मी बघितलंय्. पण पुढे त्यांनीही ते सोडलं, मी पण ते जानवं तुटल्यावर पुन्हा कधी वापरलं नाही. त्या काही महिन्यांत मला अंधुकसं आठवतंय् की लघवी करताना जानवं कानावर अडकवायला मला सांगितलं होतं. जानवं उजव्या का डाव्या कानावर हे मला आठवत नाही, पण

'शास्त्र' म्हणून मला काहीतरी सांगितलं होतं. कानही शास्त्राप्रमाणे डावा का उजवा हे ठरलेलं असतं. शहरात अनेक लोक अजूनही आपल्या ब्राह्मण असण्याचा अभिमान बाळगून वावरताना मी बघतो. क्वचित सार्वजनिक मुताऱ्यांच्यात जानवं कानाला अडकवणारा माणूसही आढळतो, पण अगदी क्वचित.

गांधीहत्येच्या काळात तर ब्राह्मणांना वेचून मारल्याची, त्यांची घरं जाळल्याची उदाहरणं सापडतात. प्रत्यक्षात पूर्वीपासून शिक्षणाच्या वाटेनी गेल्यामुळे ब्राह्मणांना अक्कलहुशारी जास्त होती. त्यांना लोभ नव्हता. दुसऱ्याला शिकवण्याची, ज्ञानदानाची इच्छा होती. स्वातंत्र्याच्या लढ्यात पुढाकार घेणारे बरेचसे ब्राह्मण होते. नेहरु, टिळक, आगरकर, गोखले, सावरकर ह्या सगळ्यांना स्वार्थापलीकडे बघण्याची दृष्टी आणि प्रवृत्ती होती. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेत पुढाकार घेतला.

राजकीय पातळीवर दलितांच्या उद्धारासाठी त्यांना सवलती द्याव्यात असे निर्णय ब्राह्मणांनी घेतले तेव्हा त्यांना आपण स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेणार अशी कल्पना नव्हती. या निर्णयप्रक्रियेत वैश्य आणि क्षत्रियही होते. नव्हते फक्त शूद्रवर्णीय. त्यांच्यापैकी शिकलेला आणि अधिकार असलेला एकच जण, तो म्हणजे डॉ. आंबेडकर. सध्याच्या दलितांच्या दृष्टीनी त्यांना देवच मानलेलं आहे. मधल्या काळात सर्व क्षेत्रांत विशिष्ट जातीजमातींच्यासाठी कायदे झाले त्यामागे उत्तम हेतू होते. त्या कल्पनांची म्हणजे शिक्षण, नोकरी, जागा वगैरेंच्या आरक्षणांची अंमलबजावणी झाली ती इतक्या चुकीच्या पद्धतीनी की त्या घोळातून भारत देश कधीही सावरणं शक्य नाही. दलितांचं सगळं विश्वच निराळं असतं. संदर्भ निराळे, विचारसरणी निराळी, सगळंच वेगळं असतं.

न बरा होणारा रोग देशाला झाला आहे आणि देश व्यक्ती नसून समूह असल्यामुळे मृत्यूही अशक्य अशी परिस्थिती आहे. सगळ्या सुशिक्षित, बुद्धिमान लोकांची आरक्षण प्रकारात वाट लागली. परदेशात जाऊन स्थायिक होणारे दोन वर्ग तयार झाले. इंग्लंड, अमेरिका आणि इतर अनेक देशात कष्टासाठी माणसं हवी होती. तो एक कष्टकरी वर्ग आणि दुसरा शिकलेल्या, इंग्लिश लिहिता-बोलता येणाऱ्यांचा वर्ग. अशा दुसऱ्या प्रकारात माझाही समावेश होताच. याला 'ब्रेन-ड्रेन' असं नाव पडलं. कायम वास्तव्याची सोय, पैशाचा-सुबत्तेचा मोह, भारतातल्या वातावरणाची दहशत याचा परिणाम म्हणजे लाखो लोक कायम वास्तव्यासाठी विलायतेत गेले. तिथं त्यांना मुलं झाली, शिकली आणि हळूहळू परतीचे दोर कापले गेले.

त्यानंतरची गेल्या 15-20 वर्षांत आय.टी. क्षेत्रात परदेशात जाण्याची महाकाय लाट आली. त्यामधला प्रमुख भाग ब्राह्मण वर्गाचा आहे. त्याची कारणंही स्पष्ट आहेत. पण प्रश्नाच्या मुळाशी गेलं तर धर्म-जात या कल्पनाच गुन्हेगार सापडतात कारण ब्राह्मणद्वेष्ट्या वातावरणात भारतामधे ब्राह्मणांची कुचंबणा व्हायला लागली. परदेशात जाऊन स्थायिक होणाऱ्यांच्यात अजूनही मूळचा इथला ब्राह्मणवर्ग जास्त आहे. आता मुस्लिम आणि मराठा लोकांसाठी आरक्षण मान्य झालेलं आहे. याचा अर्थ ब्राह्मणांचे आणखीन हाल होणार. जास्त संख्येनी ब्राह्मण लोक परदेशात जाणार आणि तिथेच कायम वास्तव्य करणार. माझा एक मित्र केवळ ब्राह्मणांसाठी एक संघटना चालवतो. ज्या ब्राह्मणांवर अन्याय झाला आहे त्यांना मदत करणं आणि गरजू ब्राह्मणांच्या मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देणं, वसतिगृह चालवणं असं काम ती संस्था करते. मुंबईत दादरला याखेरीज ब्राह्मण सहाय्यक संघही आहे, पण तो निराळा.

आरक्षणाचा कायदा आला, सरकारी नोकऱ्यांच्यात लागू झाला, सरकारी, बिनसरकारी शाळांच्यात लागू झाला. कॉलेजेसमधे झाला तेव्हा यामुळे काय काय घोळ होतील याबद्दल एवढी स्पष्ट कल्पना नव्हती. मी पूर्णपणे शिक्षणक्षेत्रात नाही, पण अर्धवटपणी त्यात आहे. ज्यांच्यावर अनेक पिढ्या अन्याय झाला त्यांचा सामाजिक उद्धार करायचा असला तर थेट शालेय शिक्षणात आरक्षण या पद्धतीनी प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची कल्पना मलाही समजते.

शिक्षणामधे प्रौढशिक्षणाचे प्रयोग झाले ते मला माहिती आहेत. शोभा तर थेट त्यात कामच करत होती. त्या वेळी सरकारतर्फे अनेक कल्पना राबवल्या होत्या, त्या मला माहिती होत्या. त्यांपैकी ‘ईच वन टीच वन’ ही कल्पना सर्वांत चांगली होती. माझ्या मते एवढा उशीर झाला असला तरी अजूनही ती वापरता येईल. त्यासाठी सरकारनी राष्ट्रीय पातळीवर मोहीम हातात घ्यायला लागेल. प्रत्येक माणूस दुसऱ्या कोणाकडून तरी शिकेल आणि कोणाला तरी शिकवेल. ‘शिकायला तयार असलेला शिक्षक’ ही गोष्ट सध्याच्या यंत्रणेत दुर्मीळ झाली आहे. प्रत्यक्षात या वर्णनाचे कोट्यवधी विद्यार्थी आणि कोट्यवधी शिक्षक तयार करता आले तर दहा वर्षांत देशाचा कायापालट होईल. एवढ्या कोट्यवधी शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना तयार करणं, सुविधा पुरवणं, मानधन देणं, निरीक्षण करणं, नोंदी ठेवणं हा निव्वळ व्यवस्थापनाचा प्रश्न आहे. मी स्वतः आता म्हातारा झालो पण माझे अनेक पेशाबंधू हे काम करू शकतील.

हे सगळं सांगण्याचा मूळ उद्देश विसरता येणार नाही. 'जातीचं आरक्षण' या भयानक रोगातून भारताची मुक्तता होईल. ज्यांच्यावर जातीच्या कारणावरून अन्याय होतो त्याच्या निवारणासाठी आरक्षण हा मूळ तर्कविचार लक्षात घेतला तर अगदी आत्तासुद्धा ब्राह्मणांना आरक्षण मिळायला हवं. पण सत्ता कोणाच्या हातात आणि ती कशी वापरली जाते हे लक्षात घेतलं तर ही गोष्ट घडेल असं मला वाटत नाही.

मी तर स्वतः गेली 57 वर्षं जाहीर धर्म आणि जातिव्यवस्थेविरोधी, कर्मकांडविरोधी आहे. पण लोक काय करतात, कशासाठी करतात हे माहीत असायलाच हवं. त्यामुळे त्याविषयी अनेकांशी बोललो. जीवनसाथमधे अनेक वेळा अशा चर्चांचं सूत्रसंचालन केलं. अर्थातच त्याविषयी बोलण्यापेक्षा ऐकण्याचं काम जास्त केलं. आत्तापर्यंत त्याविषयी कळलंय् तेवढं मांडतोय.

सगळी कर्मकांडं मुळात श्रद्धेवर म्हणजे ईश्वरावरच्या श्रद्धेमधून जन्मलेली असतात. जिथे श्रद्धा तिथे विचार करायला बंदी असते. श्रद्धा म्हणजे विश्वास, आत्मविश्वास अशा अर्थानी त्याच्याकडे बघण्याबद्दल काही अडचण नाही, कारण आत्मविश्वास ही प्रत्येक माणसाची जगण्याची गरजच आहे. हा आत्मविश्वास कमी पडला की दुसऱ्या कोणावर, कशावर तरी विश्वास म्हणजेच श्रद्धा ठेवण्याखेरीज मार्गच उरत नाही. दुसऱ्यावरचा विश्वास एका मर्यादेपलीकडे गेला की तो अंधविश्वासच असतो. थोडक्यात श्रद्धा आणि अंधश्रद्धा एकच.

स्वतः विवेक वापरू न शकणाऱ्यांसाठी कर्मकांडं आहेत आणि ती आंधळेपणा शिकवतात. काही विचार करायला परवानगी नाही, अमुक गोष्ट, कृती, तमुक वेळांना अमुक पद्धतीनी करायची याचा अर्थ करायची. सैनिकाला जशी फक्त आज्ञा पाळण्याची परवानगी असते तसा सर्वसामान्य माणूस कर्मकांडं जाणणाऱ्यांच्या फक्त आज्ञा पाळतो. नेमका जाणकार कोण हेही ठरवण्याचा मार्ग नसल्यामुळे घरातले, गावातले वडीलधारे, अधिकारी लोक सांगतील ती आज्ञा. ते तथाकथित गावातले सामाजिक पुढारी काही धर्मशास्त्राचा अभ्यास केलेल्यांना कधी विचारतात तर कधी स्वतःच्या स्वार्थासाठी मनचंच सांगतात. 'असं शास्त्रात सांगितलंय्' असं म्हणतात. 'हे माझं मत आहे' असं म्हणत नाहीत कारण त्यामुळे मतस्वातंत्र्य सूचित होतं.

माझ्या नातेवाइकांना, ओळखीच्यांना अमुक कर्मकांडामागची मूळ कल्पना जाऊच दे, त्यात नेमकं काय करायचं असतं याचं वर्णन सांगा म्हटलं तर 50

जणं 50 निराळ्या गोष्टी सांगतात. कोणालाही नेमकं माहितीच नसतं. माझ्यासारख्या विवेकवादी लोकांचं प्रमाण 1% मानलं तरी बाकी सर्व जनतेचं वर्णन हेच. 'अंध.'

काही उदाहरणं देतो. सोवळं वस्त्र याचा मूळ संबंध स्वच्छतेशी आहे, रेशमी कापडाशी नाही. हिंदू कर्मठ पुरुष उघड्यानी जेवतात, त्याचाही संबंध कपडे स्वच्छ राहावेत याच्याशीच आहे, मग स्त्रियांचं काय? स्त्री-पुरुष असमानता तर सर्व कर्मकांडांच्यात ओतप्रोत भरलेली आहे. स्त्री-पुरुष असमानतेच्या निरनिराळ्या रूपांविषयी आपण स्वतंत्र बोलणार आहोत त्यामुळे त्याविषयी आणखी आत्ता सांगत नाही. निरनिराळ्या समाजांत निराळी कर्मकांडं असतात. प्रत्येक कृतीमागे पूर्वी अर्थ असणारच पण तो संदर्भ कालबाह्य झाला की कृती बंद व्हायला पाहिजे ती होत नाही म्हणून तो आंधळेपणा असं आपण म्हणतोय्.

पाश्चात्त्यांच्यात घरात, चर्चमधे बूट वापरतात, हिंदूंच्या घरात-देवळात पादत्राणं चालत नाहीत. त्याचबरोबर ख्रिश्चन चर्चेसमधे लोकांना वापरण्याच्या टॉयलेटस् प्रत्येक ठिकाणी असतात. ही गोष्ट शारीरिक स्वच्छतेसाठी आवश्यक असूनही हिंदू मंदिरांमधे नसते. ख्रिश्चनांच्यात प्रत्येक पदार्थाला निराळी डिश असते तर हिंदू एका मोठ्या ताटात ठराविक ठिकाणी ठराविक पदार्थ वाढून खातात. मुस्लिम तर अनेक जण एका मोठ्या ताटात ताटाभोवती गोलात बसून जेवतात. यातलं योग्य-अयोग्य ठरवणार तरी कसं?

माझ्या आणि शोभाच्या सामाजिक कामामुळे आमचा जनसंपर्क खूप आहे. एरवी समाजसुधारणेच्या कल्पनेनी भारलेली निःस्वार्थी माणसं, त्यांच्या कामात अगदी डोळस असलेली माणसं, डोळसच नाही तर दूरदृष्टी असलेली माणसं या कर्मकांडांच्या बाबतीत आंधळेपणानीच वागताना दिसतात. या समाजाच्या अवस्थेचा विचार केला की वाईट वाटतं. डॉ. नरेंद्र दाभोळकर काय म्हणत होते ते फार कमी लोकांना कळलं होतं. समाजातले सर्व गुरू, बुवा, महाराज यांनी कुटुंबांच्या मदतीनी नवस, व्रतवैकल्यं यांची जबरदस्ती केली. सगळे गुरू एकमेकांबद्दल कडवट बनले. पद्धतींबद्दल दुराग्रही बनले. या विषयात एका निर्णयापर्यंत मी फार पूर्वी पोचलो. तुम्ही तुम्हाला हवं ते करा, मी त्यात नाही हे नक्की.

●●●

5

पुनर्जन्माविषयी समतोल विचार

पुनर्जन्म आणि पूर्वजन्म यांबद्दल थोडं सांगतो, जगात हा वाद हजारो वर्षं संपलेला नाही. हा माणूस गेल्या जन्मी असा असा होता असं म्हटलं तरी सध्याच्या योग्य वागणुकीतून त्याची सुटका होत नाही हे सगळ्यांना माहीत असतं, पटतं. पण पुढच्या जन्मात अमुक व्हावं, आत्म्याला शांती मिळावी म्हणून अमुक करूया, तमुक करू नका हे मात्र केवळ भीती दाखवण्यासाठी असतं. योग्य वागावं असं नुसतं ज्याला पटवता येत नाही त्याच्यासाठी पुनर्जन्माची कल्पना खरोखरच हुशारीची आहे. तू असं वागलीस तर माझ्या मृत आईच्या आत्म्याला त्रास होईल, हे काहींसाठी उपयोगी असेलही.

आमच्या प्रकारच्या विवेकवादी माणसावर अशा धमकीचा काहीच परिणाम होत नाही. खरं म्हणजे अशी धमकी देणाऱ्या माणसाबद्दल वाईट वाटतं. आम्ही विचारानी मुक्त माणसं मात्र कुठच्याही धमकीशिवाय योग्य वागणं हेच सरस मानतो. त्या मुक्तीशिवाय असं लिखाण किंवा संकलनही शक्य होणार नाही. हा पुस्तकसंच, ही कार्यशाळादेखील अशक्य आहे.

माझ्या मते माणूस जेवढा प्रसिद्ध तेवढी त्याच्यावर योग्य तेच बोलण्याची जबाबदारी अधिक असते. टी.व्ही.वरच्या प्रसिद्ध, लोकप्रिय कार्यक्रमात मोठ्या अभिनेत्रीनी 'इस जनममे' असं म्हटल्यासरशी काही कोटी लोकांच्या मनातला पुनर्जन्म या कल्पनेवरचा विश्वास शतपटीनी वाढतो आणि विवेक नष्ट होतो. त्याचा मुख्य तोटा म्हणजे 'या जन्मी कसंही अनैतिक वागायला हरकत नाही, पुढच्या जन्मी ते दुरुस्त करू', असं वाटणं. सिनेमातल्या एखाद्या पात्राच्या तोंडी 'इस जनममे' असा संवाद असल्यानी एवढं बिघडत नाही. प्रेक्षकाच्या दृष्टीनी तो संवाद त्या अभिनेत्रीच्या तोंडून ते रंगवलेलं पात्र बोलत असतं. मुलाखतीची गोष्ट

निराळी. तिथे ती स्वतःच ते वाक्य म्हणते. मला स्वतःला वाटतं की, व्यक्ती म्हणून नटांना कुठचाही विचार करण्याची निश्चित मुभा आहे, पण पडद्यावर नाही.

मग पुढे स्वर्ग आणि नरक ही कल्पना पण लोकांनी उचलून धरली. कुठची कल्पना कशा पद्धतीनी जगभरात अनेक ठिकाणी पोचली हे ठरवणं फार कठीण आहे. पण भारतापर्यंत जे काही पोचलं ते आणखीनच गमतीशीर होतं. मुळात भारतातली मूर्तिपूजा, अनेक देव, देवी. त्यात स्वर्ग-नरक आणि स्वर्गात जाण्यासाठी काहीतरी करणं, नरकात न जाण्यासाठी प्रयत्न, ज्योतिषी, बुवा, महाराज, करणी, भानामती या सगळ्यांचं प्रचंड जंजाळ बनलं.

एकदा पुनर्जन्म ही कल्पना मानली की गतजन्म ही कल्पनादेखील ओघानीच येते. 'गेल्या जन्मीची पापं' या उल्लेखानी कोणालाही निरुत्तर करता येतं. गतजन्म आणि पुनर्जन्म या पाठोपाठ या पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका म्हणजे मोक्ष ही कल्पनाही निघाली. 'सात जन्म' ही जबरदस्त कल्पना खूपच लोकप्रिय झाली. त्याला साहित्यात, कविता आणि गद्य दोन्हींमधे स्थान मिळालं. अगदी या अर्थाची भावगीतं, सिनेमातली गाणी गाजलीदेखील. हे सगळं इतकं पक्कं रुजलं की पुनर्जन्म या मूळ कल्पनेबद्दल कोणी शंका घेईनासं झालं.

अनेक चालीरीती, कर्मकांडं यांच्या मुळाशी पुनर्जन्म ही कल्पना असते. मृत्यूसंबंधातली सगळी कर्मकांडं तर या गृहिताभोवताली गुंफलेली आहेत. मृत्यूनंतर माणूस स्वर्गात जावा म्हणून विशिष्ट मंत्र आणि कृती याचा अर्थ स्वर्ग आणि नरक या कल्पनेवरचा विश्वास. कर्मकांडांच्या बाबतीत कुठचाही प्रश्न विचारायचा नाही हीच मुख्य अट असते. समजा, तशी परवानगी असती तर असा प्रश्न विवेकवादी माणूस विचारेल– एकदा स्वर्गात प्रवेश झाला की मग पुनर्जन्माचं काय होणार? शिवाय गेल्या जन्मी अशाच पद्धतीनी ती व्यक्ती स्वर्गात गेली असली तर पुन्हा जन्मली कशी? खुद्द माझा गतजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, मोक्ष या कुठच्याही कल्पनेवर विश्वास नाही. पण सर्वसामान्य जनतेला या कल्पनांवर विश्वास ठेवण्यासाठी सिनेमांच्यातले अनेक उल्लेख पुरतात. मराठीतल्या काही सिनेमांनी तेच केलं. असा सिनेमा, नाटक करमणुकीच्या हेतूनी बनवलेलं असतं. पण तिथे तो विषय थांबत नाही. त्याचे समाजावर परिणाम होतातच.

लहानपणापासून मला एक प्रश्न पडलेला आहे. मला एवढ्या वर्षांच्यात त्याचं उत्तर मिळालेलं नाही. प्रश्न असा की, एक माणूस मेला की कुठेतरी तो

पुनर्जन्म घेणार ही कल्पना मान्य केली तर त्याचाच अर्थ कोणीतरी मेल्याशिवाय दुसरं कोणी जन्मच घेऊ शकत नाही. तसं असलं तर जगाची लोकसंख्या वाढणारच नाही. लोकसंख्या सतत वाढते याचा अर्थ पुनर्जन्म, गतजन्म या कल्पना खोट्या असल्या पाहिजेत. या माझ्या प्रश्नाचं एकच उत्तर मला मिळालं. ते म्हणजे 'चूप बस.'

वटपौर्णिमेच्या निमित्तानी वडाची पूजा आणि तोच पती 7 जन्म मिळावा म्हणून इच्छा ही तर फारच गमतीची गोष्ट वाटते. गेल्या जन्मी केलेल्या पूजेमुळे 7 जन्मं मिळणारा पती नं. 1 आणि या जन्मी केलेल्या पूजेमुळे मिळणारा पती नं. 2 यांचं पुढच्या जन्मी काय करायचं? या प्रश्नावर देखील तेच उत्तर. चूप बस.

आत्मा नावाचं काही असतं असं मानणारे आणि न मानणारे असे सरळ दोन गट आहेत. आत्मा नावाचं काही नसावं असं मला का वाटतं हे मी सांगू शकतो. काही लाख वर्षांपासून किंवा खूप हजार वर्षांपासून पृथ्वीवर प्राणी होते. आत्मा ही कल्पना खरी मानली तर मानवाचा जन्म किंवा मोक्ष नाही मिळाला तर एखाद्या इतर प्राण्याचा जन्म घेऊन आत्मा पुन्हा पृथ्वीवर असणारच. प्राणी याचा अर्थ मासे, कीटक, पक्षी, जनावरं, सरपटणारे प्राणी असा घ्यावाच लागणार आणि या प्रत्येक प्राण्याचा आत्मा कुठेतरी फिरत राहणार. या सगळ्या आत्म्यांच्या संख्येचा अंदाजसुद्धा करणं कठीण एवढा तो मोठा आकडा असणार. एवढे आत्मे आकाशात खरोखर हिंडत असले तरी आपल्या संबंधातला विशिष्ट आत्मा गर्दीतून वाट काढत आपलं चांगलं किंवा वाईट करायला कसा पोचेल? मुळात आत्मा आकारानी केवढा असतो? अशा प्रकारचे प्रश्न विचारत मी अनेकांशी बोलल्यावर 'गप्प बस'. एवढं एकच उत्तर मला मिळालं.

या बाबतीत वाचायचा मी प्रयत्न केला पण योग्य काही सापडलं नाही. मुळात माझा पिंड (कावळा शिवतो त्या पिंडाचा काही संबंध नाही) खूप वाचण्याचा नाही, थोडं मोजकं वाचन पण चिंतन जास्त असा आहे. हळूहळू खात्री होत गेली की, गतजन्म, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, आत्मा, मोक्ष या सगळ्या कल्पनांच्यातून मी मुक्त व्हायला पाहिजे.

पारंपरिक वाङ्मयात पुरुषार्थाचा अर्थ सांगताना 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष' असा सांगितलेला आहे. त्याचा अर्थ फक्त पुरुष असा न घेता आधुनिक संदर्भात पुरुष किंवा स्त्री असा घ्यावा लागेल आणि सध्याच्या आयुष्याला उपयोगी पडेल असा बोध काढायचा असेल तर धर्म म्हणजे योग्य वागणूक, अर्थ म्हणजे

चरितार्थाची जबाबदारी, काम म्हणजे समाधानी स्त्री-पुरुष संबंध आणि मोक्ष याचा अर्थ आयुष्याकडे अलिप्तपणे बघण्याची क्षमता असा घ्यावा लागेल.

आत्मा याचा अर्थ काही लोक निराळ्या प्रकारे मांडतात. शरीरात सगळे अवयव असले तरी शरीराचं यंत्र चालू ठेवायला चैतन्य लागतंच. ते चैतन्य म्हणजे आत्मा असं काही लोक म्हणतात. याखेरीज आत्मा या कल्पनेबद्दल समाज हजारो वर्षं झगडतो आहे. आत्मा आपल्या शरीराच्या आत असतो की शरीराबाहेर यावर अखंड चर्चा चालू असतात. आत्मा म्हणजे अस्तित्वाचा मुख्य सारांश इथपर्यंत मी मान्य करू शकतो, पण आपल्या त्वचेबाहेर आत्मा नावाचं काही असतं यावर माझा स्वतःचा विश्वास नाही.

इंग्लिशमधे आत्म्याला 'सोल' म्हणतात. त्यावरून 'सोल-मेट' म्हणजे जवळची व्यक्ती असा शब्दप्रयोग वापरतात. यातला मूळ मुद्दा मात्र एका कल्पनेभोवती घोटाळतो. शरीर दिसतं. मन, प्राण, आत्मा दिसत नाही तर त्यावर विश्वास ठेवायचा किंवा नाही? ज्यांचा विश्वास नाही त्यांच्या दृष्टीनी 'अमुक केलं तर त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल', हे वाक्य निरर्थक आहे. 'आत्मिक समाधान' आणि 'समाधान' या दोन्हीमधे त्यांच्या दृष्टीनी काही फरक नसतो.

शेवटी मुख्य प्रश्न माझ्या मनातला तोच आहे. तुम्ही पुनर्जन्मावर विश्वास ठेवा किंवा ठेवू नका. तुम्ही 365 दिवस 24 तास सगळ्यांशी चांगलं वागता का?

●●●

6

नशीब, ज्योतिष-पत्रिका याबद्दल समतोल विचार

तत्त्वज्ञानात नशीब या विषयावर बराच अभ्यास केलेला आहेच, मानसशास्त्रात आणि व्यवस्थापनशास्त्रातही यावर बरीच उपयोगी माहिती मिळते. जीवनसाथ अभ्यास मंडळात 'नशीब' या विषयावर अडीच-तीन तासांची कार्यशाळाही मी घेतो. माहितीच्या ओळखीच्या लोकांना नशिबानी काय मिळालं यावर चर्चा चालते. नशिबानी खूप चांगलं झालं अशी काही उदाहरणं असतात. खूप वाईट नशीब असलेलेही लोक असतात. त्यांची वर्णनं सांगितली जातात. मग यांपैकी सर्वांत दुर्दैवी कोण यावर चर्चा चालतात. त्या तुलनेत शेवटी स्वतःच्या नशिबाची त्याच्याशी तुलना करायची असते. इतर अनेकांच्या तुलनेत आपली परिस्थिती बरीच बरी आहे असा जवळजवळ प्रत्येकाचा निष्कर्ष निघतो.

कार्यशाळेची सुरुवात शुभ-अशुभ, इतरांनी करण्याजोग्या काय काय गोष्टी आहेत अशानी होते, पण शेवट स्वतः काय काय करायचं याच्या यादीमधे होतो. आपलं नशीब चांगलं का वाईट यावर जेव्हा जीवनसाथमधे चर्चा होते तेव्हा कुठच्याही सज्ञान स्त्री-पुरुषाला एवढं तर कळायलाच पाहिजे की जे आपल्या हातात नाही ते नशीब. त्यामुळे त्यावर उपाय करण्याची धडपड अजिबात करू नये. तरीदेखील लोकांच्या डोक्यात असले नशीबासंबंधीचे विचार चालू असतात. त्यावर लोक तासन्तास, वर्षानुवर्षं चिंतेत घालवतात. हे माझ्याच बाबतीत का घडलं, माझ्याच वाट्याला का आलं, यावरून रडतात. जीवनसाथच्या कार्यशाळेत लोक ज्या गोष्टींवरून अर्थशून्य तक्रारी करतात त्यांचे काही नमुने सांगतो.

1) मी भारतासारख्या दरिद्री देशात का जन्माला आलो?

2) मी या पिढीत का जन्माला आले?

3) मी अर्धशिक्षित वडील आणि निरक्षर आई यांच्या पोटी का जन्माला आलो?
4) मी जेमतेम रूपाची, जेमतेम उंचीची, सावळ्या रंगाची का झाले?
5) माझ्याच नशिबी असा नासमझ चमत्कारिक नवरा का?
6) माझ्याच नशिबात अशी नखरेल बायको का?
7) माझ्याच पोटी लागोपाठ मुली का जन्मल्या?
8) एकुलता एक मुलगा कायमचा परदेशी गेल्यामळे माझ्याच वाट्याला का हा एकटेपणा?
9) मी जिथे जातो ती कंपनी बंद पडते, असा कसा मी करंट्या नशिबाचा?
10) माझी व्यवसायातली करिअर चालू असताना नेमकी एवढी भाववाढ कशी झाली?

या 10 मुद्द्यांबद्दल सगळ्यांचं काही काही म्हणणं असतं. हळूहळू लोकांच्या लक्षात येतं की, आपल्याला नशिबानी काही खूप चांगल्या गोष्टीदेखील मिळाल्या आहेत आणि त्या इतरांकडे नाहीत. चर्चेच्या शेवटी एक निष्कर्ष अगदी पक्का असतो. आपण शरीरानी, बुद्धीनी 'नॉर्मल' आहोत ही मुळात केवढी मोठी नशिबानी मिळालेली गोष्ट आपल्याकडे आहे. बाकीच्या गोष्टी अगदीच गौण आहेत. या एका गोष्टीमुळे आपलं नशीबच करंटं असं म्हणण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही.

सत्यशोधकाच्या दृष्टीनी नशिबाची व्याख्या सोपी आहे. जे आपल्या हातात नाही, जे आपल्याला बदलता येत नाही ते नशीब. ते बदलता येत नाही त्यामुळे बदलण्याचे प्रयत्न करण्यात एक मिनिटही वाया घालवू नये. आपण ज्या उंचीचे, ज्या रंगाचे आहोत त्यात बदल होणार नाही. त्यामुळे त्याबद्दल बोलण्यात काही फायदा नाही आणि प्रयत्न करण्यातही अर्थ नाही. तब्येत मात्र सुधारू शकू, कारण तो नशिबाचा भाग नाही. मी श्रीमंताच्या घरी जन्मलो असतो तर, अमेरिकेत जन्मलो असतो तर, या विचारात काही अर्थ नाही. बुद्धी हा नशिबाचा भाग आहे, पण मेहनत, चिकाटीनी प्रयत्न या स्वतः करण्याच्या गोष्टी आहेत.

लोक जेव्हा देव शब्द वापरतात तेव्हा त्याचा अर्थ 'जे आपल्या हातात नाही ते' एवढाच असतो. त्या ठिकाणी निसर्ग म्हटलं काय, नशीब म्हटलं काय, प्राक्तन म्हटलं काय किंवा योग म्हटलं काय, एकच.

पुढचा घोटाळा असा की, जे लोक नशीब आणि प्रयत्न याबद्दल असा

स्पष्ट विचार करू शकत नाहीत, स्वतःच्या जिद्द, मेहनत, प्रयत्न याबद्दल ज्यांचा विश्वास कमी पडतो ते नशीब जाणून घेण्यासाठी आणि ते बदलण्यासाठी प्रयत्न करतात. त्यातला विवाहाच्या संबंधातला एक मोठा विषय म्हणजे पत्रिका. मानसशास्त्र पुरेसं प्रगत झालेलं नव्हतं तेव्हा पत्रिकेशिवाय (कुंडली, हस्तसामुद्रिक, प्रश्नज्योतिष इ.) लोकांना काही आधार नव्हता. पुढे तीच रूढी बनली.

त्या रूढीच्या घट्ट विणलेल्या जाळीपलीकडे पाहणाऱ्याला पत्रिका प्रकरणातला फोलपणा दिसू शकतो. विशेषतः भारतात तर जवळजवळ सगळे विवाह पत्रिका बघून होत असताना असमाधानी वैवाहिक आयुष्याचं एवढं भयानक प्रमाण दुसरं काय सांगतं? अनेक वेळा अभ्यास मंडळात असा प्रश्न विचारला जातो की, कुंडली, पत्रिका हे शास्त्र नीट शिकल्याशिवाय त्यावर विश्वास नाही असं कसं म्हणता येईल? त्याचं उत्तर असंच आहे. पत्रिका बघण्यामागची मूळ कल्पना स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास न ठेवता परावलंबित्व पत्करण्याची असल्यामुळे त्या वाटेला आम्ही जात नाही.

ज्योतिष आणि पत्रिका

ज्योतिष-पत्रिका- याबद्दल सत्यशोधकाची भूमिका काय असते ते सांगतो. आपल्या कळत्या वयापासून पत्रिका, भविष्य या विषयाची तोंडओळख होते. लहानपणापासूनच शुभ-अशुभाच्या अनेक संकल्पना आपण ऐकतो आणि पाळतो. उदाहरणार्थ, मांजर आडवं जाणं, शनिवारी नखं न कापणं, सोमवारी केस न धुणं, न कापणं, अमावस्येला नवीन खरेदी न करणं, घुबडाचं ओरडणं. पाल चुकचुकणं अशुभ मानतात. त्याची चिकित्सा न करता आपण अशा सगळ्या गोष्टी पाळतो.

पुढच्या टप्प्यात लग्न हा शब्द उच्चारताच त्याच्या अनुषंगानी पुढचा शब्द पत्रिका हा असतो. या सगळ्या विषयाची गुंतागुंत आपल्या डोक्यात सतत चालू असते. त्याला कारण म्हणजे आपल्या आयुष्यातली अनिश्चितता. तसंच संकटं, आपत्ती यांची भीती. या सगळ्यांमुळे माणूस कळत नकळत पत्रिका, भविष्य याकडे ओढला जातो. तसंच प्रत्येकाला आपल्या भविष्याविषयी कुतूहल, जिज्ञासा असते. या सगळ्या विषयाकडे बघण्याचा आपला एक नवा दृष्टिकोन तयार व्हावा असा जीवनसाथचा प्रयत्न आहे.

ज्योतिषाची व्याख्या नेमकं काय म्हणते बघूया. जन्मवेळेची ग्रहस्थिती

आणि नंतर वेळोवेळी आकाशात निर्माण होणारी ग्रहस्थिती यांचे संयुक्त परिणाम माणसाच्या जीवनावर होतात हे मान्य करून त्याचा अभ्यास करणारं शास्त्र म्हणजे फलज्योतिष. ज्योति याचा अर्थ आकाशामधले दीप्तीमान गोल. म्हणजेच ग्रह-तारे. त्यामुळेच पूर्वी खगोलशास्त्र या अर्थाने ज्योतिष या शब्दाचा वापर केला जायचा. कालांतरानी ज्योतिषशास्त्राला खगोलशास्त्र हे नाव मिळालं त्यामुळे आता ज्योतिष हे नाव फलज्योतिष या अर्थानी वापरलं जातं आणि तरी सत्यशोधक मार्गानी एक शंका समोर येतेच. मधल्या काळात अनेक ग्रहांचे शोध लागले. त्यांचा नाही का परिणाम होणार? शिवाय अवकाश अनंत असल्यामुळे आपल्या सूर्यमालेपलीकडेही ग्रह आहेत त्यांचं काय?

पंचांग हे काय प्रकरण आहे ते थोडं बघूया. काळ हा अनादी अनंत आहे. या काळाविषयी माणसाला पूर्वीपासूनच उत्सुकता वाटायची. या काळाची गणना करण्यासाठी प्रत्येक परंपरेनी स्वतःच्या पद्धती निर्माण केल्या. भारतामधे कालगणना करण्यासाठी पंचांगाची निर्मिती झाली. तिथी, वार, नक्षत्र, योग व करण या कालगणना करणाऱ्या पाच अंगांची रोजची माहिती ज्यात असते त्याला पंचांग म्हणतात. थोडक्यात ते एक प्रकारचं कॅलेंडरच असतं.

भविष्य सांगण्याचे एकूण प्रकार असे असतात.

1) पत्रिका,
2) फलज्योतिष,
3) हस्तरेषा - (हात बघून भविष्य सांगणं) प्रत्यक्षात माझा हस्तसामुद्रिक किंवा हस्तरेषा भविष्यावर विश्वास नाही, पण तरुणांच्यात मुलीचा किंवा मुलाचा हात हातात घेण्याची संधी म्हणूनच याकडे बघितलं जातं. मी स्वतः सुद्धा त्यातलाच एक होतो.
4) टॅरोट-कार्ड म्हणजे ठराविक चित्रं असलेल्या पत्त्यांवरून भविष्य सांगणं. माझ्या दृष्टिकोनातून करमणुकीखेरीज त्याला काही अर्थ नसतो. रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवरच्या वजनाच्या कार्डामागे भविष्य लिहिलेलं असतं तेही करमणुकीपुरतंच असतं.
5) पोपटानी कार्ड काढणं – हा तर केवळ कष्टकरी वर्गाकडून पैसे काढण्याचा एक छोटा धंदा आहे. दुसरं काही नाही.
6) न्यूमरॉलॉजी म्हणजेच संख्याशास्त्र – जन्मतारखेच्या संख्येनुसार भविष्य

सांगणं किंवा नावातल्या अक्षरांच्या संख्येनुसार भविष्य सांगणं.

माझ्या अनुभवातले थोडे प्रसंग सांगतो. माझा विश्वास नसूनही मी कोणाबरोबर तरी एकदा हौस म्हणून भविष्य सांगणाऱ्याकडे गेलो होतो. त्यांनी मी विचारलं त्या एक-दोन प्रश्नांची उत्तरं काहीतरी आकडेमोड करून सांगितली. मी लांब कुठेतरी जाणार सांगितलं, ते बरोबर निघालं. 3 आकडा माझ्यासाठी शुभ सांगितला. प्रत्यक्षात आम्ही 3 लोकांनी जी भागीदारी केली त्यात खूप घोळ झाले. थोडक्यात या शास्त्रात काही तथ्य आहे की काय अशी शंका येण्याइतपत काही प्रसंग घडले, हेही खरं. पण योगायोग समजून मी त्या संभ्रमातून बाहेर आलो. पुन्हा त्या प्रकारचे प्रसंगच घडले नाहीत. जे घडले ते विश्वास न ठेवण्याजोगेच घडले. माझा माझ्यापुरता निर्णय पक्का झाला.

7) याशिवाय प्रश्नज्योतिष हाही प्रकार आहे. त्यात प्रश्न विचारण्याच्या वेळेवर उत्तर अवलंबून असतं. चेहरा बघून ज्योतिष सांगणारेही आहेत.
8) याच प्रकारचं आणखी एक प्रकरण म्हणजे वास्तुशास्त्र आणि फेंगशुई. अमुक दिशेला दार, तमुक दिशेला पाणी किंवा अग्नी, कोपरा पाडा, भिंत वाढवा वगैरे गोष्टींनी वास्तुशास्त्राची प्रॅक्टिस करणारे बांधकाम क्षेत्रामधे धुमाकूळ घालतात. ज्यांचा विश्वास आहे ते त्या वाटेनी जातात. विश्वास नाही ते लोक पुण्याच्या लक्ष्मी रोडचं उदाहरण घेतात. लक्ष्मी रोडवर दक्षिणेला ज्यांचा दरवाजा आहे अशी शेकडो दुकानं गेली अनेक वर्षं जोरात चालू आहेत. नवीन इमारतीत फ्लॅट घेताना प्रत्येक मजल्यावर कुठचातरी फ्लॅट दक्षिण दरवाजाचा येतोच. त्यांचं काहीही वाईट होत नाही.

पुन्हा मागे वळून जरा पत्रिकेचा पुन्हा एका विशिष्ट अंगानी विचार करू. पत्रिका ही फक्त लग्नासाठीच नाही तर आयुष्यातल्या अनेक महत्त्वाच्या घटनांसाठी काही लोक वापरतात– शिक्षण, नोकरी, परदेशगमन, आजारपण, घर, स्थावर मालमत्तेचीही पत्रिका बघितली जाते. असे जे भविष्य बघायचे प्रकार आहेत त्यातला सगळ्यात जास्त आढळणारा प्रकार म्हणजे लग्नासाठी पत्रिका. त्यातली मुख्य गोष्ट म्हणजे जन्मवेळ. त्याची व्याख्याच पक्की नाही, ही अडचण सत्यशोधकाच्या नजरेतून बघताना मुख्यतः जाणवते. जेव्हा गर्भ राहतो ती जन्मवेळ नेमकी ठरवणंच अशक्य आहे. मूल आईच्या पोटातून बाहेर येतं

त्यालाही जास्त वेळ लागू शकतो. मग जन्मवेळ ठरवणार कशी? हॉस्पिटलमधे नर्स लिहील ती जन्मवेळ. दुसरं काय?

लग्न ठरवताना पहिली पायरी ही पत्रिका जुळवण्याचीच असते. याचं प्रमुख कारण विवाह या गोष्टीला सामोरं जात असताना वाटणारी असुरक्षितता किंवा भीती. कितीही ओळखीची व्यक्ती असली तरी लग्नानंतर ते नातं चांगलाच आकार घेईल ना, याची चिंता प्रत्येकाला असते. याला मानसिक आधार म्हणजे पत्रिका जुळणं म्हणजेच गुणमेलन यातून मिळतो.

गुणमेलनाविषयी थोडी माहिती सांगतो. 8 भिन्न प्रकारचे गुण माणसात असतात, असं मानलेलं आहे. प्रत्येक प्रकारातल्या विविध संख्यांची बेरीज 36 होते, त्यांपैकी कमीतकमी 18 गुण जमले, तर पत्रिका जुळली, असं समजलं जातं. मुळात मानसशास्त्राचा जन्म आणि विकास गेल्या 60-70 वर्षांतला आहे. आता मानसशास्त्राच्या चाचणीनी स्वभावाचा प्रकार, येऊ शकणारे प्रश्न, त्यावर करण्याचे उपाय सगळ्या सोयी आहेत. त्यापूर्वी शोधलेल्या ज्योतिष, पत्रिका याला खरं तर शास्त्र मानण्याचीही गरज नाही. डॉ. जयंत नारळीकरांनी अगदी स्पष्ट म्हटलं आहे की, हे शास्त्रच नाही.

पत्रिका पाहताना अनेक कारणांमुळे पत्रिका जुळली नाही, असं सांगून स्थळ नाकारलं जातं. मंगळ, एकनाड, षडाष्टक, सगोत्र, नक्षत्रदोष याही गोष्टींचा विचार ज्योतिषी करतात. मंगळ प्रकरण खूप प्रसिद्ध आहे. त्याविषयी थोडी माहिती देतो. पत्रिकेत 1, 4, 7, 8, 12 यांपैकी कुठल्याही स्थानात मंगळ असला, तर तो मंगळदोष मानला जातो. त्यातही कडक मंगळ, सौम्य मंगळ असे भेद केले आहेत. 'मंगळदोष' हे नकाराचं बरेचदा मुख्य कारण ठरतं. यामागचं वास्तव असं आहे की, मंगळाचा उल्लेखच मुळात सतराव्या शतकानंतर आला आहे. त्याला प्राचीन ज्योतिषशास्त्राचा आधार नाही. त्यामुळे त्यावर किती अवलंबून राहायचं, त्यानी खरंच किती फरक पडतो, हा वादाचाच मुद्दा ठरू शकतो.

एकनाड म्हणजे काय ते सांगतो. अंत्य, आद्य, मध्य या तीन नाड्या असतात. एकनाड असली तर संतती होत नाही, अशी समजूत असल्यानी एकनाड हेही नकाराचं एक कारण ठरतं. प्रत्यक्षात याला वैज्ञानिक आधार नाही. कोणताही संख्याशास्त्रीय अभ्यास हे सिद्ध करू शकलेला नाही. त्याऐवजी शारीरिक वैद्यकीय तपासणी लग्नापूर्वीच करणं ही बदलत्या काळाची महत्त्वाची गरज ठरेल.

काही लोक मुलाच्या किंवा मुलीच्या पत्रिकेतल्या गुणांच्या जोरावर लग्न जुळवण्याचा प्रयत्न करतात. पत्रिकेत राजयोग आहे, परदेशगमन, कारखानदार, उद्योजक बनण्याचा योग असं सांगून समोरच्या स्थळाला जाळ्यात पकडण्याचा प्रयत्न करतात. अशा जाळ्यात सापडणारे लोक असतातच की!

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी 300 घटस्फोटित जोडप्यांच्या कुंडल्या संगणकाच्या मदतीनी तपासल्या होत्या. या अभ्यासात एखादं समाइक सूत्र, नियमाचं सातत्य किंवा एक मूलतः आधार देईल असं कोणतंही तत्त्व आढळलं नाही. ज्या एका ज्योतिषाच्या मदतीनी हा अभ्यास झाला त्यालाही ते मान्य करावं लागलं. याचा अर्थ पत्रिका जुळली म्हणजे लग्न टिकतंच किंवा जुळली नाही म्हणून मोडतंच, असा कोणताही नियम ज्योतिषशास्त्रानी सिद्ध केलेला नाही. त्यामुळेच, याचा आधार पूर्णतः मानून विवाहाचा निर्णय किती मर्यादेपर्यंत अवलंबून ठेवायचा, हा विचार प्रत्येकानी करणं अत्यंत महत्त्वाचं आणि गरजेचं आहे.

भविष्यकथनाचा पुढचा भाग येतो, तो म्हणजे येणाऱ्या संकटांचं निवारण करण्यासाठी सांगितलेले तोडगे. याचे असंख्य प्रकार आहेत. उदा. तुमच्या राशीसाठीचे ग्रहाचे खडे, वास्तुशास्त्रानुसार वास्तूत केलेले बदल, ग्रहशांती, नारायण नागबळी, सोळा सोमवार, गुरुचरित्रवाचन, हनुमान चालीसा वाचन, निरनिराळे उपवास अशा अनेक गोष्टी चालतात.

लोक जास्त पुण्य मिळावं म्हणून पूर्ण लंघन करतात. काही जण पाणी पण पीत नाहीत. त्याला निर्जळी उपास म्हणतात. पाणी पोटात जाऊ द्यायचं नाही, पण कंठशोष पडू नये म्हणून पाण्यानी नुसती चूळ भरतात.

त्याशिवाय मंगळागौरी, शिवामूठ, वाण, हळदीकुंकवं चालतातच. सत्यनारायण करण्यासाठी तर काही घडायला पाहिजे असं नसतंच. 'खूप दिवसांत लोकांना बोलावलं नव्हतं, म्हणून म्हटलं सत्यनारायण करूया.' असं मी अनेक लोकांना बोलताना ऐकलंय्. मी अशा निमंत्रणाला स्पष्ट नकार देतो, शोभा कधीकधी जाते, कधी जात नाही. तो माझ्या आणि शोभाच्या प्रवासातला 'स्टेशनाचा' फरक आहे.

धार्मिक उपास या कल्पनेबद्दल मला वाटतं, आयुर्वेदातली लंघन, फलाहार ही कल्पना धर्मानी उचलली आणि पुढे त्याची वाट लावली. इंग्लंडमधे आणि अमेरिकेत असे प्रसंग यायचे की, मी नि शोभा उपास करत नाही आहोत आणि

आमचे दुसरे कोणीतरी मराठी मित्र-मैत्रीण 'आज आमचा उपवास आहे', सांगून अमुक पदार्थ खातायत् नि तमुक नाही म्हणतायत्. कुतुहलामुळे पाश्चात्त्य मित्र उपास म्हणजे काय विचारायचे. उपवासाला चालणाऱ्या आणि न चालणाऱ्या खाद्यपदार्थांची कारणमीमांसा करण्याचा प्रसंग यायचा. तिथे मात्र सपशेल फजिती व्हायची कारण महाशिवरात्रीचा उपवास असला तरी त्याचं तर्कशास्त्र शिवाला देखील सांगता येणार नाही.

भविष्यात घडणाऱ्या वाईट गोष्टी टाळण्यासाठी ग्रहांचे खडे हा तर एक महत्त्वाचा उपाय मानला जातो. ग्रहांच्या खड्यांना रत्न असं नाव दिलं आहे. जर तुमच्या पत्रिकेत एखादा ग्रह बलहीन असेल, तर त्याचं रत्न वापरून त्याचं बल वाढवणं हा त्यामागचा हेतू असतो. त्या खड्यात त्या ग्रहापासून येणाऱ्या प्रकाशलहरी, उर्जालहरी अडवून धरल्या जातात अशी समजूत आहे. प्रत्यक्षात कोणत्याही वस्तूमधे अशी ऊर्जा, किरणं साठवून ठेवणं अशक्य असतं, असं विज्ञानानी अगणित वेळेला सिद्ध केलं आहे.

पृष्ठभाग केवळ किरण परावर्तित करू शकतात. जर रत्नं ऊर्जा साठवू शकत नसतील, तर ग्रह मावळल्यावर त्यांचा काय उपयोग? त्याचबरोबर राहू, केतू हे काल्पनिक बिंदू आहेत. मग त्यांच्यापासून कोणत्या प्रकारची ऊर्जा येणार आहे? त्याचबरोबर निर्जीव ग्रहांचा कोप सजीव माणसावर का आणि कसा होईल? त्यांची शांती तरी का करावी? यावरून आपण एकच निष्कर्ष काढू शकतो की, याचा सर्वांत जास्त फायदा रत्नं विकणाऱ्यालाच आहे. आपल्याला तो फायदा मिळायची शक्यता सर्वांत कमी आहे.

जे लोक याचा धंदा करतात त्यांचं मात्र कौतुक आहे. ज्या गोष्टीत कणभरदेखील तथ्य नाही ती गोष्ट दुसऱ्याला भरपूर पैशाला विकायची म्हणजे विक्रीकौशल्याची कमाल आहे. खडे, धागे, ताईत, माळा, अंगठ्या, कडी. आणि हे घालण्यासाठी कुठचाही अवयव वर्ज्य नसतो. विलायती लोकांच्यात मात्र माझ्या माहितीप्रमाणे गळ्यात माळा आणि बोटात अंगठी हे दोनच प्रकार लोकप्रिय आहेत. ती अंगठी विशिष्ट बोटातच असली तर त्याचा विशिष्ट अर्थ होतो. एवढी अतार्किक गोष्ट सोडली तर बाकी कशात त्यांच्या भावना गुंतलेल्या नसतात.

भारताच्या इतर भागांतलं मला एवढं माहिती नाही, पण महाराष्ट्रात दारू सुटण्यासाठी गळ्यात माळ घालून भरपूर पुरुष वापरताना दिसतात. आणखी एक अजब प्रकार म्हणजे रुद्राक्ष. रुद्राक्षाच्या माळा, बांगड्या, कंबरपट्टे असे अनेक

विनोदी प्रकार बऱ्याच प्रकारात आढळतात. त्यात नेमकी काय जादू आहे असं सांगतात कोणास ठाऊक, पण एकूण सगळं 'कल्याण' होतं ना!

कितीही अचूक भविष्य सांगणारा प्रसिद्ध ज्योतिषी असला, तरीही तो स्वतःच्या अंदाजाची, भविष्यकथनाची संपूर्ण हमी घेत नाही. ते एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून घ्या, असंच सांगितलं जातं. मानवी आयुष्यात अस्थिरता आहे, प्रत्येकाला सुखाची गरज वाटते. त्यातून ज्योतिष-भविष्य या मार्गांचा आधार घेतला जातो. एखाद्याच्या आयुष्यात सतत अपयश येतं, त्यानी खच्चीकरण होतं, तेव्हाही या गोष्टींचा आधार घेतला जातो. पण कोणत्याच गोष्टीचं 100% उत्तर, संपूर्ण सुरक्षितता ज्योतिषशास्त्र देऊ शकत नाही.

'लगे रहो मुन्नाभाई' सिनेमात बटुकभाई नावाच्या ज्योतिष्याच्या डोक्याला पिस्तुल लावल्यावर 'अब अगले दो मिनिटों मे आपके साथ क्या होनेवाला है?' असा प्रश्न विचारल्यावर तो भीतीनी बेशुद्ध पडतो, हा प्रसंग इतका अर्थपूर्ण असूनही समाजावर त्याचा काही परिणाम होताना दिसत नाही, ही खरी गमतीची गोष्ट आहे. कुठच्यातरी ज्योतिष्यानी मुलाच्या बारशाच्या वेळेला अक्षर सांगणं हा पण खूप विनोदी प्रकार बऱ्याच ठिकाणी चालतो. हे अक्षर सांगणारे गुरुजी, महाराज हे ही गोष्ट कुंडलीच्या आधारानी सांगतात. सांगणाऱ्यांची आणि ऐकणाऱ्यांची खरोखर कमाल वाटते.

एका प्रसिद्ध ज्योतिष्याची गोष्ट सांगतात, ती खूप रंजक नि अर्थपूर्ण आहे. भारतात मुलगा होणं या कल्पनेचं महत्त्व मी सांगायला नको. गर्भ राहिला की मुलगा का मुलगी त्याची उत्सुकता, त्यावर अवलंबून असलेले निर्णय असं असायचं. अजूनही बऱ्याच प्रमाणात असतं. हे ज्योतिषी प्रसिद्ध असल्यामुळे खूप लोक त्यांच्याकडे जायचे. ते आलेल्या सगळ्यांना खाजगीत भेटायचे. पत्रिका बघून बरीच आकडेमोड करून, बरीच रक्कम घेऊन मुलगा होईल असं सांगायचे. खूष होऊन लोक परत जायचे. 'लॉ ऑफ प्रॉबेबिलिटीझ' प्रमाणे निम्म्या लोकांना खरोखर मुलगा व्हायचा. ते काही त्यांच्याकडे पुन्हा तक्रार घेऊन जाण्याचा प्रश्नच नव्हता. इतरांना त्यांच्या सिद्धीबद्दल सांगत हिंडायचे. ज्यांना मुलगी व्हायची ते त्यांना जाब विचारायला, पुढच्या वेळी मुलगा होण्यासाठी काय करायला हवं हे विचारायला जायचे. हे ज्योतिषी त्यांना पूर्वीची भेटीची तारीख विचारून स्वतःकडची चोपडीतली नोंद काढायचे. त्यात त्यांनी भेटणाऱ्याचं नाव– मुलगी होईल असं भविष्य सांगितलं त्याची नोंद, सगळं दाखवायचे.

तुमची गैरसमजूत झाली असेल किंवा तुम्ही चुकीचं ऐकलं असेल म्हणायचे. जोडपं बिचारं परत जायचं. वहीत मुलगी अशी नोंद नि तोंडी मुलगा सांगणं या युक्तीनी त्यांनी अमाप कीर्ती आणि पैसा मिळवला कारण आपली अडाणी भारतीय जनता उल्लू बनायला उत्सुक होती.

माझ्या आईवडलांचं लग्न झालं त्याची नव्वद वर्षांपूर्वीची एक गंमत सांगतो. माझ्या मोठ्या मामाचे माझे वडील मित्र होते. मामानी त्या दोघांची ओळख करून दिली आणि ते एकमेकांना आवडले. पत्रिका मात्र जुळत नव्हत्या. मामाच्या मदतीनी खोटी जुळणारी पत्रिका बनवून घेऊन त्यांचं लग्न झालं आणि ते 65 वर्षं आनंदानी समाधानात टिकलं.

ज्योतिषशास्त्र, पत्रिका प्रकरण खरं किंवा खोटं हे कधीही कोणीही सिद्ध करू शकणार नाही. त्यामुळे जीवनसाथमधल्या संभ्रमात असलेल्या मित्रांना एकच प्रेमाचा सल्ला मी देऊ शकीन. कुठच्याही ज्योतिष्याकडे पैसे देऊन जायचं नाही. जमत असेल, वेळ, इच्छा असेल तर ज्योतिषशास्त्र या विषयाचा अभ्यास जरूर करायचा. आपापला निष्कर्ष आपणच काढायचा असतो. जो निष्कर्ष काढू तो मात्र आग्रहानी पाळायचा. पत्रिका बघायची ठरली तर बघायचीच आणि दाखवायचीच. 'जुजबी' पत्रिका बघायची हे चूक वाटतं. बघायची नसेल तर दाखवायला आणि बघायलाही नकार द्यायचा. आधी आईवडलांनी प्रथेप्रमाणे बनवली असेल तर फाडून फेकून द्यायची.

शुभ, अशुभ, शुभमुहूर्त या सगळ्या कल्पनांच्या पाठीमागे मुख्य विचार असा असतो. नशिबानी आपण एका ठिकाणी विशिष्ट आईवडलांच्या पोटी विशिष्ट वेळी जन्मलो. त्यात काहीही बदल करणं आपल्या हातात नाही. काय हातात आहे हा शोध घेताना कळतं की खरं म्हणजे काहीच हातात नाही. परंपरेनी मात्र अमुक करावं, विशिष्ट वेळी म्हणजे शुभमुहुर्तावर करावं, असं शिकवून ठेवलं आहे. जे हातात नाही ते बदलण्याचा प्रयत्न करणं हा त्यामागचा हेतू असतो. नेमकं काय साध्य होणार ते कोणालाच माहीत नसतं. पुनर्जन्म ह्या कल्पनेनी तर धुमाकूळ घालून ठेवला. 'तुमचं सगळं छान होईल पण ते पुढच्या जन्मी.' म्हणजे आत्ता बोलणंच खुंटलं. खरं म्हणजे तत्त्वज्ञानानी अगदी स्पष्ट ठासून सांगितलंय् 'ज्या गोष्टीत काही बदल करणं शक्य नसेल त्याचा पूर्णपणे विचार सोडून द्यावा आणि करण्याजोग्या गोष्टींवर सगळं चित्त एकाग्र करावं.' आणि तरी जगभरचे कोट्यवधी लोक नशीब बदलण्यासाठी धडपड करतायत्.

भारतात तर अशा लोकांचाच भरणा आहे. विवेकवादी विचारसरणीला यांपैकी काहीच पटत नाही. नशीब बदलण्यावर एक मिनिटही वाया घालवू नये असं विवेकनिष्ठ विचारसरणी आग्रहानी सांगते.

एक प्रसिद्ध वाक्य मला फार अर्थपूर्ण वाटतं. 'आकाशातल्या ग्रहांपेक्षा पृथ्वीवरच्या ग्रहांचा चांगला किंवा वाईट परिणाम खूप जास्त होतो. आग्रह, निग्रह, अनुग्रह यांचे चांगले परिणाम आणि विग्रह, दुराग्रह यांचे वाईट परिणाम होतात.'

अगदी शेवटी नेहमीचाच प्रश्न, 'तुम्ही कायम सगळ्यांशी चांगलं वागता का?'

●●●

आपण शरीरानी, बुद्धीनी 'नॉर्मल' आहोत ही मुळात केवढी मोठी नशिबानी मिळालेली गोष्ट आपल्याकडे आहे. बाकीच्या गोष्टी अगदीच गौण आहेत. या एका गोष्टीमुळे आपलं नशीबच करंटं असं म्हणण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही.

7

शपथ, शुभ-अशुभ याबद्दल समतोल विचार

माझं असं पक्कं मत बनलेलं आहे की, 'ईश्वर, धर्म, जात, पुनर्जन्म, ज्योतिष, पत्रिका, शुभाशुभ, रीतिरिवाज, कर्मकांड आणि रूढी परंपरा' या मोठ्या विचारांच्या गाठोड्याचा विवाह-अभ्यासात समावेश असायलाच हवा. याचा आणि विवाहाचा काही संबंध नाही असं म्हणणारांचा एक मोठा गट आहे. अशा गटाच्या एक बाई आमच्याकडे विवाह अभ्यासाची मोठी आठवड्याची कार्यशाळा ठरवायला आल्या होत्या. त्यांचं म्हणणं होतं की हा विषय वैयक्तिक श्रद्धेचा आहे. त्यामुळे तो अजिबात घ्यायचा नाही. माझं म्हणणं हा विषय घराघरातल्या वैचारिक अत्याचाराचा आहे. त्यामुळे त्यातून स्त्री-पुरुष सगळ्यांनी मुक्ती मिळवल्याशिवाय आयुष्यालाच अर्थ उरत नाही. त्यामुळे हा विषय थेट तपशिलात हवाच. आमचं शेवटपर्यंत यावर एकमत न झाल्यामुळे ती कार्यशाळा घ्यायला मी नकार दिला.

दुसऱ्या एका ठिकाणी कार्यशाळेबद्दलचे सगळे अटी-बारकावे जुळत होते, पण ज्या दिवशी कार्यशाळा चालू करणं आम्हाला जमत होतं तो दिवस म्हणे चांगला नव्हता. त्यानंतर आम्ही काही महिने इंग्लंडला मुलाकडे जायचो होतो. त्याच्या पुढच्या वर्षी त्यांचा कसलातरी वार्षिक उत्सव असतो. त्याला जोडून कार्यक्रम ठरवण्याची त्यांची कल्पना होती. पण ते आम्हाला जमत नव्हतं. मला तर हा सगळा घोळ 'शुभ-अशुभ'चाच दिसत होता.

आता शुभ-अशुभ प्रकरणाबद्दल जरा सविस्तर बोलू. टप्प्याटप्प्यानी मुद्देसूद बोलू. आम्हा सत्यशोधकांची याबाबतच्या विचाराची पद्धत प्रथमच सांगतो. आमच्यात 'सकाळी सकाळी हा विषय काढू नको' असं नसतं. 'नाट लावला' नसतं नि 'आज चांगला दिवस आहे' नसतं, मुहूर्त नसतो, वाढदिवस

नसतो, मंगल किंवा अमंगल नसतं, उद्‌घाटन नसतं, पंच्याहत्तरी नसते, खरंतर समारंभ नावाचा देखावा नसतो. भूमिपूजन नसतं, वास्तुशांत नसते. अमुक माणसाच्या हातांनी पहिली कुदळ मारताना त्याचे फोटो नसतात.

आपण मुद्दामहून काही हजार वर्ष मागे जाऊन या सगळ्याकडे बघूया. एकदा कल्पना निघाली की त्यात बदल करण्याचीही कल्पना येणारच. त्यातून वास्तूपुरुष या गोष्टीला सुरुवात झाली. शुभ आणि अशुभ अशा कल्पना निघाल्या आणि त्याच्यातून मुहूर्त नावाची संकल्पना निघाली.

वास्तुशास्त्राबद्दल माझं मत मी तुम्हाला सांगतो. 'दक्षिणेकडे घराचा दरवाजा असू नये' असं वास्तुशास्त्रात भारताच्या कुठच्यातरी ठिकाणी तिथल्या विशिष्ट हवामानामुळे कुणीतरी ज्ञानी माणूस म्हणाला. भारताच्या थेट दक्षिणेला म्हणजे कन्याकुमारीच्या आसपास कुठेतरी ही कल्पना निघाली. कारण तिथे जोराचा वारा, पाऊस आणि समुद्राच्या लाटा दक्षिण दिशेकडून येतात. पुढे असं झालं की वास्तुशास्त्राच्या नियमामधेच दक्षिण दिशा कायमची वर्ज्य झाली.

उत्तर भारतामधे हाच नियम कुणी लागू करायला लागलं तर तत्त्वज्ञान त्याला निरर्थकच म्हणणार. बहुतेकांना माहिती असतं की महाराष्ट्राच्या पश्चिम भागामधे पश्चिमेकडून वारा, पाऊस आणि कडक ऊन हे तीनही येतं. भारताच्या पूर्व किनाऱ्याची हीच गोष्ट तपासली तर पूर्वेकडून वारा, पाऊस आणि कडक ऊन येतं. पण वास्तुशास्त्राचा व्यवसाय करणाऱ्यांनी दक्षिणेला काही विशिष्ट गुण चिकटवून टाकले आहेत. आग्नेयेला काही विशिष्ट गुण कायमचे चिकटवले आहेत आणि त्याचं व्यवसायात रूपांतर करायचं असल्यामुळे प्रत्येक गोष्टीला उपाय सुचविण्याची युक्ती त्यांनी चालू केली आहे. उपाय सांगितला नाही तर कशाचे पैसे मागायचे?

विवेकनिष्ठ विचारांना हे काहीच मान्य नाही. दक्षिणेकडे पाय करून झोपल्यानी आम्हाला काहीच फरक पडत नाही. काळा रंग अशुभ नसतो. 'लाल'ला काहीही खास अर्थ नसतो. भगव्याला नसतो नि हिरव्याला नसतो. आमच्यात मांजर आडवं गेलं तरी चालतं, तेरा क्रमांक चालतो, नवीन जागा घेतली तरी लाल रंगाचे हात उठवलेले नसतात, काळी बाहुली टांगलेली नसते. लिंबू, मिरची टांगलेली नसते. नवी गाडी घेतली तरी त्याला हार नसतो, घरी कोणी आलं म्हणून कुंकू, नारळ, खण असलं काही नसतं. अमावास्येला पूर्वी कामावर निघत नसतील ते का हे आम्हालाही समजतं, पण आम्हाला अमावास्येमुळे काहीही फरक पडत नाही.

शंभरऐवजी एकशे एक रुपये वाढते म्हणून चांगले हे आम्हाला अशास्त्रीय वाटतं. वास्तुपुरुष, हत्यारांची पूजा या सगळ्या कर्मकांडापासून आम्ही दूर असतो. आम्ही 'आजचा दिवस वाईट आहे' असं वाक्य कधीही उच्चारत नाही. आमच्या प्रकारच्या लोकांच्या घराच्या दारावर गणपतीची टाइल नसते. दाराला लटकवलेलं तोरण नसतं, दारासमोर रांगोळी, स्टिकर, पणत्या असं काही नसतं.

मी आतापर्यंत 'य' अफिडेव्हिटस् केलेली आहेत. दर वेळचं तेच संभाषण करून मला कंटाळा आलेला आहे, पण तरी मी बुद्धीला न पटलेल्या गोष्टीला स्पष्ट नकार देण्याचा आग्रह सोडायला तयार नाही. अफिडेव्हिट करताना ते नोटरी मला शपथ घ्यायला सांगतात, त्याला मी नकार देतो. त्यांचा मतलब फक्त पैशाशी असतो. त्यामुळे नव्याण्णव टक्के वेळा काही प्रश्न येत नाही. एकदा एक नोटरी चिडलाच. म्हणाला, ''देवावर विश्वास नाही याला काय अर्थ आहे? आपल्या जन्मदात्या आईवडलांवर तरी विश्वास आहे का? त्यांची शपथ तरी घ्याल ना?'' मी म्हणालो, ''पण माझा शपथ घेण्यावरच विश्वास नाही ना!'' त्याचा राग आणखी वाढला. तेवढ्यात कोणीतरी घाईचा निरोप घेऊन आला म्हणून माझी सुटका झाली. नाहीतर तिथे कार्यशाळाच घ्यावी लागली असती.

आमच्या दृष्टीनी कुठल्याही कामाचा मुहूर्त नसतो. पण ठरलेल्या वेळेला चांगल्या दर्जाचं काम पुरं करण्याचं महत्त्व आम्हाला पटतं. बाहेरगावी जाताना उजव्या हातावर दही वगैरे आम्हाला मान्य नाही. आम्ही शपथ घेत नाही, देतही नाही, पण इतरांपेक्षा जास्त खरं बोलतो आणि वागतो.

कोर्टात मला एक्स्पर्ट ओपिनियन द्यायला अनेकदा जावं लागलेलं आहे. मी कोर्टातल्या शपथेला स्पष्ट नकार देतो. ॲफिडेव्हिट करताना नकार देतो. कधीकधी कारण विचारतात. 'मी कायम खरं बोलतो. त्यामुळे इथंही खरं बोलीन.' असं उत्तर दिलेलं बहुतेक न्यायाधीशांना मान्य होत नाही. शेवटी 'सद्‌सद्‌विवेकबुद्धीला स्मरून खरं बोलतो' या वाक्यावर मांडवली होते. आपल्या सरकारचं, जनतेचं सत्यशोधनाच्या वाटेतलं स्टेशन कुठलं ते स्पष्टपणे समोर येतं.

मुलं जन्मताना डोकं प्रथम बाहेर येतं. क्वचित काही मुलं पायाच्या बाजूनी बाहेर येतात. त्यांना पायाळू म्हणतात. अशी समजूत आहे की, अशा पायाळू मुलाला दिव्य दृष्टी असते. असा माणूस आयुष्यभर खास माणूस म्हणून वावरतो.

लाखो लोक मुहूर्त बघून वाहन विकत घेतात, तरी लाखो अपघात होतात. यावरून शुभ मुहूर्त ही कल्पना निरर्थक आहे असं मनात कसं येत नाही? मी

सिनेमाच्या मुहूर्तांच्या वगैरे बातम्या वाचतो. मला खूप आश्चर्य वाटतं. मोठमोठ्या खेळाडूंच्या विशिष्ट आकड्यांच्या आग्रहाच्या बातम्या, कहाण्या टीव्हीवर बघतो. मी थक्क होतो. मी तेवढा मोठा नाही आणि प्रसिद्धही नाही. मला या बाबतीत काय वाटतं याला काहीच महत्त्व नाही. पण अशा कुठल्याही अविवेकी रूढींचा, श्रद्धेचा माझ्यावर अजिबात परिणाम होत नाही.

खेळाडू म्हणून खूप थोर आणि प्रसिद्ध असलेल्या लोकांना विशिष्ट आकडे लिहिलेला 'जर्सी'च लागतो. याचा अर्थ 'लकी नंबर' नावाच्या कल्पनेवर त्यांचा विश्वास असतो. त्यांनी खाजगी आयुष्यात कसं वागावं याबद्दल बोलण्याचा मला अधिकारच नाही. पण लाखो लोकांवर त्यांच्या 'लकी नंबर' मानण्यामुळे चुकीचा संदेश पोचतो त्याचं काय?

इंग्लंडमधे, अमेरिकेतदेखील राज्यकारभाराची सूत्रं हातात घेताना शपथा घेतात. भारतातदेखील सारख्या शपथा घेतात आणि हे सगळे जगभरातले लोक शपथेप्रमाणे कधी वागत नाहीत. मागे मी तुम्हाला सांगितलं की, मी लहानपणी चुकीचं वागायचो, रोज मार खायचो आणि रोज देवासमोर उभं राहून शपथ घ्यायचो. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच सगळं करायचो. तेव्हापासून माझा शपथेवरचा विश्वास कायमचा उडाला. एवढ्या साठ वर्षात त्यानंतर पुन्हा एकही प्रसंग शपथेवर विश्वास ठेवावा असा मला दिसलेला नाही. इतकी स्पष्टपणे निरर्थक शपथेसारखी गोष्ट सगळीकडे का चालू राहिली असावी? डॉक्टर लोकांची शपथ, कोर्टातली शपथ, राजकारणाचं पद स्वीकारतानाची सरकारच्या वतीनी घेतलेली शपथ या कशातच मला अर्थ दिसत नाही.

कधीकधी एकदम शेकडो लोक हात समोर धरून कशाची तरी शपथ घेताहेत असा फोटो असतो. काही शपथा हजारो लोक घेताना दिसतात. माझ्या विवेकवादी बुद्धीला यातली एकही गोष्ट खरी वाटत नाही. त्यातली कुठलीही गोष्ट शपथ घेतल्यामुळे घडेल यावर माझा विश्वास नाही. पण मी पंचावन्न वर्षं अनेक लोकांशी विवेकवादी, सापेक्ष दृष्टिकोनानी सतत वागल्यामुळे नक्की सांगू शकतो की, या शपथ घेणाऱ्या सर्वांपेक्षा शपथेला नकार देणारा मी जास्त खरा वागतो.

नारळ देणं, नारळ फोडणं हे मराठी भाषेत खास अर्थ प्राप्त झालेले शब्द आहेत. एकूणच नारळ या फळाचा दबदबाच आहे. समारंभात आलेल्या पाहुण्याला, वक्त्याला श्रीफळ आणि शाल देण्याचा एकदम कडक संकेत आहे. मला ही गोष्ट निरर्थक वाटते. म्हणून नारळ स्वीकारायला मी स्पष्ट नकार देतो.

भावनेचं प्रतीक म्हणून वस्तूचा वापर हाच मुळात मला मान्य नाही. कृती चालेल, शब्द चालतील, पण वस्तू नको.

नारळाविषयीची गमतीची गोष्ट तुम्ही नक्की ऐकली असेल. नारळ कधी कोणाच्या डोक्यात पडत नाही. माझ्या दृष्टीनी नारळात दैवी शक्ती वगैरे काही नसते. नारळाच्या झाडाचा घेर कमी असतो. त्याची सावली विसाव्यासाठी उपयोगी नसते. त्याच्या खाली त्यामुळे कोणी बसत नाही. त्याखेरीज नारळाचं डेख चिवट असतं. वाऱ्यानी अकस्मात नारळ सहज पडत नाही. मुद्दामहून वर चढून नारळ कोयत्यानी तोडावा लागतो. नारळासारखेच सगळे गुणधर्म पोफळीत असतात. पण त्याला दैवी शक्ती आहे असं का म्हणत नाहीत? कारण पोफळीचं फळ लहान असतं. लांबून ते दिसत नाही. शिवाय ते स्वयंपाकात उपयोगी नाही.

एक त्रासदायक गृहस्थ आहेत. ठरलेल्या कार्यक्रमाचा नारळ फोडायला त्यांना बोलावलं की ते त्रास देत नाहीत असं त्यांच्याबद्दल बोललं जातं. पुढचा त्रास टळणार असेल तर त्यांना फोडू दे नारळ असं लोक ठरवतात.

माझ्या लहानपणी शपथ घेताना आम्ही स्वतःच्या गळ्याला चिमटा घ्यायचो. वचन देताना समोरच्याच्या तळहाताला चिमटा घेतल्यासारखं करायचो. लहानपणी प्रत्येक गोष्ट मनापासून करायची आणि दुसराही तेवढंच मनापासून पूर्ण खरं वचन द्यायचा, आणि ते बंधन मानायचा. मोठेपणी कसली शपथ, कसलं वचन नि कसला शब्द? माझ्या मते नुसतं तोंडी बोललं तरी पुरेसं आहे. मुख्य अडचण बोलल्याप्रमाणे करण्याची आहे आणि तो एवढा मोठा साथीचा रोग आहे की त्यातून भारत हा रोगी बरा होणारच नाही.

माणसानी हजारो लोकांसमोर माइकवर काहीतरी शपथ घेण्यानी त्याच्या स्वतःच्या मनावर होणारा परिणाम मोजला तर तो शून्य असतो. त्या तुलनेत जीवनसाथच्या कार्यशाळेत 15-20 लोकांसमोर 'यापुढे मी अमुक पद्धतीनी वागेन' असं माणसानी स्वतःहून बोललेलं त्याच्या स्वतःच्या मनावर जास्त परिणाम करतं. तो बोलल्याप्रमाणे तसं वागण्याची खूप शक्यता असते. हा सगळा 'सायकोडायनॅमिक्स'चा खेळ आहे. याबद्दल स्वतंत्रपणे लिखाण या पुस्तकाच्या संचात आहेच, पण इथे थोडक्यात सांगतो. एका माणसाशी काहीतरी मनापासून बोलून कबूल करणं, पाच माणसांच्या गटासमोर बोलणं, पंधरा-वीस लोकांसमोर बोलणं, तीस-चाळीस माणसांसमोर बोलणं आणि तीनशे माणसांसमोर बोलणं याचे बोलणाऱ्या माणसावर होणारे परिणाम निरनिराळे असतात.

तीस माणसांपेक्षा जास्त संख्या गेली की 300 काय, 10,000 काय अणि एक लाख काय फरकच पडत नाही. पूर्वी माणसाच्या मनाचा असा नीट अभ्यास झालेला नसल्यामुळे अग्नीवर हात, समोर हात, हातावर चिमटा, गळ्याला चिमटा अशा पद्धतींवर सगळ्यांचा विश्वास होता. या पद्धती कालबाह्य आणि त्यामुळे निरुपयोगी झाल्याचं मानसशास्त्रज्ञांना माहिती आहे. पण सरकारी पदावरून निर्णय घेणाऱ्यांना म्हणजे राजकारण्यांना आणि कायदेपंडितांना माहिती नाही. त्यामुळे अशा शपथा घेतल्याचा उपयोग शून्य होतो.

एक उदाहरण देतो. शरीराला इजा झाली की, औषध घेण्याआधी व्यायामानी स्नायूची दुरुस्ती करणं बरेच वेळा शक्य असतं. अशा व्यायामांमधे कधीकधी वजन उचलायचं असतं. ते वजन डंबेल्स आहेत का गव्हाची पिशवी आहे याला काहीच महत्त्व नसतं. पण मर्म न समजणाऱ्यांना ते डंबेल्स महत्त्वाचे वाटतात. दुसरा व्यायाम पावलांनी वर्तमानपत्राचा तुकडा चुरगळण्याचा असतो. पण वर्तमानपत्राचा तुकडा नसला तरी नुसत्या पावलांनी तो व्यायाम करता येतोच. नासमझ लोकांना मात्र वर्तमानपत्र महत्त्वाचं वाटतं. शपथ प्रकरणाची अशी परिस्थिती झालीय असं मला वाटतं. मुळातली विचाराची बैठक विसरली गेली. शपथ महत्त्वाची झाली.

कुटुंबात लोक चांगलं वागीन अशा शपथा घेतात. शपथांवर माझा विश्वास नाही हे खरंच आहे. पण मनातली माझी खरी इच्छा अशी आहे की हा माझा अंदाज पूर्ण चुकावा आणि माझी सपशेल फजिती व्हावी. त्या माणसानी खरोखर शपथेप्रमाणे वागावं आणि आता जे बोललो त्याबद्दल माझ्यावर माफी मागण्याची पाळी यावी.

संक्रांतीला आम्ही विवेकनिष्ठ लोक तिळगूळ देत नाही, घेत नाही. पण कायम सभ्यपणीच बोलतो. सौजन्य सप्ताह ही कल्पनाच विनोदी आहे. वर्षभर, बारा महिने सगळ्यांशी सौजन्यानीच वागणं आम्ही योग्य मानतो. सप्ताह पाळण्याची जरूरच नसते. आमच्या बोलण्यात साडेसाती नावाचा शब्दप्रयोग नसतो. कारण ही कल्पना चुकीची आहे. आजचा दिवस चांगला आहे असं आम्ही मानत नाही आणि म्हणतही नाही. आम्ही शनिवारी काम सुरू करायला जराही कचरत नाही. साडेतीन मुहूर्त म्हणजे सर्व कामांना चालणारे शुभ मुहूर्त ही कल्पना आम्हाला निरर्थक वाटते.

माझ्याकडे काउन्सेलिंगला येणारे लोक माझ्या दृष्टिकोनातून खूप निरर्थक

गोष्टी करतात, पण मी त्याविषयी बोलणं निघाल्याशिवाय आपणहून काही सांगत नाहीत. पाश्चात्त्य वळणावर गेलेले लोक मधूनमधून 'टचवूड' म्हणतात. काही तर जागेवरून उठून काही अंतरावर ठेवलेल्या लाकडी स्टुलाला शिवून येतात. समस्येच्या खऱ्या उत्तरांच्या शोधाऐवजी अशा निरर्थक गोष्टीत गुंतलेल्या भारतीय जनतेबद्दल मला फार वाईट वाटतं.

मी शुभ-अशुभ अजिबात मानणारा नाही. त्यामुळे मला मागे 'सेकंड हँड' कार घ्यायची होती तेव्हा एजंट लोकांना मी सांगितलं होतं की मला कोणालातरी न लाभलेली कार स्वस्तात हवी. प्रत्यक्षात तशी कार मला कोणी देऊ शकलं नाही याचा अर्थ स्पष्ट आहे.

लोक पितृपंधरवडा चालू असताना खरेदी टाळतात. मला तो काळ खरेदीसाठी फार शुभ वाटतो, कारण दुकानात गर्दी नसते. उत्सवांच्या दिवशी मात्र कुठचंही काम धड होत नाही त्यामुळे तो दिवस मला अशुभ वाटतो.

आम्ही लोक पत्रावर 'श्री' लिहीत नाही. त्यापेक्षा प्रत्येक कागदावर ठरावीक ठिकाणी तारीख लिहिणं, समास सोडणं जास्त महत्त्वाचं आहे असं मानतो.

दसऱ्याच्या दिवशी घराला, वाहनाला झेंडूच्या फुलांच्या माळा लावण्यात आम्हाला काही अर्थ दिसत नाही. त्यापेक्षा वाहनाची स्वच्छता, वेळेवर 'मेकॅनिकल मेन्टेनन्स' आणि वाहन सुरक्षितपणी सर्व नियम पाळून चालवणं आम्हाला जास्त महत्त्वाचं वाटतं. हत्यारांची पूजा आम्हाला निरर्थक वाटते. सर्व हत्यारं रोज कपाटात जागच्या जागी ठेवणं जास्त महत्त्वाचं वाटतं. इतरत्र उल्लेख केलेलं मूलतत्त्व इथे पुन्हा सांगतो. जे करायचं ते 365 दिवस करायचं असतं. विशिष्ट दिवसाला आमच्या दृष्टीनी काही महत्त्व नसतं. थोडक्यात मुहूर्त ही कल्पनाच नसते. मुळात ठरावीक दिवशी ठरल्या वेळेला म्हणजेच शिस्तीनी, वेळ पाहून कामं करावी म्हणून मुहूर्त ही कल्पना निघाली. जो माझ्यासारखा एखादा प्रत्येक गोष्ट शिस्तशीर आणि वेळेवर करतो त्याच्यासाठी मुहूर्त ही निरर्थक कल्पना आहे.

सगळे उद्योजक आणि त्यांच्याकडे काम करणारे कामगार यांच्यात देवधर्म, जात, सण-उत्सव, कर्मकांड या विषयात मोठ्या पंचाईती असतात. मालक असलेल्याकडे अधिकार असतात आणि कामगारांकडे नसतात. पण मूळ वृत्तीत कित्येक वेळा फार फरक नसतो. माझ्यासारख्याला त्यामुळे बरेच प्रश्न पडतात.

स्वतः दत्तजयंती साजरी करणारा घरमालक कामगारांनी धुळवड केल्याबद्दल कसं बोलू शकतो? श्रीमंतांच्या पार्टीत इंपोर्टेड स्कॉच पिऊन पाचकळपणा

करणाऱ्या घरमालकाला किंवा कॉंट्रॅक्टरला कामगारांच्या दारूविषयी बोलण्याचा हक्क कसा पोचतो? स्वतः मैलभर रांगेमधलं श्रीखंड आणून दसरा साजरा करणारा घरमालक किंवा कॉंट्रॅक्टर कामगारांनी गटारी अमावास्या 'साजरी' करण्यासंबंधी तक्रार कशी करू शकतो? कामगारांचे सण निराळे असतात एवढंच. 26 जानेवारी म्हणजे काय हे कित्येक कामगारांना माहितीही नसतं. 15 ऑगस्टचा पत्ता नसतो. पण संक्रांतीची कर महत्त्वाची असते. 'अखेत' (म्हणजे अक्षय्य तृतीया) पाळायची असते. नागपंचमी, बैलपोळा त्यांचं सबंध कुटुंब साजरं करत असतं. गावी असलेलं शेत, बैलांची जोडी ही त्यांची एलायसी पॉलिसी असते. थोडक्यात मालक नोकरांमधे पैशात, शिक्षणात आणि अधिकारात फरक असतो, पण पारंपरिकेत फार फरक नसतो असंच दिसतं. तपशील फक्त निराळे असतात.

आपला समाज विचार आणि भावना यांच्या समतोलाच्या बाबतीत भावनेच्या बाजूला फार कललेला आहे. विचाराच्या बाजूला त्याला खेचण्यासाठी ज्या मुख्य गोष्टींच्या बाबतीत त्याला खेचायला हवं आहे असे सगळे विषय जीवनसाथमधे आहेत. सत्यशोधक म्हणून शोधाच्या या प्रवासाच्या कुठच्या टप्प्यावर कोण असेल काही सांगता येत नाही. पण कुठच्या स्टेशनवर गाडी आहे यामुळे वैवाहिक आयुष्यात प्रचंड फरक पडतो एवढं मी नक्की सांगू शकतो.

जीवनसाथ अभ्यास मंडळामधे या सगळ्या विषयांची एकत्रित चर्चा अनेक वेळेला होते. ग्रुपचं मत प्रत्येकाला कळतं आणि स्वतःचंही त्याविषयीचं मत एकेकजण सांगतात. सुरुवातीला काही लोक गप्प बसतात. मग धिटाईनी बोलायला लागतात. काहींना याविषयी चर्चासुद्धा चुकीची वाटते, कारण याविषयी प्रश्न विचारायचाच नाही, अशी त्यांची श्रद्धा असते. काहींना याबाबतीत स्वतःचं मत काय हे माहितीच नसतं. कारण आतापर्यंत याविषयी विचारच केलेला नसतो. आणखीन एक गट असतो. त्यांचं म्हणणं असतं विवाह आणि हे विषय यांचा काय संबंध? गटचर्चातून जे दोन मुख्य प्रवाह दिसतात त्यापैकी पारंपरिक विचार तुम्हाला माहीत आहेत. निराळ्या विचारांचं संकलन इथे सांगावं असा हेतू आहे.

आमचं याविषयीचं मत एवढ्या वर्षांच्या अभ्यासानी पक्कं बनलेलं आहे ते असं. आदिमानवापासून माणूस प्रगतीचे टप्पे ओलांडत गेला तसे वागणुकीच्या प्रकाराचे साचे बनू लागले. त्या त्या टोळीच्या वागणुकीच्या प्रकाराला विशिष्ट नावं शोधल्याशिवाय त्यांना ओळखणार कसं, यामुळे गटांच्या नावांनी ओळखी तयार झाल्या. सतत बदल होत राहिले. पण त्याचं सूत्र हजारो वर्ष दुनियाभरासाठी

एकच आहे. 'पुढारी' आणि 'अनुयायी' हे दोनच खरे प्रकार. पुढाऱ्यांनी कधी स्वार्थासाठी तर कधी परार्थासाठी पद्धती तयार केल्या, बदलल्या, मोडल्या, नव्या शोधून बनवल्या. अनुयायांनी त्या फार विचार न करता पाळल्या. अनुयायांना पटेल असे विचार मांडणं ज्याला जमेल त्याचे विचार अंमलात येणार असा साधा नियम होता. पुढाऱ्यांचा अहंकार बलस्थानी असल्यामुळे दुसऱ्या पुढाऱ्याला विरोध, त्यासाठी न्याय्य अन्याय्य मार्गांनी वाटेल ते करण्याची तयारी यामुळे या पद्धतींचे विरोध तीव्र बनले.

लग्नविधींबद्दल विचार केला तरी तर्कबुद्धीला न पटणाऱ्या खूप गोष्टी दिसतात. अनेक प्रकारच्या पूजा, त्यांचे विशिष्ट विधी असतात. विवाहविधी ही गोष्ट याच प्रकारची आहे. समानता आणि स्त्रीपुरुषसमानता या तत्त्वांच्या विरुद्ध असेच हे विवाह विधी आहेत. ईश्वर या कल्पनेची निरर्थकता कळली असेल तर पूजा निकालात निघते. शुभअशुभ या कल्पना रद्द झाल्या की भूमिपूजन, वास्तुशांत यांचाही प्रश्न संपतो.

ईश्वर, धर्म, जात, नशीब, पत्रिका, शुभ, अशुभ, मुहूर्त, विधी ह्या मानवी मनाच्या कल्पना म्हणजे विकार आहेत. निसर्गतः मानवाला या विचारांपैकी एकही विकार नसतोच. नंतरच्या वाढीत या विकारांमुळे तो आजारी पडतो.

मागे आपण म्हणालो तसं देव नावाच्या कल्पनेचा ज्योतिष या शास्त्राशी काही संबंध नाही. देवाचा धर्माशी नाही, धर्माचा जातीशी नाही, पण प्रत्यक्षात देव, धर्म, जात, ज्योतिष, शुभ, अशुभ आणि या भोवतालची कर्मकांडं यांचं माझ्या दृष्टीनी एक 'पॅकेज' बनलेलं आहे. देवभक्त पण धर्म न मानणारा माणूस नसतोच. जात, धर्म मानणारा पण नास्तिक माणूस असूच शकत नाही. काही असो. 'या सगळ्या चर्चांचा आणि वैवाहिक आयुष्यातल्या सुखाचा संबंध आहे, हा हे सांगण्याचा मूळ उद्देश आहे. या बाबतीत एकानी दुसऱ्याला आपलं म्हणणं पटवून देण्याचा कधीच प्रयत्न करू नये. अगदी नवरा-बायकोनीसुद्धा! हा व्यक्तिगत प्रश्न समजून कोणीच कोणावर जबरदस्ती करू नये. या विषयांच्यात जेवढी मुक्तता तेवढं सुख असतं.

माझ्या मनात अगदी एकच प्रश्न प्रत्येक विषयाच्या शेवटी असतो. तुम्ही शुभ, अशुभ माना, शपथेवर विश्वास ठेवा किंवा ठेवू नका. तुम्ही 365 दिवस 24 तास सगळ्या लोकांशी सरळपणी, सज्जनपणी वागता का?

●●●

8

रूढी-परंपरा-चालीरीती-व्रतवैकल्यं-कर्मकांडं

1) या लेखामागची मूळ कल्पना

मी स्वतः रूढी, चालीरीती, परंपरा, कर्मकांडं यांचा जाहीर विरोधक आहे. माझ्या मते जवळजवळ सगळ्या रूढी नुसत्या निरर्थकच नाहीत तर अपायकारक आहेत. त्याबद्दल चर्चा करण्यासाठीच आजची कार्यशाळा आहे. तुम्ही काही लोक रूढी पाळत असाल, काही लोक पाळत नसाल. रूढींबद्दलचा निर्णय तुमचा तुम्हीच घ्यायचा आहे. एकच सांगा. तुम्ही सगळ्यांशी कायम चांगले वागता का?

सर्वसाधारण भारतीय माणूस घाबरट आहे. कशाचातरी आधार त्याला सतत हवा असतो. तो शक्यतोवर चारचौघं वागतील तसं वागतो. स्वतंत्र विचार करण्याइतकी त्याची बुद्धी शाबूत आहे, पण कुवत नाहीशी झालीय. परंपरा नावाचं भूत त्याच्या मानगुटीवर बसलेलं आहे. ती परंपरा पाळत आयुष्य रेटायचं आणि अशीच चाल-रीत, रूढी आहे, त्याला मी काय करणार असं म्हणत राहायचं. त्याचं उदात्तीकरण करण्यासाठी 'माणूस समाजाचाच एक भाग आहे,' 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' वगैरे आहेच सगळं, पण 'मनाचे करावे' हे करण्याची हिंमत होत नाही.

प्रत्यक्षात पूर्वीच्या समाजात निरक्षरांचं प्रमाण खूप होतं. गावं शेतीप्रधान होती. घरात कॅलेंडरं नव्हती. त्या काळात निरक्षरांना वर्षात केव्हा काय करायचं हे लक्षात ठेवण्याचा दुसरा काही मार्ग नसल्यामुळे समाजातल्या पुढाऱ्यांनी म्हणजे ब्राह्मणांनी सगळं वार्षिक वेळापत्रक निसर्गाबरोबर बांधलं. त्यापुढच्या टप्प्यात

स्त्रियांना रूढिबंधनात अडकवून टाकलं. सारांश असा की, रूढी-परंपरा निरक्षरांसाठी होत्या आणि आहेत. तुम्हा आम्हा सुशिक्षितांसाठी नाहीत. आपण स्वतः समजून विचार करून वागावं अशी आपल्याकडून अपेक्षा आहे.

हजारो वर्षांच्या सांस्कृतिक प्रवासात निरनिराळ्या चालीरीती लोकांना सुचत गेल्या. आणि लोकांना पटण्यासाठी राजकारणी आणि समाजकारणी लोक असं 'शास्त्रात सांगितलंय' असं त्याचं वर्णन करायला लागले. सर्वसामान्य माणूस 'शास्त्रात जिथे कुठे सांगितलंय ते मला दाखवा' असं तेव्हाही म्हणायचा नाही आणि अजूनही म्हणत नाही.

रूढींविषयी मला आणखी एक असं वाटतं की, 'आपल्याला एवढी रीतिरिवाजांची माहिती आहे' आणि ती आपली हुशारी लोकांना कळण्याची ही संधी सोडायची नाही असं ज्येष्ठांना वाटतं. त्यामुळे रूढी-परंपरा, चाली, रीतिरिवाज पुढे चालू राहतात.

मी माझ्या अभ्यासात रूढी तीन गटात विभागल्या आहेत. 1) अपायकारक रूढी, 2) उपयोगी रूढी, 3) अपाय नाही, उपाय नाही, पण अर्थही उरलेला नाही अशा रूढी. जीवनसाथच्या कार्यशाळेत या तीनही प्रकारांबद्दल मिश्रगट चर्चा मधूनमधून असतात. माझ्यासारख्या ज्ञानमार्गावर चालणाऱ्या माणसाला उपयोगी रूढी फार कमी दिसतात. थोड्या अपायकारक, आणि बऱ्याचशा निरर्थक वाटतात.

काही रूढी निरुपद्रवी असतात हे मला मान्यच आहे. दोन माणसं निराळ्या गावाहून एकमेकांशी फोनवर बोलत असतात तेव्हा 'जेवण झालं का?' असं विचारतात. खरा प्रश्न असा असतो की बोलण्यासाठी ही वेळ सोयीची आहे की नाही, जेवण पार पडलं असलं तर बोलणारा माणूस स्वस्थचित्त असतो, नाहीतर अस्वस्थ असण्याची शक्यता असते. पण या प्रश्नामुळे अपाय काहीच होत नाही.

सगळ्या प्रकारच्या शुभेच्छा माझ्या दृष्टीनी निरर्थकच असतात. 'परीक्षेसाठी शुभेच्छा', 'प्रवासासाठी शुभेच्छा' यामुळे ही व्यक्ती आपली हितचिंतक आहे एवढं कळतं. परीक्षा किंवा प्रवास व्हायचा तसाच होतो.

अशा निरुपद्रवी रूढी मला अमान्य आहेत असं नाही. पण मी त्या पाळत नाही. 'क्रिटिकल ॲनॅलिसिस' पद्धतीत किंवा 'रॅशनल इमोटिव्ह बिहेविअरल थेरपी' मधे भावना त्यातल्या त्यात अचूक वर्णन करण्याचा प्रयत्न असतो. त्याप्रमाणे 'परीक्षेसाठी शुभेच्छा'ऐवजी 'तुझी परीक्षा छान पार पडावी अशी माझी

इच्छा आहे' असं दुरुस्त केलेलं वाक्य मी वापरतो.

चांगलं आणि सज्जनपणी वागण्यासाठी सण, उत्सव, धर्म, रीतिरिवाज, व्रतवैकल्यं या कशाचीही मला जरुरी वाटत नाही. खरं बोलण्यासाठी मला शपथेची गरज वाटत नाही. माझ्या मते या माझ्या मानसिक, बौद्धिक अवस्थेत सर्वांत जास्त सुख आणि समाधान आहे.

●

रूढी-परंपरा निरक्षरांसाठी होत्या आणि आहेत. तुम्हा आम्हा सुशिक्षितांसाठी नाहीत. आपण स्वतः समजून विचार करून वागावं अशी आपल्याकडून अपेक्षा आहे.

२) सध्याची रूढींबद्दलची परिस्थिती

रीतभात पाळलीच पाहिजे असं आग्रहानी म्हणणारे लोक त्याच्या समर्थनासाठी काहीतरी कारण किंवा आख्यायिका सांगतात. अडचण अशी असते की, काहीशे किंवा काही हजार वर्षांपूर्वीच्या परिस्थितीला ते तत्त्व लागू होतं याबद्दल काहीच मतभेद नसतो. सध्याच्या परिस्थितीला या रीतभातीत काही अर्थ नाही असा मुद्दा असतो. त्यामुळे तो कालबाह्य विचार मला मुद्दा पटवण्यासाठी पुरत नाही.

भारतात अनेक सुपरवायझर्स, कामगार माझ्या संपर्कात आले. मी त्यांना हा शब्द न वापरता विवेकनिष्ठ विचारसरणी समजावण्याचा प्रयत्न केला. मी त्यांचा 'मोठा साहेब' असल्यामुळे त्यांनी माझं ऐकून घेतलं एवढंच. पण त्यांच्या वागणुकीत बदल झाला नाही. खरं म्हणजे माझी फजिती झाली.

इथे एका गोष्टीबद्दल मुद्दामहून सांगतो. समोरच्यानी आपण काय म्हणतो ते ऐकून घेतलं म्हणजे 'तो माझं ऐकतो' असं नाही, मी बोललो ते सहन केलं असं असतं. खरी परीक्षा एकच. माझ्या बोलण्यामुळे त्याच्या वागणुकीमधे बदल झाला का? सगळ्या व्यवसायातले अधिकारी, कुटुंबातल्या अधिकारी व्यक्ती, मुलांचे पालक, नवराबायको, मित्रमंडळी, सगळ्यांनी ही नीट समजून घेण्याची गोष्ट आहे. 'दुसऱ्याच्या वागणुकीत बदल झाला तर त्या संवादात आपण पास नाहीतर आपण नापास.'

ही सगळी रूढींबद्दलची परिस्थिती पहिली पिढी पुढच्या पिढीवर लादते आणि त्याला 'संस्कार' म्हणते. माहिती असावी म्हणून सांगतो, या पुस्तकसंचात 'संस्कार म्हणजे नेमकं काय?' असा लेख जरूर वाचा. प्रत्यक्षात सत्यशोधनाच्या वाटेनी घरातला एक माणूस जरी जाऊ शकला तरी तो आपलं कुटुंब आणि काही प्रमाणात आसपासचा समाज बदलू शकतो.

नुसत्या विचारापेक्षा पुढची कृती महत्त्वाची. एखाद्या विचाराचं कृतीत रूपांतर करायला म्हणजे 'वागून बघायला' घाबरण्याचं काहीच कारण नाही. या बाबतीत तुम्ही कोणी सत्यशोधनाच्या वाटेनी चालायला सुरुवात केलीत की, घरातल्या ज्येष्ठ मंडळींची शिकवणी घेणं चुकत नाही. होकार किंवा नकार

आग्रहानी स्पष्टपणी द्यायचा असतो, विरोधी विचार, मतभेद त्याविषयी चर्चा म्हणजे वितंडवाद नाही, भांडण नाही हे मुळात त्यांना शिकवावं लागतं. घरातली मोठी माणसं 'त्यांच्या काळी योग्य' अशा गोष्टी करण्याचा आग्रह धरत असतात. तऱ्हेतऱ्हेचे होम-हवन, लघुरुद्र त्यांना खरोखर महत्त्वाचे वाटतात. त्यांचा हेतू स्वार्थी नसतो. सबंध कुटुंबाचं कल्याण व्हावं असाच असतो. त्यांनी कोणावरही त्याची सक्ती करू नये एवढंच विवकेवाद्यांचं म्हणणं असतं.

रूढींचे काही फायदेदेखील स्पष्टपणे दिसतात. काही लोकांना काहीतरी करून वेळ घालवायचा असतो. त्यांना चरितार्थाची चिंता नसते, पण खरोखरच करायला काही नसतं. सामाजिक कामासाठी होणारे बौद्धिक, शारीरिक कष्ट करायचे नसतात. अशा माणसांसाठी परंपरेनी ही फार मोठी सोय करून ठेवलेली आहे. ती म्हणजे कर्मकांडं. मुख्य म्हणजे त्यात विचार न करण्याचीच मुख्य अट असते. सगळं काम सोपं होतं.

या अर्थानी बघितलं तर बऱ्याच लोकांसाठी धार्मिक कर्मकांडं अतिशय उपयोगी आहेत. प्रत्येक माणसानी विचार करून ठरवायचं की, आपण कुठल्या गटात आहोत. कर्म करणाऱ्यांच्या की कर्मकांडं करणाऱ्यांच्या.

मधे आमच्याकडे काम करणारी मोलकरीण म्हणाली की, नवरात्रीपूर्वी गोधड्या, पांघरुणं धुवायची आहेत. शोभा म्हणाली की, अशी प्रथा आहे म्हणून पांघरुणं धुतात. बुद्धीला पटणारी गोष्ट वाटली. थंडीत वापरण्यासाठी थंडी पडण्यापूर्वी पांघरुणं धुणं, पावसाळ्यात दमट हवेमुळं त्याला येणारा कुबट वास घालवून टाकणं हे चांगलंच आहे. वाईट एकाच गोष्टीचं वाटतं. अशी उपयोगी गोष्ट नवरात्रीशी जोडण्याची गरज पूर्वी असेल. पण खरं कारण कळण्याजोगी आता माणसं शहाणी झालीयत. त्यांना हे खरं कारण सांगण्याचा प्रयत्न तर करून बघायला हवा! सबंध जनतेला निरक्षर आणि निर्बुद्ध कशाला समजायचं?

आमच्या ओळखीच्या एक बाई आहेत. त्यांना रीतभात तोंडपाठ आहे. कोणी मुलगी बाळंत झाली की तिला शिरा करून पाठवायचा हे लगेच सुचतं. कारण तशी रीत आहे. तिला इतर काही मदत पाहिजे आहे का याची चौकशी रीतीत सांगितलेली नसल्यामुळे ती चौकशी त्या करत नाहीत.

एक गमतीची गोष्ट सांगतो. केरसुणी या वस्तूला लक्ष्मी म्हणतात हा वेडगळपणाही आहे आणि हुशारीदेखील आहे. स्वच्छता म्हणजे जणू काही

देवता या दृष्टीनी त्याच्याकडे बघितलं तर तो शहाणपणा आहे. प्रत्यक्षात स्वच्छतेबद्दलची अशी रूढी लोक पाळताना दिसतात की आपलं घर स्वच्छ करून कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकायचा. याला उपाय शोधला तरच केरसुणीला लक्ष्मी म्हणण्याचा नैतिक हक्क पोचतो.

●

३) दैवी शक्तींवरचा विश्वास

मी आणि शोभा ईजिप्तमधल्या कैरोच्या जवळपासची ठिकाणं बघत टॅक्सीमधून जात असताना टॅक्सीवाल्यांशी हिंदी-इंग्रजीमधून थोडं थोडं बोलणं चाललं होतं. आम्ही कुठच्या धर्माचे याबद्दलच्या त्याच्या प्रश्नाला 'धर्म नाही' सांगून झालं होतं. तरी त्याचा पुढे प्रश्न आलाच. 'तुम्ही मूळचे हिंदू असणार' म्हणाला. त्याला कारण विचारल्यावर त्यानी सांगितलं की, माझे कान टोचलेले याचा अर्थ हिंदू असा होतो. तेव्हा प्रथम लक्षात आलं की, लहानपणी मुलगे, मुली यांचे कान टोचण्याची सर्रास पद्धत फक्त हिंदू धर्मात आहे.

कोणीतरी सांगितलं की, 'प्रेशर पॉइंटस्', 'पंक्चर पॉइंटस्' या विचारपद्धतीप्रमाणे कान टोचल्यामुळे व्यक्तिमत्त्व समतोल होतं. ही गोष्ट नक्कीच मानसशास्त्राचा विकास होण्यापूर्वी हिंदू संस्कृतीत कोणीतरी शोधलेली असणार. अशा पद्धतीनी समतोल व्यक्तिमत्त्व बनत असतं तर हिंदू लोक एकाहून एक समतोल झाले असते. मुख्य म्हणजे सध्या भारत देश ज्या 'अत्यवस्थ' परिस्थितीत पोचला आहे तसा पोचलाच नसता.

इंग्लंड आणि यू.एस.ए. या दोन्ही ठिकाणी भारताविषयी फारशी माहिती नसायची. अनेक वेड्यासारखे प्रश्न ते लोक विचारायचे. गप्पा मारताना मी त्यांच्याशी मला न पटणाऱ्या गोष्टींविषयी थोडं थोडं बोलायचो. त्यांच्याकडच्या चुकीच्या रूढींविषयीही बोलायचो आणि भारतातल्या रूढींविषयीही सांगायचो. खरं म्हणजे जशा कुटुंबात मी वाढलो होतो की त्यामधे रूढी पाळण्याचं प्रमाण कमीच होतं. थोडक्यात माझीच माहिती अपुरी होती.

एकूण मला कळलं की जगभरचे लोक निरनिराळ्या रूढी पाळतात. त्याचं प्रमाण कमी-जास्त असतं. पण सगळ्या रूढी एव्हाना बदल झालेल्या परिस्थितीत निरर्थकच झालेल्या असतात. दोन गोष्टी लहानपणापासून मला आठवतायत. एक म्हणजे 'अमृत' नावाचं पेय. कधीही कोणी न बघितलेलं, चाखलेलं, माणसाला अमर करणारं पेय. घराघरात त्याचा उल्लेख व्हायचा. वेडगळपणाची रूढीच ती. दुसरी गोष्ट मला आठवतेय ती म्हणजे 'परीस.' लोखंडाला स्पर्श केला की त्याचं सोनं होतं म्हणे! लहान मुलांना अशा भ्रामक कल्पना सांगण्याची रूढी माझ्या

लहानपणी होती बाबा!

खरं म्हणजे माझ्यासमोर व्यक्तिगत प्रश्न काहीच नाहीत. सामाजिक प्रश्न मला त्रास देतात. हे मी एका परगावच्या वृद्ध गृहस्थांशी फोनवर बोलत होतो. मी व्यक्तिगत प्रश्न नाहीत म्हणतोय हे बहुधा त्यांना कळलंच नाही. त्यांनी मला अग्निहोत्र या विषयावरचं एक पुस्तक जबरदस्तीनी पाठवलं आणि ते वाचण्याबद्दल आग्रह करायला लागले. सगळे प्रश्न अग्निहोत्र करून मिटतील असं पुनः पुन्हा सांगायला लागले. मी पुस्तक न वाचल्याबद्दल ते अजूनही माझ्यावर रागावलेलेच आहेत. अग्निहोत्र म्हणजे काय हे मी समजून घेतलेलं आहे. माझ्या मते ते निरुपयोगी आहे. ते माझ्यावर रागावले. पण मी मात्र कोणाच्याही कुठल्या आग्रहाबद्दल रागवत नाही. मला त्यांच्या परिस्थितीचं वाईट वाटतं मात्र.

स्त्रियांच्यात अंगात येणं हा एक गमतीचा प्रकार आहे. बाईच्या अंगात देवीच येते. देव अंगात येत नाही. प्रत्यक्षात आपल्याला हे नक्की माहिती आहे की ज्या बायकांना घरून वाईट वागणूक मिळते त्यांचं अंतर्मन त्यावर काहीतरी उपाय शोधत राहतं. अंतर्मनाला हा उपाय केव्हातरी पटतो आणि त्या बाईचं आयुष्य बदलतं, अंगात यायला सुरुवात होते.

पूर्वी मला माहीत नव्हतं पण गेल्या काही वर्षात आमच्याकडं स्वयंपाक करायला येणाऱ्या बाईंकडून कळलं की, अनेक लोकांमधे स्त्रिया नारळ फोडत नाहीत. माझ्या आईकडून मी हे कधी ऐकलेलं नव्हतं. शोभा तर सर्रास नारळ फोडते. त्यामुळे या रूढीच्या मागे बाईचं एक काम कमी करावं एवढाच उद्देश असावा बहुतेक.

नवस बोलणं हे असंच एक गमतीचं प्रकरण आहे. माणसं दुसऱ्याच्या भल्यासाठी नवस मागतात हाही चांगुलपणा आहे. पण जेव्हा एक व्यक्ती नवस बोलते आणि त्यात दुसऱ्या व्यक्तीची परवानगी न घेता त्याचा समावेश करते तेव्हा आश्चर्य वाटतं. म्हणजे सासू नवस बोलते की, अमुक झालं तर माझा मुलगा आणि सून तमुक करतील. हे मात्र अगदीच विनोदी झालं. विनोदी वाटलं तरी रूढी आहे ना तशी!

●

4) नाट, शकुन, शुभ-अशुभ, पायगुण वगैरे

पुण्यात राहात असल्यामुळे मधूनमधून रिक्षानी कुठेतरी जाण्याचा प्रसंग येतो. एका हातात पिशवी, छत्री, अशा वस्तू असतात. त्यामुळे एका हातानी खिशातले पैसे काढायची पाळी येते. अंगठ्याजवळच्या दोन बोटांनी नोट धरून मी ती एकदा रिक्षावाल्याला देत होतो. रिक्षावाला रागावला. म्हणाला, 'पैसे असे कात्रीत पकडल्यासारखे देऊ नका. पैशाला नाट लागतो.' अर्थात आम्ही दोघांनी करण्याची ती गोष्ट असल्यामुळे आणि ते त्याचे पैसे असल्यामुळे मी त्याला हवे त्या पद्धतीनी नोटा दिल्या. खुद्द मला त्याबद्दल तशा भावना नाहीत.

आमच्या ओळखीचा एक दुकानदार काउंटवर वस्तू आणि पैसे आपटतो. ते मला चूक वाटतं, पण मी त्याबद्दल काही बोलत नाही. माझ्या मनातला विचार शुभ-अशुभाचा नसतो. मान-अपमानाचा असतो, सभ्य-असभ्यपणाचा असतो.

काही काही रूढी थेट अज्ञानावर आधारलेल्या असतात. मानसशास्त्रानी अगदी निश्चित सिद्ध केलंय की, काही माणसं निसर्गतः डावरी असतात आणि त्यांना उजव्या हातानी कामं करण्याची, लिहिण्याची जबरदस्ती करू नये. सबंध जगभर अशीच परिस्थिती होती. सगळ्या लिखाणकामाच्या पद्धती उजव्या हातानी काम करणाऱ्यांसाठी बनवलेल्या असतात. शेकडो वर्षं चालत आलेल्या या जगभराच्या रूढीनी काही घोटाळे मात्र करून ठेवले.

डावा हात म्हणजे अशुभ अशी कल्पना रुजली. लहान मूलं सुरुवातीची 3-4 वर्षं दोन्ही हात एकत्र किंवा आळीपाळीनी वापरतात. कुठच्याही कामासाठी डावा की उजवा हात याचा त्यांना विधिनिषेध नसतो. हळूहळू त्यांना जो हात सोयीचा वाटेल तो वापरायला लागतात नि शाळेच्या वयापर्यंत लिहिण्यासाठी डावा की उजवा हात हे ठरतं. या सत्य गोष्टीबद्दलच्या अज्ञानाची माझी सगळी पिढी शिकार होती. प्रसाद घेताना उजव्या हाताऐवजी डावा हात पुढे केल्याबद्दल आमच्या लहानपणी आम्ही हातावर फटकेही खाल्लेले आहेत. आमच्या पिढीत कोणालाच खरं माहिती नाही की आमची उपजत नैसर्गिक प्रवृत्ती डाव्या हाताची की उजव्या हाताची होती.

एक उदाहरण आमच्याकडे काम करणाऱ्या मोलकरणीचं देतो. तिच्या

लहानपणी ती शाळेत जायची. पण डावरी असल्यामुळे तिच्या बाई तिला त्यापायी मारायच्या. अभ्यासाची गोडी लागणं दूरच, तिनी सरळ शाळा सोडली. आज ती निरक्षर म्हणून धुण्याभांड्याची, केरपोछाची कामं करतीय. असे अनेक बिगारी नि बाया याच पद्धतीनी निरक्षर म्हणून आयुष्य जगतील. शुभ-अशुभ, डावा-उजवा हात हे प्रकरण भारत देशाला केवढ्यात पडतंय? पुस्तकाला पाय लागणं हा एक असाच प्रकार आहे. पुस्तकाला पाय याचा अर्थ ज्ञानाचा अपमान ही प्रतीकात्मक कल्पना आहे. त्याची रूढी बनली. त्यामुळे किती घरांच्यात लहान मुलं बोलणी, मार खात असतील कोण जाणे! त्याविषयी आपण थोड्या वेळानी पुढे आणखी सविस्तर बोलू.

मी अनेक वर्षांपासून काळ्या शाईचं पेन वापरतो. माझ्या दृष्टीनी पांढऱ्या कागदावर काळी शाई जास्त स्पष्ट दिसते. एखादा फॉर्म आधी काळ्या शाईनी छापलेला असतो. तो भरताना निळं पेन वापरावं. त्याचंही कारण उघड आहे. हातानी भरलेला मजकूर निराळा उठून दिसला पाहिजे. या काळी, निळी शाई प्रकरणात शुभ-अशुभचा मला संबंधच दिसत नाही. तरीही काळ्या रंगाला अशुभ मानणारे महाभाग मला माहिती आहेत. काय म्हणायचं त्यांना?

काही गोष्टी आपण समजू शकतो. अमावास्या अशुभ ही कल्पना पूर्वी का रूढ झाली असेल हे समजणं सोपं आहे. पूर्वी वीज नव्हती, दिवे नव्हते. अमावास्येच्या रात्री चंद्रप्रकाश नसल्यामुळे खूप अंधार घराबाहेर, वाटेवर असणारच. कीटक, श्वापदं, साप आणि दुष्ट माणसं, खाचखळगे याचा अंधारामुळे त्रास होणार. त्यामुळे अमावास्येला घराबाहेर पडू नये ही रूढी समजायला सोपी आहे. पण आता? घराबाहेर व्यवस्थित प्रकाश असतो. त्यामुळे रूढी म्हणून अमावास्येला बाहेर जाणं टाळणं किंवा नवीन काम सुरू करायला नकार देणं हे निरर्थक आहे.

स्त्रीच्या मासिक पाळीबद्दलचे हिंदू धर्मातले नियम, शास्त्राधार, रूढी, कर्मकांडं (जो शब्द पसंत पडेल तो वाचावा) इतके अनैसर्गिक आहेत की, ते पाळणाऱ्यांच्या परिस्थितीबद्दल, त्यांच्या बुद्धीबद्दल दया येते. सर्वसाधारणपणी जगातली निम्मी लोकसंख्या स्त्रिया आहेत याचा अर्थ त्यांना मासिक पाळी येणारच. ही गर्भ राहण्यासाठीची निसर्गयोजना आहे आणि शारीरिक गरज आहे. त्या काळात स्त्रीनी विश्रांती घेण्याची गरज असते हे साध्या शब्दात ठरवून टाकण्याऐवजी तिला अपवित्र समजायचं नि अनेक गोष्टी करण्यासंबंधी बंधनं

घालायची हा वेडेपणा किंबहुना अमानुषपणा आहे.

मलमूत्र या गोष्टी अपवित्र आहेतच. पण नैसर्गिक आहेत, हे कळल्यावर शौचाला जाणाऱ्या प्रत्येक माणसावर बंदी आहे असं म्हणणं जितकं वेडगळपणाचं आहे तसंच हे आहे. अनेक वर्षं विटाळ या कल्पनेनी बायकांना छळण्याचा कार्यक्रम धर्मांध लोकांनी चालवलेलाच आहे. पारश्यांच्यातही ही चुकीची पद्धत आहे, पण ख्रिश्चनांच्यात नाही. या बाबतीत सर्व धर्मांचा माझा अभ्यास वगैरे नाही. पण हे चूक आणि निरर्थक आहे असा निर्णय आमच्यापुरता आणि आमच्या कुटुंबापुरता आम्ही घेतला. मुळात इतरांना या स्त्रीची पाळी चालू आहे हे कळण्याचं कारणच नाही. काही सुज्ञ कुटुंबांना हे शहाणपण आलं नि त्यांनी जरा दगदग कमी करण्यापलीकडे काही करायचं नाही, सांगायचं नाही असा सोपा निर्णय घेतला. अशाही भरपूर स्त्रिया आहेत की ज्या धार्मिक कार्यक्रमात नेमकी मासिक पाळी येऊ नये यासाठी औषधं घेऊन आरोग्याची नासाडी करून घेतात. या धर्म-रूढी वेडाला काय म्हणायचं हे समजेनासच होतं.

दुसरी एक गोष्ट सांगतो. कुठच्या तरी बाळासाठी टांगलेला रिकामा पाळणा हलवल्याबद्दल मी लहानपणी भरपूर बोलणी खाल्लेली आहेत. प्रत्यक्षात टांगलेली, हलणारी, झोके घेणारी कुठलीही वस्तू असली की घरात वावरणाऱ्या लोकांना लागण्याचा, इजा होण्याचा धोका असतोच. तोच पाळणा स्टँडवर टांगलेला असला की, हा धोका संपतो, पण ते लक्षात न घेता बोलणारे बोलतातच. कारण उघड आहे. रूढीमधे विचार करायला बंदी असते ना! मग त्याला अपशकुन ठरवून मोकळे होतात!

फिलाडेल्फियात 1970 साली आम्ही लग्न केलं तेव्हा मला आणि शोभाला लग्नाची नोंदणी करायला वाट्टेल तो दिवस चालत होता. अपशकुनी दिवसही चालला असता. लग्नासाठी, लग्नाआधी, आयुष्यभरात, चांगला दिवस, अशुभ दिवस, शुभवेळ असं काही असतं असं मला, शोभाला वाटत नाही. 365 दिवसांचे 24 तास आणि त्याची 60 मिनिटं सारखीच शुभ आणि अशुभ असतात. सारासार विचार वापरून, दुसऱ्याचा विचार करून केलेली प्रत्येक कृती चांगली म्हणजे शुभच असते, अशा भूमिकेतून आम्ही वागलो नि आमच्या मुलांवरही तसेच संस्कार आपोआप झाले.

आम्ही कधीही ज्योतिषाच्या, पत्रिकेच्या मागे लागलो नाही. माझ्या मते ते दुर्बळांना मानसिक आधार देण्याच्या अनेक आयुधांपैकी एक आहे. आपल्या

समाजातलं ''पत्रिका-कुंडली'' प्रकरण पूर्ण नाहीसं व्हावं आणि सद्सद्बुद्धीनी लोकांनी वागावं, अशी आमची फार इच्छा आहे. माझी भूमिका निरीश्वरवादी, जाती-धर्मविरोधी, निरर्थक कर्मकांडविरोधी आहे, हे बहुतेकांना माहीत आहे. मी स्वतः अगदी निवडून सर्वांत अशुभ अपशकुनी दिवशी काही कामं करण्याच्या मागे होतो. पण असा कुमूहूर्त नसतोच, असं अनेकांनी सांगितलं. नीट विचार केला तर आपल्यालाही पटतं की, प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी कुठेतरी काहीतरी दुर्घटना होतच असते. प्रत्येकच क्षण अपशकुनी असतो. त्याचबरोबर प्रत्येक क्षण कोणासाठीतरी शुभशकुनी असणारच.

खूप शिक्षण असलेलं माणूससुद्धा किती निरर्थक आणि अतार्किक म्हणजेच परंपरावादी विचार करू शकतं याचं एक उदाहरण सांगतो. शुभ आणि अशुभ असं काही नसतंच असं मला नक्की वाटतं. आमच्या नात्यामधल्या एक उच्चशिक्षित बाई अमुक एक रंगाची स्वतःची साडी अशुभ असल्याचं सांगत होत्या. त्यांनी ती साडी नेसली की, त्या दिवशी काहीतरी वाईट घडतं म्हणत होत्या. खरं म्हणजे ती साडी फेकून द्यायची म्हणजे सगळे प्रश्न संपले नसते का? मी तिथे अर्थातच काही बोललो नाही. कारण मी अवाक् झालो होतो.

सर्वांना पसंत असं काहीच नसतं आणि सगळे नाकं मुरडतात असंही काही नसतं. सगळ्या घटनांसाठी शुभ वेळ निवडून मगच ते काम करायचं असं खरोखर ठरवलं तर आयुष्य जगणं अशक्य आहे. पायगुण, हातगुण वगैरे गोष्टीसुद्धा कशा, कोणी शोधल्या कोण जाणे. प्रत्येकजण प्रत्येक गोष्ट करतो, तेव्हा कुठच्या तरी ठिकाणी काहीतरी वाईट घडतंच असतं. असो. हा विषयच असा आहे की, ज्याला यावर विश्वास ठेवायचा आहे त्याचं कोणी मन वळवू शकत नाही. त्याचबरोबर ज्याला विश्वास ठेवायचा नाही त्यालाही पटवू शकत नाही.

शुभ-अशुभाच्या बाबतीत नवरा-बायकोत मतभेद कमी प्रमाणात असतात, पण 'सक्ती नको' हे आपलं मूळ सूत्र तसंच कायम असावं. सुखी विवाहपूर्व आणि वैवाहिक आयुष्याचं रहस्य अगदी साधं आहे. 'गंडविरहित-स्वच्छ-साधा आपला आणि दुसऱ्याचा विचार'. अभ्यास मंडळात या विषयांवर अगदी सविस्तर चर्चा चालते.

●

5) बारसं, वाढदिवस, मुंज इत्यादी

माझ्या लहानपणाचं म्हणजे साधारण साठ वर्षांपूर्वीचं वातावरण मला आठवतंय. त्या काळी बारसं खूप मोठ्या प्रमाणात साजरं व्हायचं आणि वाढदिवस छोट्या प्रमाणात. आता बघावं तर प्रत्येक सण आणि समारंभ दणक्यात साजरा होतो. हा रूढीतला बदल नक्की आहे, पण वाईट बदल आहे. वाढदिवसाला एवढं महत्त्व देणं हे पाश्चात्त्यीकरण आहे. जिथे बघावं तिथे केक, कँडल्स या भाषेतच लोक बोलत असतात. आमच्या दोन्ही मुलांची बारशी आम्ही केली नाहीत.

लहान मुलांना खऱ्या नावाऐवजी टोपणनावानी हाक मारण्याची एक रूढी आहे. मुळात मोठी पाचसहा अक्षरी नावं ठेवायची आणि मग दुसरं सोपं नाव टोपण नाव म्हणून निवडायचं. मग 'बंडू ऊर्फ विनायक' असा आयुष्यभर उल्लेख करत बसायचा. काहींना फक्त बंडूच माहिती असतं तर काहींना फक्त विनायक. आमच्या घरात मात्र टोपणनावाचं खूळ कधी शिरलं नाही.

भारतीय संस्कारांच्यात 'औक्षण' नावाचा संस्कार असतो. जरा विचार केला की, त्याची अर्थशून्यता कळते. पण विचार करायला बंदी असण्याचीच रूढी आहे ना!

मी तुम्हाला मागे म्हणालो त्याप्रमाणे माझी मुंज आईवडलांनी केली होती. मी माझ्या पद्धतीनी नंतर विवेकनिष्ठ विचार केला तेव्हा मला मुंज या कल्पनेबद्दल काही आक्षेप दिसायला लागले. एक म्हणजे मुंजीचा विशिष्ट मंत्र, विधी यामुळे त्या मुलाच्या वागणुकीत काही बदल होत नाही. थोडक्यात ज्यामुळे माणसाच्या वागणुकीत बदल नाही तो संस्कार म्हणून मानायला मी तयार नाही. मुंज फक्त मुलांचीच होते याचा अर्थ हा स्त्रीपुरुष असमानतेचा संस्कार त्या मुलावर नकळत केला जातो. याला क्वचित अपवाद दिसतो. मुलींचीही मुंज होते, पण काही धर्मात आणि अपवादात्मक ठिकाणी.

मुंजमुलानी लग्न करेपर्यंत ब्रह्मचर्य पाळणं अपेक्षित असल्यामुळे सोडमुंज करावी लागते. सरासरी लग्नाचं वय कमी होतं तोपर्यंत एवढी अडचण नव्हती. पण मुलांचं सरासरी लग्नाचं वय वाढल्यामुळे ब्रह्मचर्याची अट जटिलच बनणार.

मुंज ऊर्फ उपनयन ऊर्फ व्रतबंध फक्त ब्राह्मणांच्यातच होतो. अर्थात ही प्रथा जातिभेदाला खतपाणी घालते. तेही सामाजिक दृष्टिकोनातून हानीकारकच आहे.

नंतर जेव्हा आमचा मुलगा शोनील याच्याबद्दल निर्णयाचा प्रश्न आला तेव्हा आम्ही मुंज न करण्याचा निर्णय घेतला. शोनील आता 42 वर्षांचा आहे. त्याचं सगळं छान चालू आहे. मुंज न केल्यामुळे त्याच्या आयुष्यावर शश्प परिणाम झाला नाही. जी गोष्ट बुद्धीला पटत नाही ती मी करत नाही. त्यामुळे पन्नास वर्षांपूर्वी कुठल्यातरी मुंजीच्या समारंभाला हजर राहिलो असीन. त्यानंतर मी मुंजीला जायला कायम नकार देत आलो आहे. शोभा जिथे नकार देऊ शकत नाही त्या ठिकाणी जाते. पण माझ्यासारखाच तिचाही मुंज या संस्कारावर विश्वास नाही.

एका बाबतीत माझं मत पक्कं बनलेलं आहे. ईश्वर, पूजाअर्चा, धर्म, धार्मिक कर्मकांडं यांच्या विरोधात चळवळी, मोर्चे यात मला रस नाही. ते व्यक्तिस्वातंत्र्य आहे. मी मला न पटलेल्या गोष्टीत स्वतः भाग घेणार नाही हे नक्की आणि या विषयात प्रबोधन करत राहणार हेही नक्की. मला उत्सवी वातावरण अयोग्य वाटतं. वाढदिवस साजरे करणं मला पटत नाही. त्यामुळे आमच्या घरी वाढदिवसही नसतात. माझा नकार पक्का असतो. पण मी व्यक्तिगत पातळीवर वाद घालत नाही. विरोधी विचारांमुळे माझा अपमान होत नाही.

आणखीन एक गोष्ट मी अनेकजणांना करताना बघितली आहे. एखादी गोष्ट दोन्ही हातांनी करण्याऐवजी एका हातानी करायची आणि दुसरा हात कोपराला टेकवायचा. प्रतीक या कल्पनेसंबंधी तत्त्वज्ञानात बरंच चिंतन आहे. बहुतेक वेळा प्रतीक म्हणून कुठल्यातरी वस्तू वापरतात. प्रतीक म्हणून दोन्ही हातांऐवजी एका हाताचा दुसऱ्या हाताला स्पर्श ही क्वचित आढळणारी गोष्ट आहे. मग त्याची रूढी बनली. अर्थातच माझ्या दृष्टीनी ती निरर्थक आहे.

●

6) खाण्यापिण्याबद्दलच्या रूढी

काही रूढींमधे धार्मिकतेचा काहीच संबंध नसतो. धार्मिक कर्मकांड नसलेल्या रूढींपैकी एक म्हणजे कोणाकडे पहिल्यांदा गेलं की काहीतरी खाण्याची किंवा पिण्याची रूढी. 'काहीतरी खाल्लंच पाहिजे' असा यजमान आग्रह करतो आणि 'बरं मग नुसती हातावर साखर द्या.' असं म्हणून पाहुणा त्या रूढीला मान देतो. मला हे निरर्थक वाटतं.

'जेवण' या गोष्टीच्या बाबतीतही काही चुकीच्या पद्धती रूढ झालेल्या आढळतात. एका गृहस्थांना मी फोन करण्याची वेळ ठरलेली होती. मी ठरलेल्या वेळी फोन केला. बायकोनी फोन उचलून सांगितलं, 'ते जेवतायत.' मला त्याचा अर्थ न कळल्यामुळे मी फोन चालू ठेवला. मला नवराबायकोचं बोलणं ऐकू येत होतं. 'जेवूसुद्धा देत नाहीत शांतपणे' अशा अर्थाची संभाषणं होती. मी फोन ठेवला. नंतर कळलं की जेवताना उठायचं नाही अशी त्यांच्या घरची पद्धत होती. मला त्या रूढीत काही अर्थ दिसत नाही. मुख्य म्हणजे ठरलेल्या वेळीच मी फोन केला होता त्यामुळे माझी काही चूक नव्हती.

आणखी एक गोष्ट माझ्या लहानपणी आईकडून ऐकलेली आठवते. मी माझ्या तरुणपणी प्रचंड कामात असायचो. पहाटे निघून कॉलेजमधे शिकवणं, मग पूर्ण वेळची नोकरी, संध्याकाळी जर्मन भाषेचा क्लास आणि रात्री व्यायामशाळा. या कार्यक्रमात 'आज नाश्त्याला काय आहे?' असं विचारलं जायचं, कधी रात्री जेवायला काय पदार्थ आहे हे मी विचारायचो. कधी खास आवडीचा पदार्थ असायचा. त्याबद्दल बोलणं व्हायचं. पण तो तयार व्हायचा असायचा, आणि तो खाऊन निघण्याइतका मला वेळ नसायचा. मग आईचं ठरलेलं वाक्य असायचं, 'खाण्याचं नाव काढून न खाता जाऊ नको' मी तेव्हा गप्प बसायचो. गुपचूप एक घास तोंडात टाकून निघायचो. नंतर त्याचा परिणाम एवढाच झाला की मला खरोखर वेळ असेल तेव्हाच मी जेवायला काय अशी चौकशी करायचो.

अनेक वर्षांनी मी कोणीतरी म्हटलेलं हे वाक्य मधे ऐकलं. ही रूढी निरर्थक आहे का नाही याबद्दल माझा विचार सुरू झाला. माणसाला जिवंत

राहण्यासाठी अन्न पाहिजेच. त्यामुळे खाणं ही गोष्ट महत्त्वाची आहे यात काही शंका नाही. आईच्या पाककौशल्याचा अपमान करण्याचा यात काही संबंध नाही. मला जेव्हा वेळ असेल तेव्हा पुन्हा तो पदार्थ गरम करावा लागेल.' तेव्हा तो आताच्या एवढा रुचकर लागणार नाही पण ही गोष्ट खरी. तो पदार्थ समोर बनताना दिसला, पण त्याविषयी न बोलता मी निघालो तर आईला चालतं याचा अर्थ इतर कशाचाच याच्याशी संबंध नाही. थोडक्यात तर्कबुद्धीला पटणारं कुठचंच कारण सापडत नाही. सारांशात खाण्याचं नाव काढून न खाता बाहेर जायचं नाही ही निरर्थक रूढीच म्हणायला हवी.

एकदा एक माणूस ठरलेल्या वेळेपेक्षा बराच उशिरा आला. विचारल्यावर म्हणाला, "हो. जेवायला जाऊन आलो." याचा अर्थ त्याच्या दृष्टीनी असा असावा की, जेवण हा विषय निघाला की, बाकी सगळं माफ. उशीरबिशिराला महत्त्व नाही. जेवण शब्दासरशी समोरच्याचं तोंड बंद झालं पाहिजे. माझ्या दृष्टीनी हा चुकीच्या रूढीचाच प्रकार आहे.

आलेल्या पाहुण्याला जेवताना खाण्याचा आग्रह केलाच पाहिजे अशी रूढी आहे. मला आग्रहानी जेवणातले पदार्थ वाढताना एका घरचे यजमान प्रत्यक्ष म्हणाले, "तुमचं पोट बिघडलं की आमचं समाधान होईल.' त्यानंतर माझं पोट खरोखरच बिघडून दोन दिवस वाट लागली. पाश्चात्त्यांच्यात सौम्यपणी एकदा सूचित करण्यापलीकडे कोणी कोणाला खाण्यापिण्याचा आग्रह करत नाहीत. माझ्या अंदाजानी एकूण भारतातलं दारिद्र्य, आतिथ्याच्या कल्पना, जे खरं मनात नाही ते दाखवण्याची धडपड, मुळातल्या समृद्ध भारतातले पूर्वीचे संस्कार अशा कारणांनी अशी जेवणातल्या आग्रहाची चुकीची प्रथा पडली असावी. मी कोणालाही आग्रह करत नाही आणि करवून घेत नाही.

निरर्थक रूढींनी स्वयंपाकघरात, जेवणघरातही शिरकाव केलेला दिसतो. काही पदार्थांच्या उगीचच जोड्या ठरवून टाकून त्यांची रूढी बनलीय. उदाहरणार्थ, शिरापुरी, श्रीखंडपुरी, आंबरसपुरी. प्रत्यक्षात पुरीला तेल जास्त लागतं. आणि तेवढं तेल तब्येतीला अपायकारक असतं. त्याखेरीज चपातीही त्या पदार्थांबरोबर तेवढीच चांगली लागते. मटणभाकरी, चिकनभाकरी याचं तसंच. चपाती, घडीची पोळी त्यांच्याबरोबर जास्त चविष्ट लागते.मी अनेक पदार्थ निरनिराळ्या पदार्थांबरोबर जोडीनी खाऊन बघितले आणि त्यातले काही निराळ्या जोडीबरोबर खूप छान

लागले. करून बघणं माझ्या दृष्टीनी फार महत्त्वाचं आहे. सगळ्याच बाबतीत.

पेढा घेण्यासाठी उजवाच हात पुढे करण्याचा आग्रह काय, मुळात मुलगा झाला की पेढेच वाटायचे आणि मुलगी झाली की बर्फीच वाटायची हा आग्रह या निरर्थक रूढी आहेत. लग्न ठरलं की, लाडवाचं जेवण ही रूढी, 'आम्हाला लाडू केव्हा देणार?' असा त्यामुळे लग्न न झालेल्या मुलीला विचारलेला प्रश्न, या सगळ्या निरर्थक रूढी आहेत. ही असली वाक्यं, असल्या कल्पना आमच्या घरातून स्पष्ट विचारांच्या प्रभावामुळे हद्दपार झाल्या.

थोडं 'उपास' या कल्पनेबद्दल बोलूया. माझ्या स्वतःच्याच विचार आणि वागणुकीबद्दल एक गोष्ट प्रथम तुम्हाला सांगतो. माझा धार्मिक उपासावर कधीच विश्वास नव्हता आणि आजही नाही. पण दुसऱ्याची श्रद्धा असली तर त्याला फसवून भलता पदार्थ खायला घालणं चूकच आहे. काही लोकांना मी असं करताना बघितलं आणि ते मला अजिबात पटलं नव्हतं. मी असं कधी केलं नाही, पण अमुक माणसाचा आज महाशिवरात्रीचा उपास आहे कळल्यावर मुद्दाम मांसाहाराचे उल्लेख त्याच्यासमोर करण्याचा खोडसाळपणा मी पूर्वी केलेला आहे. माझी ती चूक होती.

घरात माझी आई उपासाच्या दिवशी साबुदाण्याची खिचडी, रताळ्याचे काप वगैरे काहीतरी करायची. मी म्हणायचो, की एरवी मला ते पदार्थ आवडतात, पण उपासाच्या दिवशी उपासाचे म्हणून परंपरेनी ठरवलेले पदार्थ मी खाणार नाही. माझ्या अडेलतट्टूपणामुळे आईला बरेचदा बिनउपासाचा कुठलातरी पदार्थ माझ्यापुरता शिजवावा लागलेला होता. मी घरातला एकटा मुलगा होतो त्यामुळे माझा हा हट्ट आईनी खपवून घेतला. नाहीतर 'खायचं असेल तर खा नाहीतर रहा उपाशी' हे वाक्य मला ऐकावं लागलं असतं. आताही मी तेवढाच कर्मकांडविरोधी आहे, पण असा अडेल वागत नाही.

परंपरेमधले उपासाला चालणारे पदार्थ आणि न चालणारे पदार्थ यांची यादी म्हणजे विनोदीपणाचा कहर आहे. त्याच्यामागची तर्कसंगती खुद्द देवालासुद्धा सांगता येणार नाही. उपासाला फळं चालतात ही एकच बुद्धीला पटण्याजोगी गोष्ट त्यात चांगली आहे. मी सुज्ञ लोकांना मी उपासाच्या दिवशी फक्त फलाहार करताना बघितलं आहे. फक्त दूध, निर्जळी उपास असे काही प्रकार निदान

विनोदापासून दूर असतात.

शोभाच्या आणि माझ्या स्वतंत्र संसारात संपूर्ण कुटुंबानी ‘धार्मिक उपास’ या कल्पनेची आमच्या घरातून फार पूर्वीच हकालपट्टी केली आहे.

●

परंपरेमधले उपासाला चालणारे पदार्थ आणि न चालणारे पदार्थ यांची यादी म्हणजे विनोदीपणाचा कहर आहे. त्याच्यामागची तर्कसंगती खुद्द देवालासुद्धा सांगता येणार नाही.

7) लग्नसमारंभाशी जोडलेल्या रूढी

तुम्ही हे प्रसिद्ध वाक्य ऐकलं असेल. 'भारत हा श्रीमंत देश आहे आणि त्यात गरीब लोक राहतात.' याचे अनेक अर्थ आहेत. त्यातला एक अर्थ सोन्याच्या साठ्यासंबंधी आहे. देशाच्या तिजोरीत जेवढा सोन्याचा साठा असेल तेवढी त्या देशाच्या आर्थिक चलनाला म्हणजेच रुपयाला जगाच्या बाजारात किंमत असते. भारत देशात भरपूर सोनं आहे. पण ते सरकारच्या तिजोरीत नाही. लोकांच्या अंगावर आहे. माझ्या दृष्टीनी दागिन्यांसाठी म्हणजेच खासगी वापरासाठी सोन्याचा उपयोग हे राष्ट्रद्रोही कृत्य आहे.

मी सोन्याचा वापर साठ वर्षांपूर्वी सोडून दिला आहे. पण हा मुद्दा जनतेला पटवण्यात मी पूर्ण असफल झालो. हजारो वर्षापासून भारतात सोन्याचा वापर सुरू आहे. भारतातून सोन्याचा धूर निघतो म्हणायचे. त्या काळात प्लॅटिनम धातूचा शोध लागला असता तर त्याचा धूर निघाला असता कदाचित. सांगायचा मुद्दा असा की, सोनं इतकं रूढीत घट्ट बसलेलं आहे की ते लोकांच्या अंगावरही आहे आणि भावनेतदेखील आहे. माझ्या नजरेतून व्यक्तिगत वापरासाठी सोन्याचा उपयोग यावर कायद्यानी बंदी आणायला हवी.

शोभाचा मोठा भाऊ गेली पंचेचाळीस वर्षं अमेरिकेत आहे. तो, त्याची बायको, दोघंही यू.एस. सिटिझन्स आहेत. त्यांच्या दोन्ही मुली तिथेच जन्मल्या. त्यामुळे त्या दोघी यू.एस.ए.च्या सिटिझन्स आहेत. भारतीयांनी भारतातल्या परिस्थितीनुसार सोनं वापरणं हे अयोग्य असलं तरी अमेरिकेचं नागरिकत्व पत्करल्यावर सोनं वापरणं ही गोष्ट चूक ठरत नाही. त्याची बायको आणि मुली सोनं वापरतात, कारण त्या मूळच्या भारतीय आहेत. अमेरिकेतल्या स्त्रियांना सोन्याविषयी खास भावनिक आकर्षण वाटत नाही.

लग्नानंतर बायका सोन्याचं मंगळसूत्र खूप श्रद्धेनी घालताना आपण बघतो. शोभाची मंगळसूत्रावर श्रद्धा नाही आणि माझा तर मंगळसूत्र घालायला विरोधच आहे. श्रद्धेच्या प्रश्नाला कोणाकडे काही उपाय नाही. पण मंगळसूत्र खेचून नेल्याच्या एवढ्या घटना होत असून बायकांच्या विचारात बदल कसा होत नाही हा खरा प्रश्न आहे.

लग्नसमारंभाशी इतरही काही प्रथा जोडलेल्या आहेत. पाहुण्यांपैकी फक्त निमंत्रण करायला काही मिनिटांसाठी आलेले पाहुणे हा निराळाच प्रकार आहे. आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या लग्नसमारंभाचं आमंत्रण करायला आईवडील येतात. तो मुलगा किंवा मुलगी स्वतः येत नाही. आई-वडील यांच्यापैकी कोणी हयात नसलं तर घरातलं कोणीतरी मोठं माणूस शोधतात. पण ही रूढी पाळतात. निमंत्रण करायला आलेल्यांच्या हातावर चमचाभर साखर देण्याचीही रूढी आहे. माझ्या दृष्टीनी ती निरर्थक आहे. लग्नसमारंभाच्या पत्रिकेत घरची ज्येष्ठ लोक समारंभाचं बोलावणं करतात असाच उल्लेख असतो. त्यातदेखील अर्थ नाही. लग्न करणारी मुलगी आणि मुलगा यांचा बालविवाह होतोय असाच त्याचा अर्थ होतो.

'लग्नसमारंभ' या गोष्टीला रुढी किंवा प्रथेमुळे एरवीसुद्धा कसं खास स्थान मिळालं आहे ते जरा बघूया. आतापर्यंत जवळजवळ प्रत्येक शिंप्याबद्दलचा माझा अनुभव सांगतो. मी तयार कपडे वापरत नाही. कारण मला हव्या तशा सोयी करण्यासाठी कपडे शिंप्याकडूनच शिवून घ्यावे लागतात. कपडे टाकताना शिंपी विचारतो, 'केव्हा पाहिजेत?' मी म्हणतो, 'काही विशिष्ट तारीख नाही. तुम्हीच तारीख सांगा आणि तुम्हीच ती तारीख पाळा.' तिथेच तर सगळा घोटाळा होतो. जी गिऱ्हाइकं 'पुढच्या सोमवारी लग्नाला जायचंय. त्यासाठी पाहिजे.' म्हणतील त्यांचं काम ठरल्या वेळेवर होतं. मी असं कुठचंच कारण सांगत नाही. त्यामुळे माझं काम वेळेवर होत नाही. मला लग्न आहे असं खोटंच सांगता येईल. पण तसं मी करत नाही. शिंप्याशी बोलणारी व्यक्ती लग्न करण्याजोग्या वयाची दिसत असली आणि शिंप्याला सांगितलं 'माझं लग्न आहे' तर एका दिवसातदेखील कपडे शिवून मिळतात.

लग्न या कारणासाठी कामाच्या ठिकाणीही हक्कानी रजा मागता येते. या विषयावर वाद घालण्याची मालकाचीही टाप नसल्यामुळे कामाची धांदल असली तरी तो बिचारा मुकाटपणी दुसरी काहीतरी व्यवस्था करतो.

●

8) पोषाखाच्या रूढी

पोषाखातसुद्धा खूप रूढी आहेत. पुरुषांमधे शहरी शर्टपँट, ग्रामीण लेंगा-सदरा, जुन्या काळची काळी टोपी, धोतर आणि कोट, या सगळ्या गोष्टी म्हणजे रूढीचेच परिणाम आहेत. बायकांच्यातसुद्धा नऊवारी साडी, पाचवारी साडी, गुजराथी साडी, पंजाबी ड्रेस, पँट-टॉप, स्कर्ट या सगळ्या रूढीच आहेत. एक नक्की. रूढी मोडायला खूप हिंमत लागते. ती नसल्यामुळे सगळं अडतं. करून बघायची हिंमत असलेल्याला बाकीचे चक्रम, विक्षिप्त, जादा, आगाऊ, शिष्ठ अशी नावं ठेवतात. कारण तशीच प्रथा आहे. मी प्रचंड शिस्तीचा असल्यामुळे मला सगळ्या कपड्यांना माझ्या वस्तूंच्या गरजेप्रमाणे ठरलेल्या ठिकाणी खिसे लागतात. त्या माझ्या कपड्यांच्या खिशांचा इतरांशी काही संबंध आहे का? पण त्यालासुद्धा लोक विक्षिप्त समजतात.

रूढीबद्दल इंग्लंडमधली एक गंमत सांगतो. पूर्वी इंग्लंडसारख्या वर्षभर थंडी असलेल्या देशात ठिकठिकाणी हीटर्स नसायचे. साहजिकच शरीराच्या संरक्षणासाठी पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि पँट, शिवाय गळ्याभोवती टाय अशी पुरुषांच्या पोषाखाची रूढी बनली. पुढे जागोजागी हीटर्स आले. पूर्ण बाह्यांच्या शर्टची, टाय आणि कोटाची गरज नाहीशी झाली. गरज बदलली. पण रूढी बदलली नाही. मी रूढी न मानणारा असल्यामुळे मी थेट इंग्लंडमधे राहून, ती रूढी न जुमानता अर्ध्या बाह्यांचा शर्ट घालायचो. माझं काम उत्तम असल्यामुळे कुठेच काही अडलं नाही. खास प्रसंगी मला ऑफिसमधून विनंती असायची की, तेवढ्यापुरता टाय आणि जॅकेट वापरलं तर बरं होईल.

केशरचना हा खरा म्हणजे पोषाखाचाच एक भाग असतो. पुरुषांच्या बाबतीत एके काळी गोटा आाणि शेंडी अशी रूढी होती. नंतरच्या काळात डावीकडे भांग अशीच प्रथा होती. उजवीकडे भांग, मधे भांग, उलटे केस ठेवणाऱ्यांना लोक नावं ठेवायचे. मला तर तरुणपणी फक्त उलटे वळवलेले केसच आवडायचे.

स्त्रियांसाठी मधे भांग हीच रूढी होती. दुसरं काही केलं तरी लोक बोलायचे. केस कापण्याचं तर नावसुद्धा काढलेलं चालायचं नाही. शोल्डर कट,

बॉब कट, या गोष्टी अजूनही फक्त मोठ्या शहरात चालतात. छोट्या गावात स्त्रीनी केलेला 'बॉयकट' अजूनही मान्य नाही. शहरातदेखील अशा बायकांना 'भुंडी' म्हणतात. शोभा पूर्वी तिच्या कामासाठी बॉबकटमधे वस्त्यांच्यात जायची. त्यात शोभा मंगळसूत्र आणि कुंकू वापरायची नाही. शोभाच्या नेमक्या 'अविवाहित, विवाहित, विधवा, घटस्फोटित, निपुत्रिक, वांझ, अशा 'स्टेटस्'विषयी इतरांना प्रश्न पडायचे.

तुम्हाला माहिती असेल की, न्हावी ही एक स्वतंत्र जात आहे. केस कापणं हे काम खालच्या दर्जाचं मानलं आणि ते न्हाव्यानीच केलं पाहिजे असं ठरवलं. त्यामुळे पूर्वीचे अनेक लोकं ते काम स्वतः करायचे नाहीत. श्रीमंत लोकांकडे रोज न्हावी जायचा. मध्यमवर्गीय ब्राह्मणाकडे मधूनमधून जायचा. मधल्या काळात अर्धवट वाढलेले दाढीचे खुंट दिसले तरी चालतील पण स्वतः वस्तऱ्याला हात लावायचा नाही. इतका कर्मठपणा करणारे आता कमी लोक शिल्लक आहेत.

मी स्वतः गेली 48 वर्षं स्वतःचे केस आरशात बघून स्वतः कापतो. काही म्हणजे काही कधी अडलं नाही.

पूर्वी स्त्रियांचा आणि न्हाव्याचा संबंध फक्त विधवेचे केस कापून तिला विद्रूप करण्यापुरताच असायचा. सध्या स्त्रियांची ब्यूटी पार्लर्स ही शहरात आणि ग्रामीण भागातही अत्यावश्यक गरज म्हणजेच नवी रूढी बनायला लागली आहे.

●

9) हिंसा-अहिंसा

अनेक जाती-जमातींच्यात विशिष्ट दिवशी रेड्याचा बळी, बोकडाचा बळी अशा प्रथा अजूनही आहेत. कायद्यानी खरं म्हणजे त्याला बंदी आहे. पण भारतातला कायदा पाळण्याची यंत्रणाच अनेक चुकीच्या रूढी पाळणाऱ्यांनी भरलेली आहे. त्याचं काय? त्यामागचं मूळ तत्त्व अहिंसा हे सगळ्यांना माहीत आहे. पण उपयोग शून्य.

कायदा करणारे, न्याय देणारे न्यायाधीश, वकील, न्यायाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणारे पोलीस हे स्वतः त्याच्या खाजगी, सामाजिक आयुष्यात कसे वागत असतील? ते लोकांची मान कापत नाहीत, पण कोणाचाही मान ठेवत नाहीत. त्याचं काय?

एका बाजूला बळी देण्याच्या हिंसक रूढी दिसतात तर दुसऱ्या बाजूला अहिंसा पाळण्यासाठी तोंडाला फडकं बांधून गावोगावी हिंडणारे जैन साधू आणि साध्वी दिसतात. हवेतले जंतू मरतात या कल्पनेपायी हे फडकं असतं. त्यांनी जंतू, सूक्ष्मजंतू या विषयाचा थोडा जरी अभ्यास केला तरी त्यांची तोंडं फडक्याऐवजी ज्ञानानी बंद होतील.

आणि तरी मला वाटतं की, हिंसेच्या प्रथांपेक्षा अहिंसेबद्दलच्या प्रथा निरर्थक असल्या तरी अपायकारक नाहीत. कोणाला तोंडावर फडकं बांधायचं असलं तर बांधू देत.

●

10)) नमस्कारासंबंधी रूढी

ज्याच्याविषयी आपल्याला आदर वाटतो तो आदर वाटण्याविषयी काही मतभेद नाही. तो आदर व्यक्त करण्यामधे मात्र माझ्या दृष्टीनी चुकीच्या रूढी घुसलेल्या आहेत.

वयानी मोठ्या असलेल्या माणसाला वाकून नमस्कार करण्याचीही रूढीच आहे. त्यात मला काही अर्थ वाटत नाही. अमुक माणूस आपल्यापेक्षा मोठा का छोटा, हे तर्कानीच ठरवावं लागतं. मी माझ्या तरुणपणी माझ्या खऱ्या वयापेक्षा मोठा दिसायचो. मध्यमवयीन असताना खऱ्या वयापेक्षा लहान दिसायचो. आता म्हातारा झालेलो असताना दोन्ही प्रकारचे घोटाळे सारखे होत असतात. मी बहात्तर वर्षांचा आहे, तर बहात्तर वर्षांचाच साधारणपणी वाटतो. मी माझे विचार बोलायला लागलो की, तरुणांपेक्षाही जास्त आधुनिक असल्यामुळे काही वर्षं लहान वाटतो. माझ्या हालचाली चपळ असल्यामुळे त्याही बाबतीत जरा लहान वाटतो. माझा पोषाख बघून मात्र मी खऱ्या वयापेक्षा मोठा वाटतो.

शोभाचीही वयाची गंमतच आहे. ती 69 वर्षांची आहे पण तिचा चेहरा, बरेचसे काळे केस, यामुळे गरवारे बालभवनच्या टेबलामागे बसलेली असताना ती बरीच लहान वाटते. शिवाय ती आधुनिक विचारांचीही आहे. ती उठून चालायला लागली की, खऱ्या वयापेक्षा मोठी वाटते. पंधरा वर्षांचा मधुमेह असल्यामुळे ते परिणाम हालचालींवर होतातच.

मी विचार करून ठरवलं आहे की, मी कोणाला वाकून नमस्कार करत नाही आणि करवून घेत नाही. शोभा या बाबतीत आणि एकूणच माझ्याएवढी आग्रही नाही. माझ्या दृष्टीनी बघितलं तर वाकून नमस्कार ज्या व्यक्तीला करायचा त्याचं नातं, लायकी, वय, सगळ्याचा विचार केला तर अशी व्यक्तीच सापडत नाही. निव्वळ वयाचा विचार करायला मी तयार नाही. माणूस वयानी मोठा का छोटा हा प्रश्न मुख्य असला तर कोणी कोणाला नमस्कार करायचा ते आधी जन्मतारीख विचारूनच ठरवायला लागेल. कारण मोठ्यानी छोट्या माणसाला नमस्कार करणं रूढीत बसत नाही.

आणखी एका मूलतत्त्वाचं मला महत्त्व वाटतं. ते म्हणजे ‘जो नियम

दुसऱ्याला तोच नियम स्वतःला.' त्या तत्त्वाचं पालन करायचं तर दोन्ही व्यक्तींनी एकमेकांना वाकून नमस्कार करायला हवा. या धडपडीत दोघांचं डोकं आपटण्याची शक्यताच जास्त वाटते.

मी ज्यांच्याज्यांच्याशी याविषयी बोललोय, त्यांच्यापैकी एवढा विचार कोणी केलेलाच नव्हता. बऱ्याच लोकांचा विचार करायलाही नकार होता. सर्वांत जास्त लोकं अशी होती की ती म्हणत होती, 'नमस्कार केल्यामुळे आपलं शरीर काही झिजत नाही, समोरचा खूष होतो. त्यामुळे झाला तर फायदाच होईल, नुकसान नक्की नाही.' फारच थोडे लोक आग्रहानी नमस्कार करणारच असं कारणासकट म्हणत होती. बहुतेक सगळी ज्येष्ठ मंडळी वाकून नमस्कार केला की बाकी सगळ्या इतर गोष्टी माफ करतात हे मला माहिती आहे. माझ्या मते असा नमस्कार म्हणजे लाच असते.

भारतातल्या अनेक रूढींपैकी एक म्हणजे भक्ती, आदर या भावनांचं पादत्राणांशी असलेलं वाकडं. देवाला नमस्कार करताना लोक जशा चपला काढून मग नमस्कार करतात त्याचप्रकारे वडीलधाऱ्या व्यक्तीला पायातलं काढून वाकून नमस्कार करण्याची रूढी पक्की आहे. नमस्कार करणाऱ्याचे पाय अनवाणी हवेत आणि ज्याला नमस्कार करायचा त्यानीही चपला-बूट काढलेले पाहिजेत. मी यातलं काहीच करत नसल्यामुळे मला प्रश्न येत नाही, पण शोभाला येतो. पंधरा वर्षांच्या मधुमेहामुळे शोभा कायम बूट वापरते. ती कुठेच कधी अनवाणी चालत नाही. अडचणच येते. पूर्वी पायमोजे वापरायचे नाहीत त्यामुळे त्याबद्दल रूढी काहीच म्हणत नाही.

ज्ञानाचा आदर मनात असावा. यामधेही काही मतभेद नाही. मी तर ज्ञानमार्गाचाच पुरस्कर्ता आहे आणि ही कार्यशाळा, हा पुस्तकसंच ज्ञानाबद्दलच्या आदरासंबंधीच आहे. प्रथेप्रमाणे चुकून पुस्तकाला, वहीला पाय लागला तर नमस्कार करतात. एखाद्या व्यक्तीला चुकून पाय लागला तरी नमस्कार करतात. या दोन्ही रूढींबद्दल मी फक्त एक गोष्ट नोंदवतो. या रूढीमधली विचारहीनता एवढी आहे की, वर्तमानपत्र या ज्ञानाचं मोठं भांडार असलेल्या वस्तूला लोक नमस्कार नाही करत. उलट त्याचा वाटेल तसा उपयोग करतात. त्यात वस्तू बांधतात, कचरा भरतात, वर्तमानपत्रावर खुशाल पाय देऊन उभे राहतात, वगैरे.

पाय लागला की आठवणीनी नमस्कार करणारा माणूस एरवीच्या आयुष्यात

पायाऐवजी हाताचा वापर करायला म्हणजे मुलांना हातानी बडवायला मागेपुढे बघत नाही. आपण स्पष्ट विचार करू शकलो तर पाय या अवयवाला अशी अपमानाची वागणूक का ते आपण समजू शकतो. पाय आणि चप्पल, बूट म्हणजे अस्वच्छतेशी संबंध आहे. पण रूढीबंधनातल्या विचारसरणीला धुतलेला पायदेखील चालत नाही. कारण स्पष्ट आहे. रूढीला विचार करण्याचं वावडं आहे.

आणखी एक कारण मला दिसतं. हातापेक्षा पायात ताकद जास्त असते. कोणालातरी हातानी मारणं आणि लाथ मारणं यात फरक असतो. लहान मुलांना मारामारी करताना लाथेचा वापर करायचा नाही हे जरूर सांगावं, पण त्याचं खरं कारण जरूर सांगावं.

मी स्वतः कोणालाही माझा चुकून धक्का लागला (मग तो पायाचा, हाताचा, कशाचाही असो) तर तोंडानी माफी जरूर मागतो. पण नमस्कार करत नाही. 'विद्येची देवता' वगैरे विचार माझ्या मनात येत नाहीत. लहान मुलांना काहीच कळत नसल्यानी ते पुस्तकांचं शब्दशः काहीही करतात. पुस्तकं, मासिकं फाडतात, फेकतात. त्यांच्यावर उभी राहतात. त्यावर मुततात. पुस्तकांनी मारामारीही करतात. लहान मुलांना त्याबद्दलच्या अशास्त्रीय दैवी महत्त्वाबद्दल अजिबात सांगू नये असं मला वाटतं. लिहिलेला कागद ही खूप महत्त्वाची गोष्ट असू शकते, एवढीच महत्त्वाची आणि खरी गोष्ट सांगावी. अगदी न कळणाऱ्या लहान मुलांपासून पुस्तकं दूर, उंचावर ठेवणं सर्वांत सोपं.

●

11) सामाजिक कार्यक्रमातल्या रूढी

ज्यांचा धार्मिक कर्मकांडाशी काही संबंध नाही अशाही खूप चालीरीती असतात. कार्यक्रमाला खास पाहुणा, मार्गदर्शक वक्ता म्हणून बोलावलं की त्या व्यक्तीला मानधन देण्याची रूढी आहे. बक्षीस समारंभ, उद्घाटन, संमेलन समारोप अशासाठी बोलावणं असलं की मानधन देत नाहीत. कार्यशाळेला, भाषणाला मानधन देतात. मला हे चूक वाटतं. वक्त्याचं ज्ञान, जाणारा वेळ, होणारे श्रम यात खरं म्हणजे काहीच फरक नसतो. या रूढीतच घोटाळा आहे.

बक्षीस समारंभाच्या कार्यक्रमांना बक्षीसं नेहमी, कुठच्या तरी महत्त्वाच्या व्यक्तीच्या 'हस्ते' अशी रूढी आहे. ती व्यक्ती महत्त्वाची असली तरच लोक जमा होतात हे मला माहिती आहे. पण त्यानंतर त्या खास व्यक्तीचं भाषण असतं. अशा अनेक कार्यक्रमांना मी पूर्वी गेलो आहे. अशी सगळी भाषणं निरर्थक होती अशी माझी खात्री झाल्यावर अशा 'हस्ते' कार्यक्रमांना मी जाईनासा झालो. मी फक्त कार्यशाळांचंच निमंत्रण मान्य करतो.

माझ्या व्यवसायात मी अनेक कामं अविश्वसनीय उत्तम दर्जाची आणि अविश्वसनीय जलद वेगानी पुरी केली. तोच माझा व्यवसाय होता म्हटल्यावर करणारच. माझ्या अशिलांना त्याचा मोठा वाजतगाजत समारंभ करायची इच्छा असायची. सुरुवातीला काही ठिकाणी मी उत्सवमूर्ती म्हणून गेलोही. पण तिथले निरर्थक हारतुरे, निरर्थक भाषणं, मला फेटा घालण्याचा आग्रह, त्याला माझा नकार, या सगळ्याचा मला वैताग आला. मी त्यानंतरही कामं केली. पण उद्घाटन समारंभाला सरळ सांगून नकार दिला.

मी अनेक कार्यक्रमांना जातो, वक्ता असतो, प्रमुख पाहुणा असतो. संयोजक दीपप्रज्वलनाचा घाट घालतात, मी त्याला नकार देतो. समजावून सांगतो की, अशा निरर्थक रूढींमधे मी सहभागी होत नाही. मी पुष्पगुच्छच काय एक फूलदेखील स्वीकारत नाही. मला ते निरर्थकच नाही तर कृत्रिम आणि पर्यावरणाला हानीकारक वाटतं. मी नारळ, शाल, इतर कुठहीची भेटवस्तू स्वीकारत नाही. तसं आधी सांगतो म्हणजे संयोजकांना आयत्या वेळी धक्का बसत नाही.

रोप लावलेली माती भरलेली कुंडीही मला योग्य वाटत नाही. बहुतेक वेळा

त्या रोपासाठी योग्य जागा त्या व्यक्तीच्या घरात नसते. थोडक्यात पाहुण्यांच्या हातून एक रोप मारण्याचा तो उद्योग ठरतो. आणि हे सगळं कशासाठी? तर व्यासपीठावर लोकांच्या देखत काहीतरी वस्तू पाहुण्याच्या हातात देण्याचं रूढीचं बंधन वाटतं म्हणून.

मला आतापर्यंत अनेकांनी कार्यक्रमानंतर खाजगीत भेटून सांगितलंय की त्यांनाही अशा कृत्रिम, निरर्थक रूढी पसंत नाहीत. पण नकार देण्याइतकी हिंमत त्यांच्याकडे नाही. नाही म्हणायचा त्यांचा धीरच होत नाही.

●

12) रूढीमधले झालेले आणि करण्याजोगे बदल

खरं सांगायचं तर 25-30 वर्षांपूर्वीची जगाची, भारताची पर्यावरण हानीची अवस्था लक्षात घेतली तर अनेक गोष्टी खूप सुंदर होत्या, त्यात एक गोष्ट म्हणजे रांगोळी होती. मी वृत्तीनी आणि कौशल्यानी चित्रवेडा चित्रकार असल्यानी मी लहानपणी खूप रांगोळ्या काढायचो. नावीन्याची आवड आणि मुळातली प्रतिभा, कल्पकता यामुळे मला सरळधोपटपणी काढलेली ठिपक्यांची रांगोळी आवडायची नाही. माझा दुसरा आक्षेप होता तो अशाबद्दल की ती मेहेनतीनी काढलेली रांगोळी टिकत नाही. लोकं ती तुडवतात. त्यामुळे मी पाटावर रांगोळी काढायचो आणि पाट हवा तसा हलवायचो. ठिपके न वापरल्यामुळे मला हवं ते चित्र मी काढायचो. पण रांगोळीनी.

गेल्या पंधरा वर्षात पर्यावरण शास्त्राविषयी जरा जास्त माहिती मिळाली. रांगोळी बनवण्याच्या प्रक्रियेत वाया जाणारी ऊर्जा, रांगोळी हा मूळचा टणक दगड असल्यामुळे त्याचं विघटन होत नाही ही अडचण मला महत्त्वाची वाटायला लागली. गेल्या काही वर्षात रांगोळीचा नवा प्रकार रूढ झाला. मुठीमुठींनी काढलेली रांगोळी. त्यात कलात्मकता अजिबात नाही. यामुळे होणारी पर्यावरण हानी मला खूप टोचायला लागली.

घरात जुन्या निवडक, शोभिवंत वस्तू शोकेसमधे किंवा दिवाणखान्यात दिसेल अशा ठिकाणी ठेवण्याची आधुनिक रूढी आहे. त्यांना अँटिक क्राफ्ट आयटेम्स किंवा अँटिक फर्निचर म्हणतात. नेहमीच्या वस्तूंपेक्षा अशा वस्तू जास्त महाग असतात. कारण त्या जुन्या काळापासून कोणीतरी जतन करून ठेवलेल्या असतात. अशा अँटिक गोष्टींचा बाजार मात्र पार बिघडलेला आहे. खरी जुनी अस्सल ऐतिहासिक महत्त्व असलेली वस्तू आणि खोटी नक्कल यातला फरक कळण्यासाठी त्यातली तज्ज्ञ माणसंच लागतात. आपण तर सहज उल्लू बनू शकतो. एकदा एका गिऱ्हाईकाला पाचशे वर्षांपूर्वीची खास वस्तू पाहिजे होती. जी समोर होती ती चारशे वर्षांपूर्वीच्या पद्धतीची होती. दुकानदार म्हणाला, ‘काही अडचण नाही साहेब, आमच्या कारखान्यात तुम्हाला हवी तशी पाचशे वर्षापूवीची वस्तू आठ-दहा दिवसात बनवून मिळेल ना!

कुठच्या सणाचं महत्त्व जास्त आणि कुठच्या सणाचं कमी हे कोण कसं ठरवतं, हे मला समजत नाही. माझ्या लहानपणी पुण्यात नवरात्रीचं महत्त्व अगदी कमी होतं. गेल्या काही वर्षात ते खूप वाढलं. पूर्वी गुढी पाडव्याचं खूप महत्त्व होतं, आता ते तुलनेनी कमी झालं. नवरात्रीबद्दल माझा अंदाज असा की, पूर्वीचं पुणं थेट मराठी भाषिकांचं होतं. मग हळूहळू अ-मराठी लोक वाढले. त्यांनी नवरात्रीला खूप महत्त्व द्यायला सुरुवात केली. दसरा सणदेखील हळूहळू कमी महत्त्वाचा झाला.

रूढी-परंपरेमधे असे बदल सतत होत असतात. ही मात्र अभ्यासण्याची गोष्ट आहे. उपयोगी आणि चांगले बदल होत असले तर ते चांगलंच आहे. चांगले बदल मात्र फार क्वचित आढळतात.

●

13) पाप-पुण्य, मृत्यूसंबंधीच्या रूढी

खास करून भारतात पाप-पुण्याविषयी खूप गमतीशीर गोष्टी बघायला मिळतात. पुण्य मिळवण्याच्या कल्पनादेखील निरर्थकच असतात. त्यातल्या काही दुसऱ्यांना उपद्रव देणाऱ्याही असतात.

मी जिथे राहतो तिथे दोन निरनिराळ्या दुकानदारांबद्दल आसपासच्या अनेकांच्या तक्रारी असतात. पण ते दुकानदार तक्रारींकडे लक्ष देत नाहीत. कारण त्यांना पुण्य मिळतं अशी त्यांची कल्पना पक्की असते.

एक दुकानदार रोज सकाळी दुकानासमोरच्या फरशीवर धान्याचे भरपूर दाणे टाकतात. ते दाणे वेचायला इतके पारवे येतात की, गिऱ्हाईकांना त्या दुकानापर्यंत पोचता येत नाहीच, पण फूटपाथवरून चालत पलीकडेदेखील जाता येत नाही.

दुसरे एक दुकानदार रोज बेवारशी भटक्या कुत्र्यांना बिस्किटं खायला घालतात. त्यापैकी काही कुत्र्यांना लूत भरलेली असते, एखादं इतर काही आजारानी त्रस्त असतं. काही खूप म्हातारी कुत्री लंगडत येतात. इथे रोज बिस्किटं मिळतात हे माहिती असल्यामुळे कुत्र्यांचा मुक्काम दुकानाच्या दारातच असतो. शेजारचे दुकानदार वैतागलेले असतात. गिऱ्हाईकं घाबरतात. सोसायटीनी, इतर दुकानदारांनी त्यांना सांगून बघितलं, पण उपयोग शून्य. मुख्य म्हणजे कुत्र्यांना बिस्किटं घालू नये असा कायदा नाही.

केवळ माहिती म्हणून सांगतो. विलायतेत म्हणजे इंग्लंड, यूएसए, कॅनडा या देशांच्या शहरात भटकी कुत्री नसतात. कोणाला प्राणी पाळायचा असला तर त्याची अर्ज, नोंद, परवाना, गळ्यात नंबरचा बिल्ला, सगळं करणं कायद्यानी सक्तीचं आहे. त्या पाळलेल्या प्राण्याची संपूर्ण जबाबदारी मालकाला घ्यावीच लागते. काही गडबड झाली तर दंडदेखील भरावा लागतो.

खायच्या प्यायच्या वस्तू विकणारी दुकानंही दिसतात. बनवलेल्या चहाचा पहिला एक कप चहा रस्त्यावर ओतून देण्याची प्रथा आहे. अर्थातच त्या कल्पनेत काही दम नाही. आपलं नशीब एवढंच की, दुकानात बनलेल्या प्रत्येक पदार्थाची पहिली बशी रस्त्यावर टाकत नाहीत.

अनेक निरर्थक रूढी असतात. त्यापैकी एक मृत्यूसंबंधी आहे. प्रत्यक्षात माझा असा निर्णय आहे की, मृत्यूबद्दलच्या कुठच्याही कर्मकांडांच्यात मी भाग घेत नाही. मला ते पटत नाही. याविषयी सविस्तर चर्चा स्वतंत्र प्रकरणात सापडेल. पण सध्या त्यासंबंधीच्या रूढींविषयी बोलूया.

माणूस गेलं की, स्मशानात त्याला जाळण्याची रीत आहे. दुसरा पर्याय असतो विद्युतदाहिनीचा. पर्यावरणाचा विचार केला की दोन्ही पद्धती वाईटच. एक लाकडाच्या वापरामुळे आणि दुसरी विजेच्या प्रचंड वापरामुळे.

आता मी जे सांगतोय ते हिंदूंच्या भावना दुखावणारं आहे हे मी मान्य करतो. पण खरा योग्य उपाय की जो पर्यावरण हानी करणार नाही तो म्हणजे त्या व्यक्तीला जमिनीत पुरणं. निर्मनुष्य जंगलात खड्डा खणून पुरलं तर जास्त चांगलं. खड्डा खणणं समजा नाही जमलं तर प्रेत झाडीत ठेवून द्यावं. तर्कबुद्धीनी मी म्हणतोय ते सगळं पटेल, पण भावनेला मान्य होणं कठीण आहे. त्याचं कारण 'अंत्यसंस्कार' या कल्पनेत माणसं फार गाडलेली असल्यामुळे त्यांना गाडणं पसंत पडत नाही.

आणखी काही मृत्यूसंबंधीच्या निरर्थक रूढींचं काय करायचं हाही प्रश्न असतो. मयताचं पौरोहित्य करणारे पुरोहित इतर कामं करत नाहीत तर फक्त तेवढंच काम करतात. त्यांना इतर कामांसाठी लोक बोलवतदेखील नाहीत.

घरातलं कोणी वारलं की फक्त पुरुष गोटा करतात. मिशी मात्र आग्रहानी ठेवलेली असते. ती वडील वारले तरच काढतात. बरेच पुरुष वडील हयात असेपर्यंत बारीक काडीएवढी का होईना मिशी ठेवतातच.

मृत्यूनंतरचे दिवस मोजून दहावा दिवस, बारावा दिवस साजरा करण्याची रूढीदेखील अजून बऱ्याच प्रमाणात पाळली जाते. वर्षश्राद्धंदेखील घरोघरी चालू असतात.

आमच्या ओळखीचे एक संस्कृती अभ्यासक आहेत. त्यांच्या मते सर्वपित्री अमावास्येला सगळ्या मेलेल्या लोकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समारंभ करायचा असतो. त्याशिवाय सामान्य जनतेच्या लक्षात ती कृतज्ञतेची भावना लक्षात येत नाही. आणि त्यांना आठवणही राहत नाही. निरक्षरांचं प्रमाण बघितलं तर या कल्पनेत तथ्य वाटतं, पण निरक्षरांपुरतं.

आणखी एक रूढी मला माहिती आहे. आई किंवा वडील वारल्यापासून एक वर्षाच्या आत अविवाहित मुलांनी लग्न करून टाकावं. माझा या रूढीबद्दल

आक्षेप एवढाच की, एवढ्या काळात परिचयोत्तर विवाह योग्य पद्धतीनी होणं जवळजवळ अशक्य असल्यामुळे ही रूढी पाळणाऱ्या कुटुंबात घाईनी लग्नं ठरतात आणि होतात.

पितृपंधरवडा म्हणजे तर कहर आहे. व्यवसायामधे काम न करण्यासाठी, पैसे न देण्यासाठी ही सबब सर्रास वापरली जाते. पितृपंधरवडा म्हणजे अशुभ काळ असं ज्या महाभागांनी प्रथम सांगितलं त्यांची कमाल वाटते. एखाद दुसरा दिवस अशुभ असं उठवलं तर लोक मानण्याची शक्यता खूप असते. मी असं करणार नाही, पण उदाहरण म्हणून सांगतो. मी एखादा दिवस अशुभ ठरवून त्या कल्पनेच्या प्रसाराला सुरुवात केली तर वर्षभरात तो दिवस अशुभ मानणारी हजारो लोकं असतील. पण पंधरवडा अशुभ हे लोकांच्यात पसरवणं म्हणजे मार्केटिंग स्किलची लिमिट आहे.

आमच्या नात्यात काही महिन्यांपूर्वी एक गृहस्थ वारले. मी अंत्यसंस्कारांना जाण्याचा प्रश्नच नव्हता. माझ्या त्यावर विश्वास नाही आणि मी निर्भीडपणे हेच कारण सांगून जायला नकार देतो. शोभा कधीकधी जाते तशी या खेपेला गेली नाही. सर्वांत आश्चर्य म्हणजे त्या गृहस्थांची सख्खी मोठी बहीणदेखील अंत्यसंस्काराला गेली नाही. निरर्थक रूढी पाळणाऱ्या आपल्या समाजात किंचित बदल व्हायला लागला आहे की काय अशी मधूनच शंका येते ती असं उदाहरण बघून. मला स्वतःला असं वाटतं की, अंत्यसंस्कारासाठी निदान बाहेर गावाहून प्रवास करून जायचं नाही ही पायरी समाजानी गाठली तरी खूप झालं.

आपण टी.व्ही.वर दृश्य बघतो ना, की मेलेला माणूस पांढऱ्या चादरीखाली मधे ठेवलेला असतो आणि भोवताली अनेक स्त्री-पुरुष पांढरी वस्त्रं घालून बसलेली आहेत, ते लोकांनी फारच मनावर घेतलेलं आहे. अनेक लोक अशा प्रसंगी घालण्यासाठी ठेवणीतला पांढरा पोशाख घरी तयारच ठेवतात. घरातल्या प्रत्येक व्यक्तीजवळ एक सेट कमीतकमी असतोच. ते विशिष्ट पांढरे कपडे एरवी कधी वापरायचे नसतात, अशीही रूढी आहे.

याखेरीज मृत्यूसंबंधी अनेक कर्मकांडं आहेतच. हार घालणं, चार पुरुषांनी खांदा देणंदेखील. मडकं हातात घेऊन फेऱ्या मारून शेवटी ते फोडणं, अंत्यदर्शनासाठी रांगा लावणं, या रूढी कॅमेऱ्यात टिपण्याजोग्या असल्यामुळे टी.व्ही., सिनेमा याचं अतिशयोक्त स्वरूप दाखवतात आणि असं करायलाच लागतं अशी रूढी आणखी पक्की होते.

श्राद्धाच्या दिवशी तांदुळाची खीर करतात अशी रूढी असते. त्यामुळे ती एरवी करायची नाही, अशीही रूढी आहे. खरं म्हणजे ती खीर छान लागते आणि करायला सोपी असते. आमच्या घरी आम्ही अनेक वेळा करतो बाबा.

स्मशानात प्रेताभोवती गोल फिरतात. त्यामुळे मुलांना कोणाभोवती गोल फिरायचं नाही असं सांगतात. इतर रूढी पाळत नाही तशी आमच्या घरात हीही रूढी आम्ही पाळत नाही. नातवंडांसाठी खाली सतरंजीवर गाद्या घातल्या की, दोघंही नातवंडं मला मधे बसवून माझ्याभोवती गोल फिरण्याचा खेळ खेळतात. आम्हा सगळ्यांना फार मजा येते.

कोणीतरी मेल्याचं कळलं की एरवी अबोल, आपणहून काही न बोलणाऱ्यांच्या, करणाऱ्यांच्या कृतीला एकदम झटका येतो. ते अनेकांना अमुक व्यक्ती गेल्याचा फोन करतात. भलभलत्या वेळेला लोकांना जाऊन बातमी सांगतात. अपेक्षा अशी की, त्या व्यक्तीनी अंत्ययात्रेला, स्मशानात ताबडतोब सगळी कामं टाकून जावं. काही दिवसांनी कोणी फोन केला तर अशी अपेक्षा असते की समाचाराला जावं. हे सगळं त्या माणसाच्या मनावर असलेल्या रूढीच्या बंधनामुळे होतं. अशा समाचाराला गेलं की, चहापाणी करायचं नाही हीपण रीत आहेच.

देहदान ही गोष्ट भारतीय रूढींच्यात न बसणारी आहे. तरीही देहदानाचा फॉर्म भरून ठेवणारांचं थोडं प्रमाण शहरात आहे. ग्रामीण भागात मात्र अनेकांना याची कल्पनाही नसते.

●

14) कुटुंबकारणातल्या आणि सामाजिक अधिकाराच्या रूढी

आमच्या मुलाची लहानपणची एक गोष्ट सांगतो. आमचा मुलगा लहान असताना कुठचीतरी शाळेमधली प्रार्थना घरात म्हणून दाखवायचा आणि ती शाळेत अशी शिकवली आहे असं सांगायचा. ती सगळी प्रार्थना म्हणताना तो दोन्ही डोळे मिटायचा आणि त्यानंतर थोड्याच वेळात एकदा डावा डोळा उघडायचा, मग तो बंद करून उजवा डोळा उघडायचा. त्याला विचारलं 'असं का करतोस? तुझ्या डोळ्याला काही होतंय का?' तर म्हणायचा, 'नाही. पण बाई असं करतात.' उत्सुकता म्हणून शाळेत जाऊन बघितलं आणि सगळं काही लक्षात आलं. मुलांना डोळे बंद करायला सांगायचे आणि मुलं तसं करत आहेत की नाही असं बघायला बाईंना मधूनच डावा, मधूनच उजवा डोळा उघडायला लागायचा. रीत ही गोष्ट अशी असते. 'का' हा प्रश्न कधी विचारायचा नसतो. आणि त्यातल्या त्यात मोठा, अनुकरण करण्याजोगा माणूस जे करेल ते विचार न करता करायचं असतं.

ज्येष्ठांचं मुख्य म्हणणं एकच असतं. पिढ्यान् पिढ्या, हजारो वर्षं चालत असलेल्या रूढी चूक कशा असतील? प्रत्यक्षात ते कालबाह्य आहे. आजच्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी लागू नाही. ही आईवडलांची शिकवणी, आजीआजोबा, काकाकाकू यांची शिकवणी घरातला तरुण सत्यशोधक घेऊ शकत नाही. याचा अर्थ घरात लोकशाही नाही, संवाद, विचारस्वातंत्र्य नाही. ज्येष्ठ शिकायला तयार नाहीत. त्यांना हे शिकायला तयार नसण्याचे अधिकार कुटुंबानी आणि समाजानी रूढीमुळे दिलेले आहेत.

●

15) काय बदल करता येतील?

निरनिराळ्या प्रकारची राजकीय पदं स्वीकारताना लोक शपथ घेतात ही गोष्ट जगभर चालते. माझ्या दृष्टीनी ते निरर्थक कर्मकांड आहे. त्या शपथेच्या मजकुराचा कायदेशीर कागद बनवून त्याखाली त्या व्यक्तीनी सही करावी, इतरांनी साक्षीदार म्हणून सही करावी आणि त्या दस्ताच्या प्रती जनतेला वाटाव्यात. या पद्धतीमुळे ती व्यक्ती शपथेच्या मजकुराप्रमाणे वागली नाही तर सर्वसामान्य माणूस मंत्र्यावरदेखील खटला भरू शकेल अशी सोय असली तर जरा कोणीतरी लक्ष देण्याची शक्यता आहे. एरवी राज्यकर्त्यांच्या कुठच्याही शपथेवर आपला अजिबात विश्वास नाही.

कर्मकांडविरोधी, नास्तिकांची संघटना करण्याचा अनेकांनी प्रयत्न केला आणि तो फसला. हिंदू, ख्रिश्चन मुस्लिम धर्मसंस्थांकडे पैशाची आणि हिंसेचीही ताकद आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे खुनी सापडू शकत नाहीत याचाही काही अर्थ होतोच ना! नास्तिक एकमेकांशी भांडतात हेही खरं आहे. पण ते असा प्रकार करत नाहीत.

या सगळ्या रूढी आणि परंपरांवरचा विश्वास-अविश्वास, पटणं-न पटणं, करणं-न करणं, ऐकणं-न ऐकणं प्रकरणात नवरा-बायकोचं नातं लग्नानंतर हळूहळू सुधारतं किंवा बिघडत जातं. शेवटी दोन निराळ्या कुटुंबाची सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेली दोन माणसं ती. निराळी असणारच. दोघांना मिळून मिश्र संस्कृती घडवायची असते. माझ्या आजी-आजोबांच्या काळात त्या मिश्रसंस्कृतीचा रंग फक्त पुरुषाचा असायचा. माझ्या आईवडलांच्या पिढीत स्त्रीचा रंग त्यात थोड्या प्रमाणात मिसळायला लागला. मी आणि शोभा यांच्यात मात्र खरोखर निळा + पिवळा = हिरवा संस्कृतिरंग झाला.

कौटुंबिक विसंवाद यासंबंधी आपण स्वतंत्रपणी एका प्रकरणात बोलणार आहोतच. आता याविषयी आणखी सांगत नाही. नवरा-बायको या दोन स्वयंपूर्ण सज्ञान व्यक्ती असतात. त्यामुळे विसंवादात का होईना त्या आयुष्य पुढे नेतात. बिचाऱ्या लहान मुलांचं मात्र फार कठीण असतं. लहान मुलं पार गोंधळून जातात आणि अस्वस्थ होतात. मी आणि शोभा फार वर्षांपासून पालक शिक्षणाचं काम

करतो. शोभा तर पालक विद्यापीठची प्रमुखच आहे. त्यामधे निरनिराळ्या संस्कारांचं मुलांशी वागताना काय करायचं, रूढींचं, देवधर्माचं, मुलांशी वागताना काय धोरण ठेवायचं हा विषय नेहमी निघतो. एका महत्त्वाच्या गोष्टीचा इथे उल्लेख करून इथे थांबतो. पालक शिक्षणाविषयी आपण स्वतंत्रपणी बोलू. मुलं उपजत बुद्धीनी आणि कुतूहलानी आपल्याकडे सतत बघत असतात. आपण वागू ते मुलं उचलणार, त्यांना मुद्दामून घडवू नये. याला आम्ही 'असंस्कार' असं मानतो. त्या 'असंस्कारा'चा जास्त विचार करावा. '

जीवनसाथच्या गटचर्चेत आणि वैयक्तिक समुपदेशनात लोक मला नेहमी विचारतात की त्यांना कर्मकांड, रूढिप्रियता सोडायची आहे. सकस, अस्सल ताकदवान विचार करण्याचं धाडस अंगी यावं अशी त्यांची इच्छा आहे. त्यासाठी काय करायला हवं? माझ्या माहितीप्रमाणे जीवनसाथमधे जेवढी जीवनकौशल्यं आणि त्यासाठी जरूर असलेले स्पष्ट विचार मी मांडतो, ते सगळे विषय एकत्र एके ठिकाणी कुठेच मांडलेले नाहीत. वाचायची असली तर साधारण शंभर पुस्तकं वाचावी लागतील. सरासरी पाचशे पानी एक पुस्तक म्हटलं तरी 50,000 पानांचा हा अभ्यास होईल.

पुढे काहीजण विचारतात की आमचं सगळंच आयुष्य सणवार, व्रतं, उत्सव यांनी भरलेलं आहे. त्यातून बाहेर कसं पडता येईल? या प्रश्नाचं एकच उत्तर आहे. टप्प्याटप्प्यानी, घरात जाहीर करून दरवर्षी एक सण कटाप करत जायचा. इतरांना सवय झाली, स्वतःला स्वतःबद्दल आत्मविश्वास आला की, जास्त वेगानी एकएक सण, व्रत, कर्मकांड कटाप करत जायचं. या पद्धतीनी वागल्यावर छान वाटेल. अभिमान वाटेल. इतपत जमलं तर पुढचा प्रवास फार सोपा आहे. झपाट्यानी वाट सरेल.

एखाद्यानी विचार करून रूढींमधून हळूहळू मुक्त व्हायचं ठरवलं तर काही काळ आयुष्यात तात्पुरती पोकळी जाणवेल. ती लवकरात लवकर चांगल्या, समाजोपयोगी, आधुनिक गोष्टींनी भरण्याचा मात्र प्रयत्न करायला हवा. नाहीतर पोकळीचा त्रास होईल आणि पुन्हा कर्मकांडाकडे वळावं लागेल.

रूढी या विषयाचा अभ्यास करताना काही थोर लोकांच्या इतिहासातल्या विधानांची मला आठवण करून द्यायचीय. 'सनातन रूढींच्या जबरदस्तीखाली भारतीय लोक ढापण लावलेल्या बैलाप्रमाणे त्या चक्रात चालत राहतात' असं लोकहितवादी म्हणजे देशमुख म्हणायचे. ज्योतिबा फुलेंनीदेखील समाजाला

बुद्धिवादाची ओळख करून दिली. धर्मातल्या रूढींबद्दल राजा राममोहन रॉय यांनी 'विश्वधर्म' ही कल्पना मांडली होती. अशा गोष्टींचा पुन्हा नव्यानी विचार व्हायला हवा आहे.

एवढ्या जबरदस्त कामांचा आपल्याला पार विसर पडलेला मला दिसतो. या परिस्थितीचं कारण मला तत्त्वज्ञानात, मानसशास्त्रात आणि व्यवस्थापनशास्त्रात एकच दिसतं. स्वतंत्र विचारांची क्षमता असलेली माणसं हजारात एक एवढीच असतात.

●●●

9

आधुनिक –पारंपरिक म्हणजे नेमकं काय?

1) या लेखामागची कल्पना

मी स्वतः आधुनिकतेचा आग्रह धरणारा आणि सतत प्रत्येक कृत्यामधली आधुनिकता शोधणारा आहे. त्यामुळे अस्सल आधुनिक विचारातली पहिली गोष्ट प्रथमच सांगतो. कुठच्याही मी केलेल्या विधानाबद्दल बिनधास्तपणी शंका विचारा. त्यामुळे, मतभेदामुळे माझा अपमान होत नाही, मला वाईट वाटत नाही. शंका न विचारता मुकाटपणी ऐकून घेणं ही पारंपरिकता आहे. परंपरेतलं मुख्य सूत्र असतं 'चुप बसा.'

आधुनिक म्हणजे काय याच्या अनेक व्याख्या आत्तापर्यंत अनेकांनी केल्या आहेत, पण मला सर्वांत पटलेली व्याख्या अशी आहे–

'सध्याच्या आपल्या आसपासच्या जगामधे सुधारणा करण्यासाठी खरं उपयोगी काय आहे, याचा अखंड शोध चालू असणं आणि त्याकरता आवश्यक आणि शक्य तेवढ्या सगळ्या गोष्टी करून बघण्याचा सतत प्रयत्न करणं.' अशी वागणूक म्हणजे आधुनिकता.

हा विषय कशा पद्धतीनी मांडावा याबद्दल मी केलेला विचार असा. भाषा, गणित शिकवताना जसा तो निरनिराळ्या पद्धतीनी आणि क्रमानी उपयोगात आणण्यासाठी रचना करतात तसंच अभ्यास मंडळातल्या कार्यशाळेत व्हावं असं मला वाटतं. माझ्या दृष्टीनी आधुनिक बनण्याला पर्यायच नाही. पण ते आधुनिकता म्हणजे काय समजलं तरच शक्य आहे. म्हणून हा सगळा प्रयत्न.

विवाह शिक्षणाच्या अभ्यासक्रमातले सगळे विषय एकमेकांशी संबंधित असल्यामुळे एकमेकांत मिसळलेले आहेत हे आपण आधी बोललोच आहोत. त्यातही काही विषय सर्वव्यापी आणि त्यामुळे जास्त गोंधळाचे आहेत. अशा सगळ्या विषयातही एक विषय सबंध आयुष्यभर धुमाकूळ घालणारा आहे तो म्हणजे संस्कार. बऱ्याच अभ्यासानंतर शोभानी आणि मी काही गोष्टी शोधून काढल्या. त्यापैकी एक महत्त्वाचं निरीक्षण असं की, संपूर्ण भारत देशाची अशी समजूत आहे की पारंपरिक विचारांचा पगडा, त्याचं शिक्षण म्हणजे संस्कार. त्यामुळे या विषयाचे दोन भाग आम्ही पाडले. प्रथम आधुनिक आणि पारंपरिक याबद्दल स्पष्ट विचार होऊ दे आणि मग संस्कारांकडे आपण वळू.

मी आणि शोभा दोघं स्वतःला आधुनिक समजतो. जीवनसाथमधे जमलेल्या एका लग्नाच्या वयाच्या मुलाच्या आई-वडलांना विचारलं. ते स्वतःला आधुनिक मानतात. मग एका लग्नाला उशीर झालेल्या 37 वर्षांच्या मुलीला विचारलं. तीही स्वतःला आधुनिक समजते आणि तिच्या धाकट्या बहिणीचं वर्णन ती ट्रॅडिशनल असं करत होती. एक तरुण मुलगा आई-वडलांना पारंपरिक म्हणत होता, स्वतःला आधुनिक म्हणत होता आणि त्यामुळे घरच्यांशी संवादच अशक्य होतो म्हणत होता. दुसरी एक मुलगी तिची आजी नऊवारी नेसते, पण विचारांनी आधुनिक आहे म्हणत होती. मुद्दा असा आहे की, आधुनिकतेचा आणि पारंपरिकतेचा अर्थ जो तो स्वतःच्या मनाप्रमाणे लावत होता आणि तो अर्थ निराळा निराळा होता. आता या विषयातल्या या विशिष्ट कार्यशाळेचे मुद्दे आणि अशा इतर कार्यशाळांचे मुद्दे एकत्र करून सगळी निरीक्षणं मुद्देसूदपणे मांडतो.

पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे आधुनिकता आणि पारंपरिकता व्यक्तिसापेक्ष आणि काळसापेक्ष आहे. त्या त्या काळातले संदर्भ निराळे आणि त्या त्या व्यक्तीची बघण्याची नजर निराळी. प्रत्येक काळात समाजात एक सनातन वर्ग असतो. पूर्वापारच्या काळापासून चालत आलेल्या कल्पनांना चिकटून राहण्यात समाजाचं हित आहे असं या सनातन लोकांना मनापासून वाटतं. त्याच वेळेला नवीन विचारांचं आकर्षण असलेला आधुनिक वर्गदेखील प्रत्येक काळात समाजामधे असतोच. या दोन्ही वर्गांचा संघर्षही सततच चालू असतो. तो पूर्वी होता, आज आहे आणि भविष्यात देखील चालूच राहणार.

पण त्याची व्याख्या मात्र पक्की आहे, ती अशी. त्या त्या माणसाच्या

आसपासची परिस्थिती लक्षात घेऊन अनेक पर्यायांच्यामधून परिस्थितीला योग्य असं सत्य शोधून ते अमलात आणण्याचा प्रयत्न करत राहणं म्हणजे आधुनिकता. पूर्णपणी आधुनिक असा कोणीही माणूस नसतो आणि पूर्णपणी पारंपरिक असं कोणी नसतं. सगळे लोक पारंपरिक विचारापासून आधुनिक विचारापर्यंतच्या वाटेवरचे प्रवासी असतात. ह्या महत्त्वाच्या गोष्टी न समजल्यामुळे लोकं एकमेकांवर शिक्के मारत सुटतात. तो शिक्का नापसंत असला तर अपमान होतो, विसंवादाला कारण निर्माण होतं. उदाहरणार्थ : मी स्वतःला आधुनिक समजतो, त्याची माझ्या दृष्टिकोनातून काही कारणं असतील. पण मी कॉम्प्युटरचा एवढा वापर करत नाही म्हणून एखादी तरुण व्यक्ती मला 'जुन्या विचारांचा आणि ट्रॅडिशनल' समजली तर तो मला माझा अपमान वाटू शकतो.

सध्या मला ई-मेल बघण्या आणि करण्यापुरताच कॉम्प्युटर वापरता येतो. पण ही माझ्यामधली उणीव मी लवकरच दूर करीन. माझ्या कंबरदुखीच्या त्रासाचा मला बाऊ वाटायचा. पण मी आता योग्य त्या कमरेच्या व्यायामाचं तंत्र शिकून घेतलंय. मानेच्या व्यायामांचा देखील मला फायदा होतो. त्यामुळे नव्याण्णव टक्के ही गोष्ट प्रत्यक्षात मी करू शकीन.

ठिकठिकाणी असे अनेकांचे अनेक अपमान होत असतील. त्यामुळे तर आपण हा विषय अभ्यासाला घेतला आहे. आधुनिकता आणि पारंपरिकतेबद्दलच्या लक्षणांचे आपण सरळ दोन भाग पाडू–

1) इतरांच्या नजरेला दिसणाऱ्या गोष्टी आणि 2) नजरेला न दिसणाऱ्या विचारातल्या गोष्टी.

प्रथम नजरेला दिसणाऱ्या गोष्टींच्यात आपण कुठे बसतो ते ज्यानी त्यानी ठरवावं. वर्णन करताना माझ्या अभ्यासात ज्या गोष्टी पारंपरिक मानल्या जातात त्याचं वर्णन प्रथम आणि प्रवासवर्णनातला शेवटचा टप्पा आधुनिक अशी रचना केली आहे. त्यात थोडी सरमिसळ आहे मात्र. कारण अंतर्विचारांवर बाह्यरूपातली आधुनिकता किंवा पारंपरिकता अवलंबून असते, पण आधी दिसतं ते बाह्यरूप.

या मिसळीला आत्ता तरी काही इलाज दिसत नाहीय. त्यातल्या त्यात मी एवढंच करतोय की, आयुष्यात ज्या क्रमानी साधारणपणी घटना घडतात त्या क्रमानी मुद्यांची रचना करण्याचा प्रयत्न केलाय.

जीवनसाथच्या मिश्रगट चर्चांमधे अनेक वेळा निरनिराळ्या वयाच्या अविवाहित

आणि विवाहित स्त्री-पुरुषांबरोबर चर्चा करून हे मुद्दे काढलेले आहेत. सर्वांत आधुनिक काय हे बहुमतानी ठरलेलं आहे. शक्यतोवर ते प्रत्येक मुद्याच्या शेवटी येईल असा क्रम ठेवलेला आहे.

तुम्ही स्वतः विचारानी त्या यादीत कुठे बसता ते ठरवा. तुमचे घरचे लोक कुठे बसतात तेही ठरवा. एकत्र चर्चा करून संपूर्ण कुटुंबाची सरासरी आधुनिकता आणि पारंपरिकताही बघता येईल.

●

‘सध्याच्या आपल्या आसपासच्या जगामधे सुधारणा करण्यासाठी खरं उपयोगी काय आहे, याचा अखंड शोध चालू असणं आणि त्याकरता आवश्यक आणि शक्य तेवढ्या सगळ्या गोष्टी करून बघण्याचा सतत प्रयत्न करणं.’ अशी वागणूक म्हणजे आधुनिकता.

2) बाह्यरूपातली पारंपरिकता किंवा आधुनिकता

1) तान्ह्या बाळाला पारंपरिक घरात 24 तास टोपडं, झबलं घालून ठेवतात. थंडी असो नाहीतर उन्हाळा असो./आधुनिक घरांच्यात ऋतूप्रमाणे योग्य तसे कपडे तान्ह्या बाळाला घालतात.
2) पारंपरिक घरांच्यात 1-2 वर्षापर्यंतचं बाळ घरात खुशाल नागडं हिंडतं. मुलगा, मुलगी असा फरक करत नाहीत. लहान मूल दिवसभर सारखी शी-शू करणार, हे गृहीत धरलेलं असतं./आधुनिक विचारांच्या अनेक घरात फरशीच्या, कार्पेटच्या स्वच्छतेच्या काळजीनी मूल 24 तास डायपरमधे असतं. खरं म्हणजे लहान मुलाचे हाल चालू असतात. डायपरनी कधीकधी अंग उबतं, कधी पुरळ येतं. डायपर बोचतात. अत्याचार चालू असतात./ साध्या सुती लंगोटाइतकं आधुनिक काही नाही.
3) लहान बाळाला आधुनिकतेच्या कल्पनांमुळे बाजारात मिळणारे तयार जाड किंवा नायलॉनचे कपडे चढवले जातात./प्रत्यक्ष सैलसर सुती झबली हा पोशाख सर्वांत योग्य म्हणजेच आधुनिक मला वाटतो.
4) 5-7 वर्षाच्या मुलाला किंवा मुलीला देखील सधन पालक खोट्या आधुनिकतेच्या कल्पनांमुळे बाजारातले महागडे तयार कपडे आणतात./प्रत्यक्षात साधे सुती कपडे, तेही हवामानाला सोयीचे हाच खरा आधुनिक पोषाख समजावा.
5) परंपरेत मुलाच्या कानात काहीतरी सोन्याचा दागिना घालायचा असतो. त्यासाठी कान टोचतात./आधुनिक घरात कान टोचत नाहीत. मुलांसाठी कुठचेच दागिने खरे म्हणजे योग्य नसतात.
6) शिशू वयात मुलांनी अर्धी चड्डी वापरणं आणि मुलींनी फ्रॉक किंवा स्कर्ट वापरणं अपेक्षित असतं. थंडीच्या काळात मुला-मुलींच्या पायांना निश्चित थंडी वाजते./मुलांनी पायजमा आणि मुलींनी सलवार किंवा ट्रॅक-पँट वापरणं हे आधुनिक आहे.
7) शाळेमधली मुलं-मुली पुस्तकांसाठी नाइलाजानी दप्तर वापरतात. जेव्हा संधी मिळेल तेव्हा दप्तर वापरणं सोडून देतात./प्रत्यक्षात कुठच्यातरी प्रकारची गळ्यात अडकवण्याजोगी पिशवी प्रत्येक कुमार वयातल्या मुला-मुलीकडे

असणं हे कार्यक्षमतेसाठी, वस्तूंची सुरक्षिततेसाठी जास्त उपयोगी, त्यामुळे जास्त आधुनिक आहे.

८) कॉलेजच्या वयात स्त्री-पुरुष आकर्षणाची तीव्रता मनात खूप असते. त्या वयात लैंगिक शिक्षणाचा विषय काढला तरी अभ्यासावर वाईट परिणाम होईल या भीतीनी घरातल्या सगळ्यांनी तो विषय टाळणं हा पारंपरिक विचार आहे./कुठच्या तरी अभ्यास गटात जाऊन लैंगिक शिक्षण घेणं हा आधुनिक विचार आहे.

९) स्त्रीचा पोषाख – नऊवारी साडी/ पाचवारी साडी/बिनबाह्यांचा ब्लाऊज आणि पाचवारी साडी/जरीची साडी/मितपारदर्शक साडी/डिझायनर साडी/ पंजाबी ड्रेस आणि ओढणी/ओढणीशिवाय पंजाबी ड्रेस/बिनबाह्यांचा पंजाबी ड्रेस/पँट टॉप/3/4 पँट + टॉप/ स्कर्ट/फ्रॉक/हिंदी सिनेमामधे अनेक नाचांमधला उत्तान पोषाख (अजून तरी रस्त्यावर असे पोषाख घालून हिंडताना कोणी दिसत नाही.)/मुद्दामून भोकं असलेली जीन पँट वापरणं/ सलवार कमीज ओढणी हा खरा योग्य आणि आधुनिक पोषाख आहे.

परदेशातली आधुनिकता, पारंपरिकता शोधणं हा आपला मूळ उद्देश नाही, तरी पाश्चात्त्य देशातली स्त्रियांच्या पोषाखाची गंमत सांगतो. पाश्चात्त्य स्त्रियांच्यात पारंपरिक स्त्रिया स्कर्ट किंवा फ्रॉक वापरतात. अर्थातच, त्या पाय उघडे टाकतात. थंडी असली तरी पाय दिसले पाहिजेत अशी परंपरा असल्यामुळे नायलॉन स्टॉकिंग्ज घालतात. हे सगळं सांभाळण्यासाठी स्त्रियांनी पायावरचे केस काढण्याची खबरदारी घ्यायची पद्धत निघाली. नंतरच्या काळात रासायनिक क्रीम्स निघाली. ती वापरायची की नाही या हो-नाही मधे काही वर्षं गेली, पण मुळात पाय दिसले पाहिजेत ही परंपरा अनेक वर्षं टिकून आहे.

आधुनिक पाश्चात्त्य स्त्रिया पँट आणि टॉपचा वापर करायला लागल्या. पाश्चात्त्य देशात काही ठिकाणी खूप उकाडा असतो. तिथे तरुण मुली लांडे स्कर्ट, मिनी ड्रेस, हाफ पँट, सगळे प्रकार वापरायला लागल्या. पण एवढ्या 50-60 वर्षांच्या काळात पाश्चात्त्य स्त्रियांनी भारतीय स्त्रियांसारखी पातळ कापडाची सलवार मान्य केलेली नाही.

सलवार कमीज घातलेल्या स्त्रीला पाश्चात्त्य समाज भारतीय किंवा पाकिस्तानी समजतो. 2001 साली झालेल्या कुप्रसिद्ध ट्विन टॉवर्सवरच्या हल्ल्यात हल्ला

करणारे अफगाण लोक होते. ओसामा बिन लादेन अफगाणी असला तरी पाकिस्तानशी त्याचे लागेबांधे होते. पाकिस्तानी बायका सलवार-कमीज वापरतात तशाच भारतीय बायकाही वापरतात. भारतीय बायका साडीही वापरतात. त्याचबरोबर काही देशातल्या मुस्लीम स्त्रिया साडीसारखा वाटणारा झगा वापरतात.

पाश्चात्त्यांना सलवार-कमीज, त्यातली भारतीयांची आणि पाकिस्तान्यांची निराळी पद्धत, ओढणी घेणं न घेण्यातला फरक, साडी, पायघोळ झगा, डोक्यावरचा पदर आणि डोक्यावरून घातलेली काही मुस्लीम जमातीतली कुंची, बुरखा सगळ्यातल्या फरक समजत नाही.

2001 सालच्या दहशतवादी हल्ल्यानंतर काही ठिकाणी अमेरिकन लोकांनी चिडल्यामुळे, घाबरल्यामुळे, भारतीय, पाकिस्तानी स्त्रियांवर हल्ले केले. इतर पुरुष त्यांच्या पँट-शर्ट या पाश्चिमात्य पोषाखामुळे सुटले, पण शीख लोकं त्यांच्या दाढी आणि फेट्यामुळे त्यात सापडले. अफगाणी पुरुषांच्या डोक्यावर त्यांच्या विशिष्ट प्रकारची पगडी आणि दाढी ओसामा बिन लादेनच्या फोटोमुळे अमेरिकन लोकांच्या डोक्यात पक्की बसली होती.

अमेरिकेतल्या अनेक भारतीय स्त्रियांनी घराबाहेर पडताना पँट टॉप घालायला सुरुवात केली, दाढी-मिशीवाल्या पुरुषांनी दाढी-मिशी काढून गुळगुळीत चेहरे केले. या सगळ्या घोटाळ्यांचा आपल्या आधुनिक पारंपरिक विषयाशी असलेला संबंध खूप दूरचा आहे हे मला मान्य आहे, पण तरी हा उल्लेख मला इथे रास्त वाटतो.

10)पुरुषाचा पोषाख – धोतर बंडी उपरणं/लुंगी सदरा/लेंगा झब्बा/सलवार झब्बा/पँट फुलशर्ट/पँट मॅनिला/जीन पँट मॅनिला/जीन पँट टी-शर्ट/पँट टाय जॅकेट/पँट टाय सूट/मुद्दामून भोकं असलेली जीनपँट वापरणं.
ऋतूप्रमाणे पँट-मॅनिला किंवा शर्ट/भारतातलं महाराष्ट्रातलं हवामान लक्षात घेऊन लेंगा झब्बा हा खरा योग्य आधुनिक पोषाख असं सर्वांचं म्हणणं पडलं.

11)स्त्री केशरचना – एक वेणी/अंबाडा/2 वेण्या/पोनी टेल/मोकळे केस/बॉबकट/बॉयकट/स्त्रियांसाठी बॉबकट, तोही परिस्थितीप्रमाणे हेअर बँडच्या साहाय्यानी बांधणं किंवा केस मोकळे सोडणं हे सर्वांत सोयीचं म्हणजे आधुनिक ठरलं.

12)पुरुष केशरचना – गोटा आणि शेंडी/गोटा आणि घेरा/बारीक केस/

डावीकडे भांग/उजवीकडे भांग/उलटे केस/मधे भांग/खांद्यापर्यंत केस/पोनीटेल/डावीकडे किंवा उजवीकडे भांग हे सर्वांत आधुनिक असं ठरलं.

13)स्त्री – उन्हापासून संरक्षण – डोक्यावर पदर/डोक्यावर ओढणी/डोक्याभोवती स्कार्फ/डोक्यावर कॅप/डोक्यावर ब्रिम हॅट./डोक्यावर ओढणी हे सर्वांत सोपं, उपयोगी, त्यामुळे आधुनिक ठरलं.

14)पुरुष – उन्हापासून संरक्षण – घडीची काळी टोपी/पांढरी नेहरू टोपी/डोकं न झाकलेलं बोडकं/डोक्यावर ब्रिमहॅट/डोक्यावर कॅप. डोक्यावरची कॅप आधुनिक ठरली.

15)स्त्री-चेहऱ्यावरचे अलंकार-मेकप – नाकात नथ/कोरडं कुंकू/कानात कुड्या/कपाळावर टिकली/कानात लोंबणारे इयररिंग्ज/कानात दागिना नाही/कपाळावर कुंकू किंवा टिकली काहीच नाही./कपाळावर लहान टिकली, कुंकू आणि कानात छोटे डूल आधुनिक ठरलं./चेहरा सतत नीटनेटका ठेवून किंचित फेसपावडरचा वापर हे सर्वांत आधुनिक असं ठरलं.

पाश्चात्त्य स्त्रियांची आणखी एक गंमत सांगण्याजोगी आहे. ज्येष्ठ, पारंपरिक स्त्रिया चेहऱ्यावर खूप 'हेवी मेकअप' करतात. इतका की त्यांचा मूळचा मेकअपमागचा खरा चेहरा फक्त त्यांनीच स्वतः अंघोळीच्या वेळी बघितलेला असतो. एरवी 24 तास त्या मेकअपमागे चेहरा लपवलेल्याच असतात. लिपस्टिकदेखील लालभडक अशीच परंपरा होती.

नंतरच्या काळात पाश्चात्त्य स्त्रियांच्या मेकअप, लिपस्टिक याबद्दलच्या कल्पना बदलत गेल्या. आधुनिक पाश्चात्त्य स्त्रियाही मेकअप करतात, लिपस्टिक लावतात, पण तो 'लाइट मेकअप' असतो आणि लिपस्टिकही जवळजवळ ओठांच्या रंगाचं गुलाबी किंवा 'स्किन कलर'चं असतं.

16)पुरुष-चेहऱ्यावरचे अलंकार – मोठी दाढी आणि मोठी मिशी/कानात भिकबाळी/छोटी मिशी/गुळगुळीत बिन दाढी-मिशीचा चेहरा./बिन दाढी-मिशीचा रोज दाढी केलेला चेहरा आधुनिक ठरला. कान मोकळे.

17)स्त्रिया – गळ्यातले अलंकार – सोन्याचं मंगळसूत्र, चपलाहार, मोहनमाळ/फक्त हलकं सोन्याचं मंगळसूत्र/नकली मंगळसूत्र/गळ्याभोवती घट्ट बसणारी माळ/गळा मोकळा. हे सर्वांत आधुनिक ठरलं.

18)पुरुष – गळ्यातले अलंकार – गळ्यात सोन्याची माळ/गळ्यात काही नाही.

हे सर्वांत आधुनिक असं ठरलं.

19) स्त्रिया – पादत्राण – पायात काही नाही, अनवाणी/सपाट चपला/प्लॅटफॉर्म चपला/उंच टाचांच्या चपला/मॅचिंग सँडल्स/कॅनव्हास शूज/लेदर शूज/ टोकदार हाय हील सँडल्स/थोडी उंच टाच असलेले सँडल्स सर्वांत आधुनिक ठरले.

20) पुरुष – पादत्राण – खडावा/चढाव/पुणेरी जोडे/चपला/सँडल्स/फ्लोटर्स/ लेदर लेस शूज/इलॅस्टिक मोकॅसिन्स/स्पोर्ट्स शूज/रंगीबेरंगी स्पोर्ट्स शूज/ काळे स्पोर्टस् शूज हे सर्वांत आधुनिक ठरले.

21) स्त्रिया – नशिबानी मिळालेलं रंग, रूप, उंची यावर समाधान मानणं/या गोष्टीसाठी निसर्गोपचारांचा उपयोग/या गोष्टी सुधारण्यासाठी व्यायाम/प्रसाधनं – लिपस्टिक, मेकअप या मार्गानी जाणं/निसर्गोपचार, योग्य आहार आणि व्यायाम यांचं मिश्रण सर्वांत आधुनिक ठरलं.

22) पुरुष – नशिबानी मिळालेलं रंग, रूप, उंची यावर समाधान मानणं/ शरीरसौष्ठव, आरोग्य, ताकद यासाठी व्यायाम करणं/व्यायाम, आरोग्य याकडे दुर्लक्ष करणं/व्यायाम करणाऱ्यांची हेटाळणी करणं/व्यायाम करून शरीरसौष्ठव वाढवणं सर्वांत आधुनिक ठरलं.

23) स्त्री किंवा पुरुष – कलागुणांचा आदर असणं, पण प्रत्यक्ष सिनेमे, नाटकं बेतानी, कमी प्रमाणात बघणं/शास्त्रीय संगीत, नृत्य यांची आवड/संगीत नाटकांना प्रत्यक्ष हजेरी/सिनेमाकडे जास्त कल/नट-नट्या, त्यांचं आयुष्य यात खूप रस असणं/प्रत्यक्ष स्टेज किंवा स्क्रीन यामधे सहभाग./सगळ्या कलांचा आदर, आवड असणं आणि स्वतःचं काम, कुटुंब सांभाळून कार्यक्रमांना जाणं, टी.व्ही., सिनेमा, नाटक, गाण्याचे कार्यक्रम बघणं हे सर्वांत आधुनिक ठरलं.

24) स्त्री किंवा पुरुष – पान, तंबाखू, बिडी, सिगरेट, चिरुट, पाइप, दारू या व्यसनांचा तिरस्कार, निंदा/अशा व्यसनांच्या बाबतीत समजूतदार भूमिका ठेवून वागणं/या व्यसनांबद्दलच्या उत्सुकतेमुळे एकदा आस्वाद घेऊन बघणं/पुरुषांच्या बरोबरीनी पान, तंबाखू, बिडी/सिगरेट/दारू यांचा वापर करणं./अशा सगळ्या व्यसन लावणाऱ्या गोष्टी काय आणि कशा असतात हे समजून घेणं. उत्सुकतेमुळे एकदा आस्वाद घेऊन पूर्ण सोडणं हेच सर्वांत योग्य आणि आधुनिक ठरलं.

25) स्त्री किंवा पुरुष – दारूच्या व्यसनानी वाईट अवस्थेत पोहोचणं/मधून मधून दारू पिणं/क्वचित दारू पिणं/फक्त बिअर पिणं/दारू न पिणं/दारू इतरांना पिऊ न देणं.

भारतात पुरुष बऱ्याच प्रमाणात दारू पितात. स्त्रिया त्या मानानी अगदीच कमी पितात. अनेक पुरुषांना आपण दारू पितो याचा चक्क अभिमान वाटतो. घरातला बार ते हौसेनी इतरांना दाखवतात. स्वतःला समजण्यासाठी दारूचे प्रकार पिऊन बघणं, तरीही स्वतः दारूं न पिणं, पण दुसऱ्याला त्याबद्दल काही सांगायचा प्रयत्न न करणं हे सर्वांत आधुनिक आहे असं ठरलं.

26) स्त्रीला उत्तम स्वयंपाक येणं/जेमतेम स्वयंपाक येणं/स्वयंपाक न येणं/घराबाहेर खाण्याची सवय./उत्तम स्वयंपाक येणं, घरी स्वयंपाक करणं आणि तरी जरुरीच्या प्रसंगी बाहेर खाण्याची तयारी असणं हे आधुनिक असं ठरलं.

27) पुरुषांनी अजिबात स्वयंपाकघरात न येणं/स्वयंपाकात मदतीला तयार, पण स्वतःला येत नसणं/स्वतः स्वयंपाकाची आवड आणि सवय/घराबाहेर खाण्याची आवड आणि सवय.

मला स्वयंपाक येत नाही. पण जरा वेळ मिळाला की मी तो करायला लागीन. शोभाला मला स्वयंपाक शिकवायला वेळ नाही ही अडचण आहे. पण पुस्तकात वाचून सोपे पदार्थ मी करायला लागीन./स्वयंपाक हे केवळ स्त्रीचं क्षेत्र न मानता त्यात कौशल्य मिळवणं हेच सर्वांत योग्य आणि त्यामुळे आधुनिक याबद्दल एकमत झालं.

28) स्त्री किंवा पुरुष – तत्त्वनिष्ठेमुळे कडक शाकाहारी असणं आणि आसपास मांसाहार न खपणं/स्वतः सक्त शाकाहारी असून आसपास मांसाहारी पद्धतीच्या स्वयंपाकाबद्दल आक्षेप नसणं/स्वतः मांसाहारी असणं, पण धार्मिक, रूढींचे रीतिरिवाज पाळणं, विशिष्ट प्राणी खाऊन काही प्राण्यांचं मांस वर्ज्य समजणं/कुठचाही प्राणी वर्ज्य नसणं. त्यासाठी कुठचाही दिवस, वार यांच्या धार्मिक आणि रिवाजाच्या बंधनांना न जुमानणं.

जे लोक मांसाहार करतात ते स्वतःला आधुनिक समजतात. मांसाहारानी कशी शारीरिक ताकद येते, त्याची चव किती चांगली असते, जगात इतर देशात लोक कसे मांसाहार करतात वगैरे गोष्टी सांगतात. कडक शाकाहाऱ्यांना हिणवण्याचाही

प्रयत्न करतात. पण मांसाहार करताना स्वतःच्या परंपरेतल्या कल्पना ते सांभाळतात. थोडक्यात, अशा आधुनिक वागणाऱ्यांच्यातही पारंपरिकता असते.

ते काही विशिष्ट प्राण्यांचंच मांस खातात. मांसाहारासाठी काही विशिष्ट दिवस टाळतात. मांसाहाराच्या निरीक्षणात एकूण सबंध जगभर फक्त शाकाहारी प्राण्यांचंच मांस खातात असं आढळतं./खरं योग्य आणि आधुनिक काय याबद्दल असं ठरलं की, मुख्यतः शाकाहार, पण क्वचित प्रसंगी माफक मांसाहाराची तयारी हेच सर्वांत आधुनिक. मांसाची निवड आवडीप्रमाणे आणि विशिष्ट वारांशी काही संबंध न जोडता हे सर्वांत आधुनिक असं ठरलं.

29) स्त्री किंवा पुरुष – लाकडावर स्वयंपाक/चुलीचा वापर/बिनधुराच्या चुलीचा वापर/गॅस सिलिंडरचा वापर/पाइप गॅसचा वापर/विजेच्या शेगडीचा वापर/मायक्रोवेव्हचा वापर/सूर्यचुलीचा वापर./सूर्यचुलीचा शक्यतोवर वापर आणि ते शक्य नसेल तेव्हा पाइप गॅस किंवा गॅस सिलिंडरचा वापर हे सर्वांत आधुनिक ठरलं.

30) स्त्री किंवा पुरुष – उखळीचा वापर/जात्याचा वापर/पाटा-वरवंटा वापर/खलबत्त्याचा वापर/दाण्याच्या कूटयंत्रासारख्या हातानी चालणाऱ्या यंत्राचा वापर/मिक्सरचा वापर/घरघंटी चक्की वापर/फूड प्रोसेसर वापरणं/घरी काही न कुटता सगळे मसाले, पिठं गिरणीतून दळून आणणं/सगळी पिठं, मसाले यांची प्लॅस्टिकची तयार पाकिटं आणणं./जरुरीप्रमाणे खलबत्ता, हातानी चालवण्याची यंत्रं आणि मिक्सरचा वापर हे सर्वांत योग्य आणि आधुनिक ठरलं.

31) स्त्री किंवा पुरुष – घरी रिठा वापरून हातानी कपडे धुणं/घरी साबण वापरून हातानी कपडे धुणं/घरी डिटर्जंट, रासायनिक पावडर वापरून हातानी कपडे धुणं/धुण्यासाठी मोलकरीण नेमणं/वॉशिंग मशीनचा वापर धुण्यासाठी करून घरी कपडे वाळवणं/घरी वॉशिंग मशीन आणि ड्रायर दोन्ही ठेवून त्याचा स्वतः वापर करणं आणि स्वतः इस्त्री करणं/घरी मशीनमधे कपडे धुवून, वाळवून इस्त्री न करता कपडे वापरणं/घरी मशीनमधे कपडे धुवून, वाळवून इस्त्रीसाठी लाँड्रीत देणं/घरी धुण्याची काही सोय न ठेवता लाँड्रीचाच पूर्ण वापर करणं./साबण किंवा डिटर्जंट पावडर वापरून थोडेथोडे कपडे स्वतः हातानी धुवून, घरी वाळवून आवश्यक तेव्हाच घरी इस्त्री करून वापरणं सर्वांत आधुनिक असं ठरलं. पर्यावरणाची

हानी होते म्हणून कपड्यांना अजिबात इस्त्री न करणारेही काही लोक असतात./साबणाऐवजी रिठ्याचा वापर सर्वात आधुनिक ठरला.

32) स्त्री किंवा पुरुष – कपड्यांसाठी खादीचा वापर/हातमाग + सुती कपड्यांचा वापर/टेरिलिनची कापडं पोषाखासाठी वापरणं/टेरिकॉटच्या कापडाचा वापर. सुती कापडं वापरायला चांगली असली तरी महाग असतात आणि लवकर फाटतात./बऱ्याच चर्चेनंतर टेरिकॉट कपडे सर्वांत आधुनिक असा निर्णय झाला.

33) स्त्री किंवा पुरुष – अंघोळीसाठी साय, बेसन, उटणी, रिठा, माती यांचा वापर/अंगाचा साबण आणि शाम्पू वापरणं/साबण, शाम्पू, रसायनं काहीच न वापरता अंघोळ करणं./खरं सांगायचं तर रोज अंग चोळून व्यवस्थितपणी अंघोळीच्या वेळी साफ केलं तर साबणाची गरज क्वचितच पडते. असं करणं हेच सर्वांत आधुनिक आहे असं ठरलं.

34) स्त्री किंवा पुरुष – दिवसातून एकदा-दोनदा अंघोळ/दिवसातून जास्त वेळा साध्या पाण्यानी फक्त चेहरा धुणं/आयुर्वेदिक प्रसाधनं वापरणं/रासायनिक प्रसाधनं वापरणं/डिओडरंट स्प्रेचा, सेंटचा सर्रास वापर करणं./रोज एकदा अंघोळ आणि जमेल तेवढ्या वेळा चेहरा धुणं एवढ्याच गोष्टी योग्य आणि शक्य ठरल्यामुळे तेच आधुनिक ठरलं.

35) स्त्री किंवा पुरुष – दात घासण्यासाठी कडुलिंबाच्या काडीचा वापर/कडुलिंब चूर्णाचा वापर/दंतमंजनाचा बोटानी वापर/टूथपेस्ट आणि टूथब्रशचा वापर./ टूथब्रश त्याच्या तंतूंमुळे दातांच्या फटीत जाऊ शकतो. त्यामुळे ब्रश आणि त्याबरोबर दंतमंजन किंवा पेस्ट हेच सर्वांत आधुनिक आहे असं ठरलं.

36) स्त्री किंवा पुरुष – सुती रुमाल जवळ कायम बाळगणं/रुमाल न वापरता टिश्यू पेपर वापरणं./स्त्री असो, पुरुष असो, कायम एक सुती रुमाल खिशात किंवा पर्समधे बाळगणं हेच आधुनिक आहे असं ठरलं.

37) स्त्री किंवा पुरुष – कापडी पिशवीचा आग्रह/कागदी पिशवी वापरणं/कॅरीबॅग मागणं/जाड प्लॅस्टिकची पिशवी जवळ ठेवणं./पर्यावरणशास्त्राला मान्य असलेली बऱ्यापैकी मोठी पिशवी घडी करून नेहमीच्या पिशवीत ठेवणं हीच गोष्ट आधुनिक आहे असं ठरलं.

38) स्त्री किंवा पुरुष – स्वदेशी वस्तूंचा सतत आग्रह धरणं/स्वदेशी किंवा परदेशी बनावट याचं महत्त्व न ठेवता सोयीप्रमाणे वापर करणं/परदेशी

बनावटीच्या वस्तूंचा अभिमानानी वापर करणं/शक्यतोवर स्वदेशी वस्तूंचा वापर ही गोष्ट सर्वांत आधुनिक ठरली.

39)भेटवस्तू देण्या-घेण्याच्या बाबतीत पारंपरिक विचार म्हणतो की, घरी आलेल्या पाहुण्याला किंवा आपण कुणाकडे पाहुणे म्हणून गेलो की यजमानाला भेटवस्तू नेलीच पाहिजे. कित्येक लोक काहीतरी खाण्याचा पदार्थ भेट म्हणून देतात. बहुतेक वेळा तो गोड पदार्थ असतो. खरं म्हणजे मधुमेहाचं प्रमाण इतकं झपाट्यानी वाढतंय की गोड पदार्थ भेटवस्तू म्हणून देणं जास्त जास्त अयोग्य ठरत चाललंय. याला आधुनिक पर्याय म्हणून काही जण तळलेला किंवा उकडलेला, भाजलेला नमकीन पदार्थ आणतात. त्यातलं मीठ आणि स्निग्ध पदार्थ रक्तदाब, वजनवाढ दोन्हीसाठी वाईट असतं.

नीट विचार केला तर बाजारातल्या खाद्यपदार्थांच्या दुकानातला प्रत्येक पदार्थ आरोग्याच्या निकषावर नापास झालेला असतो. मग मूळ मुद्दा असा निघतो की भेटवस्तू म्हणून खाद्यपदार्थ देण्याची कल्पना अपायकारक आहे का उपायकारक आहे? मला पक्कं माहिती आहे की असे पदार्थ लोक कामवाल्या गरजूंना देऊन मोकळे होतात. भेटवस्तू म्हणून कुठचीच वस्तू योग्य ठरत नाही. खाद्यपदार्थ तर नाहीच नाही. खरा आधुनिक मार्ग म्हणजे काही न देणं हाच ठरतो.

बहुतेकांना हा विचार पटत नाही हे मला माहिती आहे. शोभा देखील 'भेटवस्तू कटाप' हे धोरण अमलात आणू शकलेली नाही. अशा नव्याण्णव टक्के लोकांना माझी एकच नम्र सूचना/विनंती आहे, त्याचे काही टप्पे आहेत.

टप्पा 1) 'सरप्राइज गिफ्ट' ही कल्पना डोक्यातून काढणं. माझ्यासारख्या व्यवस्थापनशास्त्रातल्या माणसाला नो सरप्राईजेस हे व्यवस्थापनशास्त्रातल्या मूलतत्त्वांपैकी एक मूलतत्त्व पक्कं माहिती आहे. पटलं आहे. 'अमुक एक वस्तू या व्यक्तीला अकस्मात भेट म्हणून दिली की ती व्यक्ती एकदम खूष होईल' ही कल्पना बहुतेक वेळेला खोटी असते, पण भेट देणाऱ्या माणसाला नाराज करायचं नसल्यामुळे बहुतेक वेळा ते बोलता येत नाही.

टप्पा 2) भेटवस्तू द्यायचीच ठरलं तर निदान ज्या वस्तूची खरी गरज आहे ती वस्तूच द्यायची हे पक्कं करावं.

टप्पा 3) स्वतःची किती खर्च करण्याची तयारी आहे हे अगदी स्पष्टपणी आकड्यात सांगावं. वस्तू विकत घेऊन त्यावरचं किमतीचा आकडा खोडणं,

लेबल काढणं, भेट स्वीकारणाऱ्यानी चौकशा करकरून ती वस्तू किती किमतीची होती हे शोधून काढणं, त्यावरून भेट देणाऱ्याविषयी काहीतरी बोलणं, या सगळ्या गोष्टी विनोदी आणि न शोभणाऱ्या असतात. / सर्वात आधुनिक म्हणजे भेटवस्तू कटाप करणं.

40) स्त्री किंवा पुरुष – घरात कमीत कमी फर्निचरचा वापर करणं/दिवाणखान्यात बिनपाठीचे दिवाण ठेवणं/दिवाणखान्यात पाठ असलेली लाकडी बाकं ठेवणं/दिवाणखान्यात खुर्च्या/सोफासेटची व्यवस्था/फोमचे अतिशय मऊ सोफासेट ठेवणं./सगळ्या चर्चांनंतर पाठीच्या सुट्या खुर्च्या आणि त्यावर कापसाच्या गाद्या हेच सर्वांत आधुनिक ठरलं.

41) स्त्री किंवा पुरुष – जेवायला बसण्यासाठी सतरंजी/पाट/पाट आणि चौरंग/जेवणाचं टेबलं आणि खुर्च्यांची सोय./पाट आणि समोर ताटाखाली चौरंग हे सर्वांत चांगलं, पचनासाठी चांगलं आसन आहे. तेच सर्वांत आधुनिक म्हणायला पाहिजे. मला आणि शोभाला ही गोष्ट पटली आहे, पण या वयानंतर आम्हाला ते जमणं शक्य नाही.

42) स्त्री किंवा पुरुष – स्वयंपाकघरात खाली बसून स्वयंपाक करण्याचा ओटा/स्वयंपाकासाठी उभ्यानी स्वयंपाक करण्याचा ओटा/उभ्याचा ओटा आणि त्याखाली ट्रॉलीज./उभ्यानी स्वयंपाक करण्याचा ओटा आणि त्याखाली ट्रॉलीज हेच सर्वांत कार्यक्षम, सोयीची आणि वेळ वाचवणारी रचना असल्यामुळे तीच आधुनिक आहे असं ठरलं.

43) स्त्री किंवा पुरुष – घरात वस्तू ठेवण्यासाठी बिन दरवाज्याच्या मांडण्या/वस्तूंसाठी दरवाजाची कपाटं/काचेची कपाटं./काचेच्या दरवाजाची कपाटं सर्वांत आधुनिक ठरल्या, कारण आत काय वस्तू ठेवल्या आहेत ते कपाट न उघडता कळतं.

44) स्त्री किंवा पुरुष – पिण्याचं पाणी थंड करण्यासाठी ओलं फडकं गुंडाळलेलं धातूचं भांडं/लाल किंवा काळा माठ/नळाचा माठ/रेफ्रिजिरेटर/खाण्या-पिण्याची वस्तू एक्झॉस्ट फॅन असलेल्या जाळीच्या कपाटात ठेवणं/सतत ताज्या नवीन वस्तूंची खरेदी करणं./शहरात राहणाऱ्यांसाठी रेफ्रिजरेटर सर्वांत आधुनिक ठरतो किंवा जवळून थोड्या थोड्या ताज्या वस्तू खरेदी करून त्या जाळीच्या कपाटात ठेवणं शक्य असलं तर ते सर्वात आधुनिक आहे.

45) उकाड्याची व्यवस्था म्हणून घरात झोपाळा, हातपंखे अशी व्यवस्था/घरात टेबल फॅन्स/सीलिंग फॅन्स/डेझर्ट कूलर/विंडो ए.सी./स्प्लिट ए.सी./सेंट्रल ए.सी./घरामधे सीलिंग फॅन्स आणि एक्झॉस्ट फॅन वापरून ए.सी. टाळणं हेच खरं योग्य आणि आधुनिक आहे, असं सर्वमान्य झालं.
मी आणि शोभा इमारतीमधल्या सर्वात शेवटच्या मजल्यावर राहतो. उन्हाळ्यात छत खूप तापतं. त्यामुळे आम्हाला ए.सी. वापरणं भाग पडतं.

46) सूर्यप्रकाशाप्रमाणे दिनचर्या जुळवणं/मशालींचा वापर/मेणबत्त्यांचा वापर/कंदील वापरणं/पिवळ्या गोल बल्बचा वापर/ ट्यूबलाईटचा वापर/डेलाईट बल्बचा वापर/कन्सील्ड लायटिंग/सी.एफ.एल.बल्ब वापर/एल.इ.डी.वापर/विजेचा खूप वापर/वीजजोडाबरोबर इन्व्हर्टर बसवणं/सोलर लाईट वापर./ सूर्यप्रकाशाप्रमाणे जास्तीत जास्त प्रमाणात दिनचर्या जुळवणं आणि एल.ई.डी.चा जास्तीत जास्त वापर करणं, घरातले काही दिवे सोलर एनर्जीवर चालवणं या सगळ्याचा मिश्र वापर हे सर्वात आधुनिक ठरलं.

47) स्त्री किंवा पुरुष – जिथून जसा मिळेल तसा पदार्थ खरेदी करणं/सेंद्रिय शेतीच्या पद्धतीचेच पदार्थ खरेदी करून ओल्या फडक्यात साठवणं./सेंद्रिय शेतीचा माल शक्य त्या प्रमाणात खरेदी करून ओल्या फडक्यात गुंडाळून ठेवणं हे त्यातल्या त्यात आधुनिक ठरलं.

48) गोठ्यात जाऊन भांड्यातून दूध आणणं/दूधवाल्यानी घरी येऊन भांड्यात दूध देण्याची व्यवस्था/पिशवीमधलं पाश्चराइज्ड दूध खरेदी करणं/दूध पावडर वापरणं/टेट्रा पॅकमधलं दूध वापरणं/चहा–कॉफीत दुधाचा वापर न करणं/चहा, कॉफी, कोको बोर्नव्हिटा ऐवजी थेट दूध पिणं/दुधाचा वापर सोडून देणं./दुधाचा वापर कमी करणं, दूधवाल्यानी ताज्या दुधाचा रतीब घालणं याचा मिश्र वापर सर्वात आधुनिक. मला आणि शोभाला हे जमलेलं नाही.

49) घरी फोन नसणं/घरी लँडलाइन टेलिफोन वापरणं/मोबाईलचा सर्रास वापर./ मिश्र वापर हाच सर्वात आधुनिक मार्ग आहे असं ठरलं. स्वतःला आधुनिक समजणारी बरीच लोकं खूप सोयी असलेले महागडे मोबाईल सेट वापरतात. त्यांना प्रत्यक्ष भेटीपेक्षा, पत्र लिहिण्यापेक्षा मोबाईलवर मेसेज, बोलणं जास्त सोयीचं वाटतं. ते प्रत्यक्ष भेटीपेक्षा स्वस्तदेखील पडतं. आधुनिकतेच्या व्याख्येमधलं वैयक्तिक आणि सामाजिक हित अशा मोबाईलच्या वापरामुळे

शक्य होतं की नाही याबद्दल मात्र शंका वाटते. आमच्याकडे मिश्र वापराचा अतिरेक झाला आहे. निरनिराळ्या कारणांमुळे आमच्याकडे एक लँडलाईन, एक ब्रॉडबँड-लँडलाईन, 2 साधे मोबाईल फोन आणि 1 स्मार्ट फोन एवढ्या गोष्टींचा वापर असतो.

50)कॉम्प्युटरचा अजिबात वापर न करणं/कॉम्प्युटर वापरणं शक्यतोवर टाळणं/ जरूर तेव्हाच आणि तेवढाच कॉम्प्युटरचा वापर/लॅपटॉपवर दिवसभर काम करणं/कागद वापरणं या गोष्टीचा पूर्ण विसर पडणं./कॉम्प्युटरची पुरेशी माहिती आणि मध्यम नियमित वापर हे आधुनिक ठरलं.

मी आणि शोभा जरूर तेवढाच कॉम्प्युटर वापरतो. इंटरनेट, वेबसाईट, यू ट्यूब याचा आम्ही पुरेसा वापर करत नाही.

51)लहान मुलांशी बोलताना लाडात किंवा बोबडं बोलणं/सोपी वाक्यरचना करून, थोडक्यात, मोठ्यांच्याच भाषेत बोलणं/लहान मुलांशी इंग्लिश बोलणं./मुलांशी मोठ्यांच्याच भाषेत, बोबडं न बोलता सोपी वाक्यरचना करून बोलणं हे सर्वात आधुनिक यावर एकमत झालं.

52)मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत घालून हळूहळू इंग्लिशचं ज्ञान वाढवत नेणं/मुलांना इंग्लिश मीडियमच्या शाळेत घालणं./सर्वात योग्य, उपयोगी आणि आधुनिक मार्ग असा – मुलांना शक्य तेवढ्या घराजवळच्या शाळेत घालून मराठी, हिंदी आणि इंग्लिश तीनही भाषा सहज, सावकाश तयार करून घेणं.

53)मराठी-संस्कृत शब्द मिसळून बोलणं/मराठी – इंग्रजी मिसळून बोलणं/ इंग्लिशमधे बोलणं/भाषांच्या मिश्रणाला विरोध, पण स्वतःला चांगलं इंग्लिश, चांगलं मराठी येणं/मराठी, इंग्लिश दोन्ही भाषा कच्च्या राहणं/मराठी, इंग्लिश याखेरीज इतर भाषांमधे प्रावीण्य मिळवणं./सोपे, त्या त्या भाषेतले चांगले शब्द वापरून मराठी, हिंदी, इंग्लिश यावर प्रभुत्व असणं हे सर्वात आधुनिक.

आधीच्या पिढीमधे असा समज होता की, प्रत्येक माणसाला गुरू लागतोच. आधुनिक कल्पनेप्रमाणे 'सेल्फ मेड' माणसं असतात नि ती जास्त प्रगल्भ असतात. अशा 'सेल्फ मेड' माणसाला गुरू म्हणून व्यक्ती लागत नाही. पुस्तकं चालतात. चर्चागट चालतात.

54)मोठ्यांदा बोलणं/फार हळू आवाजात बोलणं/मृदू आवाजात मध्यम गतीनी

शांतपणी बोलणं./मृदू आवाजात मध्यम गतीनी शांतपणी, स्पष्टपणी बोलणं हीच बोलण्याची चांगली, परिणामकारक, उपयोगी आणि त्यामुळे आधुनिक पद्धत असं ठरलं.

55)वाचन कमी असणं/मराठी पुस्तकं, नियतकालिकं, वार्तापत्र वाचणं/इंग्रजी कादंबऱ्या, वर्तमानपत्र याचं वाचन करणं/इंग्लिश आणि मराठी कादंबऱ्या, कविता, वर्तमानपत्र सगळं वाचणं./मराठी, इंग्रजी पुस्तकं, वर्तमानपत्रं यांचं नियमित निवडक वाचन हेच सर्वात आधुनिक असं ठरलं.

56)शक्यतोवर गावाबाहेर न पडणं/महाराष्ट्राबाहेर जायला नकार/भारताच्या अनेक राज्यांत जायची संधी साधणं/परदेशात प्रवास करणं/परदेशात स्थायिक होणं./भारतातल्या अनेक राज्यांत आणि जगातल्या अनेक देशांत प्रवास करणं, परराज्यातल्या आणि परदेशातल्या लोकांना स्वतःकडे बोलावणं हे सर्वात आधुनिक असं ठरलं.

57)जास्तीतजास्त अंतरं चालत कापणं/घोड्याचा वापर/बैलगाडीतून जाणं/ सायकलनी इकडे तिकडे प्रवास करणं/मोटारसायकल स्वतः चालवणं/ चारचाकी गाडी स्वतः चालवणं/ड्रायव्हर नेमून चारचाकीनी प्रवास/इंधन बचतीसाठी सार्वजनिक वाहनाचा शक्यतोवर वापर करणं.

जरुरीप्रमाणे जाणीवपूर्वक सार्वजनिक वाहन, सायकल, मोटारसायकल, कार यांचा माफक वापर करून जवळच्या अंतरावर चालत जाणं हे सर्वात आधुनिक असं एकमतानी ठरलं.

●

3) मनातली आणि विचारातली पारंपरिकता किंवा आधुनिकता

कित्येक गोष्टींची कृती नजरेला दिसते. त्या कृतीचा मनातला अर्थ आधुनिकतेशी किंवा पारंपरिकतेशी जोडलेला असतो. या यादीमधल्या काही गोष्टी बाह्यरूपाच्या यादीत यायला पाहिजे होत्या की काय असं वाटू शकेल, पण त्यामागच्या विचाराला जास्त महत्त्व देऊन या यादीत त्या लिहिलेल्या आहेत.

1) पुरुष हा स्त्रीपेक्षा सरस, बुद्धिमान, शक्तिमान, जास्त सक्षम असतो असं मानणं/स्त्री पुरुषापेक्षा जास्त सरस आणि सक्षम असते असं मानणं/क्षमता, बुद्धिमत्ता, प्रतिभा, धाडस यातले कुठचेच गुण ती स्त्री आहे का पुरुष यावर अवलंबून नसतात असं मानणं./स्त्री-पुरुष समानता पूर्णपणी मानणं हेच आधुनिक ठरलं.
2) मुलगा-मुलगी यांचं लग्न ठरल्याचं जाहीर करण्यासाठी साखरपुडा करणं याला परंपरेत खूप महत्त्व होतं. सध्याच्या काळात विवाह नोंदणीची सरकारतर्फे सोय असल्यामुळे विवाहाची लेखी नोटीस देणं हीच गोष्ट आधुनिकतेच्या व्याख्येत बसते. हे सगळं समजून देखील प्रत्यक्षात कोणी त्याची अंमलबजावणी करत नाही.
3) हुंडा या कल्पनेला पाठिंबा असणं/अप्रत्यक्ष हुंड्याचे मार्ग शोधून काढणं/ या सामाजिक प्रश्नाच्या अभ्यासाबद्दल उदासीनता/हुंड्याच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रूपांना कडक विरोध./हुंड्याच्या सगळ्या प्रत्यक्ष, छुप्या, अप्रत्यक्ष रूपांना कडक विरोध करणं हीच खरी आधुनिकता.
4) विधिपूर्वक लग्नसमारंभ ही मूळ कल्पनाच पारंपरिक आहे. नोंदणी विवाह आणि समारंभाला पूर्ण चाट ही एकच गोष्ट आधुनिक आहे.
5) लग्नानंतर बायकोनी नाव, आडनाव दोन्ही बदलणं/बायकोनी फक्त आडनाव बदलून नाव तेच ठेवणं/बायकोनी नाव आणि आडनाव तेच ठेवणं/नवरा-बायको दोघांनी आडनाव सोडून देणं./मला स्वतःला अभ्यासानंतर वाटतं की आडनाव सोडणं हेच सर्वात आधुनिक. माझं आणि शोभाचं वय लक्षात घेऊन आम्हाला यापुढे ही गोष्ट योग्य वाटत नाही. आमच्यापेक्षा अगदी तरुण अविवाहित यांच्याही मनात आडनाव, वंशाचा अभिमान असं काय

काय घोळत असतं. बायकोनी नाव, आडनाव लग्नानंतरही न बदलणं याच्यापुढच्या आधुनिकतेचा विचार कोणी करू शकत नाही. मिश्रगटानी हा विषय बहुमतानी माझ्यावर सोडला.

6) बायकोनी आणि नवऱ्यानी एकमेकांना अहो अशी हाक मारणं/नवऱ्यानी बायकोला ए अशी नावाने हाक मारणं. पण बायकोनी नवऱ्याला अहो म्हणणं/दोघांनी एकमेकांना ए म्हणणं. लग्नाच्या आधुनिक कल्पनेत नवरा आणि बायको अधिकारानी बरोबरीचे असं असतं. त्यामुळे एकमेकांना ए म्हणणं हेच खरं आधुनिक आहे हे एकमतानी ठरलं.

7) मुलांनी आई-वडलांना ए आई आणि अहो बाबा म्हणणं/मुलांनी आई-वडलांना ए मम्मी आणि वडलांना अहो पपा, डॅडी म्हणणं/मुलांनी आईला ए आई आणि वडलांना ए बाबा म्हणणं/आईला नावानी हाक मारणं आणि वडलांना ए बाबा म्हणणं/मुलांनी आई-वडलांना ए म्हणून नावानी हाक मारणं.

   आई आणि वडील दोघांबद्दल मुलांना जवळीक वाटणं हे आधुनिक यावर सगळ्यांचं म्हणणं पडलं की मुलांनी दोघांना ए म्हणणं हेच आधुनिक. नावानी हाक मारण्यासंबंधी मात्र गटातल्या बहुतेकांना प्रश्न पडलेला होता.

8) मुलांनी आई-वडील आणि सर्व वडीलधारी मंडळींशी त्यांच्या समोर आणि अपरोक्ष आदराचा उल्लेख करणं. थोडक्यात, सर्व प्रसंगी वयाचा मान राखणं/सर्व वडीलधाऱ्यांचा वरकरणी आदर करून प्रत्यक्षात त्यांच्याशी बेपर्वाईनी वागणं/सर्व वडीलधाऱ्यांशी समानतेनी, सन्मानानी वागणं, पण लहानांशी अनादरानी वागणं/लहान-मोठे सगळ्या लोकांशी सन्मानपूर्वक प्रेमानी वागणं./लहान आणि मोठ्या सगळ्यांशी सन्मानपूर्वक वागण्याविषयी एकमत होऊन हीच आधुनिक पद्धत असं ठरलं.

9) एकत्र कुटुंबाच्या कल्पनेबद्दल आग्रह/एकत्र कुटुंब कल्पनेचे फायदे-तोटे दोन्ही समजल्यामुळे त्याबद्दल जोडीदाराच्या इच्छेप्रमाणे वागण्याचा निर्णय/विभक्त कुटुंबाचा पुरस्कर्ता, पण जरुरीप्रमाणे जुळवून घेण्याची तयारी/विभक्त कुटुंबाचा आग्रह/काही अभ्यास न केल्यामुळे डोक्यात गोंधळ आणि स्पष्ट विचार करायला नकार./विभक्त कुटुंब हीच जगण्याची सगळ्यात आधुनिक पद्धत असं एकमतानी ठरलं.

10) चरितार्थ चालवण्याची जबाबदारी पुरुषाचीच असं आग्रहानी म्हणणं, आचरण

करणं/स्त्री आणि पुरुष दोघांनी पैसे मिळवावेत आणि चरितार्थाची जबाबदारी घ्यावी असं मानणं/स्त्रीनी चरितार्थ चालवून पुरुषानी घर सांभाळणं./नवरा-बायको दोघांनी समाधान देणारं काम करून पैसे मिळवावेत हाच आधुनिक मार्ग असं ठरलं.

11) जोडप्याला एकमेकांचे आर्थिक व्यवहार माहीत नसणं/फक्त नवऱ्यानी आर्थिक व्यवहार बघणं/फक्त बायकोनी आर्थिक व्यवहार सांभाळणं/दोघांनी मिळून घरचे आर्थिक व्यवहार ठरवणं/दोघांपैकी ज्याला सोयीचं त्यानी प्रत्यक्ष व्यवहार करणं/एका समाईक खात्याव्यतिरिक्त दोघांची दोन स्वतंत्र खाती असणं./एका समाईक खात्यातले व्यवहार, सविस्तर अभ्यास करून त्याचे निर्णय घेणं आणि शिवाय नवरा-बायकोची स्वतंत्र खाती एकेकट्यानी सांभाळणं हाच खरा आधुनिक मार्ग आहे असं बहुमतानी ठरलं.

12) लग्नानंतरच्या नवरा-बायको व्यतिरिक्त भिन्नलिंगी मैत्रीला पूर्ण विरोध असणं/ नवरा-बायकोची भिन्नलिंगी व्यक्तींशी मैत्री असू शकते हे समजणं/अशी मैत्री प्रत्यक्ष असणं, त्याला पाठिंबा असणं/अशा मित्र-मैत्रिणींशी दोघांची नवरा-बायकोची मैत्री असणं/मित्र-मैत्रिणींची नवरा आणि बायको दोघांशीही मैत्री असणं हीच खरी आधुनिक सामाजिक रचना हे बहुमतानी ठरलं.

13) स्त्री-पुरुष आकर्षणाविषयी उघड चर्चेला नकार/स्त्री-पुरुष आकर्षण ही नैसर्गिक गोष्ट असल्यामुळे सभ्यतेचे संकेत पाळून त्याविषयीच्या उघड चर्चेला होकार. नवरा आणि बायकोनी अमुक व्यक्ती आवडते - स्त्री असो किंवा पुरुष हे एकमेकांना सांगणं, त्याची स्पष्ट चर्चा हेच सर्वात आधुनिक असं बहुमतानी ठरलं.

14) जोडीदार निवडण्याचं काम आई-वडलांवर सोपवणं/जोडीदार सापडणं हा संपूर्णपणी नशिबाचा प्रश्न मानणं/जोडीदाराच्या निवडीसाठी स्वतः प्रयत्न करणं/स्वतः प्रयत्न हीच सर्वात आधुनिक गोष्ट आहे असं एकमतानी ठरलं.

15) माझ्याकडे साखरपुड्याच्याही आधी वैयक्तिक समुपदेशनाला येणारी बरीच जोडपी आहेत. स्वतःचा जोडीदार स्वतः निवडण्यापर्यंत आधुनिक मूल्य पाळणारा मुलगा आणि मुलगी साखरपुड्याच्या निर्णयात मात्र पारंपरिक बनतात. साखरपुड्याच्या आधी समुपदेशकाला भेटायला जाणं ही मुळात आधुनिक कल्पना असून देखील त्या आधुनिकतेत पारंपरिक विचार लपल्याचं लक्षात येतं. पारंपरिकतेमधे साखरपुड्याचा समारंभ गृहीत असतो./आधुनिक

विचारात 'मॅरेज रजिस्ट्रार'ला नोटीस गृहीत असते, ते लोकांना कठीण जातं. पण तोच विचार सर्वात आधुनिक असं बहुमतानी ठरलं.

16) एखाद्या मुलाच्या आणि मुलीच्या लग्नसमारंभाच्या निमंत्रणपत्रिकेवर निमंत्रण करणारे आई-वडील, आजी-आजोबा असणं हे थेट पारंपरिक आहे. मुळात मोठा लग्नसमारंभ न करणं हेच खरं म्हणजे योग्य आणि खरं आधुनिक असतं. नवरा-नवरी लग्न करून संसार करण्याइतके शहाणे, जाणकार, सुज्ञ, सक्षम आहेत असं घरच्या सगळ्या लोकांना वाटत नसलं तर त्या विवाहाला बालविवाहच म्हणावं लागेल./काही लोकांना निमंत्रण करायचंच तर ते नवरा-नवरीचीच नावं टाकून केलं पाहिजे. तेच सर्वात आधुनिक असं ठरलं.

17) तडजोड स्वीकारून जोडीदाराशी लग्न उरकून टाकणं/कायदेशीर लग्नाशिवाय स्त्री-पुरुष संबंध ठेवणं/मनाजोगा जोडीदार मिळत नसल्यामुळे अविवाहित राहणं/विवाह अभ्यास मंडळात नियमित जाणं/वैयक्तिक समुपदेशनासाठी समुपदेशकाला भेटणं/अभ्यास मंडळात नियमित हजेरी आणि शिवाय वैयक्तिक समुपदेशन हीच खरी आधुनिक पद्धत असं ठरलं.

18) समवयस्क लोकांच्यातच मैत्री करणं आणि वावरणं/स्वतःपेक्षा लहान-मोठ्या दोन्ही गटांशी मैत्री असणं/पिढीतल्या फरकाचा अभ्यास करणं, लहान-थोर सगळ्यांशी मैत्री असणं हे आधुनिक असं एकमतानी ठरलं.

19) सध्याचे तरुण नवरा-बायको एकमेकांचं उघड कौतुक करतात. 'तू छान दिसतोस, तू सुंदर दिसतेस' अशी एकमेकांची शब्दात तारीफ करतात. काही लोकांच्या देखत कौतुक करतात, तर काही फक्त खाजगीत करतात. पारंपरिक जोडपी मात्र सबंध आयुष्यात एकमेकांचं असं कौतुक न करू शकणारी आढळतात./फक्त खाजगीत एकमेकांच्या सगळ्या सद्‌गुणांचं स्पष्ट शब्दात कौतुक करणं हा आधुनिक मार्ग एकमतानी ठरला.

20) कामजीवनात पुरुषाचा पुढाकार असणं/स्त्रीचा पुढाकार असणं/लैंगिक संबंधात दोघांचा सारखा सहभाग असणं./लैंगिक संबंधात नवरा-बायको दोघांना एकमेकांविषयी आकर्षण वाटणं आणि दोघांचा सारखा सहभाग असणं आधुनिक आहे असं बहुमतानी ठरलं.

21) आपल्या घराण्याचं नाव राखण्यासाठी, वंशाचा दिवा असण्याच्या दडपणामुळे मुलगा होण्याला लोकांच्या मनात फार महत्त्व असतं./प्रत्यक्षात मुलगा

असो, मुलगी होवो फरक पडत नाही हा विचार आधुनिक आहे. मिश्रगटात याविषयी सगळ्यांचं एकमत झालं.

22)हवी तेवढी मुलं झाल्यावर स्त्रीचं संततिनियमन करणं/या गोष्टीबद्दल वेळेवर काही विचार न करणं/पुरुषानी नसबंदी करून घेणं./पुरुषाची नसबंदी हाच आधुनिक विचार यावर एकमत झालं.

23)घटस्फोट किंवा वैधव्य यानंतर पुनर्विवाहाला नकार/याबद्दल काही विचार न करणं/घटस्फोट किंवा विधुरत्वानंतर स्त्री असो, पुरुष असो, पुनर्विवाहाला पाठिंबा आणखी संबंधितांना मदत करणं./पुनर्विवाहाला मान्यता, पाठिंबा हीच विचाराची आधुनिक पद्धत असं ठरलं.

24)अडचणीच्या प्रसंगी भडकपणी निर्णयाची प्रवृत्ती/गोष्टी अनिर्णित ठेवून पुढे ढकलण्याकडे कल/प्रत्येक कृतीमधे थंड डोक्यानी निर्णय घेण्याचा प्रयत्न आणि आग्रह./थंड डोक्यानी निर्णय घेणं हीच आधुनिक पद्धत असं ठरलं.

25)ईश्वराचं अस्तित्व मान्य असणं, सगळ्या गोष्टी ईश्वरी इच्छेनी होतात असं मानणं. त्यामुळे देवपूजा आग्रहानी कडकपणी करवून घेणं/स्वतः देवपूजा करणं, पण इतरांवर जबरदस्ती न करणं/ईश्वरावर श्रद्धा, पण देवपूजा न करणं/आस्तिक नास्तिक गोंधळ मनात झाल्यामुळे नाइलाजानी मधूनच देवपूजा करणं/देव, निसर्ग, नशीब या गोष्टी एकच असल्यामुळे त्यात आपण करण्याजोगं काही नाही असं मानणं/कुटुंबपातळीवर नास्तिक आचरण करणं/जाहीर नास्तिक असणं./कुटुंबपातळीवर निरीश्वरवादी असणं हे आधुनिक असं एकमतानी नाही, पण बहुमतानी ठरलं.

26)स्वतःच्या धर्माचा, जातीचा अभिमान बाळगणं/अनेक धर्म, जाती यांचा अभ्यास करायला लागणं/सर्व धर्म, सर्व जाती याविषयी समभाव बाळगणं आणि तशा प्रकारे आचरण/धर्म, जात कल्पनांचा पूर्णपणी त्याग, धर्म आणि जात याविषयी विचारणं, सांगणं, पूर्णपणी बंद करणं./धर्म आणि जात या विषयांचा प्रथम तौलनिक अभ्यास आणि त्यानंतर त्याग हे सर्वात आधुनिक असं एकमतानी नाही, पण बहुमतानी ठरलं.

27)भारतीय संस्कृतीला थोर समजणं/निरनिराळ्या प्रकारच्या संस्कृतींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणं/भारतीय संस्कृतीला नावं ठेवणं/याविषयी अपुरा विचार असल्यामुळे कुठचंच विधान न करणं/आधुनिक संस्कार शोधणं, आधुनिक संस्कारांचा अखंड शोध, प्रयोग हाच खरा आधुनिक मार्ग ठरला.

28)धार्मिक कर्मकांडं घरातल्या सर्वांना करायला सक्तीनी भाग पाडणं/धार्मिक कर्मकांडं स्वतः करणं, पण इतरांवर जबरदस्ती न करणं/कर्मकांडं सोईस्करपणी टाळणं, पण त्याविषयी काही न बोलणं/कर्मकांडांना स्पष्ट नकार देणं./ कर्मकांडांना स्पष्ट नकार हेच आधुनिक असं एकमतानी नाही, पण बहुमतानी ठरलं.

29)शुभ आणि अशुभ यासंबंधीच्या सर्व रूढी पाळणं/स्वतःला पटत नसताना दुसऱ्यासाठी शुभाशुभ पाळणं/वर्षातले सगळे दिवस, प्रहर सारखे मानणं./ शुभ-अशुभ या कल्पनांचं पूर्ण उच्चाटन हे आधुनिक ठरलं. एकमतानी नाही तर बहुमतानी ठरलं.

30)पत्रिका, कुंडली, संख्याशास्त्र यावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वागणं/अशा गोष्टींवर कधी विश्वास, कधी अविश्वास असं वागणं/या सगळ्या कल्पनांचा पूर्णपणे त्याग करणं./सगळ्या ज्योतिष, पत्रिका, कुंडली यांचा त्याग हाच आधुनिक मार्ग बहुमतानी मान्य झाला.

31)कामाच्या, व्यवसायाच्या ठिकाणी पूजा, सत्यनारायण, प्रसाद या गोष्टींना संमती असणं, त्यात सहभागी होणं/काही न बोलता प्रसाद घेऊन निघून जाणं/अशा गोष्टींना स्पष्ट नकार देऊन त्यात सहभागी न होणं./कामाच्या ठिकाणी धार्मिक कर्मकांडांना स्पष्ट नकार हीच आधुनिकता असं बहुमतानी मान्य झालं.

32)जन्मोजन्मी तोच वैवाहिक जोडीदार या कल्पनेनी वटसावित्रीची पूजा करणं/ ही पूजा कधीकधी करणं/गतजन्म ही कल्पना खरी असली तर गेल्या जन्मी केलेल्या पूजेचं काय होणार, हा प्रश्न सारखा मनात येणं. प्रश्न पडूनही रिवाज म्हणून वडाची पूजा करत राहणं/पुनर्जन्म या कल्पनेला विरोध असणं आणि त्यामुळे वटसावित्री, वडाची पूजा यावर विश्वास नसल्यामुळे नकार देणं./पुनर्जन्म या कल्पनेला नकार आणि त्यामुळे वटसावित्रीच्या पूजेला नकार एकमतानी आधुनिक ठरला.

33)धार्मिक सण, समारंभ, व्रतवैकल्यं, उत्सव या गोष्टींवर खरोखर विश्वास असल्यामुळे त्या सगळ्या गोष्टी नेमानी करणं/धार्मिक सणांच्या फायद्याबद्दल मनात शंका असूनही वादविवाद टाळण्यासाठी ते करत राहणं/समारंभ – दिखाऊ वृत्ती – खोटेपणा – कृत्रिम गोष्टी याचा संबंध न समजल्यामुळे त्याबद्दल विचार न करणं/धार्मिक सण-समारंभ, व्रतवैकल्यं, उत्सव यातला

निरर्थकपणा समजल्यामुळे त्याला नकार देणं./सगळ्या धार्मिक कर्मकांडांना आणि व्रतवैकल्यांना स्पष्ट नकार हाच आधुनिक मार्ग एकमतानी नाही तरी बहुमतानी मान्य झाला.

34)यंत्रांची ठराविक दिवशी पूजा करणं, त्यासाठी काम बंद ठेवणं, पण यंत्रांच्या नियमित निगा राखण्याकडे दुर्लक्ष करणं/यंत्रांची पूजा आणि नियमित निगा दोन्हीकडे दुर्लक्ष करणं/यंत्रांची नियमित निगा, स्वच्छता याकडे व्यवस्थित लक्ष देणं, पण यंत्रांच्या पूजेला काही महत्त्व न देणं. /यंत्रांचा नियमित मेन्टेनन्स हीच खरी आधुनिकता आणि पूजेला छाट याविषयी पूर्ण एकमत झालं.

35)ओळखीच्या आजारी माणसाला रुग्णालयात भेटायला जाऊन आजारांविषयी बोलणं/आजाऱ्यासमोर गंभीर, दुःखी चेहऱ्यांनी वावरणं/भेटायला जाऊन हास्यविनोद करणं/प्रत्यक्ष भेटायला न जाता फोनवर चौकशी करणं/प्रत्यक्ष न जाता पत्र पाठवणं/आजारी माणूस बरा होऊन घरी गेला की थोडा वेळ त्याच्या सोयीच्या वेळेला भेटून येणं./शक्यतोवर रुग्णालयात न जाता सोयीची वेळ ठरवून घरी अगदी थोडा वेळ भेटणं हेच आधुनिक याबद्दल पूर्ण गटाचं एकमत झालं.

36)कोणी वारलं असं कळलं की अनेकांना ते फोन करून कळवणं/अंत्यदर्शनासाठी अनेक तास मृत शरीर घरात ठेवणं/रस्त्यावरून अंत्ययात्रा नेणं/मृत्यूनंतर धार्मिक विधी करणं आणि करवून घेणं/शववाहिनीमधून मृत व्यक्तीला स्मशानात नेणं/निवडक 5-10 लोकांना कळवून बाकीच्यांना न कळवण्याबद्दल सांगणं/देहदान करणं/आधी संबंधित फॉर्म्स भरून ठेवून देहदान करणं हेच सर्वात आधुनिक असं एकमतानी नाही, पण बहुमतानी ठरलं.

37)अगदी क्वचित असं उदाहरण सापडतं. आई किंवा वडील वारल्यावर त्यांना आग्रह करून, पुढाकार घेऊन त्यांचं दुसरं लग्न लावून देणाऱ्या तरुण मुला-मुलींचं खरंच कौतुक वाटतं. हा खरा आधुनिक विचार आहे. स्वतःची आई किंवा वडील असले म्हणून काय झालं, त्यांना जोडीदाराची गरज असतेच/मला स्वतःला हा विचार आधुनिक वाटतो, पण घरात हा विषय काढायची जवळजवळ कोणाचीच तयारी नव्हती. बहुमतानी ही गोष्ट माझ्यावर सोडायचं ठरलं.

38)मृत्युपत्र करणं या कल्पनेला नकार असणं/मृत्युपत्र करण्याची कल्पना

पटली तरी त्याबद्दल प्रत्यक्ष हालचाल न करणं/मृत्युपत्रातल्या मजकुराबद्दल गुपित ठेवून त्यावरून मुलं, नातवंडं, भाऊ, बहीण यांच्याकडून हव्या त्या गोष्टी करवून घेणं/मुलांशी मृत्युपत्रातल्या मुद्यांची चर्चा करून मग मृत्युपत्र करणं/लिव्हिंग विल बनवणं./मुलांशी चर्चा करून मृत्युपत्र आणि लिव्हिंग विल बनवणं हेच आधुनिक हे सर्वमान्य होतं, पण घरी आई-वडलांशी हे बोलण्याची कोणाची तयारी नव्हती.

39) घरात कोणी वारलं तर शववाहिनीतूनच स्मशानापर्यंत न्यावं हे ठीक आहे. रस्त्यावरच्या अंत्ययात्रेच्या परंपरेपेक्षा ते खूपच आधुनिक आहे. हा मुद्दा एकमतानी मान्य झाला.

40) स्मशानात परंपरेप्रमाणे धार्मिक कृत्यं करण्यासाठी भटजींना सांगायचं का नाही, हा पुन्हा अंत्यसंस्कारांच्यावर विश्वास आहे का नाही, यावर अवलंबून असतं./माझ्या दृष्टिकोनातून खऱ्या आधुनिक माणसानी अंत्यसंस्कार रद्द असं म्हणायला हवं. याबद्दल मिश्रगटात बरीच चर्चा होऊन बहुमतानी अंत्यसंस्कार रद्द म्हणजे आधुनिक असं ठरलं.

41) परंपरेप्रमाणे स्मशानात स्त्रिया जात नाहीत. आधुनिक विचारांप्रमाणे कुठेच स्त्री-पुरुष फरक करणं योग्य नाही. गटातही हेच मान्य झालं./आभाची सासू पद्मजा फाटक वारली तेव्हा आभानी स्मशानात जायला नको असं बोलणारे काही लोक आसपास होतेच. आभा मात्र थेट आधुनिक घरातली असल्यामुळे स्मशानात गेली.

42) विद्युतवाहिनीचाच वापर करणं हे आधुनिक आहे, तशीच मागणी केली पाहिजे. पर्यावरणाच्या दृष्टीनी तेही वाईट असतं, पण त्याबद्दल स्वतंत्रपणे बोलू. या पुस्तकसंचात इच्छामरण – मृत्यू याबद्दल सविस्तर लेख आहे तो जरूर वाचावा.

43) स्वच्छतेच्या अघोरी कल्पनांचा आग्रह. उदा. कायम थंड पाण्यानी अंघोळ, केवळ त्यानंतरच स्वयंपाकघरात पाऊल ठेवणं, स्वयंपाकासाठी रेशमी वस्त्राचा आग्रह/अंघोळ, पाण्याचं तपमान, वस्त्राचा प्रकार याबद्दल आग्रह नसणं/स्वच्छता कायम पाळणं, पण अशा रूढींना विरोध/अस्वच्छ राहणं, अंघोळीचा कंटाळा, कपडे अस्वच्छ असं वावरणं./अंघोळ करूनच कुठचंतरी काम करण्याचा हट्ट म्हणजे पारंपरिकताच आहे./रोज अंघोळ अवश्य करावी, पण इतर कर्मकांडांमधल्या कल्पनांना फाटा द्यावा म्हणजेच आधुनिक

असं ठरलं. पाण्याचं तपमान ऋतूप्रमाणे ठरवावं असंही ठरलं.

44) तब्येतीच्या तक्रारींच्या बाबतीतही ज्याप्रकारे लोक विचार करतात, तिथेही आधुनिक किंवा पारंपरिक दृष्टिकोन असतो. भारतीय परंपरेत फक्त आयुर्वेद ही एकच विद्या होती. त्यानंतर होमिओपॅथी माहिती झाली. त्याला लोकप्रियताही मिळाली. पुढे पाश्चात्त्य प्रभावामुळे ॲलोपॅथीचा वापर वाढत गेला. प्रत्यक्षात यापैकी अमुक एक पद्धत आधुनिक असं ठरवणं कठीण आहे. कारण तीनहीच्या खासियती स्वतंत्र आहेत. प्रत्यक्षात मात्र असं दिसतं की ॲलोपॅथी म्हणजे आधुनिक विचार./विकाराच्या प्रकाराप्रमाणे पद्धत निवडावी हाच आधुनिक विचार एकमतानी ठरला.

45) स्त्रीनी मासिक पाळीच्या वेळी निराळ्या खोलीत बाजूला बसणं/बाजूला बसलेल्या बाईजवळ तिची लहान मुलं गेली तरी रागवारागवी करण्याची घरात पद्धत/पाळीच्या वेळेला बाईनी घरात मोकळेपणानी वावरून फक्त श्रमाची कामं टाळणं/सॅनिटरी पॅड्स बरोबर ठेवल्यामुळे कोणाला कळणारही नाही अशा पद्धतीनी सर्व ठिकाणी वावरणं./मासिक पाळीविषयी शास्त्रीय माहिती मिळवून शक्य होईल तेवढं कामकाज दमादमानी उरकणं, घरातल्यांना किंवा बाहेरच्यांना काही कळू न देता सगळी काळजी घेणं हेच आधुनिक असं ठरलं.

46) दुसऱ्या घरी पाहुणे म्हणून गेलेले असताना – घरी हातानी बनवलेला खाद्यपदार्थ खाऊ म्हणून नेणं/हातानी बनवलेली टिकाऊ कलाकुसरीची किंवा उपयोगी वस्तू देणं/विकतचा खाद्यपदार्थ देणं/विकतची शोभेची वस्तू देणं/घरच्या बागेतली फुलं देणं/विकतचा पुष्पगुच्छ देणं/भेटवस्तू, फुलं देणं आणि घेणं दोन्ही टाळणं./कुठचीही भेटवस्तू न देणं, पण कायम चांगलं वागणं हेच आधुनिक यावर एकमत झालं, पण प्रत्यक्षात तसं वागणं गटाला कठीण वाटलं.

47) दुसऱ्याकडे जाताना न कळवता जाणं/वेळ कळवून ती न पाळणं/फोन करून नंतरची वेळ कळवणं/वेळ पाळणं./दुसऱ्याबरोबर वेळ ठरवणं आणि कायम ठरलेली वेळ पाळणं हीच आधुनिकता याबद्दल गटात एकमत झालं.

48) दुसऱ्याकडे पाहुणे म्हणून गेल्यावर निःसंकोचपणी पोटभर जेवायचं, आणखी मागून घेऊन खायचं/नकार देऊन अगदी थोडं खायचं/शिष्टाचार म्हणून थोडा पदार्थ बशीत किंवा ग्लासमधे उरवायचा/खाण्या-पिण्यातलं काही नको

असेल तर सभ्यपणी स्पष्ट नकार द्यायचा./काय हवं, नको ते स्पष्टपणी वेळेवर सांगणं हीच आधुनिकता असं ठरलं.

49) आपल्याकडे पाहुणे आले असताना खाण्याचा खूप आग्रह करायचा/पदार्थ समोर ठेवायचे आणि घ्या म्हणून त्यांच्यावर सोडायचं/टेबलावर पदार्थ ठेवून आपल्या मर्जीप्रमाणे बुफे डिनरची सोय./बुफे डिनर हे सर्वात आधुनिक असं सर्वमान्य झालं.

50) खाण्याच्या पदार्थांच्या बाबतीत लोकं समजतात की बाहेर रेस्टॉरंटमधे खाणं म्हणजे आधुनिक. त्याबरोबर कुठचंतरी एअरेटेड पेय पिणं म्हणजे जास्त आधुनिक. प्रत्यक्षात जिथे जिथे धंदा म्हणून खाद्यपदार्थ विकले जातात, तिथे धंदा मुख्य असतो; खाद्यपदार्थांचा दर्जा दुय्यम असतो./कायम स्वतः घरी खाद्यपदार्थ शिजवून खाणारं कुटुंब हे खरं आधुनिक असं मला वाटतं. गटाचं वैचारिक एकमत झालं, पण तसं प्रत्यक्षात वागणं शक्य होत नाही असं बहुतेकांना वाटलं.

51) आपल्या आयुष्याची जबाबदारी स्वतःची न मानता घरातल्या वडीलधाऱ्या कर्त्या पुरुषावर टाकणं/स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी स्वतःची मानणं. त्यामुळे स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणं./'सज्ञान' या शब्दाचा खरा अर्थ स्वतःची जबाबदारी स्वतःवरच असते, ह्याचं ज्ञान होणं. आधुनिकतेमधे त्याचा मुख्य समावेश असतो, हे एकमतानी मान्य झालं.

52) वडलांच्या, कुटुंबाच्या पैशानी शिक्षण घेणं/स्वतःच्या मेहनतीनी स्कॉलरशिप मिळवून शिकणं/पैसे मिळवत टप्प्याटप्प्यानी स्वतःच्या पैशावर शिक्षण घेणं./पैसे मिळवत टप्प्याटप्प्यानी स्वतःच्या पैशानी शिकणं हेच आधुनिक असं ठरलं.

53) शक्यतोवर नोकरी करणं/शक्यतोवर स्वतःचा धंदा किंवा व्यवसाय करणं./यापैकी काहीही केलं तरी मनापासून आवडीनी जबाबदारीनी काम करणं हे खरं आधुनिक समजायचं असं एकमतानी ठरलं.

54) ज्या कामात पैसे जास्त मिळतात ते चांगलं समजणं/काही व्यवसायांना कमी दर्जाचं मानणं/सगळी कामं चांगली असतात, ती मनापासून आणि दर्जेदार करणं महत्त्वाचं मानणं./मनापासून काम करणं आणि कामाचा दर्जा सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करणं हे आधुनिकतेचं महत्त्वाचं लक्षण आहे, असं एकमतानी ठरलं.

55)बांधकाम क्षेत्रातलं एक खास उदाहरण सांगतो. इंग्लंडमधे क्वेकर नावाचा पंथ असतो. अहिंसा, साधेपणा अशा मार्गांनी जाणारा. त्यातला एक आर्किटेक्ट लॉरी बेकर महात्मा गांधींच्या काळात भारतात आला आणि त्यांच्या प्रभावानी भारतातच राहिला. बांधकाम क्षेत्रात, विशेषतः केरळमधे त्रिवेंद्रमच्या आसपास त्यांनी एकाहून एक अशी अद्वितीय कामं केली की बांधकाम क्षेत्रातल्या सगळ्यांचे डोळे विस्फारले. एका बाजूनी आर.सी.सी. कॉलम, बीम, स्लॅब म्हणजे आधुनिक इमारती असं सबंध भारत मानत होता./त्याच काळात त्या त्या भागात मिळणाऱ्या बांधकाम साहित्यामधून सुंदर इमारतींची रचना खरी म्हणजे जास्त आधुनिक होती. सर्वसामान्यांना ही गोष्ट समजणं मात्र फार कठीण आहे. लॉरी बेकर आता हयात नाही. पण ते सर्वात आधुनिक तंत्रज्ञान आहे.

56)घराच्या पारंपरिक रचनेच्या कल्पनांमधे स्वयंपाकघर, कोठीची खोली, दिवाणखाना निरनिराळा असायचा. दिवाणखान्यापलीकडे व्हरांडा असायचा. बाहेरचा माणूस आधी व्हरांड्यात बसायचा. मग दिवाणखान्यात बसायचा. जरा मध्यम आधुनिक घरांच्यात व्हरांडा नसतो. दिवाणखाना आणि जेवणघर यामधे भिंत नसते. काही घरांच्यात स्वयंपाकघर देखील जेवणघराशेजारी असतं आणि मधे भिंत नसते./असा वातावरणातला मोकळेपणा म्हणजेच आधुनिकता यावर बहुतेकांचं एकमत झालं.

57)पारंपरिक कल्पनांच्यात संडास आणि अंघोळीची मोरी एकाच खोलीत मान्य होत नाही तर आधुनिकतेत कम्बाइन्ड टॉयलेट जास्त सोयीची समजतात. भारतीय संडास पारंपरिक समजतात आणि विलायती कमोड आधुनिक समजतात. माझं असं मत झालं आहे की, जिथे शक्य असेल तिथे भारतीय संडास आणि कमोड दोन्हीची सोय ठेवावी. भारतीय संडासाची एकदा सवय गेली की नंतर गुडघे साथ देत नाहीत. त्यामुळे आलटून पालटून दोन्हीचा वापर करावा./घरात अशी दोनही प्रकारच्या संडासांची सोय असणं जास्त आधुनिक असतं, हे एकमतानी मान्य झालं.

58)मी खिशामधली नोंदी करण्याची सी.क्यू.एस.डायरी वापरतो. अनेक लोकं नोंदी लिहिण्याच्या सवयीला पारंपरिक समजतात. मोबाईल स्मार्टफोनमधे सगळ्या सोयी असल्यामुळे नोंदी करण्यासाठी मोबाईलचा वापर म्हणजे आधुनिक अशी त्यांची समजूत असते. माझं निरीक्षण मात्र असं आहे की

ते लोक डायरी, मोबाईल यापैकी कशातच नोंदी करत नाहीत./लक्षात ठेवून पूर्ण जबाबदारीनी वागणं हे आधुनिकतेत गृहीत आहे. त्यासाठी डायरी का स्मार्टफोन का पामटॉप कॉम्प्युटर, हे गौण आहे. याबद्दल एकमत झालं.

59) दुसऱ्याला फसवून फायदा कमावण्यात आनंद मानणं/रास्त व्यवहाराचा आग्रह धरणं./रास्त व्यवहाराचा सतत आग्रह हवा. तीच खरी आधुनिकता असते याबद्दल एकमत झालं.

60) कायदे पाळण्याचा प्रयत्न करणं, आग्रह धरणं/कायदे मोडण्यात शौर्य मानणं./सगळेच्या सगळे कायदे, नियम, संकेत पाळण्याचा आग्रह म्हणजेच आधुनिकता यावर एकमत झालं.

61) नोकरांना त्यांच्या पायरीवर ठेवणं/घरच्या आणि बाहेरच्या नोकरांना सन्मानाची वागणूक/नोकरांसकट सगळ्यांना कायम सन्मानाची वागणूक म्हणजेच आधुनिकता यावर एकमत झालं.

62) गरिबाला नाडून त्याचा गैरफायदा घेणं/आपण केवळ नशिबानी सधन घरात जन्मलो त्यामुळे चुकून आपले पैसे गेले तरी गरिबाचं नुकसान होऊ न देणं. गरिबाचं कधी नुकसान होऊ न देणं हीच आधुनिकता आहे यावर पूर्ण एकमत झालं.

63) विशिष्ट सणांना, प्रसंगांना दान देणं – एरवी देण्याला नकार/या कर्तव्याबद्दल कधीच काही विचार न करणं/समाजासाठी काहीतरी केलंच पाहिजे, याची सतत सक्रिय जाणीव ठेवणं./समाजासाठी सतत काहीतरी केलं पाहिजे अशी जाणीव, प्रयत्न म्हणजेच आधुनिकता याबद्दल एकमत झालं.

64) वैवाहिक आयुष्यात कायम बायकोनी जुळवून घ्यावं अशी नवऱ्याची अपेक्षा असणं/वैवाहिक आयुष्य आपोआप चांगलं असेल असं धरून चालणं/चांगल्या वैवाहिक आयुष्यासाठी नवरा-बायको दोघांनी विवाहाचा अभ्यास करणं./नवरा-बायको दोघांनी अभ्यास करून समृद्ध विवाहासाठी प्रयत्न करणं हीच खरी आधुनिकता.

65) वाढदिवस प्रकरण म्हणजे आपल्या समाजातला गैरसमजुतीचा कहर आहे. तो साजरा करणं म्हणजे प्रेम व्यक्त करणं असं जवळजवळ सबंध जनता समजते.

आमच्याकडे भांडी घासणारी मुलगी सांगत होती की, तिला उसने पैसे हवेत. कारण तिच्या भाच्याचा वाढदिवस आहे आणि टीव्हीवर पैसे भरायचेत.

कारण एका चॅनेलवर वाढदिवसाच्या शुभेच्छा आणि फोटो दाखवतात. असं करणं ही जास्त आधुनिक गोष्ट आहे असं तिला तर वाटतंच, पण अनेकांना वाटतं.

आमचे तिघं मित्र आहेत. ते एकमेकांचे भागीदार आहेत. एकेकाळी हौसेनी एकमेकांचे वाढदिवस साजरे करायचे. साजरे करायचे म्हणजे बाहेर कुठेतरी एकत्र जेवायला जायचे. हळूहळू तिघांची लग्नं झाली. मग ते वर्षातून नऊ दिवस बाहेर जेवायला लागले. 6 लोकांचे वाढदिवस आणि त्यांच्या लग्नांचे वाढदिवस. मग काही वर्षात प्रत्येकी दोन दोन मुलं झाली. त्यांच्या वाढदिवसासकट एकूण 15 वेळा सगळ्यांनी बाहेर जेवायला जायला सुरुवात झाली. तशी दोन-चार वर्षं गेल्यावर सगळे वैतागले आणि वाढदिवसांची जेवणं त्यांनी थेट बंद करून टाकली. 'आता ही जेवणं बास' असं धाडसानी म्हणण्याचं काम प्रथम कोणी केलं, यात मला स्वारस्य होतं. नाही म्हणण्याचं साहस हाच तर मुख्य प्रश्न असतो. त्यांच्यातल्या 5 वर्षाच्या मुलीनी ते केलं.

काही लोक स्वतःला आधुनिक समजतात आणि त्यामुळे पाश्चिमात्यीकरणाचे बळी होतात. ते वाढदिवस साजरा करतात. पण केक, कँडल्स यांचा वापर करतात.

वाढदिवस साजरा करण्याचा आणि आधुनिकतेचा सुतराम संबंध नाही असं माझं पक्कं मत बनलं आहे./बऱ्याच चर्चेनंतरही हा मुद्दा निष्कर्षापर्यंत पोचला नाही.

66)आमच्या ओळखीच्या एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आहेत. एकदा बोलताना त्यांनी मनातली गोष्ट उघड केली. ऑफिसमधल्या कारकुनांनी, संस्थेत आलेल्या लहान वयाच्या मुला-मुलींनी त्यांना मान द्यावा अशी त्यांची अपेक्षा असते. त्या आल्यावर लोकांनी उभं रहावं, वाकून नमस्कार करावा या संस्कारातून त्या बाहेर येऊ शकत नाहीत/आधुनिकतेत हे बसत नाही. हा थेट पारंपरिक विचार आहे यावर गटात एकमत झालं.

67)मी एवढ्या वर्षांच्यात बघतोय. भाषण ही कल्पना थेट पारंपरिक आहे. छोट्या गटात लोकांच्या सहभागासकट कार्यशाळा ही आधुनिक आहे. माझा तर भाषण या कल्पनेला चक्क नकारच असतो./यावर जीवनसाथच्या सगळ्या जमलेल्यांच्यात एकमत झालं.

ही कार्यशाळा अतिशय चांगली, डोळ्यात अंजन घालणारी झाली असं सगळ्यांना वाटलं.

●

4) निष्कर्ष

आपण सगळे आधुनिकता आणि पारंपरिकता यांचं मिश्रण आहोत, हे प्रत्येकाला एव्हाना कळलंच असेल. कार्यशाळेच्या अगदी सुरुवातीला आपण असं म्हटलं होतं की, पारंपरिक मूल्यांचा पगडा म्हणजे संस्कार अशी सबंध भारताची समजूत आहे, पण सध्याची परिस्थिती समजून त्याला उत्तर शोधण्याशिवाय कोणाला पर्यायच नसतो. याचाच अर्थ, आधुनिकतेचे संस्कार समजून घेतल्याशिवाय दुसरा मार्गच नाही.

जीवनसाथ चालू झालं नव्हतं त्याकाळात देखील माझी भूमिका 'आधुनिकतेचा शोध' अशीच होती, पण तेव्हा गटचर्चा नव्हत्या. त्यामुळे वैयक्तिक वादाची जरूर पडायची. आता मी कुठच्याही परिस्थितीत वैयक्तिक वाद टाळतो. पण तेव्हा मलाही कळत नव्हतं ना!

एका व्यक्तीशी माझा झालेला वैयक्तिक पातळीवरचा वाद सांगतो. माझी बाजू जाहीरच आहे. ती व्यक्ती परंपरावादी होती. मी म्हणत होतो त्याचा सारांश असा होता–

खरी परंपरावादी भूमिका घ्यायची असेल तर प्रत्येक पुरुषानी याविषयी बोलण्यापूर्वी पारंपरिक वेषात माझ्यासमोर यावं. गोटा, शेंडी, धोतर, जानवं, बंडी, पायात चढावा. सकाळी देवपूजा करता का, संध्याकाळी संध्या म्हणता का, याचा प्रथम उलगडा करा.

बोलणारी स्त्री असली तर प्रत्येक विधवा स्त्रीनी प्रथम केशवपन करून, लाल नऊवारी लुगडं नेसून, अनवाणी माझ्यासमोर यायचं नि मग बोलायचं. प्रथम तुम्ही सती का गेला नाहीत, याचं उत्तर द्यायचं.

समोर येणारी सधवा स्त्री असली तर नऊवारी साडी, मंगळसूत्र, डोक्यावर पदर घेऊन माझ्याशी बोलायला यायचं.

एवढं बोलल्यावर पुढे चर्चा व्हायचीच नाही. माझा विजय झाला, असं मला वाटायचं. पण या सगळ्याचा काही उपयोग नव्हता. कारण माझं ज्ञान या पद्धतीनी वाढत नव्हतं. ज्ञान वाढण्यासाठी अभ्यास मंडळाखेरीज काही इलाज नाही.

इंटरनेट वापरणं ही गोष्ट आधुनिकतेत बसते याबद्दल शंकाच नाही. त्यात

मला दोन अडचणी मात्र दिसतात. एक म्हणजे बरीचशी माहिती पाश्चात्त्य असते. ती माहिती इतकी असते की आपल्याला त्यातलं काय हवंय हे ठरवतानाच दमछाक होते.

दुसरं म्हणजे माहिती किती खरी किती खोटी याची कोणावरच जबाबदारी नसते. कोणीही काहीही त्यावर टाकावं.

आधुनिकतेची एक निराळी व्याख्या आहे. आधुनिकता म्हणजे निसर्गाची मूळ योजना काय आहे ती शोधून ते सत्य म्हणून स्वीकारून त्या विचारांच्या जास्तीत जास्त जवळची कृती करणं.

आधुनिकतेची दुसरी व्याख्या अशी आहे की आधुनिकता म्हणजे कुठच्याही कल्पनेला, विचाराला नकार नसणं. करून बघायला तयार असणं.

आधुनिकतेचा एक अर्थ म्हणजे जास्तीत जास्त लोकांची ज्यानी प्रगती होईल, वैचारिक प्रगल्भता येईल अशा गोष्टीच्या, कृतीच्या सतत प्रयत्नात राहणं.

सरंजामशाही, हुकूमशाही ही पारंपरिक भारतीय पद्धत आहे. लोकशाही हा आधुनिक विचार आहे. ही गोष्ट राजकारणासारखीच कुटुंबव्यवस्थेलाही लागू आहे.

सगळ्या आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन भावनांकडे झुकलेला असणं हे पारंपरिक आहे. विचाराच्या दिशेनी वाटचाल ही आधुनिक आहे. या वाटचालीत दोन्हीचा समतोल साधता आला की खरी आधुनिक वागणूक म्हणायची.

आपण पारंपरिकता, आधुनिकता याचा अभ्यास मुख्यतः वैवाहिक आयुष्याच्या संदर्भात करतो आहोत. त्यामुळे महत्त्वाचा एक मुद्दा शेवटी मला सांगितलाच पाहिजे. एखादी गोष्ट करण्याची आधुनिक पद्धत कुठची आणि पारंपरिक पद्धत कुठची याबद्दल नवरा-बायकोत मतभेद होऊ शकतो. अशा वेळेला कोणी कोणाचं म्हणणं मानायचं याबाबतीतला पारंपरिक दृष्टिकोन म्हणजे पुरुषाचं बायकोनी ऐकायचं आणि वयानी मोठ्या माणसाचं धाकट्यानी ऐकायचं. आधुनिक दृष्टिकोनाप्रमाणे वयाचा आणि स्त्री का पुरुष याचा काही संबंध नाही. मध्य काढायचा. ते शक्य झालं नाही तर प्रत्येकानी स्वतःच्या मताप्रमाणे वागायचं.

अगदी शेवटी पुन्हा एकदा सांगतो. एखादी गोष्ट करून बघण्याची तयारी, बोलून बघण्याची, वागून बघण्याची तयारी ही खरी आधुनिक गोष्ट आहे. लहान मुलं आपल्या सगळ्यांपेक्षा जास्त आधुनिक असतात. कारण ती सतत करून बघतात, बोलून बघतात, वागून बघतात.

मी आणि शोभा शहरात राहतो, पण आमचे काही मित्र सुशिक्षित असून

छोट्या गावी मुद्दामून जाऊन तिथे स्थायिक झाले. मी आणि शोभा आधुनिक आहोतच. पण छोट्या गावात जाऊन राहणारे आणि अनेक शहरी सुविधा नाकारणारे आमचे मित्र आमच्यापेक्षा जास्त आधुनिक आहेत असं आम्हाला वाटतं.

एवढ्या सगळ्या आत्तापर्यंतच्या मुद्यांच्यात तुम्ही स्वतः, तुमचा जोडीदार, कुटुंब कुठे बसतं ते जरूर बघा. त्यासाठीच तर ही कार्यशाळा घेतली.

काही नवीन निकष सुचले तरी कळवा. पुस्तकाच्या पुढच्या आवृत्तीत त्याचा तुमच्या नावासकट समावेश करू.

●●●

एखादी गोष्ट करून बघण्याची तयारी, बोलून बघण्याची, वागून बघण्याची तयारी ही खरी आधुनिक गोष्ट आहे. लहान मुलं आपल्या सगळ्यांपेक्षा जास्त आधुनिक असतात. कारण ती सतत करून बघतात, बोलून बघतात, वागून बघतात.

10

खरे संस्कार म्हणजे नेमकं काय?

खरे संस्कार शोधल्याशिवाय पर्याय नाही हे सगळ्यांना मान्य होईल. म्हणजे नेमकं काय हा प्रश्न मात्र कठीण आहे. मला त्याबद्दल काय वाटतं ते सांगण्याचा प्रयत्न करताना पूर्वीचे संस्कार कसे होते, याचा आढावा घ्यावाच लागेल. आणखी एक गोष्ट अशी की, पारंपरिक ते आधुनिक अशी बाह्यरूपात आणि विचारात अशी 57 + 67 एवढ्यांची यादी खरी म्हणजे संपलेली नाही, पण उरलेल्या गोष्टींचा उल्लेख संस्काराविषयी बोलताना करू. सुरू करूया आता?

या पुस्तकसंचातल्या इतर लेखात ज्या मुद्यांची सविस्तर चर्चा झाली आहे असेही मुद्दे संस्कार या विषयाशी संबंधित असल्यामुळे इथे थोडक्यात घ्यावे लागतील. सध्या सगळ्या संस्कार संस्कार म्हणून ज्याला लोक ओळखतात त्यात काहीतरी नजरेला दिसणारं, म्हणजे फोटो काढण्याजोगं, अर्थात देखावा करण्याजोगं असावं लागतं. देखावा लक्षात राहतो, त्या तुलनेत शब्द लक्षात रहात नाहीत हे गेल्या काहीशे वर्षांत पक्कं झालं आहे. पण सध्याच्या संस्कारांच्यातला देखावा उरला, फोटो टिकले आणि त्यामागचा आशय हरवला अशी स्थिती आहे. थोडक्यात सध्याच्या संस्काराचा एका शब्दात अर्थ सांगायचा तर 'देखावा' हाच शब्द मला चपखल वाटतो.

माझ्या दृष्टिकोनातून संस्काराची आधुनिक व्याख्या प्रथम थोडक्यात सांगून टाकतो. जरा वेळानी त्याच्या तपशिलात शिरू. आधुनिक संस्कार म्हणजे 'बलवानानी दुर्बलाला मदत करण्याची कर्तव्य भावना'. या एका वाक्यावर तुमचा एकीकडे विचार चालू दे. दुसऱ्या बाजूनी संस्कारांचा इतरांना सध्या काय अर्थ वाटतो तो सविस्तर बघूया. एक महत्त्वाची अडचण अशी आहे, की चांगले

संस्कार असलेली व्यक्ती इतरांपेक्षा निराळी ओळखू येते. पण ते संस्कार नेमके करायचे कसे, त्याची युक्ती बऱ्याच अभ्यासकांना सापडलेली नाही. संस्कार करण्यासाठीचे गेली शेकडो वर्षं परंपरेनी सांगितलेले मार्ग उपयोगी नाहीत एवढं मात्र कळलेलं आहे.

शोभा, माझी बायको गरवारे बालभवनची संचालक आहे हे तुम्हाला माहितीच आहे. बालभवन हे रंजनकेंद्र आहे. दिवसभर शाळेनी अभ्यास अभ्यास करून मुलांना छळलेलं असतं आणि लहान मुलाला तर मोठ्या माणसासारखी ‘थोडं पडण्याची’ वगैरे जरूर नसते. मुलांना खेळायचं असतं. खेळत खेळत काही शिकायला मिळालं तर त्यांची काही हरकत नसते, पण ‘खेळत खेळत’ हे महत्त्वाचं. आयुष्यात पुढे अनेक विषयांचा संबंध येतो त्या प्रत्येक विषयाचं खरं तर शिक्षण व्हायला हवं. पण शाळा ठराविक 10 विषयांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. पालकांना वेळ नसतो. मग मुलं नुसतीच दंगामस्ती, खोड्या, टंगळमंगळ करत किंवा टीव्ही बघत शाळेनंतरचा वेळ घालवतात. त्याच्याऐवजी रंजनकेंद्र शाळेतल्या विषयांपलीकडचं आयुष्य शिकवतं, पण खेळत खेळत.

हे सगळं चालू असताना अनेक पालकांना हे समजत नाही की, हे मुलांवरचे संस्कारच आहेत. त्यामुळे पालक सारखे विचारतात की, इतरांसारखे ‘संस्कारवर्ग’ तुम्ही का नाही घेत? त्यांच्या दृष्टिकोनातून श्लोक, प्रार्थना, स्तोत्रं म्हणजे संस्कार असतो. याला काहीतरी उत्तर शोधायला पाहिजे म्हणून ‘संस्कार म्हणजे नेमकं काय?’ या विषयाच्या शोभाच्या आणि माझ्या अभ्यासाला सुरुवात झाली. आणखी एक गैरसमजूत म्हणजे संस्कार हे लहान मुलांवरच करायचे असतात. मला आणि शोभाला हे देखील पटत नाही. खरं म्हणजे आम्हाला वाटतं की, संस्कार कोणी करायचे नसतात. ते एखाद्या व्यक्तीवर इतरांच्या वागणुकीमुळे आपसूक होतात. थोडक्यात संस्कार घेता येतात, पण देता येत नाहीत, ही खरी अडचण वाटते आहे.

एक महत्त्वाची गोष्ट प्रथम सांगतो. समाजातल्या सगळ्या रूढी, परंपरा निरक्षरांसाठी योजल्या होत्या. अजूनही निरक्षराला रूढी पाळणं सोपं वाटतं. कारण लक्षात ठेवण्याच्या सोयीसाठी त्या निसर्गाशी, सूर्य-चंद्राशी, शेतीशी जोडल्या होत्या. सुशिक्षितांसाठी त्या रूढींची गरज नाही. पण हे स्पष्ट शब्दात कोणीतरी सांगण्याची गरज आहे. त्यामुळे ही गोष्ट सूज्ञांना कळण्याची शक्यता आहे की पारंपरिक रूढी पाळणं म्हणजे संस्कार नाहीत.

संस्कार आणि मूल्यशिक्षण यात फारच साम्य आहे आणि ते आयुष्यभर चालू असतं. 'चांगला शिक्षक कुठचा, तर जो शिकायला तयार असतो तो.' या वाक्याचा अर्थ सगळ्यांनी नीट समजावून घ्यावा, म्हणजे संस्काराचा अर्थही कळायला लागेल.

चांगले संस्कार झालेली व्यक्ती म्हणजे सुसंस्कृत व्यक्ती. आता चांगले म्हणजे काय, ते तपासूया. त्याचीही व्याख्या सोपी करता येईल. स्वतःचा विचार म्हणजे स्वार्थ. इतरांचा विचार म्हणजे परार्थ. आपण मुद्दामून परमार्थ न म्हणता परार्थ म्हणत आहोत, कारण त्याला भक्तीची लय देण्याची आत्ता कल्पना नाही. थोडक्यात, ज्या कृतीमधे स्वार्थ आणि परार्थ साधला जातो ती समतोल कृती. जो माणूस स्वतःच्या वागणुकीचा, बोलण्याचा दुसऱ्यावर काय परिणाम होईल त्याचा विचार करून, दुष्परिणाम टाळून वागतो तो सुसंस्कृत.

मगाशी आपण म्हणालो की, सध्याची परिस्थिती आणि प्रश्न समजावून घेतल्याशिवाय माणसाला पर्याय नाही. कारण त्या प्रश्नांची उत्तरं शोधावीच लागतात. पूर्वी इतिहासात काय झालं, कां झालं, प्रश्न कसे सोडवले, हे जरूर शिकावं. पुराणात, प्राचीन, अतिप्राचीन काळी काय करत होते, कसं करत होते, हे जरूर शिकायचं. पण या सगळ्याचा उद्देश सध्याचे प्रश्न सोडवणं हाच आहे. पूर्वी करत होते ती गोष्ट सध्याच्या संदर्भात सध्याच्या पद्धतीनी वापरली तरच त्याचा उपयोग होण्याची शक्यता आहे.

म्हाताऱ्या माणसांनी आपले पूर्वज काय करत होते हे जरूर जाणून घ्यावं, आपण स्वतः तरुणपणी काय करत असू हे जरूर आठवून बघावं, पण शेवटी सध्या आपण म्हातारे आहोत आणि म्हातारपणाचे म्हणजे सध्याचेच प्रश्न आपल्याला सोडवायचे आहेत हे लक्षात ठेवावं. तरुणपणी जशी उडी स्वतः मारली असेल तशी आता मारली तर धडपडायचीच शक्यता जास्त. आपण तरुणपणी बसल्या बैठकीत 50 जिलब्या खात होतो हे आठवायला हरकत नाही, पण आज त्या खायच्या का, याचं उत्तर नाही असं आहे. सध्याच्या परिस्थितीतलं सत्य काय, हे शोधणं म्हणजेच सत्यशोधक वृत्ती हाच खरा उपयोगी संस्कार आहे. आपला आजचा सगळा संदर्भ 'विवाह, आयुष्य आणि संस्कार' हाच असल्यामुळे वैवाहिक आयुष्यात नवरा-बायको दोघांनी, सबंध कुटुंबानी सत्यशोधक वृत्ती ठेवणं आणि त्याचा प्रवास एकत्र करणं याला काही पर्याय नाही. तोच खरा संस्कार.

शाश्वत तत्त्व कळणं, ती पाळणं कायम महत्त्वाचं असतं. तपशील मात्र बदलत राहतील. ते मान्य करण्यात शहाणपणा आहे. या विषयाच्या मुळात शिरून विचार केला तर एक गोष्ट स्पष्ट आहे की, पृथ्वीवरच्या इतर प्राण्यांच्यात आणि माणसाच्यात हाच तर मुख्य फरक आहे. माणूस आपल्या वागणुकीत सतत परिस्थितीप्रमाणे बदल करत गेला. पूर्वी माणूस हत्यार म्हणून टोकदार दगडाचा वापर करत होता. पुढे धातूचा शोध लागल्यावरही माणूस 'संस्कार संस्कार' असं म्हणत पूर्वी दगडी हत्यारं वापरत होता म्हणून मी दगडी हत्यारंच वापरणार असं म्हणायला लागला तर गोंधळच होणार. विस्तवाचा शोध लागल्यावरही 'संस्कार संस्कार' असा जप करत आग्रहानी कच्चं मांस खायला लागला असता तर तो वेडेपणाच झाला असता.

इतर प्राणी खाणं, झोपणं आणि प्रजोत्पादन एवढ्याच गोष्टी हजारो वर्षांपासून करतायत. एकेकाळी माणूसही एवढंच करायचा. पुढे बुद्धीमुळे माणूस भाषा शिकला. पण त्यांच्यापैकी कोणी कोणी म्हणू लागला की, माझे पूर्वज भाषा वापरत नव्हते. हा पारंपरिक संस्कार मला जपायचा आहे म्हणून मी भाषा वापरणार नाही, तर तो 'संस्कार' म्हणून मान्यच होणार नाही.

निरनिराळ्या भौगोलिक परिस्थितीमधे, हवामानाप्रमाणे माणूस प्रश्नांना उत्तरं शोधत गेला. 'अडचणीला उत्तर' म्हणजेच रीत म्हणजेच संस्कार असा अगदी त्याचा साधा अर्थ आहे. दहा निराळ्या भौगोलिक परिस्थितीतल्या दहा गटांनी दहा निराळ्या पद्धती शोधल्या. याचा अर्थ दहा निरनिराळे संस्काराचे अर्थ बनले. म्हणजेच दहा निरनिराळ्या संस्कृतींचा उदय झाला. त्या दहाही पद्धती निराळ्या होत्या, इथपर्यंत मान्य. पण त्यात उच्च-नीच हा विचार नव्हता. स्तर नव्हते.

आपण जीवनसाथ अभ्यास मंडळात नेहमी म्हणतो की, 'निराळं म्हणजे वाईट नाही', तो महत्त्वाचा विचार कुठून आला, हे आता स्पष्ट दिसेल. या सगळ्या पद्धतींना माणसानी पुढच्या काळात 'धर्म' असं नाव दिलं. त्यामधे 'माझा धर्म तो श्रेष्ठ धर्म' हेही प्रकरण घुसलं. धर्म या विषयाविषयी स्वतंत्रपणी आपण सविस्तर बोलणार आहोत. माणसाच्या खास बुद्धीमुळे माणसानी वाङ्मय, काव्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य अशा कलाही विकसित केल्या. संस्कार या कल्पनेला धर्म जोडला गेला, कला जोडल्या गेल्या.

वैयक्तिक पातळीच्या वादविवादावर माझा विश्वास नाही. त्यामुळे सामाजिक

प्रश्नाच्या चर्चेच्या पातळीवर संस्कार या विषयाचा अभ्यास करताना काय घडलं ते सांगतो. गटचर्चेत साधारणपणे दोन गट होते. एका गटाचं म्हणणं परंपरा पाळणं म्हणजे संस्कार आणि माझ्या गटाचं म्हणणं होतं, आधुनिकतेचा तोच खरा संस्कार. अनेक मुद्यांवर तासन्‌तास चर्चा झाली. पण त्यातला एकच महत्त्वाचा मुद्दा सांगतो. जुन्या काळातल्या परंपरा पाळणं म्हणजे संस्कार असं घटकाभर मान्य करू, पण किती जुन्या काळातल्या परंपरा म्हणजे योग्य पद्धती हे कसं ठरवलं? 50 वर्षांपूर्वीच्या पद्धती म्हणजे परंपरा, का 100 वर्षांपूर्वीच्या का त्याच्याही पूर्वीच्या? पूर्वीच्या परंपरा असं मान्य केलं तर त्या तोंडी सांगू शकणारं कोणी आता हयात नाही. त्या नीट लिहून ठेवलेल्या नाहीत. तारखेसकट एखादी गोष्ट मूळ प्रश्न, सोडवण्याची पद्धत, त्याचं कारण आणि नेमकं उत्तर असं लिहिलेलं असलं तर त्याला अर्थ आहे. नाहीतर ती कल्पना निरर्थक ठरते.

त्याशिवाय मूळ प्रश्न बदलला तरी पुढचा मजकूर कालबाह्य आणि गैरलागू होतो. याशिवाय 100 वर्षांपूर्वी म्हणजे किती पूर्वी? 200 वर्षं? 500 वर्षं? जितक्या पूर्वीच्या काळाचा संदर्भ आपण घेऊ तेवढं ते जास्त निरुपयोगी ठरणार आणि त्याचं अनुकरण आणि अंमलबजावणी अशक्य होणार. असा मुद्दा काढल्यावर चर्चा संपली. कारण या प्रश्नाचं उत्तर कोणाकडे नव्हतं आणि आजतागायत कोणी देऊ शकलेलं नाही. या परंपरावादातून पुढे अनेक रूढी, रीतिरिवाज, कर्मकांडं, चालीरीती बनल्या. त्याच्याविषयीही आपण स्वतंत्रपणी बोलणार आहोत.

मानसशास्त्राच्या अभ्यासातली सर्वात छान गोष्ट म्हणजे त्यामुळे अनेक कोडी सुटायला मदत होते. आपल्या प्रत्येकाच्यातले एक-तृतीयांश गुण-दुर्गुण आनुवंशिक असतात. ते गुण 8 पिढ्या आधीपासूनचे असं म्हणतात. त्यातली आनुवंशिकता समजू शकते, पण 8 पिढ्या याला फारसा अर्थ नाही. आणि 8 पिढ्यांएवढी नीट माहिती काढणं पण शक्य नाही. कुलवृत्तांत वगैरे असतात, वंश नावाची गोष्ट असते हे सगळं खरं, पण त्याबद्दलच्या ज्ञानाला फारच मर्यादा आहेत.

वंश याविषयी आपण नंतर बोलूया. पण हे एक-तृतीयांश गुण आपल्या हातात नाहीत, एवढा मुद्दा आत्ता मान्य करुया. उरलेले दोन-तृतीयांश आपल्या हातात आहेत आणि आपण त्यावर म्हणजे 'आत्ता' वर लक्ष केंद्रित करुया. आपल्यावर आई-वडील, नातेवाईक, शिक्षक यांच्याकडून संस्कार होतात. मित्र,

शाळा, इतर समाज यांच्याकडून होतात. त्याशिवाय आपण आपल्यावर स्वतः संस्कार करत असतोच. मी एखाद्या विषयावर वाचतो, बोलतो, ऐकतो, चिंतन करतो म्हणजे माझ्या स्वतःवर संस्कार होतात असा याचा अर्थ आहे.

आत्तापर्यंत अनेकांनी संस्कार याची व्याख्या केलेली आहे. आपण त्याचा साध्या शब्दात अर्थ शोधण्याचा प्रयत्न करुया. संस्कार म्हणजे व्यक्तीवर झालेला परिणाम. शरीरावर झालेले परिणाम या व्याख्येतून बाद केले तर उरले विचार आणि भावना यांच्यावरचे परिणाम. ज्या संस्कारांबद्दल आपण आत्ता बोललो आहोत त्यामधे 'सुसंस्कृत' म्हणजे फक्त सुसंस्कार अभिप्रेत आहेत. कुसंस्कार हेही संस्कारच, पण आपल्याला ते आत्ता म्हणायचं नाहीय. त्याच्या अभ्यासात आपल्याला स्वारस्य नाही.

संस्कार याचा शब्दार्थ परिणाम किंवा इंप्रेशन हे एकदा समजलं की तो परिणाम चांगला का वाईट हे पुन्हा आपल्यावरच अवलंबून असतं. सुसंस्कारही असू शकतो नि कुसंस्कारही असू शकतो. तो कुठच्या प्रकारचा संस्कार आहे हे ओळखायचं कसं, ठरवायचं कसं, हाच तर वादाचा विषय आहे. अमुक एक संस्कार चांगला का वाईट ठरवण्यासाठी मुळात पूर्वग्रहरहित दृष्टिकोन पाहिजे. जुनं ते चांगलं असं धरून चाललं तर चाचणीलाच परवानगी नाही, असा अर्थ होतो. सर्व परंपरावादी, रूढिप्रिय माणसांची मुख्य अट हीच असते की या प्रश्नाकडे निर्लेप दृष्टीनी बघण्याचीच परवानगी नसते. ती परवानगी आपल्याला आहे असं धरून चालून आपण असा शोध घ्यायचा प्रयत्न करुया की कशामुळे परिणाम होतो आणि कशामुळे परिणाम टिकतो?

निराळ्या कुटुंबात निराळे संस्कार असतात. त्या निराळ्या संस्कारात वाढलेली दोन माणसं एकमेकांशी लग्न करतात तेव्हा त्यांच्या निराळ्या संस्कारांचं मिश्रण होऊन आणखी तिसरी निराळी संस्कृती जन्म घेते.

हा मुद्दा नीट समजण्यासाठी शोभाच्या आणि माझ्या कुटुंबाच्या संस्कारांना समजण्याजोगी नावं देतो. माझ्या वडलांच्या संस्कारांना भागवत संस्कार म्हणजे 'भा'संस्कार म्हणूया. माझी आई माहेरची बाळ, म्हणजे तिचा 'बा' संस्कार म्हणूया. माझे आई आणि वडील मिळून जो संसार त्यांनी केला तो 'भाबा' संस्काराच्या आधारानी केला. साहजिकच माझ्यावरच्या लग्न होईपर्यंतच्या काळात मी भाबा संस्कृतीच्या पद्धतीनीच वागणार.

शोभाच्या वडलांचं आडनाव कोडोलीकर म्हणजे 'को' संस्कार. शोभाच्या

आईचं माहेर नाईक म्हणजे ‘ना’ संस्कार. या पद्धतीनी शोभाची लग्न होईपर्यंतची वागणूक ‘कोना’ संस्कारांच्या आधारावर बेतलेली होती. मी आणि शोभानी लग्न केल्यावर आम्ही जी नवीन संसाराची पद्धत तयार केली त्याला ‘भाबाकोना’ असं म्हणता येईल. आमची मुलं शोनील आणि आभा त्यांची लग्नं होईपर्यंत भाबाकोना पद्धतीनी वाढली.

शोनीलचं लग्न ॲनस्तेसिया इकॉनॉमूशी झालं. ॲनस्तेसियाच्या पूर्वजांविषयी मला माहिती नसल्यामुळे मी त्याला नुसतं ‘इ’ म्हणतोय. म्हणजे शोनील – ॲनस्तेसियाचा संस्कार ‘भाबाकोनाइ’ पद्धतीनी होणार. आभाचा नवरा श्रेयस फाटक. म्हणजे त्या दोघांचा संसार ‘भाबाकोनाफा’ पद्धतीनी होणार.

या सगळ्याचा सारांश एवढाच की, नवराबायकोचे संस्कार निराळेच असणार हे नीट पटणं, समजणं आणि वागताना ही गोष्ट समजून वागणं म्हणजेच आधुनिक संस्कार. हे आडनावाच्या अक्षराचं जसं उदाहरण आपण घेतलं तसंच रंगांच्या साहाय्यानी घेण्याचा ‘एक्सरसाइज’ आम्ही जीवनसाथमधे घेतो. कोणाचा रंग कुठचा मानायचा आणि तोच रंग का मानायचा, याला मात्र काही उत्तर नसतं. त्यासाठी आडनावाचं अक्षर वापरलं. आमचं कुटुंब उदाहरणासाठी वापरलं कारण त्यातल्या आडनावांची पहिली अक्षरं सोयीची आहेत.

तत्त्वज्ञानातला एक महत्त्वाचा विचार असा आहे की एकानी दुसऱ्याला सांगितलं त्याला ज्ञान म्हणायचं नाही तर जे दुसऱ्याला समजलं ते ज्ञान. त्याच तर्कपद्धतीनी ज्याचा परिणाम होतो आणि टिकतो तो संस्कार. तत्त्वज्ञानानी ‘संस्कृती’ याचा अर्थही असा सांगितलेला आहे की आसपासच्या सर्व वस्तू, प्राणी, माणसं यांचा विचार करून जबाबदारीनी वागण्याची पद्धत म्हणजे ‘संस्कृती’.

दुसऱ्या शब्दात आधुनिक ह्याचाच अर्थ सत्यशोधक वृत्ती. सध्याच्या प्रश्नांचे सर्व घटक लक्षात घेऊन जे उत्तर रास्त वाटेल तसं वागूया, असं खरं म्हणजे प्रत्येकानी ठरवायला पाहिजे. पण पारंपरिकतेच्या व्याख्येमधे बदल करायला परवानगी नाही. परंपरा म्हणजे काय, हे नेमकं माहिती नाही. त्यामुळे परंपरावाद्यांची वाटपण कठीणच आहे आणि आधुनिकतावाद्यांची वाटही खडतर आहे. आणि तरी परंपरावादी जास्त प्रमाणात आहेत ह्याचं कारण ते संख्येनी जास्त आहेत आणि त्या संख्येची ताकद त्यांना जास्त सुरक्षित वाटते. परंपरावाद्यांचं ठराविक वाक्य असं असतं, “आसपास बघायचं आणि जे चारचौघं करताहेत

तसं वागायचं''.

कुठचाही विचार करून बघायची तयारी असणं आणि नसणं या माणसाच्या 2 खऱ्या जाती. आधुनिक संस्कार म्हणजे ती तयारी असणं. पारंपरिकतेमधे 'याविषयी एक शब्द काढू नका' याची मोठी यादी असते. त्यामुळे पारंपरिकता आपल्या अभ्यासासाठी अगदीच काही कामाची नाही.

मगाशी वंश या विषयाबद्दल नंतर बोलूया म्हणालो ते राहून जायला नको म्हणून इथे सांगतो. माझंच उदाहरण घेतो, कारण ते सर्वात सोपं आहे. माझ्या वडलांचं नाव रामचंद्र, आजोबांचं शंकर, पणजोबांचं महादेव, खापर पणजोबांचं गोविंद इथपर्यंत मला माहिती आहे. 4 पिढ्यांच्या मागचं मला माहिती नाही. पणजोबांची मला काहीही माहिती नाही. आजोबांना मी प्रत्यक्ष भेटलेलो आहे, पण तेही थोडंच. माझ्या आईच्या वडलांना, माझ्या आजोबांना मी बघितलेलं आहे. त्यांचं नाव विष्णू होतं ते मला माहिती आहे, पण खलास. त्याच्यापूर्वीचं मला काही माहिती नाही. शोभाच्या आई-वडलांच्या बाबतीतली साधारण परिस्थिती अशीच आहे.

मला मानववंशशास्त्रातली आणखी काही माहिती नसल्यामुळे 8 पिढ्या हा विचारसुद्धा मी धड करू शकत नाही. कोणाच्याही पूर्वजांचा अपमान मला करायचा नाही, पण 'भागवत वंश' आणि त्याचं नाव राखणं वगैरे कल्पना मला अतिशयोक्त आणि अवाजवी वाटतात. मी भागवत कुलवृत्तांताचा ग्रंथ काढून त्यातून काही माहिती फार तर वाचून दाखवू शकीन. मला स्वतःला ज्याविषयी एवढी कमी माहिती आहे त्याचा मला 'अभिमान' कसा वाटेल?

व्यक्ती ओळखण्यासाठी पूर्वी फोटो, हाताचे ठसे, हस्ताक्षर, इतर संदर्भ नोंदी फारशा नव्हत्याच. त्या काळात 'अनिल रामचंद्र भागवत' असं मोठं नाव वापरण्यामागचा उद्देश आपण समजू शकतो. सारख्या नावाच्या दोन व्यक्तींबद्दल समजुतीचा घोटाळा नको, हे अगदी समजण्याजोगं आहे. पण सध्याच्या परिस्थितीत 'अनिल भागवत' एवढा उल्लेख केला तर गोंधळ शक्यच नाही.

आता त्याच्यापुढे जाऊन विचार करू. आडनावामुळे जात, धर्म कळतो अशा कल्पनेमुळे कित्येक लोक आडनाव गाळतात, पण 'अनिल रा.भा.' वापरतात. काही लोकं अनिल रा (म्हणजे रामचंद्र) आणि शं (शंकर हे आजोबांचं नाव) म्हणजे अनिल रा.शं. असं वापरतात. त्यात पुन्हा नवऱ्याच्या नावाच्या पद्धतीत आणि बायकोच्या नावाच्या पद्धतीत फरक करतात म्हणजे माझं

नाव अनिल रा. शं. आणि शोभाचं मात्र शोभा प्र (प्रमिला हे शोभाच्या आईचं नाव) अ (अनंत हे शोभाच्या वडिलांचं नाव). थोडक्यात, यामुळे आडनाव गाळणं हा एकच मर्यादित उद्देश साध्य होतो.

त्यात पुन्हा आईचं नाव आधी का, वडलांचं नंतर का, वगैरे प्रश्न उरतातच. त्यातला विचार असा असतो की, आईच्या पोटी जन्म होतो म्हणून तिचं नाव आधी. या सगळ्या प्रयत्नांचं आपल्याला प्रयोगाची मधली पायरी म्हणून कौतुक आहे, पण खरा मार्ग एकच. फक्त 'अनिल', फक्त 'शोभा'. लोकांना वाटतं, यात कायदेशीर अडचणी येतील. पण तसं नाही. कायद्यानी विशिष्ट पद्धत पाळून काहीही नाव घेता येतं. प्रश्न असतो स्पष्ट विचारांचा, निर्णयाचा आणि अंमलबजावणीचा. थोडक्यात, 'भागवत वंश' हा विचार प्रथम डोक्यातून काढणं, त्याआधी वडलांचं नाव न वापरल्यानी त्यांचा अपमान होईल का, नातेवाइकांच्या आक्षेपांचं काय करायचं, याचा विचार मागे टाकला, तरच मनानी मी फक्त 'अनिल' पर्यंत पोहोचू शकतो. एवढा सगळा विचार जर मी मांडू शकतो तर मी अजून 'अनिल भागवत' नाव का वापरतो हा प्रश्न तुमच्या मनात येईल. त्याचं साधं उत्तर असं आहे की, असा बदल करून तो बदल रुळण्याएवढं माझं आयुष्य उरलेलं नाही.

संस्कृती या शब्दाचा अर्थ सांगायला मगाशी सुरुवात केली होती ते आता सांगतो. संस्कार म्हणजे चांगला किंवा वाईट परिणाम हे आपण बघितलं. खूप मोठ्या जनसमुदायावर एकाच प्रकारचा झालेला संस्कार म्हणजे संस्कृती. नैसर्गिक भावना, वर्तणूक म्हणजे प्रकृती. त्यावरच्या चांगल्या संस्कारांनी बनते ती संस्कृती आणि वाईट संस्कारांनी बनते ती विकृती. मूल जन्मतं तेव्हा त्याची असते ती म्हणजे निर्लेप अवस्थेतली प्रकृती. पालक आणि समाज त्याच्यावर चांगले संस्कार करतात ती संस्कृती आणि वाईट संस्कारांनी बनते ती विकृती.

हे समजण्यासाठी एक प्रसिद्ध उदाहरण आहे ते दुधाचं. दुधामधे ठरवून मोजून थोडं दही टाकून त्यावर संस्कार केला तर त्याचं दही बनतं. दही नाही टाकलं आणि हवेतले जंतू त्यात मिसळले तर दूध नासतं. दूधाप्रमाणेच माणूस तसाच्या तसा राहू शकत नाही. त्याचं पुढे सुसंस्कृत दही, पुढे ताक, लोणी, तूप बनतं किंवा विकृत नासकवणी बनते. अन्न, वस्त्र, निवारा ह्या नैसर्गिक गरजा. त्यापुढे मानवानी बुद्धिमत्तेच्या जोरावर आरोग्य, मैथुन, ज्ञान, धर्म, भक्ती आणि मनोरंजन या गोष्टी विकसित केल्या. हे सगळं साधण्याची विशिष्ट पद्धत म्हणजे

संस्कृती. भारतीय पद्धत म्हणजे भारतीय संस्कृती. पाश्चात्त्य पद्धत म्हणजे पाश्चात्त्य संस्कृती. चिनी पद्धत म्हणजे चिनी संस्कृती.

त्यातली विशेष गोष्ट अशी आहे की आर्थिक स्तर बदलणं शक्य आहे, तुलनेनी सोपं आहे, पण सांस्कृतिक प्रकार पिढ्यान्‌पिढ्यांच्या परिणामामुळे बदलणं खूप कठीण आहे. मी आणि शोभा ठरवून अमेरिकेतून भारतात परत आलो आणि आमच्या बरोबरचे अनेक मित्र तिथेच स्थायिक झाले. आमच्या बरोबरीचे ते सगळे लोक सांस्कृतिकदृष्ट्या भारतीयच राहिले. त्यांची मुलं अमेरिकेतच जन्मली, वाढली. त्यांनी पुढच्या पिढीत अमेरिकनांशी लग्नं केली. आता त्यांची मुलं म्हणजे आमच्या बरोबरीच्या लोकांची नातवंडं सांस्कृतिकदृष्ट्या खरी अमेरिकन होतील. मधल्या पिढीला सांस्कृतिक रस्सीखेच सहन करावी लागली. कारण ती अटळ होती.

जगात कुठेही बघितलं तरी माणूस स्वतःची सोय शोधत असतो. योग्य वाटले, सोयीचे, फायदेशीर वाटले तर तो दुसऱ्या जमातीतले रीतिरिवाज उचलतो. जे सोयीचं वाटतं ते तो इतरांना सांगतो, पटवतो. त्यासाठी वाद घालतो. काहींना ते पटतं. त्यांचा गट बनतो. अशा लोकांची संख्या वाढते. मग तो समाजमान्य रिवाज बनतो. संस्कृती त्या नवीन रिवाजालाही सामावून घेते. वाद घालतानाची चर्चा जाचक असते. सर्वसामान्यांना ती झेपत नाही. असे सर्वसामान्य लोक संख्येनी जास्त असतात, पण ती माणसं रिवाजामधले बदल करण्याचं काम त्यातल्या त्यात ज्येष्ठ, हुशार, वाक्‌चतुर अशा पुढाऱ्यांवर सोपवतात. अशा पुढाऱ्यांना जेवढे बदल पटतात तेवढे बदल होतात.

पूर्वी असे पुढारी ब्राह्मण असायचे. ब्राह्मणाला अक्कल आहे, अहंकार आहे, पण लोभ नाही, हे सगळ्यांनी मान्य केलं होतं. त्यामुळे समाजातल्या चांगल्या प्रथांचं श्रेय ब्राह्मणांकडेच जातं आणि अनिष्ट, अन्यायकारक रीतींचा दोषही ब्राह्मणांकडेच जातो. ब्राह्मणांनी स्वतःला सोयीच्या आणि समाजाच्या कल्याणाच्या अनेक कल्पना समाजाला शिकवल्या. स्वर्ग–नरक ही कल्पना, पाप–पुण्याची कल्पना हे त्यांचं देणं आहे. सध्याची भारतीय संस्कृती जशी आपण आत्ता बघतो त्यापेक्षा कितीतरी निराळी होती असं म्हणतात. ही सगळी अनेक हजार वर्षांची प्रक्रिया आहे. संस्कृतीनी कायम सोयीची दखल घेतली आणि ती घेतलीच पाहिजे.

मगाशी म्हटलं तसं परंपरा पाळणं हा महत्त्वाचा संस्कार बहुमतानी

समजला जातो, पण परंपरा म्हणजे नेमकी कुठच्या काळातली परंपरा, हे ठरवणं फार कठीण असल्यामुळे खूप गोंधळ झाले. काही लोक परंपरांबद्दल प्रश्न उपस्थित करणारे होते. त्यांना गप्प बसवलं गेलं. मंत्र ब्राह्मण म्हणणार आणि परिणाम आपल्यावर होणार ही गोष्ट न पटणारे खूप आहेत, पण त्यांना आज जसं गप्प बसवलं जातं, तसंच तेव्हा अनेकपटींनी व्हायचं. हजारो वर्षांच्या परिणामांमुळे अजूनही परंपरेविरुद्ध फक्त खूप धाडस असलेला माणूसच बोलतो. आजही सर्वसामान्य माणसांचं डोकं परंपरांनी भरलेलं आहे. खऱ्या निर्लेप विचाराला त्यात स्थान नाही, ही मोठी अडचण आहे.

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ फ्रॉईड यांनी मानवी संस्कृतीबद्दल फार महत्त्वाच्या गोष्टी मांडल्या.

1) मानवी संस्कृती ही निर्बंधांवर आधारलेली आहे.
2) कामप्रेरणा, आयुष्य सुखाचं करण्याची धडपड आणि मरणाची भीती यांच्यावर मात करण्याचा केविलवाणा प्रयत्न म्हणजे संस्कृती.

प्रत्यक्षात या तीन मूळ प्रेरणांचा वास्तवाशी सतत संघर्ष म्हणजे आयुष्य.

महात्मा गांधींनी सबंध आयुष्याचा अभ्यास आणि चिंतन खूप केलेलं होतं. त्यांनी 11 व्रतं सांगून त्यांचं पालन केलं, ती अशी –

1) अहिंसा	7) अस्वाद
2) सत्य	8) सर्वत्र भयवर्जनम्
3) अस्तेय (चोरी न करणं)	9) सर्वधर्मसमानत्व
4) ब्रह्मचर्य	10) स्वदेशी
5) असंग्रह	11) स्पर्शभावना
6) शरीरश्रम	

एखादा परंपरावादी आग्रहानी म्हणाला की, मी ही एकादशव्रताची परंपरा पाळीन तर ती गोष्ट सत्यशोधक वृत्तीलाही मान्य होईल, कारण ती रास्त आहे.

महाराष्ट्राचे लाडके लेखक पु.ल. देशपांड्यांनी भारतीय संस्कृतीबद्दल खुबीनी खूप टीका केली. त्यांच्या विनोदी लेखनप्रकारामुळे ती टीका लोकांना बोचली नाही. पण एक-दोन ठिकाणी त्यांनी अगदी स्पष्टपणी म्हटलंय की, भारतीय संस्कृती ही ‘चूप बस संस्कृती’ आहे. माझी आणि त्यांची एक-दोन वेळा

कामानिमित्त प्रत्यक्ष गाठ पडली होती. एकदा अगदी थोडासा पत्रव्यवहार झाला होता. पण त्यांचं भारतीय संस्कृतिविषयीचं व्यक्तिगत मत विचारण्याची मला संधी मिळाली नाही.

मधल्या हजारो वर्षांच्या परंपरेच्या वातावरणातला सर्वात मोठा दोष म्हणजे विरोधी विचार व्यक्त करायला असलेली बंदी. प्रत्यक्षात मानसशास्त्राच्या अभ्यासात विरोधी विचाराचं स्वागत करावं असं म्हटलं आहे. कारण त्याशिवाय विचारमंथनच होणार नाही. स्वावलंबन, व्यक्तिस्वातंत्र्य या सर्वोच्च मूल्यांना परंपरा अतिशय घातक आहे. आजही सर्वसामान्य माणूस स्वावलंबनापासून खूप दूर आहे, व्यक्तिस्वातंत्र्याचा आव आहे, राजकारणात गुप्त पद्धतीनी निरर्थक मतदान स्वातंत्र्य आहे, पण रोजच्या कौटुंबिक जीवनात खरं व्यक्तिस्वातंत्र्य क्वचितच दिसतं.

आपल्या सर्वसाधारण घरातलं सर्वात लोकप्रिय वाक्य आहे, 'सांगितलंय तेवढं कर'. त्यापुढचं वाक्य 'स्वतःचं डोकं चालवू नको,' किंवा 'स्वतःचा शहाणपणा इथे दाखवू नको.' या तऱ्हेनी पारंपरिक संस्कारांनी विचार न करता मुकाटपणी ऐकायला शिकवलं, हे वाईट झालं.

मुद्दा समजण्यासाठी काही उदाहरणं घेऊया. 'पायगुण' नावाच्या कल्पनेनी हजारो वर्षं सुनांना छळलं. अजूनही आपल्या समाजाच्या डोक्यातून पायगुण पूर्ण गेलेला नाही. बाहेर जाताना कोणाला कुठे जातोस असं विचारलं तर म्हणे त्या माणसाचं काम होत नाही. प्रत्यक्षात त्याचा अर्थ असा आहे की, कौटुंबिक व्यवस्थापनाची गरज म्हणून त्या माणसानी कुठे जातो आणि केव्हा येणार, हे आपणहून सांगावं. पण खरी गरज विसरून निरर्थक गोष्टींची परंपरा मात्र टिकली.

परंपरेतले सगळे सण तर शेतीशी निगडित आहेत. एकेकाळी भारत खरोखरच शेतीप्रधान देश होता. शहरांची उपनगरं म्हणजे फळबागा होत्या. निसर्गात कुठची वनस्पती वर्षातल्या कुठच्या मोसमात मिळते तेव्हा ती वापरायचा सण योजला नसता तर ते धान्य, भाजी, फळं याची नासाडी झाली असती. वस्तू खोक्यात भरून दुसऱ्या ठिकाणी पाठवून विकणं तेव्हा शक्य नव्हतं.

आता शहरं मोठी झाली. जवळजवळ कुठचीही वस्तू ताजी किंवा डबाबंद तंत्रानी वर्षभर मिळते. घरात, दुकानात वस्तू साठवणं शक्य झालं कारण फ्रीझर्स आले. पूर्वी त्या विशिष्ट सणाची जाहिरात करण्याचा मार्ग नव्हता. दारावर तोरण, विशिष्ट फुलांचा विशिष्ट वस्तूंना हार ही परंपरा रुजवली की सगळ्यांना कळतं. त्यामुळे शहरात राहून सध्याच्या काळात या सणांना, तोरणांना काही अर्थ

राहिलेला नाही. पण परंपरावादी लोकांमुळे अजून घराघरात सणाचं कुठचं तरी सोयीचं स्वरूप अजून टिकलेलं आहे. त्याचं मुख्य कारण एकच. परंपरेमधे व्यक्तिस्वातंत्र्य राहून गेलं, एवढंच नाही तर स्वतंत्र विचार, अभिव्यक्ती यांना बंदी आहे.

आमच्या घरात आम्ही नवी आधुनिक परंपरा पाळतो. कुठचाही सण साजरा करायचा नाही आणि 365 दिवस आनंदी, समाधानी, शांत चित्त रहायचं अशी परंपरा आम्ही रुजवली आहे. पूर्वी शेतीप्रधान काळात अमुक एक पीक चांगलं आलं की आनंद व्यक्त करायचा, सण, समारंभ करायचा यात काही चूक नव्हतं. पण सध्याच्या काळात कॅलेंडरमधे लिहिलेली तिथी बघून सण साजरा करण्यानी शहरातल्या लाखो लोकांना खरोखर एकाच दिवशी आनंद होत असेल यावर माझा विश्वास नाही.

कामाला सुटी याचा आनंद शक्य आहे, पण सणामुळे नाही. पूर्वी सण वर्षभर सारखे विभागलेले होते. तसंही आता होत नाही. राजकीय हेतूंनी मतं मिळवण्यासाठी सर्व धर्माच्या सुट्ट्या कॅलेंडरमधे लाल दिसतात. वर्षातून विभागूनच्या ऐवजी त्या लागोपाठ येतात. शनिवार – रविवारला जोडून येतात, काय वाटेल ते होतं. माझ्या जलद गतीनी बांधकाम करवून घेण्याच्या व्यवसायात सण, परंपरा, सुट्ट्या ही माझ्यासमोरची गंभीर समस्या होती. त्याविषयी आपण स्वतंत्रपणी सविस्तर बोलणार आहोत.

परंपरेमधे काही चांगल्या गोष्टी होत्या हे मान्यच आहे. संस्कृत श्लोक पाठ करायचे असायचे. पाढे पाठ असायचे. संध्याकाळी दिवेलागणीपूर्वी म्हणजेच उजेडात घरात यायचं असायचं. ते दिनचर्येत रुजवण्यासाठी दिव्यांना नमस्कार करायचा असायचा. घरच्या सगळ्यांना रिपोर्ट करायचं की मी परत आलो आहे, यासाठी त्यांना नमस्कार करायचा असायचा. घरात टी.व्ही. नसल्यामुळे काहीतरी उद्योगाची मुलांना गरज होती. घरात समया, कंदिल किंवा विजेचे दिवे असले तरी एकूण प्रकाश कमी होता. कमी प्रकाशात सगळ्या मुलांनी एकत्र करण्याचा उद्योग म्हणजे श्लोक, पाढे, रामरक्षा, हनुमान स्तोत्र आणि काय आठवेल ते, पण सगळं तोंडी. मोठ्या मुलांच्याबरोबर लहान मुलंही हे सगळं म्हणत असल्यामुळे त्यांचंही हळूहळू सगळं पाठ व्हायचं.

माझेपण पाढे पाठ होते, त्याची एक गंमत सांगतो. मी वयाच्या बावीसाव्या वर्षी इंग्लंडमधे जाऊन नोकरी करायला लागलो आणि पुढे अमेरिकेत गेलो हे

आपलं पूर्वी बोलणं झालंय. त्या दोन्ही ठिकाणच्या ऑफिसमधे पाढे पाठ असणारा मी एकटाच होतो, कारण त्यांच्याकडे पाढ्यांची परंपरा नव्हती. आर्किटेक्चर विषयात आकडेमोडीचा बराच संबंध येतो. त्यात ब्रिटिश आणि अमेरिकन लोकांना फक्त कॅलक्युलेटर वापरता येतो. तोंडी गुणाकार – भागाकार त्यांना येतच नाहीत. त्यांना हातानी कागदावर लिहिण्याची सवय नाही. फक्त टाइपरायटर माहिती. माझं हस्ताक्षर उत्तम होतं. त्यामुळे तिथे माझे तोंडी गुणाकार आणि हस्ताक्षर ही त्यांना जादुगिरीच वाटायची.

भारतात खूप निरनिराळे धर्म, जाती, राज्यं, भाषा असं असल्यामुळे परंपरा वैविध्य खूप असतं आणि तरी हिंदू धर्मातल्या आणि त्यासुद्धा महाराष्ट्रातल्या परंपरा आपल्यासमोर येतात. महाराष्ट्रातही कोकणी, घाटी, खानदेशी, विदर्भी पद्धती म्हणजेच संस्कार निराळे असतात. बहुतेकांना वाटतं, विलायतेत म्हणजे पाश्चिमात्य देशात परंपरा नसतात. तसं अजिबात नाही. ब्रिटिश मॅनर्स नावाची गोष्ट मी प्रत्यक्ष अनुभवली आहे. ब्रिटिश आणि युरोपियन लोक अमेरिकेत गेलेले असल्यामुळे आपल्या दृष्टीनी ती सगळी पाश्चात्त्य संस्कृती हे एकच गाठोडं असतं. ते अजिबात खरं नाही.

त्यांच्या परंपरा आहेत, पण व्यक्तिस्वातंत्र्याचं मूल्य सांभाळत त्यांनी परंपरा जपल्या. आत्ता आपला तो अभ्यासाचा विषय नसल्यामुळे त्याविषयी अधिक आत्ता बोलत नाही. एवढंच सांगतो की, वाढदिवस, त्यासाठी गिफ्ट, पार्टी, रिटर्न गिफ्ट ही परंपरा विलायतेतून आपण घेतली आणि पुढे पाश्चात्त्यिकरणाच्या रेट्यात ती इथे रुजली. जशी ही परंपरा आपण घेतली तशी शर्ट, जाड कापडाची पँट, टाय, कोट ही पण उचलली. ब्रिटिशांनी आपल्यावर राज्य केल्यामुळे ते साहजिक होतं. पातळ, सुती कापडाचा लेंगा-झब्बा सोडून आपण पुरुष भलत्या सापळ्यात अडकलो. ब्रिटिशांच्या इंग्लंडमधे वर्षभर जिथे थंडी असते तिथे जी पद्धत सोय असते ती इथल्या उष्ण हवामानात कशी योग्य ठरेल? पण कुठच्याही रूढी-परंपरेतली मूळ कल्पना ती मुकाटपणी पाळण्याची असल्यामुळे भारताएवढ्या परंपरावादी देशात अशी चुकीची नवी परंपरा रुजू शकते.

माझ्या पिढीवर लहानपणापासून काही संस्कार झाले ते चांगलेच होते. खोटं बोलू नये, चोरी करू नये या कल्पना उत्तम होत्या. पण माझ्या आई-वडलांना हा संस्कार कसा करायचा हे माहीत नव्हतं. केवळ माझ्या आई-वडलांनाच नाही तर 60 वर्षांपूर्वी कोणालाच ते माहिती नव्हतं. दुसऱ्यावर

संस्कार करणं याला मानसशास्त्रात ‘दुसऱ्याच्या मनात विचार आणि भावना निर्माण करणं’ म्हणतात. संपूर्ण मानसशास्त्रातल्या सगळ्या पुस्तकांच्या अभ्यासात याचा खात्रीशीर मार्ग कोणालाही सापडलेला नाही. आम्हा मानसशास्त्राच्या अभ्यासकांसमोरचं ते सर्वात मोठं आव्हान आहे.

मी माझ्या लहानपणी चोरी नाही केली कधी, पण खोटं रोज बोलायचो. शाळेत जायचो नाही, कारण अभ्यासाची गोडी लागली नव्हती. शाळेच्या वेळेला घरातून बाहेर पडून दिवसभर कुठेतरी खेळून शाळेच्या सुटण्याच्या वेळेला घरी यायचो. रोज आईचा आणि वडलांचा मार खायचो. माझ्या आई-वडलांना ‘खरं बोलणं’ हा विचार माझ्या मनात निर्माण करायचा होता. त्यांना माहिती असलेले तीन मार्ग ते वापरत होते. एक शपथ. ‘पुन्हा कधी खोटं बोलणार नाही’ अशी शपथ ते मला घ्यायला लावायचे. दुसरा मार्ग देवासमोर हात जोडून उभा रहा आणि देवाला सांग, ‘मला चांगली बुद्धी दे’. तिसरा मार्ग मार. आधी आई मारायची नि संध्याकाळी कामावरून आल्यावर वडील मारायचे.

मी मानसशास्त्राचा शिस्तशीर अभ्यास असा मार खाल्ल्यावर 50 वर्षांच्या खंडानंतर केला. ‘शपथ, देव आणि मार’ या तीनही गोष्टींबद्दल माझं भरपूर चिंतन झालं होतं. आई-वडलांनी वापरलेल्या तीनही गोष्टींनी माझ्या मनावर संस्कार झाले, पण त्यांच्या मनात होते तसे नाही. माझ्या स्वतःच्या प्रेरणेनी मी काही वर्षांनंतर शाळेत अभ्यास करायला लागलो, त्यांच्या सांगण्यामुळे नाही. या गोष्टींबद्दल माझ्या मनावर संस्कार झाले ते असे. शपथ या गोष्टीवरचा माझा विश्वास उडाला. मी कट्टर निरीश्वरवादी झालो आणि मुलांना मारण्याचा सक्त विरोधी झालो.

निरनिराळ्या लोकांकडून मी हिंदू परंपरेतले ‘16 संस्कार’ असं ऐकलं होतं. माझे आई-वडील परंपरावादी नव्हते, सर्वसाधारणपणी आधुनिकतेच्या प्रवासाची तयारी असलेले निमआधुनिक होते. त्यामुळे पुढे मी या विषयाच्या अभ्यासाला लागलो तेव्हा आईकडून त्याबद्दल पूर्ण माहिती मिळाली नाही. पुढे शोभानी आठवून आठवून मला 16 संस्कारांची यादी दिली. ती इथे देतो. माझ्या आणि शोभाच्या संसारात ‘आधुनिक, वास्तव, खरे योग्य, उपयोगी संस्कार’ याच्या शोधात आम्ही असल्यामुळे आम्ही या 16 च्या यादीपैकी एकाच्याही भानगडीत पडलो नाही.

पूर्वीच्या काही पिढ्यांपूर्वी ‘एके काळी’ यामागचा अर्थ आम्ही समजू

शकतो, कारण कुठच्याही गोष्टीचा नीट समजल्याशिवाय नकारात्मक विचार करायचा नाही हा संस्कार आमच्यावर कायमचा झालेला आहे. आमची होकाराची यादी आणि नकाराची यादी साक्षेपानी विचारपूर्वक बनवलेली असते. पुढे आपण याविषयी सविस्तर बोलणार असल्यामुळे आत्ता ती देत नाही. पण मी एवढं नक्की सांगू शकतो की, संस्कार याचा साधा अर्थ 'होकार आणि नकाराची यादी' असाही होतो. 16 संस्काराची यादी खाली दिलीय, पण त्याहीपेक्षा वागणुकीच्या बंधनांची खूप मोठी यादी परंपरेत बनायची. ती तोंडी असायची, आणखी ती यादी पुरुषांपेक्षा स्त्रियांवरच्या बंधनांची होती.

16 संस्कारांची यादी अशी होती. म्हणजे इतरांच्या दृष्टीनी अजूनही आहे.

1) गर्भसंस्कार, 2) डोहाळजेवण, 3) सटवीपूजा, 4) नामकरण, 5) जावळ, 6) उष्टावण, 7) मुंज, 8) सोडमुंज, 9) लग्न, 10) गर्भदान (पूर्वी मुलींची लग्नं लहानपणी व्हायची. लग्नानंतर पाळी यायची.) 11) साठी, 12) सहस्रचंद्रदर्शन, 13) मृत्यू, 14) मृत्युनंतरचा दहावा दिवस, 15) तेरावा दिवस, 16) श्राद्ध.

या यादीतल्या काही गोष्टी माझ्या आणि शोभाच्या लहानपणी झाल्या होत्या. त्याला आमचा इलाज नव्हता. उदाहरणार्थ – माझी मुंज झाली होती. पण पुढच्या पिढीत आम्ही निर्णय घेणारे असल्यामुळे आमच्या मुलाची शोनीलची मुंज केली नाही. सोडमुंजीचा प्रश्नच नाही. लग्नसमारंभ न करणं, लग्नविधी टाळणं पूर्णपणी आमच्या हातात होतं. मी आणि शोभा, शोनील आणि त्याची बायको ॲनस्तेसिया, आभा आणि तिचा नवरा श्रेयस यांच्या लग्नात लग्नविधी, त्यामुळे होणारे संस्कार असा विषयही निघाला नाही. साठी आम्ही दोघांनी केली नाही.

गर्भसंस्कार या कल्पनेत आमच्यापैकी कोणालाही तथ्य वाटत नाही त्यामुळे आम्ही त्या भानगडीत पडलो नाही.

मृत्यू आणि दहावा, तेरावा, श्राद्ध ह्या संस्कारांमागे 'पुनर्जन्म' या कल्पनेवरचा विश्वास हे कारण आहे. पुनर्जन्म मानला की गतजन्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य हा कल्पनांचा तांडाच्या तांडा समोर हजर होतो. माझा पुनर्जन्म या कल्पनेवर विश्वास नाही. शोभाचा विचार त्याच दिशेनी चालला होता. पण माझ्याइतका दृढ अविश्वास तिचा पूर्वी नव्हता. 1972 साली शोभाचे वडील वारले तेव्हा निर्णय घेणारे मी आणि शोभा नव्हतो. त्यांच्या मृत्यूनंतरच्या कर्मकांडात मी भाग घेतला

नाही, पण शोभानी घेतला.

1996 साली माझे वडील वारले. कर्मकांडं कमी होती, पण होती. मी आणि शोभानी त्यात भाग घेतला नाही. 1999 साली शोभाची आई वारली तोपर्यंत शोभा मृत्युविषयीच्या कर्मकांडं, रूढी, परंपरा यातून पूर्ण मुक्त झाली होती. इतका तिचा विचारांचा प्रवास झालेला होता. शोभाच्या नात्यातले काही लोक परंपरांबद्दल, मृत्युविधीच्या संस्कारांबद्दल आग्रही होते. त्यांना मात्र शोभानी विरोध केला नाही. माझी आई 2007 साली गेली. तोपर्यंत आमचं संपूर्ण कुटुंब परंपरामुक्त झालेलं असल्यामुळे अंत्यसंस्कारांचा प्रश्न आलाच नाही.

एवढ्या निरनिराळ्या संस्कारांचा ज्या कल्पनेतून जन्म झाला ती गोष्ट म्हणजे धर्म. प्रत्यक्षात माझा जैन मुस्लीम, पारसी, शिख, ख्रिश्चन, ज्यू, पॅगन अशा अनेक लोकांशी संबंध आला. त्यामुळे माझा निर्णय तरुणपणापासून ते आत्तापर्यंत पक्का होत गेला की, मी कुठच्याही धर्माचा नाही. मी हिंदू नाही. त्यामुळे मला जातही नाही. या बाबतीतही माझ्या मागून शोभाचा प्रवास स्पष्ट, अधिक स्पष्ट झाला आणि आम्ही दोघं धर्म आणि जात या बंधनातून मुक्त झालो.

मी आखाती देशात काम करायचो तेव्हा रोजच्या वागणुकीत प्रश्न यायचा नाही. पण अरब राष्ट्र जाहीरपणी मुस्लीम राष्ट्र असल्यामुळे आणि मी स्वतःला हिंदू मानत नसलो तरी त्यांच्या दृष्टीनी काफीर होतो. जो मुस्लीम नाही त्या माणसाला सूक्ष्मपणी निराळी वागणूक मिळते. त्यात माझं नाव असं. अनिल यात काही अडचण नव्हती, पण वडलांचं नाव रामचंद्र यात खूप अडचण होती. बाबरी मशीद आणि राममंदिर हे प्रकरण तेव्हा अगदी ताजं होतं.

आणखी एक किस्सा सांगतो. तो तर पुण्यात कर्वेनगरमधल्या आमच्या घरी घडलेला. जनगणनेसाठी दोन लोक आमच्या घरी माहिती घ्यायला आले होते. त्यांनी धर्म आणि जात विचारली. मी दोन्ही मानत नाही म्हणून सांगितलं. घरात कोण कोण रहातं, उद्योगकाय, वगैरे विचारून ते निघाले. मला उत्सुकता होती म्हणून म्हटलं, तुम्ही काय नोंदी केल्या? धर्म आणि जातीबद्दल काय लिहिलं? ते म्हणाले, 'असं उत्तर देणारे ब्राह्मणच असतात' आणि गेले. लोकांच्या डोक्यात धर्म आणि जात या दोन्ही गोष्टी किती प्रमाणात भरल्या आहेत त्याचं उदाहरण आहे हे.

धर्म मानणाऱ्यांना, कट्टर हिंदुत्ववाद्यांना वाटतं आणि त्यांच्या प्रभावामुळे अनेकांना वाटतं की, धार्मिक विधींमुळे माणसावर चांगले संस्कार होतात.

प्रत्यक्षात संस्कार याचा अर्थ परिणाम आणि तो परिणाम कशानी होतो हे 'ॲप्लाईड सायकॉलॉजी' आणि 'ग्रुप काउन्सेलिंग' यामुळे आम्हाला चांगलंच माहिती आहे. आमच्या जीवनसाथ अभ्यास मंडळात स्वतःची मुलं सांभाळण्याच्या बाबतीत बायकोच्या कष्टांचा विचार करण्याविषयीच्या चर्चेमधे एका पुरुषानी सगळ्यांच्या देखत सांगितलं की, इतके दिवस हा विचार जाणवला नव्हता, पण आता चूक लक्षात आल्यामुळे तो मुलांकडे लक्ष देण्यात बायकोला मदत करेल आणि तसा तो पुढे वागला. हा झाला खरा संस्कार. संस्कृत मंत्र लग्नाच्या धामधुमीत भटजींनी म्हणून हा या वर्णनाचा परिणाम कसा होणार?

एका विवाहित मुलीनी आपल्या आई-वडलांच्या कुठच्यातरी छोट्या चुकीमुळे त्यांच्याशी अबोला धरला होता. अभ्यास मंडळात जवळच्या माणसांच्या चुका माफ करण्याविषयी चर्चा चालू होती. मुलांवर आई-वडलांचं किती प्रेम असतं आणि लहानपणीच्या, तरुणपणीच्या किती चुका आई-वडलांनी सोडून देऊन पोटात घातलेल्या असतात हे दुसऱ्याच एका पालक आईच्या बोलण्यात आलं. ही विवाहित मुलगी रडू लागली. म्हणाली, 'यजमानांच्या राग राग करण्याच्या स्वभावामुळे, त्यांच्या आग्रहानी तिनी आई-वडलांशी संबंध तोडले. पण आता ती नवऱ्याला न घाबरता त्यांच्याशी संबंध जोडणार.' तिनी खरंच तसं केलं. हा झाला खरा संस्कार.

दुसऱ्या एका पुरुषानी बायकोला मारणं सोडून दिलं. कारण अभ्यास मंडळातली 'लोकशाहीचा खरा अर्थ' ही कार्यशाळा. धुरानी भरलेल्या वातावरणात मुंडावळ्या बांधलेल्या अवस्थेत गुरुजींनी ह्या अर्थाचा संस्कृत मंत्र लग्नात रेकून म्हणलेला होता. काय झाला त्याचा उपयोग?

आमच्या सत्यशोधक विचार पद्धतीत एकादशीचे उपास नसतात. उपास म्हणून फलाहार केला तर निदान आरोग्याला तरी फायदा होईल. पारंपरिक उपासात उपासाचे पदार्थ नावाचा एक जबरदस्त विनोदी प्रकार बघायला मिळतो. आरोग्याला अपायकारक, परदेशात जन्मलेले अनेक पदार्थ 'उपासाला चालणारे' म्हणून मिरवतात.

खरोखरच धर्म, त्यातून निघालेली कर्मकांडं, रूढी, परंपरा त्यातली अनेक करण्याची आणि न करण्याची पथ्यं यांच्यात उपास हा सर्वात हास्यास्पद प्रकार आहे. जो बटाटा काहीशे वर्षांपूर्वी भारतात पिकतच नव्हता तो उपासाचा पारंपरिक पदार्थ म्हणून मान्य! साबुदाणा आणि दाणे या गोष्टींनी हमखास वात

धरणार आणि पित्त होणार हे माहिती असून उपासाला ते चालतात. चर्चेच्या पातळीवर उपासाला चालणाऱ्या पदार्थांची तर्कसंगती सांगा म्हटलं तर 'असले प्रश्नच मुळात उपासाला चालत नाहीत' असं उत्तर मिळतं.

धर्म या गोष्टीकडे मानसशास्त्राच्या नजरेनी बघितलं तर त्यात खूप गोष्टी चांगल्या आहेत. प्रत्येक माणसाला मनस्वास्थ्य मिळणं फार आवश्यक असतं. त्या मनस्वास्थ्यासाठी त्याला दोन जाणिवांची गरज असते. एक म्हणजे आसपासची माणसं माझ्यासारखीच आहेत आणि त्या माझ्यासारख्या माणसांच्यामधे माझ्यातल्या विशिष्ट गुणामुळे मी खास आहे.

आसपासची माणसं उंची, रंग वगैरेंनी आपल्यासारखी असली की आपण स्वस्थ असतो. बाकी सगळे कॉकेशियन गोरे आसपास असले किंवा सगळे हबशी काळे, धिप्पाड असले तर भारतीय सावळ्या माणसाला स्वस्थ वाटत नाही. स्वतःला खास वाटण्याची गरज एकवेळ नाही पुरी झाली तरी चालते, पण स्वस्थ वाटण्यासाठी समान रूप, समान भाषा, समान विचार, समान सवयी, समान श्रद्धा यापैकी सगळं किंवा बरंचसं असायला लागतं. हे सगळं म्हणजे संस्कृती आणि हिंदू संस्कृतीच्या माणसाला तशाच प्रकारच्या म्हणजे समानधर्मी माणसांच्यात स्वस्थ वाटतं, ते महत्त्वाचं आहे.

याच प्रकारे मुस्लीम माणसाला पाकिस्तानात, बांगलादेशमधे स्वस्थ वाटतं. एकूण दृश्यं, मशिदी, दाढीवाले लोक आसपास असले की 'आपल्या लोकांच्यात' आल्यासारखं वाटतं. खरं म्हणजे धर्माचा मुख्य उद्देश सर्वसामान्य जनतेला स्वस्थ वाटणं हाच होता.

थोडक्यात काय, तर धर्म ही कल्पना मानसशास्त्राच्या अंगानी विचार केला तर अतिशय उत्तम होती. लोकसंख्या जशी वाढली तशी धर्म या कल्पनेवर आधारलेल्या प्रत्येक कृतीच्या शाखा काढून विकेंद्रीकरण करणं आवश्यक बनलं. धर्म ही कल्पना मानवनिर्मित असली तरी त्याचं महत्त्व वाढवण्यासाठी, छाप पाडण्यासाठी हा ईश्वरी आदेश आहे, असं सांगणं भाग पडलं. सरकारी ऑफिसमधे हुकुमावरून अशी पाटी असली की आपण मुकाटपणी आज्ञा पाळतो. त्याच पद्धतीनी प्रत्येक कृती, कर्मकांड 'ईश्वराच्या हुकुमावरून' असं धर्मश्रेष्ठींनी जनतेला सांगून टाकलं. काम फत्ते झालं नि काय!

'शास्त्रात असं सांगितलंय' असं म्हणणारे अनेक शास्त्री, महाराज, बुवा, थोडक्यात धर्मप्रेषित त्या व्यवस्थेत निर्माण झाले. विकेंद्रीकरण झाल्यामुळे त्यांच्या

पद्धती निरनिराळ्या झाल्या. सगळं देवाच्या आणि धर्मशास्त्राच्या नावानी चालायचं, पण कुठे चतुर्थीचं महत्त्व फार तर कुठे एकादशीचं. काही ठिकाणी पौर्णिमेला फार महत्त्व दिलं गेलं तर काही ठिकाणी अमावस्येला. हिंदू धर्मातही अनेक पंथ निर्माण झाले. पुढे त्यांच्या त्यांच्यात वादही भरपूर झाले. पण सगळं ईश्वरी इच्छेनी आणि धर्मशास्त्राप्रमाणे. कोण खरं, कोण खोटं ठरवणं अशक्यच होतं. कारण देव काल्पनिक असल्यामुळे निवाडा करायला येणार नव्हता आणि धर्मशास्त्र असं स्पष्टपणी लिहिलेलं अस्तित्वातच नव्हतं.

धर्माचं शिक्षण अनुकरणानीच मिळतं. घरातली ज्येष्ठ मंडळी जे, जसं करतील तसं करायचं, इतकं साधं त्याचं वर्णन होतं. अनेक पंथ असल्यामुळे अनेक पद्धती लोक पाळायला लागले. देवभक्तीचे प्रकार निघाले. कल्पनेतलाच देव म्हटल्यावर एक देव काय नि अनेक देव काय, देवी काय, त्यांचे अनेक प्रकार, आख्यायिका, सगळं अमर्याद झालं. अनेक प्रकारची कर्मकांडं, ज्योतिषशास्त्रावर श्रद्धा, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक इतकं ते कल्पनांचं अगडबंब भांडार लोकांसमोर आलं. यामुळे सांस्कृतिक उदारता आली. पूर्वीच्या परंपरेत नास्तिक हाही वागणुकीचा एक प्रकार म्हणून त्याचंही स्वागत केलं होतं, ही गोष्ट अनेकांना माहीत नसेल.

इतकी निरनिराळी विविधता असल्यामुळे आणि भाषेमधे खूप प्रगती झाल्यामुळे वेदांचं काम अनेकांनी मिळून केलं. त्याकाळी धन म्हणजे गायी. एकमेकांना द्यायचं तर तूप. तुपाचा संग्रह असायचा, असे उल्लेख सापडतात. मग वाङ्मय निर्माण झालं. त्यानंतर पुराणं. गोष्टी सांगून आपलं म्हणणं दुसऱ्याला पटवायचे ते पुराण. त्या काळात निरनिराळ्या ठिकाणी अनेक चर्चापीठं होती. त्यातून कुटुंब, नातं या कल्पना उदयाला आल्या. त्यात विवाह ही कल्पना निघाली. अनेकांशी लैंगिक संबंध इथपासून एक पती, एक पत्नी अशा विवाहाच्या कल्पनेपर्यंत समाज पोहोचला. विवाह, आयुष्य, आणि संस्कार याबद्दल आपण बोलणारच आहोत, पण जरा वेळानी. त्याआधी धर्मानी निर्माण केलेल्या रूढी याविषयी बोलूया.

मगाशी आपण म्हणालोच की, रूढी पाळणं म्हणजे संस्कार असं लोकांना वाटतं. रूढी-परंपरेबद्दल एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना रास्त मानण्याची भारतीय परंपरा आहे. ईश्वर नाही असं कोणी म्हणला तर समाज त्याला सतावून सोडतो. धर्म नाही असं म्हणताक्षणी आसपासचे, शेजारीपाजारी

जवळजवळ वाळीत टाकतात. जात नाही, धार्मिक विधी नाहीत, पत्रिका नाही, शुभ-अशुभ विधी नाही म्हणणाऱ्याला समाजाला तोंड देण्याची ताकद नसली तर तो तोंड उघडतो नि इतरांचे रागावलेले चेहरे बघून न बोलता तोंड बंद करतो. त्यामुळे ईश्वरवाद, धर्म, जात, पुनर्जन्म, कर्मकांडं यांना आम्ही विकार मानतो.

आमच्या विकारमुक्त पद्धतीचे लोक पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरात जास्त करून आहेत. मोठ्या शहरात मुक्ततेचं वातावरण जास्त आहे. छोट्या गावात एकमेकांवरचे रूढीचे ताण वाढवायला लोकांना वेळ खूप असतो. त्याचा ते व्यवस्थित सदुपयोग करतात.

खरं तर जन्मल्यापासून मरेपर्यंत काय करायचं म्हणजे वेळ कसा घालवायचा, हा अनेकांना पडलेला खरा प्रश्न असतो. हे एवढे देव, विधी, सण, समारंभ, व्रतवैकल्यं, संस्कार, परंपरा, मुहूर्त यामुळे वेळ व्यवस्थित जातो. माणसाला डोकं कशानी तरी भरावं तर लागतंच. त्यात भरायला या सगळ्या गोष्टींचा भुस्सा फार उपयोगी पडतो. सर्वसामान्यांमधे ह्या सगळ्या रूढी पाळणं हाच लोकप्रिय मार्ग आहे, हे सगळ्या पुढारी मंडळींनी ओळखलेलं असतं. त्यांच्या दृष्टीनी खऱ्या भाविकतेचा संबंध नसतो. नफ्याच्या धंद्याचा संबंध असतो. या भारतीय वातावरणात 'देवभक्ती धंदा' हा उत्तम चालणारा धंदा आहे. 'धर्म-धंदा' असाच जोरात फोफावणारा आहे. ज्योतिष व्यवसाय तसाच. त्यात इनव्हेस्टमेंट कमी, प्रॉफिट रेशो खूप. सध्याच्या राजकारणाच्या धंद्यामधे या साईड बिझिनेसचा आधार घेतल्याशिवाय चालतच नाही. फार पूर्वी संस्थानिकांच्या काळात राजा-प्रजा नात्यामधेही काही विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी प्रजेला दुबळं ठेवण्यातच जास्त फायदा होता. दुबळेपणा आणि ईश्वरभक्ती, धर्म-जात बंधनं, कर्मकांडं यांची जोडी पक्की जुळलेली आहे. जनतेची त्यातून मुक्तता ही सत्तेच्या राजकारणासाठी हितकारक नसते.

रूढी आणि परंपरा पाळणारे समाजात खूप मोठ्या संख्येनी असतात. कुठच्याही प्रश्नाला त्यांचं उत्तर साधं असतं. चारचौघं करत असतील तसं करूया. योग्य का अयोग्य, न्याय्य का अन्याय्य, स्वतःला पटणारं का न पटणारं, ह्या कशाचंही त्यांना महत्त्व नसतं. आसपास बघून जे इतर लोक करतायत ते आपण करायचं असा त्यांचा साधा निर्णय असतो. त्यांच्या दृष्टीनी जो वर्ग अनुकरण करण्याजोगा असतो त्याचं ते अनुकरण करत सुटतात. असं अनुकरण करण्याजोगे लोक म्हणजे त्यांच्यापेक्षा जास्त सुशिक्षित, श्रीमंत, सुस्वरूप, प्रसिद्ध, थोडक्यात

यशस्वी असतात.

कष्टकरी वर्गाला, आमच्या बांधकामाच्या साईटवरच्या कामगारांना, घरच्या मोलकरणींना आपलं अनुकरण करण्याची इच्छा असली तरी ते अनुकरण धड नसतं. आपण कुठचीतरी कृती का करतो, त्याच्यामागचा विचार त्यांना समजत नाही. त्यांना पैशानी, वेळेनी, बुद्धीनी, भावनेनी खरं अनुकरण झेपण्याजोगं नसतं. मग ते कुठचीतरी वरवर दिसणारी गोष्ट उचलून त्याचं अपभ्रंशित अनुकरण करतात. त्यांना स्वतः विचार करता येत नाही आणि नीट अनुकरण करता येत नाही.

आमच्या बांधकामावरचे मजूर दिवसभराच्या अंगमेहनतीच्या कामाला जाड कापडाची पँट घालतात, कारण सगळे साहेब लोक पँट वापरतात. प्रत्यक्षात लेंगा फार सोयीचा असतो. कामगारांच्यात अनेकांच्या घरी आईला मम्मी म्हणतात आणि ही मम्मी पूर्ण अंगठेबहाद्दर असते आणि करते काय तर धुणं-भांडी आणि केर-फरशीची कामं. आमच्या घरच्या धुणं-भांडी, केर-फरशी करणाऱ्या बायकांना तर काम करून निघताना 'जाते' न म्हणता 'येते' म्हणायचं, एवढाच संस्कार समजतो. भांडी स्वच्छ घासावीत, केर नीट काढावा, गैरहजेरी आधी कळवावी वगैरे संस्कार हे खरे महत्त्वाचे संस्कार असतात, पण ते त्यांना समजत नाहीत, जमत नाहीत. आपण मोबाईल वापरतो त्यामुळे तेही वापरतात, पण तो फक्त 'इनकमिंग कॉल्स'साठी. त्यांच्या मोबाईलमधे बॅलन्सच नसतो.

पूर्वीच्या काळी वर्तमानपत्रं, टी.व्ही., रेडिओ यातलं काही नव्हतं. 'मास कम्युनिकेशन मीडिया' यातला एकच प्रकार शक्य होता आणि तो म्हणजे उत्सव. खरं म्हणजे सभाच ती. पण त्याला धार्मिक रूढीचं स्वरूप दिलं तरच लोक यायचे. एकमेकांशी वार्तालाप व्हायचा. कोणाच्या तरी बोलण्याचा एखाद्यावर परिणाम झाला की तो माणूस तो परिणाम आणखी दुसऱ्यापर्यंत पोहोचवतो. अशा सभांमधून बऱ्याच विचारमंथनातून काही रूढी, परंपरांमधे बदल झाले, काही गळून पडल्या. ही एखादी रूढी नाहीशी होण्याची, बदलण्याची, नवीन रूढी बनण्याची क्रिया जर तेव्हा घडू शकत होती तर आत्ताही बदल करता येईल.

खरी गोष्ट अशी आहे की आपण सगळ्यांनी जबाबदारी घेतली आणि आधुनिक अर्थपूर्ण रूढी शोधून काढायचं ठरवलं तर त्याला वेळ लागेल, पण ते अशक्य नाही.

खरं म्हणजे रूढी सतत बदलत असतेच, पण त्याचा वेग कमी असल्यानी

आपल्याला स्वतःच्याच ते लक्षात येत नाही. आपण मगाशी म्हणालो तशी नवी रूढी बनवायची असेल तर ती विचारवंत, सामाजिक पुढारी, शिक्षक यांची जबाबदारी आहे. मी आणि शोभा जीवनसाथ आणि पालक विद्यापीठ या माध्यमातून हीच धडपड करतो आहोत, पण गरजेच्या मानानी त्याचा वेग फार कमी आहे. समाजाच्या बरोबर राहण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची संख्या खूप आहे. जुन्या कल्पनेचा आग्रह धरून बसणारे संख्येनी अगदी कमी असतात आणि नवीन कल्पना काढून त्या वापरून बघणारेही अगदी कमी असतात.

हे जुन्याच्या बाजूचे म्हणजे पारंपरिकतेच्या बाजूचे अल्पसंख्याक आणि आधुनिक अल्पसंख्याक शक्यतोवर एकमेकांना भेटत नाहीत, चर्चा करत नाहीत आणि वाटेलाही जात नाहीत. उदाहरणार्थ जीवनसाथमधे एकदा येऊन बघणारा माणूस कट्टर परंपरावादी असला तर मुळात तो पुढच्या वेळेला येतच नाही. त्यामुळे वादविवाद होतच नाही. आधुनिकतावादी माणूस आहे हे माहीत असलं तर परंपरावादी व्यक्ती, संस्था त्याला बोलवतच नाही आणि तो आपणहून तिथे फिरकतच नाही. 2% टक्के लोक आधुनिक आग्रही गटाचे, शहाण्णव टक्के लोक स्वतः विचार करून कुठचीही आग्रही भूमिका न घेणारे आणि 2% पारंपरिक आग्रही गटाचे असतात. यातलं खरं काय, हे कधीही ठरू शकणार नाही, कारण चर्चा होतच नाही.

मी आणि शोभा स्पष्टपणी जाहीररीत्या आधुनिक 2% मधले आहोत. आम्हाला रोजच्या वागण्यातल्या अनेक गोष्टी निरर्थक वाटतात, पण आम्ही वैयक्तिक वादाच्या स्वरूपात काही बोलत नाही. शहाण्णव टक्केवाला गट त्या रोज करत असतो. अगदी थोडी उदाहरणं देतो. तुम्ही कुठच्या गटात आहात ते तुम्हीच ठरवा.

पहिल्यांदा आलेल्या पाहुण्याला 'पहिल्यांदाच आलात. काहीतरी खाल्लंच पाहिजे, निदान चहा घ्या. अगदी काही नाही तर हातावर साखर तरी घ्या' असं सगळं आम्ही अनेक वेळा बघितलं आहे. पाणी देणं, ते सुद्धा भांडं भरून आणि मग एक घोट पाणी पिऊन बाकीचं टाकून देणं आम्ही बघितलं आहे. लग्न ठरलं की लाडू वाटणं, मुलगा झाला की पेढे वाटायचे, मुलगी झाली की बर्फी वाटायची, हे आम्ही बघितलं आहे. पेढा घेण्यासाठी उजव्याऐवजी डावा हात पुढे केला म्हणून मी लहानपणी ओरडाही खाल्ला आहे आणि फटकेही खाल्ले आहेत. घरच्या बाईनी नऊवारी का पाचवारी साडी नेसायची आहे याबद्दल पूर्वी

घराघरात खटके उडायचे. आता पंजाबी ड्रेस की पँट -टॉप यावरून चालतात. मुख्य मुद्दा असा की, या कार्यशाळेत तुम्हीच सांगा या रूढी बरोबर आहेत का? समजा, बदलायच्या तर तुम्ही काय बदल सुचवाल?

पारंपरिक भारतीय माणूस मी गेली 50 वर्षं न्याहाळतो आहे. सगळ्या रूढी–परंपरांमधे विचार करायला बंदी असल्यामुळे परंपरेबद्दलसुद्धा माणूस विचार करायला तयार नाही. त्याकडेही तो 'आपली रूढी, माझ्या वंशाची परंपरा, माझ्या धर्माचा रिवाज' अशा भावनेनीच फक्त बघू शकतो. योग्य-अयोग्य, न्याय्य-अन्याय्य, हितकारक-अहितकारक अशी चिकित्सा तो करूच शकत नाही.

संसाधनांच्यात, उपकरणात माणूस आधुनिक बनला. टी.व्ही., कॉम्प्युटर, मोबाईल तो अगदी सहजपणी हाताळतो. गेल्या काही वर्षातलं एखाद्या बिझनेस मीटिंगमधलं दृश्य असं असतं की मीटिंगसाठी जमलेली 5-6 माणसं आळीपाळीनी इतर कोणाशी तरी मोबाईलवर बोलतात. त्यामुळे सलग धड मीटिंग शक्यच नसते. ही माणसाची प्रगती म्हणायची का नाही? ह्या संस्काराला काय म्हणायचं?

घर फर्निचरनी गच्च भरून जातं आणि राहणाऱ्यांना हालचाल करायला धड जागाच नसते! शिवाय त्या फर्निचरची स्वच्छता, हलवाहलवी, दुरुस्त्या यांनी जीव उबतो. साधेपणातलं स्वातंत्र्य जे पूर्वीच्या संस्कारात होतं त्याचं काय झालं? मुलांच्या खेळण्यांची संख्या देखील इतकी वाढलेली असते की काही काळानी मुलं तिकडे बघायला तयारच होत नाहीत. ती खेळणी ठेवायला कपाटं बनवण्याचाच जाच जास्त. आधीच्या पिढीची काही श्रीमंत माणसंही माझ्या आठवणीत आहेत. घर मोठं पण फर्निचर थोडंच आणि मोजकं. ते साधेपणाचे पारंपरिक संस्कार मात्र विसरले गेले.

आणखी एक पारंपरिक संस्कार माझ्या लहानपणी घरोघरी दिसायचा, तो म्हणजे गरजूंना मदत करण्याचा. कितीतरी गरीब घरची मुलं जेवायला इतरांकडे वार लावून जायची. मोठ्या एकत्र कुटुंबात घरातल्या एवढ्या माणसांच्या स्वयंपाकात एक मुलगा जेवून जाणं यात कोणालाच ओझं वाटायचं नाही. आमचं कुटुंब कनिष्ठ मध्यमवर्गीयच होतं, पण आमच्याकडेही वारानी जेवणारी मुलं असायची. एकूणच निरपेक्षपणी इतरांसाठी काहीतरी करणं हा पारंपरिक संस्कार दिसेनासा झाला.

मी काही वर्षांपूर्वी पुढाकार घेऊन एक फॅमिली ट्रस्ट स्थापन करण्याचा

प्रयत्न केला होता. आमच्या नात्यात जो गरजू असेल अशा मुलाला/मुलीला सगळ्या इतर नातेवाइकांनी थोडी रक्कम दर वर्षी द्यायची, अशी ती कल्पना होती. त्याचं सगळं व्यवस्थापन बघायला मी तयार होतो. स्वतःही मी त्या ट्रस्टमधे पैसे घालणार होतो. एक-दोन मीटिंग्जनंतर पुढच्या वेळी मीटिंगला कोणीच न आल्यामुळे सगळं बारगळलं. मला असं ओझरतं कोणीतरी म्हणालं की, बंडखोर, निरीश्वरवादी, कर्मकांडविरोधी असा माणूस म्हणजे मी व्यवस्थापक म्हणून कोणालाच पसंत पडलो नव्हतो.

आपण ज्या ज्या गोष्टी बोलतो आहोत त्या सगळ्याचा संबंध आपल्या विवाह अभ्यासाशी सततच आहे. जोडीदार निवडताना काय काय गोष्टी बघायच्या, या यादीत बऱ्याच गोष्टी असतात. त्यातल्या बहुतेकांचा उद्देश सांस्कृतिक दर्जा तपासणं हा असतो. सांस्कृतिक दर्जाचा दाखला नसतो, कागदपत्रं नसतात, काहीच नसतं आणि तरी तो तपासायची जरूर असते.

साध्या शब्दात दुसऱ्याची कदर करण्याची क्षमता म्हणजेच भावनांक तपासायचा असतो. या पुस्तकसंचात भावनांक (ई.क्यू.) असा लेख आहे. त्यात या संबंधी बरेच तपशील आहेत. जोडीदाराचा ई.क्यू. तपासायचं मुख्य कारण 'दुसऱ्याची कदर' मधली दुसरी व्यक्ती म्हणजे आपण स्वतःच असतो की! असं म्हणतात की त्या घरात मोलकरणीशी कसं वागतात यावरून खूप गोष्टी कळतात. लोकशाहीची समज कळते, समानतेची समज कळते. स्त्री-पुरुष समानतेची पुरुषाची समज मुद्दामून जास्त कष्ट घेऊन तपासावी लागते.

शिकलेल्या मुला-मुलींना जोडीदाराच्या सांस्कृतिक दर्जाचा अंदाज यायला हवा असेल तर अभ्यासातले खास आवडते विषय, पत्रलेखनाचं प्रमाण, छंद, दैनंदिनी लिहिता का, वाचन काय प्रकारचं, मोकळा वेळ कसा घालवता, चित्रपट, नाटकं, टी.व्ही. पाहण्याचं प्रमाण याविषयीही समजून घ्यावं लागेल.

काही चालीरीतींविषयी बोलताना एक गोष्ट अगदी प्रकर्षानी आठवते. काही मित्रमंडळींना गृहीत धरणं म्हणजे जवळची मैत्री वाटते. न कळवता दुसऱ्याकडे जाणं आणि त्या मित्रानी सगळ्या गोष्टी सोडून आपल्यासाठी वेळ काढलाच पाहिजे अशी अपेक्षा करणं, ही त्यांची रीत असते. अशा प्रकारच्या एक बाई अकस्मात आमच्याकडे यायच्या, आमच्या कार्यक्रमांचा खूप गोंधळ करून ठेवायच्या आणि वर आमचं घर कर्मकांडविरोधी आहे हे माहिती असून त्यांच्या मनातल्या रीतिरिवाजांचा आग्रह धरायच्या. आमची मुलं तेव्हा लहान होती. त्यांची

दृष्ट काढायच्या. कानामागे काजळ लावायच्या. अशा आमच्या दृष्टीनी निरर्थक गोष्टींचा आग्रह धरायच्या. आमच्याकडे आम्ही काजळ ठेवत नाही म्हटलं तर मेणबत्तीवर काजळी बनवायच्या. दुसऱ्यावर कर्मकांडांची जबरदस्ती हीच त्यांची मैत्री, आपुलकी याची व्याख्या होती.

काही रूढी, रीतिरिवाज म्हणजे मोठ्या जनसमुदायाच्या वागण्याच्या पद्धतीबद्दल मला अनेक वर्षं कोडं पडलेलं होतं. मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे ते कोडं सुटलं. कोडं असं होतं की कोकणात चोऱ्या होत नाहीत, त्याचं कारण शोधणं. लोकांच्या वाड्या असतात. जमिनीभोवती कुंपणं नसतात. रस्त्यावर कुंपण, फाटक असं काही नसतं. घराभोवतालच्या वाडीच्या अंगणात कितीतरी उपयोगी वस्तू पडलेल्या असतात. रात्री त्या घेऊन जाणं अगदी सोपं असतं, पण कोणी नेत नाही. त्याचं साधं कारण असं सापडलं की, सगळ्यांचीच परिस्थिती तशी असते. स्वतः काचेच्या घरात राहणारा माणूस दुसऱ्याच्या घरावर दगड कसा मारेल? प्रत्यक्षात हे एक कोडं सोडवताना दुसरं कोडं सुटलं.

दुसरं कोडं असं की, भारतातले सर्व राजकीय पक्ष एकमेकांवर जाहीर चिखलफेक करतात, भांडाभांडीत एकमेकांवर तुटून पडतात, पण मोठमोठ्या पैशांच्या व्यवहारात भागीदाऱ्या करतात, ते कसं? कोड्याचं उत्तर कोकणातल्या वाडीसारखंच आहे. प्रत्येक पक्षाला, त्यातल्या प्रत्येक व्यक्तीला भ्रष्टाचारानी बरबटलेल्या काही खाजगी गोष्टी लपवण्याजोग्या असतातच. त्यामुळे जिथे जनतेला फसवून पैसे कमावण्याचा प्रश्न असेल तिथे ते एकत्र होतात. जनतेला मामा बनवण्याचं जॉइंट प्रॉजेक्ट ते हौसेनी गोडीत पुरं करतात. या बाबतीतही अपवाद आहेत, पण हाताच्या बोटावर मोजण्याजोगे.

एवढं सगळं रूढी-रीतिरिवाजाचं पुराण सांगण्याचा उद्देश एकच आहे. जी डोकी या परंपरांनी, कर्मकांडांनी पूर्ण भरली आहेत, त्या डोक्यांच्यात सध्याच्या आपल्यापुढच्या खऱ्या प्रश्नांविषयीच्या विचाराला जागाच शिल्लक नाही. वर आपण बोललो त्या निरर्थक गोष्टी डोक्यातून काढून टाकेपर्यंत कणभरही जागा होणार नाही आणि तोपर्यंत अर्थपूर्ण जगणं शक्य होणार नाही.

जेन साही या भारतात बंगलोरमधे स्थायिक झालेल्या मूळच्या ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञ बाईंनी भारतात पाळतात त्या रूढी, कर्मकांडं महत्त्वाची मानलेली आहेत. मला हे माहिती आहे ते 'एज्युकेशन अँड पीस' या इंग्रजी पुस्तकाचं मराठी भाषांतर शोभा करतेय म्हणून. जेन साहीच्या म्हणण्याप्रमाणे कर्मकांडं

माणसांना जोडून ठेवतात म्हणून महत्त्वाची आहेत.

मला जेन साहीचा मुद्दा पटत नाही. प्रत्येक गोष्टीला उपयोगी आधुनिक पर्याय शोधण्याच्या मी सतत मागे असतो. माझ्या मते, माणसांना जोडण्यासाठी, माणसांनी एकमेकांना धरून राहण्यासाठी सर्वात उपयोगी आधुनिक पर्याय म्हणजे 'बलवानानी दुर्बलाला मदत करण्याची कर्तव्य भावना' हा संस्कार. ही गोष्ट मी इथे सविस्तर समजावून सांगतो, कारण नुसत्या या एका वाक्यानी पुरेसा परिणाम म्हणजेच संस्कार होणार नाही.

जवळजवळ प्रत्येक माणूस कशात तरी बलवान असतो आणि दुसऱ्या कशामधे तरी दुर्बल असतो. या माझ्या संस्काराच्या कल्पनेप्रमाणे प्रत्येकजणानी आयुष्यभर कोणातरी दुर्बलाला मदत करत असायला पाहिजे आणि त्याचबरोबर स्वतः दुसऱ्या विशिष्ट बाबतीत दुर्बल असल्यामुळे मदत घेत असलं पाहिजे. हे नीट समजण्यासाठी काही उदाहरणं घेतो.

मी स्वतः काही बाबतीत शोभापेक्षा बलवान आहे. माझी शारीरिक ताकद शोभापेक्षा जास्त आहे. त्यामुळे माझं कर्तव्यच आहे की शोभाला एखादी जड पिशवी उचलायला मी मदत करायला पाहिजे. मी ती मदत केली तर तो चांगला संस्कार. नाही केली तर वाईट संस्कार.

शोभाला इतरांच्या भावनिक गरजेबद्दल माझ्यापेक्षा जास्त चांगली समज आहे. याचा अर्थ, भावनांकाच्या बाबतीत ती सबल आहे आणि तिच्या तुलनेत मी दुर्बल आहे. याचा अर्थ, मी तिची याबद्दलच्या सल्ल्याच्या बाबतीत मदत मागायला पाहिजे आणि तिचं कर्तव्य आहे की तिनी ती मदत केली पाहिजे. तो झाला योग्य संस्कार. तिनी मदत नाही केली तर तो वाईट संस्कार.

बांधकाम, त्याचं व्यवस्थापन यातलं मला खूप समजतं. म्हणजे त्या बाबतीत मी बलवान. दुसऱ्या एखाद्याला तेवढं नाही समजत त्यामुळे तो दुर्बल. मी त्याला मदत करणं हे माझं कर्तव्यच आहे आणि मी ती मदत खुशीनी करणं हा सुसंस्कार आहे.

मला तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि व्यवस्थापनशास्त्र यातलं इतर अनेकांपेक्षा जास्त समजतं म्हणून मी त्यात बलवान आणि आयुष्य जगताना धडपडतात ती जोडपी या बाबतीत दुर्बल. त्यामुळे वैवाहिक समुपदेशनात त्यांना मदत करणं हे माझं कर्तव्यच आहे. या भावनेनी मी त्याकडे बघणं हा सुसंस्कार. मी त्याच्याकडे निव्वळ धंदा म्हणून बघता कामा नये.

तत्त्वज्ञानात माझ्यापेक्षा बलवान लोक आहेत आणि मी त्यांच्या तुलनेत दुर्बल आहे. त्यामुळे मला मदत करणं हे त्यांचं कर्तव्य आहे असं त्यांनी मानणं हा सुसंस्कार. याच प्रकारे मानसशास्त्र विषयात माझ्यापेक्षा बलवान लोक आहेत. त्यांनी मला मदत करणं हा झाला सुसंस्कार.

मी इंग्रजी संभाषणकला, चांगलं हस्ताक्षर यामधे सबळ आहे. त्यामुळे मी त्या विषयातल्या दुर्बलांना मदत करणं हे माझं कर्तव्य आहे असं मी मानणं, हा झाला सुसंस्कार.

काही लोकांना पैसे कसे मिळवावेत, राखावेत याबद्दल समज नसते. त्यांच्या तुलनेत मला ते जास्त जमतं. हे ज्ञान मी त्यांना माझं कर्तव्य म्हणून द्यायला हवं हा सुसंस्कार. पण माझ्यापेक्षा चांगली पैशाची समज आणि व्यवस्था जाणणारे लोक आहेत. त्यांच्याकडून मी ते शिकायला हवं. ते मी शिकायला उत्सुक असणं आणि शिकवायला उत्सुक असणं हा सुसंस्कार आहे. श्रीमंत माणसाकडे पैसे आहेत म्हणून त्यानी पैसे वाटणं यापेक्षा त्यानी पैसे मिळविण्याचा मार्ग दुर्बलांना सांगणं हा सुसंस्कार आहे.

हा मुद्दा आत्तापुरता समजला तरी पुरे झालं. याच्यापुढे संस्कार या विषयाचे जे भाग आपण बोलणार आहोत त्या प्रत्येक बाबतीत ‘सबलानी दुर्बलाला मदत करणं म्हणजेच सुसंस्कार’ या दृष्टीनी आपण त्यांच्याकडे बघणार आहोत.

याहून परखडपणी हा मुद्दा मांडायचा झाला तर असं म्हणावं लागेल की, अश्रद्ध झाल्याशिवाय, श्रद्धा, परंपरा यांची पुटं स्वच्छ केल्याशिवाय नवीन कल्पना सुचू शकत नाहीत. जसं पाटीवरचा पहिला मजकूर पुसल्याशिवाय नवीन मजकूर लिहिता येत नाही, तसं.

भारतीय मनाला परंपरा, श्रद्धा यांची सवय आहे. सवय ही गोष्टच अशी असते. आपण अगदी रोज पन्नास वेळा करतो त्या गोष्टीत सुद्धा कुठच्या हातानी, पायानी, अवयवानी, कुठच्या क्रमानी आपण काय करतो हे ठरलेलं असतं. रोज आपण तसंच करतो. त्यात बदल झाला तर आपल्याला चमत्कारिक वाटतं. कुठच्या अवयवात तात्पुरता बिघाड झाला की मनाला त्रास होतो.

आपण एरवी उजव्या हातानी कामं करणारे असलो तरी आपण डाव्या हाताची मदत सततच घेत असतो. आपले बोलताना, एखादी गोष्ट वर्णन करतानाचे हातवारे देखील ठराविक लकब बनते. ती लकब बोलण्यात, नजरेत, चालण्यात कशातही आनुवंशिकरीत्या प्रकट होऊ शकते. तसंच परंपरांचं आहे.

परंपरागत मनाच्या सवयी आनुवंशिकरीत्याही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचतात.

आमच्या ओळखीचे काही लोक जाहीरपणे आधुनिकतेच्या प्रबोधनाचं काम करतात. परंपरेमधे सरस्वती पूजनानी शैक्षणिक कामाची सुरुवात करण्याची पद्धत आहे. त्याला ते विरोध करतात. त्यातले काही अशीही विधानं करतात की, सरस्वतीऐवजी तिथे फुले, आंबेडकर यांचा फोटो चालला असता. माझी वैयक्तिक धारणा मात्र अशी आहे की, तुम्ही तुम्हाला जे गोड वाटेल ते करा. मी कशातही भाग घेणार नाही. हार घालणार नाही, दिवे लावणार नाही, नमस्कार करणार नाही. मला अशी भूमिका सर्वात योग्य वाटते.

प्रत्येकजण स्वतःला पारंपरिक, निमपारंपरिक, निमआधुनिक किंवा आधुनिक यापैकी काहीतरी समजत असतो. समोरची व्यक्तीही आपल्या वागणुकीवरून आपल्यावर यापैकी कुठचातरी शिक्का मारतच असते. या दोन कल्पना जुळणाऱ्या असतीलच असं सांगता येत नाही.

देवधर्म, जात, ज्योतिष, पत्रिका, शुभ-अशुभ या सगळ्यांबद्दलच्या रीतींचं पॅकेज मानणारा तो पारंपरिक आणि न मानणारा तो आधुनिक असंही खरं नाही. आधुनिकतेमधे प्रगतीकडे वाटचाल, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणाचा विचार, लोकशाहीची समज, साधेपणा या सगळ्याचा समावेश आहे. हे न समजल्यामुळे पँट-शर्ट, सलवार-कमीज या आधुनिक रूपापलीकडे सामान्य माणूस पोहोचू शकत नाही. पॅकेजमधल्या सगळ्या कल्पना पूर्वीच्या समाजकारण्यांनी निराळ्या हेतूमुळे मुद्दामून लोकप्रिय केल्या होत्या. आता त्या कालबाह्य झाल्यामुळे त्यांचा स्वतःवरचा पगडा काढून टाकणं हा खरा आधुनिक विचार आहे, हे काहींना, अगदी थोड्यांना कळतं.

जीवनसाथ अभ्यास मंडळात आधुनिक म्हणजेच सध्याच्या काळातल्या प्रश्नांना उत्तरं शोधण्यासाठीच्या संस्कारांचा अर्थ सांगण्याचं काम चालतं. मी गेली अनेक वर्षं या विषयावर काम केलेलं असल्यामुळे मी यावर सलग भाषणं देऊ शकलो असतो. पण मी तसं करत नाही. कारण भाषणं मला पटत नाहीत. मी कार्यशाळाच घेतो. एक चिनी म्हण आहे ती याबाबतीत मला फार उपयोगी वाटते. 'ऐकलं-विसरलं, पाहिलं-लक्षात राहिलं, केलं-समजलं.'

एका गोष्टीबद्दल माझी खात्री झालेली आहे. नुसतं एकानी काहीतरी सांगितलं आणि दुसऱ्यानी ते ऐकलं म्हणजे संस्कार नाही. दुसऱ्याच्या वागणुकीत

बदल झाला तरच तो संस्कार समजायचा. जीवनसाथमधे मिश्रगट चर्चेचे 60 विषय एका यादीच्या स्वरूपात लिहून तयार असतात. त्या विषयांची समज वाढून त्याप्रमाणे माणसाची वागणूक बदलली की तो खरा सुसंस्कार मानायचा. संस्काराची एक सोपी व्याख्या आहे. 'सतत सदसद्विवेकबुद्धी वापरून वागणं' म्हणजे सुसंस्कार.

लहान मुलांवर चांगले संस्कार व्हावेत यासाठी काही लोकांनी गोष्टीरूपात जगण्याचं, वागण्याचं तत्त्वज्ञान लिहिलेलं आहे. ती कल्पना मला चांगली वाटते. शिकवण्याची पद्धत म्हणून मला ती उपयोगी वाटते. कीर्तनं सुद्धा चांगली पद्धत आहे. कविता ही कल्पना छान आहे. कविता गेय असते म्हणजेच चाल लावून म्हणता येते. ही चांगलीच गोष्ट आहे, कारण चालीमुळे ती जास्त लक्षात राहते.

या सगळ्या पद्धती मला पटतात. पण त्यातला आशय मला जीवन जगण्यासाठी उपयोगी वाटत नाही. कारण त्यातला आशय फक्त 'ईश्वराची भक्ती करा' या पलीकडे जात नाही. 'सबलांनी दुर्बलांना मदत' या आशयाबद्दल मी ठाम आहे. ते कळणं हाच खरा संस्कार. आता आपण संस्कारांचे काही गट करून त्याच्याबद्दल एकएक करून स्वतंत्रपणी थेट बारकाव्यात शिरून बोलू. ते गट असे.

1) आहाराविषयीचे संस्कार
2) आरोग्याविषयीचे संस्कार
3) पोषाखांचे संस्कार
4) निवाऱ्यासंबंधीचे संस्कार
5) विवाहासंबंधीचे संस्कार
6) मुलांवरचे संस्कार
7) पैशाबद्दलचे संस्कार
8) कामाबद्दलचे संस्कार
9) अभिरुचीचे संस्कार
10) मृत्युसंबंधीचे संस्कार
11) संस्कारांविषयी करण्याजोग्या गोष्टी

समाजाचा खरा प्रश्न आधुनिकतेच्या दृष्टिकोनातून शोधायचा असं ज्यांनी ठरवलं आहे ते आपापला मार्ग निवडतात. जगातल्या सगळ्या प्रश्नांना मी उत्तरं शोधीन असं कोणी ठरवलं तरी ते अशक्य आहे. त्यामुळे आपापल्या मार्गानी प्रत्येकानी प्रयत्न करत राहणं हेच नैसर्गिक आणि योग्यही आहे.

आसपासच्या समाजामधे पारंपरिक मूल्यांचा प्रभाव नक्की जास्त आहे, कारण तत्त्वज्ञानामधे आधुनिकतेचा जो खरा अर्थ सांगितला आहे तो लोकांना

माहिती नाही. आधुनिक याचा अर्थ सतत प्रत्येक गोष्टीतलं खरं काय ते शोधत राहाण्याचा प्रयत्न. या तत्त्वाप्रमाणे आणि या अर्थाप्रमाणे खरा आधुनिक माणूस आज जे योग्य वाटतं आहे ते आज करतो. पण नंतर त्याला निराळी कुठची गोष्ट योग्य आहे असं वाटलं तरी तो बदल करायला तयार असतो. आत्तापर्यंत आपण काही गोष्टी समजून घेतल्या त्याचा एक अगदी साधा निष्कर्ष आहे. पूर्ण आधुनिक किंवा पूर्णपणे पारंपरिक अशी व्यक्ती नसते.

आधुनिकतेच्या दिशेनी सतत वाटचाल करत राहणं आणि प्रश्नांना उत्तरं शोधत राहणं हाच खरा सुसंस्कार.

करायला हव्यात अशा गोष्टींची यादी एवढी मोठी आहे हे जर पटलं तर पुढचा प्रश्न मनात येणार. एवढ्या गोष्टींचं नियोजन कसं करायचं? त्यासाठी शोधलेला आधुनिक संस्कार म्हणजे सतत बाळगायची, खिशात किंवा पर्समधे ठेवण्याची डायरी आणि ती कशी वापरायची याची पद्धत. हा आधुनिक संस्कार खरा उपयोगी ठरणार आहे.

अकरा मुद्यांविषयी सविस्तर बोलण्याआधी तुमच्या आत्तापर्यंतच्या संस्कारांविषयी मला एकच विचारायचं आहे. तुम्ही सगळ्या लोकांशी कायम चांगले वागता का? सगळे लोक म्हणजे मुलं, म्हातारे, आपल्या धर्माचे, परधर्माचे लोक, आपल्या जातीचे, इतर जातीचे, आपल्या रंगाचे, भाषेचे, इतर रंगाचे, भाषेचे, सगळे लोक. मानव आणि मानवेतर सजीव प्राणीदेखील. चांगलं वागणं म्हणजे कोणालाही न दुखवण्याचा आटोकाट प्रयत्न करणं.

या प्रश्नाचं उत्तर मला सांगण्याची जरूर नाही. त्याविषयी तुम्ही स्वतः चिंतन करावं एवढीच इच्छा आहे.

●

आधुनिक संस्कार म्हणजे 'बलवानानी दुर्बलाला मदत करण्याची कर्तव्य भावना'.

1) आहाराविषयीचे संस्कार

काही वेळापूर्वी आपण सगळ्या परंपरा पाळणाऱ्यांना एक प्रश्न विचारला होता. पूर्वी जी रूढी होती ती म्हणजे परंपरा असा अर्थ असला तर पुढे प्रश्न असा की किती वर्षांपूर्वी? हाच प्रश्न आता आहारातल्या परंपरेबद्दल विचारूया. किती वर्षापूर्वीची आहारातली रूढी म्हणजे परंपरा? खरोखर शोधत मागे मागे गेलं तर एकेकाळी शेतीचाही शोध लागलेला नव्हता. मानव दोन गोष्टी खायचा. फळं आणि छोट्या आकाराचे प्राणी. थोडक्यात, मानववंशशास्त्राप्रमाणे सर्वात पूर्वीचा मानव फलाहारी आणि मांसाहारी होता. शिवाय फळांपासून दारू निसर्गातच बनायची. ती पण तो प्यायचा. त्यामुळे आहाराची खरी परंपरा कुठची असं विचारलं तर फळं, मांस आणि दारू असं उत्तर मिळतं.

हे खूप धक्कादायक आहे हे मला माहिती आहे. मी शहरात राहतो, आपला अभ्यास शहरी लोकांच्यामधला आहे. शहरी लोकांचा संदर्भ मनात ठेवून पर्यावरणाचा विचार केला तर मांसाहार पर्यावरणाला अगदी घातक आहे, हे मला पूर्ण माहिती आहे. मी आणि शोभा कट्टर शाकाहारी नाही, आम्ही अगदी कमी प्रमाणात मांसाहारही करतो हे अगदी खरं आहे. पण निव्वळ रूढी परंपरा यांचा विचार केला तर मांसाहारात काही चूक नाही, एवढंच मला म्हणायचं आहे.

अशी अनेकांची समजूत आहे की, आपण जो पदार्थ खातो त्याचे गुण आपल्यामधे येतात. मांसाहारामुळे माणूस पशूसारखा वागतो असं त्यांचं ठाम मत असतं. हे खरं असतं तर मनुष्यभक्षी जमाती अधिक माणुसकीनी वागल्या नसत्या का? पक्ष्यांचं मांस खाणाऱ्यांना उडता आलं नसतं का? अंगात शौर्य येण्यासाठी लोकांनी खाण्यासाठी वाघ, सिंहाची पैदास नसती का केली?

आहारातल्या परंपरा यामधे बरेच मुद्दे येतात ते आपण आता एक एक करून बघू. शाकाहारी लोकांची भारतात तरी संख्या जास्त आहे. भारतातल्या काही राज्यांत, उदाहरणार्थ – राजस्थान, गुजराथ इथे महात्मा गांधी, जैन धर्माची शिकवण अशा कारणांमुळे मांसाहारी लोक फारच कमी सापडतात. केवळ माहिती म्हणून सांगतो. शाकाहारी पदार्थात, त्यातल्या चवी, स्वाद, मिश्रणं, रोजचे तसेच खास पदार्थ याच्यातली विविधता, या बाबतीत भारताचा हात सबंध

जगात कोणी धरू शकत नाही.

मी आणि शोभा जगातल्या 165 देशांपैकी 35 देश हिंडलो आहोत. अनेक ठिकाणी शाकाहारी म्हणजे काय हे समजायलाही त्यांना कठीण जातं अशी अवस्था आहे. भारतामधे जसे तीव्र मसालेदार तिखट पदार्थ बनवतात तसेही ते खाऊ शकत नाहीत. तीव्र का सौम्य, हा आवडी-नावडीचा प्रश्न आहे. भारतामधल्या दुधापासून बनवलेल्या मिठाया, त्याचे अनेक प्रकार, बेसनापासूनच्या मिठाया, नमकीन पदार्थ हे सगळं अचाट आहे. पाश्चात्त्यांकडे दूध भरपूर आहे, पण दुधाच्या मिठाया नाहीत. त्या भारतीय दुकानांच्यातून आणाव्या लागतात. अर्थातच मोठ्या किंवा मध्यम शहरातच भारतीय दुकानं असतात.

विलायतेतल्या काही गमती सांगण्याजोग्या आहेत. आपण भारतीय माणसं तहान भागवण्यासाठी पाणी पितो आणि जेवणात मधेही पाणीच पितो. विलायतेत पाणी पिण्याचं प्रमाण कमी आहे. 1968 मधे मी इंग्लंडला गेलो तेव्हा राष्ट्रीय पातळीवर काही समाजप्रबोधनाच्या मोहिमा चालू होत्या. एक म्हणजे अंघोळीविषयी. त्या काळी सरासरी ब्रिटिश माणूस आठवड्यातून एकदा अंघोळ करायचा. आपल्याकडे जशी कुटुंबनियोजनाची मोहीम आखलेली होती, तशी तिथे लोकांनी अंघोळ करावी अशी राष्ट्रीय मोहीम होती. दुसरी मोहीम पाणी पिण्यासंबंधीची. ‘पाणी तब्येतीला आवश्यक, फायदेशीर असतं’ अशा चक्क सरकारी जाहिराती असायच्या. त्या काळी अशी वृद्ध लोकं मला माहीत होती की, ज्यांनी सबंध आयुष्यात पाण्याची चवच घेतली नव्हती. ते फक्त वाइन, बिअर असं काहीतरी प्यायचे.

आणखी एक गमतीची गोष्ट म्हणजे पाश्चात्त्यांना उष्टं, खरकटं वगैरे कल्पना समजत नाहीत. सारखी एकमेकांची चुंबनं घेण्याच्या प्रघातामुळे ओठांच्या स्पर्शाला त्यांचं मन निर्ढावलेलं असणार. पाश्चात्त्य माणूस एकाच्या ग्लासमधली बिअर दुसरा कोणी प्यायला तर त्याला अस्वच्छ मानतच नाही. खरकट्याची तीच तऱ्हा. उष्टं किंवा खरकटं या अर्थाचे इंग्रजी शब्दच नाहीयत. निराळ्या संस्कृतीत कशी निराळी गंमत असते बघा ना!

भारतीय संस्कारांप्रमाणे उष्टं म्हणजे अस्वच्छ अशी संकल्पना आपण मान्य धरून एक विचार मांडतो. या कल्पनेचा आधार घेऊन कुसंस्काराचा प्रभाव समजावून सांगतो. आपण तोंड लावून भांड्यानी पाणी प्यायलो की भांडं उष्ट म्हणजे अस्वच्छ होतं. त्याला आपण चुकीचा म्हणजे कुसंस्कार समजू. आपण जेव्हा ते भांडं विसळण्यासाठी त्यात पाणी ओततो तेव्हा भांड्यातला आधीचा

अस्वच्छपणा नवीन पाण्यात मिसळतो. आपण ते पाणी टाकून देऊन भांडं विसळलं म्हणजे स्वच्छ झालं असं मानतो, पण ते खरं नाही. कारण अस्वच्छतेचा काही अंश त्या भांड्यात असतोच. खरं म्हणजे अशा प्रकारे आपण ते भांडं कितीही वेळा विसळलं तरी अस्वच्छतेचा किंचित अंश त्या भांड्यात शिल्लक राहणारच. तसं संस्कारांचं आहे. काहीशे वर्षं, अनेक पिढ्या गेल्या तरी संस्कार पूर्ण धुवून काढणं शक्य नाही.

अभ्यासाच्या पातळीवर मांसाहाराकडे बघितलं तर अनेक चित्रविचित्र रूढी, परंपरा सापडतातच. एकदा जिवंत प्राणी मारून खायचा विचार मान्य केला की अमुक प्राणी खायचा असतो किंवा नसतो अशा प्रकारची रूढी निरर्थकच असते. मग ती मुस्लिमांची डुक्कर वर्ज्य ही परंपरा असो किंवा रोज सकाळ-संध्याकाळ मांसाहार करणारी व्यक्ती गुरुवारी मांस वर्ज्य म्हणते ही रूढी असो. सगळं निरर्थकच. त्यातला चव आवडणं न आवडणं हा भाग पूर्ण निराळा आहे.

जगात, विशेषतः चिनी संस्कृतीचा प्रभाव असलेल्या देशात पाली, साप, झुरळं, खेकडे, किडे सगळं खातात. एकदा प्रयत्न केला तेव्हा त्याची चव मलाही आवडली नाही. पण तत्त्व म्हणून त्याला चुकीचं म्हणण्याचं काही कारण नाही. भारतातही बंगाली लोक खास मासेखाऊ म्हणून प्रसिद्ध आहेत. मासे हा शाकाहाराचाच प्रकार बंगाली लोक मानतात. 'स्कँडिनेवियन कंट्रीज' म्हणजे डेनमार्क, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड यामधे 'रेनडियर'चं मांस खूप खास समजतात. त्यामधे प्रथिनं भरपूर आणि स्निग्ध भाग अगदी कमी असतो. भारतभर हिंदू जास्त प्रमाणात असल्यामुळे गाय, बैल यांचं मांस हा फार संवेदनाशील विषय आहे. एकदा गाईला देव मानलं की तिथे विचार बंदच होतो. भारताबाहेरच्या जगात मात्र गाय-बैलांचं मांस म्हणजे बीफ हे मुख्य अन्न आहे.

प्रत्यक्षात भारतात, मोठ्या शहरात, त्यातही मुंबई-पुण्यात पाश्चात्यीकरण प्रचंड प्रमाणावर झाल्यामुळे जंक फूडचं प्रमाण फार वाढलं. शाकाहारी, मांसाहारी या वादापेक्षा जंक फूडचं आक्रमण हा जास्त गंभीर आणि अपायकारक विषय आहे. शहरात कुठचाही खाद्य पदार्थ खऱ्या अर्थानी ताजा मिळूच शकत नाही. दूध नाही, भाज्या नाही, फळं नाही. एक-दोन दिवसांपूर्वीचं याला ताजं म्हणायचं.

घराबाहेर शाकाहारी पदार्थ खाल्ला तरी तो तीन-चार दिवसांपूर्वीचा फ्रीझरमधे ठेवलेला खावा लागतो. मांसाहारी पदार्थ आठ दिवसांपूर्वीचा का पंधरा

दिवसांपूर्वीचा हे ठरवणं कठीण आहे. सगळे बर्गर, पिझ्झा विकणारी किंग मंडळी यांच्याकडचे पदार्थ एका महिन्यापूर्वीचे ताजे असतात. नीट विचार केला तर मासे आणि त्यातही 'फिशटँक' मधला जिवंत मासा निवडून घेतलेला ही एकच गोष्ट ताजी असू शकते. त्यातही आपल्याला दाखवलेलाच मासा खरोखर आपल्या प्लेटमधे आला तर!

अशी एक कविकल्पना आहे की, मांसाहारी लोक वृत्तीनी हिंस्त्र असतात आणि शाकाहारी सौम्य असतात. हे अगदी म्हणजे अगदी खरं नाही. कशा पद्धतीनी जेवतात त्यावरही स्वभाव अवलंबून नसतो. मुस्लीम लोक एका ताटात जेवतात. पाश्चिमात्य लोकांना उष्टं, खरकटं याचा काही विधिनिषेध नसतो. डाव्या, उजव्या हाताचाही नसतो. या गोष्टींचा वागणुकीशी काही संबंध नसतो.

नुकतीच आमच्याकडे एक युरोपियन मुलगी जेवायला आली होती. ती हौसेनी चमचा न वापरता हातानी जेवणार म्हणाली. ती दोन्ही हातांचा सर्रास वापर करत होती. कशाला काय लावून खायचं हे माहिती नसल्यामुळे पोळी भाताला लावून खात होती. तिच्या बोटांच्या फटीतून उसळ निसटून ताटात पडत होती. आमचा नातू या गमती बघून खूष झाला. पाश्चात्य लोक मांसाहारी असले तरी त्याचेही शिष्टाचार असतातच. मांसामधली हाडं टाकण्याची विशिष्ट पद्धत असते. जेवणासाठी पाश्चात्त्य लोक टेबल-खुर्चीच वापरतात आणि काटा-चमचा-सुरीचा वापर करतात.

भारतीय पारंपरिक हिंदू माणूस खाली पाटावर बसून सदरा काढून जेवतो. निमपारंपरिक आणि निमआधुनिक या पद्धतीत तडजोड करतात आणि टेबल-खुर्ची मान्य करतात, पण इतर परंपरा पाळतात. ताटात डावीकडे काय, उजवीकडे काय, वर काय त्याचीही ठरलेली रीत असते. या सगळ्या निरनिराळ्या आहाराच्या शिष्टाचाराच्या पद्धती निराळ्या आहेत. पण त्यात चांगलं-वाईट, योग्य-अयोग्य, उच्च-नीच असं काही नाही हे समजून घ्यायला पाहिजे.

सर्वसाधारण भारतीय माणूस मनानी असं समजतो की, जेवणापूर्वी हात तर धुतलेच पाहिजेत आणि शक्यतोवर अंघोळदेखील झालेली पाहिजे. हा काही अंशी धार्मिक, काही अंशी उष्ण प्रदेशातल्या स्वच्छतेच्या कल्पनांचा संस्कार आहे. त्याच्या मनावर असाही संस्कार झालेला असतो की शौचाला आधी जायचं, त्यानंतर अंघोळ करायची. काही कारणामुळे या तपशिलात बदल झाला तर त्याला अस्वस्थ वाटतं. हे खूप बारीक तपशील आहेत हे मान्य आहे, पण

माझं निरीक्षण असं आहे की गेल्या 60-70 वर्षांत असे सवयीच्या संस्कारांचे आग्रह हळूहळू पुसट व्हायला लागले आहेत.

जी एक भारतीय परंपरा अगदी तातडीनी बदलण्याची गरज आहे ती म्हणजे दुपारी आणि रात्री दोन वेळा भरगच्च जेवणं. ते आरोग्यासाठी चुकीचं आहे हे अनेक वर्षांपूर्वीपासून सगळ्यांना माहीत आहे. पण यात बदल करणाऱ्यांचं प्रमाण फार कमी आहे. थोडं आणि विभागून अनेक वेळा खाणं ही एकच गोष्ट आरोग्यासाठी योग्य आहे. लंघन, विशिष्ट पदार्थ खाऊन उपवास, व्रतं, कुठचातरी खाण्याचा पदार्थ सोडणं या सगळ्या रूढी-परंपरेतल्या निरर्थक कल्पना आहेत.

शोभावर एका संस्काराचा खूप पगडा आहे. शोभा खाण्याचा पदार्थ कमी प्रमाणात, थोडासा, मोजका बनवूच शकत नाही. पाहुणे जेवायला आले की त्यानंतर तो पदार्थ आम्ही दोन दिवस तरी खातो.

आधुनिकतेची इच्छा असणारे पण प्रत्यक्षात अनेक तपशील, सवयी यांच्याबाबतीत खूप गोंधळ असणारे अनेक लोक आमच्या ओळखीचे आहेत. त्यांचे हेतू चांगले आहेत. ते त्यांच्या कुवतीप्रमाणे बदलण्याचा प्रयत्न करतायत हे मला समजतं, पण ते निमआधुनिक-निमपारंपरिकतेच्या पुढे जाऊ शकत नाहीत.

आमच्या ओळखीच्या एका कुटुंबातले एक आजोबा खादीच वापरतात आणि बायकोच्या हातचंच खातात. त्यामुळे बायकोवर केवढं ओझं निर्माण झालं. त्यांच्या खादीच्या पांढऱ्या झब्ब्यांची लाँड्रीची बिलं इतकी होतात की समुपदेशनात त्यांच्याबद्दल घरची लोकं तक्रारच करत होती. या आजोबांना कुठच्या गटात बसवायचं?

खाण्याच्या पदार्थांच्या बाबतीत जे पूर्वी त्यांच्या तरुणपणी आधुनिक मानलं गेलं होतं ते तसंच आमच्या ओळखीच्या एक वयस्कर बाई धरून बसल्या आहेत. एवढी वर्षं मधे गेली तरी त्या ते आग्रह सोडत नाहीत. आता त्यांना आधुनिक व्यक्ती असं कोण म्हणणार?

ज्यांचा आहारशास्त्राचा सर्वांगीण अभ्यास आहे ते लोकं या विषयातले बलवान. त्यांनी दुर्बलांना म्हणजे इतरांना याबद्दलचं ज्ञान कर्तव्यबुद्धीनी देणं हाच खरा सुसंस्कार.

●

2) आरोग्याविषयीचे संस्कार

परंपरा या विषयाचा अभ्यास करताना आरोग्यही त्यातून सुटत नाहीच. मगाशी आपण बोललो ती 2 वेळा भरपेट जेवण्याची परंपरा बदलायला हवीच आहे. मध्यमवर्गीयांचा अभ्यास आपण जीवनसाथमधे करतो. सगळ्या मध्यमवर्गीयांच्यात एक गोष्ट समाईक आढळते. ते भरपूर खातात. मी ओव्हरवेट आहे असा मी आधी उल्लेख केला, ते अगदी खरं आहे. त्याचं कारणही मला माहीत आहे. घरातला एकटा मुलगा म्हणून अगदी लहानपणापासून मी भरपूर खात आलो आहे. मला सगळे पदार्थ आवडतात. त्याखेरीज खास पदार्थ केला तरी तो मी सर्वात जास्त खायचा आणि एखादा पदार्थ उरला तरी तो खाऊन संपवण्याची जबाबदारी माझीच. चांगला भाग एवढाच होता की मी भरपूर व्यायाम करायचो. आपण सगळ्या मध्यमवर्गीयांनी करण्याजोग्या दोन गोष्टी म्हणजे कमी खाणं आणि रोज व्यायाम.

व्यायामाबद्दलही गैरसमजुती फार आहेत. माझ्या तरुणपणी माझ्या कॉलेजमधे पद्धतशीर व्यायाम नियमितपणी करणारे चार-पाच लोक होते. अशी काहीतरी गैरसमजूत होती की बुद्धीचं आणि व्यायामाचं वाकडं असतं. अशा चुकीच्या परंपरेमुळे माझ्या व्यायामशाळेमधे माझ्याइतकं शिकलेलं कोणीच नव्हतं. आनुवंशिकतेमुळे काही लोकांची हाडांची, बांध्याची ठेवण रुंद आणि मजबूत असते तर काहींची बारीक आणि सडपातळ असते. ग्राम्य किंवा व्यायामशाळेतल्या भाषेत त्याला ‘डबल हाड’ आणि ‘सिंगल फसली’ म्हणतात. अशा सिंगल फसली लोकांना भीती वाटते की व्यायाम केला तर ते आणखी बारीक होतील. त्यामुळे ते व्यायाम, वजनाचे जिम मधले व्यायाम टाळतात. प्रत्यक्षात मूळ सांगाड्यामधे बदल करता येत नाही हे खरं असलं तरी वजनांचा व्यवस्थित व्यायाम केला आणि तो सावकाश सावकाश वाढवला तर त्यांचेही स्नायू आकारानी वाढतात, बळकट होतात, छान दिसतात. सगळं काही होतं.

विनोबा भावे म्हणायचे की व्यायामानी स्नायूंची ताकद वाढते, पण कष्टांनी नसा (नर्व्हज) तयार होतात. अगदी बरोबर आहे. कष्टही हवेतच. खेळही हवेत. सध्याच्या शहरी मध्यमवर्गीय आयुष्यात तर अगदी कोपऱ्यावर जायचं तरी लोक

चालत जायच्या ऐवजी वाहन घेऊन जातात. सायकलचा वापरही कमी होत चालला.

भारतीय परंपरेतली आणखी एक वाईट गोष्ट म्हणजे पुरुषांनी व्यायाम करायचा आणि स्त्रियांनी नाही करायचा. कष्टकरी पुरुषही व्यायाम करत नाहीत. त्यांचं म्हणणं असतं की दिवसभराच्या कामातच त्यांचा व्यायाम होतो. हे म्हणणं पूर्णपणी चुकीचं आहे. काम, खेळ, दगदग आणि व्यायाम या गोष्टी निराळ्या आहेत. काम, खेळ, दगदग यात पूर्ण शरीराचा समतोल व्यायाम क्वचितच होतो. पण व्यायामात त्याचा क्रम, वेळ आपल्या हातात आणि त्यामुळे समतोल असतो. आरोग्याबद्दल ग्रामीण भागात काय चालतं याची माहिती म्हणून केवळ सांगतो. बायको गंभीर आजारानी अंथरुणावर असली तर तिच्यावरच्या इलाजापेक्षा दुसरं लग्न करू असं पुरुष म्हणतात.

आरोग्याच्या परंपरांच्या अभ्यासात एक खूप आश्चर्यजनक गमतीशीर गोष्ट समोर येते. एरवी आपण विचार केला आणि शहरी कष्टकरी माणसं आधुनिक का पारंपरिक असतात असा प्रश्न केला तर 'पारंपरिक' असं उत्तर मिळेल. पण काहीतरी आजार झाला की शहरातला कष्टकरी माणूस 'ॲलोपॅथी'चा डॉक्टर गाठतो आणि सुशिक्षित, मध्यमवर्गीय लोकं आयुर्वेद, होमिओपॅथी, नेचरोपॅथी यांचा प्रयत्न करतात. या सगळ्या पद्धतीतलं दुर्दैव असं की, जे दोन विषय खरे महत्त्वाचे आहेत, म्हणजे आहार आणि व्यायाम त्याविषयी कोणी काही सांगत नाहीत. नेचरोपॅथीमधे आहारावर जरा लक्ष देतात, पण व्यायामाकडे नाही.

भारतीय स्त्रियांवर व्यायामाचा संस्कार झालेला नाही हे सत्य मान्यच करायला हवं. शहरामधे काही मुली, वयस्कर स्त्रिया जिममधे जाताना दिसतात. काही सकाळी चालायला जाताना दिसतात. याचा अर्थ 'हल्लीच्या बायका व्यायाम करतात' असा होत नाही. अशा नियमित व्यायाम करणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण फार कमी आहे. त्याचं कारण असं आहे की त्यांच्यावर घरातल्या कामांची फार जबाबदारी असते. नवरे त्यांना पुरेशी मदत करत नाहीत.

पोहण्याच्या बाबतीतही स्त्रिया फार मागे आहेत. त्याची काही कारणं आपण समजू शकतो. पोहण्यासाठी आवश्यक असा पोषाख आणि भारतीय विकृत पुरुषांच्या नजरा याचा हा परिणाम आहे. मी माझ्या तरुणपणी रोज पोहण्याच्या तलावावर पोहायला जायचो. पोहायला उतरण्याच्या आधी शॉवर रुम्स, टॉयलेट्स अशा सोयी असायच्या. शॉवर घेऊन, टॉयलेटचा वापर करूनच तलावाच्या

पाण्यात उतरायचं अशा सूचना असायच्या. पाट्या असायच्या पण काही लोकं त्या सूचनांकडे दुर्लक्ष करताना दिसायचे. त्यामुळे पाणी खराब होत असणारच. त्यातले काही पाण्यात पोहताना लघवी देखील करायचे. सार्वजनिक आरोग्याबद्दलचा या लोकांवर संस्कार झालेला नव्हता, हे उघड आहे.

योग्य संस्कार म्हणजे योग्य परिणाम हे मान्य असलं तर संस्कार कुठच्याही वयाच्या माणसावर होऊ शकतात. लहान मुलांवर संस्कार याविषयी इथे सविस्तर सांगण्याचा उद्देश नाहीय. लहान मुलांनी दात घासणं, अंघोळ करणं, खाण्यापूर्वी हात धुणं, सगळे पदार्थ आवडीनी खाणं एवढं केलं तरी पुरतं. लहान मुलांसाठी संस्कार वर्ग म्हणजे काय असावं, नसावं हे आपण बोलतोच आहोत, पण मोठ्यांसाठीचा संस्कारवर्ग म्हणजे ही कार्यशाळा आहे.

भारतातली उष्टं, खरकटं, सोवळं, पारोसं ही कल्पना पाश्चात्त्यांना समजत नाही. त्याच्यामागची मूळ कल्पना स्वच्छतेचीच आहे. प्रश्न असा आहे की ज्यांना उष्टं चालत नाही त्यांना लहान मुलाची घेतलेली पापी, स्त्री-पुरुषांनी ओठांचं घेतलेलं चुंबन कसं चालतं? सोवळ्याला फक्त धार्मिक संदर्भ आहे. पारोशानी जेवण चालत नाही तर चहा, रात्रीचं जेवण कसं चालतं?

संस्कारांसंबंधी अगदी स्वतंत्र आणि प्रचंड काम भारतातल्या पुरुषांवर करणं जरुरीचं आहे ते म्हणजे व्यसनी लोकांवर. एकदा व्यसन लागलं की ते काम सुसंस्कार, समुपदेशन या कक्षेतून वैद्यकीय कक्षेत जातं. मी हा पुरुषांचा खास उल्लेख करतो आहे, कारण पुरुषांना स्त्रियांच्या तुलनेत फार मोठ्या प्रमाणात व्यसनं असतात आणि मुलं लहान असल्यापासून चुकीच्या पालकत्वामुळे ते होतं. प्रथम पालक शिक्षणाचे योग्य संस्कार पालकांवर करण्याचीच जरुरी आहे.

आई-वडील दोघांनाही त्यांच्या मुलांनी रोज नियमित व्यायाम करताना पाहिलं तर तो संस्कार मुलांवर आपोआप होणार. व्यसनं तर पालकांनी घातलेल्या अतिरेकी बंधनातून जन्म घेतात.

ग्रामीण भागामधे अशी शिकवणच असते की, पुरुषाला कसलं तरी व्यसन असलंच पाहिजे. पाळीव जनावरांना कामाला जुंपलेलं असतं. जनावरांना मालकांच्या व्यसनाच्या निमित्तानी 2-4 मिनिटं विश्रांती मिळते. त्यासाठी ही कल्पना मुळात निघाली. तंबाखू स्वस्त असल्यामुळे बिडी किंवा चुना-तंबाखू यापैकी कसलंतरी व्यसन बहुतेक ग्रामीण लोकांना असतंच. इथे आपण निर्व्यसनी म्हणजे सबल आणि व्यसनी म्हणजे दुर्बल म्हणूया.

सबलांनी दुर्बलाला ज्ञान देऊन मदत करणं याविषयी आरोग्याच्या बाबतीतही बरंच करण्याजोगं आहे. स्वतःचं आरोग्य चांगलं असावं अशी तीव्र इच्छा निर्माण होण्यासाठी पालकांची त्याबाबतीतली भूमिका इथपासून सुरुवात होते. मुलं पालकांचंच अनुकरण करणार हे उघड आहे. बाकीचं आरोग्य चांगलं असलं की व्यसनं आपोआप दूर राहतात.

●

3) पोषाखाविषयीचे संस्कार

कुठच्याही माणसाला आपण प्रथम भेटतो तेव्हा भेटल्याभेटल्या आपल्या मनात जे काही विचार येतात त्यामधे समोरचा माणूस समानधर्मी म्हणजे आपल्या प्रकारचा आहे की नाही याचा आपण अंदाज घेत असतो. प्रत्यक्षात पूर्ण आधुनिक किंवा पूर्ण पारंपरिक कोणीही असूच शकत नाही हे आपण बघितलं, पण त्या व्यक्तीचा कल कुठे आहे आणि आपण स्वतःला काय समजतो, या दोन गोष्टी आपण ताडून बघत असतो. ते ठरवण्यासाठी प्रथमदर्शनात त्याचा चेहरा आणि पोषाख या दोनच गोष्टी आपल्याला दिसतात. अगदी सुरुवातीला आपण आधुनिक आणि पारंपरिक म्हणजे नेमकं काय, हे बघायचा प्रयत्न केला. त्या यादीमधे पोषाख अगदी सुरुवातीला आहे. पण संस्कारांचा अभ्यास करताना हा विषय सुरुवातीला घेतलेला नाही. त्याचं कारण असं की, प्रत्यक्ष भेटीपूर्वी नुसत्या नाव, आडनावावरून त्या माणसाचा धर्म, उच्च-नीच जात, हे डोक्यात येतंच. माझ्या दृष्टीनी हे चुकीचं आहे, पण तरी ते मनात येतंच.

माणसाखेरीज इतर कुठचाच प्राणी कपडे वापरत नाही. फार पूर्वी माणूसही विवस्त्रच फिरायचा. त्यामुळे परंपरावाद्यांना विचारण्याजोगा एक प्रश्न हा होऊ शकतो. इतकं मागे जायचं का? किती मागे बघायचं? हाच तर गहन प्रश्न आहे. त्याचं उत्तर फार सरळ आहे. मागे जायचं, पण सोयिस्कर तेवढं मागे प्रत्येकजण जाणार. याचाच अर्थ प्रत्येकाची सोयीची व्याख्या निराळी असू शकते. तिथेच तर घोटाळा असतो आणि त्यावरून तर वाद होतात. हे वाद ज्यांच्यात होतात ती दोन्ही माणसं परंपरावादीही असू शकतात किंवा स्वतःला आधुनिक समजणारीही असू शकतात.

अमेरिकेतल्या पश्चिम भागात हवामान मध्यम, कधी उष्ण सुद्धा असतं. तिथे न्यूडिस्ट कॉलनीज आजही आहेत. त्या लोकांना परंपरावादी मानायचं का? आफ्रिकेत काही आदिवासी जमाती अजूनही कपडे वापरत नाहीत. पण तेवढे अपवाद सोडले तर एक नक्की, की लज्जारक्षण ही मानवाची सांस्कृतिक ठेव आहे. तो त्याच्या प्रगतीचा, विशेषत्वाचा झेंडा आहे आणि त्याला असाधारण महत्त्व प्राप्त झालेलं आहे. पूर्वीच्या वस्त्र नेसणाऱ्या मानवानी प्रथम चामडं

गुंडाळलं, काहींनी वल्कलं पसंत केली. बऱ्याच काळानी सुई-दोऱ्याची कल्पना प्रत्यक्षात आली. मग कापड निघालं, शेवटी कपडे आले. विचार करत किती मागे जायचं? पोषाखातली पारंपरिकता कशी ठरवायची?

कपड्यांचा मुख्य उद्देश हवामानापासून म्हणजे ऊन, पाऊस, थंडी, वारा यापासून संरक्षण करणं हा असल्यामुळे हवामानातल्या बदलाप्रमाणे कपड्यात बदल झाले. मग त्यात हौस आली. त्यातले शिष्टाचार, खास प्रसंगांसाठी खास पोषाख वगैरे प्रकरणं चालू झाली. निराळ्या भौगोलिक भागातल्या गरजा निराळ्या. त्याप्रमाणे पोषाख बनले. पण त्यामुळे पोषाखावरून लोक विभाग ओळखायला लागले. एका प्रांतातले लोक दुसऱ्या प्रांतातल्या पोषाखावर टीका करायला लागले, असभ्य समजायला लागले.

जगाच्या इतर भागातल्या आणि भारतातल्या वस्त्रांची तुलना केली तर असं दिसतं की, पारंपरिक भारतीय पोषाखात कमीतकमी शिवणकाम होतं. साडी, गाठ मारण्याची चोळी, पुरुषांचं धोतर, उपरणं, यात शिवणकाम नव्हतंच. पुरुष जास्त प्रमाणात एका विभागातून दुसऱ्या विभागात जायचे. पुरुषांचे 18 पगडीचे प्रकार होते. त्यावरून कुठच्या विभागातून माणूस आला हे कळायचं. तो एक प्रकारचा गणवेश होता. त्यावरून 'अठरा पगड जाती' वाक्प्रचार रुळला. पुढे अंगरखे आले तेव्हा शिवणकामाचा वापर सुरू झाला.

मागे आपण बोललो त्याप्रमाणे सत्यशोधक वृत्तीचा आणखीन एक महत्त्वाचा भाग सगळ्यांनी समजून घ्यायला पाहिजे. तो म्हणजे सत्यशोधन ही अखंड, अविरत चालणारी प्रक्रिया आहे. ह्याचाच अर्थ संपूर्णपणी आधुनिक अशी कोणीही व्यक्ती असू शकत नाही आणि संपूर्णपणी पारंपरिक असंही कोणी नसतं. हा विषय समजावून सांगण्यासाठी एक उदाहरण सांगतो. महाराष्ट्रातल्या सर्वसाधारण हवामानामधे दोन पिढ्या आधीचे पुरुष धोतर नेसायचे. धोतर पातळ कापडाचं असायचं. ही गोष्ट हवामानाप्रमाणे एकदम योग्य होती. काही लोकं पातळ कापडाचा पायजमा वापरायचे. तेही योग्य होतं. त्यानंतर ब्रिटिशांच्या अंमलामुळे जाड कापडाची पँट पुरुषांच्या वाट्याला आली आणि पँट घालणारा तो आधुनिक पुरुष असा सर्वसाधारणपणे समज झाला.

आता नीट, विवेकवादानी विचार केला तर अगदी स्पष्ट आहे की, इंग्लंडमधल्या हवेला जाड कापडाची पँट घालणं योग्य आहे आणि महाराष्ट्रातल्या हवेमधे पायजमा किंवा लेंगाच योग्य आहे. हे सगळं समजून देखील आज आता

एकविसाव्या शतकात असा प्रश्न समाजात बहुमतासाठी टाकला की पातळ कापडाचा लेहंगा वापरणारा माणूस आणि पँट घालणारा माणूस ह्यांच्यापैकी आधुनिक कोण? नव्वद टक्के लोकं पँट घालणारा आधुनिक असं म्हणणार हे आपल्याला माहिती आहे. ह्याच प्रकारे टी-शर्ट घालणारा तो आधुनिक असंही लोकं म्हणतील. प्रत्यक्षात टी-शर्टच्या होजिअरी कापडामुळे त्याला खिसा शिवता येत नाही. ज्या गोष्टी जबाबदारीनी सांभाळायला पाहिजेत, उदा. : क्रेडीट कार्ड, रोख, पॅनकार्ड, आधारकार्ड वगैरे, त्या खऱ्या म्हणजे शरीराच्या पुढच्या भागावर म्हणजे छातीवरच्या खिशात पाहिजेत. पण टी-शर्टला खिसा शिवण्याच्या अडचणीमुळे पँटच्या हिप पॉकेटमधे महत्त्वाच्या गोष्टी ठेवून त्या चोरीला गेल्याची किती उदाहरणं मी तुम्हाला सांगू? ह्यावरून खरं आधुनिक कोण आणि पारंपरिक कोण हे अगदी स्पष्ट होतं. मुख्य प्रश्न विवेकनिष्ठ विचार करण्याचा आहे.

जेव्हा भारतावर मोगलांची आक्रमणं झाली तेव्हा मुस्लिमांच्या स्त्रिया बुरख्यात असायच्या. भारतातल्या उघड्या चेहऱ्यांच्या स्त्रियांवर ते तुटून पडले. राजस्थानवर खूप आक्रमणं झाली. त्यामुळे पुढे राजस्थानात घुंघटाची पद्धत रूढ झाली. भारताच्या इतर शहरांच्यात त्याच काळात स्त्रियांच्यात दोन पिढ्या आणि नऊवारी, सहावारी संघर्ष चालू होता. ग्रामीण भागातलं पागोटं, मुंडासं किंवा फेटा हे सर्वोपयोगी वस्त्र होतं.

केशसंभार हा वस्त्राचाच प्रकार आहे. पूर्वीचे भारतीय पुरुष खांद्यापर्यंत येणारे केस ठेवायचे आणि स्त्रिया लांब शेपटा ठेवायच्या. ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या प्रभावानी पुरुषांचे केस बारीक कापण्याची पद्धत रूढ झाली. सध्याच्या काळात भारतीय पुरुषांच्या केशरचनेत कमी विविधता आहे. बायकांच्या केशरचनेचे मात्र खूप प्रकार आहेत. कशाला आधुनिक आणि कशाला पारंपरिक म्हणावं हे केशरचनेच्या बाबतीत सांगणं कठीणच आहे. तुम्हाला चीनमधली गंमत माहीत आहे? चिनी पुरुष केस वाढवून शेपटा ठेवतात आणि बायका खांद्यापर्यंत केस ठेवतात.

पोषाखामधे सोय आणि सौंदर्य हे दोन्ही हेतू साध्य करायचे असल्यामुळे भारतीय स्त्रियांच्यात पंजाबी ड्रेस किंवा सलवार-कुडता खूप काळ टिकला. अजूनही टिकेल. सांस्कृतिक संघर्ष त्यातही आहेच.

शहरात बघितलं तर बायका एकतर 24 तास साडी नेसतात नाहीतर हाऊसकोटमधे खुशाल रस्त्यावर हिंडतात. लग्न होईपर्यंत त्यांना पंजाबी ड्रेस

घालायची परवानगी असते, पण नंतर नसते. अजून गाऊन हा ग्रामीण भागात मान्य नाही. पुरुष केवळ चड्डीवर आणि उघडे असे ग्रामीण भागात सर्रास आढळतात. शहरात पुरुषांची शर्ट-पँट जवळजवळ पूर्णपणी स्थिरावली. जीन्स हा नवा पायंडा तरुणांच्यात रुजला आणि टी-शर्टही आला आणि स्थिरावतोय.

पोषाखाचा शिष्टाचार काय आणि वागणुकीतला काय, शिष्ट म्हणजे शहाणा. कृष्णशिष्टाई म्हणजे शहाणपणानी केलेला मध्यस्थीचा प्रयत्न. म्हणून शिष्टाचार म्हणजे शहाण्यांचा आचार. भारतात अजूनही शहर आणि खेडी यांच्या शिष्टाचारात बरीच तफावत आहे. त्याचं मुख्य कारण शिक्षणातली आणि पैशातली तफावत. खरी पंचाईत आहे ती शहरातल्या झोपडपट्टीवासियांची. त्यांना शहरी शिष्टाचार सांभाळायचे आहेत, पण शिक्षण आणि पैसे या दोन्ही बाबतीत ते ग्रामीणांच्या वर्गातले आहेत.

एक गंमत सांगतो. पाश्चात्त्यांच्यात भारतीय बायकांच्या साडीला 'सेक्सी' पोषाख समजतात, कारण साडीमधून पोट उघडं दिसतं. याउलट भारतीयांच्या दृष्टीनी पाश्चात्त्य बायकांचा स्कर्ट, फ्रॉक किंवा पँट-टॉप 'सेक्सी' असतो, कारण त्यामधे ओढणी, पदर असं काहीच नसतं. महाराष्ट्रातल्या पंजाबी ड्रेस घालणाऱ्या मध्यमवयीन आणि वयस्कर स्त्रियांच्या दृष्टीनी ओढणीला फार महत्त्व असतं. छाती झाकणं याला एवढं महत्त्व केवळ पुरुषांच्या विकृत नजरांमुळे आलं. पाश्चात्त्यांच्या एखाद्या समुद्रकिनारी फिरणारे स्त्री-पुरुष बघितले तर थक्क व्हायला होतं. कारण पोहत नसताना देखील सगळ्या वयाच्या बायका बिकीनी घालून सूर्यप्रकाशामधे 'टॅन' होत असतात. अक्षरशः हजारो लोक आरामखुर्च्यांवर उन्हं अंगावर घेत पहुडलेले दिसतात. भारतीयांच्या दृष्टीनी हा पोषाख म्हणजे सरळ सरळ 'उत्तान' असतो.

मला आणि शोभाला पोषाख या गोष्टीविषयी काय वाटतं ते सांगायलाच पाहिजे. खास ठेवणीतले पोषाख आमच्याकडे अजिबात नसतात. जे कपडे आहेत ते सगळे साधे, मध्यम किमतीचे आणि वर्षातल्या कुठल्याही दिवशी वापरण्याचे आहेत. आमची कपड्यांची संख्याही कमी आहे. आमच्या दृष्टिकोनातून हा पोषाखातला साधेपणाचा महत्त्वाचा संस्कार आहे आणि तोही हळूहळू लोप पावतोय याची आम्हाला काळजी आहे.

●

4) निवाऱ्यासंबंधीचे संस्कार

निवाऱ्यासंबंधीची परंपरा पाळणार का, असं परंपरावाद्यांना विचारलं तर ते त्याचं उत्तर कदाचित हो असं देतीलही, पण त्यांना प्रश्नाचा अर्थ न समजता दिलेलं ते उत्तर असेल. मुळात परंपरा कधीची, हे उत्तर आपल्याला त्यांच्याकडून कधीच मिळणार नाही. जरा मागे जायचं की, फार मागे जायचं की फार फार फार मागे जायचं? पूर्वी माणूस गुहेत राहत होता, पुढे तो दगड रचून आडोसे आणि झाडांच्या फांद्यांचा वापर करायला लागला. त्या बांधकाम केलेल्या छपराखाली तो वस्तू ठेवायला लागला. बाकी वावर उघड्यावरच होता. संडास, मोरी हा प्रकारच नव्हता. अजून कित्येक खेड्यांत घरात संडास नसतो. घरापासून बऱ्यापैकी लांब हगंदरी असते. घराजवळ परसात लोकं पाटीचा संडास बांधायला लागले तेव्हा लोक त्याला गुवाचा कारखाना म्हणायचे.

त्या तुलनेत अंघोळीच्या मोरीचा घराजवळ लवकर जम बसला. अजूनही उघड्यावर अंघोळ करणारे खूप सापडतात, पण मध्यमवर्गीयांच्यात आणि सुसंस्कृत घरात नाही. थोडक्यात घराच्या जवळ संडास असणं-नसणं, घरात अंघोळीसाठी मोरी असणं- नसणं यांनी संस्कृतीचा दर्जा ठरायला सुरुवाती झाली. आंघोळ शब्दाची गंमत या विषयाच्या अभ्यासाच्या वेळेला कळली. 'अंग ओल'पासून अंघोळ.

जोडीदाराची निवड पक्की करण्याआधी घर बघायला यायचा रिवाज आहे. मुलीनी मुख्य काय बघायचं तर अंघोळीची सोय आणि स्वयंपाकाचा ओटा. प्रत्यक्षात ओटा उभ्याचा असला तर पाय दुखतात, खाली बसून स्वयंपाकाचा ओटा असला तर कंबर दुखते. खूप माणसांचा स्वयंपाक करताना म्हणजे बराच वेळ स्वयंपाकाला लागणार असला तर खुर्ची, स्टुल आणि समोर स्टुलासारखा स्टँड अशी काहीतरी सोय कार्यालयांच्यात असते. माझ्या मते जास्त स्वयंपाक, एकत्र कुटुंबाचा स्वयंपाक, अशा परिस्थितीत स्वयंपाकाच्या ओट्याची रचना डायनिंग टेबल आणि खुर्ची अशासारखी पाहिजे.

घरातल्या झोपण्याच्या खोल्यांची संख्या हा सांस्कृतिक दर्जाचा निकष असतो. त्याचं कारण प्रगत संस्कृतीत प्रायव्हसी असण्याला खूप महत्त्व आलं.

शहरात वाढलेल्या मुली छोट्या गावातल्या मुलांना पसंत करत नाहीत. कारण गावातली घरं खूप मोठी, ऐसपैस असतात. पण त्यात दरवाजा बंद करून एकांत मिळेल अशा खोल्यांची संख्या कमी असते. ड्रेनेज नसल्यामुळे संडास-मोरी खोलीजवळ नसते. एकूणच घराची रचना शहरांच्या तुलनेत अगदी जेमतेम असते. याखेरीज त्या घरात स्त्री-पुरुष समानतेची समज किती असेल, याविषयीही मुलींच्या मनात शंका असते.

केवळ माहिती म्हणून सांगतो. विलायतेत प्रत्येक जोडप्याला एक, प्रत्येक अविवाहिताला एक अशी स्वतंत्र खोली प्रत्येक मध्यमवर्गीयाच्या घरात असतेच. रात्री झोपताना बरेच पाश्चात्त्य लोक सगळे कपडे काढून झोपतात.

प्रत्येक खोलीला दरवाजा असतोच. न बोलता, न विचारता कुठचाही पाश्चात्त्य माणूस दुसऱ्याच्या खोलीचा दरवाजा उघडून आत जात नाही. हा वागणुकीचा रिवाज इतका पक्का आहे की कित्येक घरांच्यात बेडरूमच्या दाराला आतून कड्या नसतात.

मी अमेरिकेतून कायम वास्तव्यासाठी भारतात आलो आणि मुंबई-पुण्यात स्वतःचा व्यवसाय सुरू केला. असं लक्षात आलं की इमारतीच्या रचनेविषयी भरपूर अंधश्रद्धा होत्या. बांधकामाच्या पद्धतींबद्दलही खूप अंधश्रद्धा, गैरसमजुती होत्या. इंजिनीअरिंगविषयी अज्ञान होतं. मी या प्रकारच्या चुकीच्या गोष्टी दूर करण्याची धडपड गेली अनेक वर्षं करतोय. माझ्या पेशाबंधूंनी मात्र त्याबद्दल फारसं काम केलेलं मला आढळलं नाही. मागणीप्रमाणे पुरवठा करायचा का योग्य मागणी म्हणजे काय हे सांगण्याचा प्रयत्न करायचा हा त्यातला प्रश्न असावा. मी पूर्वी लिहिलेली 'घर पाहावं बांधून' आणि 'व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी' ही दोन पुस्तकं हा त्यातलाच एक भाग होता.

●

5) विवाहासंबंधीचे संस्कार

तत्त्वज्ञानामधे आयुष्याचा दर्जा म्हणजे नेमकं काय, यावर गटचर्चा चालतात. पैसे, प्रवास, करमणूक, स्त्री-पुरुष सहवास, लैंगिक सुख, मुलं, नातवंडं या अनेक गोष्टींपासून स्वतःला सुख मिळणं म्हणजे आयुष्याचा दर्जा इथपर्यंत लोक विचार करू शकतात.

माणसाचा दर्जा हा शब्द खूप चमत्कारिक वाटतो. हा शब्द उच्चारल्याबरोबर कोणाच्या दर्जाबद्दल आपल्याला बोलण्याचा अधिकार आहे का, हा प्रश्न मनात येतोच. कोणाच्या मनात रंग, शरीरयष्टी, शिक्षण, जात, देश, पैशांची समृद्धी याविषयी तर आपण बोलत नाही ना, ही शंका येईल. हे बोलण्याचा, हा शब्द वापरण्याचा अधिकार नाही हे कळून देखील आपल्या मनात कल्चरल क्लास म्हणजेच सांस्कृतिक दर्जा हा विचार येतोच. इथे एवढंच म्हणूया की, स्वतःचा आणि दुसऱ्याच्या विचार आणि भावना यांची कदर ठेवून वागणारा माणूस म्हणजे चांगल्या दर्जाची व्यक्ती. दुर्दैवानी असं दिसतं की आपल्या देशाची, राज्याची, शहरांची लोकसंख्या अफाट असली तरी चांगल्या दर्जाची माणसं फार कमी संख्येनी दिसतात.

या कार्यशाळेत संस्कार म्हणजे काय, याचा आपण सगळे मिळून शोध घेतो आहोत. प्रथम आपण अन्न, वस्त्र, निवारा याबद्दलचे संस्कार तपासले, त्यात आपण कुठे बसतो, समोरचा माणूस कुठे बसत असेल याचा अंदाज करायचा, आणि हे सगळं कशासाठी? तर आता एवढं संस्कृतीचं किचकट आणि गुंतागुंतीचं अवडंबर विवाहाला लागू करायचं. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा आपण मान्यच करू, पण संस्कारांमुळे सन्मान आणि लैंगिक स्वास्थ्य या गरजा त्यात वाढल्या. आणखी पुढे स्वस्थ निद्रा आणि भयमुक्ती याही गोष्टी त्यात वाढल्या.

या सगळ्या गरजा सुशिक्षित, सुसंस्कृत आणि शहरी मुला-मुलींच्या मनातल्या आहेत. आजही शहरातल्या झोपडपट्टीत किंवा ग्रामीण भागात दोन वेळा जेवायला आणि झोपायला जागा मिळाली की झालं इतकीच अपेक्षा मुलींची विवाहाबद्दल असते. ज्याला आपण ग्रामीण अपेक्षा म्हणतो आहोत तो सांस्कृतिक

दर्जा आहे आणि त्याचीच सगळी मिश्रणं, रूपं आपल्याला तपासायची आहेत.

पारंपरिक संसारात नवरा श्रेष्ठ हे गृहीत धरलेलं होतं. त्यामुळे त्याबाबतीत माहेरी जे संस्कार झाले असतील त्या पार्श्वभूमीवर मुलगी जोडीदार ठरवण्यापूर्वी स्त्री-पुरुष समानतेचे तपशील तपासणार. सासर, माहेर यात फरक असणारच. त्या फरकामुळे फार तडजोडी नको असतील तर विभक्त कुटुंबाला पर्याय नाही, कारण एकत्र कुटुंबाचा विचार थेट पारंपरिक आहे. मुळात बायको हे नवऱ्याच्या गरजा पुरवण्याचं साधन आहे असंच परंपरा मानते. दुसऱ्याची पर्वा करणारा जोडीदार आहे का नाही, काही न पचणारे, न पटणारे संस्कार समोर आले तर त्याला खुबीनी, संयमानी हाताळण्याची क्षमता आपल्याला आहे का नाही, याचा विचार प्रत्येक विवाह करू इच्छिणाऱ्यानी करायला हवा.

विशेषतः वैवाहिक संबंधांमधे असं एक वाक्य परंपरा सांगते, की 'दुसऱ्याच्या मनातलं न सांगता कळलं पाहिजे.' आधुनिक विचाराप्रमाणे शब्दात सांगितल्याशिवाय दुसऱ्याच्या मनातलं कळणं ही खूप कठीण गोष्ट आहे. त्यामुळे स्वतःला काय वाटतं हे व्यक्त करणं हेच आधुनिक वागणं आहे.

आधुनिक संसार हा दोन शिखरांचा पिरॅमिड आहे, म्हणजेच ट्रॅपेझॉइड आहे. कूळरीत म्हणजेच संस्कार दोन्ही घरांचे निराळे असणार. एकानी दुसऱ्याची रीत मान्य करायची ही परंपरा आहे. म्हणजे कायम बायकोनी नवऱ्याची. प्रत्यक्षात नवी रीत बनवण्याची गरज आहे आणि त्यासाठी हा सगळा अभ्यास आहे.

या पुस्तकसंचात जोडीदाराची निवड या प्रकरणात एकमेकांना पाठवण्याची प्रश्नावली दिली आहे. ती लग्न ठरवताना उपयोगी ठरतेच, पण त्याखेरीज विवाहितांनी सुद्धा ती भरली तर आपलं दोघांचं जुळतं ते कशामुळे आणि ज्या बाबतीत जुळत नाही ते कशामुळे हे कळेल आणि बदलासाठी प्रयत्न करता येतील.

सध्याच्या तरुण पिढीच्या अनेक सवयी बघितल्या, वागणूक बघितली की अनेक प्रश्न पडतात. सांस्कृतिक पाश्चात्त्यीकरणाचा पगडा फार जोरकस आहे. घराबाहेर पडली की तरुण मुलं पाश्चात्त्यीकरणाच्या अमलाखाली असतात. घरात ज्येष्ठांच्या मनात पारंपरिकता म्हणजे चांगली वागणूक असं असतं. फारच क्वचित काही तरुणांना या दोन गोष्टींचं फ्यूजन जमतं. बहुतेकांची अवस्था कन्फ्युजनची असते. या परिस्थितीत अपराधी भावनेमुळे तरुण पिढी कसून परंपरा पाळायचं ठरवते. तेही अर्धवट पद्धतीनी. या अस्वस्थतेनी तरुण पिढीला पार वेढून टाकलेलं आहे.

जोडीदाराच्या निवडीसाठी योग्य वय म्हणजे काय, हे पण या पुस्तकसंचाच्या सुरुवातीला सांगितलं आहे. भारतीय पारंपरिक संस्कारात नवऱ्यामुलाचं वय मुलीच्या साधारणपणे दुप्पट असायचं. संसारात श्रेष्ठ कोण, याचा निकाल तिथेच लागायचा. जन्मतारखेवरून शारीरिक वय स्पष्ट कळतं, पण आयुष्याबद्दलच्या परिपक्वतेचं काय हा मुख्य प्रश्न शिल्लक रहायचा. 'दोन वेळा जेवायला मिळालं की झालं' यामधे स्त्रीचा पोटापाण्याचा उद्योग म्हणजे लग्न हे उघड आहे. तिथपासून समाज विचार करत करत मुलीपेक्षा मुलगा दोन-तीन वर्षांनी मोठा असावा या वयाच्या रूढीपर्यंत सध्या पोहोचलाय. माझ्या मुलापेक्षा माझी सून चार वर्षांनी मोठी आहे, पण हा अगदीच अपवाद आहे.

लग्नाच्या जोडीदाराच्या बाबतीत पुरुष स्त्रीपेक्षा वयानी मोठा हा संस्कार संपूर्ण भारतीयांच्या मनावर बिंबलेला आहे. महाराष्ट्र त्याला अपवाद अर्थातच नाही. हा संस्कार इतका घट्ट आहे की एखाद्या मुलाला आपल्यापेक्षा वयानी मोठ्या मुलीबद्दल आकर्षण वाटलं तर काहीतरी चुकीची गोष्ट आपण करतो आहोत असं त्याला स्वतःलाच वाटायला लागतं.

मला अगदी माझ्या जवळची दोन उदाहरणं माहिती आहेत. एक मुलगा आणि एक मुलगी प्रेमात होते. त्यांचं लग्न होऊ शकलं नाही, कारण त्यांच्यात मुलगी काही महिन्यांनी मुलापेक्षा मोठी होती. घरच्यांचा पूर्ण नकार होता. दुसऱ्या उदाहरणात एक वयस्कर विधवा स्त्री एका स्थळाला नाही म्हणाली, कारण ती त्या पुरुषापेक्षा वयानी दोन वर्षं मोठी होती.

लांबचे बहीण-भाऊ असले तरी त्यांच्यातल्या लग्नाला समाजाची मान्यता नसते. प्रत्यक्ष लग्नाला विरोध असतो. एवढंच नाही, तर एखाद्या सिनेमात प्रेमिकांची भूमिका लांबचे बहीण-भाऊ करत नाहीत. ते नट अशा भूमिकेला नकार देतात आणि प्रेक्षकदेखील त्यांना मान्य करत नाहीत. मागे एका कार्यशाळेत जोडीदार निवडीसाठीच्या रोल प्ले मधे एका मुलानी आणि मुलीनी जोडी बदलायला लावली कारण ते एकमेकांचे लांबचे बहीण-भाऊ होते.

अजूनही विवाहाच्या संस्कारातल्या रूढीप्रमाणे मुलापेक्षा जास्त शिकलेली आणि जास्त कमाई असणारी मुलगी मुलांना चालत नाही. विवाहाबद्दलच्या पारंपरिक संस्कारात पुरुष श्रेष्ठ हे मूळ गृहीत अजूनही मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या डोक्यात पक्कं असल्यामुळे दोन घोटाळे होतात. त्यातला पहिला सुरू होतो स्थळं बघण्याच्या पद्धतीपासूनच. मुलीच्या आईवडलांनी स्वतःकडे कमीपणा

घेऊन विनंत्या करत आर्जवी पद्धतीनी मुलाच्या घरच्या लोकांना विचारायचं, फोटो-पत्रिका पाठवायची, जोडे झिजवायचे असं सगळं मुलाच्या घरच्यांनी गृहीतच धरलेलं असतं. पुढच्या बैठका, चर्चा, याद्या, देणी-घेणी यातही मुलाची बाजू श्रेष्ठ मानवजात असल्यासारखी वागते. लग्नसमारंभ मोठा, भरपूर खर्चाचा आणि खर्च मुलीकडच्यांचा हा संस्कार अजूनही मुलांच्या डोक्यातून गेलेला नाही.

लग्नविधीमधले काही विधी लोकांनी बदलून बघितले आहेत. कार्यालयाऐवजी फार्महाऊसवर, भटजींच्या ऐवजी लग्न लावण्यासाठी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक विधींऐवजी इतर काही प्रतीकं, मंत्रांऐवजी खास लिहिलेली मराठीमधली शपथ, जेवणात आरोग्यकारक आणि पर्यावरणपूरक खाद्यपदार्थ, असे अनेक प्रयोग लोक करतात. तरी ते निमआधुनिकच ठरतं. खरी आधुनिक गोष्ट विवाह नोंदणी कार्यालयात नोंदणी करून समारंभाला पूर्ण फाटा हीच आहे.

मुख्य म्हणजे पारंपरिक संस्कारांच्यात मुलीकडच्यांनी एखादा प्रतिप्रश्न केला तर मुलांचा अपमानच होतो. मुलाकडच्या नेमक्या आर्थिक परिस्थितीविषयी खोटं बोलणं अजूनही सर्रास चालतं. माझं वैयक्तिक मत असं आहे की, दोन कंपन्या जशा एकत्र मर्ज होताना बॅलन्स शीट्स तपासतात, तितक्या प्रांजळपणी आपापली बॅलन्स शीट दोन्ही घरांनी एकमेकांना द्यायला हवी. प्रत्यक्षात प्रॉपर्टीसाठी आपण लग्न करत नाही असं तोंडानी म्हणत म्हणत मुलीचे दागिने, मालमत्ता, वडलांच्या गुंतवणुकीतला हिस्सा या सगळ्यावर मुलाचा डोळा असतो.

माझ्या आणि शोभाच्या लग्नाच्या वेळी मी माझ्या आग्रही स्वभावामुळे फिलाडेल्फिया, यू.एस.ए. इथे अर्ध्या मिनिटात नोंदणीच्या सह्या करून लग्न केलं हे आपण पूर्वी बोललो आहोत. शोभाच्या ठाण्याच्या घरी कधी न बघितलेल्या अमेरिकेतल्या जावयाकडे लग्न करण्यासाठी शोभाला पाठवण्याचा निर्णय शोभाच्या आई-वडलांनी कसा घेतला असेल याबद्दल तेव्हा मी पुरेसा विचार केला नव्हता, असं मला आता विचार करताना वाटतं. शोभाच्या आईपेक्षा तिच्या वडलांवर या निर्णयाची जबाबदारी होती. तो निर्णय खूप कठीण असणार.

मला स्वतःला माझ्या चांगुलपणाविषयी कितीही आत्मविश्वास असला तरी शोभानी माझ्या गुणांची पारख कशी केली, तिनी घेतलेल्या निर्णयावर तिच्या वडलांनी कसा भरवसा ठेवला असेल, हे मला कोडं वाटतं. तिच्या वडलांना बापू म्हणायचे. बापू अगदी कमी शिकलेले होते, पण जोडीदाराची निवड आणि लग्नसमारंभ याबाबतीत बापूंना आधुनिक संस्कार म्हणजे काय हे कळत असलं

पाहिजे. शिक्षण आणि सुसंस्कृतपणा या गोष्टी निराळ्या असतात हेच यावरून सिद्ध होतं. माझी आणि त्यांची कधीच भेट झाली नाही. शोभाच्या सांगण्यावरून ते अतिशय सुसंस्कृत होते हे नक्की. शोभाची आई आणि वडील कधीच एकमेकांशी भांडले नाहीत. अगदी थोड्या पैशात 4 मुलांसकट संसार त्यांनी समाधानानी केला. याचा अर्थ, ती खुबी त्यांना साधली होती.

आणखीन एक खूप महत्त्वाची पण संस्कारांच्यामुळे दुर्लक्ष होतं अशी गोष्ट म्हणजे चांगले लैंगिक संबंध. संस्कारांच्या पगड्यामुळे त्यासंबंधी स्पष्ट बोलायला कोणी तयार होत नाही. खरी गोष्ट अशी आहे की 'समाजमान्य पद्धतीनी शारीरिक लैंगिक संबंध' हा विवाहाचा मुख्य हेतू आहे. लैंगिक संबंधांचं पुरेसं ज्ञान नसलं आणि त्याखेरीजही काही लैंगिक घोटाळे असले तर लग्नाच्या पहिल्या रात्रीपासून बरबादीची सुरुवातच होते. इतकी महत्त्वाची गोष्ट पण त्याविषयी मुलगा, मुलगी, दोघांचे आई-वडील, काही बोलत नाहीत आणि 'पाण्यात पडलं की पोहता येतं' असं मानून काही करतही नाहीत. या पुस्तकसंचातल्या लैंगिक संबंध या लेखात याविषयी सविस्तर माहिती आहे. शिवाय मी आणि शोभा गेली 25 वर्षं या विषयावर कार्यशाळा घेतो. या विषयाबद्दल कार्यशाळा घ्यायला विरोध असणारेही मला भेटलेले आहेत. संस्कारांमुळे लैंगिक संबंधांबद्दल बोलणं सोडा, ऐकायलाही लोक तयार नसतात.

लैंगिक संबंध सुरळीत व्हावेत म्हणून लग्नापूर्वी वैद्यकीय तपासणीची आम्ही शिफारस करतो. मुली जेवढ्या प्रमाणात अशा तपासणीला तयार होतात त्या तुलनेत मुलगे तयार होत नाहीत. तिथेही पुरुष श्रेष्ठ हा संस्कार आडवा येतोच.

भारतच काय, सबंध जग पुरुषप्रधान आहे. शेकडो, हजारो वर्षांच्या संस्कारामुळे स्त्रिया आर्थिक व्यवहारात पूर्वी कधी नव्हत्याच. स्त्रियांना आर्थिक व्यवहारांचा अनुभव कमी, त्यामुळे त्यातल्या लबाड्या, भ्रष्टाचार याचाही अनुभव त्यांना कमी असतो. अजूनही भ्रष्टाचाराचा संस्कार स्त्रियांवर कमी झालेला दिसतो. तुलनेनी पुरुष जास्त संख्येनी भ्रष्टाचारी असतात. त्यांच्या अपेक्षा जास्त असतात. स्त्रिया छोट्या रकमा खातात आणि भ्रष्टाचारी स्त्रियांची संख्या कमी असते.

विवाहासंबंधी तरुण मुला-मुलींवर चांगले संस्कार व्हावेत अशी इच्छा तर प्रत्येकाची असते. पण दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टींबद्दलच्या पूर्वग्रहामुळे म्हणजेच पूर्वसंस्कारांमुळे त्याच उद्देशानी चालू असलेल्या विवाह अभ्यास मंडळात पुरेसे लोक येत नाहीत. अजूनही समाजातल्या स्त्री-पुरुषांच्या विचारांचा 'एक्स-रे'

काढला तर 'स्त्री' याविषयी खूप गोंधळ पुरुषांच्या आणि जोडप्यांच्या डोक्यात आढळतात. स्त्री ही पूज्य मानणारे बहुतेक लोक दुटप्पी असतात आणि वागतात. आईचा प्रश्न आला की स्त्री पूज्य आणि बायकोचा प्रश्न आला की स्त्री भोग्य. काही लोक त्यांच्यावरच्या चुकीच्या संस्कारांमुळे सर्व स्त्रियांना भोग्य मानतात. फारच कमी पुरुष स्त्रीला बरोबरीची मानतात.

विवाह अभ्यास मंडळात दोन महत्त्वाचे संस्कार मुलं-मुली, विशेषतः पुरुषांवर करण्याचा प्रयत्न असतो. एक म्हणजे 'कोणाचाही अपमान करण्याचा कोणालाही अधिकार नाही', आणि दुसरा म्हणजे 'नवरा-बायको यांच्या संस्कारात फरक असतो.' हे कळण्याचा आणि पटण्याचा संस्कार.

पारंपरिक संस्कार म्हणजे तुम्हाला नेमकं काय म्हणायचं आहे, असं एखाद्याला विचारलं की तो बायकोनी कसं 24 तास मंगळसूत्र, कुंकू वापरलं पाहिजे, हे सांगतो. व्रतवैकल्यांची, कर्मकांडांची भली मोठी यादी असते. मी आणि शोभा या विचाराशी सहमत नसल्यामुळे यावर वाद होऊ शकतात, पण वैयक्तिक वादात आम्ही पडत नाही. आम्हाला विरोधी विचार चालतो. गटचर्चेमधे हा विषय आम्ही मांडतो. सभ्य भाषा, मुद्देसूद मांडणी नेहमीच जास्त परिणामकारक असते. मुख्य सूत्र मात्र कायम असं पाहिजे की, स्वतःला पटेल तशी, बोलू तशी प्रत्यक्षात वागणूक हवी. तिथे मात्र आम्हाला अडचण दिसते. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' हे आधुनिक संस्काराला पूर्ण मान्यच आहे. खरं त्याबद्दल आधुनिक विचारांचा आग्रह आहे.

पारंपरिक संस्कारात आणखी एक गोष्ट राहून गेलेली आढळते. प्रत्यक्ष मेहनतीचं काम करत असतानाची वेळ सोडली तर बाकी सर्व वेळी स्वच्छता आणि नीटनेटकेपणा ही कायमची गरज असते. नीटनेटकं राहणं, चेहरा नीटनेटका ठेवणं आणि नटणं या निराळ्या गोष्टी आहेत. प्रत्येक नवरा-बायकोनी एकमेकांना आकर्षक दिसावं यासाठी आठवण ठेवून या गोष्टीकडे लक्ष देणं हा महत्त्वाचा संस्कार आहे. त्या प्रयत्नात कोणी वारंवार पाण्यानी तोंड धुवील तर कोणी चेहऱ्यावर पावडरचा हात फिरवील. यावरून नवरा-बायकोमधे मतभेद झाल्याची खूप उदाहरणं दिसतात.

एकमेकांशी खूप छान जुळणारे नवरा-बायको क्वचित सापडतात हे मान्य करावंच लागतं. मध्यम जुळणारे त्यामानानी बऱ्या प्रमाणात असतात. या दोन्ही गटातल्या नवरा-बायकोंच्या मनावर एक संस्कार मात्र झालेला दिसतो. अशा

नवरा-बायको दोघांनाही एकमेकांविषयी आकर्षण वाटत असतं. पण ते खाजगीत देखील स्पष्टपणे व्यक्त करायचं नाही असं बंधन असल्यासारखे दोघं वागतात. लग्नापूर्वी 'तू छान दिसतेस' 'हँडसम दिसतोस' असं म्हणणारे नवरा-बायकोदेखील लग्नानंतर हे वाक्य त्यांच्या शब्दकोशातून कटाप करतात. हे वाक्य लग्नानंतर त्यांच्या तोंडून उमटतच नाही. हा सगळा परिणाम अर्थातच भारतीय संस्कारांचा असतो. प्रत्यक्षात संपूर्ण वैवाहिक आयुष्यभर या कौतुकपर शब्दांची दोघांनाही गरज असते.

भारतीय संस्कृतिकोशाच्या सगळ्या खंडांच्यात मी विवाहाचे संस्कार शोधायचा प्रयत्न केला. त्यात विवाहाचे ८ प्रकार आणि विवाहविधी यापलीकडे काही सापडेना. एवढ्या हजारो वर्षांच्या भारतीय संस्कृतीत विवाहापूर्वी आणि विवाहानंतर स्त्री आणि पुरुषाच्या मनाबद्दल अभ्यास झालेला नाही याचं मला फार आश्चर्य वाटतं.

माझ्या प्रत्यक्ष ओळखीत असे शेकडो लोक आहेत की ज्यांना प्रामाणिकपणी असं वाटतं की, नोंदणी विवाहात काही संस्कार होत नाहीत. त्यामुळे त्यांचा नोंदणीला विरोध तरी असतो किंवा ते नोंदणीकडे केवळ कायद्याचं बंधन म्हणून बघतात आणि संस्कार होण्यासाठी दुसरी कुठलीतरी धर्माधिष्ठित पद्धत शोधतात. मला आणि शोभाला हे पटत नाही. अशा धर्माधिष्ठित पद्धतीनी आवश्यक तेवढे संस्कार नवरा-बायकोच्या मनावर खरोखर झाले असते तर एवढे दुभंगलेले नीरस संसार दिसलेच नसते.

●

6) मुलांवरचे संस्कार

या आधी अगदी सुरुवातीला आपण मुलांवरच्या संस्कारांचा उल्लेख केला होता. याच विषयावर पालकत्वासंबंधी या पुस्तकसंचात लेख असल्यामुळे इथे आपण मोजक्याच गोष्टींविषयी बोलूया. नवरा-बायकोनी एकमेकांशी, एकमेकांच्या नातेवाइकांशी कसं वागायचं यासंबंधीचे संस्कार असतातच, पण मूल हे दोघांचं असल्यामुळे दोघांच्या मतांचा प्रश्न त्यात येतोच. पूर्वीच्या संसारांच्यात मुलांवरचे संस्कार ही संपूर्णपणी आईची जबाबदारी मानलेली होती. एकत्र कुटुंबात इतरांच्या मदतीनी आयांना ते जमतही होतं. विभक्त कुटुंबात मात्र एकट्या आईला ही जबाबदारी पेलणं सोपं नसतं. पारंपरिक संसारात वडलांना पालकत्व या विषयाच्या अभ्यासाची गरज नसायची, पण आता आहे. वडलांनी मुलांचा सांभाळ करण्यात भाग घ्यायचा की नाही, याबद्दलच मतभेद असतात.

मुलांना सांभाळण्याबद्दलची एक गंमत सांगतो. आमची मुलं शोनील आणि आभा लहान होती. एक ओळखीतल्या बाई मुलांना सांभाळायला आमच्याकडे येऊ शकतील का, याविषयी चर्चा चालू होती. आमची दोघंही मुलं आम्हाला ए अनिल आणि ए शोभा अशी हाका मारत होती हे त्यांनी बघितलं. आमची त्याला काहीच हरकत नव्हती, पण त्यांना ते खटकत होतं. अनिल आणि शोभा या नावातली अक्षरं घेऊन शोनील आणि आभा नावं बनलेली असल्यामुळे त्यांचा घोटाळा झाला होता. त्या म्हणत होत्या, ''तुमच्या अनिलला मी अगदी व्यवस्थित सांभाळीन. त्याला आई, बाबा म्हणायला शिकवीन.''

पारंपरिक संसारात वडलांची भूमिका धाक एवढीच असायची. रागावणं, मारणं, तिरकं बोलणं, अपमान करणं एवढंच माहिती असल्यामुळे मुलांशी खेळणं, गप्पा मारणं हा संस्कार वडलांवर झालेलाच नसायचा. ज्यांना खरा संस्कार म्हणजे काय समजत नाही त्यांच्यासाठी पारंपरिक संस्कारात असलेली एक ठळक दिसणारी गोष्ट केली की बाकीचं सगळं खपतं. अशी युक्ती म्हणजे मोठ्या वयाचा माणूस दिसला की वाकून नमस्कार करायचा. ही अतिशयोक्ती नाही. खरंच घरातले वयस्कर इतके भाबडे असतात की वाकून नमस्कार केला की बाकी इतर सगळ्या गोष्टी खपतात.

घराघरात आणखी एक नियम असतो. मोठी माणसं बोलत असताना मधे काही बोलायचं नाही. हे नीट पद्धतीनी मुलांपर्यंत पोचलं नाही तर मुलांवर 'चूप बस' संस्कार होतो.

काही लोकांचा विश्वास असतो की, 1000 वेळा देवाचं नाव घेणं किंवा लिहिणं, यानीच योग्य संस्कार होतो. असं असतं तर प्रभावी पालकत्व या विषयावर रक्त आटवण्याची गरजच पडली नसती. आणखी जास्त वेळा सगळ्यांनी तुम्ही सांगाल ते देवाचं नाव म्हणलं, लिहिलं की काम झालं असतं.

मी माझं संपूर्ण नाव अनिल रामचंद्र भागवत असं न वापरता फक्त अनिल भागवत एवढंच वापरतो. त्याबद्दल एकदा एक गृहस्थ माझ्यावर खूप रागावले. म्हणाले, 'काही संस्कार आहेत का नाही?' त्यांच्याशी नाही पण ते गेल्यावर इतर काही लोकांशी माझं बोलणं झालं. माझ्या मते, नाव, आडनावाचा उल्लेख सुद्धा व्यक्ती नीट ओळखावी एवढाच असतो. समजा, एकाच ठिकाणी दोन अनिल भागवत असले तर नेमकं ओळखण्याचा प्रश्न येऊ शकेल. त्या नावाचा आणि योग्य-अयोग्य संस्काराचा काही संबंध नाही. गंमत म्हणून सांगतो, माझ्या ओळखीचे पुण्यात 4 अनिल भागवत आहेत आणि बाहेरगावी असलेले एक अनिल रामचंद्र भागवत देखील आहेत.

मुलांवरचा खूप महत्त्वाचा संस्कार म्हणजे श्रमसंस्कार. सगळं घरकाम घरातल्या मुलांना आणि मुलींना लहानपणापासून शिकवण्याची गरज आहे. यापुढच्या काळात घरातल्यांचं चहा-पाणी, नाश्ता, पाहुण्यांचं आदरातिथ्य अशा अनेक जबाबदाऱ्या पुरुषांनी उचलाव्याच लागणार आहेत, तरच सुरळीत संसार होतील.

फार पूर्वी म्हणजे काहीशे वर्षांपूर्वी परंपरेमधला मुंजीचा अर्थ समजून घेणं खूप रंजक आणि उपयोगी आहे. मुंजीनंतर मुलगे आई-वडलांचं घर सोडून गुरुगृही रहायला जायचे. 8 ते 25 या वयात अनेक श्रमाची कामं मुलं रोज करायची. विद्याभ्यास, जीवनकौशल्य, गुरूंची सेवा या सगळ्या अनुभवामुळे जे संस्कार व्हायचे ते महत्त्वाचे असायचे. 8 ते 25 या वयात साधी राहणी, साधा आहार आणि सगळ्या प्रकारचे उपभोग वर्ज्य असं ते आयुष्य असायचं. उपभोग वर्ज्य यामधेच ब्रह्मचर्याचाही समावेश होता.

मुलांवरच्या संस्कारांचा विचार करताना शाळा हा विषय टाळताच येत नाही. माझ्या मताप्रमाणे शाळांच्या मे महिन्याच्या मोठ्या सुट्ट्या चुकीच्या आहेत. मुलांचा अभ्यास लक्षात घेतला – अगदी कुठच्याही इयत्तेचा तर वर्षातले 200

ते 225 दिवस अभ्यास आणि बाकी सुट्टी ही गोष्ट पटण्याजोगी आहे. पण त्या सुट्ट्या वर्षभर सारख्या व्यवस्थित विभागलेल्या, रविवारला जोडलेल्या असाव्यात. सण, उत्सवांच्या सुट्ट्यांमुळे मुलांवर चांगले संस्कार वगैरे काही होत नाहीत. नव्या सांस्कृतिक रचनेमधे मुलांसाठी या नव्या कल्पनेप्रमाणे सुट्ट्या ठेवाव्यात. त्यामुळे पालकांबरोबर मुलांच्या सुट्ट्या जुळतील. मे महिन्याच्या सुट्टीची मुलांना सुरुवातीला मजा वाटते आणि नंतर नंतर कंटाळा येतो तेही टळेल. पालकांसकट सगळ्यांचं मानसिक स्वास्थ्य सुधारेल.

शाळांच्या शिक्षणक्रमात नव्या सांस्कृतिक रचनेप्रमाणे बरेच बदल करावे लागतील. मुलांची बुद्धीची क्षमता त्याचप्रमाणे आवड निराळी असते. या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन मुलांचे गट करायला हवेत. सध्या शाळांच्यात मुलांना जे संस्कार मिळतात त्याला 'चूप बसा' प्रकारच म्हणतात. प्रत्यक्षात उलट व्हायला पाहिजे. 'प्रश्न विचारा' संस्कृती म्हणजे नवे संस्कार. आवड आणि क्षमतेप्रमाणे मुलांचे गट केलेले असल्यानी मोठी मुलं लहान मुलांना शिकवतील. त्यात आलेल्या शंका शिक्षकांना विचारतील. याच पुस्तकसंचात 'शिक्षण आणि करिअर' नावाचा लेख आहे. तो वाचल्यानी सध्याच्या शिक्षणपद्धतीनी झालेली हानी आणि त्यावरचे काही उपाय यांना नक्की दिशा मिळेल.

घरातल्या वस्तू नीटनेटक्या आवरून नीट ठेवणं, कागदपत्रं नीट लावून ठेवणं, अशा गोष्टी आई-वडलांनी केल्या, त्यात मुलांची थोडी थोडी मदत घेत हळूहळू जबाबदारी वाढवत नेली तर खूप महत्त्वाची गोष्ट साध्य होते. जे लिहायचं ते नीटच लिहायचं. चांगलं हस्ताक्षर हा पण महत्त्वाचा संस्कार आहे. पूर्वी आपण बोललो आहोत त्याची इथे पुन्हा आठवण करून देतो. संस्कार म्हणजे श्लोक आणि स्तोत्र हे खरं नाही.

तत्त्वज्ञान आणि ज्ञानाचा आदर याबद्दल आता बोलू. सर्वसामान्य जीवनात माझ्या लहानपणापासून एक संस्कार जवळ जवळ सगळ्यांच्यावर झाला असेल. त्याप्रमाणे पुस्तक, वही हे ज्ञानाचं प्रतीक आहे आणि ज्ञानाला देवत्व दिलेलं आहे. त्यामुळे पुस्तक, वही याला पाय लागला तर त्याला ज्ञानाचा अपमान झाला असं समजायचं. पाय हा शरीराचा महत्त्वाचा अवयव असला तरी त्याचा आणि पादत्राणाचा संबंध असल्यामुळे त्याला घाण मानायचे. त्यामुळे त्या पुस्तक किंवा वहीला नमस्कार करायचा संस्कार.

तत्त्वज्ञानाच्या आधारानी आणि विवेकनिष्ठ पद्धतीनी विचार केला तर

वर्तमानपत्रं, मासिकं ही सुद्धा ज्ञान देण्याचीच साधनं आहेत. पण त्या बाबतीतल्या भावना संस्कारांवर अवलंबून नसल्यामुळे वर्तमानपत्र, मासिकांचा वापर माणूस वाटेल तसा करतो. तो त्याच्यात धान्य भरतो, दारूची बाटली गुंडाळतो, मासिकाच्या पिशव्या बनवतो. तत्त्वज्ञानावर आधारलेल्या विवेकवादाच्या नजरेतून हे चूक आहे. सगळ्या प्रकारच्या ज्ञानाचा कायम आदर करावा, पण पाय लागण्याला अजिबात महत्त्व देऊ नये असं विवेकवाद म्हणतो.

खरं बोलण्याचा संस्कार मुलांवर करावा अशी सगळ्या पालकांची इच्छा असते. हे खूप कठीण आहे, कारण जे निरनिराळे ताण आई-वडलांवरचे वाढलेले आहेत ते कसे मॅनेज करायचे हे त्यांना समजत नाही. आई-वडील तोंडानी म्हणतात की, त्यांना खोटं चालत नाही. मुलांनी आधी खरं सांगितलं असतं तर चाललं असतं म्हणतात. प्रत्यक्षात मुलानी खरं सांगितलं तर खपत नाही. अशा परीक्षेत मुलांसमोर आई-वडील सारखे नापास होतात.

मुलांच्या हातातून एखादी वस्तू पडली की आई-वडील 'डोळे फुटले का?' असं हमखास म्हणतात. असं न म्हणणं हा खरा सुसंस्कार आहे. पालकांच्याही हातून वस्तू पडतात. नुकसान होतं, गैरसोय होते. केवळ मुलं वयानी लहान आहेत म्हणून असं कधीच बोलायचं नसतं.

मुलांवर चांगले संस्कार झाले की त्यांची भाषा चांगली तयार होते. कुठच्याही नॉर्मल मुलाला राज्यभाषा म्हणजे मराठी, राष्ट्रभाषा म्हणजे हिंदी आणि जगभाषा म्हणजे इंग्लिश या तीन भाषा आल्याच पाहिजेत असा सरकारी पातळीवरचा नियम हवा. एरवीची शाळा इंग्रजी माध्यमाची असो, हिंदी माध्यमाची असो किंवा मराठी माध्यमाची असो. या तीनही विषयांना उत्तम शिक्षक असावेत, त्या तीनही भाषा 10 वीच्या परीक्षेला सक्तीचे विषय म्हणून ठेवावेत. ही एवढी गोष्ट केल्यानी प्रत्येक मुलाचं, कुटुंबाचं आणि राज्याचं, देशाचं सगळं वातावरणच बदलून जाईल. मुळात कुटुंबातला अंतर्गत संवाद खूप सुधारेल, राज्याराज्यातले संबंध सुधारतील. पाश्चात्त्य जगाशीही संबंध सुधारतील.

या भाषेच्या संस्कारात प्रथम बोलणं– मग वाचणं– शेवटी लिहिणं असा क्रम असला पाहिजे. सध्या शाळाशाळांमधे लिहिण्यानी सुरुवात होते ते मला अगदी चुकीचं वाटतं. मी शिक्षणतज्ज्ञ नाही, भाषातज्ज्ञ नाही, पण व्यवस्थापनतज्ज्ञ आहे. मानसशास्त्र शिकलो आहे. या नवीन पद्धतीच्या भाषासंस्काराला सुरुवात केली की जादूसारखी प्रगती दिसेल हे मी खात्रीनी सांगतो.

मुलांवर आणखी एक खूप महत्त्वाचा संस्कार मला आवश्यक वाटतो तो म्हणजे व्यायामाचा संस्कार. खेळ निराळा आणि व्यायाम निराळा. व्यायामाचा संस्कार देखील प्रेमानी, प्रोत्साहन देत गोडी लावून व्हायला हवेत. माझ्या काळात व्यायामाचे शिक्षक देखील भलत्या गोष्टींचा आग्रह धरायचे. मला वाटतं, ते संस्कार चुकीचे होते. सूर्यनमस्काराचा त्यावेळचा किस्सा सांगतो. विशिष्ट दिशेला महत्त्व असं एकदा मानलं आणि प्रतीक ह्या गोष्टीचं मनाला महत्त्व वाटलं की हट्टाला सुरुवात होते. माझ्या लहानपणी सूर्यनमस्कार पूर्वेकडे तोंड करून घालायला पाहिजेत हा व्यायामशाळेतल्या शिक्षकांचा हट्ट मी बघितलेला आहे. तसं न करणाऱ्या मुलाला त्यांनी फटके मारल्याचंही बघितलं आहे.

पोहणं शिकवणारे शिक्षक मुलांना मुद्दामून पाण्यात ढकलताना मी बघितलं आहे. त्यामुळे पाण्याची भीती जाते असं त्यांना वाटतं. प्रत्यक्षात अशा वागणुकीनी मुलांना पाण्याची भीती वाटते. असे शिक्षक नेमका काय संस्कार करतात असं समजायचं?

मी स्वतः पेढा खायला डावा हात पुढे केला म्हणून फटकाही खाल्लेला आहे. प्रार्थना ही एक अशीच गोष्ट आहे. जमलेल्या सगळ्यांचं लक्ष केंद्रित व्हावं, प्रार्थनेचा चालीवरचा आवाज संगीतासारखा जागेत घुमावा हे सगळं समजण्याजोगं आहे, पण प्रार्थनेचे शब्द चुकल्याबद्दल मुलांच्या थोबाडीत मारणं हे मूळ तत्त्वात कसं बसू शकेल? ही काय संस्कार करण्याची पद्धत झाली?

●

7) पैशांबद्दलचे संस्कार

या पुस्तकसंचामधे 'आर्थिक व्यक्तिमत्त्व', 'विवाह, आयुष्य आणि व्यवस्थापनशास्त्र' असे दोन स्वतंत्र लेख असल्यामुळे याबद्दलच्या संस्कारांविषयी अगदी थोडक्यात सांगतो. फार फार पूर्वी पैसे नव्हते तेव्हा धन म्हणजे गायी असायच्या. आणि धनसंग्रह तुपाचाच करायचे. आपण पिकवू ती गोष्ट दुसऱ्याला देऊन तो बनवेल ती वस्तू त्या बदल्यात आपण घ्यायची असे व्यवहार असायचे. ब्राह्मण शेती करायचे नाहीत, फक्त ज्ञानदान करायचे आणि इतरांकडून वस्तू घ्यायचे. ब्राह्मणांना धनलोभ नव्हता, ज्ञानलोभ होता. तेव्हापासून ब्राह्मणी संस्कार म्हणजे काटकसरीचा संस्कार समजला जायला लागला.

मला स्वतःला अल्पबचतीची सवय हा महत्त्वाचा संस्कार वाटतो. कुटुंब एकत्र असो नाहीतर विभक्त असो. त्या कुटुंबात रोज थोडे पैसे बाजूला पडलेच पाहिजेत. रुपयांची किंमत घसरली, महागाई वाढली, तसा आकडा बदलेल, पण तो आकडा पुढे किती मोठा होतो हे गणित मुद्दामून एकदा करून बघा. पूर्वी मला आणि शोभाला रोज थोडी रक्कम बाजूला टाकण्याची सवय होती. मधे काही काळ आम्हाला ते जमलं नव्हतं, पण आम्ही पुन्हा रोज काही रक्कम बाजूला टाकणं सुरू केलं. छान वाटतं.

माझ्या पिढीवर खरोखरीच काटकसरीचा टिकाऊ संस्कार झालेला आहे. पेशव्यांमुळे अनेक ठिकाणी, विशेषतः पुण्यात स्वतःचे वाडे, इनाम जमिनी, अशी उदाहरणं आढळतात. पण हातात पैसे बेताचेच असायचे. त्यामुळे काटकसर डोक्यात कायमची घर करून बसली. कायस्थ, वैश्य यांच्याकडे तुलनेनी जास्त पैसे असायचे. खजिने सांभाळण्याची जबाबदारी असायची. अशा ब्राह्मणेतर लोकांना 'परभट' म्हणायचे. त्यांना शिक्षण आणि पैसे अशा दोन्ही गोष्टींची समज आणि आवड होती. मराठा समाज एकेकाळचे क्षत्रिय, योद्धे असले तरी राजे लोकांकडून मिळालेल्या इनाम जमिनींचे मालक होते. त्यामुळे शिक्षण कमी, पण भांडणं आणि पैसे दोन्हीची समज त्यांच्याकडे पारंपरिक संस्कारांनी आलेली आहे. शूद्रांकडे मात्र ज्ञान, पैशाची समज, भांडणांची सवय, जमिनी, मालमत्ता यापैकी कुठचाच संस्कार नसल्यामुळे शूद्र संख्येनी खूप, पण मागासलेपणाचा,

न्यूनगंडाचा संस्कार घेऊन वावरले.

या सगळ्या चातुर्वर्णांच्यात शूद्र सोडून इतर तीनही वर्णात मिश्रविवाह झाले. संस्कारांची मिसळामिसळ झाली. त्या प्रक्रियेमधे 'फक्त पैसे' संस्कृती जन्माला आली. आजही समाजात कितीतरी मोठ्या संख्येनी या प्रकारचे लोक आढळतात. त्यांना ज्ञानाचं, श्रमाचं, कलांचं कमी महत्त्व असतं. ते खाणं-पिणं, दागिने, मौजमजा यामधे संबंध आयुष्यभर दंग असतात. त्यांना समाजाशी, कष्टकऱ्यांविषयी काही वाटत नाही. सामाजिक कामाची तर अजिबात समज आणि आवड नसते. असे संस्कार घेऊन जगणारे उथळ लोक शहरात जास्त प्रमाणात दिसतात. अशा लोकांना साधेपणा, पर्यावरणाची समज हे महत्त्वाचे संस्कार अजिबात समजू शकत नाहीत. त्यांच्या दृष्टीनी सबंध आयुष्य म्हणजे एक 'पार्टी' असते.

जेव्हा प्रथम पैसे म्हणजे धन ही कल्पना निघाली, तेव्हा निरनिराळे धातू जमिनीच्या पोटातून काढून त्यावर प्रक्रिया करून वापरण्याला सुरुवात झाली. सोनं हा त्या काळचा सर्वात शुद्ध धातू म्हणून त्याला खास महत्त्व आलं. सोन्याची नाणी म्हणजेच मोहरा याची देवाणघेवाण सुरू झाली. सोन्याचा लोकांच्या मनावर पगडा बसला तेव्हा त्याचा संस्कार झाला. आज सोन्यापेक्षाही किमती प्लॅटिनम धातूचा शोध लागला तरी सोन्याचं निराळं स्थान लोकांच्या मनात आहे.

सोन्याचं मंगळसूत्र, सोन्याच्या बांगड्या, कानात, केसात, स्त्री-पुरुषांच्या गळ्यात सोन्याचे हार, अंगठ्या वगैरे दागिने वापरण्यात लोकांना भूषण वाटायला लागलं. सोन्याची अंगठी या एका गोष्टीत माझ्या नजरेला निराळीच गोष्ट दिसते. प्रत्यक्षात सोन्याची काय नि चांदीची काय, अंगठी म्हणजे मला अस्वच्छच वाटते. विशेषतः भारतात ढुंगण धुण्यासाठी माणूस जिथे हातानी पाणी वापरून धुतो तिथे मला अंगठी म्हणजे घाणच दिसते. माणूस डाव्या हातानी का उजव्या हातानी जेवतो याचाही याच्याशी संबंध नाही. भारतीय माणूस जेवणही हातानी करतो. जेवणातले कणही अंगठीत अडकतात. थोडक्यात जोपर्यंत अंगठी वापरणारा प्रत्येक माणूस जेवण्यापूर्वी आणि संडासात जाण्यापूर्वी अंगठी काढून ठेवताना मला दिसत नाही तोपर्यंत मला तो आरोग्याला घातक असा संस्कारच वाटतो.

मी किंवा शोभा अंगठीच वापरत नाही त्यामुळे आमच्याकडे हा अंगठीबद्दलचा प्रश्न उदभवतच नाही. माझ्या ओळखीतल्या अनेक अंगठी वापरणाऱ्या माणसांचं

मी निरीक्षण करूनच हे सांगतोय. आमच्या ओळखीची एक मराठी मुलगी यू.एस.ए. मधे गेली 25 वर्षं आहे. ती भारतात तात्पुरती आलेली असताना आमच्याकडे डोकावली होती. या विषयावर मी तिच्याशी बोलण्याचा प्रश्नच नव्हता. पण मधे ती शौचाला गेली तेव्हा हातातली अंगठी टेबलावर काढून ठेवू गेली एवढं मात्र मी टिपलं. विशेष वाटलं.

त्याशिवाय लोक अंगठीत हिरा वगैरे वापरतात. म्हणजे तर त्याच्या किमतीमुळे ती अंगठी मला संडासात पडण्याचीही भीती जाणवते. हा माझ्या मनावरचा अतिशयोक्त तीव्र संस्कार आहे हे मला कित्येकांनी सांगितलंय पण माझ्या शंकेचं समाधान कोणी करू शकलेलं नाही. मला स्वतःला मुळात कुठचाच दागिना आवडत नाही. मला दागिना म्हणजे कृत्रिमता, नखरेबाजपणा असंही वाटतं आणि मुळात त्वचेला लागून कुठचाही धातू बऱ्याच काळासाठी, कायमचा चिकटून वापरणं हेच मला अस्वच्छ वाटतं. आपण ऊष्ण प्रदेशात राहतो म्हणजे सोनं, का चांदी का तांबं हाही प्रश्न नाही. सगळं अस्वच्छच असतं. याच कारणासाठी मला कुठचाही कपडा अंगाबरोबर घट्ट बसणारा 'स्किन फिट' योग्य वाटत नाही.

सोन्याच्या वापराविषयी आणखी एक मुद्दा इथे मांडतो. मी कॉलेजमधे शिकत असताना अर्थशास्त्र या विषयाशी माझी वयाच्या 17 व्या वर्षी ओळख झाली. त्यात जागतिक अर्थव्यवस्था, चलनव्यवस्था, रुपयाच्या जागतिक बाजारातल्या किमतीचं गणित, त्याचा देशातल्या सोन्याच्या साठ्याचा संबंध मला समजला. अर्थशास्त्र हा माझा खोलवर अभ्यासाचा विषय नाही हे मला कबूल आहे, पण साध्या भाषेत एवढी गोष्ट मला समजली की जागतिक बाजारातली रुपयाची किंमत देशाच्या तिजोरीतल्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबून आहे. जे सोनं लोकांच्या अंगावर दागिन्यांच्या स्वरूपात आहे ते देशाच्या खजिन्यात असतं तर रुपयाची किंमत वाढली असती. हे स्पष्ट कळल्यावर माझा स्वतःचा निर्णय पक्का झाला. खाजगी उपयोगासाठी सोन्याचा वापर ही नुसती चुकीचीच नाही तर राष्ट्रद्रोही गोष्ट आहे. मग तो दागिना कुठचाही असला तरी तो राष्ट्रद्रोहच होतो.

सोन्याचं आयुर्वेदामधे औषधी महत्त्व आहे वगैरे मला सगळं माहीत आहे. पण भारतीय जनतेला सोन्याचं भावनिक महत्त्व असण्याचा जो संस्कार आहे त्यापासून मात्र मी आणि शोभा, आमचं सगळं कुटुंब मुक्त आहे.

शोभा आणि मी एकमेकांना न बघता लग्न ठरवलं आणि यू.एस.ए.मधे

साध्या नोंदणी पद्धतीनी लग्न केलं हे आपलं पूर्वी बोलणं झालंय. शोभाच्या वडलांची नि माझी कधीच गाठ पडली नाही, पण त्यांनी तिला एक महत्त्वाचा संस्कार दिला होता. त्यांनी तिला सांगितलं होतं, ''आत्ता अनिल अमेरिकेत असला, सुबत्तेत असला तरी त्यामुळे तू तुझा निर्णय घेऊ नको. पैसे कधी असतात तर कधी नसतात. माणूस पारखून निर्णय घे.'' शोभावरचा हा संस्कार एकदम टिकाऊ आहे. माझंही तसंच असल्यामुळे आमचं जुळतं. आमचा दोघांचा पैसे या गोष्टीवरून कधीच वाद झालेला नाही.

मधे काही बँकांनी त्यांचा धंदा वाढवण्यासाठी जनसंपर्क वाढवायचा निर्णय घेतला असावा. शोभाच्या आणि माझ्या वाढदिवसाचे शुभेच्छा फोन यायला सुरुवात झाली. आपण बँकेच्या संस्कारांबद्दल जरा विचार केला तर वाटतं, असल्या उद्योगाऐवजी बँकेनी कार्यक्षमता वाढवावी. चांगली 'सर्व्हिस' द्यावी. तो खरा चांगला संस्कार म्हणता येईल.

●

8) कामाबद्दलचे संस्कार

सर्वसाधारण भारतीय माणसावर कामाच्या प्रकाराचे जे संस्कार सध्या दिसतात त्याचे दोनच मुख्य प्रकार आहेत. एक म्हणजे नोकरी आणि दुसरं म्हणजे धंदा. दीडशे वर्षं ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. त्या काळात जवळजवळ सगळे शिकलेले लोक 'नोकरी एके नोकरी' या मनःस्थितीत गेले. आधी संस्थानिकांच्या दरबारात नोकरी करणारे स्वातंत्र्यानंतर सरकारी नोकरीच्या मागे असायचे. सरकारी नोकरी म्हणजे कायमची सोय, स्थैर्य, त्यामुळे त्याचं आकर्षण, हा संस्कार मी माझ्या लहानपणी आणि तरुणपणी जवळजवळ सगळीकडे पाहिला.

नोकरीचा दुसरा अर्थ जबाबदारी नको, ठराविक वेळेत हजर राहून 'टोला ते टोला' काम केलं की संपलं. हा टोला ते टोला संस्कार अंगी मुरलेले अनेक लोक सगळीकडे आपल्याला सध्याही दिसतात. खरं म्हणजे आपल्या जाणत्या आयुष्यातला एक-तृतीयांश भाग, म्हणजे दर दिवशी 24 तासांपैकी 8 तास आपण चोख काम करावं अशी कल्पना असते. प्रत्यक्षात या प्रकारचे लोक कामाच्या जागेवर 8 तास नाइलाजानी नुसते हजर असतात. खरं काम ते निम्मा वेळही करत नाहीत. लोकांच्या दोन जाती समजल्या जातात. हे असे लोक पहिल्या जातीचे म्हणजे साप्ताहिक सुट्टीची वाट पहात आठवडा ढकलतात. दुसऱ्या जातीचे लोक आठवडाभर चांगलं काम व्हावं म्हणून साप्ताहिक सुट्टी मान्य करतात.

खाजगी व्यवसायातही कामं करण्यासाठी माणसं नोकरीला ठेवावीच लागतात. त्यातली अगदी थोडी अशी असतात की जी जबाबदारीनी आपलं मानून काम करणारी असतात. पण पैशांचा धोका पत्करण्याची त्यांची तयारी नसते. स्वतःचा व्यवसाय किंवा धंदा करणारा माणूस मात्र पैसे, वेळ घालायला आणि धोका पत्करायला तयार असतो. हा 'धोका पत्करायला तयार' हा खूप महत्त्वाचा संस्कार असतो. माझ्या ओळखीचे मुंबईत आणि दुबईत अनेक सिंधी होते. ते त्यांचं तत्त्वज्ञान म्हणून अभिमानानी सांगायचे की, काहीही करीन पण स्वतःचा व्यवसाय करीन. महाराष्ट्रात स्थायिक झालेले राजस्थानी 'धंदा/व्यवसाय' प्रकारचे असतात. त्यांच्यातले अगदी कमी लोक नोकरी पत्करतात.

कामासाठी घरापासून/गावापासून/देशापासून लांब जायची तयारी असणं हा पण कामाच्या संस्काराचा भाग आहे. महाराष्ट्रीय माणूस यू.एस.ए.मधे जायला तयार असतो पण नोकरीसाठी. याउलट यू.एस.ए.मधे गुजराथी लोकांनी 'पटेल-मोटेल्स' काढून नाव कमावलं. मी आणि शोभा फिलाडेल्फियामधे होतो त्याला फार वर्षं झाली हे खरं, पण अजूनही परिस्थितीत बदल नाहीय. फार कमी मराठी लोक स्वतःचा धंदा/व्यवसाय करतात.

कामाबद्दलचा एक महत्त्वाचा संस्कार मुलांच्या मनावर व्हायला हवा. स्वतःचं काम अतिशय गंभीरपणी, मनापासून, कष्ट घेऊन करायला पाहिजे. प्रत्येक दिवशी स्वतःच्या कामाचं स्वतःला समाधान वाटलं पाहिजे हे महत्त्वाचं आहे. चांगलं काम केलं की तुम्ही लोकांच्या आपोआप लक्षात राहाता. तुमच्या कामाला मागणी असते, पैसे आपोआप मिळतात. अडचण अशी आहे की, हा संस्कार मुलांच्या मनावर होण्यासाठी प्रथम पालकांच्या मनावर होण्याची गरज आहे. 'ज्या कामाला हात लावीन ते चांगलंच करीन' हा प्रथम स्वतःचा निर्धार पाहिजे.

इथे आम्ही पुण्यात राहतो, अनेक दुकानांच्यात, ऑफिसमधे जातो. जवळ जवळ प्रत्येक ठिकाणी देवाचा फोटो, फोटोपाशी कुठच्यातरी पद्धतीचा हार, उदबत्ती यातला काहीतरी प्रकार असतोच. कामाच्या ठिकाणचा देव हा भारतीयांवरचा खास संस्काराचा भाग आहे. इतर देशांच्यात कामाच्या जागी देव क्वचितच दिसतो. भारतात विशेषतः महाराष्ट्रात अगदी भाजीवाला सुद्धा 'भवानी' नावाची कल्पना डोक्यात बाळगतो. त्यात अर्थ काही नाही हे त्यालाही माहीत असतं, पण तो संस्कार जात नाही. रेस्टॉरंट चालवणारा मालक रोज सकाळी पहिला एक चहाचा कप रस्त्यावर ओततो हे मला एकेकाळी माहीत नव्हतं. गंमत वाटली.

माझे वडील थेट नोकरीच्या प्रकारचे होते. मी मात्र जो करीन तो स्वतःचा व्यवसाय असं पक्कं ठरवलं होतं. त्यासाठी तर मी यू.एस.ए.मधून भारतात आलो. मी स्वतः पक्का निरीश्वरवादी, कर्मकांडविरोधी असल्यामुळे माझा व्यवसाय मी आल्यादिवशी चालू केला. मुहूर्त वगैरे मी मानत नाही, शुभ-अशुभ मानत नाही. त्यामुळे मला कसलीच अडचण नव्हती, पण बांधकामाच्या धंद्यात मात्र बघावं तर प्रत्येक 'क्लायंट'च्या डोक्यात मुहूर्त, शुभदिवस, भूमिपूजा, बांधकाम झाल्यावर वास्तुपूजा, वास्तुशांत ही प्रकरणं असायची. ही बांधकाम क्षेत्रातली अंधश्रद्धाच होती, पण त्या संस्काराच्या पगड्याला मी काही करू शकत

नव्हतो. 'मी त्यात भाग घेणार नाही' एवढंच मी कायम म्हणालो नि तसं केलं.

शोभा शिक्षणक्षेत्रात आहे हे तुम्हाला माहितीच आहे. ती निरनिराळ्या निमित्तानी अनेक शाळांच्यात जाते. प्रत्येक वेळा ते निरर्थक सरस्वती पूजन तिनी शेकडो वेळा बघितलं. मग तिनी नवा पायंडा सुचवायला सुरुवात केली. वर्षाच्या ज्या काळात कार्यक्रम असेल त्याच्या आसपास कुठच्यातरी थोर शिक्षणतज्ज्ञाची किंवा विचारवंताची जयंती असतेच. त्यांचा फोटो लावावा. त्यांची, त्यांच्या कामाची माहिती सांगावी. मला वाटतं, आधुनिक संस्काराच्या दिशेनी टाकलेलं हे योग्य पाऊल आहे. सुरुवातीला लोकं सरस्वतीचा आणि कुठच्यातरी माणसाचा फोटो लावतील, पण ते चालेल. उदाहरणार्थ – महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, गुरुदेव रविंद्रनाथ टागोर, ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, ताराबाई मोडक, गिजूभाई बधेका.

कामाच्या ठिकाणी 'मस्टर' किंवा 'टाइम मशीन' असलं तरच लोक वेळेवर येतात हा सगळ्यांचा अनुभव आहे. ठरल्या वेळेला हजर न होण्याचा संपूर्ण भारताचा संस्कार 'इंडियन स्टॅन्डर्ड टाइम' म्हणून जगभर प्रसिद्ध आहे. स्वतः दुसऱ्याला दिलेला शब्द किंवा वेळ न पाळणं, उलगडा न करणं म्हणजे स्वतःचा कमीपणा त्याचबरोबर दुसऱ्याचा अपमान आहे हे भारतीयांना समजतच नाही. या पुस्तकसंचातल्या 'विवाह आयुष्य आणि व्यवस्थापन' या लेखात यावरचे उपायही सांगितले आहेत.

भारतीयांच्या आणखी दोन कुसंस्कारांना सबंध जग नावं ठेवतं. एक म्हणजे रांग मोडून पुढे घुसणं. मग ती उभं असलेल्या लोकांची रांग असो नाहीतर रस्त्यावरच्या वाहनांची असो. दुसरा म्हणजे रस्त्यावर थुंकणं, कचरा टाकणं, बागेत, सार्वजनिक ठिकाणी खुशाल घाण करणं. या संस्कारातून आपण केव्हा बाहेर येणार, कोण जाणे!

लोक आपापल्या कामाला जाताना स्वतःच्या वाहनानी जातात. पुण्याची लोकसंख्या 50 लाख तर वाहनांची संख्या 40 लाख आहे. त्यातली 30 लाख दुचाकी आहेत. मोटरसायकल, स्कूटर्स, स्कूटरेट्स, अनेक प्रकार. या 30 लाख वाहनचालकांच्या वाहन चालवण्याच्या सवयी भयानक आहेत. त्या 30 लाख लोकांवर एक संस्कार कोणी करू शकलं तरी समाजाचं कल्याण होईल. फक्त एक संस्कार. बाकी अनेक गोष्टी आहेत त्या राहू देत. 'कुठच्याही वाहनाला डावीकडून ओव्हरटेक करायचं नाही' एवढी एक गोष्ट फक्त. डावीकडून

सुळ्ळकन टू व्हीलर पुढे गेली की अक्षरशः थरकाप होतो.

एखादी रूढी एखादा देश किती वर्षात बदलू शकतो ही त्या देशाची परीक्षा असते. मी या परीक्षेला इंग्लंड, यू.एस.ए., कॅनडा आणि अनेक युरोपियन देश, याखेरीज आखाती देश बसलेले बघितले आहेत. या परीक्षेचा खास संदर्भ आहे चलन आणि मोजण्याची परिमाणं बदलण्याचा. भारतानी 1956 साली 'मेट्रिक सिस्टिम' वापरायला अधिकृतपणी सुरुवात केली. म्हणजे 59 वर्षं झाली या गोष्टीला. पैसे-आणे जाऊन 100 पैसे-रुपया आला. शेर जाऊन किलोग्रॅम आले. फूट जाऊन मीटर आले. या गोष्टीला 59 वर्षं झाली तरी अजून पावशेर किती आणे,' अशी संभाषणं सर्रास ऐकू येतात. अनेक वस्तू अर्धवट-सेंटीमीटरमधे मिळतात. कारण त्या पूर्ण फुटात बनवलेल्या असतात. संस्कार? 'माय फूट!'

या अशा लोकांच्या देशात सर्व बाबतीत काही अर्थपूर्ण बदल व्हायला कितीशे वर्षं लागणार आहेत कोण जाणे!

●

9) अभिरुचीचे संस्कार

ज्या निरनिराळ्या गोष्टींवरून माणूस सुसंस्कृत आहे का नाही हे आपण ठरवतो त्यात काही चूक असतं असं मला वाटत नाही. माणूस बोलायला लागला की लगेच आपला अंदाज सुरूच होतो. असं म्हणतात की, झोपेतून खडबडून जागा झालेला माणूस मातृभाषा बोलतो. कोळणीची गोष्टही तुमच्या माहितीची असेल. माशांच्या वासाची सवय असलेल्या कोळणीला सुगंधी फुलं असलेल्या खोलीत झोप येईना. तो म्हणजे संस्कार. संस्काराची व्याख्या सांगण्यासाठी आणखी एक उदाहरण प्रसिद्ध आहे. रुमालात मोगऱ्याची फुलं ठेवून रुमालाला मोगऱ्याचा वास येत राहतो. फुलं काढून हलवली तरी देखील येतो.

ज्या निरनिराळ्या बाह्यरूपातल्या पद्धतींवरून आपण काही अंदाज बांधतो त्या अगदी मोघम असतात, पण त्याचा साचा असतो. अंगावर, हातावर, कपाळावर, मनगटावर गोंदवलेलं चित्र, मजकूर बघितला की आपण अशा व्यक्तीला कमी शिकलेल्या, कष्टकरी किंवा ग्रामीण गटात टाकतो. त्यांच्यात गोंदवणं ही रूढीच आहे. पण आपल्या मनावरचा संस्कार कसा आहे बघा ना!

संस्कार म्हणजे खोलवरचा टिकाऊ परिणाम ही व्याख्या मान्य केली तर ती बोलण्याच्या बाबतीत चांगलीच जाणवते. भाषेच्या संस्काराचा मगाशी आपण उल्लेख केला.

आपल्या आसपासच्या काही मर्यादित लोकांच्यातसुद्धा निरनिराळ्या प्रकारचे शब्दप्रयोग, उच्चाराच्या पद्धती, हेल आढळतात. महाराष्ट्रभर असं समजतात की पुण्याचं मराठी म्हणजे अस्सल शुद्ध मराठी. मी आणि शोभा पुणेकर असल्यामुळे आम्हाला ही कल्पना सोयीची असली तरी खरी नाही. भाषेच्या बाबतीत बरोबर-चूक, चांगलं-वाईट असं काही नसतं. आपण भारतात असं मानतो की, लंडनमधलं इंग्लंडच्या राणीचं इंग्लिश म्हणजे शुद्ध इंग्लिश. ही समजूतही मला सोयीची आहे. कारण इंग्लंडमधे मी ब्रिटिश कुटुंबातच रहात होतो. पण हीही समजूत खरी नाही. अमेरिकेत, कॅनडामधे इंग्लिशच बोलतात आणि तेही तेवढंच चांगलं असतं. निराळं असतं एवढंच.

इंग्लंड-अमेरिकेतल्या लोकांची एक गंमत सांगतो. त्यांना आपल्या भाषेतले

काही शब्दच म्हणता येत नाहीत. उदाहरणार्थ – ळ, ज्ञ, भ. मी जिथे काम करायचो त्या ठिकाणी खूप गंमत चालायची. माझं आडनाव भागवत. बायकोचं नाव शोभा, देशाचं नाव भारत. ते म्हणायचे, हा तुमचा 'भ' जिथे तिथे इतका छळतो हे आम्हाला प्रथमच कळलं. इतर भकार पुढे मी सांगितलेच नाहीत.

आभा आणि श्रेयस काही काळ बँकॉकला होते तेव्हा आम्ही त्यांच्याकडे गेलो होतो. आभाच्या थाई मैत्रिणी झाल्या होत्या. त्यांना पण भ म्हणता येत नव्हता. त्या शोभाला चक्क 'सोफा' म्हणायच्या. थायलंडमधे आम्हाला निराळीच आश्चर्यजनक गोष्ट लक्षात आली. करंगळी वर केली की लघ्वीला जायचं आहे ही जगभरची एकच भाषा आहे, असं आम्हाला वाटत होतं. थाई लोकांना ही करंगळीची भाषा माहीत नव्हती.

भारतात संस्कृत भाषेच्या प्रभावामुळे असेल बहुतेक, पण महाराष्ट्रातल्या सुशिक्षित लोकांची वाणी जितकी स्वच्छ आहे तेवढी इतर कोणाचीच नाही. महाराष्ट्राच्या उत्तरेकडे गेलं की स्त्री ऐवजी इस्त्री आणि ज्ञ ऐवजी ग्य सुरू होतं. दक्षिणेकडे गेलं की एल.एम.च्या ऐवजी यल यम आणि एच च्या ऐवजी हेच सुरू होतं. भाषाशास्त्राचा माझा अभ्यास नसल्यामुळे मला याचं कारण माहीत नाही. माझा अंदाज असा आहे की वाचन किती, लोकांच्याशी बोलण्याची सवय किती, इतर भाषांची किती ओळख अशा अनेक घटकांवर ते अवलंबून असावं. स्वच्छ बोलणारे दक्षिणी आणि उत्तर भारतीयही मला माहीत आहेत, पण कमी!

सांस्कृतिक पातळी अशाही काही गोष्टींवरून कळते. मनोरंजनाचा कुठचा प्रकार माणसाला जास्त आवडतो त्यावरून अंदाज येतो. टी.व्ही. बघण्याचं प्रमाण, वाचनाचं प्रमाण, संगीत कुठचं आवडतं, संगीताची समज, आवड, सहली, पार्ट्या, उत्सवांचे आवडते प्रकार कुठचे यावरूनही आपण अंदाज बांधतो.

एका महत्त्वाच्या गोष्टीची आपण आठवण ठेवलीच पाहिजे. जगातल्या सगळ्या संस्कृतींमधे कलांची वाढ झाली, शिल्प, संगीत, नृत्य, चित्र यांची प्रगती झाली कारण तो अनेकांचा पोटापाण्याचा उद्योग होता. सध्याच्या काळाचं उदाहरण घ्यायचं तर जो कारागीर गणपतीच्या मूर्ती बनवण्याचं काम करून कुटुंबाचा चरितार्थ चालवत असेल तो गणपती उत्सवाच्या निरर्थकपणाबद्दल कधी बोलेल का? सोन्याचे दागिने बनविणारा कारागीर किंवा विकणारा सराफी दुकानदार कधी सोनं वापरणं हा कसा राष्ट्रद्रोह आहे याविषयी कधी बोलणं शक्य आहे का?

भारतातल्या सण, समारंभ यांच्या प्रमाणाबद्दल, अतिरेकाबद्दल माझा

वैयक्तिक आक्षेप अगदी पक्का आहे. तरीही त्यातल्या काही गोष्टींचं मला कौतुक वाटतं. गणपती उत्सवात काही ठिकाणचे देखावे फार कौशल्यपूर्ण आणि सुंदर असतात. दिवाळीत माझ्या लहानपणी किल्ले बनवायची पद्धत खूप लोकप्रिय होती. त्याचं प्रमाण आजकाल खूप कमी झालंय. प्रतिकृती बनवण्याचं कौशल्य, त्यासाठी मूळ किल्ल्याचा केलेला अभ्यास खूप चांगली गोष्ट असते. मला वाटतं, अशा चांगल्या कौशल्यपूर्ण छंदांसाठी त्या विशिष्ट सणांचं बंधन मानायचं काहीच कारण नाही. वर्षभर ते छंद, ते कलेचे आविष्कार चालू रहावेत.

मनोरंजनाचे इतरही प्रकार असतातच. उदाहरणार्थ गाड्यांची शर्यत, शिकार वगैरे. सध्या गेली काही वर्षं प्राण्यांच्या शिकारीला भारतात पूर्णच बंदी असल्यामुळे हा एक चुकीचा हिंसक संस्कार बंद झाला हे छान झालं.

व्यसनं ही कुठचीही असली तरी ती वाईटच असतात, पण लोकांच्या मनात व्यसनांच्यातही सांस्कृतिक दर्जा असतो. विलायती दारू पिणारा उच्च आणि देशी दारू पिणारी व्यक्ती नीच असं लोक समजतात. पाइप-चिरुट, सिगरेट, बिडी तीनही वाईट, पण पाइप किंवा चिरुट पिणारा उच्च आणि बिडी पिणारा नीच असे स्तर लोक मानतात. सगळ्या प्रकारच्या नारकोटिक ड्रग्जना मात्र कोणी मान देत नाही कारण ते कायद्यात बसत नाही.

अभिरुचीच्या संस्काराबाबत निश्चित काही ठरवणं कठीण जातं पण सुसंस्कृत माणसाला चांगलं-वाईट माहिती असतं. अभिरुचीचा आणि पैसे असण्या-नसण्याचा खरा संबंध नसतो. पण तरी एवढं आपण म्हणू शकतो की पांढरे, राखाडी, फिके रंग दिसायला चांगले दिसतात. गडद, तीव्र, भडक रंग नजरेला चांगले दिसत नाहीत. पण काही लोकांना भडक, चकचकीत असेच रंग आवडतात.

रंगांच्या वर्णनांपैकी एक विशिष्ट वर्णन खूपच खास आहे. ते म्हणजे 'सॉइल कलर्स' किंवा 'अर्थ कलर्स'. थोडक्यात मातीचे जे रंग असू शकतात ते म्हणजे मातकट रंग. तेही मला चांगले वाटतात. आणखी एक खूप अडचणीचा रंग म्हणजे हिरवा. हिरव्याची योग्य छटा म्हणजे काय, हे शब्दात वर्णन करणं कठीण आहे. खूप सुंदर हिरवा आणि घाणेरडा हिरवा दोन्ही अनेक ठिकाणी वापरलेले आढळतात. निसर्गात हिरव्या रंगाच्या ज्या छटा आढळतात त्या सगळ्या सुंदर असतात. त्याखेरीजच्या कृत्रिम छटा दिसायला विद्रूप दिसतात. हे मी सांगतोय ते योग्य संस्कारांना मदत व्हावी म्हणून.

आणखी काही गोष्टी व्याख्या करायला कठीण, पण त्यावरून अभिरुचीचे संस्कार कळतातच. कुठच्यातरी व्यक्तीचे वाढदिवसाचे, शुभेच्छांचे मोठे प्रचंड फलक चौकाचौकात दिसले की त्या व्यक्तीविषयी वाईटच मत होतं. स्वतःच्या कुठच्याही गोष्टीची एवढी जाहिरात करण्याचा निर्णयच अभिरुचीचा दर्जा दर्शवतो.

मागे मी आखाती देशात काम करत होतो हे आपण बोललो होतो. तिथे राजवाड्यावरच काम करण्याची मला संधी मिळाली. पैसे भरपूर, पण हीन रुची याचं उदाहरण तिथे बघायला मिळतं. जवळ जवळ प्रत्येक धातूची वस्तू गोल्ड प्लेटेड वापरायचा राजाचा निर्णय होता.

प्रत्येक गोष्ट नीटनेटकी, सुबक असावीच. पण त्याच्या रचनेचं सौंदर्यही कळायला हवं. दोन सुंदर वस्तूंच्या मधे पुरेशी जागा नसली तर त्या दोन्ही सुंदर वस्तू एकमेकांना मारक ठरतात. बहुतेक लोकांच्या घरी दिवाणखान्यात शोकेस असते. त्या शोकेसची परिस्थिती अशीच होते. जी गोष्ट मुळात सौंदर्य वाढवण्यासाठी बनवली त्याचा बरोबर उलटा परिणाम झालेला आढळतो. वस्तू त्या त्या ठिकाणी शोभायला हव्यात. पण निव्वळ शोभेच्या वस्तू मात्र बहुतेक वेळा कुठेच शोभत नाहीत.

खरं मनातून आपल्याला असुंदरतेचा तिटकारा हवा. तसा असला तर वाटतं 'काहीही करा पण ते सुबक हवं.' त्यासाठी थोडी मेहनत जास्त, थोडा वेळ जास्त, थोडा खर्च जास्त होणार, पण ते चालेल.

उपयोगासाठी सोयीची आणि सुबक असं काहीही बनवायला रचनेचं कौशल्य आणि खरी सौंदर्याची जाण लागते. अशा रचना करणं, आवडणं, त्यांचा वापर करणं ही चांगली अभिरूची असणं म्हणतात. निव्वळ सुशोभीकरण मात्र वाईट अभिरुचीचं उदाहरण मानतात. मला हे दोन्ही मुद्दे पटतात. निव्वळ डेकोरेशन मला कधीच आवडलं नाही.

माझं आणखी एक निरीक्षण आणि सुचलेली कल्पना सांगतो. सगळ्या ठिकाणी आपण स्टेजवर ठेवलेला पोडियम, त्यावर माइक आणि माइकच्या मागे लपलेला वक्त्याचा चेहरा बघतो. यावर एक उपाय करण्याजोगा आहे. पोडियमवरच्या सपाट भागाच्या दोन कोपऱ्यात दोन माइक बसवायचे. अशी वस्तू खास बनवायला हवी याची मला कल्पना आहे. पण या पद्धतीनी बोलणाऱ्या व्यक्तीचा चेहरा तरी प्रेक्षकांना नीट दिसेल.

●

10) मृत्युसंबंधीचे संस्कार

या विभागामधे मी मुद्दामून म्हातारपण आणि मृत्यू या दोन्हीविषयीचे संस्कार चर्चेला घेतले आहेत.

म्हातारपणात मुख्य गोष्ट होते ती म्हणजे परावलंबित्व येतं. शारीरिक, आर्थिक, मानसिक. त्या परावलंबित्वाचा मुख्य त्रास होतो. आणि तरी सरासरी भारतीय म्हाताऱ्या माणसाच्या मनावर परावलंबी अवस्था स्वीकारण्याचा संस्कार आहे. 'परावलंबित्व' ही गोष्ट मला चुकीचा संस्कार वाटते. तरुणपणी ज्या गोष्टी माणूस सहज रोज करतो त्या सगळ्या गोष्टी म्हातारपणी बदलतात. कुठच्याही वस्तूला पाय लावू नये, चुकून पाय लागला तरी नमस्कार करावा असा भारतीयांच्या मनावर घट्ट संस्कार आहे. म्हातारपणी मात्र यामधे बदल होतो, खरं म्हणजे करावा लागतो. हातामधून काही वस्तू खाली पडली की वाकणं कठीण असतं. ती वस्तू पायानी ओढून घेणं याला पर्याय नसतो.

असं म्हातारपण आलं की त्या निमित्तानी निदान माणसानी मृत्यूविषयी स्पष्ट विचार करायला लागावं. म्हातारपण याचा अर्थच मृत्यू जवळ येण्याची अवस्था. 'दोन प्रकारच्या निमंत्रणांना नाही म्हणायचं नसतं – एक लग्नाचं निमंत्रण आणि दुसरं मयतीचं बोलावणं' असा आपल्या परंपरांमधे संस्कार आहे. मला हा संस्कार योग्य वाटत नाही. मी एव्हाना जवळजवळ सगळ्या कर्मकांडांच्या विकारातून मुक्त झालो असलो तरी मी पूर्वी अगदी सगळ्या कर्मकांडांच्यातून गेलेलो आहे.

मेलेल्या माणसाचं शरीर घरात अंत्यदर्शनासाठी ठेवतात. नाकात कापसाचे बोळे. नंतर उचलायला सोपं जावं म्हणून त्या व्यक्तीला तिरडीवरच झोपवतात. आसपास माणसं एक शब्द न बोलता तासन्‌तास उभी राहतात. कुठच्यातरी महत्त्वाच्या व्यक्तीसाठी सगळे थांबून राहिलेले असतात. किती वेळ थांबायचंय कोणालाच माहिती नसतं. कधी जेवणाची वेळ होते, पण घरातली आणि बाहेरची कोणीच जेवू शकत नाहीत. एरवीच्या पद्धतीचा पाहुणचार करायचा नसतो हे आपण समजू शकतो. पण अशा मयतीच्या प्रसंगामधे होणारी गैरसोय वर्णनापलीकडची असते. अशा एक-दोन प्रसंगांनंतर मी माझ्यापुरता निर्णय फार पूर्वीच घेतला की

मी त्यात नाही.

मृत्यूनंतरचे जे संस्कार म्हणून मानले गेले आहेत ते सगळे पुनर्जन्म या कल्पनेवर आधारलेले आहेत. मृत व्यक्ती स्वर्गात जावी, पुढचा जन्म चांगल्या मानवाचा असावा अशा परस्परविरोधी आणि अर्धवट कल्पना डोक्यात ठेवून, मंत्र म्हणून मृत शरीर जाळतात. हिंदू परंपरेप्रमाणे स्त्रियांना स्मशानात प्रवेश नसतो हे देखील चुकीचंच आहे. सध्याच्या आधुनिक विचारांच्यात ही गोष्ट बसत नाही. त्यामुळे ती पाळायची गरज नाही.

मृत शरीर जाळणं, तेही शहरात, हे पर्यावरणाची मोठी हानी करणारी गोष्ट आहे. सर्वात योग्य गोष्ट म्हणजे जवळच्या जंगलात, झाडीत जमिनीत खड्डा खणून प्रेत पुरणं. त्याची आपोआप माती व्हायला किती महिने, वर्षं लागतात हे खरं म्हणजे मला माहिती नाही, पण ते गौण आहे. मला कळलेल्या माहितीप्रमाणे त्यात कायद्याची आडकाठी असते. त्याचा अधिक अभ्यास मी जरूर करीन.

मृत्यूनंतर बरोबर 1 वर्षांनी वर्षश्राद्ध असा संस्कार परंपरेत मानतात. श्रद्धापूर्वक केलेली आठवण म्हणजे श्राद्ध असा त्याचा शब्दार्थ आहे. मृत व्यक्तींची श्रद्धेनी आठवण, कृतज्ञता व्यक्त केल्यामुळे स्वतःतला अहंकार कमी होतो अशी त्यामागची कल्पना आहे. आपल्या सगळ्या पूर्वजांबद्दल याच प्रकारे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पारंपरिक संस्कारात पितृपंधरवड्याचीही सोय केलेली आहे.

जी घटना निश्चित घडणार त्याची तयारी माणसानी करायलाच हवी हे कोणाच्याही बुद्धीला पटण्याजोगं आहे. मृत्यू ही घटना नक्की घडणार हे प्रत्येकाला माहिती असतं, पण केव्हा हे माहिती नसल्यामुळे बहुतेक जण काही तयारी करत नाहीत. माझ्या मते, मृत्युपत्र तयार करणं, त्याचा मजकूर नवरा-बायको, मुलं यांनी एकत्र बसून चर्चा करणं हा महत्त्वाचा 'एक्सरसाइज' आहे आणि महत्त्वाचा संस्कारही आहे. फक्त आपल्या परंपरांचा त्याला पूर्ण नकार आहे.

पुढे जाऊन माणसानी 'लिव्हिंग विल' म्हणजेच मराठीत इच्छामरणपत्र देखील बनवायला हवं. आपण स्वतः निर्णय घेण्याच्या अवस्थेत नसलो तर इतरांना, डॉक्टरांना दिलेल्या आगाऊ सूचना त्यामधे असतात. मी आणि शोभानी 'विल' आणि 'लिव्हिंग विल' दोन्ही केव्हाच बनवलं आहे.

●

11) संस्कारांबद्दल करण्याजोग्या गोष्टी

अगदी सध्याच्या काळात विवाहयोग्य वयातल्या मुला-मुलींना लग्नाआधी आणि लग्नानंतर संस्कार या विषयाबद्दल स्वतः आणि दोघांनी मिळून विचार करणं या गोष्टीला काही पर्याय नाही. अगदी आदिमानवापासून गरजा बदलतील, परिस्थिती बदलेल त्या वेगानी संस्कार बदलत होतेच. त्याचा काही वेग होता. गेल्या पन्नास वर्षांत म्हणजे मी बावीस वर्षांचा होतो तेव्हा प्रत्येक गोष्ट हातानी आणि स्वतः करण्याची पद्धत होती. भारतात टी.व्ही. नव्हता. फोन होते, पण त्याचा वापर कमी होता. कॉम्प्युटर्स या विषयात संशोधन चालू होतं. इंग्लंडला मी प्रथम गेलो तेव्हा टी.व्ही. कसा असतो ते बघण्यासाठी कौतुकानी दुकानात गेलो होतो. तोही काळा-पांढरा. रंगीत टी.व्ही.चा शोध लागला होता, पण रंग नीट दिसण्यावर संशोधन चालू होतं.

माझ्या घरी फोन नव्हता. फोन खूप महाग होते. मी इंग्लंडला सुखरूप पोहोचलो हे घरी कळवायला टपालानी पत्र पाठवणं एवढाच रास्त मार्ग होता. नंतर शोभा माझ्याशी लग्न करण्यासाठी यू.एस.ए.ला आली तेव्हा ठाण्याला तिच्या घरी फोन नव्हता. फिलाडेल्फियाच्या माझ्या घरी टी.व्ही. नव्हता. शोभा आल्यावर तो घेतला.

मी आणि शोभा आपापल्या ठिकाणी जिथे नोकऱ्या करायचो तिथे टाईपरायटर्स होते. अगदी अद्ययावत म्हणजे इलेक्ट्रिक टाईपरायटर्स असायचे. कॅलक्युलेटर्स होते, पण इलेक्ट्रिक कॅलक्युलेटर्स होते. सबंध ऑफिसमधे एक-दोन असायचे. बाकी सगळे आम्ही कागदावर आकडे मांडून बेरजा करायचो. माझ्या आर्किटेक्चरल फर्ममधे ड्राईंग्ज हेच मुख्य काम चालायचं. तेही मोठ्या ड्रॉईंग बोर्डवर आणि पेन्सिल किंवा शाईनी. एस्टिमेट करताना फक्त कॅलक्युलेटर्स वापरले जायचे.

हे सगळं एका माणसाच्या आयुष्यात 50 वर्षांमधे इतक्या झपाट्यानी बदललं ते माझ्या पिढीला खरं म्हणजे झेपलं नाही. या निरनिराळ्या उपकरणांमुळे रिकाम्या वेळेत करण्याच्या सगळ्या गोष्टी बदलल्या. संवाद माध्यम बदललं की संवादाचा दर्जा, पद्धत सगळ्यावर परिणाम होतोच. सगळ्या गोष्टींचा वेग वाढला आणि वेगाच्या अपेक्षाही वाढल्या.

आमच्या मुलांच्या काळात सगळ्या गोष्टी लवकर व्हायला लागल्या. त्यांना त्या बऱ्याचशा पचल्या, पण काहींमधे ते अडखळले. त्यांना जेव्हा वागणुकीतले सांस्कृतिक प्रश्न आले तेव्हा वडीलधारे म्हणून आम्ही त्याची उत्तरं देऊ शकलो नाही. पण आपण या प्रश्नांसाठी पुरेसे सक्षम नाही हे माझ्या पिढीनी कधी कबूल केलं नाही. आपल्या काळात लागू असलेला हट्ट धरून बसायचा आणि त्याला 'संस्कार' म्हणायचं असं चालू केलं.

साहजिकच दोन पिढ्यांच्यातला संघर्ष पूर्वी होता त्यापेक्षा तीव्र बनला. जन्मदाते म्हणून आई-वडलांविषयी कर्तव्यभावना होती, पण सल्लागार म्हणून त्यांच्याविषयीचा आदर कमी झाला. त्यामुळे संघर्ष जास्त वाढला. आमच्या पिढीमधली आमची काही मित्रमंडळी आणि आम्ही यांच्यात मुख्य फरक हाच की आम्हाला समजत नाही ही गोष्ट आम्हाला समजली आणि आम्ही ती मान्य केली.

मला स्वतःला संस्कार या गोष्टीबद्दल काय वाटतं ते निराळ्या शब्दात सांगतो. भारतीय जनतेनी सज्जनपणी, समजूतदारपणी, समतोलपणी वागावं म्हणून एवढी वर्षं पारंपरिक संस्कारांचा उपयोग करून बघितला. स्वातंत्र्य मिळाल्यापासून 67 वर्षं झाली. हा प्रयोग फसलेला आहे. आता आधुनिक संस्कार करून बघण्यासाठी काही वर्षं द्यायला हवीत. निदान 25 वर्षं तरी. त्याआधी अंदाजे 25 वर्षं आधीचे चुकीचे संस्कार धुवून काढायला लागतील.

आधुनिक संस्कार हे चविष्ट पेय आहे. एकदा त्याची चव तर घेऊन बघा! टेकडीपलीकडे ज्ञानाचा सागर असताना लोक टेकडीअलीकडे पारंपरिक संस्काराच्या डबक्यात डुंबत कसंबसं आयुष्य काढतायत, असं मला वाटतं. सागर म्हणजे आधुनिक संस्कार. टेकडी म्हणजे अभ्यास मंडळ.

आता अगदी सुरुवातीला मी म्हणालो तो आधुनिक संस्काराचा मला समजलेला अर्थ पुन्हा सांगतो. 'बलवानांनी दुर्बलांना मदत करण्याची कर्तव्य भावना' म्हणजे संस्कार. मगासपासून आपण सध्याची परिस्थिती अनेक संदर्भात तपासली आहे. त्या प्रत्येक संदर्भात हा मी म्हणतोय तो आधुनिक संस्काराचा अर्थ कसा लागू करायचा, ते बघूया.

1) आहाराविषयीचे संस्कार : गेल्या 50 वर्षांत आहारातल्या घटकांविषयी ॲलोपॅथीच्या आधारानी पृथक्करण करून बराच अभ्यास झालेला आहे. आयुर्वेदानी आहाराचा अभ्यास शेकडो वर्षांपूर्वीपासून केलेला आहे, पण त्याला रासायनिक

पृथक्करणाचा आधार नव्हता. आयुर्वेदात रुग्णाच्या संपूर्ण आयुष्याचा अभ्यास होता. त्याचा स्वभाव, आहार, व्यायाम, सगळ्याचा एकत्रित अभ्यास आणि त्याला जोडून नाडीपरीक्षा होती. भारताखेरीज बाकीच्या जगानी आयुर्वेद नाकारला. पाश्चात्त्यांच्या प्रभावामुळे भारतीयांच्यात देखील 'ॲलोपॅथी'ला महत्त्व आलं. खरे ज्ञानी आयुर्वेद जाणणारे वैद्य संख्येनी कमी उरले. दुर्दैवानी 'ॲलोपॅथी'च्या अभ्यासात आहाराचा पुरेसा समावेश नसतो. त्यामुळे 'डाअेटिशियन' ही निराळी शाखा झाली.

मला वाटतं की, आहारशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास केलेल्यांनी, आयुर्वेद जाणणाऱ्यांनी इतर समाजाचं सतत प्रबोधन करत राहणं म्हणजेच या विशिष्ट संदर्भात बलवानांनी दुर्बलांना केलेली मदत ठरेल, म्हणजेच आधुनिक संस्कार होईल. या विषयावर मुक्त लिखाण, टेलिव्हिजनवर ज्ञानप्रसार करावा. त्या ज्ञानदानाकडे धंदा म्हणून बघू नये. स्वतःच्या क्लिनिककडे ग्राहक खेचण्याची धडपड करू नये. खात्रीनी सांगतो, लोक आपोआप येतील.

2) आरोग्याविषयीचे संस्कार : सोपं आणि संक्षिप्त करण्यासाठी आपण आरोग्य या विषयात व्यायाम, स्वच्छता आणि व्यसनं या विषयांचा समावेश केला आहे. व्यायामाविषयी ज्यांचा खरा अभ्यास आहे अशांनी म्हणजे 'फिजिओथेरपिस्ट', स्पोर्ट्स मेडिसिनमधले डॉक्टर्स, योगशिक्षक यांनी स्वतःची 'प्रॅक्टिस' वाढवावी, पण आधुनिक संस्काराचा हा अर्थ प्रथम लक्षात ठेवावा. माफक, परवडणाऱ्या दरात लोकांसाठी हे ज्ञान उपलब्ध करणं हे स्वतःचं कर्तव्य आहे. ह्याकडे लक्ष द्यावं. 'प्रॅक्टिस' आपोआप वाढेल.

मी असं ऐकलं आहे की अमेरिकेत 'इंटिग्रेटेड मेडिसिन' चा कोर्स सुरू झाला आहे. म्हणजे ॲलोपथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, आहारशास्त्र, व्यायामशास्त्र सगळ्याचा एकत्रित अभ्यास ही फार चांगली कल्पना आहे.

स्वच्छता या विषयाशी संबंधित ज्ञानी माणसं म्हणजे 'इम्यूनॉलॉजी'चं शास्त्र. त्या विषयातल्या लोकांनी सर्वसामान्य माणसांनी स्वतःची प्रतिकारशक्ती कशी वाढवावी, याचं ज्ञान सोपं करून त्याविषयी लिखाण, कार्यशाळा घेतल्या की आधुनिक संस्कार होतील. त्यांनी ते मनावर घ्यायला हवं.

व्यसनं हे प्रकरण खूप गंभीर आहे. त्यात मानसशास्त्रीय भागही खूप असतो आणि औषधयोजनांचा स्वतंत्र अभ्यास हाही भाग असतो. या विषयात

'क्युरेटिव्ह' कामापेक्षा 'प्रिव्हेंटिव्ह' काम जास्त करायला हवं.

या विषयातल्या तज्ज्ञांनी या संदर्भातल्या आधुनिक संस्काराच्या अर्थाकडे बारकाईनी लक्ष द्यावं. आपल्या कामाकडे धंदा म्हणून बघू नये.

सरकारनी भारतीयांचं आरोग्य, आरोग्यसेवा याकडे निराळ्या नजरेनी बघायला हवं. याबद्दल डॉक्टर मंडळींनी सबलांनी दुर्बलांना केलेली मदत या दृष्टीनी विचार करावा.

3) पोषाखाविषयीचे संस्कार : या एका विषयामधले तज्ज्ञ कोणाला म्हणता येईल हा प्रश्नच आहे. 'फॅशन डिझायनर्स' माझ्या ओळखीचे आहेत, त्यांच्याशी मी अनेक वेळा सविस्तर बोललेलो आहे. माझी त्या सबंध क्षेत्राबद्दलच वैयक्तिक तक्रार आहे. सोय आणि आकर्षकता या दोन्ही गोष्टींकडे सतत लक्ष पाहिजे. त्यापैकी 'फॅशन डिझायनिंग' या क्षेत्रानी 'सोय' या गोष्टीकडे पूर्ण दुर्लक्ष केलेलं आहे. ते फक्त धंदा बघतात. माझ्या दृष्टीनी त्यांनी लोकांना काही सांगण्यापूर्वी त्यांच्या प्रबोधनाची गरज आहे. पोषाखाच्या पद्धतीची दर दहा वर्षांनी आवर्तनं चालू असतात, पण माझा आक्षेपाचा मुद्दा प्रत्येक आवर्तनात तसाच राहतो. सोयीकडे लक्ष कमी. माझ्या मते पाश्चात्त्य जगाला सोय आणि सुबकपणा यांचं योग्य मिश्रण भारताच्या तुलनेत जास्त चांगलं जमलं आहे.

4) निवाऱ्यासंबंधीचे संस्कार : मोठ्या शहरांपेक्षा छोट्या गावांच्यात मुबलक जागा, खोल्यांची संख्या आणि तरी पुरेशा सोयी, बंद दरवाजा असलेल्या म्हणजे 'प्रायव्हसी' असलेल्या खोल्या अशा मिश्रणाचा सबंध कुटुंबानी मिळून विचार करावा.

5) विवाहासंबंधीचे संस्कार : याविषयी मी या कार्यशाळेबद्दलच्या पुस्तकसंचात अनेक ठिकाणी सांगितलेलं आहे तेच इथे ठळकपणे सांगतो. शाळेतल्या 5 वी इयत्तेपासून स्त्री-पुरुष आकर्षण या विषयाचं पद्धतशीर शिक्षण सुरू झालेलं हवं. मुलाची किंवा मुलीची लैंगिक कुतूहलाची कोंडी होण्यापेक्षा लैंगिक ज्ञान मिळणं, तेही टप्प्याटप्प्यानी हे फार महत्त्वाचं आहे. 12 वी पर्यंत टप्प्याटप्प्यानी ज्ञान मिळत गेलं की मुलं आणि मुली जास्त शांत होतील आणि त्यांचं अभ्यासाकडे जास्त चांगलं लक्ष लागेल. तो महत्त्वाचा ज्ञानसंस्कार असेल.

खुद्द विवाहाचा काळ जवळ आल्यावर काहीही संस्कार करायचे शिल्लक असता कामा नयेत असं खरं म्हणजे व्हायला हवं. तोपर्यंत विवाहपूर्व समुपदेशन, विवाह अभ्यास मंडळ सक्तीचं व्हायला हवं.

जोपर्यंत विवाहाच्या कायद्यात बदल होत नाही, अंमलबजावणीत बदल होत नाही, थोडक्यात राजकीय पुढाऱ्यांवर योग्य तो संस्कार होत नाही तोपर्यंत परिस्थितीत बदल होणार नाही. या बाबतीत राजकीय पुढारी म्हणजे सबल आणि जनता म्हणजे दुर्बल.

कुटुंबपातळीवर ज्येष्ठ लोकांना त्यांच्या वयामुळे, अनुभवामुळे बलवान मानलं जातं. प्रत्यक्षात सध्याच्या जगाबद्दलचं ज्ञान म्हणजे बळ मानलं तर तरुण पिढी बलवान असते. कोण जास्त बलवान हे ठरत नाही. त्यामुळे कोणी कुणाला शिकवायचं हेच ठरत नाही, हीच अडचण असते.

6) मुलांवरचे संस्कार : या एका बाबतीत पालक मुलांचे पोशिंदे असल्यामुळे पालक बलवान आणि मुलं दुर्बल हे फार सरळ आहे. कार्यशाळेबद्दलच्या या पुस्तकसंचात पालकत्वासंबंधी स्वतंत्र लेख आहे. त्यातला सारांश फक्त इथे सांगतो. मुलांची प्रचंड ताकद म्हणजे कुतूहल, म्हणजेच शिकण्याची इच्छा. कुठच्याही नॉर्मल मुलाला जबरदस्ती, धाकदपटशा असे अत्याचार करून अडथळे आणले नाहीत तर शिकण्याची इच्छा, गोडी असतेच. पुस्तकं, शाळा ही नुसती साधनं आहेत. पालकांनी म्हणजे बलवानांनी मुलांना म्हणजे दुर्बलांना करण्याची मुख्य मदत म्हणजे बळाचा वापर न करणं.

7) पैशासंबंधीचे संस्कार : पैशानी सुस्थितीत असणाऱ्या प्रत्येकानी दुर्बलांना मदत करणं याबाबतीत एक गोष्ट समजावून घेतली पाहिजे. पैसे दान करणं म्हणजे योग्य संस्कार नाही. पैसे कसे मिळवायचे, कसे राखायचे, कसे वाढवायचे, याबद्दलचं ज्ञान दुर्बलाला देणं हा योग्य संस्कार असतो. उचलून पैसे दिले तर ते खर्चले की संपतात. पैसे कमावण्याचं ज्ञान दिलं तर ते कधीच संपत नाही. आणीबाणीच्या परिस्थितीतच पैसे द्यायचे, पण ते उसने आणि व्याजानीच द्यायचे. हे देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला कळणं, पटणं आणि अमलात आणणं हा खरा संस्कार.

8) कामाबद्दलचे संस्कार : प्रत्येक कामामधे उपजत अंग असणं आणि अनुभव मिळवणं हे दोन्ही भाग महत्त्वाचे असतात. हे दोन्ही गुण ज्यांच्याकडे असतात आणि जे त्यावर मेहनत करतात तेच लोक यशापर्यंत पोहोचतात. याबाबतीत आपलं ज्ञान राखून ठेवणं, गुप्त ठेवणं, दुसऱ्याला ते मिळू नये अशी धडपड करणं हे सगळे प्रकार सगळीकडे चालू असतात. ते मात्र अगदी चुकीचं आहे.

अनुभवी माणसानी या बाबतीत स्वतःला सबळ समजायचं आणि नवीन माणसाला आनंदानी काम शिकवायचं, त्याला प्रोत्साहन द्यायचं हे कटाक्षानी करायचं. नवीन आलेला माणूस चांगलं काम शिकला तर स्वतःचं काम जाईल किंवा कमी होईल ही भीती खरी नसते. तरुण माणूस मुळात त्या वकूबाचा असला आणि तुम्ही आखडूपणानी त्याला कामाबद्दलचं ज्ञान दिलं नाही, जबाबदारी दिली नाही, तर तो दुसरीकडे जाऊन यशापर्यंत पोहोचणारच, हे पक्कं लक्षात ठेवावं.

9) अभिरुचीचे संस्कार : याबाबतीतले सबळ म्हणजे अनुभवी किंवा ज्येष्ठ आणि दुर्बळ म्हणजे लहान किंवा तरुण मुलं. या संबंधात कुठच्याच गटाला जास्त किंवा कमी समजतं असं समजता येत नाही. एकच गोष्ट सगळ्यांनी लक्षात ठेवण्याची आहे. निसर्गाइतकं सुंदर दुसरं काही नसतं. निसर्गातली रंगसंगती, रचना हे सगळ्यांनी निरीक्षण करायचं आहे.

10) मृत्युसंबंधीचे संस्कार : मृत्युसंबंधी मोकळेपणानी बोलायला तयार असणं, लिहायला तयार होणं हा महत्त्वाचा संस्कार आहे. हे ज्यांना कळलं ते बलवान. बलवानांनी वेळेवर मृत्युपत्र, इच्छामरणपत्र केलेलं असतं. त्यामुळे ते निश्चिंत आणि शांत होतात. त्यामुळेच त्यांना बलवान म्हणायचं. बाकीचे सगळे मृत्यूला घाबरत जगतात म्हणून त्यांना दुर्बल म्हणायचं. या बाबतीत बलवानांनी लिखाणातून, बोलण्यातून अखंड प्रबोधन करत राहणं हीच मदत आणि हाच संस्कार.

या पुस्तकसंचात ज्येष्ठ नागरिकांशी संवाद हा लेख आहे. त्यातला एकच मुद्दा इथे सांगतो. त्यांची मुख्य अडचण अशी असते की त्यांना समजत नाही हे त्यांना समजत नाही, त्यामुळे मान्य नाही. अनेक तरुणांच्या दृष्टीनी आई-

वडलांपेक्षा आजी-आजोबा बरे असं असतं. कारण त्यांना ते मान्य असतं.

आई-वडील ज्या संस्कारांचा आग्रह करत असतात त्या गोष्टींमधे तरुणांना स्वारस्य नसतं आणि त्यांचा मुख्य प्रश्न निराळाच असतो. इतक्या भयानक गुंतागुंतीच्या आयुष्यात इतके ताण असतात की, ज्या संस्कारांबद्दल ज्येष्ठांचा आग्रह असतो, त्या गोष्टी करायला वेळ कुठे असतो त्यांना? याचं खरं सार असं आहे की, काही दारं बंद केल्याशिवाय इतर दारं उघडता येत नाहीत. काही गोष्टी डोक्यातून काढून टाकल्याशिवाय डोक्यात खऱ्या प्रश्नांच्या रास्त उपायांसाठी जागाच होणार नाही.

याला व्यवस्थापनाच्या भाषेत होकार आणि नकारांची यादी म्हणतात. काही गोष्टी आपण आवर्जून करतोच आणि काही गोष्टी नाहीच करत. हे दोन्ही 'च' महत्त्वाचे आहेत. माझी अशी शिफारस आहे की, ज्यानी त्यानी आपली 'करणारच' आणि 'करणार नाहीच' ची यादी बनवावी. नमुना म्हणून माझ्या च च्या दोन याद्या इथे देतोय. मी बंडखोर, विवेकनिष्ठ विचारांचा, आग्रही, जाहीर निरीश्वरवादी, कर्मकांडविरोधी असल्यामुळे माझी 'होच'च्या यादीपेक्षा 'नाहीच'ची यादी मोठी आहे. पण त्यानी काही फरक पडता कामा नये. तुम्ही तुमची यादी स्वतः बनवायची आहे. तुमचं वय काहीही असो, तुम्ही विवाहित असा अविवाहित असा, यादी मनात असते ती कागदावर उतरवा.

●●●

11

स्वतःची होकारांची आणि नकारांची यादी

'होच' ची यादी

मी स्वतः गेली अनेक वर्षं निरर्थक रूढी शोधणं, वेचून वेचून त्यांचा अर्थ समजून घेणं, त्यांच्यापैकी चांगल्या-वाईट ठरवण्याचं काम करतो. ज्या मला निरर्थक वाटतात त्या सोडून देतो. पटतात त्या गोष्टी आवर्जून करतो. आधुनिक विचारात तशीच कल्पना आहे. अशा आधुनिकपणाची लागण होते, पण त्याचा वेग फार कमी असतो. लग्नसमारंभ, मृत्यूचे प्रसंग सर्वांत महत्त्वाचे मानले जातात. त्याखेरीज कमी महत्त्वाच्या, वाढदिवस, समारंभ, भेटवस्तू अशा रूढींचा रेटा फार जबरदस्त असतो. समाजावर जरा परिणाम होतो आहे अशी शंका येण्यासाठी दहा वर्षं लागतात. प्रत्यक्ष बदल थोडेफार दिसायला त्यापुढे पंधरा वर्षं लागतात. त्या बदललेल्या गोष्टींचं रुढीत रुपांतर व्हायला त्यापुढे 25 वर्षं लागतात. या सगळ्यांची बेरीज 50 वर्षं होते. याला इलाज मात्र काही नाही.

स्वतःला अमुक अमुक गोष्टी पटत नाहीत ह्याची प्रत्येक समजदार माणसाची यादी तयार पाहिजे आणि 'मला हे पटत नाही, त्यामुळे मी ते करणार नाही' असं म्हणण्याइतका निर्भीडपणा पाहिजे. सर्वसाधारण समाजाची एकच पंचाईत असते. विचार करण्यापर्यंत माणसं पोचतातही, पण पुढे धाडस कमी पडतं आणि अंमलबजावणी राहते. याची माझ्यापुरती होकारांची यादी अशी.

1) सगळे नातेवाईक, मित्र, कमी-जास्त ओळखीचे यांच्याशी मी कायम सभ्यपणी, शांतपणी बोलतो, वागतो.

2) माझ्या हातून वागणुकीत एखादी चूक झाली तर आठवणीनी स्पष्ट शब्दात माफी मागतो. गैरसमजुतीचं कारणही स्पष्ट करतो.
3) गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी सी.क्यू.एस. खिशातल्या डायरीचा वापर करतो आणि ती डायरी ठरलेल्या शिस्तीत कायम बरोबर ठेवतो.
4) प्रत्येक व्यक्तीशी रास्त पैशाचा व्यवहार करण्याचा प्रयत्न आणि आग्रह करतो. रास्त व्यवहारासाठी बरीच माहिती काढावी लागते ती आवर्जून काढतो.
5) विशेषतः कष्टकरी वर्गाला बाजारप्रमाणे मोबदला मिळालाच पाहिजे असा आग्रह धरतो. काही कारणानी थोडं इकडे-तिकडे होणार असलं तर मी केवळ नशिबानी सधन वर्गात आहे याची जाणीव ठेवून नुकसान मी सोसतो.
6) संबंधित सर्व लोकांचा आत्मसन्मान जपतो.
7) आयुष्यातल्या प्रत्येक प्रश्नाकडे अभ्यास करण्याजोगा विषय म्हणून बघतो.
8) मी कुठच्याही ठिकाणी ठरल्यापेक्षा उशिरा जात नाही, कायम वेळ पाळतोच.
9) उत्तरासाठी, उलगड्यासाठी कोणाला टांगून ठेवत नाही, त्यामुळे होकार-नकार, पुढचा वायदा यांचा लगेच उलगडा करतो.
10) पर्यावरण या विषयाचा माझा आधीचा स्वतंत्र अभ्यास नसताना देखील मला त्याचं महत्त्व समजलं आहे. त्यामुळे शहरात राहून देखील शक्यतोवर पर्यावरणपूरक शैलीनी जगण्याचा प्रयत्न करतो.
11) वीज, पाणी या दोन्हींची बचत करतो.
12) पशुपक्षी, जनावरं, वनस्पती या सर्व जिवंत गोष्टींचा म्हणजेच पर्यावरणाचा अभ्यास करून त्यांच्याशी चांगलं वागतो. कायमच वागीन.
13) मुलांचे संबंध कायम सलोख्याचे राहाण्यातला एक घटक म्हणून माझ्या गुंतवणुकी, मालमत्ता यांची कागदपत्रं व्यवस्थित ठेवतो. मृत्युपत्र आधीच केलेलं आहे. तपशीलात महत्त्वाचे बदल झाले तर मृत्युपत्र पुन्हा बनवीन.
14) मृत्यूपूर्वीच्या शेवटच्या काळात मी निर्णय घेण्याच्या अवस्थेत नसीन. अशा परिस्थितीतल्या माझ्या सूचनांचं ‘लिव्हिंग विल’ मी बनवलेलंच आहे. त्या बाबतीत आणखीन अभ्यास करून मी ते ‘लिव्हिंग विल’ परिपूर्ण करीन.
15) व्यक्तिस्वातंत्र्य / स्त्री-पुरुष समानता या मूल्यांचा कायम आदर करीन.

माझी नकारांची - 'नाहीच'ची यादी

बाह्यरुपासंबंधी–

- दागिने वापरत नाही.
- राखाडी, काळी पँट किंवा लेंगा याखेरीज इतर रंग तुमानीसाठी वापरत नाही.
- शर्ट, मॅनिला समोरून बटणं नसलेला, डोक्यावरून काढावा लागणारा वापरत नाही.
- गंजिफ्रॉक हे अंतर्वस्त्र अजिबात वापरत नाही.
- घराबाहेर घालण्याच्या कपड्यांची एकूण संख्या, शर्ट-पँट मिळून दहाच्या वर जाऊ देत नाही.
- पैशाचं पाकीट, डायरी, पेन, घराची किल्ली अशा वस्तूंशिवाय घराबाहेर पडत नाही. घराची किल्ली महत्त्वाची.
- चपला-बूट काळ्या रंगाखेरीज वापरत नाही.
- घराबाहेर पडताना पिशवीशिवाय नुसत्या हातात वस्तू नेत नाही.
- केस कापण्यासाठी सलूनमधे जात नाही, कारण स्वतः कापतो.

- लहान मुलांशी बोबडं बोलत नाही.
- बायको, मुलं, नातवंडं यांना मारणं सोडा, त्यांच्यावर हातही उगारत नाही.
- कोणाशी ओरडून बोलत नाही.
- कोणाला वाकून नमस्कार करत नाही. कोणाकडून करवून घेत नाही.
- दारू पीत नाही.
- सिगरेट ओढत नाही.
- तंबाखू खात नाही.
- वैयक्तिक पातळीवरचा वाद करत नाही.

- बाहेरचं कोणीही येणार असलं तरी व्यवस्थित पूर्ण पोशाखाशिवाय त्यांना भेटत नाही.
- एकांताशिवाय दुसऱ्याच्या देखत तोंडात बोट घालत नाही.

- खात असताना तोंडात घास अर्धवट ठेवून बोलत नाही.
- जांभई देताना तोंडावर हात ठेवायचं विसरत नाही.
- जांभई देता देता बोलत नाही.
- दुसऱ्याच्या देखत नाकात बोटं घालत नाही.
- रुमालात नाक शिंकरत नाही.
- पाहुण्याला खाण्यापिण्याचा आग्रह कधी करत नाही.
- माझी मतं कधीही दुसऱ्यावर लादत नाही.
- दोन व्यक्तींच्या संभाषणात विचारल्याशिवाय मधे बोलत नाही.
- कुठच्याही रांगेत रांग मोडून पुढे घुसत नाही.
- व्यक्तिगत सेवा, म्हणजे मालिश– पाय, डोकं चेपणं वगैरे कोणाकडून करून घेत नाही.
- मी कोणाची व्यक्तिगत सेवा, शुश्रुषा करत नाही.
- कुटुंबातल्या व्यक्तीखेरीज हॉस्पिटलमधे उपचार म्हणून भेटायला जात नाही.
- माझ्या शरीरावर फार खर्चाची शस्त्रक्रिया करून घेत नाही.
- शारीरिकदृष्ट्या परावलंबी, अपंग आयुष्य जगत नाही, जगत राहणार नाही.
- मुलं-नातवंडं यांच्या मोहात गुंतून पडणार नाही.
- अनोळखी लहान मुलांच्या आपणहून जवळ जात नाही.
- बायकोव्यतिरिक्त इतर स्त्रियांशी शारीरिक लैंगिक संबंधाला नकार.
- बायकोव्यतिरिक्त इतर सर्व स्त्रियांशी सभ्यपणे वागण्याच्या निर्णयामुळे स्पर्शाला नकार.

पैसे

- पैशाच्या व्यवहारात दुसऱ्याला कधीही फसवत नाही.
- वस्तूची किंमत-भाव याबद्दल घासाघीस करत नाही.
- दुसऱ्याकडून फुकट काही घेत नाही.
- भिकाऱ्याला भीक देत नाही.
- रेस्टॉरंटमधे टिप ठेवत नाही.
- दारावर विकायला आलेल्या वस्तूंच्या मोहात पडून त्या खरेदी करत नाही.

- कोणाकडूनही लाच स्वीकारत नाही.
- मुलांच्या पैशांवर अवलंबून राहणार नाही.
- स्वतःच्या मुलांकडे त्यांना ओझं वाटेल एवढा काळ राहाणार नाही.
- सरकारी नोकरी कधीही केली नाही आणि करणार नाही.

व्यक्तिगत व्यवस्थापन

- फाइल, फोल्डर अशा व्यवस्थेशिवाय सुटा कागद घरात, ऑफिसमधे ठेवणार नाही.
- डावीकडे समास सोडल्याशिवाय कुठचाही कागद लिहिणार नाही.
- उजव्या वरच्या कोपऱ्यात तारीख लिहिल्याशिवाय कागदच वापरत नाही.
- कुठच्याही गोष्टीची आठवण मला करायला दुसऱ्याला सांगत नाही.
- सगळ्या क्रिया शांत चित्तानी करीन.
- बेजबाबदारीनी, बेदरकारपणी ड्रायव्हिंग करणार नाही.
- ड्रायव्हिंग करत असताना मोबाइलवर बोलणार नाही.

रूढी

- ओळखीच्यांना मूल झालं तरी हॉस्पिटलमधे भेटायला जाणार नाही.
- वाढदिवसांच्या कार्यक्रमांना जाणार नाही.
- घरात कोणाचाही वाढदिवस साजरा करणार नाही.
- मुंजीच्या कार्यक्रमाला हजर राहात नाही.
- लग्नसमारंभांना जात नाही.
- भेटवस्तू देत नाही.
- भेटवस्तू स्वीकारत नाही.
- ईश्वर मानत नाही.
- धर्म मानत नाही.
- जातिभेद मानत नाही.
- ज्योतिष मानत नाही.
- पुनर्जन्म मानत नाही.
- स्वर्ग, नरक, पाप-पुण्य या कल्पना मानत नाही.
- धार्मिक उत्सवांना जात नाही.

- धार्मिक उपवास करत नाही.
- कशाचीही पूजा करत नाही, प्रसाद स्वीकारत नाही.
- ओवाळणं, आरती, गंध, टिळा या सगळ्यांना नकार देतो.
- देवाच्या प्रतिनिधींकडे म्हणजे बुवा, महाराज, माताजी यांच्या कधीही जवळ फिरकणार नाही.
- व्यक्तीपूजेला सक्त विरोध आहे.
- सोन्याचा वापर कधीही करणार नाही.
- मृत्यूसंबंधीच्या सर्व कर्मकांडांना नकार.
- मयतीबद्दलचे फोन करत सुटणार नाही.
- जाहीर कार्यक्रमांच्या ठिकाणी पुष्पगुच्छ स्वीकारणार नाही, फूल पण नाही.
- जाहीर कार्यक्रमांच्या ठिकाणी दीपप्रज्वलन करणार नाही.
- जाहीर कार्यक्रमांच्या ठिकाणी नारळ स्वीकारणार नाही.
- जाहीर कार्यक्रमांच्या ठिकाणी शाल स्वीकारणार नाही.
- जाहीर कार्यक्रमांच्या ठिकाणी रोप स्वीकारणार नाही.
- कुठचाही धार्मिक सण साजरा करणार नाही.
- भूमिपूजन, वास्तुपूजन, कुदळ मारणं, नारळ फोडणं यांत भाग घेणार नाही.
- वास्तुशास्त्र, फेंगशुई अशा अंधश्रद्धांच्या आसपाससुद्धा जाणार नाही.
- दक्षिणेकडे दार टाळणं वगैरे अंधश्रद्धांना अजिबात महत्त्व देणार नाही.
- फटाके कधीही खरेदी करणार नाही, उडवणार नाही.
- अंधश्रद्धेवर आधारलेल्या रुढींवर विश्वास ठेवणार नाही. उदाहरणार्थ, मांजर आडवं गेलं की अशुभ समजणं, दक्षिणेकडे पाय, घराचा दरवाजा यांना अशुभ मानणार नाही. शनिवारला न कर्त्याचा वार म्हणणं, अमावस्येला कामाची सुरुवात टाळणं अशा शुभ-अशुभाच्या कल्पनांना थारा देणार नाही.
- शुभ अशा कल्पनेनी दारावर तोरण, वाहनाला झेंडूचे हार, नव्या घरात काळी बाहुली टांगणं, भिंतीवर लाल पंजे उठवणं, शुभ-लाभ लिहिणं अशा कुठल्याही कल्पनांना पाठिंबा देणार नाही.

●●●

12

समाजकार्याच्या दिशा

1) या लेखामागची कल्पना

समाजकार्य शब्दासरशी तुमच्या मनात येणारा एक शब्द सांगा असं जीवनसाथच्या मिश्र गटाला विचारलं. ताबडतोब पहिल्यानी उत्तर दिलं, 'लष्करच्या भाकऱ्या'. मग एकजण म्हणाला, 'बाबा आमटे'. कोणी म्हणालं, 'मेधा पाटकर'. मग 'हेल्पेज इंडिया', 'क्राय' असे उल्लेख आले. मग 'आमीर खान', 'सचिन तेंडुलकर' आले. त्यानंतर 'गरवारे बाल भवन', 'जीवनसाथ' चे उल्लेख आले.

एवढ्यावरून एक गोष्ट लक्षात आली की, लष्करच्या भाकऱ्या या कल्पनेविषयी 'हे आपलं काम नाही' अशीही भावना होती नि बाल भवन, जीवनसाथ ही कामं छोटी असली तरी समाजकार्य प्रकारची आहेत हे जमलेल्यांना कळत होतं. याचा अर्थ काहीतरी व्याख्या त्यांच्या मनात होती, पण शब्दात मांडण्याची अडचण होती. माझ्या मनात आजच्या कार्यशाळेतून एकच गोष्ट व्हायला हवी आहे. ती म्हणजे प्रत्येकाला इतरांसाठी काहीतरी करावंसं वाटणं.

या आजच्या कार्यशाळेविषयीच्या लेखाला 'अनिल आणि शोभाचा समाजकार्याच्या दिशेनी प्रवास' असं समजलं तरी चालेल. 1969 साली मी फिलाडेल्फिया यू.एस.ए.मधे आणि शोभा ठाण्याला असा आमचा पत्रव्यवहार चालू झाला. साधारण वर्षभर तो चालला नि त्यानंतर 1970 मधे आम्ही फिलाडेल्फियात नोंदणी पद्धतीनी लग्न करून आमच्या संसाराला सुरुवात केली. ती प्रेमपत्रं नव्हती. विचारमंथनाचा प्रवास होता आणि त्यातला एक मुद्दा अगदी

ठळक आणि शोभाला सांगायलाच पाहिजे असा होता. 'भारताचं, महाराष्ट्रातल्या आपल्या माणसांचं काही बरोबर चाललेलं नाही. जगण्याचा योग्य मार्ग प्रथम आपण स्वतः शिकायचा आणि मग त्याच्या प्रबोधनाला सुरुवात करायची. त्यासाठी कायम परदेशात राहण्याच्या मोहात न पडता जरा पैसे गाठीला बांधून भारतात परत यायचं'. शोभाला हे सगळं पसंत होतं. शोभाला भारतात परत येण्याची कल्पना पसंत नसती तर आम्ही एकमेकांशी लग्न केलं नसतं.

माझी समाजकार्याशी ओळख लहानपणीच झाली होती. माझे आई-वडील सानेगुरुजी कथामालेचं काम करायचे. अनेक मुलं नियमितपणी आमच्या घरीच यायची. ग्राहक पेठेसाठी घरगुती किराणा सामानाची घाऊक खरेदी, वाटप हे काम पण चालायचं. ही दोन्ही कामं छोटी असली तरी माझ्या आईवडलांना त्यातून जे समाधान मिळायचं ते आम्हाला कळायचं. माझ्या आईवडलांचा त्यात काही स्वार्थ नव्हता. त्यावरून एक गोष्ट लक्षात आली होती. स्वतःचा स्वार्थ नाही, पण इतरांचा फायदा होतो असं कुठचंही काम माणसानी जरूर करावं. स्वतःला आनंद मिळेल असं या प्रकारचं कुठचंही काम निवडलं तरी ते छोटंसं समाजकार्यच असतं.

माझा सहभाग या आईवडलांच्या कामात कमी होता. मला तेव्हापासूनच राजकारणात रस नव्हता पण समाजकारणात होता. माझे आई-वडील पूर्वी काँग्रेस पक्षाला पाठिंबा द्यायचे, पण सानेगुरुजी कथामालेच्या कामाचा रंग थेट समाजवादी पक्षाचा होता. तेव्हा प्रथम आई-वडील म्हणताना मी बघितलं की, राजकीय पक्षाचा-आपला काय संबंध? आपला चांगल्या कामाशी मतलब आहे. तेव्हा मी शब्दात मांडत नसलो तरी मला स्पष्ट झालं होतं की, राजकारण आणि समाजकारण निराळं आहे. सामाजिक काम करण्यात मला रस आहे, असणार आहे आणि भविष्यातही राजकारणात रस नसणार आहे. आजही मी कुठच्याही राजकीय पक्षाचा नाही, शोभाही नाही.

फिलाडेल्फियात माझी आणि शोभाची नोकरी सोमवार ते शुक्रवार उत्तम चालू होती. शनिवार-रविवारी काहीतरी इतर करावं म्हणून शोध चालू होता. भारताविषयीच्या बातम्या तरी कळाव्यात म्हणून आम्ही काही मराठी मित्रमंडळींनी 'महाराष्ट्र टाइम्स' चालू केला. अनेकांनी मिळून तो घेतलेला असल्यामुळे आमच्यापर्यंत तो पोचायला 15-20 दिवसही लागायचे. शनिवारी-रविवारी सहली, जेवणं, क्वचित दारू हे चालायचंच. करमणुकीचे कार्यक्रमही असायचे.

याला जरा व्यवस्थित स्वरूप द्यावं म्हणून आम्ही खटपट करत होतो. न्यूयॉर्कमधे महाराष्ट्र मंडळ होतं. आम्ही फिलाडेल्फिया महाराष्ट्र मंडळ काही मित्रमंडळींनी स्थापन केलं. बैठकांच्यात चर्चा व्हायच्या, कार्यक्रम ठरायचे, पण करमणुकीचे कार्यक्रम आणि धार्मिक उत्सव म्हणजे सार्वजनिक गणपती, नवरात्र, दिवाळी यांपलीकडे जायला कोणी तयार नव्हतं. एवढ्या वर्षांनंतरही त्यात काही फरक पडलेला नाही, फक्त एक वाढ झाली आहे. महाराष्ट्रातलं चांगलं सामाजिक काम निवडून त्याला आर्थिक मदत देणारं 'महाराष्ट्र फाउंडेशन' स्थापन झालंय्.

मी आणि शोभा यू.एस.ए.चे ग्रीन कार्ड होल्डर असून भारतात कायम वास्तव्यासाठी यायचा पुढे निर्णय घेतला. त्याला इतर कारणं होती, पण एक कारण तिथे सामाजिक कार्यासाठीचं योग्य वातावरण नव्हतं हेही होतं. अमेरिकन लोक, काळे आणि गोरे आम्हांला आपलं मानत नव्हते आणि आम्हीही त्यांना आपलं मानत नव्हतो. त्यामुळे इतरांसाठी काम म्हणजे कोणासाठी या प्रश्नाला धड उत्तर नव्हतंच.

भारतात परत आल्यावर आयुष्यातल्या नवीन पर्वाला सुरुवात झाली. इथे येण्यापूर्वी मी आणि शोभानी जगात बरंच हिंडून घेतलं. पर्यटनानी, देशाटनानी येणारं पांडित्य आपल्यात यावं अशी इच्छा होती. तो प्रवास बराच मोठा म्हणजे 50,000 कि.मी.चा होता. आम्ही आठ महिने घराबाहेर एका कॅपरमधे राहून हिंडत होतो. त्या प्रवासाविषयी सांगायचा इथे उद्देश नाही कारण या पुस्तकसंचात दुसरीकडे त्याचा उल्लेख आहे.

इथे आल्याआल्या माझ्या बांधकाम व्यवसायाला सुरुवात झाली आणि बांधकाम व्यवसायातल्या सुधारणा हा एक समाजकार्याचा विषय चालूच झाला. बांधकाम या विषयावर मी प्रत्यक्ष व्यवसाय, कॉलेजमधे शिकवणं, माणसं तयार करणं, लेखन, कार्यशाळा असं सर्व आघाड्यांवर काम करायला लागलो. त्यात वेळ खूप जायचा, शोभा आणि मुलं यांना मी पुरेसा वेळ देऊ शकायचो नाही. माझ्या वेळेचा भार हलका करावा म्हणून भागीदार घेतले पण ते प्रकरण एवढं जमलं नाही. त्यात बऱ्याच अडचणी आल्या आणि त्या निस्तरताना आणखी अडचणी आल्या.

मुलं जरा मोठी झाल्यावर शोभानी प्रौढ शिक्षण, स्त्री-प्रश्नांचा अभ्यास यात काही वर्षं अनुभव घेतला आणि मग ती गरवारे बालभवनची संचालक झाली. नियमित लिखाण, पालक-शिक्षणाच्या कार्यशाळा आणि पुण्यानी बालककेंद्री

धोरणं अमलात आणावीत यासाठी भरपूर काम चालू झालं. माझ्या व्यवसायातली अनियमित प्राप्ती माहिती असल्यामुळे शोभानी कायम पगारी नोकरीच करायची असं आम्ही ठरवलं. अजूनही शोभा बालभवनची संचालक म्हणून दर महिना पगार घेते. तिच्या लायकीच्या मानानी पगार कायम कमीच होता, पण ते तिला आणि मला मान्य होतं. थोडक्यात आम्ही दोघंही चरितार्थ, कुटुंब, मुलं, नातेवाईक यांना सांभाळून जमेल तेवढ्या सामाजिक कामाला सुरुवात केली. सुसंवाद नावाचा मित्रमंडळींचा गट स्थापन करून 'पिढीतला फरक' या विषयावर कामाला सुरुवात केली. अनेक कारणांमुळे तो गट पुढे बंद पडला.

नवरा-बायकोंनी एकत्र काम केल्यामुळे एकमेकांशी स्पर्धा, श्रेष्ठ-कनिष्ठ या भावनेनी कामात अडचणी येतील असं काहींना वाटतं. आमच्या बाबतीत तरी आमची पूर्ण खात्री होती. आम्हाला एकमेकांच्या कामात रस आहे, असूया नाही, स्पर्धा नाही. आमची दोघांच्या कसबांची यादी एकमेकांना पूरक असल्यामुळे हा निर्णय सोपा वाटला. शिवाय कौटुंबिक विषयातले मुद्दे नवरा-बायकोनी मिळून एकत्रपणी सांगण्याला विशेष महत्त्व असल्यानी त्याचे फायदेच जास्त आढळायला लागले. आमच्यापुरते हे मुद्दे आम्हाला निर्णय घ्यायला पुरेसे स्पष्ट वाटले. इतर लोक सामाजिक काम काय करतायत् याचा आढावा घेतला तर आढळलेल्या गोष्टी अशा–

1) बहुतेक सामाजिक कामं एकेकट्या स्त्रिया करतायत्. त्यांच्या नवऱ्यांचं त्यांना फारसं सहाय्य, पाठिंबा नाही. त्यांच्या खाजगी वैवाहिक आयुष्यात आणि लोकांशी बोलण्यात फार तफावत असते.
2) एकट्या स्त्रिया (अविवाहित, घटस्फोटित, विधवा) सामाजिक कामात रस घेताना दिसयतायत्.
3) संस्था-संस्थांच्यात हेवेदावे, अंतर्गत राजकारणं, चढाओढी खूप आहेत. (आम्ही दोघांनीही इतर संस्थांमधल्या आमच्या कामात हे अनुभव घेतल्यामुळे या गोष्टी खूप जवळून बघितल्या आहेत.)
4) सामाजिक हेतूंनी चालू केलेली बरीच कामं हळूहळू 'फॉरेन फंडिंग' नावाच्या 'पपेटियर'च्या हातातली बाहुली बनलीयत्. फंडस् संपले की प्रॉजेक्ट संपलं, म्हणजेच सामाजिक काम बंद.
5) काही कामं हळूहळू थेट राजकीय पक्षांच्या पंखाखालीच जाऊन बसलीयत.

6) मुख्य म्हणजे बहुतेकांना समाजासाठी काही करायचं की लाऊडस्पीकर, स्टेज लागतंय्.
7) अनेकांना सामाजिक काम म्हटलं की सत्कार, मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, खाऊ वाटप एवढंच सुचतंय्.
8) काहींना कुठचेतरी बुवा, महाराज यांचा सत्संग लोकांना घडवून देणं हेच खरं सामाजिक काम वाटतंय्.

हे सगळं बघितल्यावर आमचे निर्णय पक्के होत गेले. मुख्य म्हणजे इतरांच्या प्रश्नांच्या अभ्यासामुळे स्वतःच्या प्रश्नांचं पृथक्करण सोपं होत गेलं.

हे असं अनेक वर्षं चाललं. व्यवसायातल्या पैशाच्या प्रश्नामुळे मी काही काळ आखाती देशात काम केलं. अडचणी संपल्यासरशी भारतात परत येऊन 'जीवनसाथ' आणि 'पालक विद्यापीठ' या कामाला आमच्याच एका ट्रस्टच्या छत्राखाली सुरुवात केली. तो ट्रस्ट म्हणजे 'जनमानस'. मी आणि शोभा दोघंही त्याचे ट्रस्टी आहेत. नुकतंच आभाचं नावही वाढवलं आहे. शोनीलचं नाव वाढवण्यात काही अर्थ नाही कारण तो इंग्लंडमधे कायमचा स्थायिक झालेला आहे. तो या ट्रस्टला फार तर सल्ला देऊ शकेल.

समाजकार्याची व्याख्या अधिक स्पष्ट व्हावी म्हणून आणखी एक तपशील सांगतो. जीवनसाथ आणि पालक विद्यापीठ या दोन्हींमधे लोकांचे पगार, स्टेशनरी, प्रवासखर्च असतातच. तो खर्च भरून निघावा आणि पदरखर्च होऊ नये यासाठी फी तर घ्यावीच लागते. पण या दोन्ही कामांवर आमचा चरितार्थ अवलंबून नसल्यामुळे नफा-तोटा न होता ते काम सुरळीत चालतं, यात आमचं समाधान असतं. एकेकाळी हे मुद्दे स्पष्ट होण्यापूर्वी दोन-तीन गोष्टींबद्दल शंका होत्या. त्या अशा–

1) चरितार्थाचा उद्योग निराळा असणं हे चांगलं का वाईट? समाजासाठी कुठच्यातरी कार्याचे पूर्णवेळचे कार्यकर्ते आम्ही भरपूर बघितले आहेत. त्यामधल्या काहींना पैसे फार कमी मिळतात याचं असमाधान स्पष्ट जाणवतं. काही काळानंतर असे कार्यकर्ते पार बिघडून पैशाच्या मागे लागल्याची उदाहरणंच जास्त आहेत. अगदी क्वचित काही जण बरीच वर्षं हलाखीत काढल्यामुळे निराश होऊन उदासीन झालेलेही बघितले आहेत.
2) दुसरा एक विवाद आम्ही ऐकला आहे. तो असा की, लोकांसाठी काम

करायचं असेल तर त्यात अजिबात पैशाची अपेक्षा ठेवू नये. ते काम विनामूल्यच असलं पाहिजे. अशी अनेक कामं आमच्यादेखत पैशाअभावी बंद पडलेली आम्ही बघितली आहेत.

3) आपण स्वतः त्या निवडलेल्या क्षेत्रात काम करायचं का माणसं नेमून त्यांच्याकडून काम करवून घ्यायचं? याही बाबतीत आम्ही अशी सुरुवात केलेल्या अनेक सामाजिक कामांना धंद्याचं स्वरूप आलेलं बघितलं आहे. आमचा एक निश्चय पक्का झाला की, ते काम स्वतःच करायचं.

1997 ला जीवनसाथचं काम चालू केलं त्याला 18 वर्षं झाली. समाजकार्य या कामाविषयी आम्हाला बराच स्पष्ट विचार करता आला आणि करावा लागला, तो इथे मुद्देसूदपणे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. ही एक कार्यशाळा आहे अशी कल्पना करून या जीवनसाथच्या मिश्रगटासाठी त्याची रचना मी केली आहे.

स्वतःच्या समाधानासाठी प्रत्येक म्हणजे प्रत्येक जण जगतो. आपल्या कुटुंबासाठीही खूप जण बरंच काहीतरी करत असतात. निराळ्या शब्दांत हीच गोष्ट अशी मांडता येईल– स्वकेंद्री प्रत्येक जण असतो. काही जबाबदार लोक कुटुंबकेंद्री होतात. कुटुंबाबाहेरच्यांसाठी काहीतरी निरपेक्षपणे काम करणारे कमी असतात. त्यात फार मोठं समाधान आहे हे त्यांना समजलेलं असतं. तसं काहीतरी काम करण्याची धडपड केल्याशिवाय स्वतःचं आयुष्य अर्थपूर्ण होत नाही.

हा मुद्दा पटणारे बरेच लोक भेटतात. निरनिराळ्या वयाचे आणि निरनिराळ्या अवस्थांमधले लोक ही गोष्ट मान्य करतात. असं काम केव्हा चालू करावं याला काही नियम नाही. निवृत्त झाल्यावर मग समाजासाठी काहीतरी करू अशी थांबण्याची गरज नाही. जमेल तेवढं छोटं, थोडं काम तरुणपणीच सुरू करावं, यात सर्वांत जास्त समाधान आहे. मुळात असं इतरांसाठी निरपेक्षपणी केलेलं आणि स्वतःला समाधान देणारं काम शोधणं महत्त्वाचं आहे. काय आणि कसं काम करावं हे समजण्यासाठी आणि निर्णय घेता येण्यासाठी ही कार्यशाळा आहे.

आपण सगळे मिळून आता असं करूया, समाजकार्याचा अर्थ नीट समजल्यामुळे अशा प्रकारचं काम कुठेही माहिती असेल त्याविषयी आळीपाळीनी थोडक्यात बोलूया. असं काम स्वतः केलेलं असेल तर त्याविषयी, कुटुंबात, ओळखीत कोणी केलेलं असेल त्याविषयी सांगायचं. तसं नसेल तर कुठेही, कोणीही काही काम करत असेल त्याविषयी सांगायचं. ते मगाशी सांगितलेल्या

समाजकार्याच्या व्याख्येत बसायला हवं. अशा कामापैकी काय आवडलं, कुठचा भाग पटला नाही ते जरूर सांगावं.

माणसाबद्दलची संवेदनक्षमता म्हणजे माणुसकी इथपर्यंत आपल्या सगळ्यांना माहिती आहे. पूर्वी म्हणजे काही हजार वर्षांपूर्वी पर्यावरणशास्त्र नावाचा शब्दही कोणाला माहीत नव्हता, पण पर्यावरण जपणं माहीत होतं. माणुसकी हा शब्द माहीत नव्हता, पण ही कल्पना निव्वळ 'मानवजात' एवढ्यापुरती मर्यादित नाही हे माहिती होतं. प्राणी, वनस्पती, निसर्गातल्या निर्जीव वस्तू सगळ्यांशी आपला संबंध आहे हे कळत होतं. गेल्या शतकात मात्र माणुसकी म्हणजे फक्त माणसाच्या गरजेसाठी अशा अर्थानी त्याकडे जग बघायला लागलं आणि मग ती गरज पुरवण्यासाठी 'काहीही' अशी सुरुवात झाली. याला उपाय शोधण्यासाठी जगभर पर्यावरणशास्त्रावर काम चालू झालं. माणुसकी म्हणजेच समाजकार्य या विषयाचा परीघ खूप वाढला.

महत्त्वाची गोष्ट अशी की, एवढ्या समाजकार्याच्या अनेक प्रकारांपैकी काहीही जमेल ते आणि जमेल तेवढं करावं, पण शक्य तेवढ्या लौकर चालू करावं. मुख्य म्हणजे पहिल्यांदा जी गोष्ट करून बघावीशी वाटेल ती करून बघावी. एक महिना तरी कमीतकमी त्या कामात घालवला की ते आपल्या स्वभावाशी सुसंगत, सोयीचं आहे का नाही याचा अंदाज घ्यावा. ते नाही जमलं तर दुसरं काहीतरी करून बघावं. 'करून बघणं' याला फार महत्त्व आहे. दुसरा कोणी काहीतरी करत असलेलं काम निराळं असलं तर त्याला नावं ठेवण्याचा आपल्याला काही अधिकार नाही. एखादं काम निराळंच काय, कदाचित विरोधी दिशेचंसुद्धा असू शकेल. त्यालाही नावं ठेवायची नाहीत. सारांशात, स्वतःच्या कुटुंबाव्यतिरिक्त इतरांसाठी निरपेक्ष, निःस्वार्थी हेतूनी 'कोणीही, काहीही, कितीही, कुठेही आणि कोणासाठीही' करत असला तरी त्याचा आपल्याला आदर आहे.'

यापुढे एक प्रश्न राहतोच. असं काम एखाद्याला सापडलं तरी चरितार्थासाठी पैसे तर मिळवायला हवेत ना? याचं सोपं उत्तर असं की, समाजाला प्रगतीच्या वाटेवर नेणारं, हिताचं कुठचंही काम असलं आणि ते काम करण्याबद्दल रास्त मोबदला घेतला तर त्यात काही चूक नाही. मध्यमवर्गीय राहणीइतकी प्राप्ती त्या कामातून झाली तरी चालेल. त्यात नफेखोरी, व्यापारी वृत्ती असता कामा नये. पैशाबद्दलचा हा मुद्दा स्पष्ट झाल्यामुळे 'लष्करच्या भाकऱ्या' थापण्याचे रास्त पैसे मिळत असतील तर चांगलं आहे की! चरितार्थ आणि सामाजिक कामाचं समाधान

दोन्ही साधता येईल.

साधारण पन्नास वर्षांपूर्वी सामाजिक काम याचा अर्थ फुकट असा गृहीतच धरलेला असायचा. हळूहळू परिस्थिती बदलली, महागाईच्या राक्षसानी संपूर्ण देशभर जनतेची वाट लावली. पैशाचा विचारही मनात न येता काम करण्याचे दिवस गेले. मला वाटतं, प्रत्येक सामाजिक संस्थेच्या निर्णय घेणाऱ्यांना ही गोष्ट कळायला हवी. कार्यक्रमाला निमंत्रण देतानाच मानधनाचा उलगडा आधी करायला हवा हे त्यांना समजायला हवं. ती समज नसली तर चांगल्या माणसाबद्दलही गैरसमजुती होऊ शकतात.

मला आणि शोभाला असे खूप अनुभव आलेले आहेत. कधीकधी तर कार्यक्रमासाठी आम्ही केलेला जाण्यायेण्याचा खर्च प्रचंड आणि त्यांनी प्रतीकात्मक मानधन म्हणून अकरा रुपये द्यायचे, असंही झालेलं आहे.

आमचा अनेक वर्षं असा विश्वास होता की, चांगलं आणि अस्सल समाजोपयोगी कामं असलं की पैसे त्या कामाकडे चालत येतात. काही कामं प्रत्यक्ष बघितल्यामुळे, काही चांगल्या कामांविषयी वाचल्यामुळे, ऐकल्यामुळे खात्री पटली की, खऱ्या, चांगल्या मनापासून केलेल्या सामाजिक कामासाठी पैसे हा प्रश्न नसतोच.

काही लोकांना सामाजिक कामाची इच्छा, आवड आणि कष्टाची तयारी असते, पण चरितार्थाच्या झगड्यात आयुष्याची अनेक वर्षं जातात आणि मग उतारवयात एखादं काम सुरू करण्याचं धाडस होत नाही.

आणखी एका महत्त्वाच्या मोठ्या विषयाचा समाजकार्याशी संबंध आहे. तो जरा समजावून सांगतो. जगातल्या सगळ्या देशांत 'आहे रे' प्रकारचे कमी लोक आहेत आणि 'नाही रे' भरपूर आहेत. काही देशांना दोन्हींचा तोल साधला आहे तेवढे देश अपवाद. बाकी सगळीकडे एका मोठ्या भीतीनी 'आहे रे' वर्ग घाबरलेला असतो. 'नाही रें' साठी काही काम नाही केलं तर ते संख्येनी जास्त असल्यामुळे आपल्यावर एकत्र होऊन हल्ला करतील, बंड करतील, चोऱ्यामाऱ्या करतील ही ती भीती. त्यामुळे काही लोक माणुसकीचं कर्तव्य म्हणून समाजासाठी काहीतरी करतील, तर काही भीतीपोटी समाजकार्य करतील आणि तरीही त्या दोन्ही हेतूंनी केलेल्या सामाजिक कामाचं आपल्याला कौतुक आणि आदर आहे, स्वागत आहे.

सगळा 'नाही रे' वर्ग म्हणजेच कष्टकरी वर्ग चांगलं काम करत नाही,

जबाबदारीनी वागत नाही, वेळा पाळत नाही, कामाची टाळाटाळ करतो वगैरे सगळं खरंच आहे. त्याबाबतीत त्यांच्या वागणुकीचं मी समर्थन करणार नाही. त्यांच्या बाजूनी मांडण्याजोगा एकच मुद्दा आहे.

सगळा कष्टकरी वर्ग मनातून दिवसाचे चोवीस तास एकाच काळजीत असतो– 'पैसे कसे पुरवायचे'. दुसऱ्या कुठल्या विचाराचा डोक्यात शिरकाव व्हायला जागाच नसली तर करतील काय ते?

नोकरमंडळींशी तुम्ही स्वतः कसे वागता हे तुम्हालाच स्वतःला नीट माहिती असेल. मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो, त्याची उत्तरं मला सांगण्यापेक्षा तुम्हीच स्वतःशी विचार करा. कामवाल्यांना काही खायला-प्यायला दिलं तर त्यांनी कुठे बसावं अशी तुमची कल्पना असते? तुमच्या डायनिंग टेबलापाशी खुर्चीवर का खाली फरशीवर? आमच्याकडच्या दोन कामवाल्यांपैकी एक खुर्चीवर बसते आणि दुसरी आम्ही सांगूनही तिला खाली बसायची सवय असल्यामुळे खाली फरशीवर बसते.

एक गोष्ट आम्हाला नक्की कळलेली आहे. समजून चांगलं काम करणाऱ्या, सरळ, चांगल्या स्वभावाच्या, प्रामाणिक अशा मोलकरणी 10,000 मधे 1 इतक्या कमी प्रमाणात असतात. एखाद्या मोलकरणीला वैतागून काढून टाकण्यापेक्षा तिला चांगलं काम करण्यासाठी प्रोत्साहन देणं, चांगलं काम म्हणजे काय हे समजावून सांगणं एवढं करायलाच पाहिजे. ते फायद्याचंही आहे कारण नवीन मोलकरीण तिच्याहून वाईट असणं शक्य आहे.

आमच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला निरनिराळ्या पद्धतींनी जबाबदारीची वागणूक शिकवण्याचा आम्ही प्रयत्न करायचो. अर्थात रागवारागवी न करता आणि आवाज न चढवता मार्ग काढायचा हे पक्कं होतं. तिला आम्ही चहा तर द्यायचोच. पुढे तिला सांगितलं की, आधी न कळवता ती उशिरा आली तर तिला दोन कप चहा प्यावा लागेल. तिला ही शिक्षा न वाटल्यामुळे तिनी ते मान्य केलं. एकदा-दोनदा दोन कप चहा प्यायली देखील. तिला सगळ्याची गंमत वाटत होती. तिसऱ्या वेळेला तिच्या डोक्यात मात्र प्रकाश पडला. नको असताना चहा प्यावा लागणं ही शिक्षा आहे हे तिला नीट कळलं.

मग खऱ्या अर्थानी जबाबदारीनी वागणं, वेळ पाळणं, उशीर झाला तर कळवणं या विषयांबद्दलच्या बोलण्याला सुरुवात झाली. न कळवता गैरहजर राहणार नाही हे तिनी कबूल केलं आणि हातून चूक झालीच तर चार कप चहा

पिण्याची शिक्षा ठरवली. पुढे तिनी एकदा 4-5 दिवस न कळवता दांडी मारली. आल्यावर मी तिला म्हणालो की, आता बादलीभर चहा प्यावा लागणार. बरीच चेष्टा, हसणं-हसवणं झाल्यावर ती गंभीर होऊन म्हणाली, 'पुढच्या वेळेपासून मी असं कधीच करणार नाही.' तिच्या डोक्यात मूळ मुद्दा शिरला असावा कारण पुढे तिच्यात अगदी पूर्ण नाही पण बरीच सुधारणा झाली.

कामवाल्या बायका काही तास घराबाहेर असतात म्हटल्यावर त्यांना मधे केव्हातरी संडास-मोरी वापरावी लागतेच. मला कित्येक घरं माहिती आहेत की, जिथे नोकरांना घरातले संडास-मोरी वापरू देत नाहीत. आमच्या घरी आमची हरकत नसते. तुमच्याकडे काय पद्धत असते?

कामवाल्यांना शक्य तेव्हा आपल्यासाठी केलेला खाद्यपदार्थ देणं, चहा देणं असं तुमच्याकडे असतं का? भांडी घासणारी मोलकरीण एखाद्-दोन दिवस आली नाही तर तुम्ही सिंकमधे तिच्यासाठी खरकटी भांडी साठवून ठेवता का जरूर तेवढी स्वतः घासून टाकता? पगार, सुट्या, दिवाळी-बोनस वगैरे पैशांच्या व्यवहाराचा जो ठरलेला तोंडी करार असेल तो चोख पाळता का? दिवाळी जवळ आली की बोनस द्यायला नको म्हणून मोलकरणीला किंवा ड्रायव्हरला कामावरून काढून टाकणारे लोकही आम्ही बघितले आहेत.

आत्तापर्यंत आपण बोललो त्याबद्दल काही शंका, मतभेद असले तर त्याविषयी आधी बोलू आणि मग थोडं मुद्देसूद पृथक्करण मी मांडणार आहे. जमलेल्यांपैकी या कशाबद्दलच मतभेद कोणी व्यक्त केलेला नाही. पण एक शंका अनेकांनी आत्तापर्यंत विचारलेली आहे. 'चरितार्थासाठी पैसे मिळवण्यात आमचा इतका वेळ जातो की कुटुंबाला द्यायलाच आम्हाला वेळ पुरत नाही. इतरांसाठी वेळ देण्याची इच्छा असून वेळ देणं आम्हाला शक्य होत नाही.' दुसरा प्रश्न, 'आपण कोणाला काही सांगायला गेलं तर कोणी ऐकून घ्यायलाच तयार नसतं.' तिसरा प्रश्न, 'आपल्या देशातली परिस्थिती कधीही बदलेल असं वाटत नाही. सरळ परदेशात का स्थायिक होऊ नये?' चौथा प्रश्न, 'काही खूप मोठी कामं करणाऱ्या संस्था आहेत. तिथे राहण्या-जेवण्याची सगळी फुकट सोय होते, पण त्यांच्या सूचनांनुसार काम करावं लागतं, तसं केलं तर चरितार्थाचा झगडा पूर्ण संपेल. असं करावं का?'

एक गोष्ट अगदी नक्की आहे. कुठच्याही कामात नुसती कळकळ पुरत नाही. व्यवस्थापन-कौशल्य लागतंच.

बहुतेक सधन लोकं समाजकार्याच्या म्हणजेच लष्करच्या भाकऱ्यांच्या भानगडीत पडत नाहीत हे तर आपण बघतोच. त्याशिवाय असं दिसतं की, कुठच्यातरी भाषणाचा, कार्यक्रमाचा त्यांच्यावर तात्पुरता परिणाम होतो आणि त्यांना मधूनच समाजकार्याचे झटके येतात. तेही खरं उपयोगाचं नाही. कुठच्याही कामात सातत्य खूप महत्त्वाचं असतं. एरवी लोकांना स्वार्थ हा एकच शब्द समजतो. मधेच त्यांच्यावर परार्थाचा अंमल चढतो, असंच म्हणायला हवं.

अनेक लोकांचा एक प्रतिवाद मी ऐकला आहे. ते म्हणतात, 'आम्ही एकट्यानी करून काय होणार?' प्रत्यक्षात कुठच्याही गोष्टीची सुरुवात एकट्यानी म्हणजे स्वतःच करायची असते. हजारो किलोमीटर्सचा प्रवास समोर दिसत असला तरी सुरुवात पहिल्या एका पावलानीच होते.

शोभाचा अमेरिकेतला भाऊ सुरेश कोडोलीकर अमेरिकेत राहून गेली अनेक वर्षं क्रियायोग शिकवण्याचं महत्त्वाचं काम निरपेक्षपणे करतो आहे.

लोकांचं असंही म्हणणं असतं की, लोकांच्यात मिसळलं पाहिजे, ओळखी वाढवल्या पाहिजेत म्हणजेच बरकत होते. लोकसंपर्क हवा यात काहीच वाद नाही. पण कुठच्यातरी प्रकारचं समाजकार्य निवडलं तर तोही हेतू साध्य होतो हे मी नक्की सांगतो. माझं आणि शोभाचं उदाहरण बघा ना! आमचा लोकसंपर्क खूप आहे. त्यासाठी गरवारे बालभवन, माझ्या पूर्वीच्या बांधकाम व्यवस्थापन विषयातले लोक, जीवनसाथ आणि पालक विद्यापीठ ही कामं त्याबाबतीतली सगळी गरज पुरवतात. त्यासाठी लग्नसमारंभांना जाण्याची काही गरज नसते.

एवढे प्रश्न तुमच्या मनात निर्माण झाले हे बघून मला चांगलं वाटतंय्. प्रश्न निर्माण झाले म्हणजे या विषयात तुम्हाला रस आहे हे पक्कं झालं. प्रश्न निर्माण करणं आणि मग त्यांची उत्तरं देणं हे माझं आणि जीवनसाथचं कामच आहे. या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपण शोधायचीच आहेत पण त्यापूर्वी नुसत्या मुद्यांच्या मांडणीचा तक्ता डोळ्यासमोर ठेवूया. तुमच्या अनुभवात, बघण्यात, ऐकण्यात जी कामं असतील ती या तक्त्यापैकी कुठच्या प्रकारात बसतात हे तुम्ही नक्की ठरवू शकाल.

शोभा आणि मी दोघंही समाजासाठी काहीतरी करण्याच्या म्हणजे योग्य प्रमाणात स्वार्थ-परार्थ साधण्याच्या वृत्तीचेच आहोत. गेली काही वर्षं मात्र शोभाचा तोल पार चुकलेला आहे. कुटुंबाकडे, घराकडे, माझ्याकडे तिचं फार दुर्लक्ष होतं. तिची स्वतःची शक्तीही त्या सगळ्या कामाला पुरी पडत नाही. शोभा विचार

करून यामधे बदल करेल याबद्दल माझी खात्री आहे.

सामाजिक कामाचे मुख्य प्रकार - त्याचा संदर्भासाठी तक्ता

(1) 1) चांगलं अर्थपूर्ण काम + मोठं नाव आणि प्रसिद्धी
2) चांगलं काम + मोठं नाव नाही
3) दिखाऊ काम + प्रसिद्धी खूप
4) दिखाऊ काम + मोठं नाव मिळवण्यात अपयश

(2) 1) जागतिक पातळीवरचं काम
2) राष्ट्रीय पातळीवरचं काम - भारतापुरतं
3) राज्य पातळीवरचं काम - फक्त महाराष्ट्रापुरतं
4) शहर पातळीवरचं काम - फक्त पुणं किंवा फक्त मुंबईपुरतं किंवा तुमच्या गावापुरतं काम
5) छोट्या विभागातलं काम - आपल्या भागापुरतं, को-ऑप. सोसायटी, उदाहरणार्थ कर्वेनगरपुरतं काम
6) विस्तारित कुटुंब पातळीवरचं काम - कुलवृत्तांत वगैरे
7) फक्त स्वतःच्या कुटुंबाकडे जबाबदारीनी लक्ष केंद्रित करणं

(3) 1) राजकारणाशी – कुठच्यातरी पक्षाशी जोडलेलं काम
2) राजकीय लोकांशी भांडून, बंडखोरी करून काम
3) राजकीय वर्तुळापासून दूर राहून पण न भांडता अलिप्त काम

(4) 1) जागतिक फंडिंगवर अवलंबून काम (परदेशी मदतीवर अवलंबून)
2) श्रीमंतांकडून पैसे गोळा करून काम
3) ज्यांच्यासाठी काम त्यांच्याकडूनच पैसे घेऊन काम
4) स्वतःचे पैसे घालून काम (अर्थात आधी स्वतःच्या चरितार्थाची सोय करून)

(5) 1) पूर्ण वेळ सामाजिक काम
2) अर्ध / पाव वेळ, नोकरी-धंदा संभाळून काम
3) जमेल तेव्हा अनियमित काम
4) नोकरी-धंद्यात समाजहिताचा दृष्टिकोन ठेवून सगळ्याशी चांगलं वागणं.
5) घरी कष्टकऱ्यांशी चांगलं वागणं, त्यांना मदत करणं.

हा तक्ता अगदी त्रोटक मुद्द्यांचा असल्यामुळे त्याबद्दल काही शंका अजून शिल्लक असतील, पण आपण एक एक करत त्या सगळ्यांची उत्तरं शोधू. आता सामाजिक कामाचे प्रकार पण जर निराळ्या दृष्टिकोनानी बघून कसे होतात ते सांगतो. काही माझ्या अनुभवातली, काही बघितलेली, ऐकलेली, वाचलेली, मी आणि शोभानी थोड्या प्रमाणात सहभाग घेतलेली, आमचा पाठिंबा असलेली अशी ही कामं आहेत.

●

2) 'फंडिंग' असलेली कामं

जो माणूस नॉर्मल नाही तो निराळा आहे हे लगेच कळतंच. त्याला मदतीची गरज असल्यामुळे तो गरजू आहे हेही लगेच आणि स्पष्ट कळतं. अशा कामांसाठी फंडिंग असतं.

कॅन्सरग्रस्तांसाठी, एड्सग्रस्तांसाठी फंडिंग असतं.

ड्रगॲडिक्टस्साठी फंडिंग नसतं.

कुष्ठरोग्यांसाठी फंडिंग नसतं. म्हणून तर आनंदवनला पैशाच्या व्यवस्थेची एवढी काळजी असते.

प्रॉजेक्ट प्रपोझल पाठवायचं, मीटिंग्ज घ्यायच्या, बहुतेक वेळा फंडिंग मिळतं. एखाद्या ठिकाणी नाही मिळालं तर दुसरीकडून मिळतं. हे प्रॉजेक्ट प्रपोझल कसं लिहायचं यातले जाणकार खूप आहेत. यातल्या बऱ्याचशा गोष्टी दिल्लीतून हलत असल्यामुळे दिल्लीत या विषयातले कन्सल्टंटस्, एजंटस् सर्वांत जास्त असतात. त्याच्या खालोखाल मुंबईत आणि त्याखालोखाल बंगळुरु नि मग चेन्नईमधे असतात असं मी ऐकलंय्. मला किंवा शोभाला असा प्रत्यक्ष अनुभव नाही.

मतिमंद/विकलांग/बहुविकलांग/अपंग/स्वमग्न/अंध या वर्णनात बसणारी मुलं, मोठी माणसं यांच्या प्रॉजेक्टसाठी फंडिंग मिळतं. ते सरकारी किंवा खाजगी असू शकतं. त्याशिवाय अनाथ मुलामुलींसाठी/वेश्यांच्या मुलामुलींसाठी/एडस्ग्रस्त-कॅन्सरग्रस्त असलेल्यांच्या उपचारांसाठी/निराधार वृद्धांसाठी फंडिंग मिळतं. तेही सरकारी किंवा खाजगी– कशाही स्वरूपाचं असू शकतं.

आमच्या ओळखीत सरकारी फंडिंग आणि खासगी देणग्या अशा दोन्ही स्वरूपांत पैसे मिळवून अशा प्रकारची चांगली कामं करणारी बरीच लोकं आहेत. पुण्यात, मुंबईत, रत्नागिरीत, नाशिकमधे, सोलापूरला. ती आमच्या वैयक्तिक ओळखीची आहेत.

माझ्या आणि शोभाच्या ओळखीची अशी लोकं बरीच आहेत की, जी दरवर्षी छोटी हजार-दोन हजार रुपयांची रक्कम विशिष्ट संस्थेला देणगी म्हणून देतात. एरवी ही माणसं सर्वसामान्य चंगळवादी उच्चमध्यमवर्गीयांचं आयुष्य

जगत असतात. अगदी काहीच न करणाऱ्या अनेक लोकांपेक्षा हे बरं आहे असं आम्हाला वाटतं.

अशा छोट्या रकमांच्या देणग्यांवर चालणाऱ्या काही संस्थाही आम्हाला माहिती आहेत. त्यांच्यापैकी एक माणूस पूर्ण वेळ देणग्या गोळा करण्याचंच काम करतो. ते वस्तू पण घेतात. मला आणि शोभाला ही गोष्ट कधी पटली नाही आणि जमलीही नसती.

शिवाय वस्तू वाटणारे लोक आहेत. जेवणं फुकट देणारे आहेत. लोकांकडून वस्तू, पैसे, कपडे घेऊन गरजूंकडे पाठवणारेही खूप ओळखीचे आहेत. काही व्यावसायिक चांगल्या निवडक कार्यक्रमांचा खर्च उचलणारे आहेत. खाजगी धंद्यातले अनेक लोक त्यांना आवडलेल्या कामांसाठी खूप देणग्या देतात.

गेल्या अनेक वर्षांत असं दिसतंय् की, सामाजिक कामाला आध्यात्मिक रंग असला की लोकांना आवडतं, चांगलीच लोकप्रियता मिळवतं. अशी काही कामं आम्ही बघितली आहेत. पुण्याच्या जवळ 25-30 किलोमीटर अंतरावर प्रचंड जमीन आणि त्याच्यावर एखादं गाव वसावं तेवढ्या इमारती. यांना एवढे पैसे मिळतात तरी कुठून असा आपल्याला प्रश्न पडतो. मुंबई-पुण्याच्या उपनगरांच्या आसपास अशी बरीच उदाहरणं सापडतात.

सरकारी फंडिंगची जास्त माहिती शहराच्या नगरसेवकांना असते. अनेक नगरसेवकांचे स्वतःचे धंदे/व्यवसाय असतात, त्यांत ते भरपूर पैसे मिळवतात. त्यासाठी सरकारी फंडिंग वळवल्याची काही उदाहरणं तर नक्की सापडतात. याखेरीज समाजकार्यासाठी म्हणून नाव कमावलेल्या रोटरी, जेसीज, लायन्स, अशा संस्थाही असतात. त्यांच्या मेंबरशिपमधे लोक धन्यता मानतात. त्यामुळे व्यवसायासाठी आवश्यक असलेला जनसंपर्क वाढतो. त्यातल्या काहींचा पसारा जगभर असतो, पण समाजकार्याच्या देखाव्याचा भाग त्यात जास्त असतो. मी आणि शोभा काही संस्थांचे काही काळ सदस्य होतो. काही ठिकाणी आम्हाला विवाह शिक्षण, पालक शिक्षण, बांधकाम व्यवस्थापन अशा विषयांत व्याख्याते म्हणून बोलावलं होतं, पण आम्हाला असं जाणवलं की, व्याख्यात्याच्या विषयापेक्षा फेलोशिप म्हणजे जेवणात त्यांना जास्त रस होता. एका कार्यक्रमात तर 'तुमचं बोलणं चालू द्या, आम्ही एका बाजूला जेवून घेतो,' असं सरळच सांगितलं. काही काळानी आम्ही एवढ्या मोठ्या जागतिक सामाजिक संस्थांमधून काढता पाय घेतला. ते त्यांच्या परीनी काम करतायत्, पण आमच्यासाठी ते

सोयीचं नव्हतं.

अशा अनेक प्रकारच्या फंडिंगवर चालू असलेल्या कामांच्यातला एक धागा मात्र अगदी समान असतो. 'फंडिंग बंद झालं की कामही बंद.'

काही सिनेमा-नटनट्या, क्रिकेटियर्स यांच्याकडे प्रसिद्ध चेहरा आणि पैसा असतो. त्यांतले काही जण काहीतरी उद्योग करावा म्हणून रेस्टॉरंट काढतात, सिनेमा प्रॉडक्शनमधे पैसे घालतात.

प्रत्यक्षात अशी खूप सामाजिक कामं असतात की, ज्यांचं जरा नाव झालं, ती कामं जास्त लोकांपर्यंत पोचली तर कामं जास्त आणि चांगली होतील, शिवाय जनतेचाही फायदा होईल. प्रसिद्ध व्यक्तींनी अशा कामांचं 'प्रमोशन' विनामूल्य करावं, त्यांत स्वतःचे पैसे घालावेत. स्वतःचे पैसे, श्रम, बुद्धी, वेळ त्यांनी त्या कामांत घातला तरच त्यांची 'इन्व्हॉल्व्हमेंट' वाढेल. नुसती देणगी देण्यातला तोच तर मुख्य फरक आहे.

●

3) सामाजिक प्रथा बदलण्याची कामं

भारताच्या आपल्याला माहीत असलेल्या इतिहासात पूर्वी स्त्रियांच्या बाबतीत खूप अन्यायाच्या सामाजिक प्रथा होत्या. त्या प्रथा मोडण्यासाठी अनेकांनी सबंध आयुष्यभर कामं केली. सतीची चाल मोडली, विधवा-पुनर्विवाहात, स्त्री-शिक्षणात कर्वे, फुले यांनी खूप काम केलं. 'स्वराज्य आधी का सुराज्य आधी' हा टिळक-आगरकर वादही आपल्याला माहीत आहे.

सामाजिक प्रथा बदलण्याच्या कुठच्याही सध्या चालू असलेल्या कामाला खात्रीशीर फंडिंग मिळत नाही. मुळात सामान्यांसाठीचं काम सहानुभूती निर्माण करू शकत नाही त्यामुळे लोकही त्यासाठी उचलून पैसे द्यायला राजी नसतात. अशा कामात पुरेशी प्रसिद्धी नसते, 'फोटो काढण्याजोगं' त्यात काही नसतं, त्यामुळे देणाऱ्याचा अहंकार त्यात सुखावला जात नाही. मला आणि शोभाला अशी बरीच कामं अगदी जवळून माहिती आहेत. तुम्हालाही याशिवाय काही माहिती असतील. अशी कुठची कुठची कामं आहेत, त्यांची आपण सगळे मिळून यादी करूया.

बाबा आमटे यांनी आनंदवन सुरू केलं तेव्हा सुरुवातीला त्यांना खूप त्रास झाला. महारोग्यांना पूर्वी स्वतःच्याच गावाबाहेर लोक वाळीत टाकायचे ते आनंदवनमधे टाकायला लागले. तिकडे लोक फिरकायचेच नाहीत नंतर. बाबांनंतर डॉ. विकास आणि डॉ. भारती आमटे ते चालवतात. त्यांची पुढची पिढी पण डॉक्टर झाली आणि तिथेच राहून काम करतात. पण सबंध आमटे कुटुंब लोकांवर फार नाराज आहे. संस्थेचा संसार मोठा झालाय् आणि एवढे पैसे उभे करण्यात खूप अडचणी आहेत.

डॉ. प्रकाश आणि मंदा आमटेंनी हेमलकसा इथे आदिवासींच्या आरोग्य शिक्षणाचं काम चालू केलं त्याला अनेक वर्षं झाली. त्यांच्या प्राण्यांच्या दवाखान्यानी त्यांना खूप लोकप्रियता मिळाली. पैशाचाही प्रश्न सुटला. पण त्यांचं काम लोकांना समजलं असं अजूनही म्हणता येत नाही.

डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांनी गडचिरोलीत आरोग्यसेवेचं काम चालू केल्याला अनेक वर्षं झाली. 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या पुस्तकामुळे

आणि 'निर्माण' या तरुणांच्या शिक्षणाच्या नव्या संकल्पनेमुळे त्यांचं नाव झालं. पण त्यांचं काम समजण्याची पंचाईत तशीच आणि कारण तेच. सामान्य शहरी माणसाला आपल्या व्यापातून पैसे आणि वेळ दोन्हींची सवड नाही.

मेधाताई पाटकरांचं कामदेखील गेली अनेक वर्षं चालू आहे. धरणग्रस्तांचं पुनर्वसन या विषयावर सातत्यानी एवढी वर्षं काम लोकांना बऱ्यापैकी माहीत झालं. देशाच्या पातळीवर पाणी-प्रश्नाची योग्य हाताळणी या विषयावर अगदी उच्चशिक्षित म्हणून मान्यता पावलेले, यशस्वी, श्रीमंत असे लोकदेखील अगदी अडाण्यासारखं वागताना दिसतात, हे मात्र दुर्दैव आहे.

स्त्री-प्रश्नावर कामं करणारी बरीच लोकं आहेत. विशिष्ट जमातीसाठी समाजप्रबोधनाचं काम करणारी मंडळं आहेत. जागतिक पातळीवर एका देशातल्या तरुणांनी दुसऱ्या देशात जाऊन राहावं अशी कामं करणारे आहेत. भारत-जपान, भारत-इंग्लंड, भारत-फ्रान्स, भारत-जर्मनी, भारत-यू.एस.ए., भारत-थायलंड असं काम करणाऱ्या बऱ्याच संस्था मुंबई, पुणे, दिल्ली इथे आहेत.

आमच्या जवळच्या ओळखीत सफाई कामगारांच्यात काम करणारी एक संघटना आहे. त्यांचं मला आणि शोभाला कौतुक आहे कारण खरोखरच कष्टकऱ्यांची, गरिबांची बाजू लावून धरणाऱ्या संघटना कमी आहेत. आणखी पण अशी एक संस्था आम्हाला माहिती आहे. अशा संघटनांबद्दल आदर असूनदेखील एक गोष्ट मला जाणवली. संघटनाप्रमुख थेट एकाधिकारी असतात आणि संस्थानिकासारखे वागतात. अशा ठिकाणी जी लोकशाहीची पद्धत आढळायला हवी तशी आढळत नाही. एक माणूस कितीही चांगला असला तरी तो नुसत्या सदिच्छेच्या बळावर संस्था धडपणी चालवू शकत नाही. त्यामुळे गैरशिस्त आणि अव्यवस्था जिथे तिथे जाणवते.

जनमानस ट्रस्टतर्फे काही कामं जी मी आणि शोभा करतो त्या कामांसाठी शुल्क असतं, पण ते इतकं किरकोळ असतं की सध्याचे इतर खर्च लक्षात घेतले तर ते फुकट काम केल्यासारखंच आहे. अगदी सुरुवातीला तुमच्यापैकी काही जणांनी सामाजिक कार्याच्या यादीत 'गरवारे बालभवन' आणि 'जीवनसाथ'चा उल्लेख केला त्याचं कारण ते आहे. ही दोन्ही कामं सामाजिक प्रथेबद्दलचीच आहेत.

गरिबांसाठी काहीतरी करायला पाहिजे आणि ते सरकारनी करायला हवं असं सगळ्यांना वाटतं आणि त्यात चूक काही नाही. सगळ्या सरकारी यंत्रणांच्यात सर्वोच्च स्थानावर कायदा असतो. सबंध देशातली सर्वात जास्त

अधिकाराची जागा म्हणजे दिल्लीतलं सर्वोच्च न्यायालय आणि त्यातला सर्वोच्च न्यायाधीश. तिथपर्यंत जाण्याची सर्वसामान्यांना क्वचितच पाळी येते. पण रोज होणाऱ्या सर्वसामान्य माणसावरच्या अन्यायाबद्दल फार कमी काम चालू असतं. गरिबांसाठी न्यायालय म्हणजे लोकन्यायालय. त्याशिवाय मोफत वकिली सल्ला मिळणारं ठिकाण तत्वतः अस्तित्वात असतं. पुणे मनपामधे लोकायुक्त नावाची न्यायव्यवस्थाही आहे. सगळ्या महानगरपालिकांच्यात असते, पण त्यात देखावाच जास्त. काम कमी होतं.

अनेक लोक सत्कार-समारंभ करणं हे सामाजिक कार्य मानतात. सामाजिक कार्याच्या प्रथांपैकी सर्वांत विनोदी गोष्ट म्हणजे 'सौजन्य सप्ताह'. सौजन्य तर 365 दिवस 24 तास पाळायचं असतं. त्याचा सप्ताह साजरा करणं म्हणजे विनोदच झाला. याच प्रकारे मी 'आरोग्य सप्ताह'सुद्धा बघितलेला आहे. गंमत वाटली.

●

4) धार्मिक प्रकारची सामाजिक कामं

अगदी सुरुवातीला आपण स्पष्ट केलं आहे की, मी स्वतः धर्म मानत नसलो, तुमच्यापैकी कोणी लोकं मानत नसले तरी ज्या लोकांचा विश्वास आहे की, अमुक धर्माच्या शिक्षणामुळे समाजाचं कल्याण होईल ती लोकं त्या धर्माच्या प्रसाराचं काम करणार. ते स्वार्थ बाजूला ठेवून समाजहितासाठीच काम करत असल्यामुळे आपल्या दृष्टीनी त्याही कामाविषयी आपल्याला आदर, आपुलकी आणि कौतुक आहे.

काही लोकं मंदिरं बांधण्यासाठी खूप धडपड करतात. लोकांच्या दान + देणग्या यांमुळे प्रचंड श्रीमंत झालेली देवस्थानं आहेत. काहींच्या जाचक अटीही असतात. देवदर्शनासाठी प्रचंड रांगा, स्पेशल दर्शनासाठी स्पेशल फी, त्याचे एजंट, भ्रष्टाचार, अत्याचार अशा वाटेनी गेलेली धार्मिक स्थळंही खूप आहेत. विवेकनिष्ठ विचाराला मुळात देवच मान्य नाही, धर्मही मान्य नाही. पण आत्ता आपल्या 'समाजकार्याच्या दिशा' या विषयाच्या अभ्यासात आपण एवढंच म्हणतो आहोत की, ज्यात देवस्थानाचा स्वार्थ, देवस्थानाच्या विश्वस्तांचा स्वार्थ मधे आला, तिथे धंदा चालू होतो आणि जे देवदर्शन सर्व थरांतल्या लोकांना उपलब्ध होऊ शकत नाही त्याला एक अभ्यासक म्हणून आपण समाजकार्य म्हणायला तयार नाही.

भारतीय परंपरेमधे गरीब घरच्या ब्राह्मण मुलांनी माधुकरी मागायची पद्धत होती. माझ्या लहानपणी आमच्याकडे देखील वार लावून जेवायला काही मुलं यायची. खरं म्हणजे ती पद्धत चांगली होती. सध्याच्या काळातही अशी मदत करण्याचा प्रघात असायला हरकत नाही, पण त्यात अनेक अडचणी दिसतात. काही अडचणी सांगतो.

1) लोकांकडे पैसे आहेत, जेवण देणं परवडण्याचा प्रश्न नाही, पण अशा प्रकारे कोणाला मदत करण्याची वृत्ती नसते.
2) 'प्रायव्हसी'च्या कल्पनेत कुटुंबाबाहेरचं कोणीतरी आपल्याकडे येऊन घरच्यांबरोबर जेवणार हे योग्य वाटत नाही.
3) घरातल्या कोणालाच वेळ नसतो.

लहानपणापासून मी एक गोष्ट कुठेकुठे ऐकलीय्. एक चांगला राजा होता. गावातल्या सगळ्या लोकांचं जेवण झाल्याशिवाय तो राजा जेवायचा नाही. सध्याच्या काळात असे राजेही नसतात आणि गावंही एवढी मोठी असतात की, अशी चौकशी करताच येणार नाही. पण गोष्टीतलं मर्म मात्र आपल्या प्रत्येकाला खूप काही सांगणारं आहे. राजाच्याऐवजी मंत्री, नगराध्यक्ष, कुटुंबप्रमुख, कामाच्या जागेवरची अधिकारी व्यक्ती अशी कल्पना करायची.

आमच्या एका मित्रानी सबंध आयुष्य एक शाळा उभारण्यात घालवलं. त्यासाठी अगदी जेमतेम परिस्थितीत सबंध आयुष्य काढलं. अशा व्यक्तीविषयी आम्हाला खूप आदर वाटतो.

गणपती उत्सव साजरा करण्यात पुढाकार घेणं, बुद्धी आणि वेळ त्यात खर्च करणं ह्याला काही लोकं समाजकार्य मानत असतील. विवेकवादी विचारसरणीच्या दृष्टिकोनातून गणपती उत्सवच बाद असतो, पण समाजकार्याचा अभ्यासक म्हणून एखादा माणूस जराही स्वार्थ न ठेवता ते काम नीट व्यवस्थितपणी करत असेल तर त्याला समाजकार्य म्हणायला हरकत नाही.

गणेशोत्सव ही खूप लोकप्रिय झालेली गोष्ट आहे हे हेरून त्याचा धंदा करणारीही खूप लोकं आहेत. खरं म्हणजे भारतीय माणसाची सर्वसाधारण मनःस्थिती अशी आहे की, वर्षातले 365 दिवस रोज उत्सव केला तरी चालेल. लोक सगळीकडे गर्दी करतील, भक्ती करतील, रांगा लावून प्रसाद घेतील, कोणी वस्तू वाटल्या तर त्याही घेतील. करमणुकीच्या कार्यक्रमांना जाऊन बसतील. हे सगळं होईल, पण त्याला समाजकार्य म्हणायला आपण तयार नाही.

संस्कार वर्ग ही सुद्धा गोष्ट गमतीशीर आहे. काही लोक विनाशुल्क स्वतःच्या समाधानासाठी संस्कार वर्ग चालवतात. त्यांच्या दृष्टीनी धार्मिक संस्कार म्हणजेच संस्कार. पारंपरिकतेचे संस्कार म्हणजेच संस्कार. हा दृष्टिकोन व्यक्तिशः मला पटत नसला तरी ते त्यांच्या नजरेत समाजहितासाठी असतं. हे काम ते विनामोबदला करत असल्यामुळे ते समाजकार्याच्या यादीतच येतं.

●

5) शिक्षणक्षेत्रासाठी सामाजिक कामं

आपली सामाजिक कामाची व्याख्या स्पष्ट असल्यामुळे अगदी पहिल्याप्रथम स्पष्ट करून टाकूया की, शिक्षणाचा धंद्यासारखा, कारखान्यासारखा उपयोग करणारे अनेक यशस्वी, गडगंज श्रीमंत शिक्षणमहर्षी या यादीत येऊ शकत नाहीत.

मुलांना शिक्षणाची गोडी लावणाऱ्या बऱ्याच शाळा शोभाच्या आणि माझ्या माहितीच्या आहेत. एखाद्या मुलाला दहावीत किंवा बारावीत किती गुण मिळाले यापेक्षा पुढच्या आयुष्यात त्या विद्यार्थ्याला समाजाचं कल्याण आणि स्वतःचं समाधान या गोष्टी साधून चरितार्थ चालवण्याचं शिक्षण देणं जास्त महत्त्वाचं आहे. ही तत्त्वप्रणाली डोळ्यासमोर ठेवून काही प्रयोग, प्रयत्न करणाऱ्या अनेक शाळा आमच्या जवळच्या संबंधात आहेत. अशा शाळा चालवण्यासाठी फी असते, पण माफक असते. अभ्यासकाच्या दृष्टिकोनातून फी घेतली तरीही अशा शाळा चालवणं हे मोठं आणि अतिशय मूलगामी समाजकार्य आहे.

काही संस्था शाळांच्यातला अभ्यासाचा ताण कमी करण्याचं काम करतात. शाळेतल्या मुलांना शिक्षा करणं याविरुद्ध आघाडी उघडलेल्या काही संस्था आहेत. जागेच्या प्रश्नांमुळे अभ्यास करण्यातल्या अडचणींवर उपाय शोधण्यासाठी माफक शुल्कामधे अभ्यासिका चालवणाऱ्या काही संस्था आहेत. धंदा म्हणून वाचनालय चालवणाऱ्यांचाही दृष्टिकोन केवळ मनोरंजनाचा असला, पण शुल्क माफक असलं आणि वाचनालयात शैक्षणिक पुस्तकंही मिळण्याची सोय असली तर ते सामाजिक कामच म्हणायचं. पूर्णपणे मोफत अशी वाचनालयंदेखील आहेत.

पुण्यात एखाद्-दुसरी शाळा नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना तयार करणं याच उद्देशानी निघाली. तेही खूप महत्त्वाचं काम आहे. काही लोकं अजूनही कच्च्या विद्यार्थ्यांना ज्या विषयात गती नाही अशांची तयारी करून घेण्याचं काम करतात. आमच्या ओळखीच्या एक बाई जवळ राहणाऱ्या काही शाळेतल्या विद्यार्थ्यांना एकत्र करून आपल्या घरी शिकवणी घ्यायच्या. त्या त्यांच्याकडून फी घ्यायच्या नाहीत.

अशा सगळ्या कामांच्या उलट काही शाळांची विचारसरणी असते. त्यांना सर्वात प्रथम शाळेची इमारत स्वप्नात दिसते. मग काय, जबरदस्तीच्या देणग्या, मगच प्रवेश वगैरे सगळं चालू. प्रत्यक्षात शिक्षणासाठी इमारत लागतच नाही.

झाडाखाली, तंबूत शाळा भरू शकते. शिकवणाऱ्याला शिक्षणाचं मर्म कळणं महत्त्वाचं आहे. मर्म अगदी साधं आहे, विद्यार्थ्याला गोडी लावणं हेच मुख्य कसब लागतं.

काही कारखानदारांनी त्यांच्या कामगारांच्या मुलांसाठी शाळा काढल्या. पाळणाघरांच्या सोयी केल्या. त्या मुलांना बाहेरून परिक्षांना बसवण्यासाठी शिकवण्याची सोय केली. काही सामाजिक काम करणाऱ्यांनी काही मुलांना सांभाळण्याची जबाबदारी घेतली. त्यांच्या शिक्षणाची सोय केली. एका न्यासानी शिक्षणासाठी बिनव्याजी कर्जं देण्याची कामगिरी गेली काही वर्षं सांभाळली आहे. सोप्या, वाया गेलेल्या वस्तूंमधून विज्ञान-शिक्षणाचं काम करणाऱ्या काही छोट्या तर काही मोठ्या संस्था आहेत. अशा प्रकारची शिक्षणक्षेत्रातली अनेक सामाजिक कामं देशभर पसरलेली आहेत. मोठ्या शहरातही आणि छोट्या गावांच्यातही. काही ठिकाणी मुलांची वसतिगृहं काढल्याशिवाय इलाजच नसतो, कारण त्यांच्या गावात आणि शाळेच्या जागेमधे अंतर फार असतं. काही ठिकाणी मुलांचं शिक्षण व्हायचं असेल तर त्यांच्या वडलांची दारू सोडवण्याचं काम आधी हातात घ्यावं लागतं.

आम्ही तरुण होतो, शोनील आणि आभा ही आमची मुलं लहान होती त्या काळापासून डॉ. अनंत साठे आणि डॉ. शांता साठे लैंगिक शिक्षण देण्याचं काम करतायत्. त्यांचा स्वतःचा चरितार्थाचा स्वतंत्र व्यवसाय असल्यामुळे ते हे सगळं काम विनामोबदला करायचे. त्यांच्या कामामुळे आम्ही खूपच प्रभावित झालो. हे खूप उपयोगी समाजकार्य आम्ही मानतो.

मी आणि शोभा दोघांनी हे काम शिकून घेतलं. बरंच वाचन केलं. साधारण गेली 25 वर्षं आम्ही लैंगिक शिक्षणाचं काम नियमितपणी करतो आहोत. आम्हाला एका मोठ्या सामाजिक समस्येत थोडं तरी विधायक काम केल्याचं समाधान मिळतं.

●

6) बालकांच्या हक्कासंबंधी काम

भारतासारख्या देशात लोकशाही मार्गानी सरकार चालवणाऱ्यांच्या मनात 24 तास एकच विचार असतो– कुठच्या मार्गानी जास्तीतजास्त मतं मिळवता येतील. सगळ्या जाती, संघटना, त्यांतल्या मतदारांची संख्या किती, तरुण किती, मध्यमवयीन, ज्येष्ठ किती या सगळ्यांचा सतत विचार, अभ्यास करावाच लागतो. या यादीत मुलांचा समावेश नसल्यामुळे मुलं ही भारतात महत्त्वाची माणसं कधीच ठरू शकत नाहीत. 'ही मुलं म्हणजे आपले भविष्यातले पंतप्रधान आहेत,' हे भाषणात ठोकण्यापुरतं वाक्य असतं. शहरपातळीवर राजकारणाच्या आखाड्यात बालकांचा अग्रहक्क यासंबंधी कोणी मुद्दा मांडायला लागलं तर तो पहिलवान चीतपट होतो कारण प्रत्यक्ष आयुष्यात मुलं म्हणजे दुर्लक्षित जमात असते. कुटुंबपातळीवर मुलं खूप महत्त्वाची पण शहर नि योजनांच्या पातळीवर लास्ट प्रायॉरिटी.

केवळ अनाथ, गरजू मुलींसाठी काम करणाऱ्या संस्थादेखील बघितल्या आहेत. मुली अनाथ असल्या, गरजू असल्या तरी संस्था त्यांना कैद्यांसारखीच वागणूक देते असं दिसतं. खरं म्हणजे तिथल्या व्यवस्थापनालाच लोकशाहीची तत्वं शिकवण्याची गरज आहे.

शोभा पुण्यातल्या सारसबागेसमोरच्या गरवारे बालभवनची संचालक असल्यामुळे बालभवनला गेली 30 वर्षं झालेला त्रास आम्हाला अगदी बारीक तपशीलात माहिती आहे. बालकेंद्री समाज व्हायला हवा असे सगळे जाणकार, शिक्षणक्षेत्रातले ज्येष्ठ, विचारवंत म्हणतात. प्रत्यक्षात मात्र केव्हा कुठच्या दिशेनी कोणाचा हल्ला होईल हे सांगता येत नाही त्यामुळे बालभवनला सतत जागरूक राहावं लागतं.

गरवारे बालभवनचं चांगलं चाललेलं काम न बघवणारे समाजकंटक आहेतच, त्याप्रमाणे बालभवनच्या कसल्याच गरजेकडे लक्ष न देण्याचं धोरणदेखील अनेक वेळा दिसतं. कदाचित ते धोरण नसेल, स्वभाव असेल. एक उदाहरण सांगतो.

साधारण 5 वर्षांपूर्वी गरवारे बालभवन आणि सारसबाग यांच्यामधे असलेला रस्ता एकमार्गी म्हणजे वनवे झाला. काही दिवसांमधे रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर बांधला गेला. त्यानंतर वनवे असून लोकांना रस्ता ओलांडायला

सोपं जावं म्हणून झेब्रा क्रॉसिंग आणि सिग्नल बसवला. इथपर्यंत सगळ्या गोष्टी गरवारे बालभवनच्या हिताच्या आणि सोयीच्या होतायत् असं वाटलं. पुढे असं लक्षात आलं की, तो सिग्नल लाल असो नाहीतर हिरवा, तिथे कोणी थांबतच नाही. वाहनं इतकी जोरात येतात की रस्ता ओलांडणं शक्य होत नाही. मुलं आणि वयस्कर लोकांची फार पंचाईत होते. या प्रश्नाविषयी अनेकांना अनेक वेळा सांगून झालं. कोणीही काही करत नाही. करू असं आश्वासन मात्र सगळे देतात. तिथे त्या सिग्नलच्या जरा आधी स्पीड ब्रेकर, रँबलर बसवले तरी उपयोग होईल, पण यांतली कुठचीच गोष्ट पटवण्यात अजून कोणाला यश आलेलं नाही.

गरवारे बालभवनला एवढ्या निरनिराळ्या आघाड्यांवर एकाच वेळी काम करावं लागतं तरच पैशाचे आणि व्यवस्थापनाचे प्रश्न सुटू शकतात.

1. वर्षभर चालणारं संध्याकाळचं बालभवन
2. बालभवन कसं चालवायचं याचं वर्षातून दोनदा प्रशिक्षण
3. उन्हाळ्याच्या सुटीतले खास कार्यक्रम
4. वर्षभर चाललेलं निरनिराळ्या खेळांतलं प्रशिक्षण
5. मुलांसाठी उपयोगी पुस्तकं काढणारी प्रकाशन संस्था
6. वर्षभर चाललेले संगीत, वाद्यवादन, चित्रकला वर्ग
7. पुण्यात बालककेंद्री वातावरण तयार होऊन पुण्यातली मैदानं वाचावीत यासाठी सतत काम
8. बाहेरगावी शिबिरं घेणं

मुलांसाठी काम करणाऱ्या आम्हाला अशाही काही संस्था माहिती आहेत की ज्यांचा जीव छोटा आहे, त्या संस्थेकडे पुरेसे पैसे नाहीत, काम करायला माणसं नाहीत, जागा नाही, त्यांच्याकडे फक्त संस्था आहे.

मधेच कुठूनतरी थोडे पैसे मिळतात, मग त्यांचं काय करायचं याची चर्चा होते. सर्वात सोपा कार्यक्रम म्हणजे कोणाचा तरी सत्कार करायचा, पुष्पगुच्छ द्यायचा, भाषण करायचं, आलेल्यांना चहा पाजायचा. अशा सत्कार-संस्था बऱ्याच संख्येनी आहेत आणि त्या कामांना मुलांसाठी केलेलं सामाजिक काम असं नाव देण्याखेरीज इलाज नसतो.

●

7) पत्रकारितेमधून सामाजिक काम

आत्तापर्यंत असं अनेक वेळा आढळलेलं आहे की लोकांपर्यंत कुठचा विचार पोचवायचा असेल तर पत्रकार बनावं लागतं. काही वर्तमानपत्रं त्याकडे फक्त धंदा म्हणून बघतात. सामाजिक बांधिलकीचा देखावा त्यांना करावाच लागतो. काही वृत्तपत्रं पुरवण्यांद्वारे विचारमंथनाचं काम खूप चांगल्या प्रकारे करतात. अशा पुरवण्यांमधे नोकरी करणारी व्यक्तीदेखील खूप समाजपरिवर्तन करू शकते.

या क्षेत्रात काही वर्तमानपत्रं आहेत तशी मासिकंही आहेत. त्यांतली काही इतकी चांगली असतात की भारत देशात, महाराष्ट्रासारख्या राज्यात, या नियतकालिकांची आर्थिक गणितं ते कशी सोडवत असतील असा वाचक, अभ्यासक म्हणून आपल्याला प्रश्न पडतो. ज्या अर्थी इतकी वर्षं ती नियतकालिकं चालू आहेत त्या अर्थी कुठल्या तरी पद्धतीनी त्यांनी पैशाचा प्रश्न सोडवला असणार हे उघड आहे. काही पुस्तकप्रकाशनव्यवसायातली लोकं धंदा करताना दिसतात तर काही प्रकाशक समाजप्रबोधनाचं काम उत्तम रीतीनी पार पाडताना दिसतात.

जनमानस ट्रस्ट तर्फे मी मागे अनियतकालिक चालवायचो. मला स्वतःचा चरितार्थ चालवण्यासाठी व्यवसायात खूप लक्ष घालायला लागायचं. शेवटी मी नाइलाजानी ‘जनमानस वार्तापत्र’ बंद करण्याचा निर्णय घेतला. आवश्यक ते पैसे उभे करण्याचं काम मला जमलं नाही.

●

8) ग्राहकहितासाठी सामाजिक काम

अगदी श्रीमंत लोक सोडले तर म्हणजे अठ्ठ्याण्णव टक्के जनतेला मध्यम चांगला माल आणि रास्त पैशात मिळाला तर हवा असतो. त्यात अन्नधान्य मुख्य. इतर घरी लागणाऱ्या वस्तूंपेक्षा ते अत्यावश्यक असल्यामुळे कोणाला तरी कल्पना सुचली आणि अशा मालाची घाऊक खरेदी, वजनं करून छोट्या पुड्यांच्यात पुन्हा बांधणं, कोणाच्या घरी घरून सामान घेऊन जाण्याची किंवा पोचवण्याची व्यवस्था अशी साधारण 50-55 वर्षांपूर्वी मुंबईत सुरुवात झाली. चांगला निवडक माल आणि 10 ते 15% कमी पैशात यामुळे ती कल्पना रुजली. हे काम विनामोबदला करणारी बरीच माणसं मिळाली. हे काम खुशीनी वर्षानुवर्षं करणारी अनेक माणसं मुंबई-पुण्यात तरी मला माहिती आहेत. त्यात त्यांचा स्वतःचा स्वार्थ नसल्यामुळे आणि चरितार्थाचा उद्योग निराळा असल्यामुळे ते छोटं पण महत्त्वाचं सामाजिक कामच आहे.

कुठलीही वस्तू आणायची तर पैसे खर्च होणारच. पैसे खर्च करायचेच आहेत तर ते आपल्या ओळखीच्या माणसाला तरी मिळू देत, हा विचार पटणारे अनेक आहेत. पण त्या ओळखीच्या माणसाला फोन करणं, थोडं अंतर ओलांडून त्याच्याकडे आग्रहानी जाणं एवढी तोशीस लोक घ्यायला तयार नाहीत. खरं म्हणजे ओळखीच्या माणसाकडे जाऊन त्यालाच तो धंदा मिळावा यासाठी थोडा जास्त खर्च झाला तरी चालेल असं मी आणि शोभा मानतो. ती किंचित जास्त तोशीस, किंचित जास्त जाणारा वेळ, किंचित जास्त खर्च आपल्याला पटलेल्या ओळखीच्या माणसासाठी करणं हे माझ्या दृष्टिकोनातून अगदी क्षुल्लक पण समाजकार्यच आहे.

काही लोकांनी ग्राहकांना सेवा पुरवणं हा चरितार्थाचा उद्योग ठरवला. ग्राहक संघटनेकडून मोबदला घेणं शक्य आणि योग्य वाटलं नाही त्यामुळे त्यांनी स्वतः घाऊक खरेदी करून वस्तूंची तात्पुरती प्रदर्शनं मांडण्याचा व्यवसाय चालू केला. त्याचं स्वरूप फिरतं दुकान असं असल्यामुळे त्याला सामाजिक काम म्हणता येणार नाही असं व्यक्तिशः माझं मत बनलं. मग मी जीवनसाथच्या सदस्यांशीही बोललो. सगळ्यांचं तेच म्हणणं पडलं. दुकानं, मॉल्स ही काही समाजसेवा नाही.

●

9) शहरी सुविधांसाठी चळवळ

'जनमानस प्रतिष्ठान' हा एक रजिस्टर्ड ट्रस्ट आहे. त्याचा उल्लेख या पुस्तकसंचात अनेक ठिकाणी आलेला आहे. त्या कामाबद्दल काही सांगण्यापेक्षा 18 वर्षांपूर्वीचं जनमानस वार्तापत्र मला सापडलं आहे. त्यातला निवडक भाग येथे पुनर्मुद्रित करुया.

एका निराळ्या पद्धतीनी आपल्या समाजाचं पृथक्करण केलं तर आपल्या समाजाचे एकूण चार गट आहेत.

गट-1 आपल्याला नापसंत असलेल्या सध्याच्या देशाच्या समाजयंत्रणेचे हे बळी असतात. नुसते सोसत राहतात, फसत राहतात. यांची संख्या सर्वांत जास्त आहे.

गट-2 या सोसणाऱ्यांना, फसण्यावाचून इलाज नसलेल्यांना फसवणाऱ्यांचा गट आहे. कसं वागलं, काय युक्त्या केल्या की समाज पैसे देतो, अपमान सोसतो हे त्यांना माहीत आहे. ते बुद्धिमान, युक्तिबाज, अभ्यासू, अनुवंशिक अनुकूल परिस्थितीतले आणि श्रीमंत आहेत. जे फसायला तयार आहेत त्यांना फसवण्यात काही चूक नाही असं त्यांना मनापासून वाटतं. त्यांची तक्रार नाही तर तुम्ही कशाला मधे पडताय् असं ते म्हणतात. असे लोकही पहिल्या गटापेक्षा कमी पण तरी खूप आहेत. प्रत्यक्षात हा नीतिमत्तेचा प्रश्न आहे.

गट-3 हा गट बुद्धिमान, सुसंस्कृत, अभ्यासू, पण न फसणाऱ्यांचा आणि न फसवणाऱ्यांचा आहे. यांना परिस्थितीची समज आहे, पण त्यामधे बदल करण्याची जिद्द, मेहनत, धारिष्ट्य यांच्यापाशी नाही. यांची संख्या खूपच कमी आहे.

गट-4 हा गट बुद्धिमान, अभ्यासू, मेहनती तर आहेच, पण त्यांच्याकडे जिद्द, चिकाटी आणि धारिष्ट्यही आहे. हे लोक स्वतः फसणार नाहीत, त्याचबरोबर क्र.2 च्या गटाच्या लोकांनी क्र.1 च्या लोकांना फसवलेलं त्यांना चालणार नाही. अर्थातच असे लोक जगाच्या पाठीवरच कमी आहेत. या गटातले लोक एकत्र करणं हे खरं महत्त्वाचं काम ठरेल. प्रश्न असतो तेव्हा तो एकेकाचाच असतो, पण त्याच प्रकारचा प्रश्न अनेकांचा दिसायला लागतो तेव्हा त्याला

सामाजिक आशय मिळतो. असा अनेकांचा प्रश्न स्वतः समजावून घेऊन तो सोडवण्यासाठी केलेला विधायक प्रयत्न म्हणजे समाजकार्य अशी समाजकार्याची सोपी व्याख्या आहे.

जनमानसबद्दल अनेक ठिकाणी बोलणं चालूच असतं. त्यातल्या मध्यवर्ती कल्पनेबद्दल केवळ उजळणी म्हणून पुन्हा सांगतो. प्रत्येकजण स्वतःसाठी जगत असतोच. स्वतःच्या कुटुंबाच्या चरितार्थाची सोय करत असतो. या झगड्यात तो पूर्ण गुंतून गेलेला असतानाही प्रत्येकाला ही जाणीव असते, की आपण दुसऱ्यासाठी काहीतरी केल्याशिवाय आयुष्याला खरा अर्थ नाही. हे माहीत असूनही बहुतेकांना 'काय करायचं' ते उमगत नाही ही त्यांची अडचण असते. त्याशिवाय त्यांच्याकडे त्यासाठी थोडाच वेळ आणि थोडेच पैसे असतात. जनमानसला याची पूर्ण कल्पना आहे. समाजकारण याचा अर्थ एकेकाळी राजकारण असा होता. पुढे राजकारण हा धंदा झाल्यामुळे त्यातही पापभीरू सामान्य माणूस शिरू शकत नाही.

तुम्ही कोणीही असा, तुम्ही जनमानससाठी काहीतरी नक्की करू शकता. तुम्ही सदस्य होण्यासाठी रु. 20 ते रु. 100 एवढी रक्कम देऊन पावती घ्या. अमेरिका, इंग्लंडमधे राहणाऱ्या लोकांसाठी ही रक्कम 20 ते 100 अमेरिकन डॉलर्स किंवा 10 ते 50 ब्रिटिश पौंड समजावी. ही झाली जनमानसच्या कामाला तुमच्याकडून होणारी पैशाची मदत. याखेरीज तुम्ही बरंच काही करू शकता. लिखाण करणं, मुलाखती घेणं, पत्र पोचवणं. अनेक सरकारी खात्यांशी आपला सतत संपर्क असतो. तिथे जाऊन जनतेच्या वतीनी या विषयांवर चर्चा करू शकता. तुम्ही ज्या विभागात राहता त्या विभागात अशा सगळ्या विषयांवर नियमितपणे एकत्र भेटणारे गट तयार करू शकता. जनमानसची पोस्टर्स तुमच्या विभागात चिकटवू शकता. जनमानसविषयी वर्तमानपत्रात लिहू शकता. तुमच्या ओळखीच्या ई-मेल अकाउंट होल्डर्सना जनमानसची माहिती फॉरवर्ड करू शकता. 'जर्नालिझम' शिकणाऱ्यांनी अनुभवाकरता जनमानसचं काम करावं. विद्यार्थ्यांनी सुट्टीमधे लोकांच्या मुलाखती घेण्याचं काम करावं. विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या कल्पना स्पष्ट होतील. ज्युनियर जर्नालिस्ट म्हणून या अनुभवाचा त्यांना खूप फायदा होईल.

जनमानसच्या मूळ कल्पनेविषयी आणखी एक गोष्ट सांगतो. आपण मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय लोक सरकारला कर देतो. कारण, सरकारनी

पुरवलेल्या अनेक गोष्टींवर आपण अवलंबून असतो. सरकारनी पुरवलेले रस्ते, पाणी, ड्रेनेज, वीज, पोलीस-यंत्रणा, न्यायालयं सगळ्यांबद्दल आपली काही अपेक्षा असते. ती अपेक्षा पूर्ण होत नाही. सरकारच्या कार्यक्षमतेविषयी, समाजयंत्रणेविषयी आपल्याला बरंच काही म्हणावंसं वाटतं. फक्त या यंत्रणेला हलवणं फार कठीण आहे हे आपल्याला कळलेलं असतं. निराश वाटायला लागतं. वरवर आपण या यंत्रणेचा विळखा मान्य करतो, पण मनात मात्र नाराजी असते. शेवटी 'सरकार विरुद्ध जनता' हे चित्र तयार होतं. हे चित्र तर खरं असणंच शक्य नाही. कारण, प्रत्येक सरकारी नोकर स्वतःचं ते विशिष्ट खातं सोडलं तर 'जनता'च असतो. थोडक्यात, सरकारी नोकरांच्या एवढ्या प्रचंड जनसंख्येला सरकार समजायचं का जनता समजायचं हा प्रश्न आणखीच गोंधळाचा बनतो.

जनमानसचा प्रयत्न आहे की, 'अमुक विरुद्ध तमुक' हा प्रश्नच येता कामा नये. सरकार आणि जनता एकत्र पाहिजेत. हे होण्यासाठी मात्र सरकार आणि जनता यांच्यात जे 'कम्युनिकेशन' हवं ते नाही. जनमानस नेमकं तेच तर जमवायच्या प्रयत्नात आहे. 'संवाद'. या संवादाचा प्राण आहे लोकांची एकजूट. ही एकजूट भांडणासाठी नाही, तर संवादासाठी आहे. दुसऱ्यावर अन्याय करणं चूक आहे, तसंच अन्याय सहन करणंही चूकच आहे. 'ही गोष्ट मला योग्य वाटत नाही,' असं म्हणणं आणि पुढे 'यासाठी मला अशी कल्पना सुचते. तुम्हाला काय वाटतं ते कळवा,' असं सांगणं ही त्या संवादाची सुरुवात आहे. लोक काय करतात, ह्याबद्दलचं म्हणणं खाजगी गप्पांच्या पातळीवर संपवतात, कारण ते कोणाशी बोलायला पाहिजे ते माहीत नसतं. योग्य ठिकाणी जायला सवड नसते, सरकारी बंद भिंतीतला दरवाजा शोधण्याइतकी चिकाटी नसते. या सगळ्या कारणांमुळे जे सामान्य माणूस करू शकत नाही तेच तर करणं 'जनमानस'चं काम आहे.

जनमानसच्या एका खास उपक्रमाविषयी आधी सांगतो - जनमानस प्रकाशन. कुठचंही ज्ञान, विज्ञान असो, एका माणसाला जे समजलं ते इतरांना, अनेकांना समजायलाच हवं. सोप्या पद्धतीनी ते इतरांना सांगता येणं हीच तर खरी विद्वत्ता आहे. कोणाला न समजणारं कठीण बोलणारा माणूस 'थोर' असेलही, पण इतरांच्या काही उपयोगाचा नाही. या उपक्रमात निरनिराळ्या क्षेत्रांतलं ज्ञान सामान्यांपर्यंत पोचावं असा प्रयत्न आहे. अशांपैकी एक पुस्तक

आहे– ‘व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी’ - जनमानसचे एक ट्रस्टी अनिल भागवत यांनी लिहिलेलं हे पुस्तक अवश्य वाचावं अशी शिफारस आहे. तुम्ही जो विषय जाणता त्या विषयावरचं पुस्तक प्रकाशन करणं हे काम जनमानस अवश्य करेल. त्यासाठीच्या पैशाचं करू काहीतरी. हा प्रश्न सुटण्याजोगा असतो.

याखेरीज जनमानसनी ज्या ‘संवाद-मोहिमा’ हाताशी घेतल्यायत् त्यांची इथे थोडक्यात उजळणी करूया. तुम्हीही तुमच्या कल्पना सांगा. पाठपुरावा जनमानस करेल. जनमानस संस्थेनी या सगळ्या कल्पना 18 वर्षांपूर्वी चळवळीच्या स्वरूपात मांडल्या होत्या ही विशेष गोष्ट आहे.

1) पुणे, मुंबई आणि ठाणे महानगरपालिका–

1) रस्ते विभाग - रस्त्यांची, खड्ड्यांची अवस्था-दुरुस्त्या, मॅनहोलभोवती सपाट डांबरीकरण.
2) पाणी विभाग - पाण्याचा दर्जा, पाण्याचं चुकीचं व्यवस्थापन.
3) ड्रेनेज विभाग - फार रेंगाळणारी कामं. त्यामुळे केलेले रस्त्यावरचे ढीग.
4) कर विभाग - सामान्यांना समजेल असा ‘कर - तक्ता’ जाहीरपणी उपलब्ध करणं, वर्तमानपत्रात देणं.
5) कायदा सल्ला विभाग - मनपाला फसवणाऱ्यांवर कारवाई न करण्याच्या धोरणाला विरोध.
6) टी.डी.आर. संबंधातल्या तक्रारी - मनपाची फसवणूक, त्याबद्दल खुद्द मनपाचं दुर्लक्ष, याला विरोध.
7) शहरात फिरण्यासाठी म्युनिसिपल ट्रान्सपोर्टच्या छोट्या मिनीबसेसच्या कल्पनेचा पाठपुरावा.
8) शहरात स्त्रियांसाठी मुताऱ्यांची व्यवस्था.
9) मुताऱ्यांच्यात पाणी आणि बेसिन यांची सोय.

2) ट्रॅफिक पोलीस विभाग-

1) पार्किंगचे पट्टे नीट रंगवलेले नसणं.
2) रस्ता क्रॉसिंगचे झेब्रा पट्टे रात्री रंगवणं शक्य असताना रहदारीला अडथळे करून दिवसा रंगवणं.
3) छोट्या लांबीच्या रस्त्यांवरच्या नो एंट्रीच्या पाट्या काढून टाकणं.
4) बुद्धीला न पटणाऱ्या हास्यास्पद पाट्या- उदा. 100 मीटर नो

पार्किंग.

5) नो एन्ट्रीच्या पाट्यांच्यात लागू वेळेचा उल्लेख करणं, अंमलबजावणीसाठी साध्या पोषाखातली फिरती पोलीसयंत्रणा ठेवणं.

6) डावीकडचे सिग्नल सगळीकडे रद्द करणं.

7) चौकांमधल्या लाऊडस्पीकरवरून सूचना देणाऱ्या ट्रॅफिक पोलीस विभागाचं चांगल्या कामाबद्दल अभिनंदन करणं.

3) न्यायालयांचा कारभार-

इतक्या निरनिराळ्या न्यायालयांचा अभ्यास, चर्चा, पत्रव्यवहार चालू आहे.

1) जिल्हा कंझ्युमर फोरम, पुणे 2) कंझ्युमर स्टेट कमिशन-मुंबई
3) नॅशनल कंझ्युमर कमिशन-दिल्ली 4) मनपा कोर्ट, मनपा, पुणे
5) डिस्ट्रिक्ट कोर्ट-शिवाजीनगर, पुणे 6) हायकोर्ट, मुंबई

एवढ्या निरनिराळ्या विषयांबद्दल या न्यायालयांशी पत्रव्यवहार चालू आहेः

1) न्यायालयाच्या खटल्यासाठी कालमर्यादेच्या नवीन कल्पना.

2) वादी, प्रतिवादी यांना न्यायालयांनी आपणहून रजिस्टर ए.डी.नी पुढच्या तारखा कळवाव्यात अशी न्यायपूर्ण कल्पना.

3) खटल्याचं कामकाज होणार नसेल अशा प्रकारची तारीख देऊन लोकांचा आणि वकिलांचा वेळ वाया घालवू नये.

4) वकिलांना उकाड्याच्या प्रदेशात, उकाड्याच्या काळात घालावा लागणारा काळा कोट.

5) न्यायाधीशांनी वेळा पाळणं.

6) जनतेशी न्यायाधीशांनी सभ्यतेनी, अदबीनी वागणं.

7) न्यायालयांची फाइलिंगची चुकीची पद्धत. घड्या केलेली 'ब्रीफ्स' आणि सुटे कागद.

4) पोलीस खातं-

1) जनतेशी सौजन्यानी वागणं. 2) प्रत्येक तक्रारीच्या नोंदीचा आग्रह

5) एल.आय.सी.-

1) विमा हप्त्यांच्या रकमा पूर्ण रुपयात करण्याच्या सूचनेचा पाठपुरावा.

2) कार्यक्षमतेबद्दल अभिनंदन.

6) इन्व्हेस्टमेंट कंपन्या-

1) व्याजाचे चेक पूर्ण रकमेत पाठवावेत याचा पाठपुरावा.

7) बँकांच्या कार्यपद्धती-

1) बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या नावाच्या पाट्या काउंटरवर लावणं.

2) डिपॉझिट स्लिप्स भरण्यात जाणारा वेळ वाचवण्याच्या कल्पना.

3) बँकेच्या कर्मचाऱ्यांनी गिऱ्हाईकांशी अदबीनी वागणं.

4) बँकेनी गिऱ्हाईकांच्या पत्रांना लेखी उत्तरं पाठवणं.

5) बँकेनी गिऱ्हाईकांशी फोननी संपर्क साधणं.

6) फिक्स डिपॉझिटची मुदत संपल्यावर ग्राहकांना कळवणं.

7) बँकेच्या कर्मचाऱ्यांनी फूटपाथवर स्कूटर न लावणं.

8) लोकांसाठी ठेवलेल्या वेळेत फोनवर किंवा प्रत्यक्षात स्टाफनी गप्पा न मारणं.

8) रिझर्व्ह बँक -

1) जगातले अनेक देश प्लास्टिक नोटा वापरतात तशा भारतानी वापराव्यात या कल्पनेचा पाठपुरावा.

2) भारतासारख्या अशिक्षित, अर्धशिक्षित आणि ग्रामीण जनतेसाठा हिशेब सोपे करणाऱ्या नोटाच असाव्यात. केवळ 1000 आणि 100 रु. च्या नोटा सील्ड बंडलमधे असाव्यात आणि 10 रु. आणि 1 ची नाणी असावीत, याचा पाठपुरावा.

9) रिक्षा व्यवसाय - संघटना -

1) रिक्षा मीटर पद्धतीमधल्या अडचणी. 2) प्रीपेड पद्धतीतल्या अडचणी.

3) पेट्रोल दरवाढ आणि रिक्षा मीटर पद्धत. 4) रिक्षावाल्यांनी गिऱ्हाईकांची केलेली अडवणूक.

10) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ -

1) वीजबिलांची पद्धत 2) विजेच्या पुरवठ्यात अनियमितपणा.

3) भारनियमन अटळ असेल तर ग्राहकांच्या आणि विद्युत मंडळाच्या सोयीची सुधारित कल्पना.

11) दूरसंचार निगम-टेलिफोन विभाग -

1) बिलाची पद्धत. 2) डिरेक्टरीमधल्या अडचणी.

3) टेलिफोन कार्यक्षमता-अकार्यक्षमता 4) टेलिफोन केबलसाठी रस्ते

खोदून ठेवणं.

5) रेल्वे, एस.टी., एशियाड स्टँड अशा सार्वजनिक ठिकाणचे बिघडलेले नाण्यांचे टेलिफोन्स.

12) रेल्वे विभाग-

1) अकार्यक्षमता. 2) अस्वच्छता.

3) रेल्वेच्या वेळापत्रकाविषयी गोंधळ.

4) ऐकू न येणाऱ्या अनाउन्समेंटसंबंधी पाठपुरावा.

13) चॅरिटी कमिशनर ऑफिस-त्या ऑफिसची अकार्यक्षमता.

14) टपालखातं-

1) कार्यक्षमता-अकार्यक्षमता 2) नीट न उठणाऱ्या तारखेचे शिक्के

3) रजि.ए.डी.ची नवी सुधारित पद्धत

4) हवी ती टपाल-तिकिटं उपलब्ध नसणं.

5) टपाल तिकिटांची पावती न मिळणं.

15) दुकानदार

1) दुकानदारांनी संपलेल्या वस्तू वेळेवर मागवणं आणि पदार्थांचा साठा व्यवस्थित शिस्तीनी सांभाळणं.

2) दुकानात जाण्या-येण्याच्या वाटेवर वस्तू टांगून गिऱ्हाईकांची गैरसोय न करणं.

3) दुकानात गिऱ्हाईकाला पुन्हा चकरा मारायला न लावणं किंवा आपणहून फोन करून गिऱ्हाईकाची सोय बघणं.

4) कंपनीनी खरेदीवर जाहीर केलेल्या भेटवस्तू गिऱ्हाईकाला आपणहून आठवणीनी देणं.

5) मुद्दामहून आधी धडपड करून, सुट्टे पैसे, लहान नोटा यांची सोय करून गिऱ्हाईकाची सुविधा करणं.

6) दुकान उघडण्याची वेळ कटाक्षानी पाळणं.

7) दुकान बंद असताना दारावर दुकानाचे वार-वेळा लिहिणं.

16) प्राप्तीकर विभाग-

1) इन्कमटॅक्सऐवजी पर्चेस टॅक्स ह्या कल्पनेचा पाठपुरावा.

17) विक्रीकर विभाग-

1) प्रत्येक वस्तूच्या पावतीचा आग्रह,

2) गिऱ्हाईकासाठी सोप्या अशा नव्या पद्धती.

18) निवडणुका-

1) कॉम्प्युटरच्या सहाय्यानी विशिष्ट दिवशी सर्व निवडणुका, त्यांचे निकाल संपवता येतील, निवडणूक नावाचं प्रचंड खर्चिक नाटक नाहीसं करून, स्वच्छ, खऱ्या लोकशाहीच्या पद्धतीनी कारभार करण्याची नवी पद्धत.

2) निवडणुकांसाठी उमेदवारांनी समाजोपयोगी खरं काम हवं तेवढं करावं. लोकांना ते समजेल नि ते मत देतील; पण कामाचा देखावा पूर्णपणे बंद व्हावा, यासाठी निवडणुकांपूर्वीचे तीन महिने प्रचाराला बंदी या कल्पनेचा पाठपुरावा.

19) जिल्हाधिकारी- बिगरशेती परवाना या विशेषतः शहरात संपूर्ण कालबाह्य असलेल्या निरर्थक कल्पनेचा पाठपुरावा.

20) महाराष्ट्र राज्य परिवहन-

1) गाड्यांची अकार्यक्षमता, बसची अवस्था खराब, सीटस्, त्यांवरचे नंबर नसणं.

2) वाचता न येणाऱ्या गाड्यांवरच्या पाट्या. पुढच्याप्रमाणे मागून, बाजूनी पाट्या लावण्याच्या कल्पनेचा पाठपुरावा.

3) ड्रायव्हर-कंडक्टर यांची सौजन्यहीन वागणूक. त्यावर उपाय.

21) कचरा-भंगार समस्या-शहराच्या प्रश्नांना, झोपडपट्टीच्या प्रश्नांवर तोडगा असलेल्या 'जंक वर्कशॉप' ह्या कल्पनेचा पाठपुरावा.

22) सरकारी खात्यांच्या कौतुक करण्याजोग्या चांगल्या गोष्टींचं पत्रं आवर्जून पाठवून कौतुक करणं.

23) काही सामाजिक-तात्त्विक अभ्यासाची जनमानस करीत असलेली कामं-

1) जीवनसाथ विवाह अभ्यास मंडळ-अस्वस्थ विवाह म्हणजे अस्वस्थ आयुष्य. स्वतःचा आत्मसन्मान सांभाळून जोडीदाराबरोबरचं आयुष्य समाधानानी जगण्याचा मार्ग अविवाहित तसंच विवाहितांना दाखवण्याचं काम नियमितपणी चालतं. त्याच्या नियमित कार्यशाळा, आकाशवाणी-टीव्हीवर कार्यक्रम असतात. एक महत्त्वाची गोष्ट– जीवनसाथ ही वधू-वर सूचक संस्था नाही.

2) पालक विद्यापीठ-लहान मुलांना योग्य वागणूक देण्यासाठी फार पैसे लागतच नाहीत. समज मात्र लागते. मुलांशी वागण्याचं पद्धतशीर शिक्षण देण्याचं काम नियमितपणी चालतं. त्याच्या कार्यशाळा असतात.
3) सहवेदना-स्वेच्छानिवृत्ती आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न- खरं सांगायचं तर रिकामपण हाच माणसाचा खरा वैरी असतो. 'निवृत्ती' या मूळ कल्पनेची अनेक अंगं, तात्त्विक बैठक यांबद्दल विचार करणारा अभ्यासगट.
4) सरकारी नोकर- त्यांनी गेली अनेक वर्षं निर्माण केलेल्या 'पर्मनंट' नोकरी या कल्पनेबद्दल, 'नोकरशाही' किंवा सरकारी 'नोकरसत्ता' या संकल्पनेबद्दल अभ्यासगट.
5) सामाजिक काम करणाऱ्या इतर संस्थांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास- काही संस्थांमधे स्वार्थासाठी एकमेकांवर कुरघोड्या, प्रसिद्धीसाठी चाललेलं राजकारण चालतं अशा संस्थांची माहिती लोकांपर्यंत पोचवणं, त्यामुळे काय करायचं नाही हे स्पष्ट होत जाईल अशी कल्पना आहे.

मी आणि शोभा परदेशातून कायम वास्तव्यासाठी भारतात आलो तेव्हापासून जो विचार आमच्या डोक्यात होता तो जनमानसमुळे प्रत्यक्षात उतरला. 1997 मधे मी आखाती देशातून भारतात परत आल्यावर हे काम चालू केलं. या वार्तापत्रात 22 गोष्टींचा उल्लेख आहे. त्यानंतर काही नवीन कामंही चालू केली होती. सगळी मिळून 25 कामं एका वेळेला चालू होती. माझा बांधकाम व्यवस्थापनाचा व्यवसाय सांभाळून मी ही कामं प्रत्यक्ष करणं अशक्य असल्यामुळे दोघीजणींना कामाला नेमलं होतं. त्या गेल्यावर एक जेष्ठ पत्रकारही नेमला होता. आम्ही आठ जणं ट्रस्टी आहोत. तेव्हा सात होते. सगळे त्यांच्या परीनी मदत करायचे, पण मुख्य जबाबदारी माझी होती. जनमानसचं काम मी पुढे नेऊ शकलो नाही याची जबाबदारी माझीच होती.

साधारण 7-8 वर्षं जनमानसचं काम चालू होतं. आता त्यातलं जीवनसाथ जोरात चालू आहे आणि पालक विद्यापीठ चालू आहे. गेल्या 30 वर्षांत आपल्या जनतेबद्दल मात्र माझं मत 'बधीर' असं झालं आहे. मी माझ्या व्यवसायाच्या निमित्तानी अनेक ठिकाणी हिंडायचो. बरोबर जनमानस वार्तापत्राची एक प्रत

आणखी कोणी शंभर रुपये लगेच देतो म्हटलं तर पावतीपुस्तक कायम बरोबर ठेवायचो. जनमानसचे एकूण काहीशे सदस्य आहेत. ज्या लोकांशी मी बोलायचो त्यांचं आर्थिक व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक कामाबद्दलची असलेली/नसलेली आस्था मला कळायची. श्रीमंत माणसंसुद्धा अशा कामासाठी 100 रु. देतील याची खात्री नसायची. माझ्या जवळच्या ओळखीच्या, नात्यातल्या अनेकांनी त्यांचं खरं रूप या निमित्तानी माझ्यासमोर उघड केलं. ते सगळे 'सामाजिक समज' या विषयात नापास झाले आणि मी 'सामाजिक जागृती करणं' या परीक्षेत नापास झालो.

सर्वात वाईट अशाचं वाटतं की, सुशिक्षित माणसं सामाजिक प्रश्न फक्त चवीसाठी चघळायला वापरतात. त्यांवर काहीही कृती करायची त्यांची तयारी नसते. खरं तर ज्यांचा चरितार्थ चालवण्याचा मूलभूत प्रश्न सुटलेला आहे त्यांना आपल्या समाजातल्या प्रश्नांची जाणीव नसणं, त्यासाठी काहीही करायची तयारी नसणं हा नैतिक गुन्हा आहे आणि तो अक्षम्य आहे.

एक आमच्या मनाला भिडलेली, पटलेली गोष्ट पुन्हा सांगतो. परिपूर्ण आयुष्यासाठी स्वतःसाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी काहीतरी करणं आवश्यक आहे. स्वतःसाठी, कुटुंबासाठी माणसं झटतात, पण काही समाजसुधारकांकडे बघून समाजकार्याच्या खऱ्या अर्थाविषयी गोंधळ होतो. चांगल्या समाजकार्यापैकी एकही गोष्ट स्वतःला जमेलशी दिसत नाही. शेवटी मग एक सोपी गोष्ट उरते, पैसे दान करणं. तेवढंच काहीतरी केल्यासारखं वाटतं. पण खरं सांगू? पैशापेक्षा वेळ आणि बुद्धी त्या कार्याला देणं जास्त महत्त्वाचं आहे. तरुणपणी तर जणू काय समाजकार्य हा विषयच आपल्यासाठी नाही असं वातावरण असतं. नुसते पैसे कसे कमवायचे आणि 'एन्जॉय' कसं करायचं यात तरुण पिढी मशगुल दिसते. प्रत्येक गोष्टीला असतात तसे यालाही अपवाद आहेत, अगदी आमच्या जवळच्या ओळखीत आहेत आणि त्यांच्याविषयी मला आणि शोभाला खूप आपुलकी आहे.

गेली काही वर्षं काही वर्तमानपत्रं नागरी सुविधा या विषयावर काम करताता दिसतायत्. पण आपली महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकार या परीक्षेत केव्हाच नापास होऊन निर्ढावलेले आहेत. बदलाचा देखावा काही दिवस दिसेल पण जोपर्यंत जनतेचा जनमानस 'बधीरतेचा' आहे तोपर्यंत खरा बदल होईल असं मला वाटत नाही.

आम्ही पुण्याच्या कर्वेनगरमधे सुरक्षित, सुशिक्षित, सुसंस्कृत विभागात राहतो. पुणे महानगरपालिकेनी ओला-कोरडा कचरा निराळा करण्याच्या सूचना दिल्याला 2-3 वर्षं झाली. अजूनही ही सूचना खात्रीशीरपणी, काटेकोरपणी पाळणाऱ्यांची संख्या फार कमी आहे. साधारण पाच टक्के लोक हे पाळतात, बाकीचे 'सुसंस्कृत' अजून पाळत नाहीत. आम्ही त्या पाच टक्क्यांमधले आहोत हे सांगायची जरूरच नाही. जी गोष्ट नाही केली तर पैशाचा भुर्दंड बसेल तेवढीच गोष्ट लोक करणार, असा याचा अर्थ होतो, तो समाजाच्या बधीरतेचं दारूण रूप दाखवतो.

पुण्याच्या वाहतुकीच्या शिस्तीची तर फार वाईट अवस्था आहे. प्रत्येक ड्रायव्हर, मग तो दोन-चाकी चालवणारा किंवा चारचाकी चालवणारा असो, वाहन चालवताना त्याला इतका ताण सोसावा लागतो की, काही वर्षांत रक्तदाब, मधुमेह, नैराश्य, हृदयविकार या विकारांवर वैद्यकीय इलाज करणाऱ्यांना उसंत नसेल. या विषयात थोडीशी मदत 'आधार' ही संस्था करते. ते हे काम विनामोबदला करतात. त्यांचं करावं तेवढं कौतुकच आहे.

●

10) वैद्यकीय क्षेत्रातली सामाजिक कामं

पैशाची उलाढाल मोजली तर भारतात काही विशिष्ट क्षेत्रांत क्र.1, क्र.2, 3, 4, 5 खाली वरती होत असतं. त्या स्पर्धेत राजकारणाचा धंदा, देवाच्या नावानी केलेला धंदा, धर्माच्या नावानी केलेला धंदा हे असतातच. शिवाय सिनेमा, क्रिकेट, सरकारी कचेऱ्यांच्यातल्या मध्यस्थीचा धंदा म्हणजे लाओझन इंडस्ट्री हेही स्पर्धेत असतात. आता या स्पर्धेत आणखी काही प्रतिस्पर्धी उतरले आहेत. त्यात शिक्षणाचा धंदा आहे तसा 'हॉस्पिटलचा धंदा' ही आहे. छोट्या गावांच्यात योग्य वैद्यकीय सुविधा नाहीत आणि शहरात त्यासाठी लागणारे पैसे इतके प्रचंड आहेत की आजारपणाच्या खर्चाला घाबरूनच लोक जास्त आजारी होतात. या अशा वातावरणाचा फायदा घेणाऱ्या 'इन्शुरन्स कंपन्या' आहेतच आणि तरी 'काही चांगले लोक आहेत म्हणून जग चाललंय्' म्हणतात ते मधून मधून प्रत्ययाला येतं.

स्वस्त नाही पण रास्त पैशात, कुठल्याही वैद्यकीय शाखेत काम करणारा माणूस असणं, त्यानी ती रुग्णसेवा देत राहणं ही समाजसेवाच आहे. ही अपवादात्मक थोडी चांगली माणसं आहेत ती 'मेडिकल कँप' घेतात. तिथे मोफत तपासणी, कधी कधी मोफत इलाजही असतो. काही डॉक्टर्स विशेष काम करणाऱ्यांकडून फी घेत नाहीत. विशेष काम म्हणजे सामाजिक क्षेत्रात लोकहितासाठी झटणारी माणसं. शोभाच्या आणि माझ्या कामामुळे आमच्याकडूनही फी घ्यायला नकार देणारे बरेच ओळखीचे डॉक्टर्स, वैद्य, होमिओपाथ, निसर्गोपचारतज्ज्ञ, डेन्टिस्ट आहेत.

मी आणि शोभा अमेरिकेत होतो तेव्हापासूनचे आमचे जुने मित्र-मैत्रिणी अजून अमेरिकेत असतात. ते लोक आमच्याच वयाचे, पण तिथल्या समाजासाठी काम करतात. तिथे 'नर्सिंग प्रॅक्टिशनर' असलेली आमची एक मैत्रीण दरवर्षी काही महिने भारतात येते आणि आनंदवन, हेमलकसा आणि गडचिरोली इथे रुग्णसेवेत घालवते. यानी तिला खूप समाधान मिळतं.

●

11) शिष्यवृत्त्यांसाठी, पारितोषिकांसाठी पैशाची सोय

जगभर प्रसिद्ध असलेली दोन नावं तुम्हाला सगळ्यांना माहिती असतीलच. एक म्हणजे आल्फ्रेड नोबेल आणि दुसरं म्हणजे सेसिल ऱ्होड्स्. या दोन्ही बाबतींत प्रचंड मोठ्या रकमेची सोय अनेक वर्षांपूर्वी करून ठेवल्यामुळे नोबेल पारितोषिकं आणि ऱ्होड्स् शिष्यवृत्त्या शक्य होतात. ऱ्होड्स् स्कॉलरशिपचा आमचा खूप जवळून संबंध आला. आमचा मुलगा शोनील हा 'ऱ्होड्स् स्कॉलर' आहे आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यानी डॉक्टरेट केली. तिथेच तो अजूनही असतो.

आणखी खूप लोकप्रिय पारितोषिकंही तुम्हाला ऐकून माहिती असतील. बुकर, ऑस्कर, पुलित्झर, मॅगॅसेसे पारितोषिकं तुम्ही सगळ्यांनी नक्की ऐकली असतील. पण कोणीतरी पैशांची भक्कम सोय केल्याशिवाय हे होत नाही. त्यासाठी मात्र नुसते पैसे नाही तर दृष्टी लागते.

भारतातही जगातले अतिश्रीमंतांच्या यादीतले लोक राहतात. पण पैशाचा उपयोग कशासाठी करायचा हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा आणि सामाजिक जाणिवेचा प्रश्न आहे. खुद्द आमच्या ओळखीत खूप श्रीमंत लोक आहेत, पण ते 'प्रायव्हेट लिमिटेड कं.' काढून बसले आहेत. स्वतःच्या कुटुंबापलीकडे विचार करणं त्यांच्या जिवावरच येतं.

प्रायव्हेट लिमिटेड कं. चा अर्थ सांगितला की तुम्हाला गंमत वाटेल. 'प्रायव्हेट' म्हणजे फक्त स्वतःच्या कुटुंबापुरता विचार करणारा. 'लिमिटेड कं.' म्हणजे कुटुंबापलीकडे हे लोक कधी बघणार नाहीत आणि इतर कोणाला त्या वर्तुळाच्या आत घेणार नाहीत. असे लोक 'लष्करच्या भाकऱ्या' भाजणाऱ्यांना नावंही ठेवतात आणि आपण तसं कधीच करणार नाही असं अभिमानानी सांगतात.

खुद्द आमच्या जवळच्या ओळखीत शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज देणारी एक संस्था आहे. आम्हाला दोघांनाही त्या कामाबद्दल खूप आदर आणि आपुलकी आहे.

●

12) नैसर्गिक आपत्तीनंतरची कामं

आमच्या ओळखीचा एक मुलगा आहे. खूप हुशार आहे. पण दुसऱ्याला त्याची हुशारी तो कधी कळू देत नाही. तसंच भारत सरकारचं एक खातं आहे... आपत्ती निवारण खातं ऊर्फ डिझास्टर मॅनेजमेंट. त्यांची खुबी अशी, की खात्याचं अस्तित्व आपल्याला जाणवूच देत नाहीत. लातूरला एवढी वाईट अवस्था मी स्वतः बघत होतो. कच्छच्या भूज डेव्हलपमेंट काउन्सिलला सल्ला देत होतो; पण त्यांनासुद्धा याचा पत्ता नाही. वर्तमानपत्रात त्या खात्यासंबंधी बातमी वाचली तेव्हा लातूरकर-भूजकर आणि मला ते कळलं. आमच्या मॅनेजमेंटशास्त्रात 'डिझास्टर मॅनेजमेंट' हा विषय शिकवला जातो, त्यामुळे या खात्यानी काय करायला हवं किंवा हवं होतं, हे आपण बघूया.

देशाच्या, राज्याच्या किंवा मोठा पसारा असलेल्या धंद्याचा विचार केला की, एक गोष्ट नक्की जाणवते. कुठेतरी काहीतरी अपघात, घातपात, घोटाळा सतत असतोच. सगळ्या ठिकाणी सगळं सुरळीत कधीच असू शकत नाही. सैन्याचं उदाहरण घेतलं, तर युद्ध चालू असताना 'मरणाचं काम' आणि युद्ध चालू नसताना त्याची तयारी. अग्निशामक दलाचंही तसंच. आग लागली की धावाधाव आणि एरवी कवायत. आणीबाणीची परिस्थिती येण्याआधी त्याची तयारी हे त्याचं मुख्य मर्म आहे. विशिष्ट आपत्तीनिवारण मोहिमेच्या वेळी मोजका वेळ, त्वरित निर्णय, धोका जास्त, अपयश चालणार नाही, अशा अवस्थेत काम करण्यासाठी एरवी वर्षभर त्याच्या तयारीपायी मेहनत करावी लागते. ही एक गोष्ट भारतात घडताना दिसत नाही.

मी, सी.क्यू.एस. मॅनेजमेंट शिकलो, तेव्हा अनुभवासाठी छोट्या 'मोहिमा' असायच्या. त्या प्रशिक्षणातला सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे डोकं शांत ठेवणं. एक उदाहरण सांगतो- 2000 प्रेक्षकांची क्षमता असलेल्या सभागृहाची कल्पना करा, कार्यक्रम संपल्यावर अनेक दारांनी माणसं बाहेर जाऊन सभागृह रिकामं व्हायला फक्त 10 मिनिटं लागतात. आग लागली असं कळलं, की मात्र लोक भांबावून कुठेही धावतात, चेंगराचेंगरी करतात आणि शेवटी तिप्पट वेळ, अपघात, मारामारी अशी परिस्थिती होते. खरं सांगतो, काल्पनिक अपघात सांगून

त्या निमित्तानी अशी कवायत करणं जरूर आहे. खऱ्या अडचणीच्या प्रसंगी डोकं शांत ठेवण्यासाठी, अशा प्रसंगांची योजना हे 'डिझास्टर मॅनेजमेंट' खात्याचं एक काम आहे. शिवाय एका बाजूनी लोकांना शांत ठेवणं आणि दुसरीकडे अडचणीवर उपायाची तयारी करणं हे खरं काम असतं. अशा वेळेसाठी इमर्जन्सी प्लॅन क्र.1,2, 3, 4, 5 असे 'ॲक्शन प्लॅन' ठरलेले असतात, ते सगळ्यांना आधीपासून माहिती असतात.

लातूरमधल्या भूकंपात आणि कच्छच्या भूकंपात अगदी नको तेच नेमकं घडलं. घबराट, भावनातिरेक, काळजी, भीती यांमुळे सगळ्या गोष्टी एकदम घडल्या. बाहेरून लाखो लोक तिकडे धावले, पैशाचा महापूर चालू झाला; पण खऱ्या गरजेला उपयोगी मदत योग्य वेळी मिळाली नाही. ज्याला जे सुचेल तो ते करत सुटला. 'डिझास्टर मॉनिटरिंग' हे असं करायचं नसतं. वैद्यकीय मदत, पैशाची मदत, अन्नधान्याची, माणसांची मदत अर्थात लागणारच; पण केव्हा? किती? ह्याचं मॉनिटरिंग करण्याची जरूर असते. इमारतीच्या कामाच्या तपासणीसाठी अशी 'चेकलिस्ट' असते. तशी कुठच्या प्रकारची आपत्ती (भूकंप, पूर, वादळ, लाव्हा, घातपात, अपघात वगैरे) आणि नुकसानीचं प्रमाण किती (चौरस किलोमीटरची व्याप्ती, किती माणसांचं, किती पैशाचं नुकसान इ.) याप्रमाणे मदत किती, पैसे केव्हा, कोणाकडून यासंबंधी 'डिझास्टर रिलीफ प्लॅन' तयार असतो. तेवढी व्यवस्था लगेच करायची (तेवढी कुमक तयार असावी लागते) आणि पुढचे निर्णय परिस्थितीनुसार घ्यायचे. असे 'रिलीफ प्लॅन' तयार करण्याचं त्या खात्याचं काम अखंड वर्षभर चालू असावं लागतं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ते दुर्घटना घडण्यापूर्वी करून तयार ठेवलेलं असावं लागतं.

लातूरच्या भूकंपात जशी घरं बांधली गेली त्या चुकांना तर तोड नाही. त्या घरांच्या कामामुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते, अनेक राजकीय पुढारी श्रीमंत झाले. एवढा फायदा सोडला, तर बाकीची परिस्थिती अजूनही भयाण आहे. नवी बांधलेली घरं लोकांना पसंत नाहीत. त्यांत ते धान्य, चारा ठेवतात आणि स्वतः घराबाहेर झोपतात. अशा नैसर्गिक आपत्तीपेक्षा त्यानंतरच्या चुकीच्या हाताळणीला सगळे जास्त घाबरतात. 'रोगापेक्षा औषधाचा त्रास जास्त' सारखं होतं. खुद्द घरबांधणीच्या कामात खऱ्या ज्ञानाची किंमत त्यावेळच्या निर्णय घेणाऱ्यांना कधीच कळली नाही. लॉरी बेकर, डॉ. विकास आमटे यांना प्रश्नाचं उत्तर बरोबर सापडलं होतं; पण ते कोणाला ऐकून घ्यायचं नव्हतं. अशा आपत्ती निवारणाचं

नेतृत्व कोणाकडे हा मुख्य प्रश्न असतोच. वैद्यकीय क्षेत्रातल्या लोकांना वाटतं, ते प्रमुख असायला पाहिजेत, बांधकाम क्षेत्रातल्यांना वाटतं ते मुख्य. सामाजिक कार्यकर्त्यांना वाटतं, त्यांच्या हातात सूत्रं असावीत. प्रत्यक्षात सगळे निर्णय राजकीय सत्ता घेते आणि सगळे मिळून आपत्तीग्रस्तांची अवस्था 'मदतग्रस्त' अशी करतात.

'डिझास्टर मॅनेजमेंट' मधली अनुभवी ज्ञानी व्यक्ती ही एकच नेतृत्वाच्या लायकीची असते. इतरांची मदत नाकारण्याचा प्रश्नच नाही. उलट, एरवी सहज कल्पना करता येत नाही, अशा अनेकांची मदत मॉनिटरला लागते. डॉक्टर्स, नर्सेस, सर्जन्स असतातच; पण डाएटिशिअन्स, फिझिओथेरपिस्ट आणि मानसशास्त्रज्ञही असतात. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी त्या क्षेत्रातले तज्ज्ञ लागतातच; कारण यापुढे काय होऊ शकेल ही चिंता सतत असते. अशा अनेक तज्ज्ञांनी त्यांचं मत मॉनिटरला सांगायचं असतं पण अधिकार पिरॅमिडच्या शिखरावर मॉनिटर असावा लागतो. 'खरंच सांगायचं, पण कसं ति केव्हा' या विषयातला तो तज्ज्ञ असतो. 'इमर्जन्सी' ॲक्शन प्लॅन नंबर किती ते त्यानी ठरवायचं असतं.

आपत्तीनंतर लागणारे पैसे, अन्न, कपडे, माणसं, औषधं, ही मदत केव्हा, कशी यावर नियंत्रण नसलं, की या प्रत्येकाचा महापूर लोटतो आणि पाहिजे तेव्हा, हवी त्याला मदत मिळत नाही. मॉनिटर ही व्यक्ती कोणाला आरंभशूरपणाही करू देत नाही आणि पुढे दुर्लक्षही करू देत नाही. 'आज ढीगभर अन्न आणि उद्या उपाशी' ही सध्याची अवस्था केवळ मॉनिटरिंगच्या मॅनेजमेंटच्या अभावामुळे आहे. रस्त्यावरच्या अपघातानंतर जसे बघे जमतात तसे भूकंपाच्या जागी 'बघे' खूप जमतात. मुळात शहराबाहेर लोकांना पुरेसा उद्योग नसल्यामुळे उचापती, कुचाळक्या आणि स्थानिक राजकारणात 'करिअर' करणारे खूप. अशा आपत्तीनंतर त्या जागेची 'टूरिस्ट प्लेस' होते. आलेल्या 'एन.जी.ओ.' ना पैसे, वस्तू कोणालातरी देण्याची गरज असते. या उद्योग नसलेल्यांना हा नवीन उद्योग मिळतो. 'मदत एजन्सी' हा नवीन धंदा चालू होतो. आलेल्या लोकांपैकी निम्म्यापेक्षा जास्त लोक 'पैसे कमावण्याची संधी' म्हणून आपत्तीकडे बघतात. दुसरं टोक म्हणजे खरोखर सेवाभावी वृत्तीनी आलेले सामाजिक कार्यकर्ते. दुर्दैव असं, की त्यांच्या श्रमाच्या तुलनेनी आपत्तीग्रस्तांना त्यांचा तेवढा उपयोग होत नाही. याचं कारण एकच, मदत ही सत्कारणी लागण्यासाठी शांत डोक्यानी केलेला त्याचा आराखडा आवश्यक असतो. 'डिझास्टर मॉनिटर'खेरीज या

विषयातला कोणीही तज्ज्ञ त्या ठिकाणी उपयोगी नाही.

प्रत्येक माणसाला अडचणी येतात नि स्वतःच्या ताकदीच्या जोरावर तो त्या सोडवतोदेखील. सामान्य माणसाच्या ताकदीबाहेरच्या अडचणी आणि त्याही मोठ्या संख्येने आल्या की, ती सरकारी पातळीवर निवारण करण्याची आपत्ती म्हणायची. खरं तर सर्वसामान्याच्या ताकदीपलीकडचा आजार जरी एखाद्याला झाला तरी त्याची खर्चाची जबाबदारी तरी निदान सरकारनी उचलली पाहिजे. दुर्दैव असं, की आपत्तींचा उपयोग राजकीय हेतूसाठी केला जातो, परकीय मदतही भरपूर मिळते; पण पाहिजे तेव्हा 'ते पैसे सापडत नाहीत,' अशी अवस्था आढळते. 'नैसर्गिक आपत्तीत सापडणारे बरबाद होतात. लूट करणारे गबर होतात,' ही नेहमीची रीत झाली आहे. हा असमतोल टाळायचा असला, तर खरोखरीचं आपत्तीनिवारण व्यवस्थापन खातं, त्याची सूत्रं व्यावसायिक 'डिझास्टर मॅनेजर'कडे आणि त्यासंबंधीचे अधिकार थेट राष्ट्राध्यक्षाकडे, अशी रचना करणं हाच एक आशेचा किरण आहे.

अशा नैसर्गिक आपत्तीनंतर काम करण्याचे तीन मुख्य प्रकार असतात– स्वतः पैशाची मदत करणं, दुसरं पैसे गोळा करण्याचं काम करणं. तेही महत्त्वाचं ठरतं कारण लोकांना पैसे कोणाकडे नेऊन द्यायला वेळ नसतो. तिसरा मार्ग सर्वात कठीण आहे. स्वतःच्या खर्चानी आपत्तीच्या जागी जाऊन असेल त्या परिस्थितीत राहणं. स्वतःच्या खर्चानी स्वतः मेहनत करून जी मदत ज्याला पाहिजे असेल ती करणं.

भारतातल्या सत्प्रवृत्तीच्या लोकांना एक प्रश्न पडलेला असतो. नैसर्गिक आपत्ती आली की अशा माणसांची मदत करण्याची इच्छा असते, पण कपडे, वस्तू, धान्य, औषधं, पैसे खरोखर गरजूंपर्यंत पोचतील याची खात्री वाटत नाही. मी स्वतः प्रत्यक्ष आपद्ग्रस्त ठिकाणी जाऊन राहिलेलो असल्यामुळे लोकांची ही भावना मी समजू शकतो. त्याचा विचार करून मला दोन मार्ग दिसतात.

मगाशी म्हणालो तसं स्वतः अशा ठिकाणी जाणं शक्य नसलं तर त्या त्या गटानी, विभागानी स्वतःचा विश्वास असलेले काही प्रतिनिधी निवडावेत. उदाहरण शहरातल्या एखाद्या मोठ्या हाउसिंग सोसायटीचं घेतो. त्या सोसायटीनी या खास कामासाठी सगळ्यांचा विश्वास असलेली दोघं-तिघं माणसं निवडून त्यांच्या हातात मदतीसाठी जमा केलेली रक्कम द्यावी. त्या निवडक तीन-चार माणसांनी प्रत्यक्ष आपत्तीग्रस्त ठिकाणी स्वतः जावं. त्यांचा प्रवासखर्च, राहणं, जेवणखाण सगळा

खर्च सोसायटीनी जमवलेल्या पैशातून व्हावा हे गृहीत धरायला पाहिजे. त्या लोकांनी सोसायटीत नियमितपणे तिथली परिस्थिती कळवावी. तिथे गेल्यावर खरोखर सर्वांत जास्त गरजू कोण याचा अभ्यास करून त्या पैशातून खर्च करून त्यांना मदत करावी. उचलून पैसे देणं ही सर्वांत सोपी गोष्ट असली तरी ती योग्य नाही हे कायम लक्षात ठेवावं.

आणखी दुसरा मार्ग म्हणजे सरकारनी त्या विशिष्ट आपत्तीनिमित्त खास कर लागू करायचा. कर या गोष्टीमागची कल्पनाच 'आहे रें' कडून पैसे घेऊन ते 'नाही रें' ना पोचवणं ही असल्यामुळे या विशिष्ट कराच्या पैशाचा उपयोग आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी होईल. सरकारनी पुरेसा पारदर्शक कारभार मात्र केला पाहिजे. सगळे पैशाचे आकडे जनतेला जाहीरपणी सांगितले पाहिजेत. 'डिझास्टर मॅनेजमेंट कमिटी'कडे ही रक्कम सुपूर्द करायलाही हरकत नाही. त्या कराला तात्पुरत्या काळासाठी 'नेपाळ भूकंप कर' असं काहीतरी नाव द्यावं.

●

13) शहरातल्या झोपडपट्ट्यांच्यात काम

शहरात राहाणाऱ्या सुखवस्तू लोकांना आपण स्वतः राहतो त्या शहरातली किती लोकं झोपडपट्टीत राहतात याची कल्पना नसते. जाता येता रस्त्यावरून झोपडपट्टीचा थोडासा भाग दिसतो पण आकडेवारीची कल्पना नसते. मुंबईच्या लोकसंख्येपैकी 70% लोकं झोपडपट्टीत राहतात, पुण्यामधे 50% च्या वर लोकं झोपडपट्टीमधे राहतात याची कल्पना नसते. महाराष्ट्रातल्या इतर शहरांच्यात प्रमाण कमी असेल पण प्रश्नाचं स्वरूप तेच. नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर या शहरांना पूर्वी झोपडपट्ट्या माहीत नव्हत्या, त्या आता आल्या. त्याचा एक अर्थ अगदी साधा आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्यांना सगळ्या नागरी सुविधा तर पुरवाव्याच लागणार. पाणी, ड्रेनेज, वीज, रस्ता. या सगळ्याला जो खर्च येतो तो त्यांच्याकडून मागता येणार नाही, म्हणजे इतर करदाते म्हणजेच सुखवस्तू लोक तो कर भरणार.

आता अगदी स्वार्थी विचार केला तरी कोणाच्याही लक्षात येईल की, झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या राहणीत आर्थिक, सांस्कृतिक सुधारणा झाल्याशिवाय कोणालाच शांतपणी जगता येणार नाही. त्या लोकांचा कामाचा, पैशाचा, आरोग्याचा, शिक्षणाचा, नैतिकतेचा– सगळे प्रश्न एकमेकांवर अवलंबून आहेत. कुठून सुरुवात करावी हा प्रश्नच असतो. शोभानी भारतातल्या तिच्या कामाची सुरुवातच झोपडपट्टीतल्या प्रौढ-शिक्षण प्रकल्पानी केली. मी त्यांच्याबरोबर बांधकामानी सुरुवात केली. अनेक बांधकामावरचे कामगार झोपडपट्टीत राहणारे होते आणि मी अनेक वेळा त्यांच्या घरी जायचो. मी बांधकामातल्या कामगारांना एकच विषय प्रत्यक्ष कामाच्या जागेवर काम करताना शिकवायचो. तो म्हणजे 'जबाबदारीची वागणूक.'

सफाई कामगारांच्यात, मोलकरणींच्या संघटनेत कामं करणारे लोकही आमच्या चांगले ओळखीचे आहेत. अशा सगळ्या कामांच्यात मला एक अडचण जाणवते. अशी कामं कायम कुठच्यातरी राजकीय पक्षाशी जोडलेली असतात. संघटनांचे पुढारी नेत्यांना एक गठ्ठा मतं मिळवून देऊ शकतात. निर्लोभीपणे संपूर्ण स्वार्थरहित कामंही चालू असतात पण ती छोटी राहतात. त्यांना पैसे कमी पडतात.

मुंबई ही एक प्रचंड आकाराची ‘झोपडपट्टी’ आहे असं काही लोक म्हणतात. इतर जगात मुंबईचा उल्लेख ‘स्लमसिटी’ म्हणून केला जातो. या टीकेत अगदीच काही तथ्य नाही असं नाही. मुंबईत रोज निर्माण होणारा कचरा, त्याची रोजची व्यवस्था हा महाकठीण प्रश्न आहे. महापालिका त्याला पुरी पडू शकत नाही. मुंबईतल्या ‘स्त्री-मुक्ती संघटना’ या संस्थेच्या प्रमुख ज्योती म्हापसेकर आमच्या चांगल्या ओळखीच्या आहेत. त्यांनी मुंबईतल्या कचरा समस्येवर खूप छान काम गेली अनेक वर्षं केलेलं आहे.

मुंबईचे 2 भाग समजतात. एक म्हणजे श्रीमंतांची. त्याला ‘बाँबे’ म्हणतात. दुसरा भाग म्हणजे आपण आता वर्णन केलं तो मुंबई.

●

14) पर्यावरण रक्षण-शिक्षण

गेल्या 25-30 वर्षांत जगासमोर, हो, सबंध पृथ्वीवरच्या सगळ्या देशांपुढे एक प्रश्न गंभीरपणे समोर आला आहे. औद्योगिक प्रगती खूप झाली. औषध-उत्पादन क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली. अनेक रोगांचं पृथ्वीवरून उच्चाटन झालं. संपूर्ण जगाचं सरासरी आयुर्मान वाढलं. इतरांचे आकडे मला माहिती नाहीत पण भारतापुरतं बोलायचं तर स्वातंत्र्याच्या वेळी सरासरी 28 वर्षं माणूस जगत होता, तो 56 वर्षं जगायला लागला. भारतापुढचा लोकसंख्येचा प्रश्न भयानक बनला. वाहनांचा वापर, उत्पादन वाढलं, शहरं आकारानी प्रचंड झाली. शुद्ध पाण्याचा, शुद्ध हवेचा प्रश्न निर्माण झाला. लोकांचं आरोग्य खालावलं. सरासरी माणूस जास्त काळ जिवंत पण रोगी व्हायला लागला. असं लक्षात आलं की, भारताचंच नाही, सबंध जगाचंच काहीतरी चुकलंय्.

जिथे संशोधनाला संधी, साधनं, पैशाची उपलब्धता होती तिथे या प्रश्नावर जोरात संशोधन सुरू झालं. जमीन, समुद्र, आकाश, अवकाश, वनस्पती, प्राणी सगळ्यांचा एकमेकांचा एकमेकांशी आणि शेवटी मनुष्यप्राण्याच्या आरोग्याशी संबंध आहे हे लक्षात आलं आणि पर्यावरणशास्त्र शिकायला आणि शिकवायलाच हवं याची सबंध जगाला जाणीव झाली. अनेक ठिकाणी अनेक पातळ्यांच्यावर लोक काम करायला लागले. आमचा मुलगा शोनील पर्यावरणशास्त्रात डॉक्टरेट करून ऑक्सफर्डला त्यावर शिकवणं आणि संशोधन असं काम करायला लागला. त्याच्याकडून आम्हाला बरीच माहिती मिळते. या विषयावर इंग्लंड, युरोप, यू.अेस्.ए., स्कॅंडिनेव्हिया यांमधे काय काम चालू आहे हे त्याला माहिती असतं. त्यामानानी भारतात पर्यावरण रक्षण आणि शिक्षण यात फार कमी काम चालतं.

मला स्वतःला पर्यावरणरक्षणाची मध्यम समज आहे असं समजू. मी चुकीच्या चंगळवादी मार्गानीही जगत नाही आणि शोनील किंवा इथे भारतात काम करणाऱ्यांच्या इतक्या पर्यावरणाच्या जीवनपद्धतीनीही जगणं मला शक्य नाही. मी आणि शोभा अनेक गोष्टी चुकीच्या आणि अनेक गोष्टी बरोबर करतो म्हणून

आम्ही आम्हाला मधल्या डब्यातले प्रवासी मानतो. तेवढ्या ज्ञानाच्या आधारानी पर्यावरण रक्षण-शिक्षण यात मला काय अडचण दिसते ती सांगतो. वैद्यकीय क्षेत्रात आयुर्वेद, होमिओपथी यांना मागे टाकून ॲलोपथी म्हणजे 'मॉडर्न मेडिसिन' ज्या कारणानी लोकप्रिय झालं त्याचं कारण म्हणजे त्याचा गुण लवकर दिसतो.

आयुर्वेदात आणि होमिओपथी, नेचरोपथी अशा शास्त्रांच्यात संपूर्ण शरीराचा, मन, विचार, भावना यांचा जास्त मूलभूत विचार होतो, पण गुण यायला वेळ लागतो. वेळ लागला की सध्याच्या माणसाला ती गोष्ट चालत नाही, पटत नाही. पर्यावरणाचं असंच मला वाटतं. जीवनशैलीत बदल करून पर्यावरणाला योग्य अशी दिनचर्या आज अमलात आणली तरी त्याचे परिणाम दिसायला पुढची 25-30 वर्षं लागणार असली तर माणसाला ते पटत नाही.

मगाशी म्हटल्याप्रमाणे आम्ही मधल्या अवस्थेत असल्यामुळे आम्ही आमच्या परीनी काही गोष्टी सांगायचा प्रयत्न करतो पण त्याचा उपयोग तेवढा होत नाही. प्रत्यक्ष चर्चा आणि पर्यावरणविषयक पुस्तकांमुळे आम्हाला माहिती आहे ते असं– सुधारित जीवनशैलीत अभ्यासकांनी सांगितलेल्या जास्तीतजास्त गोष्टींचा अवलंब करायचा तो आपल्या आयुष्यात त्याचे परिणाम दिसावेत म्हणून नाही, तर आपल्या मुलांसाठी, नातवंडं, पणतवंडांसाठी ते करायला हवं.

शहरीकरण हाच पर्यावरणातला मूळ प्रश्न असल्यामुळे आधी शहरात राहणारे पण ठरवून शहर सोडून छोट्या गावात संसार थाटणारे लोक आमच्या ओळखीचे आहेत. असं उदाहरण आपल्या समोर ठेवून त्यांनी मोठं समाजकार्य केलं आहे. पाणी, वीज वाचवणं, कागद वाचवणं, कचरा व्यवस्थापन, वनसंरक्षण, वनवर्धन, साधी राहणी अशा अनेक गोष्टी त्यांच्या रोजच्या आयुष्यामधेच समाविष्ट आहेत. ते खाजगी वाहनं टाळतात. या सगळ्या पर्यावरणरक्षक शिक्षकांचं एक म्हणणं असतं ते इंग्रजीत मांडतो, 'थिंक ग्लोबली, ॲक्ट लोकली.' जसं आपण सुरुवातीला समाजकार्याबद्दल म्हणालो की, कितीही छोटं सामाजिक काम असलं तरी त्याचं आपल्याला कौतुक आहे, तसंच योग्य पर्यावरणाच्या प्रत्येक पावलाबद्दल आपल्याला आदर आहे. आज एक पाऊल आहे, उद्या त्याची दोन होतील.

मगाशी म्हणालो तसा शोनील, आमचा मुलगा पर्यावरण या विषयात बरंच

संशोधनाचं आणि शिकवण्याचं काम करतो. त्याचं काही काम पर्यावरण विषयाच्या जागतिक अभ्यासापर्यंत पोचतं. तो सांगतो की, या विषयातही अनेक विद्वान आहेत. काही ढुढ्ढाचार्य आहेत आणि साधारण निम्मे 'फाइव्ह स्टार इकॉलॉजिस्ट' आहेत. ते जगात अनेक ठिकाणी हिंडून पर्यावरणाची प्रचंड हानी रोज करणाऱ्या 'फाइव्ह स्टार हॉटेल्स'मधे राहून या विषयावर भाषणं देत हिंडतात. ते 'फील्डवर्क' पासून खूप दूर केव्हाच गेले आहेत.

●

15) कोणालाही जमतील अशी साधी कामं

एका निराळ्या प्रकारे सामाजिक कामाकडे बघितलं तर त्याचे 2 गट पडतात. दोन्हींचं थोडक्यात वर्णन सांगतो.

1) नेहमी, मधूनमधून पण प्रत्यक्ष संपर्कात असलेल्या लोकांसाठी, स्वार्थविरहित काम– त्यामधे मित्र, कामवाले, नातेवाईक, आसपासचे ओळखीचे लोक, आपल्या कामाच्या जागेवरचे असे लोक येतील.
2) अनोळखी समाजासाठी स्वार्थविरहित विधायक काम.

मी आणि शोभा जे काम करतो ते बरंचसं पहिल्या गटासाठी असतं आणि बाहेरगावचे कार्यक्रम, नियतकालिकांमधलं लिखाण, हा सध्याचा पुस्तकसंच या दुसऱ्या गटातल्या गोष्टी आहेत.

एवढी निरनिराळी सामाजिक कामं आपण बोललो आणि तरी काहींच्या मनात असा विचार आला असेल की, यातलं आपल्याला जमण्याजोगं कुठचंच काम नाही. त्यासाठी तर या कार्यशाळेच्या शेवटी कोणालाही जमतील अशा कामांची यादी आपण करायला घेतलीय्.

1) तुम्ही जिथे राहता ती को-ऑपरेटिव्ह सोसायटी असली तर त्याचा अध्यक्ष, सचिव, खजिनदार म्हणून भ्रष्टाचाराला थारा न देता प्रामाणिकपणी काम करणं हे सामाजिक कामच आहे.
2) आपलं ज्या विषयातलं शिक्षण असेल त्या विषयातलं ज्ञान इतरांना देणं.
3) आपण शहरात राहात असू आणि आपल्या मूळ गावात नातेवाईक, मित्र, गरजू लोक असतील त्यांची आपल्या घरी राहाण्याची-जेवण्याची सोय करणं.
4) स्वतः ज्या शाळेत, कॉलेजमधे शिकलो त्या शाळा-कॉलेजला पैशाची, वेळेची, श्रमाची, सल्ल्याची सर्वप्रकारे मदत करणं.
5) आपल्याला जी भाषा चांगली येत असेल ती रास्त फीमधे इतरांना शिकवणं. मी स्वतः अनेक वर्षांपासून इंग्रजी संभाषणवर्ग घेतो.
6) रास्त पैशात व्यायाम, खेळ, योगविद्या यांची सोय करणं, शिकवणं.
7) अल्प किमतीत साधं जेवण मिळेल अशी खानावळ चालवणं.

8) रास्त पैशात पाळणाघर चालवणं.
9) चांगल्या मनापासून शिकवणाऱ्या शिक्षकांशी सन्मानानी वागणं. चांगल्या शिक्षकांची संख्या फार कमी होत चालली आहे ही मोठी सामाजिक समस्याच आहे.
10) घरात, कामावर सगळीकडे कष्टकऱ्यांशी सन्मानानी वागणं. त्यांना अडचणीला उसने पैसे देणं. घरात असेल ते खायला देणं. चहा देणं.
11) खरेदीच्या वेळी घासाघीस न करणं.
12) बचतगट, भिशी वगैरेंची व्यवस्था प्रामाणिकपणी सांभाळणं.
13) दिलेला शब्द, दिलेली वेळ कायम पाळणं.
14) भीक देण्याला, घेण्याला प्रतिबंध करणं. त्यामागचं तत्त्व समजावून सांगणं.
15) रस्त्यावर वाहन चालवताना सर्व नियम पाळून जबाबदारीची वागणूक ठेवणं.
16) रस्त्यावर अपघात झालेला दिसला तर थांबून मदत करणं.

'मला समाजकार्य करण्याची इच्छा आहे पण काय करायचं ते न समजल्यामुळे मी थांबलोय्', असं म्हणणाऱ्यांची आता सोय झाली. यातली प्रथम एक गोष्ट करा, मग दुसरी मग तिसरी अशा सोळा गोष्टी करा. आणखी काही समजण्याचे आणि लक्षात ठेवण्याचे मुद्दे आहेत ते सांगतो.

1) तुम्ही चांगल्या हेतूनी केलेली सामाजिक हिताची गोष्ट न पटणारे लोक असतील. त्यांचा नुसता उलट्या दिशेचा प्रवास चालू असला तरी ठीक आहे. पण काही त्यापलीकडे जाऊन दुष्टावा करतील. त्याकडे दुर्लक्ष करा. निंदेकडे अजिबात लक्ष देऊ नका.
2) सामाजिक कामासाठी पैसे देणं ही गोष्ट सर्वांत सोपी आहे. पैशाचं महत्त्व नाही असं आपण म्हणत नाही, पण तुमची शक्ती, बुद्धी, श्रम, वेळ, सल्ला पैशापेक्षाही जास्त महत्त्वाचा आहे.
3) आपण काहीतरी सामाजिक काम करतो त्यामुळे स्वतःला 'ग्रेट' मानायला लागण्याचा धोका संभवतो. कधी म्हणजे कधीच चढून जाऊ नका. जेवढा माणूस अस्सल आणि खरोबर मनानी मोठा तेवढा तो अधिक साधा आणि नम्र असतो.
4) नवराबायकोंनी एकत्र करण्याजोगं सामाजिक काम असलं तर ते करताना

जास्त आनंद मिळतो. तसं नाहीच सापडलं तर एकेकट्यानी चालेल पण काहीतरी करा.

5) चुकून कोणी समाजकार्याची चेष्टा करताना दिसलं तर त्याला रोखा. कितीही छोटं असलं तरी ते काम म्हणजे खारीचा वाटा असतो.

एकदा तुम्हाला पटलं की समाज समजून घेणं, त्यासाठी निरपेक्षपणी काहीतरी करणं हे समाधानी आयुष्याचं आवश्यक असलेलं तिसरं 'डायमेन्शन' आहे की, सुरू कुठून करायचं असा प्रश्न असतो. त्याचं उत्तर सोपं आहे. आपल्या ओळखीच्या कष्टकरी, गरीब, आपल्यावर अवलंबून असलेल्या लोकांशी नीट, सरळ, सभ्य, चोख वागायला सुरुवात करायची. अगदी घरच्या मोलकरणीपासून सुरुवात केली तरी चालेल. तुम्ही यातलं काही, याहूनही खास काम आधीच करत असाल तर प्रश्नच नाही. पण तसं नसलं तर एवढं करून तर बघा!

वाहतुकीतली बेशिस्त हा मला फार अस्वस्थ करणारा विषय असल्यामुळे त्याबद्दल पुन्हा एकदा कळकळीची एक विनंती करतो.

प्रत्येक नियम आणि संकेत पाळण्यासाठीच असतो. रस्त्यावर कचरा टाकण्याबद्दल असो, पार्किंगचा, वनवे असलेल्या रस्त्यावर उलट्या दिशेनी जाण्याचा प्रश्न असो, प्रत्येक नियम पाळायचा एवढं तुम्ही स्वतः पाळलंत तरी समाजकार्य चालूच झालं. तुम्ही म्हणजे समाजच ना!

●●●

सामाजिक कामासाठी पैसे देणं ही गोष्ट सर्वांत सोपी आहे. पैशाचं महत्त्व नाही असं आपण म्हणत नाही, पण तुमची शक्ती, बुद्धी, श्रम, वेळ, सल्ला पैशापेक्षाही जास्त महत्त्वाचा आहे.

जीवनसाथ पुस्तक संच
संपूर्ण यादी

पुस्तक क्र.	पुस्तकाचं नाव
1.	विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय ● कौटुंबिक विसंवाद
2.	जोडीदाराची निवड ● लैंगिक शिक्षण
3.	व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ ● पुरुष पालकांचं शिक्षण
4.	आर्थिक व्यक्तिमत्त्व ● करीअरचं नियोजन
5.	व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं
6.	स्वावलंबन, आत्मसन्मान ● स्त्री-पुरुष असमानतेची रूपं
7.	उत्सवी प्रवृत्ती ● लग्नसमारंभ

8. खरे उपयोगी संस्कार

●

सर्वांनी करण्याजोगं समाजकार्य

---

9. रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

समतोल विचारांचं महत्त्व

---

10. ज्येष्ठांशी संवाद

●

मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

---

11. समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

जीवनसाथ समुपदेशन संस्था

---

12. कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय

●

जीवनसाथमधले खेळ

जीवनसाथ संचामधली अनिल भागवत यांची इतर पुस्तकं

पुस्तक-1

विवाह अभ्यास म्हणजे नेमकं काय

●

कौटुंबिक विसंवाद

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

1) विवाह अभ्यास मंडळ म्हणजे नेमकं काय?

1. या कल्पनेची थोडक्यात ओळख 2. विवाहाचा तत्त्वज्ञानाशी संबंध 3. वैवाहिक आयुष्यासाठीची काही महत्त्वाची तत्त्वं 4. रोजच्या आयुष्यातली साधी तत्त्वं 5. भावनांविषयीचा अभ्यास 6. विचारांचं भावनेत रूपांतर 7. भावनांवर नियंत्रण 8. कुटुंबाबरोबरच्या आयुष्याचं महत्त्व 9. व्यवस्थापनशास्त्राचा उपयोग 10. कुटुंबाचं समुपदेशन 11. आपुलकी, प्रेम, या भावना व्यक्त करणं 12. नाती सांभाळण्यासाठीची तत्त्वं आणि तंत्रं 13. प्रश्न सोडवण्याची पद्धत– मिश्रगट कार्यशाळा म्हणजेच 'ग्रुप काउन्सेलिंग' वर्कशॉप्स 14. खरं बोलणं 15. पैशाबद्दलची विचारसरणी 16. स्वावलंबन आणि आत्मसन्मान 17. स्त्री-पुरुष समतेची आणि समानतेची समज 18. लोकशाहीचं मूल्य आणि स्वतंत्र किंवा एकत्र कुटुंब 19. उत्सव, समारंभ याबद्दल भूमिका 20. असणं, दिसणं आणि दाखवणं 21. आधुनिक आणि पारंपरिक 22. वैयक्तिक समुपदेशन 23. या पुस्तकासंबंधीच्या सूचना

2) कुटुंबातले आणि नवराबायकोमधले मतभेद म्हणजेच कौटुंबिक विसंवाद

1. प्रश्नाचा नेमका शोध आणि उपायाचा शोध 2. विवाहाच्या इतिहासात आणि तत्त्वज्ञानात काय सांगितलंय 3. कौटुंबिक विसंवाद या विषयातली आकडेवारी 4. विचार, भावना यांचे गट आणि नवरा-बायकोचं नातं 5. कुटुंबातली इतर नाती / एकत्र कुटुंब 6. पैशावरून वाद 7. आत्मसन्मानावरून वाद 8. मुलांसंबंधीचे वाद 9. सासर-माहेर याविषयी वाद 10. स्त्री-पुरुष समानतेची समज नसण्यावरून विसंवाद 11. आधुनिक किंवा पारंपरिक विचारांमुळे विसंवाद 12. व्यसनं आणि भांडणं 13. नवराबायको आणि कुटुंबातले समाईक धागे 14. कुटुंबासाठी वेळ देणं 15. व्यवस्थापन कौशल्यांचा वापर 16. विवाहाचा अर्थ कळणं 17. सर्वात महत्त्वाची गोष्ट– संवाद 18. राग, धमक्या, रागवारागवी, रुसणं 19. मारहाण– हिंसेचे प्रकार 20. लग्न ठरवण्याची पद्धत– सगळ्याचं मूळ 21. लग्नाचा करार 22. मानसशास्त्राची मदत 23. करण्याजोग्या गोष्टी 24. खरं प्रेम म्हणजे काय ते न समजणं 25. भांडणांचं टोक– घटस्फोट

3) मी आणि शोभामधले विसंवाद

4) मी आणि शोभा यांचं सहजीवन, आम्ही काढलेले उपाय

5) राग आवरण्याचे मार्ग

6) आभार

●

पुस्तक-2

जोडीदाराची निवड

●

लैंगिक शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

प्रश्नावलीच्या देवघेवीची कल्पना 5. प्राथमिक प्रश्नावली 6. सविस्तर प्रश्नावली– बाह्यरूप 7. सविस्तर प्रश्नावली– पत्रिका 8. सविस्तर प्रश्नावली– शिक्षण/व्यासंग 9. सविस्तर प्रश्नावली– आरोग्य 10. सविस्तर प्रश्नावली– स्वभाव 11. सविस्तर प्रश्नावली– पैशांबद्दलची विचारसरणी 12. सविस्तर प्रश्नावली– मासिक प्राप्ती 13. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष समानता 14. सविस्तर प्रश्नावली– स्त्री-पुरुष लैंगिक संबंध 15. सविस्तर प्रश्नावली– कुटुंब 16. सविस्तर प्रश्नावली– मुलं 17. सविस्तर प्रश्नावली– लग्न समारंभ 18. सविस्तर प्रश्नावली– वैवाहिक आयुष्याचं सार 19. सविस्तर प्रश्नावली– महत्त्व कशाला? 20. त्रोटक सविस्तर माहिती 21. भावी जोडीदाराच्या प्रत्यक्ष भेटीपूर्वीचे पर्याय 22. जोडीदाराबद्दल अंतिम निर्णयप्रक्रिया 23. जीवनसाथची कार्यशाळा नेमकी कशी असते? 24. निवडक गटाचं जोडीदाराच्या निवडीसाठी समुपदेशन 25. जोडीदार ठरल्यावर लग्नापूर्वीची बौद्धिक चाचणी (मॅरेज मॅच्युरिटी इंडिकेटर) 26. अविचाराची शक्यता 27. लग्न ठरल्यानंतरची कर्तव्यं 28. जोडीदाराची निवड या कार्यशाळेत वापरायचे खेळ

9) लैंगिक शिक्षणाची गरज

1. या लेखाची पार्श्वभूमी 2. भारतातलं पारंपरिक कामशास्त्र आणि जगातली परिस्थिती 3. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्राची लैंगिक संबंधाबद्दलची भूमिका 4. सध्याच्या प्रश्नाचं स्वरूप 5. लैंगिक शिक्षणाची कार्यशाळा 6. लैंगिक संबंधातलं समुपदेशन

10) लैंगिक शिक्षण– जन्मापासून 5 वर्षांपर्यंतच्या मुलामुलींबद्दल

11) लैंगिक शिक्षण– 5 ते 10 वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींसाठी

12) लैंगिक शिक्षण– 10 ते 16 वयापर्यंतच्या मुला-मुलींसाठी

13) लैंगिक शिक्षण – तरुणांसाठी – लग्नापूर्वी

1. सध्याची परिस्थिती 2. लैंगिक भावनांचा गोंधळ 3. मुलग्यांच्या विकृत गप्पा 4. हस्तमैथुन 5. वेश्येकडे जाण्याचा मोह 6. मुलींच्या मनातल्या कल्पना 7. मुलगे आणि मुली यांची चांगली मैत्री 8. लैंगिक शिक्षणाची अविवाहितांसाठी कार्यशाळा 9. चुकीच्या गोष्टींची शक्यता– रेव्ह पार्टी 10. प्रेमभंग आणि लग्नापूर्वी लैंगिक संबंध 11. लग्नापूर्वी लैंगिक संबंधाबद्दल वैयक्तिक समुपदेशन 12. परदेशातली परिस्थिती 13. लैंगिक संबंधांमागची मानसशास्त्रीय बैठक

●

पुस्तक-3

व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा अर्थ

●

पुरुष पालकांचं शिक्षण

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

7) इ.क्यू. (इमोशनल कोशंट) म्हणजेच भावनिक गुणांक

1. भावनिक गुणांकाची (इ.क्यू.) मूळ कल्पना 2. स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या भावनांकातला फरक 3. भावनांक सुधारण्याचं शिक्षण 4. समुपदेशनातले अनुभव 5. शोभा आणि मी यांचं उदाहरण 6. भावनांक आणि समाजकार्य यांचा संबंध 7. भावनांकावर वय, आरोग्य यांचा परिणाम

8) पुरुष पालकांचं शिक्षण

1. माझं स्वतःचं लहानपण 2. पालक शिक्षणाची थिअरी आणि प्रॅक्टिस 3. शोभाचं आणि माझं पालक-शिक्षणातलं काम 4. मूल कशासाठी? 5. मुलाची शारीरिक वाढ 6. सर्वसाधारण पुरुष पालकाची सध्याची वागणूक 7. पालकत्वाचे नवे प्रश्न / उपायांचा शोध 8. मुलांना अपमानास्पद वागणूक 9. मुलं बिघडण्याची कारणं 10. आईवडलांचं एकमेकांशी नातं 11. आजोबांची भूमिका 12. शिक्षण-शाळा-अभ्यास-समुपदेशन 13. मुलांचा भाषाविकास 14. मुलांना केलेल्या शिक्षा 15. मुलांना स्वच्छतेचं शिक्षण 16. मुलांसाठी लैंगिक शिक्षण 17. मुलांसाठी वेळ काढणं 18. मुलांची पैशाबद्दलची समज 19. मुलांचे खेळ - आरोग्य 20. मुलांमुळे करिअरमधे खंड 21. भावंडांचे संबंध 22. समाजाचं मुलांकडे दुर्लक्ष 23. संस्कार 24. 'स्पेशल' मुलं 25. तरुणांचे पालक म्हणून जबाबदाऱ्या 26. पालकत्वामागचा समतोल विचार

9) आभार

●

पुस्तक-4

आर्थिक व्यक्तिमत्त्व

●

करीअरचं नियोजन

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-5

व्यवस्थापनशास्त्र – वैवाहिक आणि रोजच्या आयुष्यातलं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-6

स्वावलंबन, आत्मसन्मान

●

स्त्री-पुरुष असमानतेची रूपं

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-7

उत्सवी प्रवृत्ती

●

लग्नसमारंभ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

टीप : जीवनसाथ पुस्तक संचातल्या पुस्तक क्र. 8 चा सविस्तर अनुक्रम या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भागात दिला आहे.

पुस्तक-9 (नऊ)

रोजच्या आयुष्यातलं तत्त्वज्ञान

●

समतोल विचारांचं महत्त्व

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

5) सरकार

6) राजकीय लोकशाही

7) बहुमत

8) सहकारी संस्था

9) राजकारण

10) निवडणूक

11) राष्ट्र

12) राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधुत्व/विश्वशांती

13) कायदा आणि पोलीस यंत्रणा

14) स्वतःच्या आयुष्याविषयी समतोल विचार

15) आभार

●

पुस्तक-10

ज्येष्ठांशी संवाद

●

मृत्यूसंबंधी स्पष्ट विचार

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

पुस्तक-11

समुपदेशनाच्या अनेक नव्या पद्धती

●

जीवनसाथ समुपदेशन संस्था

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

---

5) वैयक्तिक समुपदेशन

1. या लेखाची मूळ कल्पना 2. घरातल्या किंवा ओळखीतल्या ज्येष्ठांचा सल्ला 3. मार्गदर्शन आणि समुपदेशनातला फरक 4. समुपदेशनातली मूलतत्त्वं किंवा गृहितं 5. भारत आणि पाश्चात्त्य देशातली परिस्थिती 6. समुपदेशकाची खास कौशल्यं– ऐकणं, बोलणं 7. समुपदेशनाची सुरुवात आणि प्रगती 8. समुपदेशकानी स्वतःविषयी सांगणं 9. समुपदेशनाचे प्रकार 10. क्रिटिकल ॲनॅलिसिस पद्धतीचं समुपदेशन 11. आत्मविश्वास वाढविण्यासाठी समुपदेशन 12. समुपदेशनातली तंत्रं 13. समुपदेशनातली पथ्यं 14. समुपदेशनातल्या अडचणी 15. समुपदेशकांच्या श्रेणी 16. विवाहपूर्व समुपदेशन 17. घटस्फोटापूर्वीचं समुपदेशन 18. ग्रुप काऊन्सेलिंग– एक उत्तम पर्याय 19. निष्कर्ष

6) रिफर्ड काऊन्सेलिंग ऊर्फ अप्रत्यक्ष समुपदेशन किंवा कॅरम बोर्ड काऊन्सेलिंग

7) जागा-पद्धत-व्यवहार, सूत्रधार तयार करणं वगैरे

8) या पुस्तकाचा उपयोग

9) अभ्यास मंडळात न येण्याची कारणं

10) आभार

●

पुस्तक-12

कौटुंबिक स्वास्थ्यासाठी उपाय,

●

जीवनसाथमधले खेळ

या पुस्तकाचा सविस्तर अनुक्रम

●

अनिल भागवत यांनी लिहिलेली आणखी पुस्तकं

पुस्तक-1

घर पाहावं बांधून (पाचवी आवृत्ती)

■ प्रस्तावना ■ प्रमोटर बिल्डर्सविषयी ■ आर्किटेक्ट्स्‌विषयी ■ बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरविषयी ■ आर. सी. सी. डिझायनरविषयी ■ मटेरियल सप्लायरविषयी ■ बांधकाम कामगारांविषयी ■ पेटी कॉन्ट्रॅक्टर्सविषयी ■ गळणारं छप्पर ■ ॲग्रीमेंटवर सही ■ सिस्टिम बिल्डिंग ■ बांधकाम आणि सरकार ■ बांधकाम, कर्ज, सरकारी कर आणि आपण ■ कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट कन्सल्टंटविषयी ■ बांधकामातले तांत्रिक शब्द आणि चेकलिस्ट

पुस्तक-2

लग्न पाहावं करून (उपलब्ध नाही)

पुस्तक-3

व्यवस्थापनशास्त्र तुमच्यासाठी (दुसरी आवृत्ती)

■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - एक आवश्यक व्यवस्थापनशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटची मूलतत्त्वं ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंटमधल्या महत्त्वाच्या गोष्टी आणि फायलिंग ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि कामगार ■ क्वालिटी मॅनेजमेंट आणि सुपरवायझर ■ स्पीड मॅनेजमेंट - एक जादूसारखं तंत्र ■ कॉस्ट मॅनेजमेंट ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि इतर तज्ज्ञ ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट आणि मालक ■ डिझास्टर मॅनेजमेंट - आपत्ती निवारणशास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - मोहीम फत्ते करण्याचं शास्त्र ■ मॉनिटरिंग मॅनेजमेंट - बहुउपयोगीशास्त्र ■ तुम्ही कोणीही असा - ते वापरता येईल

●

लेखक अनिल भागवत यांचे ऋणी आहेत.

- डॉ. उल्हास लुकतुके - 1997 साली जीवनसाथ सुरू करताना स्पष्ट विचारांची जीवनभर साथ हा उद्देश स्पष्ट होता, पण त्याची सुरुवात करण्यासाठी यांची खूप मदत झाली.
- जीवनसाथ - मुंबई शाखा माझ्या आईसाठी सुरू केली. मुंबईतल्या लोकांना या अभ्यासाची प्रचंड गरज होती, अजूनही आहे. तिच्या घरीच कार्यक्रम व्हायचे.
- मुंबई जीवनसाथचा भक्कम आधार होता सुशील आणि विनीता हाटे. त्यांची निष्ठा, संयोजनकौशल्य आणि आमची वैयक्तिक मैत्री मला खूप महत्त्वाची वाटते.
- पुण्यातलं जीवनसाथ अभ्यास मंडळ पहिल्या दिवसापासून जोरातच चाललं. बरीच वर्षं ते शनिवार पेठेतल्या आमच्या घरी होतं. आता आमच्याच कर्वेनगरच्या घरी अभ्यास मंडळ चालतं. गेली दोन वर्षं मी हा पुस्तकसंच लिहीत असताना मला अनेकांनी मदत केली. त्यातल्या काहींनी या पुस्तकांसाठी काही विषयांसाठी मजकूर लिहिला, काहींनी टायपिंगची, डिक्टेशन घेऊन लिहिण्याची मदत केली. मजकुरावरच्या त्यांच्या प्रतिक्रियादेखील महत्त्वाच्या होत्या. त्यांची नावं मी आडनावाच्या आद्याक्षरांच्या क्रमानी देतोय. ती आद्याक्षरं इंग्लिश अल्फाबेटाप्रमाणे रचली आहेत.

  बोकील डॉ. आशा, बोरोटीकर तुषार, भोइटे आमोद, दंडवते मानसी, डिंबळे रामभाऊ, देगवेकर दिलीप, देशपांडे केशव, देवराज शिल्पा, गोवित्रीकर सुनीति, जाधव विजय, कानेटकर श्रद्धा, कुळकर्णी पौर्णिमा,

क्षेमकल्याणी ममता, लिमये हर्षद, लिमये गौरी गोळे, मेढेकर शैवल, मोहाडीकर डॉ. लीना, मुद्‌गल दीपा, मुद्‌गल स्मिता, मुळे अंजली, म्हैसकर मकरंद, नागपूरकर माधव, पाटणकर राजेश, पाटील मोहिनी, पाटील स्मिता, पाटील विक्रांत, राऊळ श्यामल, रावराणे गीता, साठे आशा, शुक्ल डॉ. भूषण, संचेती अपूर्वा, संचेती आदिती, वळसंगकर अनिल, तेलंग डॉ. नीलू.

- जीवनसाथ अभ्यास मंडळाचे सगळे सभासद. जीवनसाथ समुपदेशन केंद्राचे सगळे समुपदेशनार्थी.
- शोभा तर या पुस्तकसंचाच्या थोड्या भागाची सह-लेखिकाच आहे. मी आमच्या वैवाहिक आयुष्यात तिच्यावर केलेल्या अन्यायाचा मी अनेक ठिकाणी उल्लेख केलाच आहे. शिवाय या पुस्तक-प्रक्रियेच्या दोन वर्षांच्या काळातही तिच्या मदतीशिवाय, टीकेशिवाय, सूचनांशिवाय आणि प्रोत्साहनाशिवाय मी इथपर्यंत पोचलोच नसतो.

  शोनील आणि आभामुळे तर जीवनसाथ संस्था सुरू झाली. अनास्तेसिया, श्रेयस आणि आमची नातवंडं ओजस, तुहिन आणि डॉमिनिक यांना पुढे त्यांच्या आयुष्यात माझ्या या कार्यशाळांचा आणि त्याबद्दलच्या लिखाणाचा उपयोग व्हावा हा माझा ऊर्जास्रोत होता.
- हे पुस्तक या अवस्थेपर्यंत आणण्यात श्री. हेमंत जोशी आणि सौ. संगीता सरदेसाई यांचा मोठा वाटा आहे.
- मी पुस्तकसंचात म्हटलं आहे तेच पुन्हा सांगतो. वाचकांच्या प्रतिक्रिया नाव, फोटो पत्त्यासह पुढच्या आवृत्तीत छापणार आहे. कौतुक, टीका दोन्हीचं स्वागत असेल. अशा प्रत्येकाचं माझ्यावर ऋण असणार आहे.

– अनिल भागवत

वैवाहिक आणि कौटुंबिक समुपदेशक

'आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचं खरं मर्म एकच – चांगल्या-वाईट अनेक घटना तुमच्या वाट्याला आयुष्यभर येणार. त्यांची हाताळणी कशी करायची हे दुसरी कुठचीही शक्ती किंवा व्यक्ती ठरवणार नसते. ते तुम्ही स्वतः ठरवायचं असतं. त्यासाठी त्या घटनेच्या सर्व अंगांचा अभ्यास स्वतःला करावा लागतो. त्या अभ्यासासाठी जीवनभर स्पष्ट विचारांची साथ लागते. म्हणजेच जीवनसाथ.'

या पुस्तकाविषयी

ईश्वर, धर्म, जात, पुनर्जन्म या सगळ्या कल्पनांच्या बाबतीत समतोल विचार करायला हवा आहे यात वादच नाही. तो कसा करायचा याबद्दलचं सविस्तर विवेचन या पुस्तकात आहे.

समाजातल्या रूढी, परंपरा निरक्षरांसाठी योजल्या होत्या. अजूनही निरक्षराला रूढी पाळणं सोपं वाटतं. कारण लक्षात ठेवण्याच्या सोयीसाठी त्या निसर्गाशी, सूर्य-चंद्राशी, शेतीशी जोडल्या होत्या. सुशिक्षितांसाठी त्या रूढींची गरज नाही. पण हे स्पष्ट शब्दात कोणीतरी सांगण्याची गरज आहे. ही गोष्ट जाणकारांना माहिती असते की पारंपरिक रूढी पाळणं म्हणजे संस्कार नाहीत. संस्कार म्हणजे 'बलवानानी दुर्बलाला मदत करण्याची कर्तव्य भावना.' तो संस्कार कसा करायचा हे लेखक तपशीलात समजावून सांगतो.

स्वतःच्या समाधानासाठी प्रत्येक म्हणजे प्रत्येक जण जगतो. आपल्या कुटुंबासाठीही खूप जण बरंच काहीतरी करत असतात. निराळ्या शब्दात हीच गोष्ट अशी मांडता येईल– स्वकेंद्री प्रत्येक जण असतो. काही जबाबदार लोक कुटुंबकेंद्री होतात. कुटुंबाबाहेरच्यांसाठी काहीतरी निरपेक्षपणे काम करणारे कमी असतात. त्यात फार मोठं समाधान आहे हे त्यांना समजलेलं असतं. तसं काहीतरी काम करण्याची धडपड केल्याशिवाय स्वतःचं आयुष्य अर्थपूर्ण होत नाही. अशांना समाजकेंद्री म्हणतात. प्रत्येक माणसाला समाजकार्य कसं करता येईल हे लेखकानी पटवून दिलेलं आहे.